मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
( जिल्हा वाचनालय )

मा १३२

खंड ४

मासिकाचे नांव —

संपादक —

मासिक क्रमांक — सन —

अंक —

( महिने )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. जुनी मासिके (संदर्भ)

ता...........
धार्मिक शाखा

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २१ वें<br>मास ५ वा | मार्गशीर्ष १८४९<br>जानेवारी १९२८ | नवें वर्ष ८ वें<br>अंक १ ला |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही.पी. नें रु. ३०३

मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३०० येथें आपल्या " हनुमान " छापखान्यात छापिलें.

| विषय | पृष्ठ. |
| --- | --- |
| १ मंगलाचरण | १ |
| २ संतसमागम | २ |
| ३ साधुसंताच्या मेळ्यांत | ३ |
| ४ परिभ्रमण | ४ |
| ५ ब्राह्मण परिषद | ५ |
| ६ साभार स्वीकार | ६–८ |
| ७ गृहस्थाश्रमाचा आदर्श | ९–१२ |
| ८ डॉ. मोरे–एक सद्गृहस्थ | १३–१४ |
| ९ कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे | १५–२० |
| १० माझी जिंदगी ५ हजार | २१–२३ |
| ११ एक योगभ्रष्ट साध्वी | २४–२८ |
| १२ मनोबागेंतला सोनचाफा | २९–३७ |
| १३ धर्मविचार व स्त्रिया | ३८–४० |


# निरंजनमाधवाची कविता.

भाग २–३

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्याच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गायिलेलें प्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुटकाव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेंत सांगणारीं अशीं घातली आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जें " सुभद्रा–चंपू " नांवाचें या कर्त्यानें केलें आहे तें छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमींचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही भाग एकत्र बांधविले आहेत. किंमत रु. १॥.

मुमुक्षु मासिक. वर्ष ८ वें अंक–१ ला

# मंगलाचरण.



पतिं विश्वस्यात्मेश्वरं शाश्वतं शिवमच्युतम् ।
नारायणं महाज्ञेयं विश्वात्मानं परायणम् ॥ १ ॥
नारायणपरो ज्योतिरात्मा नारायणः परः ।
नारायणपरं ब्रह्म तत्वं नारायणः परः ॥ २ ॥
नारायणपरो ध्याता ध्यानं नारायणः परः ।
यच्च किंचिज्जगत्सर्वं दृश्यते श्रूयतेऽपिवा ॥ ३ ॥
अंतर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थितः ।
अनंतमव्ययं कविं समुद्रेऽतं विश्वशंभुवं ॥ ४ ॥
सद्योजातं प्रपद्यामि सद्योजाताय वै नमः ।
भवे भवे नातिभवे भवोद्भवाय वै नमः ॥ ५ ॥

---

वामदेवाय नमो ज्येष्ठाय नमः श्रेष्ठाय नमो रुद्रकालाय नमः कलविकरणाय नमो बलविकरणाय नमो बलाय नमो बलप्रमथनाय नमः सर्वभूतदमनाय नमो मनोन्मनाय नमः ॥

ईशानः सर्वविद्यानामीश्वरः सर्वभूतानां ब्रह्माधिपतिर्ब्रह्मणोऽधिपतिर्ब्रह्मा शिवो मे अस्तु सदाशिवोऽहम् ॥

ऋतं सत्यं परं ब्रह्म पुरुषं कृष्णपिंगलम् ।
ऊर्ध्वरेतं विरूपाक्षं विश्वरूपाय वै नमोनमः ॥

—नारायणोपनिषद्.

# संतसमागम.

## १ गुरु.

आम्हां सद्गुरु तोचि परब्रह्म । ऐसा नित्य निजभाव सप्रेम ।
हेचि गुरुसेवा उत्तमोत्तम । शिष्य परब्रह्म स्वयें होय ॥ (एकनाथ).

## २ गीताभागवत.

(१) हरिनाम गर्जतां नाहीं भयचिंता ।
ऐसी बोले गीता भागवत ॥ १ ॥ (चोखामेळा).

(२) गीता भागवत करिती श्रवण ।
आणिक चिंतन विठोबाचें ॥ (तुकाराम).

(३) समाधान घडे साधूचे संगतीं ।
गीता भागवतीं हेंचि आहे ॥ (रामदास).

## ३ अनुभव.

प्राणेंद्रियादि सकळांसहि जो कळेना
वाचेस आणिक मनासहि आकळेना ।
शुद्धें मनें अनुभवाप्रति ये तथापि
तेव्हां पतंग मन होय चिदात्मदीपीं ॥ (वामन).

## ४ हरिदास.

हो कां भलतें कूळ । शुचि अथवा चांडाळ ॥
म्हणवी हरिचा दास । तुका म्हणे धन्य त्यास ॥

## ५ भक्त.

गंगा सागरीं मीनली मिळे । मीनली त्याचीच त्यावरी लोळे ।
तैसा भक्त मिळोनि भावबळें । माझे भक्तीचे सोहळे मजमाजी भोगी ॥
(एकनाथ).

## ६ भूतीं हरि.

सुख द्यावें ईश्वरातें । ऐसें वाटे जयातें ।
तेणें प्रतिशरीरीं जीवात्मयातें । सुख द्यावें ॥ (वामन).

## ७ लोकसंग्रह.

अभेदभक्ति वैराग्य ज्ञान । स्वयें आचरोनि आपण ।
शेखीं लावावें इतर जन । लोकसंग्रह या नांव ॥ (एकनाथ).

# साधुसंताच्या मेळ्यांत.

## लिंगायत व योगी.

सुमारें वीस वर्षांपूर्वी पुढील गोष्ट काशीक्षेत्रीं घडलेली आहे.... घाटावर एका धर्मशाळेच्या कोपऱ्यांत एक लांकडी तावदानाचें कपाट होतें व त्यांत एक योगी पद्मासन घालून आत्मा ब्रह्मांडीं नेऊन प्रहरोनूहर बसत असे. वर्णानें गौर व तेजःपुंज अशी ही मूर्ति असे. घाटावर हजारों यात्रा स्नानदानार्थ जमत असे. त्यांत एकदा सोलापुराकडील एक संपन्न लिंगायत बायकापोरें व नोकर-चाकर घेऊन स्नानार्थ आला होता. २५–३० माणूस त्याच्याबरोबर. तो स्नानास गंगेच्या पाण्यांत उतरला असतांना पांच सात बुचकळ्या मारल्यावर पाहतो तों गळ्यांतील लिंगांतून महादेव उदकांत पडल्याचें त्यास समजलें. महादेव सांपडेना. पुष्कळांनीं शोध केला, महादेव नाहीं. निष्ठावंत लिंगायतास महादेव नाहीं तर देहत्यागच करावासा वाटतो. तो लिंगायत फार भाविक होता. महादेव सांपडला नाहीं तर देह गंगार्पण करण्याचा निश्चय त्यानें सर्वांस सांगितला. त्याचीं माणसें घाबरलीं व रडारड सुरू झाली. इतक्यांत तो योगी कपाटांतून निघाला व वाऱ्यासारखा धांवत येऊन त्यानें गंगेंत बुडी मारली व एका बुचकळींत बाहेर येऊन हातांतून हरवलेला महादेव लिंगायताच्या हातीं दिला व तो पायां पडायला लागण्यापूर्वीं धूम ठोकीत कपाटांत जाऊन बसला. ही गोष्ट आमच्या ‘ माई ’ च्या डोळ्यांसमोर घडलेली आहे.

---

१. जीवात्मा व विश्वात्मा यांचें ऐक्य होऊन भूतहितार्थ आत्मप्रेमानें झटणें हा खरा वेदांत होय.

२. आत्मसंतोषासारखें आरोग्यदायक दुसरें कांहीं नाहीं.

३. हें कठिण आहे, हें मला साधायचें नाहीं असलें रडगाणें गात बसूं नकोस. ईशकृपाबलानें हें मी साधीनच असा आत्मविश्वास ठेवून कार्याला लाग. यश तुझ्या घरचें आहे.

४. कार्य करीत असतांना उत्साहबळ वाढतें. कार्यांत आनंद व सुख आहे. सत्कार्याचरण हाच मोठा आनंद आहे.

५. पराचें चित्त दुखवणें म्हणजे आत्मबल कमी करणें होय.

# परिभ्रमण.

येवलें व नागपूर येथील लोकांच्या आमंत्रणावरून रा. पांगारकर हे चंपाषष्ठीच्या दिवशीं सायंकाळीं येवलें येथें गेले. तेथें त्या दिवशीं व दुसऱ्या दिवशीं टिळक विद्यालयाचे दिवाणखान्यांत रात्रीं दोन प्रवचनें झालीं. सायंकाळीं येवल्यास अनेक वर्षांचें येवल्याचें पाण्याचें दुर्भिक्ष काढून टाकणारा तलाव त्यांनीं पाहिला. तलाव खोदण्याचें काम चालू आहे तें पाहण्यांत आलें. गंगाराम छबिलदास पेढीचे मालक वल्लभशेट यांचे औदार्याचें हें स्मारक होणार आहे. यंत्राच्या साह्यानें जें काम ४ महिन्यांत झालें असतें, त्यासाठीं हजार बाराशें माणसांचें दोन वर्षें पोट भरतें एवढ्याच थोर विचारामुळें वल्लभशेट यांनीं यंत्रें न आणण्याचें ठरविलें हें पाहून आनंद झाला. टिळकविद्यालयाचें काम रा. आपटे प्रभृति चालक अत्यंत स्वार्थत्यागानें पण हौसेनें कर्तव्य म्हणून करीत आहेत. तेथून ता० २ च्या नागपूर-मेलनें निघून रा. पांगारकर हे ता० ३ डिसेंबर रोजीं नागपूर स्टेशनवर उतरले. हेमंतव्याख्यान मालेंत ता० ३ व ता० ४ रोजीं 'ज्ञानेश्वरांचें अवतारकार्य' व 'रामदास व त्यांच्या शिकवणी' या विषयांवर त्यांचीं दोन जाहीर व्याख्यानें झालीं. ता० ४ रोजीं सकाळीं महाराष्ट्रभाषासंवर्धक मंडळाच्या वार्षिकोत्सवप्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें हिस्लॉप कॉलेजमध्यें त्यांचें व्याख्यान झालें. मराठी संतकवींनीं भक्तिमार्गप्रसारार्थ किती आवडीनें, निरलसपणें व निर्लोभपणें मराठी भाषेची सेवा केली व तिला मांगल्य व पावित्र्य आणून दिलें, हें ज्ञानेश्वरादि संतकवींच्या वचनाधारें त्यांनीं दाखविलें. यापुढें ग्रंथकारांनीं ही परंपरा राखावी व भिकार लेखांनीं व काव्यांनीं मराठी वाङ्मय दूषित होऊं देऊं नये हें सांगितलें. महाराष्ट्र भाषारूपगंगा ही ज्ञानेश्वरांच्या मुखांतून प्रगट झाली व ती नामदेवांच्या टाळावर, तुकोबांच्या झोंपडींत, सज्जनगडच्या डोंगरावर, पैठणच्या नाथांच्या मठांत, मोरोपंतांच्या खोलींत वाढली व तिनें आपल्या भक्तिज्ञानवैराग्याच्या निर्मळ लहरींनीं सारा महाराष्ट्र भिजविला. हिस्लाप व मॉरिस कॉलेजांतील विद्यार्थ्यांत भंड्यांचा सामना झाला तो फार मनोरंजक झाला. मॉरिस कॉलेजांतील २ विद्यार्थ्यांनीं तर भंडयांच्या सामन्यांत शीघ्रकवित्वही दाखविलें. आमच्याकडे विद्यार्थ्यांस श्लोक पाठ येत नाहींत व म्हणण्याचीही लाज वाटते! पण नागपूर-कॉलेजांतील विद्यार्थ्यांत पाठांतराची व कवित्वाची आवड पाहून आनंद झाला. त्याच दिवशीं दुपारीं 'तुकारामसमाजानें' रा. पांगारकर यांस पानसुपारी केली व ता. ५ रोजीं

सायंकाळीं गीतीजयन्तीनिमित्त टिळकविद्यालयाचे पटांगणावर त्यांचें व्याख्यान झालें व रात्रीं अन्तुलीकर महादेवाचे मंदिरांत कीर्तन झालें. गीतेवरील आचार्यभाष्य, ज्ञानेश्वरी, यथार्थदीपिका, व रहस्य ह्या चार ग्रंथांतील विशेष सांगून चारही ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास करण्यास त्यांनीं सांगितलें. गीतेंत कर्म, ज्ञान व उपासना तीनही सांगितलीं असून, प्रत्येकानें आपापल्या काळास अनुसरून व आपापल्या अधिकाराप्रमाणें भाष्यें केलीं आहेत. आपल्या आवडीचा एखादा ग्रंथ असला तरी इतर ग्रंथांविषयीं आदर ठेवावा. ता० ६ रोजीं सायंकाळीं मॉरिस कॉलेजमध्यें 'संशोधनकार्यांतला स्वानुभव' यावर व्याख्यान झालें व रात्रीं बर्डीवर प्रवचन झालें. ता० ७ रोजीं वर्ध्यास प्रवचन होऊन ता० ८ रोजीं ते आकोल्यास आले. तेथें २ दिवस ब्राह्मणपरिषदेचें कार्य पाहून ता० ११ रोजीं सकाळीं रा. पांगारकर नाशकास परत आले. सर्व कार्यक्रम आनंदाचा झाला नागपूर येथील जनतेचा व विशेषतः विद्यार्थीवर्गाचा उत्साह पाहून फार समाधान झालें.

---

# ब्राह्मणपरिषद्.

आकोल्याच्या ब्राह्मणपरिषदेचा कार्यक्रम वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालाच आहे. परिषदेच्या चालकांनीं ज्या सुधारणांचे ठराव पास केले, त्यांस विरोधही बराच आहे, व ठराव पास करणें व ठरावांची अंमलबजावणी होणें यांत अंतर आहे. ब्राह्मणांचें संघट्टण व पोटवर्गांचें एकीकरण ह्या दोन विषयांची बरीच चर्चा झाली. ठरावांत कांहीं एकमतानें पास झाले व कांहींवर मतभेद झाला. जेवढ्यावर मतैक्य होणें शक्य तेवढेच तूर्त घेऊन मतभेदाचे विषय पुढें ढकलले असते तर बरें झालें असतें. ब्राह्मणांना ज्या गुणांसाठीं पूर्वीपासून चारी वर्ण मानीत आले, त्या गुणांचा उत्कर्ष कसा होईल इकडे मुख्य लक्ष द्यावयास पाहिजे. स्नानसंध्या, देवपूजा, नैवेद्यवैश्वदेव, पंचमहायज्ञ या आचारधर्मावरचा कागदी ठराव पास झाला. पण हे आचार ब्राह्मणमात्रानें आधीं सुधारले पाहिजेत. 'ब्राह्मण बुद्धीपासूनि चेवले। आचारापासूनि भ्रष्टले' अशी मुसलमानी अंमलांत ब्राह्मणवर्गाची दुरवस्था झाली होती तीच फार अधिक प्रमाणावर आज झाली आहे. सहभोजन व विवाहस्वातंत्र्य हें परिषदेनें मान्य केलें पण आचारशुद्धीकडे प्रथम व मुख्य लक्ष पुरविलें पाहिजे. ब्राह्मण हे आचारविचारसंपन्न झाले कीं चातुर्वर्ण्याची गाडी रुळावर येईल. 'हें अवघें आपणापाशीं। येथें बोल नाहीं जनांसी' हें ब्राह्मणांनीं लक्षांत ठेवावें. शिक्षणामुळें सांप्रत विचाराची वाढ झाली असली तरी आचार ढिलावल्यामुळें विचार पाखांडांत नेत आहेत. 'आधीं पाहिजे आचार। मग पाहिजे विचार। आचारविचारें पैलपार। पाविजेतो' हें समर्थांचें सूत्र बहुमोल आहे.

---

# साभार स्वीकार.

१ **सद्भक्तिविजय** ( हरिभक्त रामचंद्र शंकर टाकी बी. ए., शंकरलॉज, सरस्वतीबाग, अंधेरी, (बी. बी. सी. आय्.) किं. १०८ ). श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वेळेपासून अद्वैतभक्ति उर्फ ज्ञानभक्ति, महाराष्ट्रभर विकसली आहे. तिचे मुख्य प्रसारक स्वतः महाराज असल्यामुळें त्यांचें चरित्र व ग्रंथ यांचा सकल संतांच्या विचारांशीं समन्वय करीत करीत हरिभक्त टाकी यांनीं प्रस्तुत ग्रंथांत सद्भक्तिविजय कसा झाला हें प्रेमळपणानें दाखविलें आहे. श्रीनारायणमहाराज जालवणकर यांच्या परंपरेंतले हे सप्रेम गुरुभक्त असून वामनपंडितांच्या कवितेवर विशेष लुब्ध आहेत. सद्भक्तिमय कवितासरितेंत निरंतर पोंहत असल्यामुळें यांनीं हाताला लागलीं तीं संतवचनमौक्तिकें या ग्रंथांत मुक्तहस्तानें वाचकांच्या हवालीं केलीं आहेत. ज्ञानेश्वरमहाराजांनीं प्रस्थापिलेल्या सद्भक्तीचाच स्पष्टार्थ वामनपंडितांनीं आपल्या यथार्थदीपिकेंत केला, अर्थात् 'भावार्थदीपिकेचाच' स्पष्टार्थ 'यथार्थदीपिकेंत' व्यक्त केला यामुळें ज्ञानेश्वर व वामन यांच्या गीताटीकांचा परस्पर समन्वयच आहे अशी ग्रंथकाराची बुद्धि आहे. ती आम्हांस फार आवडली. उगाच विरोध माजवीत बसण्यापेक्षां समन्वयाच्या बुद्धीनें सर्वांकडे पाहावें यांतच मौज आहे. ग्रंथ प्रेमळांनीं अवश्य पहावा.

२ **सन १९२५ चें मराठी वाङ्मय** ( रा. म. का. कारखाननीस, बी. ए. चिटणीस, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणें, किं. रु. १ ). अशा तऱ्हेचा उपक्रम कोणी तरी करायलाच पाहिजे होता, तो रा. कारखाननीस यांनीं करून वाङ्मयाभ्यासी लोकांची चांगली सोय केली आहे. हा क्रम असाच सतत चालू रहावा अशी आमची इच्छा आहे. मराठी भाषेंत १९२५ सालीं चरित्रें, नाटकें, काव्यें, कादंबऱ्या, शास्त्रीय ग्रंथ वगैरे जें वाङ्मय निर्माण झालें त्याचा हा आढावा आहे व तो चांगला साधला आहे. ग्रंथांवर संक्षिप्त अभिप्राय देतांना प्रियाप्रियभाव प्रकट झालेला दिसतो. अधिक निःपक्षपातीपणा असावा एवढीच आमची सूचना आहे.

३. **तुकारामाच्या अभंगांची चर्चा**, खंड १ ला, अभंग १–३५०. कै० वासुदेवराव पटवर्धन व प्रो. केळकर यांनीं तुकाराम चर्चा मंडळाच्या टिपणावरून लिहिलेली चर्चा रा. माधव रामचंद्र जोशी, नारायणपेठ २९९ पुणें यांनीं प्रकाशित केली आहे. प्रस्तुत खंडांत ३५० अभंगांची चर्चा छापली आहे. माडगांवकरांच्या गाथेवरून अभंगांचा क्रम धरिला आहे. पुण्यांत प्रार्थनासमाजमंदिरांत १९०१ ते १९१५ पर्यंत तुकाराममंडळाच्या बैठकी होऊन त्यांत तुकोबांच्या अभंगांची चर्चा चाले. ह्या चर्चेंत डॉ० भांडारकर,

रा. ब. मराठे, व प्रो. पटवर्धन यांचाच मुख्य भाग असे. ती चर्चा प्रो. पटवर्धन सारांशानें लिहून ठेवीत. ह्या विद्वान मंडळींनीं पदशः अर्थ लावण्याचा यत्न केला व हा यत्न तुकारामाभ्यासी लोकांना उपयुक्त वाटेल यांत शंका नाहीं. तुकाराम, विठ्ठल, मूर्तिपूजा, सगुणनिर्गुण, याविषयीं या मंडळाचें पूर्वग्रह कांहीं ठरलेले असल्यामुळें त्यांनीं अभंगांच्या शेवटीं शेरे मारले आहेत ते लोकांना रुचणें शक्य नाहीं. अनेक अभंगांवर 'विठोबाला कृष्णाचा अवतार समजून विठोबाच्या मूर्तीवरच प्रेम करणाऱ्या कवीनें रचलेले, स्वतंत्र प्रतिभेच्या उदयापूर्वींचे, लौकिक ग्रहांनीं आंखलेले' अशा प्रकारचे रुक्ष शेरे आहेत. ज्या अभंगांत सगुण मूर्ति, विठ्ठल आहे ते अभंग पूर्वावस्थेंतले व ज्यांत निर्गुण, अद्वैत वगैरे आहे ते पूर्णावस्थेंतले—अशा प्रकारची चर्चाकारांची जी दृष्टि तीहून फार वेगळी दृष्टि, सांप्रदायिकांची आहे ! हा अभंग कच्चेपणांतला, हा बऱ्याच पक्केपणांतला, हा पूर्ण बोध झाल्यावरचा असे शेरे आहेत ! 'गीता भागवत श्रवण आणि विठ्ठलाचे चिंतन' ही फार खोलांत न जाणाऱ्या मार्गाची प्रशंसा आहे, अजून दृष्टि अंतर्मुख झालेली नव्हती ! 'अंतरीची घेतो गोडी'—अभंग बहिर्मुख ! 'सुखें वोळंब दावी गोहा'—ह्या अभंगांत आपले बाईलवेड्या नवऱ्याकडून कौतुक करून घेणाऱ्या एका स्त्रीचें चित्र आहे, पण तें पाहून पटवर्धन खवळले व 'आपल्या समाजाचें व खुद्द तुकारामाचेंहि मत अनुदार, स्त्रीविषयीं कल्पना कोती, राष्ट्राची संस्कृति ओंगळ'— असे वाहवले ! असो. 'जेविले जे संत' या अभंगाचा वरवरचा अर्थ दिला आहे, पण खोल गूढार्थाचा स्पर्शही चर्चेंत नाहीं ! 'दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरीं'—हा 'अद्वैतपर अभंग मध्यम वयांतील !' 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म—हा सुंदर अभंग 'मध्यम वयांतील !' काय ह्या असल्या शेऱ्यांना म्हणावें ? तुकोबांचा भाव एकीकडे व यांचा तर्क भलतीकडे ! अभंगांचा पदशः अर्थ लावण्याचा हा प्रयत्न मात्र स्तुत्य आहे. पदपदार्थ लावण्याची मेहनत वाखाणण्यासारखी आहे. प्रो. केळकर व रा. जोशी वरीलसारखे पटवर्धनी शेरे गाळून अभंगांचे सरळ अर्थ व पदांची चर्चा छापण्याचा यापुढें उपक्रम करितील तर या चर्चेचा अभंग लावण्याचे कामीं लोकांना कांहीं उपयोग होईल.

**४. रुक्मिणीचरित्र (पूर्वार्ध).** ( ले० बाळकृष्ण शंकरशास्त्री नवांगूळ, कऱ्हाड. किं० ८।२. ) मूळ भागवत, हरिवंश, नाथांचें रुक्मिणीस्वयंवर व सामराजकृत रुक्मिणीस्वयंवर हे आधारास घेऊन लेखकानें प्रस्तुत चरित्र सविस्तरपणें गद्यांत लिहिलें आहे. प्रस्तुत पूर्वार्धांत स्वयंवरवर्णन हा ऐतिहासिक भाग दिला आहे व पुढील भागांत 'विवाहसोहळ्यापासूनचा गृहिणीधर्म' येणार आहे. एकनाथ, सामराज, मोरोपंत, वामनपंडित इ० सत्क-

वींच्या काव्यांतून समयोचित अवतरणें घेतलीं आहेत. ऐतिहासिक दृष्टि कायम ठेवून बाळकृष्ण शास्त्री यांनीं कृष्णजन्मापासून तो रुक्मिणीहरणापर्यंतचा कृष्णकथाभाग प्रेमळ व रसाळ वाणीनें सांगितला आहे. तरुणांनीं व प्रौढांनीं पुस्तक अवश्य वाचावें.

५. **विविध निबंधसंग्रह.** (ले० भिकाजी रामचंद्र जोशी, पेंडसेवाडी, गिरगांव, मुंबई. किं. ०६.) एका साध्याभोळ्या माणसानें साध्याभोळ्यापणानें प्रगट केलेले हे विविध विषयांवरचे विचार वाचल्यानें घटकाभर करमणूक होईल. या विचारांत कांहीं नवीन नाहीं. मध्यम शिक्षणाचे चार लोक घरोघर बोलतात, तेंच यानें लिहिलें आहे. यांना निबंध म्हणणें धाडसाचें आहे. लेखांत लिहिणाराची कळकळ मात्र खरी आहे.

६. **रानफुलें** ही रा. जोशी यांची काव्यकृति आहे. कांहीं पद्यें बरीं आहेत. किं. ०६.

७. **महाराष्ट्रकविसंतमाला–एकनाथः**—जस्टिन ॲबट ह्या अमेरिकन मिशनरी गृहस्थानें महिपतीकृत संतचरित्रांचें इंग्रजी भाषांतर करून तें छापविण्याचें काम सुरू केलें आहे. त्याच्या मालेंतील हें दुसरें पुस्तक आहे. महिपतीच्या भक्तलीलामृतांत अ० १३ ते २४ पर्यंत श्रीएकनाथमहाराजांचें चरित्र गाइलें आहे. ह्या बारा अध्यायांचें ॲबटसाहेबांनीं इंग्रजींत ओवीशः व अक्षरशः भाषांतर केलें आहे. भाषांतर सुबोध व बरोबर साधलें आहे. शेवटीं चरित्रविषयक व ग्रंथविषयक कांहीं अपूर्ण टिप्पणी दिल्या असून अखेर शब्दकोश जोडला आहे. मराठी वाचकांना या असल्या पुस्तकांचा उपयोग कांहींच नसला तरी केवळ इंग्रजी जाणणाऱ्यांना महिपतिकृत एकनाथचरित्राची यानें ओळख होणार आहे. ॲबटसाहेबांचा उद्योग व चिकाटी, प्रशंसनीय आहे. ॲबट हेही अमेरिकन व मिस मेयो ही बाईही अमेरिकन. दोघांच्या उद्योगांत केवढी तफावत !

कमलकंदा आणि दर्दुरीं । नांदणूक एकेच घरीं ।
परी पराग सेविजे भ्रमरीं । येरा चिखलचि उरे ॥ १ ॥

बेडकीण चिखल खाऊन फुगली आहे व ॲबटसाहेबानें एकनाथकीर्तिपराग अमेरिकेंत नेला आहे.

# गृहस्थाश्रमाचा आदर्श.

नाशीक जिल्ह्यांत नमुनेदार गृहस्थाश्रम पाळणारे एक सद्गृहस्थ आहेत त्यांचें चरित्र सर्व सांसारिकांना आरशासारखें रमणीय वाटेल व ' प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला ' अशा धन्य पुरुषाच्या चारित्र्यापासून घेण्यासारखा उत्कृष्ट बोध ते घेतील यांत संशय नाहीं. त्यांच्या अनेक गोष्टी ह्या चार वर्षांत आम्हीं ऐकल्या असून त्यांचा लाभ आमच्या वाचकांस देण्याचें आम्हीं योजलें होतें. इतक्यांत ' चित्रमय जगत् ' चा नोव्हेंबरचा ताजा अंक आमचे हातीं आला, व त्यांत रा. किनरे यांनीं दिलेलें त्यांचें चरित्र वाचलें. आमची माहिती आणि सदर लेख एकरूप झाल्यामुळें त्या लेखांतील महत्वाचीं अवतरणें आम्हीं वाचकांसाठीं देत आहोंत.

गणेश रावजी क्षीरसागर, वकील, सटाणा, जिल्हा नाशीक हे ते गृहस्थ होत. यांचा जन्म अश्विन शुद्ध ४ शके १७७० रोजीं सातारा जिल्ह्यांत कडेगांव येथें झाला. यावरून उघडच आहे कीं, त्यांचें वय आज ८० च्या घरांत आहे. तरी पाहणारास ते ५०।५५ वर्षांचे वाटतात. त्यांची शरीराची काठी ठेंगणी आहे. प्रकृतिमान आजही उत्कृष्ट आहे. सर्व इंद्रियें आपापले व्यापार उत्तम करीत आहेत. डोळ्यांना चष्मा लागत नाहीं, कान मुळींच रुसले नाहींत, उजवीकडल्या दोन दाढांवांचून बाकीचे सर्व दांत मजबूत आहेत. मनाचें तारुण्य व उत्साहशक्ति तरुणांस लाजविण्यासारखी आहे. सन १९०२ पासून फौजदारी कामें त्यांनीं सोडलीं असून फक्त दिवाणी कामें घेतात. कोर्टांत १२ ते ५ पर्यंत आपलीं कामें ते इतक्या नेटानें व तडफेनें करितात कीं तरुण व ताज्या दमाचे वकील मनांत खजिल होतात. त्यांना दीर्घायुष्याचा देणगी त्यांच्या पितृमातृवंशांकडून लाभलेली दिसते. कारण, मातृवंशाकडून त्यांचा आजा व आजी यांचीं वयें मृत्युसमयीं सुमारें ८५ वर्षांचीं होतीं; व पितृवंशाकडील आजा आजींचीं वयें अनुक्रमें ८७ व ९० वर्षांचीं होतीं. एवढी वडिलोपार्जित देणगी जरी त्यांना मिळाली होती, तरी ती देणगी कायम ठेवून तिचा पूर्ण उपभोग घेण्याला त्यांचें नियमबद्ध व व्यवस्थित आचरणच कारण झालेलें आहे.

गणपतरावांची लहानपणापासून धर्मावर विलक्षण श्रद्धा आहे. नित्य धर्मकर्मे ते अगदीं कडक रीतीनें करितात. त्यामुळें त्यांचें अनुष्ठान झाल्यावांचून तोंडांत कांहींही घालण्याचें पातक त्यांच्या हातून केव्हांही घडत नाहीं. त्यांनीं स्मार्ताग्नि बाळगिला आहे. प्रातःस्नान, संध्या, देवपूजा, स्मार्ताग्निपूजा, देवदर्शन,

सूर्यास नमस्कार, गीतेच्या पंधराव्या अध्यायाचा पाठ इत्यादि नित्यकर्मे उरक-ल्यावांचून त्यांच्या पोटांत कांहींच जात नाहीं. इतकें आन्हिक आटोपल्यावर ते फक्त पावशेर दूध घेतात. एखादें फळ मिळाल्यास तेंही खातात.

दुपारीं भोजन करितात. त्यांत भाकरी, भात, वरण, आमटी, भाजी इत्यादि नेहमींचे पदार्थ असतात. जेवणांत वर्ज्य असें कांहीं नाहीं.

वयाच्या चाळीस–बेचाळीस वर्षांपर्यंत संध्याकाळचें जेवणही वरील थाटा-चेंच असे. पुढें पन्नाशीच्या घरांत पाऊल टाकण्याचा समय आलेला पाहून त्यांनीं सायंकाळचे भोजनांत फरक केला. ते दुधाची दशमी, भाजी व आमटी खाऊं लागले. तो क्रम अद्याप चालू आहे. रात्रीं निजते वेळीं पुन्हा पावशेर दूध घेण्याची त्यांची वहिवाट आहे.

पण त्यांच्या जेवणांतली मुख्य खुबी आहे, ती निराळीच. मन जात्या धर्म-प्रवण असल्यामुळें गृहस्थाश्रमांतील सर्व धर्मकर्मे ते यथास्थित पाळतात. गृह-स्थानें भोजनसमयीं फक्त बत्तीस घासच खावे, असा शास्त्रविधि आहे. हा विधि ते बरोबर पाळतात. प्रत्येक भोजनप्रसंगीं ते भाजी–आमटीसुद्धां बत्तीस घासच खातात. भाताच्या किंवा भाकरीच्या घासालाच भाजी-आमटी चटणी लावून खातात. त्यांचे निराळे घास घेत नाहींत. पावसाळा व हिंवाळा या दोन ऋतूंत जेवतांना मध्यंतरीं अर्धा शेर पाणी पितात; उन्हाळ्यांत पाऊण शेर पितात. दोन वेळ दूध व दोन वेळ असें अगदीं मोजकें भोजन, हाच त्यांचा आहार. याशिवाय मध्यंतरी ते केव्हांही खात किंवा पीत नाहींत. त्यांच्या उत्कृष्ट आरोग्याची सगळी कळ इथें आहे.

व्यायामाचे बाबतींतही गणपतरावांचें वर्तन अगदीं नियमबद्ध आहे. स्वार्थ व परमार्थ साधून देणारा व अगदीं बिनखर्ची असा जो नमस्कारांचा व्यायाम तो त्यांचा आवडता व्यायाम होय. तो अगदीं बालपणापासून आजपर्यंत अखंड चालू आहे.

मनुष्याला मन असतें. तें जात्या उच्छृंखल आहे. त्यामुळें त्याला कह्यांत ठेवून कोणत्याही प्रसंगीं शांत राखण्याचा उद्योग माणसानें केला पाहिजे. तें जर नेहमीं संसारिक चिंतांचें दळण दळीत राहील, संसारांत क्षणोक्षणीं होणाऱ्या षड्रिपूंच्या क्षोभाला वश होऊन त्यांच्या हेलकाव्यांबरोबर जर नाचूं लागेल, तर त्या मनुष्याचें आरोग्य कधींही चांगलें राहाणार नाहीं. चिंता जिवंत माणसाला जाळते, असें म्हणतात, तें अगदीं खरें आहे. तेव्हां निरामयत्व व दीर्घायुष्य यांचा लाभ व्हावा, अशी इच्छा करणारानें अभ्यासानें मनाची शांति किंवा प्रसन्नता साध्य करून घेतलीच पाहिजे. ती एक साध्य झाल्यावर इतर आरो-ग्यसाधक नियमांचीं प्रसंगीं उपेक्षा जरी झाली, तरी ती तितकी बाधक होत

नाहीं. उलट सगळे नियम पाळून मनाची प्रसन्नता जर साधली नाहीं, तर सगळे व्यर्थ जातें. मनाच्या प्रसन्नतेचें महत्व हें असें आहे.

अशी ही प्रसन्नता साधण्याला उत्तम उपाय म्हणजे ईश्वरावर व त्याच्या योजनेवर अढळ श्रद्धा ठेवून त्याचें भजनपूजन व निरंतर चिंतन करणें हाच आहे. अशी दृढ श्रद्धा व भक्ति मनुष्याच्या मनांत बाणली म्हणजे इंद्रियनिग्रह, मनोजय, करारीपणा, निष्काम बुद्धीनें सांसारिक कर्तव्यें सारीत राहण्याची हातोटी, इत्यादि अनेक स्पृहणीय गुण त्याचे ठिकाणीं आपोआप कालांतरानें उत्पन्न होतात. अशा रीतीनें त्याचें मारक मन तारक बनतें.

गणपतराव क्षीरसागर यांची धर्मावर विलक्षण श्रद्धा आहे. ते इतके कर्मठ आहेत कीं, चालू युगांत असा मनुष्य दुर्मिळ. झोपेंत—तोही अल्प—व धंद्यानिमित्त जाणारा वेळ याशिवाय त्यांचा सर्व काळ स्नान, संध्या, देवपूजा, अग्निपूजा, भजन, गीतादासबोध इत्यादि धर्मग्रंथांचे वाचन यांतच जातो. त्यांच्या दिनचर्येचे मागे जे उल्लेख आले आहेत, त्यावरून वाचकांना त्यांच्या मनाच्या ठेवणीची बरीच कल्पना येईल, असें वाटतें.

गृहस्थाश्रमाचीं शास्त्रोक्त कर्तव्यें ते किती दक्षतेनें पाळतात, याचा विचार केला म्हणजे चालू परिस्थितींत खरोखरच मोठा अचंबा वाटतो. नित्यस्नानसंध्या झाल्यावर ते न चुकतां गोपूजन करितात. मार्जनविधि नित्य दर्भपवित्रकानें करितात. अन्नसेवन करण्यापूर्वी तुळशीपत्र घेऊन गायत्री मंत्रानें त्या अन्नाचे प्रोक्षण करितात. या विधीनें अन्न शुद्ध व पवित्र होतें, अशी त्यांची श्रद्धा आहे. पाणी घेतल्यावांचून लघवीला ते केव्हांही बसत नाहींत. त्यानें इंद्रियाची व वस्त्राची शुद्धि किंवा स्वच्छता राहते, अशी त्यांची समजूत आहे व ती खरी आहे, आरोग्याच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त आहे. लघवीहून आल्यावर शक्य तर आचमन करण्याची त्यांची रीत आहे.

गणपतराव रात्रीं सुमारें ४।४॥ तास झोंप घेतात. लहानपणापासून इतकीच झोप घेण्याची त्यांची वहिवाट आहे. ते रात्रीं १० वाजतां निजतात. निजण्यापूर्वी वेदोक्त व पुराणोक्त ईश्वरस्तोत्रें म्हणतात. दोन वाजतां उठतात. विद्यार्थिदशेंत २ ते ४ अभ्यास करण्याचा त्यांचा क्रम असे. वकिली करूं लागल्यावर तिचीं कामें करणें, त्यांवर विचार करून जरूर तीं टांचणें करून ठेवणं, यांत ते दोन तास घालवीत. पुढें स्मार्ताग्नीची दीक्षा घेतल्यावर २ ते ४ भजन करूं लागले. तो क्रम अद्याप आहे.

वयाच्या त्रेसष्ठाव्या वर्षापासून गणपतरावांनीं स्मार्ताग्नीची दीक्षा घेतली. तेव्हांपासून ते त्रिकाळ स्नान करितात. पहिलें सूर्योदयाबरोबर, दुसरें १०।१०॥ वाजतां व तिसरें सूर्यास्तापूर्वी. या स्नानाच्या वेळा चुकल्यास त्यांना उपवास

करावा लागतो. विशेषतः प्रातःकाळचे व संध्याकाळचे स्नान चुकलें, तर उपवासाचा प्रसंग येतो. स्नान ऊन पाण्यानें करितात; पण डोक्यावर ऊन पाणी कधींही घेत नाहींत, ताजे गार पाणी सुमारें ५।६ तांबे डोक्यावर घेण्याची वहीवाट आहे.

ते फक्त भोजनसमयींच पाणी पितात, मध्यंतरी मुळींच पीत नाहींत, याचा उल्लेख मागें आलाच आहे. मध्यंतरीं फार तहान लागल्यास तोंडांत आंवळकाठी धरण्याची त्यांची वहिवाट आहे.

एकादशी, महाशिवरात्र, गोकुळ–अष्टमी व रामनवमी इतके उपवास ते करितात; पण सार्थ निरशन असा मुळींच उपवास ते करित नाहींत. ५।६ खारका ताकांत अगर दह्यांत भिजवून उपवासाच्या दिवशीं खाण्याची त्यांची वहिवाट आहे. दुसरें, साखर न घालतां अर्धा शेर दूधही त्या दिवशीं ते घेतात. कांहीं फळें मिळाल्यास तींही खातात. कांहीं झालें तरी रोजच्या आहारापेक्षां जवळ जवळ निम्मा आहार उपवासाच्या दिवशीं व्हावा, तें प्रमाण किंचितही ढळूं नये, यावर त्यांचा मोठा कटाक्ष असतो.

कुटुंबें तीन झालीं, मुलें १७ झालीं; तरी जात्या मन धर्मप्रवण असल्यामुळें वैषयिक अत्याचार त्यांनीं आजपर्यंत केव्हांही केले नाहींत. गृहस्थाश्रमांतही मर्यादित ब्रह्मचर्य त्यांनीं पाळलें व पाळतात.

त्यांच्या पहिल्या दोन बायकांचें प्रकृतिमान उत्तम प्रतीचें होतें. तिसरीचें अगदींच साधारण प्रतीचें आहे. ती चहा पिते, म्हणून तिची प्रकृति राहावी तशी राहात नाहीं, असें गणपतरावांचें मत आहे.

त्यांच्या पहिल्या कुटुंबास चार मुलगे व तीन मुली अशीं सात अपत्यें झालीं. तीं लहानपणीं अत्यंत सशक्त होतीं. आतां त्यांपैकीं फक्त पहिल्या मुलीची प्रकृति उत्तम आहे. बाकीच्या मुलांपैकीं दोन मुलगे वारले. इतरांच्या प्रकृतिही चांगल्या नाहींत. तीं प्रकृतीनें दिवसेंदिवस खालावत जात आहेत. दोन मुलांच्या मृत्यूला व इतर मुलांच्या रडक्या प्रकृतींना मूळ कारण चहाच आहे, असें गणपतरावांचें ठाम मत आहे.

तिसऱ्या कुटुंबास पांच मुलगे व दोन मुली झाल्या. त्यांतला एक मुलगा सातव्या महिन्यांतच उपजल्यामुळें तो पंडुरोगी व अशक्त आहे. बाकीच्या मुलांच्या प्रकृति अगदीं उत्तम, सशक्त व निरोगी आहेत.

गणपतरावांना शिष्ट किंवा अशिष्ट असें कोणतेंच व्यसन नाहीं.

शेवटीं, गणपतरावांना निरामयत्व, दीर्घायुष्य, तरुणांनाही लाजविणारा मनाचा व शरिराचा उत्साह, मनाची आनंदी वृत्ति इत्यादि जे लाभ झाले

आहेत, त्याचीं त्यांच्या समजुतीप्रमाणें ते जीं कारणें देतात तीं समारोपा-दाखल देतों.

नियमित आहार व इतर बाबतींत आत्मसंयमनपूर्वक अगदीं नियमबद्ध आचरण यामुळेंच आपल्याला असा आरोग्याचा दुर्मिळ लाभ झाला आहे, अशी गणपतरावांची ठाम समजूत आहे.

स्नानसंध्या, देवतार्चन, परमेश्वराचें श्रद्धापूर्वक नामस्मरण, आध्यात्मिक ग्रंथांचें वाचन, यांत नित्याचा बराच काळ जात असल्यामुळें मन साहजिकच शांत व प्रफुल्लित असतें. या प्रसन्नतेचा शरीरावरही इष्ट असा परिणाम होऊन त्याच्याही स्वास्थ्याचा भंग होत नाहीं, असें गणपतराव म्हणतात.

अद्यापि दांत उत्तम स्थितींत असण्याचें कारण ते असें सांगतात:— सप्तशृंगावर ' लोखंडी ' म्हणून एक झाड आहे. त्याच्या फळांच्या सालींची राख, बदामाच्या सालींची राख, थोडी तुरटी व थोडें मीठ, यांचें मिश्रण करून तें मंजन आज २५।३० वर्षें ते दांतांना लावतात. या मंजनामुळेंच दांत बळकट झाले आहेत. अशी त्यांची समजूत आहे.

---

# डॉ० मोरे—एक सद्‌गृहस्थ.

बडोदें येथें श्री. सरदार मुजुमदार हे ' व्यायाम ' नांवाचें एक फार उपयुक्त व सुंदर मासिक आज बारा वर्षें काढीत आहेत. दुर्दैवाची गोष्ट कीं प्रणय-कथा व चावटपणाच्या आणि कुचाळकीच्या गोष्टी यांना चटावलेली तरुण पिढी अशा खरोखरीच्या उपयुक्त मासिकाकडे नीट लक्ष देत नाहीं. यांत व्यायाम, आरोग्य, सदाचार व निर्व्यसनिता यांना उत्तेजक असाच मजकूर दर अंकांत असतो. सदर मासिकाच्या नवंबरच्या अंकांत बडोद्याचे डॉ० रामचंद्र लक्ष्मण मोरे यांचें उत्कृष्ट व कित्ता घेण्यासारखें चरित्र आलें आहे. त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी आम्ही आमच्या वाचकांसाठीं पुढें देत आहोंत:—

१. डॉ० मोरे यांनीं सातव्या वर्षापासून कुस्ती, दंड बैठका वगैरे व्यायाम करण्यास सुरुवात केली. आज ५८ वर्षांच्या वयांतही दररोज पांहटेस थंड पाण्याचें स्नान करून जोर, जोडी, बैठका अर्धा तास नियमानें करितात. पूर्व-वयांत ते ५०० दंड व ६०० बैठका रोज मारीत.

२. यांचे वडिलांपासून यांना मूळव्याधीचा विकार मिळाला होता, पण

ओढियाणबंध व इतर कांहीं आसनें करून यांनीं त्यापासून आपली सुटका करून घेतली.

३. लहानपणीं तालीम करीत असतांना हे पक्के चार शेर दूध घेत. मांसाहार यांच्या घरांत त्यांच्या वडिलांपासून बंद असून हे नेहमीं साधा आहारच घेतात. डॉ० मोरे यांना तंबाखू, चहा, विडी वगैरे कोणतेंही व्यसन नाहीं.

४. ते रोज पहांटें चार वाजतां उठतात व रात्रीं १० वाजतां नियमानें निजतात. पहांटें चार वाजतां दोन पेले पाणी नाकानें व एक पेला तोंडानें पिऊन उषःपान करितात. जेवतांना ते मुळींच पाणी पीत नाहींत व दोन जेवणांशिवाय इतर वेळीं कांहींही खात नाहींत. सकाळीं व निजतांना अच्छेर दूध मात्र पितात.

५. रात्रीं १० ते पहांटें चारपर्यंत त्यांना गाढ झोंप लागते. स्वप्नें-वगैरे कांहीं पडत नाहींत. सूर्यनाडी चांगली चालावी म्हणून ते डाव्या कुशीवर निजतात.

६. त्यांची ईश्वराच्या ठिकाणीं व धर्माच्या ठिकाणीं चांगली श्रद्धा आहे. एकादशी, शनिवार व सोमवार या दिवशीं ते फक्त दूध व फळें खातात. कंद-मूळेंही ते नेहमीं घेतात.

७. त्यांची वृत्ति नेहमी आनंदी असते. आनंदी वृत्ति ही आरोग्याला फार पोषक आहे. देवपूजादिकांत रोजचा काळ घालावा व प्रत्येक कार्यांत परमेश्वराचें स्मरण करावें असा त्यांचा क्रम आहे.

८. यांनीं दोन वर्षें योगाचा अभ्यास दूर्वा व कच्चें द्विदल धान्य यांवर राहून केला.

९. गेल्या ३० वर्षांत सचोटीनें धंदा करून स्वतःला सुस्थिति प्राप्त करून घेतली आहे. त्यांना पोहणें व घोड्यावर बसणें या विद्या अवगत आहेत. त्यांचें आरोग्य उत्तम असून या ३० वर्षांत त्यांना कोणीं आजारी पाहिलें नाहीं. त्यांचा एकही केस पिकला नाहीं.

# विश्वनाथ काशिनाथ राजवाडे.

अहह महतां निःसीमानश्चरित्रविभूतयः ।

भर्तृहरी.

लेखकः—श्रीधर गोविंद काळे, एम्. ए.

१. ‘ आधीं कळस मग पायारे ’ असें एकनाथस्वामी म्हणतात. त्याप्रमाणें राजवाड्यांची स्वतःच्या उत्तरकार्याची कल्पित योजना सांगतों.याबद्दल आवर्जून त्यांचें माझें बोलणें झालें होतें. ते म्हणाले, “ मी अष्टोदर्शे वर्षे जगेन. अजून उणीं पुरीं चाळीस वर्षें आहेत. त्यावेळीं हा देश स्वायत्त आणि स्वनिष्ठ असेल. त्याला बऱ्हंशीं माझे श्रम कारणीभूत असतील. नाशिकासारख्या किंवा काशी-सारख्या ठिकाणीं मी माझी समाधि तीन चार लाख रुपये खर्चून बांधून ठेवीन. शेजारीं एक शंभूचें मंदिर करून तेथें एक सच्छील ब्राह्मण कुटुंब त्याच्या खर्च-वेंचाची कायमची व्यवस्था करून ठेवून देईन. तो ब्राह्मण चांगला कर्ता विद्यावंत पाहीन. अंतकाळ आला ह्मणजे कळवीन. मला त्या समाधीच्या तळ-घरांत नेवून बसवावें अगर मीही बसेन. प्राणवायु गेला ह्मणजे समाधीचें तोंड बंद करून वर ‘ विश्वनाथ ’ नांवाचें शिवलिंग स्थापावें. माझ्या सर्व ग्रंथांची मालकी सर्वांची आहेच. तथापि या स्थानाचे व्यवस्थेकरितां एक पंचमंडळ मी नेमून ठेवीन. त्याचा प्रमुख स्वायत्त, माझ्या देशांतला, श्रेष्ठ ब्राह्मण असून, भोंवतालीं जर्मन, फ्रेंच, रशियन, जपानी आणि अमेरिकन असे एक एक पंडित असतील. प्रमुख व मी अखेरीचे पूर्वीं निर्णयपत्र करूं, त्याप्रमाणें या सर्वांनीं चालणेचें. पश्चात् सर्व अधिकार प्रमुखाचा असेल.” समाधिमंदिर प्राची साधन करून बांधावें, तें इतक्या मजल्यांचें असावें, त्याला इतकीं गवाक्षद्वारें असावींत, खालीं चौरस इतकी जागा असावी वगैरे सर्व तपशील त्यांनीं सांगून ठेविला होता !

२. फॉय्लॉलजी ( Philology ), हिस्टरी, ( History) आणि सोशि-ऑलॉजी (Sociology), म्हणजे शब्दशास्त्र, इतिहास आणि लोकविद्या अशा त्यांच्या एकावर एक तीन ठरलेल्या अभ्यासाच्या भूमिका होत्या. मराठी धातु-कोशाचीं शेवटलीं पर्णें, प्रत्येक धातूचें एक पर्ण, अशीं जमवीत असतांना ते सहज उद्गारले, “ बाबा ‘ अनंतपारं किल शब्दशास्त्रं ’ म्हणतात तें अगदीं खरें. हा शब्दांभोधि फार गंभीर आहे. मी एकसारखा चाळीस वर्षें खपलों, तेव्हां हें तीस हजार धातूंचें शोधन सिद्ध झालें. अजून पुढें अनंत सागर आहे. माझी उगाच मासळीची तडफड आहे. भाषाविषयक शेंपन्नास निबंध आणि पांच

चार पुस्तकें लिहिलीं आहेत. परंतु या धातुकोशाचा व्युत्क्रम लागलाच सिद्ध केला पाहिजे, म्हणजे पाणिनीचा धातुपाठ घेऊन ते सर्व धातु मराठी, गुजराथी, हिंदी, बंगाली इत्यादि विद्यमान भाषांतून दाखविले पाहिजेत. त्याला पुष्कळ परिष्कार लिहिले पाहिजेत. तसेच आदेशप्रक्रिया उत्तम आली पाहिजे. फायूलॉलजी सिद्ध झाली, ह्मणजे सोशिऑलॉजीचें हत्यार झालें. त्याच्या प्रत्यक्ष पुराव्यापुढें संशय टिकतच नाहीं. तत्काळ ढिला पडतो. फायूलॉलजीनंतर इतिहास लिहिला पाहिजे. इतिहासानें लोकविद्या ( Sociology ) विषय नानाक्रियांचे पूर्वावलोकन होऊन घडलेल्या आणि घडणाऱ्या गोष्टींचे धागे सशास्त्र जुळवितां येतात. याच्या सतत अभ्यासानें आलेल्या कौशल्यावरच पुढील कार्याच्या प्रेरणांची आणि त्यांच्या साफल्याची भिस्त असते. अमुक लोकसमूहाचें अमुक सामर्थ्य आणि अमुक कार्य, हें ओळखून त्यांचा शास्त्रोक्त विनियोग करणारा तोच लोकविद्यानिष्णात. अशा निष्णात पुरुषापुढें अन्याय, विषमता, पंगूपणा इत्यादि अवगुणांचा निभाव लागत नाहीं; इतकेंच नव्हे तर अशा पुरुषाच्या संगतीनें सर्वांचें कल्याणच होतें. तो महान योजक महंत होतो" आजन्म त्यांना अभ्यासाला अत्यंत प्रिय अशा वरील तिन्ही शास्त्रांचा संबंध त्यांनीं अशा तऱ्हेनें नेहेमीं सांगावा. भौतिक शास्त्राबद्दल ह्मणावें कीं, " तिकडे स्वतंत्र पांचसाडेपांचशें बनलीं आहेत त्यांच्या अभ्यासाकडे इकडल्या एकाही पोराचें लक्ष्य नाहीं. " येथें ' पोर ' शब्दाचा उच्चार ते उपरोधिकपणें करीत. " माझ्या ठरलेल्या शास्त्रापुरता माझा बाणा मीं आजवर सोडला नाहीं आणि पुढेंही सोडणार नाहीं " असें साभिमान सांगत. " ज्या देशामध्यें आणि लोकांमध्यें भास्कराचार्यासारखे अतर्क्य बुद्धिमान् गणिती आणि वैद्यनाथ पायगुडयासारखे महावैयाकरणी, केव्हां का होईना, झाले, त्यांच्या बुद्धिश्रेष्ठत्वाबद्दल संशयच नको " असेंही आश्वासन देत. वर लिहिल्याप्रमाणें ' शब्दशास्त्रसागरांत मी एक मासळी आहे ' अशी केव्हां अत्यंत विनम्र उर्मी येई, तर केव्हां म्हणत, " माझ्यापुढें पाणिनी हें पोर आहे. त्याला अहम्चें आवाम् काय आणि वयम् काय हें समजलें नाहीं. मी जेव्हां वेदपूर्व भाषेंत जातों तेव्हां मला पृथ्वीवरचे सगळे वैयाकरणी कालचीं पोरें दिसतात. विचार आणि विकारप्रदर्शनाचा पूर्ण अभ्यास झाल्यावर कोणत्याही माणसाची भाषा आपणास समजलीच पाहिजे. " हा ज्ञातेपणाचे अभिमानाचा सहजोद्गार ऐकून मला नेहमीं आश्चर्य वाटे. मीं मनांत म्हणावें कीं, हिमालयाची उत्तुंगता आणि रत्नाकराची गंभीरता विशाल पृथ्वीवरच संभवतात; अन्यत्र नाहीं.

३ " ' संस्कृत भाषेचा उलगडा ' म्हणून मी एक पुस्तक दहा वर्षांपूर्वी लिहिलें आहे; तें वाचा. तें चांगलें कळण्यास आणखी दहा वर्षें लोटलीं

पाहिजेत." मराठींतच कठीण शास्त्रीय ग्रंथ लिहिण्याचें त्यांनीं एक गमतीचें कारण या ग्रंथाविषयीं बोलतांना सांगितलें. ते म्हणाले, "माझ्या विचारा-भोंवती मराठी हा दुर्गम किल्ला आहे. यानें माझें विचार कोणास चोरतां येत नाहींत. मी लिहितों त्याची खरी किंमत कांहीं युरोपीय पंडित जाणतात. त्यांना इकडून भाषांतर करवून घेतल्याशिवाय माझा ग्रंथ उमगत नाहीं. भाषांतर झालें कीं, मूळ ग्रंथ प्रसिद्ध होऊन त्याची किंमत वाढलीच. श्रीयुत भास्करराव भट यांचे घरीं, एका रविवारीं, जेवणाचे वेळीं, वांईच्या वैदिकांनीं हिरण्यकेशीय संहितेंतील, एका यज्ञाचे वेळच्या ' मार्जालीय ' नांवाच्या नाचाचा प्रश्न विचारला. लागलीच मृज् म्हणजे कुंचलणें, त्यावरून मार्जाल, मार्जार म्हणजे पायानें खरखरा कुंचलणारा प्राणी, असा धात्वर्थ सांगून लागलीच, पोळी खात खात, आमटीचा भुरका मारीत, आपले तीव्र आणि गणपतीसारखे सूक्ष्म डोळे वर करून, त्यांनीं दहा पांच ओळी म्हणून दाखविल्या; व पुढें " वेदीशेजारच्या एका ओटयावर नाच होत असे, लहान लहान नाटकवजा दृश्य कथा होत, त्यामध्यें लोकरीति, इतिहास असे. तेंच आपल्या इतिहासाचें मूल स्वरूप " अशी माहिती सांगितली. यावेळीं मी, रावसाहेब कृष्णाजी विनायक वझे आणि भट वकील असे पंक्तीस होतों. त्यांनीं नेहमीं सांगावें कीं, " ज्याला धर्मशास्त्राचा म्हणजे Sociology चा अभ्यास करणें असेल त्याला चारी वेदांचा सूक्ष्म अर्थ परिशीलनपूर्वक कळल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आपल्या घरच्या पुष्कळ चालीरीति वेदाच्या आणि वेदपूर्वकालाच्या आहेत. त्या राखण्यांतच आमचें हित आहे, तसेंच वैशिष्टयही आहे. यज्ञसंस्था ही फार उद्बोधक आहे. त्यामध्यें आपादमस्तक सर्व लोकांचा समावेश आहे. तिची योजना प्रखर आणि प्रगल्भ बुद्धि दर्शवित्ये. निरलस अग्निहोत्री, विशाल मनाचा धर्मशास्त्री, ज्ञाता सत्पुरुष आणि महंत हे एकाच अवस्थेचे असतात "

४. " Knowledge is action " म्हणजे ज्ञान म्हणजेच क्रिया, हें त्यांचें मुख्य सूत्र असे. त्यांनीं गंभीरपणें, शब्दाच्या अवयवावर बरावर जोर देऊन ( कारण हा राजवाडेबंधूंचा इंग्रजी उच्चाराचा विशेष आहे. ) हें इंग्रजी वेदान्तसूत्र उच्चारलेलें अजून माझे (लेखकाचे) कानांत घुमत आहे. वेदान्त विचाराचा नवीन उन्मेष जगाचें कल्याण करितो असें त्यांचें मत होतें. ज्ञाने-श्वरीच्या प्रस्तावनेच्या शेवटीं दिलेलें अभिवचन त्यांचे हातून पुरें झालें नाहीं; तथापि ' ज्ञानेश्वराच्या अमृतानुभवानें शांकरभाष्यावर मात केली आहे ' असें ते प्रति-पादन करीत. ज्ञानेश्वरांनीं सांगितला त्यापुढें वेदान्त सांगणें शक्य नाहीं असें त्यांना प्रामाणिकपणें वाटे. त्या सर्वांचे सार वर सांगितलेलें Knowledge is action हें वेदान्तसूत्र ते नेहमीं उच्चारीत. त्यांचें सर्व चरित्र म्हणजे वरील ज्ञानक्रियाएकरूपत्वाचें प्रत्यंतर सानुभव होय. निर्मळ वेदान्तविचार निघाला

म्हणजे ते क्षणभर स्तब्ध होत आणि म्हणत " वेदोपनिषदांपासूनचा हा ब्रह्मभावाच्या अमृताचा कंद ज्यांचे दैवांत तेच भरतखंडांत महाराष्ट्रांत जन्माला येतात. मद्यमांसनिवृत्ति, शुद्धबीजता आणि ब्रह्मभाव हे हजारों वर्षांच्या श्रमसातत्यानें पैदा केलेले गुण आज पृथ्वीवर अन्यांना दुर्लभ आहेत. गेलीं दहा वर्षें अमेरिका नुसतें मद्य सोडूं पहाते तर केवढा अट्टाहास करून अजून सिद्धि नाहींच. त्याला शतकेंच्या शतकें लागतात. " आजचे चांगले चांगले गृहस्थ ब्राह्मण पाहून ते केव्हां केव्हां म्हणत कीं, " शास्त्रतः एकंदर विचार करितां यांना मला सत्शूद्रांहून मोठी पदवी देववत नाहीं. कांहीं जिव्हेच्या नियमानें वागतात तर लिंगाच्या नियमनांत घसरलेले. कांही लिंगनियमनांत जागते तर जिव्हालौल्य सोडीत नाहींत. दोन्हींत घसरलेले; ते गेलेच. जे घसरले नाहींत त्यांच्याच पुत्रपौत्रांपासून कांहीं आशा. कारण ब्रह्मभाव उगाच उत्पन्न होत नाहीं. ती अत्यंत कष्टार्जित गोष्ट आहे. " त्यांना जागृति आणि सुषुप्ति यामधील स्वप्नस्थितीचा अनुभव अलीकडे चाळीस वर्षें नाहीं, असें ते सांगत. " मी मुलासारखा एकदम निद्रेंत जातों. मन तात्काल पुरीततांत प्रवेश करतें. निद्रा पूर्ण झाली कीं उठतों. उद्योगास लागतों. " " आम्हीं वागतों याचें मी स्मरण ठेवित नाहीं. कार्याकारण कांहीं गोष्टी आठवतात. मी माणूस ओळखीत नाहीं. भावाचा चेहरा तीस वर्षांपूर्वी पाहिलेला माझे स्मरणांत नाहीं. मला आप्तस्वकीय नाहीं, परका नाहीं. " आणखी ते म्हणत, " आम्ही वासना करूं तें घडतें, बरें घडतें वाईटही घडतें परवां एका गृहस्थाचें दुष्कृत्य पाहून राग आला; मरेना का बेटा असें वाटलें. तो काल एक माणूस सांगत आला कीं तो मेला. याकरितां मी अलीकडे कसलीही वासना, सुष्टदुष्ट, ठेवण्याचें सोडून दिलें आहे. "

५. जसें भक्त विठोबाला प्रेमानें ' विठाई ' असें म्हणतात तशी गत राजवाड्यांना कांहीं नांवापुढें ' उ ' किंवा ' रु ' प्रत्यय लावून एकवचनी उच्चार करणें फार आवडे. ते ' दासरु ' असें रामदास स्वामीबद्दल आणि ' शंकरू ' असें शंकराचार्यांबद्दल म्हणत. ' टिळकु ' ' महादु ' हे प्रयोग त्यांतलेच. त्यांचें ज्ञानेश्वरीचें व्याकरण वाचलें म्हणजेच या उकारांत पद्धतीचें प्राचीनत्व आणि प्रेमत्व लक्षांत येते. ते रामदासस्वामीबद्दल अत्यंत आदरपूर्वक वागत. त्यांच्या अनुभवाची त्यांनीं एक कथा सांगितली. " दासरूचे प्रकट शिष्य बाराशें, तसें अप्रकट, गुप्त, बाराशें होते. जास्तही असतील. माझ्या संशोधनकार्यांतील मुख्य साहाय्य त्यांतील एका गुप्त शिष्याचें.ह्या रामदास्यांनीं आम्हांला बारा वर्षें साहाय्य केलें. यांच्या संगतींत महाराष्ट्राचा गाभा हिंडलों. पावसाळ्यांत मी तळेगांव, कोल्हापूर कोठें तरी असे. दिवाळीच्या बेताला माझा बाहेर निघण्याचा विचार झाला कीं एक दोन दिवसांत त्यांचे पत्र यावें. " अमुक

ठिकाणीं भेटा. मी तेथें आहे. " मला चमत्कार वाटे, यांना माझी इच्छा कळली कशी ? नंतर मीं तेथें जावें. तेथें गेल्यावर एकदोन दिवसांनीं हिंडण्याचा प्रांत ठरवून तिकडे मोर्चा फिरवावा. ते जेथें जेथें जात तेथें तेथें ' हे महाराज दहा बारा वर्षांपूर्वी इकडे आले होते ' असें लोक म्हणत. सर्वांना त्यांचेबद्दल फार पूज्यभाव वाटे. गांवांत गेल्यावर त्यांचें पहिलें काम मारुतीचें देऊळ झाडून सारवून स्वच्छ करून ठेवावयाचें. प्रसंगीं रंगही द्यावयाचा. ते दिशेला केव्हां जात हें कळत नसे. मी सकाळीं उठावें तों हे मारुतीसन्निध जप करीत कडकडीत सोंवळ्यांत असत. नित्यकर्मे सारून ते भिक्षेस सुमारें दहा वाजतां निघत. जाण्याचे पूर्वी स्नानास विहीर कोठें उत्तम आहे; ग्रंथ, लेख कोठें आहेत, त्याची चौकशी कशी कोठें करावयाची, आमचे प्रातराश कोठें ठेविलें आहे, त्याची विस्तरशः माहिती सांगत. मग भिक्षेस जात. भिक्षेस निघाले म्हणजे सर्व लोक पूज्यभावानें त्यांना नमस्कार करीत. सुमारें तीन वाजण्याचे सुमारास भली मोठी झोळी भरून भिक्षा घेऊन येत. ती तेथल्या गुरवाकडे किंवा गुरविणीकडे अगर एकाद्या भक्त बाईकडे देत. त्यांतील उत्तम पदार्थ ठेवीत. बाकीच्याचे ऐवजीं दोघांपुरता उत्तम शिधा, लोणकढें तूप, दूध मागवीत. उरलेले भिक्षाद्रव्य तेथील मारुतीचे सेवेस खर्च पडे. मग पुनः स्नान करून स्वतः स्वयंपाक करीत. तों सायंकाळचा वेळ येई. भोजन झालें कीं, सायंसंध्येची वेळ येई. सायंसंध्या करून आम्ही आलों कीं, मारुतीपुढें दिंड्या, करुणाष्टकें, सवाया म्हणून कांहीं उत्कृष्ट भजन करीत. मग आम्ही त्या दिवशीं झालेल्या कामाचा आढावा व पुढील कामाचा बेत ठरवून झोंपीं जात असूं. भोजनोत्तर प्रथम माझें दुसरे दिवशीं सकाळचें अन्न स्वतः झांकून ठेवीत. त्यांत तीनचार भले मोठे पुरोडाश आणि कोरडी भाजी असे. इतकें स्वच्छ, पवित्र आणि पुष्टिकर अन्न मला कधीं खावयास मिळालें नाहीं. भोजनशुद्धि मला यांच्या संगतींत उत्तम समजली. यांच्या साहाय्याशिवाय मला इतिहाससामुग्री इतक्या सुलभतेनें मिळवितां आली नसती. यांच्या ओळखी सर्व ठिकाणीं सत्पुरुष या दर्जाच्या. त्यांनीं मला अखंड मातुःश्रीप्रमाणें वागवावें. ते केव्हां निजत आणि केव्हां उठत तें मला समजत नसे, त्यांनीं मला कसलाही त्रास दिला नाहीं. वृद्धवय असूनही त्यांना शिंक सुद्धां आलेली मला माहीत नाहीं. ते गावांत गेले कीं प्रथम मारुतीसंस्थान उज्वल करीत. तसेंच कोणास औषध, कोणास उपासना, कोणास मंत्र, नानाविध लोकांचें नानापद्धतींनीं कल्याण करून जात. त्यामुळें तें नेहेमीं सर्वांना हवे असत. माझें त्यांचें भाषण फार होत नसे. कार्याकारण बोलावें. बाकी ते आपल्या नामस्मरणांत, मी आपल्या विचारांत गुंग असूं. रोज सांपडलेल्या सामुग्रीवर कांहीं त्रोटक विवेचन होत असे.

६. माझा क्रम. मी सूर्योदयापूर्वी उठावें. फिरावयास जावें. येतांना शौच, मुखमार्जन, स्नानसंध्या करून आपलीं धोत्रें धुवून यावें मग कांहीं नमस्कार घालावेत. पुढें तास दोन तास कांहीं वाचावें. आदले दिवशींच्या कागदपत्रांची वाचून व्यवस्था करावी. मग साडेदहाचे सुमारास पुरोडाश भक्षण करून कागद धुंडाळण्यास अकरा साडेअकराचे बेतास जावें तों सायंकाळीं चार साडेचारचे बेतास परत यावें. रामदासीबोवा एकदांच तिसऱ्या प्रहरीं जेवीत. मध्यंतरी चोवीस तासांत कांहीं खात नसत. मी परत यावें तों बुवा भोजनास माझी वाटच पहात असत.

७. या रीतीनें बारा वर्षे गेल्यावर एकदां आमचा मुक्काम तुंगभद्रेच्या कांठीं हरिहरास होता. तेथें बुवांचे गुरु, अठयाण्णव वर्षांचे वृद्ध, आले होते. गुरुशिष्यांची दृष्टादृष्ट होतांच बुवा मजकडे आले आणि म्हणाले, 'गुरुजी वृद्ध झाले आहेत. त्यांच्या सेवेला मला गेले पाहिजे.' जातांना त्यांनीं माझी बारा वर्षांची शिल्लक, पंचवीसशें रुपये, त्यांच्याजवळ सांठलेली मला रोख दिली आणि चालते झाले. पुनः गेल्या पंधरा वर्षांत त्यांचें दर्शन नाहीं. त्यांचें नांव, गांव, ठिकाण मला कांहीं माहीत नाहीं. मीं विचारलें नाहीं, त्यांनीं सांगितलें नाहीं." इतकें बोलून स्नेहाच्या प्रेमातिरेकानें राजवाडे कांहीं वेळ स्तब्ध झाले.

---

# माझी जिंदगी ५ हजार.

ले०—**रामचंद्र कृष्ण कामत**, बेळगांव.

एक संन्यासी फिरत फिरत एका गांवीं येऊन तेथील मारुतीच्या देवळांत उतरला. गांवचे लोक आपल्या नित्याच्या वहिवाटीप्रमाणें सकाळीं स्नान करून देवदर्शन घेऊन आपापल्या धंद्यास जाऊं लागले. कित्येकांनीं ह्या परस्थळच्या पाहुण्यास ( स्वामीस ) पाहून आपल्या घरीं भिक्षेस येण्यास विनंति केली. स्वामी एका अटीवर भिक्षेचें आमंत्रण स्वीकारीत असत. ती अट ही होती कीं, जो खोटें बोलणारा नाहीं, त्याच्या घरीं मी भिक्षा घेत असतो, असें स्वामींनीं सांगावयाचें. ही स्वामींची अट ऐकतांच लोक आपले नमस्कार करून आपला मार्ग सुधारीत. कारण, खोटें बोलल्याशिवाय व्यवहारांत चालावयाचेंच नाहीं, अशी हरएकाची समजूत ! व्यापार तर खोटें बोलल्याशिवाय होणेंच शक्य नाहीं असें पुष्कळांना वाटतें ! सत्य भाषणानें व प्रामाणिकपणानें व्यापार

किती यशस्वी होतो, हें त्यांना माहीत नसतें ! पण समाजांत तसेही पुण्यवान लोक कांहीं असतातच. अशा जातीचा एक श्रीमंत मनुष्य स्वामींना भेटला व त्यानें प्रेमादरपूर्वक स्वामींना वंदन करून, भिक्षेस आमंत्रण केलें. स्वामींनीं आपली अट सांगितली. त्या गृहस्थानें ती अट कबूल केली व म्हटलें ' महाराज, मी सत्यव्रती आहे, मस्करीनेंही खोटें बोलणें मला आवडत नाहीं. ' स्वामींना संतोष झाला व त्यांचे परीक्षेचे कांहीं प्रश्न ठरलेले होते त्याप्रमाणें त्या गृहस्थास त्यांनीं प्रश्न केले. त्यांचीं त्यानें सरळ उत्तरें दिलीं. त्यांत ' तुझी जिंदगी किती आहे ' असा एक स्वामींचा प्रश्न होता. त्यावर ' माझी जिंदगी पांच हजारांची आहे, त्या बाबतींत मी गरीब आहे महाराज ' असें त्या गृहस्थानें उत्तर होतें. त्याचा विनय, आदर व सरळपणा पाहून स्वामींस संतोष झाला व त्यांनीं भिक्षेचें आमंत्रण स्वीकारलें. गृहस्थास आनंद वाटला व चला तर घरीं जाऊं असें तो म्हणाला. स्वामी म्हणाले, देवळांतील विहीर प्रशस्त आहे, तेथेंच आपण स्नान वगैरे उरकून घेऊन बारा वाजण्याच्या आंत तयार होऊन बसतों, तुमचें होतांच कोणास तरी बोलावणें पाठवा म्हणजे येत आहे. गृहस्थानें तें कबूल करून घरीं जाऊन सर्व सिद्धता केली. स्वामींच्या पंक्तीस आपल्या इष्टमित्र मंडळीसही त्यानें आमंत्रण दिलें. पैसा व प्रेम असल्यामुळें त्यानें जेवणाचा थाट उत्तम केला. पाट, रांगोळ्या वगैरे घालून पानें मांडलीं. आमंत्रित आप्तेष्ट मंडळी येऊन तयार झाली. देऊळ त्याच्या घराजवळच असल्यामुळें इष्ट ती तयारी होतांच, त्यानें आपल्या आठ वर्षांच्या मुलास व दहा वर्षांच्या मुलीस स्वामींना बोलावून आणण्याकरितां पाठविलें. तीं मुलें देवळांत येऊन त्यांनीं वडिलांचा निरोप स्वामींस कळविला. स्वामींनीं त्या मुलांकडे पाहिलें, तों त्यांच्या अंगावर पांच पांच हजारांचे दागिने असलेले दिसले. मालमत्तेच्या बाबतींत गृहस्थ आपल्याकडे खोटें बोलला असें स्वामींस वाटलें व त्यांनीं येत नाहीं जा असें सांगितलें. मुलेंच तीं, कांहीं न बोलतां परत आलीं व बापास स्वामी येत नाहीं म्हणतात म्हणून सांगूं लागलीं. गृहस्थास वाटलें या मुलांनीं स्वामींस काय सांगितलें व स्वामींनीं यांस काय सांगितलें कोण जाणे. म्हणून त्यानें आपल्या विवाहित प्रौढ मुलीस व तिच्याबरोबर आपल्या सुनेसही स्वामींना बोलावून आणणेस पाठविलें. त्या मुलींना पाहून स्वामींनीं विचारलें, त्या गृहस्थाच्या तुम्ही कोण ? मुलीनें सांगितलें, मी त्यांची मुलगी व ही माझी भावजय. स्वामींनीं, त्यांच्या अंगावर दहा दहा हजाराचे दागिने असलेले पाहून पूर्वींसारखाच जबाब अधिक रागानें दिला. मुलींनीं घरीं येऊन वडिलांस स्वामींचा निरोप कळविला. वडील मुलगा दुकानांतून नुकताच घरीं आलेला होता. त्यास बापानें स्वामींना बोलावून आणण्यास सांगितलें. त्यानें हातपाय धुऊन, पितांबर नेसून हातांत रुप्याची पळीपंचपात्री घेऊन देवळांत गमन केलें व स्वामींस, सर्व तयारी आहे, मंडळी

येऊन बसली आहे, आपली वाट पाहतात, चलावें लवकर, अशी विनंति केली. स्वामींनीं विचारलें, तुम्हीं त्यांचे कोण ? त्यानें सांगितलें मी त्यांचा ज्येष्ठ पुत्र आहे. स्वामी म्हणाले तुमच्या हातांत हिऱ्याची आंगठी आहे, तिची काय किंमत ? तो म्हणाला पांच हजार होईल. 'आणि गळ्यांतील मोत्यांच्या कंठ्याची ?" तो म्हणाला, होईल ५।६ हजार, महाराज. स्वामी रागानें म्हणाले— म्हणूनच मी येत नाहीं म्हणतों. मुलाला तें मोठें गूढ पडलें. तो मनांत ह्मणाला, आंगठीची व कंठ्याची किंमत काय विचारतात, आणि 'ह्मणूनच मी येत नाहीं' असें कां ह्मणतात, हें काय कोडें आहे ? स्वामींचा व बापाचा झालेला करार त्याला किंवा दुसऱ्या कोणालाच माहीत नव्हता. त्यानें स्वामीस विनंति केली, महाराज, माझ्या आंगठीच्या व कंठ्याच्या किंमतीशीं व आपल्या येण्याशीं काय संबंध आहे ? आमच्याकडून कांहीं चूक झाली असल्यास क्षमा करावी व घरीं चलण्याची दया करावी. स्वामी ह्मणाले 'किंमतीशीं काय संबंध तो तुझ्या बापाला जाऊन विचार. तुझा बाप खोटें बोलणारा आहे, याकरितां त्याच्या घरचें अन्न मी घेणार नाहीं.' तरीही मुलाची कांहीं समजूत पडेना. यांत कांहीं तरी कोडें आहे व तें बापाशिवाय उलगडावयाचें नाहीं असें त्यास वाटलें व बापाकडे येऊन त्यानें सर्व हकीगत सांगितली. बापानें स्वामींचा आशय ओळखला व स्वतःच तो त्यांच्याकडे जाण्यास निघाला. त्याबरोबर ही काय भानगड आहे पहावी ह्मणून जेवणाकरितां आलेली इतर मंडळीही त्याचेबरोबर देवळांत गेली. प्रापंचिक लोक मोठे लबाड असतात, वरवर सौजन्य दाखवून आंतून महाकपटी असतात, यांचा संसर्ग केल्यापेक्षां अरण्यांत जाऊन उपाशी राहिलेलें बरें, असे विचार स्वामींच्या हृदयांत उसळत होते. या मंडळीस पाहून स्वामी अधिकच संतापले. त्या गृहस्थानें हात जोडून, स्वामीस रागावण्याचें कारण नाहीं, आपण खोटें बोललों नाहीं व कधींही बोलणार नाहीं, आपण उगाच गैरसमज करून घेऊं नका, असें पुष्कळ प्रकारें सांगितलें. स्वामींनीं त्यावर चिडून पुनः तुमची जिंदगी किती हें खरें सांगा पाहूं, लोकांना कसें वाटतें तें पहांतों. गृहस्थ म्हणाला, लोकांना मी माझी जिंदगी सांगत नसतों, पण आतां आपल्या आग्रहामुळें सांगावी लागली. माझी जिंदगी ५ हजारांची आहे. मी त्या बाबतींत गरीब आहे महाराज, मला क्षमा करा व घरीं भिक्षेस चला. स्वामी म्हणाले, तुम्हीं साफ खोटें बोलतां; मी नाहीं तुमच्या घरीं येणार भिक्षेस. मला बोलावण्यास आलेल्या तुमच्या मुलामुलींच्या अंगावरील दागिनेच पाहिले असतां ४०।५० हजारांचे दिसतात, यावरून तुम्हीं दहापांच लाखांचे मालक आहां असें कोणीही सांगू शकेल. तुमचा ५ हजारांचा आंकडा कोण कबूल करील ? जमलेल्या लोकांची समजूतही स्वामीसारखीच झाली. स्वामींनीं त्याची अजमावलेली जिंदगी खरोखरीची आहे असें ते त्या गांवचेच असल्या-

मुळें त्यांना माहीतच होतें. हा गृहस्थ उगीच खोटें कां बोलतो असें त्यांनाही वाटलें. त्या गृहस्थानें आपल्या मुनीमास सांगून दुकानावरील चोपडया आणविल्या व खातेवहीवरील एक पान काढून स्वामींना दाखविलें, व ही माझी जिंदगी, बाकीची ती माझी नव्हे, असें सांगून नमस्कार केला. स्वामींचा चेहरा एकदम पालटला, त्यांच्या अंतरांतील खळबळ एकदम शांत झाली. व सप्रेम मुद्रेनें त्याच्याकडे पाहून त्यांनीं हातांत दंडकमंडलू घेऊन त्याच्याबरोबर निघण्याची तयारी केली. लोक आश्चर्यसमुद्रांत बुडाले; स्वामींना असें कोणते खातें दाखवून त्यांचें मन प्रसन्न केलें, ह्याबद्दल त्यांना जिज्ञासा झाली. त्यांच्या विनंतिवरून तें खातेंपा[illegible] गृहस्थानें त्यांनाही दाखविलें. मग असें तें आश्चर्यांत टाकणारें कोणतें खातें होतें बरें? तर–

## धर्मादाय खातें !

त्या खात्यावर ५ हजार रुपये खर्च होतो हीच 'माझी जिंदगी' असें तो मानीत असें. लोकांना त्या पंचपक्कान्नाच्या जेवणापेक्षां हें त्याच्या जिंदगीचें तत्त्व अधिक रुचकर लागलें व अशी आपली जिंदगी वाढविण्याचा प्रत्येकाला लोभ सुटला.

---

# एक योगभ्रष्ट साध्वी.

लेखकः—**सांभय्या राजापा कोमटी.**

वऱ्हाडप्रांतीं यवतमाळ जिल्ह्यापैकीं नेर-परसोपंत गांवीं वीरशैव धर्मीय बाळाप्पा देशमुख यांचे पोटीं सन १९०५ इ० च्या एप्रिल महिन्यांत चरित्रनायिकेचा जन्म होऊन, तिचें आळवतें नांव काशीबाई असें संबोधण्यांत आलें. जन्मतांच तिचे दोन्ही पायांत अढी असलेली दिसली. पण न्हाणतांना अगर दूध पाजतांना कोवळ्या पायांची अढी काढण्याकडे किंवा पुढें काय परिणाम होईल इकडे कोणाचेंही लक्ष गेलें नाहीं मुलगी १।२ वर्षांची झाली, तथापि तिला नीटपणें रांगतां किंवा बसतांही येऊं नये. चेहरा मात्र नेहमीं आनंदी, मोहक व हांसरा असावा. पोटानें सरपटावें, पण पायांची अढी कायमच. असें पाहून घरच्या जाणत्या माणसांस पुढच्या परिणामाची कल्पना येऊन, गांवांत असलेल्या लहानमोठया वैद्यांचे इलाज, वातहारक औषधी पोटांत देणें, व वरून तैलें वगैरे चोळणें सुरू केलें. पायांचे अढीबरोबरच उजवा हातही निरुपयोगी असल्याचें आढळून आलें. होतां होतां ७।८ वर्षें निघून गेलीं. गांवठी

इलाजानें कांहीं फायदा होणार नाहीं, असा अंदाज करून, व मिरज दवाखा न्याची कीर्ति ऐकून, सन १९११ इ० चे नोव्हेंबरमध्यें बाळाप्पानें मिरजेस जाण्याची तयारी केली, व कदाचित् या प्रवासांत कु० काशीबाईच्या आरोग्याचा फायदा न मिळाला तर, निदान पंढरपूर, नाशिक, वेरूळ, जेजुरी-आळंदी, नरसोबाची वाडी, सिंगणापूर वगैरे क्षेत्रें; अगर पुणें, मुंबई, कोल्हापूर, सारखीं शहरें, तरी पाहावयास मिळतील, या उद्देशानें आई, मुलें, कुटुंब, दोन बहिणी व भाचा, इतका परिवारही बरोबर घेतला. मिरजेस जाऊन ऑपरेशनही करविण्यांत आलें. तेथें असतांना दवाखान्याचे देखरेखीखालीं राहणें पडल्यामुळें व दवाखाना मिशनरी लोकांचा असल्यानें २०।२२ दिवसांच्या अवधींत नुसत्या फराळावर राहण्याचें आज्ञाधारकत्व, या अल्प वयांतही तिनें दाखविलें. तेथून परवानगी घेतांना, पायांची अढी मोकळी झालेली आढळून आली. इतकेंच नव्हे तर, ते वाटेल तसे मोडीसही येऊं लागले. व डॉ. वॉनलेस यांजकडून इतःपर तुम्हीं पाय लांब व आंखूड करणें, व मोडीस आणण्याची संवय ठेवावी अशी सूचना व मालिश करण्याकरितां एक बाटली औषध, आणि तें संपल्यानंतर त्याचा मिळण्याचा ठिकाणाहीं लिहून मिळालीं. वरील क्षेत्रें, शहरें पाहून परत घरीं आल्यानंतर, महिना पंधरा दिवसांनीं ती उभी राहूं लागली. पण पाय कोवळे आणि अशक्त, व वरचा भाग जड झालेला असा प्रकार असल्यामुळें लुले पाय सांगळ्यांचे मोडींत वाकूं लागले. बाप तिला कांठीचा आधार घेण्यास अगर पांगुळगाड्यानें चालणें शिकण्यास सांगत असतांही, मी आठ वर्षांची मुलगी, असें करणें लाजिरवाणें समजून तशीच वांकत चालण्यानें, पायांच्या मोडीच्या शिरा बळावून मजबूत झाल्या, व तो वांकडेपणा कायम झाला. पण आवारांत व शेजारींपाजारीं हिंडणें, फिरणें, वगैरे व्यवहार तिला करतां येऊं लागले. १९१६ च्या फेब्रुवारी महिन्यांत आतेच्या मुलाशीं ती विवाहबद्ध होऊन घरामागेंच मुलींची शाळा असल्यानें शिक्षण घेण्यास जाऊं लागली. शिक्षण सुरू असतांना तिच्या बुद्धिमत्तेमुळें मराठी चौथे इयत्तेचें सर्टिफिकेट मिळवीपर्यंत, मास्तरीणबाईला मुळींच त्रास पडला नाहीं. शाळेंतून बाहेर पडल्यावर घरचें सारवण, सैंपाक, भांडीं घासणें, व धान्य निसून पुसून साफ करणें, वगैरे कामें तिनें आपलेकडे घेतलीं. थोड्यांच दिवसांत वरील कामांत दहा माणसांच्या कुटुंबाची शुश्रूषा करण्यांत तिची तत्परता दिसूं लागली. पतिराज अक्षरशत्रु असल्यानें बापानें १९२२ सालीं सप्टेंबरमध्यें आपलें खर्चानें शांतिक सोहळा करून दिला. ( लग्नही बापानें स्वखर्चानें केलें होतें. ) पण नवरोबा चंचल वृत्तीचे असल्यानें त्या पतिनिष्ठ पण पायामुळें व्यंग बनलेल्या पत्नीकडे त्याचें लक्ष लागेना. सासरीं दोन महिन्यांकरितां ती नांदावयास गेली असतां, साठ दिवसांत तिला जांचानें साठ दिव-

सांचीं साठ वर्षे भासूं लागलीं. शरीराची व्यंगता, व त्यामुळें होणारी नवऱ्याकडून अनास्था, घरच्या मंडळीकडून प्रसंगोपात होणारी मानहानी, बरोबरीच्या मुली भोगीत असलेलें संसार व गृहसौख्य या गोष्टींमुळें उदासचित्त होऊन भक्तिमार्गाकडे तिचें लक्ष वेधलें गेलें. त्यांतच बाप प्राकृत ग्रंथ वाचनाभिरुचीचा भोक्ता असल्यानें त्याचेकडून तिला प्रोत्साहन मिळालें. घरकामाशिवाय बाकीचा वेळ सोळा सोमवार, रुद्राध्याय, व्यंकटेश स्तोत्र, सावित्रीकथा वगैरे वाचनांत जाऊं लागला. दर सोमवारीं श्रीशिवलीलामृत ग्रंथाचें पारायण निष्ठापूर्वक आटोपून नैवेद्य-आरतीचा क्रम सतत ४।५ वर्षें चालू असे. स्वधर्माप्रमाणें भस्मधारण, लिंगपूजा तुलसीपूजा, रुद्राध्यायवाचन झाल्याशिवाय अन्न ग्रहण न करण्याचा आणि एकादशी, सोमवार, वटसावित्री, हरितालिका, ऋषिपंचमी, वामनद्वादशी व चातुर्मास एकभुक्त राहणें, अशीं खडतर व्रतें आचरण करून पुन्हां त्याला बारमहा अल्पाहाराची जोड असे. पोथीपुराणाच्या श्रवणवाचनाभिरुचीनें व बापाच्या प्रेमळ सहवासानें सद्गुरुशिवाय जीवाला धन्य करून आत्मदर्शन करवून देणारा आणि जन्ममृत्यूचा फेरा चुकविणारा अन्य मार्गदर्शक नाहीं, अशी तिची खात्री झाली. व अशा सद्गुरु प्राप्त होईपर्यंत तूप, तेल यांचा तळीव पदार्थ मीं खाणार नाहीं, असा तिनें १९२६ च्या चातुर्मासारंभीं निश्चय केला. दृढनिश्चयी व अशा सद्गुरुप्रेमी भक्ताला फार दिवस तिष्ठत न ठेवतां १९२७ च्या जानेवारींत वस्तींतूनच अप्रसिद्ध व दिसावयाला व्यवहारांत उलट वर्तनी, सद्गुरु नारायण पुढें आला, व तिजवर अनुग्रह करून स्वस्वरूपजागृती मार्गाचा उपक्रम सुरूं झाला. आंगांत ताकद नाहीं, पंगुपणानें आसन मांडण्याचा इलाज नाहीं, मुद्रा लावण्यास उजवा हात असमर्थ, अशा परिस्थितींत वाटेल तसे कष्ट व त्रास सहन करून १२।१४ दिवसांच्या अभ्यासानंतर या कामांतील शाब्दिक व अनुभविक मार्मिक अशा १०।५ माणसांस ती स्वस्वरूपदर्शनांत तल्लीन झालेली दिसूं लागली. ज्ञानेश्वरी चाळतां चाळतां श्रीभगवद्गीतेंतील ८ वे अध्यायांतर्गत "अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् । यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥५ ॥" या भगवत् वाक्याचें प्राकृत विवरण तिनें आपल्या मनावर बिंबवून इतका दृढभाव जमविला कीं आधींच सर्व बाजूंनीं उदास बनलेली ती मूर्ती फारच थोड्या अवधींत जगाचें केवळ परोपकारापुरतेंच जगणें, सुखदुःखाची बेफिकिरी, व आमरणांत विषयोपभोगवर्जित ब्रह्मचर्यपालन आणि स्वस्वरूपदर्शन, या वृत्तींत गढून गेलेली दिसूं लागली. तिचें भाषण भाविकांस भक्तिमय, आप्तेष्टांस निकट सलगीचें, दुःखितांस दयार्द्रतेचें व कुश्चितांस भेदक भासूं लागलें. सद्गुरुप्राप्ति व इच्छित मनकामना पूर्ण झाल्याचें उद्यापन म्हणून सहाध्यायी मंडळीसुद्धां तारिख २१ मार्च १९२७ इ० रोजीं प्रेक्षणीय रीतीनें श्रीसद्गुरुपूजा आटोपून

घेतली. स्पर्शास्पर्श, सोंवळेंओवळें, नाहींसें झालें. सगुणोपासना न सोडतां निर्गुण स्वरूपाचा नित्यदर्शनलाभ अनुभवूं लागली. भूतमात्रांविषयीं दया व अन्नोदकदानाचा प्रभाव तिला पूर्णपणें समजून चुकला. एप्रिलची २६ तारीख, भर दोनप्रहर उन्हाची वेळ, बाई जेवायला बसलेली, अशा समयीं भुकेतान्हेनें व्याकुळ झालेले, एक शिवयोगी (जंगम,) दत्त म्हणून समोर उभे राहून भोजन मिळण्याची याचना करूं लागले. अन्नपाण्यावांचून व्याकूळ झालेली ती भोळीभाबडी सात्विक मूर्ति पाहतांच दयार्द्र होऊन, गोड शब्दांत त्यांचें स्वागत करून आपला भोजनाचा हात बाईनें आंखडला. भावजयीस ताजा सैपाक करावयास सांगून स्वामींचें भोजन आटोपल्यावर आपलें अपुरें जेवण पुरें केलें. ती निस्पृह मूर्ति जाऊं पाहात असतांही, बाप गांवीं नसल्यानें तो येईपावेतों राहाण्याचा आग्रह त्यांस ती करीत होती. दुसरे दिवशीं बाप परत आल्यावर "पुष्कळ जंगम आजपावेतो आपलें येथें आले, पण अशी मूर्ति आजपर्यंत मी पाहिली नाहीं" अशा भाविक भावनेनें ती त्याजपाशीं सांगूं लागली. उलट स्वामीही म्हणूं लागले कीं "मी संचारी मनुष्य, पण माझेही आढळण्यांत अशी गोड स्वभावाची दुसरी मुलगी आलेली नाहीं." बापानें चैत्र अमावास्येपर्यंत मोठया आदरानें स्वामींस राहून घेतलें. स्वामींच्या व बाईच्या आत्मसाक्षात्काराच्या गोष्टी होऊन, एकमेकांच्या वृत्ती तल्लीन झाल्या. ता १ मे चैत्रीं अमवास्येस बाईनें स्वहस्ते पितरतृप्तीचा पाक करून स्वामी, बाप व भाऊ यांस भोजनास बसविलें. भोजन चालू असतां स्वामीं प्रयाणास परवानगी मागूं लागले. बाप होकार भरतो आहे असें पाहून बाई घरांतून बोलूं लागली कीं, " महाराज आज तर नाहींच, पण उदईकही समाप्तीचा दिवस असल्यानें उपाशीं न जातां भोजन करून जावें. " या भाषणानें स्वामी आश्चर्य चकित झालेले पाहून " तुमचे आगमनाचा सातवा दिवस उद्यांचा आहे " असा बाहणा करून त्यांचें समाधान केलें. आपलें नैमित्तिक कर्म तुळसीपूजा, लिंगपूजा, रुद्राध्यायवाचन वगैरे आटोपून ३ वाजण्याचे सुमारास बाई जेवावयास बसली. जेवण चालू असतांच तिचे पोटांत कळा येऊं लागल्या. कसेंबसें आंचवून तिनें तेथेंच जमिनीवर आंग टाकलें. पोटदुखी वाढूं लागली. बाईचा बाप बाहेर फिरावयास गेला होता, म्हणून तिची आई बोलावूं पाठवीत असतां, तिला शपथेवर मना करण्यांत आलें. तास दीड तासानें बाप घरीं आला. त्यास बाईची पोटदुखी कळून चुकली. त्यानें आपले मुलास बाईचे सद्गुरु व गुरुगम्यमार्गी सहाध्यायी बंधु, यांना " काशीबाई मरणार म्हणून ती तुम्हांस बोलावते " असा निरोप सांगून बोलावूं पाठविलें. ६ चे सुमारास मंडळी येऊन इलाज चालवूं लागली. पोटदुखी व पोटफुगी नाहींशी होण्याऐवजीं रोग वाढूं लागला. वज्रक्षारासारख्या कडक मात्रा दोन दोन वेळ देण्यांत

आल्या. लववी, परसाकडे व वांत्या होतच होत्या, पण गुण म्हणून नाहीं. परिणाम शूळच तो. इलाज फुकट झाले. श्वास ऊर्ध्व वाहूं लागला. त्रिदोषांनीं आपला अम्मल बसविला, पण अशाही स्थितींत खणखणीत आवाजांत ती स्वामीस म्हणूं लागली कीं, "महाराज, आतां तरी सांगा कीं आपणच काशीस जाणार ? किंवा काशीस, काशीला घेऊन जाणार?" असा तिचा विनोद चालूंच होता. भाऊ, भावजय, आई व सासरीं गेलेली बहीण, यांना विसरून फक्त आजन्म प्रेम करणाऱ्या बापास मात्र कारणपरत्वें बाप म्हणून संबोधूं लागली. रात्रींचे १ वाजण्याचे सुमारास डॉक्टर व कंपाउंडर येऊन त्यांनीं औषधाचे डोस देऊन पाहिले, एनिमा केला, शेवटीं इंजेक्शन केलें. तीनवाजण्याचा सुमार. पोटांत गेलेलें पाणी उलट घशांत येऊन, गडगड शब्द करूं लागलें. देवा, नारायणा, शंकरा, रामा अशा फक्त चारच हाकांनीं कळवळ्यानें देवाला विनवून या भवपाशांतून सोडविण्याची ती करुणा भाकूं लागली. आई व बाप यांची खात्री होऊन चुकली कीं, अधु पण चतुर, कुशल व सद्‌गुणी बाई, इहलोक सोडून जाणार ह्मणून ते शोकाकूळ होऊन रडूं लागले. बाईनें तें पाहून शांत चित्तानें, नेहमींच्या आवाजांत म्हणूं लागली 'बापू, आई, तुह्मीं रडूं नका. ही वेळ चांगली आहे. महाराज समक्ष आहेत. माझ्या मरणानें तुमची काळजी दूर होईल, नवरा दुसरी बायको करण्यास मोकळा होईल. बाबा (भाऊ)चे मागची कटकट नाहींशी होईल, तुम्हीं जन्मभर माझ्याकरितां फार कष्ट सहन केलेत. धन्य आहे तुम्हां उभयतांची.' अशा प्रकारें अंतकाळचें दुःख व देहममता बाजूला ठेवून सासर सोडून माहेरास जात असल्याचें बोलूं लागली. श्रीसद्गुरु बापानें भगवद्गीतेंतील ८ वे अध्यायांतील ५ वे श्लोकाची आठवण दिली असतां, "मला कोणत्याही विषयाची वासना राहिली नाहीं, माझ्या सर्व वासना पुऱ्या झाल्या. मी भगवंताचा बोध विसरलें नाहीं, आपण स्वस्थ असा—" असें खडखडीतपणें बोलूं लागली. अरुणोदय झाला. स्त्रीपुरुषसमुदाय जमूं लागला. बाईकडून आपले भावजयीस ताजें पाणी आणण्याचा हुकुम सुटला. आईकडून दांत व तोंड साफ धुवविलें. सोमवार सोडण्याकरितां पोहे भिजवण्यास सांगून १०।५ दाणे खाऊन व्रतमुक्त झाली. शेंदोनशें स्त्रीपुरुषसमुदाय जमला. तिचा प्रयाणकाल पहाण्यास समाभ्यासी बंधु, भगिनी, आया हजर होत्या. सद्गुरुमूर्ती पुढें उभी राहून बीजारोपणाचीं स्वानुभवफळें चाखीत होती. सुवासिनींस हळदी कुंकु, व खण वांटण्यांत येऊन सर्वांस नमन करण्यांत आलें. जातीधर्माप्रमाणें स्वामी ( शिवयोगी जंगम ) चें तीर्थ ग्रहण करून त्यांचे हस्तें भालप्रदेशीं भस्मधारणा करविली, व डोक्यावर अभयकर घेऊन, गडबड करीत असलेल्या शेजारी बायांना शांत राहण्यास व "झालें आतां पुरें करा," अशी विनवणी करून पुन्हा एकदां सर्वांस नमन केलें.

प्रयाणकालाचा अवधि जवळ आला हें जाणून बापाचें हृदयावर डोकें टेंकून उर्ध्व दृष्टीनें५वे श्लोकाचा व जन्ममरणाचा फेरा चुकविण्यास समर्थ अशा सद्गुरुवाक्याच्या प्रत्यय दाखवीत फक्त ५ मिनिटांत अगदीं शेवटचा श्वास सोडतेवेळीं सुद्धां बापाचे हाताखालीं दबलेल्या आपले दोन्ही हातांनीं नमस्कार करून ता० २ मे १९२७ इ० वैशाख शु० १ सोमवारीं सकाळीं ७ वाजतां उत्तरायण, शुक्लपक्ष, दिवा, सोमवासरीं श्रीज्ञानेश्वरींतील अग्निमार्गानें श्री० सौ० काशीबाईनें इहलोकची यात्रा संपविली. स्वधर्मावर श्रद्धा ठेवणाऱ्या मूर्तीचें समाधीस अलिंगीचा हात लागूं नये म्हणून, गांवरिवाजास सोडून स्वजाती बांधवांनींच समाधी खोदण्यास सुरवात केली. बहुतेक अंत्यविधिला एक जंगम व चार पालखीवाहक, सांपडण्याची मारामार, तेथें लहानमोठे एकूणएक ७५।८० जातीबांधव, शिवाय ब्राह्मण, कोमटी, जैन, भावसार, सोनार वगैरे जमावांत ५।७ जंगमांचे शंखनादांत, मोठ्या आनंदानें बाईच्या देहाला आजेगुरु ( बापाचे उपदेश-गुरु ) चे समाधीसमोर समाधी देण्यांत आली.

---

# मनोबागेंतला सोनचाफा.

## सुवास दुसरा

लेखकः—**गो. द. करकरे, भुसावळ.**

( ११ ) देवाच्या प्राप्तीसाठीं बाल्यांतच प्रयत्न केला, एक ध्रुवानें व दुसरा नामदेवानें. कुठें या अज्ञ (!) मुलांची परमेश्वरासाठीं सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी, आणि कुठें एकेक दिडकीसाठीं प्राण देण्याघेण्यापर्यंत मजला करण्याची प्रौढमाणसांची प्रवृत्ति ?

* * *

( १२ ) 'बाळ ! थंड पाण्यांत स्नान करूं नकोस बरं. 'उद्यां तुला पडसं येईल, ' असें आपण लहान मुलांना भिववीत असतों. काय ही वृत्ति ! परमेश्वरानें हवा व पाणी हीं भूतें मनुष्याला त्रास व्हावा यासाठीं का निर्माण केलीं आहेत ?

" कदाचित् तुला नामस्मरणाची गोडी लागली, तर तूं उद्यां गोसावडा होऊन चालूं लागशील; मग या संसाराची जबाबदारी कोण पत्करील," असें म्हणून वृद्ध माणसें बद्ध तरुणांना मुमुक्षु सुद्धां होण्यापासून निवृत्त करीत अस-

तात ! काय हें गाढ अज्ञान ! जगांतील सर्व व्यवहार बंद पडावे म्हणून कां नामाची व नामस्मरणाच्या महिम्याची योजना संतांनीं केली आहे ?

* * *

( १३ ) पाऊस पडला कीं लोक म्हणतात " देव पावला. " "देव आमच्यावर खुष आहे. आमच्या खायची प्यायची तो काळजी करितो. " वेड्यांनो ! साधा पाऊस पडल्यानें देव पावला असें तुम्ही म्हणतां, इतका का देव सोपा आहे ! आणि देव तुमच्यावर खूष होऊन तरी कशावरून पाऊस पाडतो ! तुमचें गाढ अज्ञान, अप्पलपोटेपणा, व क्षुद्र बुद्धि इत्यादि पाहून करुणेनें तो तुमच्यासाठीं अश्रु कशावरून ढाळीत नसेल ?

( १४ ) अभिमन्यूला पंतांनीं " पितृमातुलममशुद्धकीर्तिधौतमही " असें विशेषण दिलें आहे. मामाच्या व पित्याच्या धवल कीर्तीनें, तो संकटांच्या अगदीं मध्यें सांपडला असतांना सुद्धा गडबडला नाहीं.

अशी आपली कीर्ति व्हावी, असें तुम्हांला वाटत असल्यास त्या गोष्टीला लागणारें हृदयाचें पावित्र्य, व तदनुषंगिक आत्मविश्वास, हीं तुमच्यांत आहेत काय ?

* * *

( १५ ) " अवघाचि संसार सुखाचा करीन " तुकोबारायांनीं म्हटल्याबरोबर लोक त्या अभंगाचा दुसरा चरण ध्यानांत न घेतां, संसार करणें हेंच ध्येय पुढें ठेवूं लागले. आपल्या संसाराच्या प्रेममय वातावरणांत आनंदानें त्रैलोक्य भरून टाकण्याची शक्ती आहे अशी तुमची खात्री आहे काय ? अशी तुमची खात्री असेल तरच तुम्ही संसारास उद्युक्त व्हा. तुकोबांचा विश्वव्यापी संसार कुठें, आणि दोन कोठड्यांच्या आंत स्वतःला व आपल्या वासनांना अडकवून घेऊन, त्यांतच जीवितसाफल्य मानणाऱ्या आम्हां पामरांचा, नांवाचा " संसार " कुठे !

* * *

( १६ ) " देह कष्टविती रात्रंदीन " एवढें तुकोबारायांचें म्हणणें ऐकतांच लोक त्यांचें अनुकरण करूं लागले. पहिल्या वेळेस दुसरा चरण लोक विसरले, तर दुसऱ्या वेळेस पहिल्या चरणाकडे, त्यांनी मुद्दाम कानाडोळा केला. देह कष्टविती ऐकल्याबरोबर बायका, पोरें, घरदार, संपत्ति, मानमरातब वगैरेसाठीं लोक देहांना कष्ट देऊं लागले. मूढांनो ! थोडासा मनांत विचार धरा. हा देह याच गोष्टीसाठीं तुम्हाला प्राप्त झाला आहे काय ?

( १७ ) आट्यापाट्याच्या खेळांत " लोण " आणणारा गडी निघालेल्या जागीं पुन्हा परत येतो. त्याला परत त्या जागीं उभा राहिलेला पाहिला, तर त्रयस्थाला तो अजून पहिल्या पाटीपर्यंत सुद्धा गेला नाहीं असें वाटेल. स्थित-

प्रज्ञ माणसाचें मुद्रा असेंच असतें. एकदा पूर्ण स्थितीला तो पोहोंचला कीं तो सामान्य मनुष्याप्रमाणें सर्व व्यवहार ( फक्त संन्यस्त वृत्तीनें ) करीत असतो; ज्ञानी मनुष्याच्या अंगीं कांहीं तरी विशेष चिन्हें पाहिजेत या समजुतीनें या स्थितप्रज्ञ मनुष्याकडे पहाणाऱ्या मुमुक्षूस, हा मनुष्य बद्धा सारखाच दिसेल !

( १८ ) दुधाला अग्नि त्रास देत असतो. त्रास थोडासा असतो तोंपर्यंत दूध तो सहन करतें. पण एकदां का तो त्रास असह्य झाला कीं, एका क्षणांत ते दूध खालीं उतरून त्रास देणाराचा नाश करितें. दुर्जनसज्जनांच्या बाबतींत असाच न्याय असतो. जोंपर्यंत दुर्जनांचा त्रास सह्य असतो तोंपर्यंत साधुलोक तो सहन करितात. पण तोच त्रास अपरिमित झाला कीं, दुर्जनांचा निःपात करण्याला त्यांना किती वेळ लागणार ?

* *

( १९ ) खोखोच्या खेळांत खुंट लागतात. खुंटाला कोणाचाही डाव आला गेला तरी कांहीं दुःख नसतें; साधुलोक जरी संसार करीत असले तरी ते या खुंटाप्रमाणें असतात. माता, पिता, पुत्र कलत्र वगैरेजण त्यांच्या भोंवतीं फेऱ्या घालीत असतात. तरी पण सुख अथवा दुःख कांहींही प्राप्त झालें तरी त्यांना विधिनिषेध नसतो.

* * *

( २० ) चंद्र एकच, पण तो चकोराला जीवन, तर " चोराच्या मनांत चांदणें. " तद्वत सज्जन ( साधू ) एकच. पण बद्धांना जसे आपले आप्त, धन, प्रिय असतात, तद्वत तो मुमुक्षूंना प्रिय असतो व दुष्टांना त्याची बलवान शत्रूप्रमाणें भीति वाटत असते.

* * *

## सुवास तिसरा.

२१. रत्नाकारांतून हजारों रत्नें प्रत्यही निघताहेत. तरी त्यामुळें तो दरिद्री झाला आहे काय ? तुम्हाला आतांपर्यंत जेवढे चांगले विचार सुचले असतील तेवढाच तुमच्या अंतःकरणांतील वृत्तींचा झरा आहे काय ? रत्नाकराच्या तळाशीं असंख्य तेजस्वीं रत्नें आहेत. फक्त तीं गुप्त आहेत. तुमच्या मनाच्या कारंजांतून अजून किती तरी सुंदर विचार फवाऱ्याप्रमाणें निघूं शकतील ! ते हल्लीं सुप्त आहेत. त्यांना जागे करा व मग तुमच्या " मनबागेंत " कोणकोणतीं फुलें उमलतात हें पाहिल्यावर तुम्ही आश्चर्यानें थक्कच व्हाल.

२२. भुंग्याला "हम" 'हम' ( सोऽहम् ) असा सारखा ध्यास लागलेला असतो. कमलाच्या सुवासानें तो मोहित होऊन आत्मत्वाचा शोध घेण्यासाठीं तो आंत जातो. तितक्यांतच त्याजवर हस्त ठेवला जातो. कमळ मिटतें व तो

आनंदांत इतका मग्न होतो कीं देहभान नाहीसें होतें. मुमुक्षूला सद्गुरु आपल्या कीर्तीनें खेचून घेतात. शिष्याला जर भृंग्याप्रमाणें ध्यास लागला असेल तर त्याजवर वरदहस्त ठेवला जातो. भृंग्याप्रमाणें गुरुचरणावर जर सर्वस्व ( देहसुद्धां ) अर्पण करण्यांला शिष्य तयार होईल तर सद्गुरूनां त्याला जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त करायला किती वेळ लागेल !

* * *

२३. कोळयांना माशांची घाण येते कां ! मुळींच नाहीं. सरावानें त्यांना त्यांत चमत्कारिक असें कांहींच वाटत नाहीं. नामस्मरण तुम्हीं रोज करूं लागला म्हणजे तुम्हांला त्यांत चमत्कारिक कांहींच वाटणार नाहीं.

* * *

२४. "महाजनो येन गतः स पन्थाः ' या म्हणीची खुबी तुम्हाला माहीत आहे ना ! पुष्कळसे लोक स्मशानाकडे जात असले तर आपण त्यांच्याबरोबर जावें काय ? नश्वर वस्तूंना पकडण्यासाठीं सर्व लोक धावत आहेत हें आपणास दिसत असतांना आपणही त्यांत सामील व्हावें काय ?

* * *

२५. स्वार्थापायीं आपले १०० मुलगे बळी जाऊं देणाऱ्या धृतराष्ट्राला होणारा कुलक्षय दिसला नाहीं व गोराकुंभारालाही " विठ्ठल" नामाचा गजर करीत असतांना आपल्या पुत्राचा स्वतःच्या पायानीं झालेला क्षय दिसला नाहीं. न दिसण्याची क्रिया दोन्हीकडे सारखी आहे. पण स्थितींत किती महदंतर आहे.

* * *

२६ पुष्पसंगें मातीस वास लागे ! खरें आहे भक्त नामदेवांच्या संगतीनें जनाबाईला विठ्ठलाच्या भजनाची स्फूर्ति झाली व तिनें "नामयाची जनीं" या नांवाचे पुष्कळ अभंग केले त्यांतला खालील तर फारच प्रेमळ आहे.

कोणे एके दिवशी । विठो गेला जनीपाशी
हळूच मागतो खायासी । काय देऊ बा मी तुजसी
हातें धरूनि नेला आंत । वाढी पंचामृत भात
प्रेम सुखाचा ढेकर दिला । जनी म्हणे विठो धाला ।

सत्संगाचे महिमान याच्याच साठीं; पंत म्हणतात "जरि राज्य दिलें केले पुत्राचे बरें नद पिमाते ? "

* * *

२७ जगांत पुष्कळांना किमयेचे वेड असतें. किमया म्हणजे हीन धातूचें सोनें बनविण्याची युक्ती. कांहीं विशिष्ट झाडाच्या पानांत धातु दाबून ठेवून पानांचा रस काढून तो धातुसहित भट्टींत तापवायचा हा त्याचा मार्ग आहे, असें

म्हणतात. किमयेच्या पाठीमागें फिरणाऱ्या मूढांनो, देवानें ही किमया करून तुम्हांला जर बद्ध करून ठेविलें नसतें तर तुम्ही आज जगाचें मालक म्हणून त्यावर सत्ता गाजवूं शकले असतां, याचा तुम्ही विचार केला आहे काय ? मुख्य किमया करणारा शोधून काढा म्हणजे मग तुम्हाला इतर गोष्टींची बिलकूल जरूरी नाहीं

* * *

२८ " त्याचा देव आला तरी ही गोष्ट बदलणार नाहीं " अशी एक म्हण झाली आहे. अज्ञानाची याखेरीज दुसरी कोणती परमावधी असेल ! त्याचा देव तुमच्या देवापेक्षां निराळा आहे काय ? –

* * *

२९. कडुलिंबाचा पाला खाण्याचा तुम्ही प्रयत्न केला तर पहिल्या दिवशीं लोक तुमच्याकडे पाहून " हा काय असें वेड्यासारखें करतो आहे " असें म्हणू लागतील.पाला कडू असल्यानें तुमच्यानें सुद्धां एकादें दुसरें पान खाववेल. तोंड कडू झाल्यानें तुह्मांला सुद्धां ' मी हा कुठून खाल्ला ' असें वाटेल; पण सराव जर तुम्ही चालू ठेवला तर कांहीं दिवसांनीं तुम्हांला पाला कडू वाटणार नाहीं. नामस्मरणाचें असेंच आहे. प्रथम नामस्मरण करणाऱ्या मनुष्याची लोक थट्टा करूं लागतात. ( पण बाबांनो, हा थट्टेचा विषय नाहीं. ) तुम्हांला सुद्धां नामस्मरण करणें प्रथम अवघड वाटेल. पण सरावानें नामस्मरण झोंपेप्रमाणें प्रिय होईल. कडुलिंब रक्तशुद्धि करतें तर नामस्मरण चित्तशुद्धि करतें.

* * *

३०. जगाला प्रकाश देणाऱ्या चंद्रसूर्यांना राहु व केतू त्रास देत असतात. सज्जनांशीं अकारण वैर धरून त्यांना छळणें हा दुष्टांचा धर्मच आहे.

* * *

## सुवास चवथा.

३१. लोखंड तापलें आहे तोंवर त्यावर घाव मारिले तर काम होतें. तवा तप्त आहे तोंवर त्यावर पोळ्या भाजून घेतां येतात. घरांतील कर्त्या आणि प्रिय माणसांच्या अकालिक मृत्यूनें उत्पन्न झालेलें स्मशानवैराग्य त्यावर ताबडतोब आघात बसले तर टिकतें, नाहीं तर पुराणांतील वांगीं पुराणांत व स्मशानांतलें वैराग्य स्मशानांत.

* * *

३२. घड्याळांतील सेकंदकांटा क्षणक्षणाला हलत असतो. सुखदुःखांचे आवेग जे आंदोलन देतील त्याप्रमाणें क्षणक्षणा बदलत जाणें हीच बद्धांची स्थिति असते. जेव्हां बद्धाला ६० आंदोलनें मिळतात तेव्हां मुमुक्षूंची एक

हालचाल होते. सुखदुःख, लोभ, मोह वगैरे विकारांचे अनेक आघात होतात तेव्हां एकादाच आघात मुमुक्षूचें अंतःकरण हलवितो. अवरकाटा मात्र साधकाप्रमाणें वागत असून मुमुक्षूला जसे आघात होतात तसे पुष्कळसे आघात झाल्यास ६० मिनिटांत फक्त पांच मिनिटें हलतो. साधकाची शेवटची पायरी म्हणजे सिद्ध. २४ तासांत फक्त एका तारखेवरून दुसऱ्या तारखेपर्यंत हलणारा काटा कूटस्थाप्रमाणें कां समजूं नये ? सिद्धच तो; साधकानें सुद्धां त्याजवर होणारे विकारांचे अतिशय थोडे परिणाम पाहून चकित व्हावें.

* * *

३३. सायकल चालवणारा समतोलपणा राखूं शकला कीं पुढें जातो. हजारों वस्तू प्रत्यहीं अंतःकरणाला खेचत असतां सुद्धां जो मनाचा समतोलपणा बिघडूं देत नाहीं असाच मनुष्य पुढें जातो. ( लोकांत पूजनीय होतो ).

* * *

३४. समजा दोन रस्ते आहेत. त्यांतला एक रस्ता अगदीं ओसाड आहे. परंतु तो शेवटपर्यंत दिसत आहे. दुसरा रस्ता अगदीं मोहक आहे. त्यावर अनेक फुलझाडें, फळझाडें वगैरे वगैरे आहेत. पण तो रस्ता अगदीं थोडासा दिसत आहे, पुढें काय आहे हें अजमावण्यास मार्ग नाहीं. "या दोन रस्त्यांपैकीं कोणत्या रस्त्यानें तूं जाशील" असें विचारल्यास कोणीहि "मी सुरक्षित रस्त्यानें जाईन" असें चटकन् उत्तर देईल. परंतु "पारमार्थिक मार्ग हा चांगला सुरक्षित असून निव्वळ मोह उत्पन्न करणाऱ्या अज्ञानमूलक मार्गानें तुम्हीं जगांत कां चालतां" असा प्रश्न केला तर किती जणांना त्याचें समर्पक उत्तर देतां येईल ?

देव होइजेत देवाचें पंगती । पतन पसंती जगाचिया ॥

तुकाराम महाराज.

* * * *

३५. "अतिपरिचियादवज्ञा" हें ठरलेलेंच आहे. वस्तूचा जितका हरघडी उपयोग होतो तितकी तिची किंमत कमी वाटूं लागते. आपल्या पंचज्ञानेंद्रियांचीं व कर्मेंद्रियांचीं हीच गत आहे. त्यांची किंमत तीं शाबूत असेपर्यंत समजत नाहीं. एक नेत्र बंद झाल्यास जगांतील निम्या सुखास आपण मुकूं. कर्ण आपलें काम करीनासें झाल्यास गायन वगैरे सर्व आपल्या कुचकामाचें होईल. कर्मेंद्रियांबद्दल तर फारच अडेल. पण इतकी सर्व स्थिति माहीत असतांना सुद्धां आपल्या देहावर प्रतिक्षण सत्ता चालविणाऱ्या परमेश्वराची आपणांस दिवसांत किती वेळां आठवण येते ?

* * * *

३६. जगांत तुम्ही कितीही सभ्य म्हणून गणले जात असा, लोक तुम्हांला

कितीही पवित्र म्हणून गणत असोत, जर तुमचें साक्षी मन तुमच्या अंतःकरणांतील काळ्याकुट्ट डागांची साक्षी देत असेल, तर तुमचें सर्व शहाणपण, तुमचें विनयशील वागणें, तुमची समयसूचकता, तुमचा दिसणारा सुंदर चेहरा, हीं सर्व फुकट आहेत. तत्वज्ञानाच्या कितीही मोहक गोष्टी तुम्हीं सांगत असा, बुद्धिमत्तेचें अलोट प्रदर्शन करण्याची तुमच्या अंगांत कितीही योग्यता असो, हृदयाच्या पावित्र्याखेरीज या सर्व गोष्टी व्यर्थ आहेत.

* * * *

३७. जगांत चार प्रकारचीं माणसें असतात. परिस्थितीबरोबर हेलकावे खाणाऱ्यास बद्ध म्हणतात. मनाजोगतें न झाल्यास क्रोध येणें, संकटें आल्यास दुःख होणें, सुखाच्या कल्पनेनें आनंदित होणें, वगैरे विकार ज्यांच्या अंतःकरणांत त्यांना न कळत उत्पन्न होतात व जे त्या विकारांतच स्वत्व समजतात अशांना बद्ध म्हणतात.

* * * *

३८. एक बुक्का कोणालाही मारला तरी प्रत्येक व्यक्तीच्या शरीरावर त्याचा सारखाच आघात होईल. फक्त व्यक्तीच्या शरीरयष्टीवर त्या आघाताचे परिणाम अवलंबून राहातील. अशक्त मनुष्य असला तर तो मूर्छित होईल. साधारण-शक्तीचा असला तर त्याला इजा होईल व काटक, दमदार असला तर त्याला कांहींच होणार नाहीं. काम, क्रोध, ह्या षड्रिपूंपासून त्रास होणें हें अंतःकरणावर अवलंबून असतें. या षड्रिपूंचे आघात प्रत्येक अंतःकरणावर सारखेच व्हावयाचे. फरक फक्त व्यक्तीच्या अंतःकरणाच्या योग्यतेवर अवलंबून असतो. ज्यांना षड्रिपूंचे आघात कळतात व ते बसूं नये अशी ज्यांची इच्छा असते, जगाच्या सर्व उपाधीपासून आपली मुक्ती व्हावी ही ज्यांची आकांक्षा असते, त्यांना मुमुक्षु म्हणतात.

* * * *

३९. Necessity is the mother of invention ही म्हण आत्मानुभवांत यथायोग्य लागूं पडते. एकदां या भवचक्रांतून बाहेर पडण्याची जरूरी भासूं लागली कीं व्यक्ती प्रयत्न करूं लागते. त्यांतच वैराग्याची वाढ व्हावी म्हणून मदतीस संकटें येतात. ऐहिकवस्तूबद्दल विरक्ति उत्पन्न व्हावी या साठींच निरनिराळे दुःखाचें प्रसंग आयुष्यांत येत असतात. परमेश्वराचें हें काम ( adding fuel to the fire ) विस्तवांत सरपण घालण्यासारखें असतें. या मनःस्थितींत असतां जर योग्य चालना ( कुठूनही, सद्गुरूकडून अथवा आत्मस्फूर्तीनें ) मिळाली तर मुमुक्षुचा साधक होतो.

* * * *

४०. आंबा हा प्रत्येक स्थितींत चवदार असतो. कच्चे आंबे अगदीं लहान असतां बद्ध असतात, तरी ते रुचकर लागतात. झाडाला बरेच दिवस टांगले राहिल्यानें ते मुमुक्षु होऊं लागतात. अशा वेळेस त्यांना कैरी म्हणतात. झाडावरून ते सुटले म्हणजे कोठयांत पिकण्यासाठीं ठेवावे लागतात. तेथें त्यांना नियमबद्ध रहावें लागतें. मुमुक्षूचा साधक झाल्यावर त्याला देखील आंब्याप्रमाणें त्यांत पुष्कळ दिवस घालवावे लागतात. साधक आंबे ( शाक ) सुद्धां गोड लागतात. अंतःकरण खेंचून घेण्याची शक्ती साधकांत ( तशीच साधक आंब्यांत ) असते. साधकाची शेवटीं स्थिती म्हणजे मात्र पिकलेला आंबा. पिकलेला आंबा हा केव्हांही ( विक्रीसाठीं ) सिद्ध असतो.

* * * *

## सुवास पांचवा.

४१. तुम्ही आपल्या मुलाबाळांचा यथायोग्य संसार करून नातेवाईकांचा परामर्ष घेऊन, व्यवहारांत अत्यंत दक्षतेनें कार्य करून निजधामाला गेला असतां तुमचे गुणवाद गाऊन तुम्हांला पुष्कळ लोक " धन्य, धन्य " म्हणून म्हणतील. पण,

ते धन्य जे तुज निरंतर चिंतिताती । ते धन्य जे तव गुणास अखंड गाती ॥<br>
ते धन्य जे सतत बोध निपूर्ण झाले । ते धन्य जे तुजसि पाहुनियां निमाले १॥

यांपैकीं कोणत्या "धन्यांत" तुमची गणना होईल ?

* * *

४२. हें जग म्हणजे एक जत्रा आहे. जत्रेंत नाना वर्णांचे व वेषाचे लोक नाना कार्यानिमित्त फिरत असतात. कोणीं लोकांस भुलविण्यासाठीं जादूचे खेळ करतात. परमेश्वरानें देखील आपणांस भुलविण्यासाठीं पैसा, स्त्री पुत्र वगैरे मोह उत्पन्न केले असून 'नजरबंदीचे खेळ' तो करवीत असतो. जत्रेंत प्रत्येक दुकानदार माझें गिऱ्हाईक केव्हां येईल याची वाट पाहात असतो. मोहाची प्रत्येक वस्तु आपलें सावज केव्हां येईल याची वाट पाहात असते. चोर चोरी करण्याच्या हेतूनें फिरत असतात. अहंकार हा चोर तुमच्या आत्मतेजाची चोरी करण्यासाठीं सदैव घिरटया घालीत असतो. " सगुण मायेचा " " कोल्हाटणीचा खेळ " तर सर्वांच्या परिचयाचा आहे. जत्रेंत येणाऱ्या पुष्कळशा व्यक्तींचें ध्येय आनंद लुटणें, मजा मारणें हें असतें. जगांतील पुष्कळ व्यक्तींचें देखील हेंच ध्येय असतें. पुष्कळ जण घरून निघतांना ज्या देवाची जत्रा त्याचें दर्शन घेण्याचा मनांत बेत करून जातात. पण बाजार पाहिला कीं त्यांना मोह उत्पन्न होतो; हेतूची भूल होते. हीच स्थिति पुष्कळशा बद्धांची होते. निव्वळ ज्या निमित्तानें जत्रा भरते त्या निमित्ताचें

दर्शन घेऊन परत जाणारे फार थोडे. ज्या स्वयंभू परमेश्वराच्या लीलामात्रें करून ही अखिल चराचर सृष्टि निर्माण झाली त्याचें अनन्य भाव मनांत धरून स्मरण करणारे व त्याप्रत पोंचणारे फारच थोडे.

* * *

४३. पांढऱ्यावर काळें करणें हा शाईचा गुणधर्मच आहे. स्वच्छ अंतःकरणावर अपवित्रपणाचे काळे डाग पाडणें हा षड्रिपूंचा गुणधर्मच आहे.

* * *

४४. कागदावर पेपरवेट ठेवलें म्हणजे तो उडून जात नाहीं. तुमच्या अंतःकरणावर जर त्रयोदशाक्षरीं मंत्राचें तुम्ही वजन ठेविलें तर तुमचें मन भलतीकडे उडून जाणार नाहीं, कदाचित् संसारावरून उठेल.

* * *

४५. एकादी दोरी कोणत्याही परिमाणांत मोजा, तिची लांबी कमी व्हावयाची नाहीं. 'रघुपति राघवाचें' नाम तुह्मी कोणत्या भाषेंत घ्या, पद्यांत घ्या अथवा गद्यांत घ्या. त्याचें महत्व व त्याची गोडी कमी व्हावयाची नाहीं.

४६ शेक्स्पियरच्या 'रोमिओ ज्युलियट' मध्यें पक्षाला खेळविणाऱ्या एका मुलीची एक गोड कल्पना दिली आहे. रेशमी दोरी ज्याच्या मानेला बांधला आहे असें एक कबुतर एक मुलगी खेळवीत असतांना तें कबूतर स्वतंत्र होण्याचा यत्न करणार असें ध्यानांत येतांच त्या silken thread नें ती त्याला मागें खेचत्ये. ( रोमिओनें या ठिकाणीं स्वतः कबूतर होण्याची इच्छा दर्शविली आहे दोरा अर्थातच स्मराचा. ) जीवाची या संसारांत हुबेहूब अशीच स्थिति असते; कधीं काळीं या जिवाला विरक्ति उत्पन्न होऊन हा परमेश्वरप्राप्तीचा प्रयत्न करीत आहे असें दिसतांच माया ही आपल्या मोहानें, मोहाच्या रेशमी दोऱ्यानें—त्या जीवाचें hopping संपल्याबरोबर पटकन् खेचते व पुन्हां संसारांत गुंतवून टाकते.

* * *

४७. आशा हें समूळ खणून काढावी । तेव्हांची गोसावी व्हावें तेणें ॥
नाहीं तरी सुखें असावें संसारीं । फजिती दुसरी करूं नये ॥

तुकोबांचा उपदेश ऐकिल्याबरोबर दांभिकांची फार चैन झाली. तत्वज्ञानाच्या पोकळ गप्पा मारून मोठेपणा मिळवावा व इकडे वृद्धांप्रमाणें संसारांत गुंतून राहून तुकोबारायांची ग्वाही द्यावी, हा राजरोस मार्ग झाला आहे. संन्यासी होण्याला आशेचा समूळ नाश होणें जरूर आहे. पण समूळ नाश करितां येत नाहीं म्हणून व्यक्तीनें आपली आध्यात्मिक प्रगति थांबवावी असा ह्या वचनाचा अर्थ नाहीं. शिवाय संसारीं राहावें कां सांगितलें तर त्रिशंकू सारखी स्थिति न व्हावी म्हणून. पण गोम त्यांनीं ही ठेविली कीं, सुखें संसारीं

असावें. पैसा नाहीं म्हणून खिन्न असणाऱ्या, मनाजोगतें घर, आवडीजोगती पत्नी नाहीं म्हणून मनांत प्रत्यहीं झुरणाऱ्या व तत्वज्ञानाच्या फुकट वल्गना करणाऱ्या दांभिकांचा संसार 'सुखें' होत असेल काय ?

४८. तुम्हीं एकादां गुरू केला आहे काय? केला असेल तर तो गुरु खालील कोणत्या दोन गुरूपैकीं आहे याचा नीट विचार करा.

गुरवोः बहवः सन्ति शिष्यवित्तापहारकाः ।
गुरवोः विरलाः सन्ति शिष्यहृत्तापहारकाः ॥ १ ॥

* * *

४९. लहान मुलांना चिंचोके घेऊन " एकी का बेकी " खेळत असतांना व एकेक चिंचोक्यासाठीं भांडतांना पाहून आपण हंसत असतों. परंतु पैशासाठीं सदोदित मुलाप्रमाणें आपणाला भांडतांना पाहून देव हंसत नसेल काय ?

* * *

५०. 'अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत, अव्यक्त निधनान्येव' हें तत्व कित्येकांना ग्रहणास कठीण वाटतें. पण यांत विशेष असें कांहींच नाहीं. Emerson नें याची लाविलेली उपपत्ति पुष्कळांच्या परिचयाची असेल. [ इमरसन म्हणतोः—एक पूल असून त्याच्या दोन्हीं बाजूस दाट धुकें पसरलें आहे. पुलावर शिरतांना मनुष्य दिसतो. पूल चालतांना दिसतो व पूल संपला कीं दिसेनासा होतो. तो कोठून येतो व कोठें जातो हें समजत नाहीं. तद्वत जगांत येणारा मनुष्य प्रथम आलेला दिसतो व जातांना दिसतो. पण तो येतो कोठून व जातो कोठें हें समजत नाहीं. ] पण त्यापेक्षां विशद करून सांगावयाचें तर पाण्याप्रमाणें शिवाचेंही अनंतत्व आहे. पाण्यापासून बर्फ तयार होतें तद्वत शिवापासून जीवाची उत्पत्ति आहे. उष्णता लागली कीं, बर्फ पुन्हां पाण्यांत मिसळून जातें. नंतर त्याचा मागमूसही राहात नाहीं. तद्वत देहकार्य आटोपलें कीं, जीव शिवांत मिसळून जातो व त्याची खूण सुद्धां मागें राहात नाहीं. बर्फ स्थूल असून पाणी सूक्ष्म आहे. त्याप्रमाणें जीव स्थूल असून शिव सूक्ष्म आहे.

---

# धर्मविचार व स्त्रिया.

( लेखकः— **आनंदघनराम, तासगांव.** )

जीवनांत सर्वांत श्रेष्ठ विचार जर कोणता असेल तर तो धर्मविचार आहे. धर्म हा गूढांतील गूढ विचार आहे. आपल्या ऐहिक व पारमार्थिक जीवनाची सुधारणा करण्याचा जो विचार त्यालाच ' धर्म ' म्हणतात.

( १ ) **धर्म म्हणजे आत्म्याचा प्रकाश**—आत्म्याच्या आत्मपणाचें प्रगटीकरण आहे. म्हणून अमुक एक बाह्य क्रिया म्हणजेच धर्म, अमुक एक ग्रंथांत

सांगितलेला तेवढाच धर्म, असला हट्ट धरून चालणें, किंवा जगतांत धर्म म्हणून कांहीं नाहींच, अथवा मनुष्याला धर्म म्हणून विचार करण्यासारखी कांहीं बाबच नाहीं, असली कल्पना करणें या दोन्हीही बाजू घातकच आहेत. यांपैकीं एकीलाही न चिकटतां त्रयस्थपणानें विचार केला तरः—

धर्म म्हणजे ( मनुष्यांतील ) मनुष्याचें मनुष्यपण.

धर्म म्हणजे मनुष्याचें कर्तव्य.

धर्म म्हणजे सद्वर्तन.

धर्म म्हणजे जीवित चांगल्या तऱ्हेनें चालविण्याचा मार्ग.

धर्म म्हणजे श्रेष्ठांनीं आचरलेला आचार.

धर्म म्हणजे आपल्यांतील उच्च भावनांची जागृति.

धर्म म्हणजे शुद्धबुद्धीची प्रेरणा.

धर्म म्हणजे सर्वश्रेष्ठ शक्तीला ( ईश्वराला ) जाणण्याची क्रिया.

धर्म म्हणजे खरा पुरुषार्थ.

धर्म म्हणजे उत्तमांतील उत्तमाच्या प्राप्तीचा उपाय.

धर्म म्हणजे मनुष्यानें मनुष्यपणांतून ईश्वरीपणांत जाण्याचा रस्ता.

धर्म म्हणजे श्रेष्ठ लाभासाठीं कनिष्ठाचा यज्ञ ( त्याग ).

धर्म म्हणजे सर्वसमर्थतेची प्राप्ति.

धर्म म्हणजे आपल्या स्वतःच्या परमोच्च स्वरूपाचें व सामर्थ्याचें सम्यज्ञान.

अशाच धर्माच्या व्याख्या होतात, व या प्रमाणें विचार करूं लागलें असतां, मनुष्यांत गूढपणानें गुप्त किंवा सुप्त असलेल्या मनुष्याच्या परिपूर्णपणाला येणाऱ्या सामर्थ्याच्या दृष्टीनें मनुष्याच्या स्वरूपाचा विचार करणें म्हणजेच ‘ मनुष्य धर्म ’ होय.

२. विश्वांतील अत्यंत श्रेष्ठ, अत्यंत सूक्ष्म व अत्यंत गूढ, अशा सां भूत तत्वांतूनच जीवात्मा बनलेला आहे. तो विश्वात्म्यांतूनच आलेला आहे. म्हणून हा आपला आत्मा परमात्म्याचाच अंश आहे, व या जीवात्म्यांत परमात्म्याचीच सत्ता भरून राहिलेली आहे. यांत संशय नाहीं. हा जीवात्मा परमात्म्यापासूनच आलेला असल्यामुळें त्या सर्व शक्तिमान् परमात्म्यांत जें ज्ञान, जी सत्ता, जी शाश्वतता व जो आनंदभोग आहे, तो सर्व आपणांत आहे.

असें जें आपल्याबद्दलचें आपलें ज्ञान हाच मनुष्यधर्माचा उदय आहे.

३. विश्वव्यापक परमात्मशक्ति आणि देहव्यापक जीवात्मशक्ति जरी सजातीय व सधर्मी आहेत, तरी त्यांच्यांतील सामर्थ्यजागृतींत सागर व जलबिंदु, सूर्य व प्रतिबिंबसूर्य असें आज जें अंतर दिसत आहे, त्यामुळें परमात्मा सर्व सत्ताधारी, आकर्षक, व आपण जीवात्मा परतंत्र, त्याच्या सत्तेनें आकर्षिले जाणारे, लघुकेंद्र आहों.

याप्रमाणें परमात्मा जो ईश्वर त्याच्यांत व जिवात्म्यांत असलेला. जो धन व ऋण, बृहत् व लघु आकर्षणसंबंध, तो वाढवून लघु केंद्राला जागृति देऊन बृहत् केंद्राशीं समान करण्याची जी क्रिया त्याचेंच नांव धर्म.

जीवात्म्यानें आपलें आकर्षक सामर्थ्य वाढवीत परमात्म्यालाच आकर्षून जवळ आणीत सामर्थ्यपूर्ण होण्याची जी क्रिया त्याचेंच नांव भक्ति.

परमात्म्याशीं प्रेमानें एक होत सर्वत्र अविछिन्न एकत्वभावना होणें त्याचेंच नांव भक्तीची परिपूर्णता किंवा स्वरूपानुभव ज्ञान.

४. या स्वस्वरूपअनुभवसाक्षात्कारासाठीं, याच स्वस्वरूपसामर्थ्यानुभवासाठीं च या स्वस्वरूप आनंदोपभोगासाठींच मनुष्याला धर्मज्ञानाची व धर्माचरणाची अवश्यकता आहे.

परमात्म्यापासून निराळें होऊन दूर दूर जाण्याची, आत्म्याकडून मनाच्या तेथून इंद्रियांच्या वेगानें विषयांकडे बाहेर जाण्याची व बाहेरच राहण्याची, आम्ही देत असलेली वेगप्रेरणाच आम्हांला उत्तरोत्तर लघु बनवीत असते. ती प्रेरणा थांबवून आम्ही बाहेरील विषयाचा विचार व विकार न घेतां जसजसें ब्रह्मांडाच्या व पिंडाच्या आंत–हृदयांत–जाण्याची प्रेरणा देऊं, तसतसें 'बृहत्' बनत जात बृहत्केंद्रच बनूं.

२

५. माझ्या बंधूंनो आणि मायबहिणींनो, आपल्या जीविताच्या कल्याणासाठीं आपणाला नित्य कांहीं तरी कर्तव्य केलें पाहिजे, यांत कांहीं शंका नाहीं. प्रपंच हा एकसारखा पाठीस लागलेलाच आहे. आळें नाहीं बळें, आपला कायमचा ओढा तिकडे लागलेला आहे. आपल्या रोजच्या प्रापंचिक व्यवसायाच्या माऱ्यांतूनच इकडे थोडा वेळ काढल्याशिवाय सोय नाहीं. या प्रपंचाच्या रोजच्या संवयीनें, आमच्या मनांत धर्माचे विचार आंत शिरण्यास कठीण झालें आहे. इतकीं आमचीं मनेंच कठीण झालीं आहेत. ईश्वरी प्रेमाचा ओलावा, त्या मनाला मुळीं स्पर्शच करीत नाहीं. नेहमीं, हें माझें, तें माझें, हें मला हवें, तें मला हवें, अशा वृत्तीनें आमचीं मनें स्वार्थाच्या आशेनें भरून गेलेलीं आहेत. प्रपंचांतील काळज्या, आप्तांचीं सुखदुःखें, शरीरांच्या व्याधी, दायादांचीं भांडणें, या योगानें मनामध्यें निराशा, मत्सर, कुबुद्धि यायोगें वाईट वासना उद्भवून उद्भवून तें बिचारें मन कुजून नासकें होऊन, त्यांत दुर्गंधी भरली आहे.

६. अशा त्या मनाला स्वच्छ करण्याचें काम धार्मिक कर्माचें आहे. धार्मिक विचारांचें आहे. पण आमच्या या संवयींमुळें तीं धार्मिक कर्में सुद्धां अशींच थिजलेलीं घडत आहेत. आमच्या पूजेंत सुद्धां प्रेम, आनंद, एकत्व व ध्यान, या क्रिया घडण्याच्या ऐवजीं मत्सर, भेदभाव, कंटाळा, संशय व क्षुद्रता याच

भरून आमची ईश्वरी प्रेमभावना गारठून गेलेली आहे. यासाठीं तिला श्रवणाच्या उबेनें थोडी हुशारी आणा, विचारानें मनांतील किल्मिष जाळून टाका, व मननानें आपली चित्तशुद्धि करा. त्यासाठीं नित्य कांहीं काल काढतां त्यावेळीं त्या कालाचा उपयोग खरोखरी ईश्वर भावना जागृत होऊन ईश्वरी प्रेम वाढेल असाच करा. तें कसें तें बरोबर शिका. म्हणजे तुम्हांला नित्य कांहीं काल त्या परमानंदस्वरूपीं परमात्म्याचा साक्षात्कार अनुभवण्यास मिळेल.

३

७ समाजांत स्त्रिया हें धर्माचें अर्धांग आहे. स्त्रिया या पुरुषाला जन्म देणाऱ्या देवता आहेत. स्त्रिया या पुरुषाचा श्रेष्ठतम सखा आहेत. अशा स्त्रियांच्या वांट्याला धर्मांतील कोणता भाग आम्हीं दिला आहे? त्यांच्या वांट्याला व्रतें, उपोषणें आणि लक्षवाती किंवा बेलपत्ती, याशिवाय कांहींच येऊं नये असें नाहीं. यांतच किंवा नुसत्या पुराणश्रवणाच्या वार्तांतच त्यांचा जन्म जावा, हें ठीक नाहीं. असल्या या एवढ्या कार्यानें त्यांना ईश्वराची— ईश्वराच्या शुद्ध स्वरूपाची—ओळख कशी होणार? त्या पुरुषांच्या अर्धांगी आहेत. "यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः" अशी स्मृतिवाणी आहे. या गोष्टी नजरेसमोर ठेवून त्यांना योग्य कर्माचें ज्ञान करून द्या, शक्य तर त्यांना योग शिकूं द्या, त्यांना उपासनामार्गाचे योग्य धडे द्या, त्यांना अध्यात्मांत प्रगति करण्यास योग्य मदत करा, महान् पुरुषांप्रमाणें त्यांना योग्य सामर्थ्यवान् होण्याला येणाऱ्या अडचणी दूर करून पुढें सरकण्याला रस्ता करून द्या. असा रस्ता मिळाला असतां, मिराबाई, जनाबाई, मुक्ताबाई, वेणुअक्का अशा स्त्रियांनीं संतांच्या संगतींत स्त्रीपण विसरून ( पण आतांच्या कॉलेजांतील मुलीप्रमाणें नव्हे, ) पुरुषांच्याही पुढें जाऊन आत्मसाक्षात्कार करून घेतला आहे. पूर्वकालीं असा अभ्यास करणाऱ्या स्त्रियांत 'ब्रह्मवादिनी' व 'सद्योवधू' असे दोन प्रकार असत. याज्ञवल्क्याची स्त्री मैत्रेयी ही नवऱ्याबरोबर सभेंत जाऊन म्हणणेंही म्हणत होती. ती सद्योवधू होय. बृहदारण्यकांत गार्गी व वाचक्नवी यांचें वर्णन आहे. महाभारतांत सुलभेचें वर्णन आहे. रामायणांत शबरी व आत्रेयी यांची माहिती आहे. अशा अध्यात्मज्ञानपारंगत व योगज्ञानपारंगत होऊन गेलेल्या स्त्रियांचा इतिहास आपल्यापुढें आहे. तो ध्यानांत घेऊन जेथें अनुकूलता व शक्यता असेल, तेथें स्त्रियांना या ज्ञानांत पारंगत होण्याला मदत करा. त्यांना खुरटून देऊन कुचंबत ठेवूं नका. त्यांना सत्य ईश्वरज्ञान व आत्मज्ञान करून देऊन, आपल्या इतर स्त्रीभागिनींना उन्नतीला नेण्याचें पुण्यकर्म करण्याची पात्रता येऊं द्या. हाच स्त्रियांचा धर्म त्यांच्यांत पातिव्रत्याचें तेज जागृत करील. हाच धर्म पतीचा सर्व संसार सुखमय करील. हाच धर्म इहपरत्र त्यांना मोक्ष देईल.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पीनें ०१२.

२. **संतचरित्रमाला**:—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रे सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेंपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रें**:—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. ( आवृत्ति ४ थी )

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग पहिला. किं. १-०.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळे ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १०८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

मुमुक्षु REG. No. B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी के॰ विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ८५.

१२–१३. मुमुक्षुंतील निवडक निबंध ( भाग १–२ ):–किं. प्रत्येकीं रु. १।८

१४. मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १८१२.

१५. पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ८८.

१६. श्रीतुकारामचरित्र:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ॰ सह. किं. रु. ३.

१७. श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ८५.

१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख–विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ८१०.

१९. मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२०. मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ):—किं. ८४.

२१. सार्थ श्रीदासबोध:—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४८१०.

२२. सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ८१२.

२३. समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२४. मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु. २८४.

२५. श्रीएकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):—किं. रु. ६.

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २१ वें | पौष १८४९ | नवें वर्ष ८ वें |
| मास ६ वा | फेब्रुवारी १९२८ | अंक २ रा |



संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही.पी. नें रु. ३ॱ२

मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १ |
| २ श्रीकृष्णनाममाला ... ... ... ... | २–४ |
| ३ कृष्णार्जुनांची अन्योन्यप्रीती ... ... ... | ५–९ |
| ४ मधुबिंदु ... ... ... ... | १०–१२ |
| ५ मुंबईत श्रीशंकराचार्य ... ... ... ... | १३ |
| ६ ज्ञानेश्वरांची घोंगडी ... ... ... ... | १४–१५ |
| ७ निवृत्तीनाथस्तवनार्या ... ... ... ... | १६–१७ |
| ८ जय जय रघुवीर समर्थ ... ... ... ... | १८ |
| ९ कर्मयोग ... ... ... ... | १९–२८ |
| १० अध्यात्मविचाररत्नमाला ... ... ... ... | २९–३५ |
| ११ मध्वमुनीश्वरांची अप्रसिद्ध कविता ... ... ... | ३६–३९ |


---


# निरंजनमाधवाची कविता.

भाग १ ला किं. १ रु. भाग २–३ किं. १॥ रु.

पहिल्या बाजीराव पेशव्याचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्याच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गायिलेलें प्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुटकाव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेंत सांगणारीं अशीं घातलीं आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जें " सुभद्रा–चंपू " नांवाचें या कवीनें केलें आहे तें छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमींचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही भाग एकत्र बांधविले आहेत.

# मंगलाचरण





१

वैराग्यअभिमानें फिरतसें जातें । म्हणउनि त्यातें भवखुंटा ॥१॥
संचित मातृका वैरण घातली । व्यक्ति हे बुडाली अव्यक्तामाजी ॥२॥
नामरूपादिक दळियेलें सर्व । पीठ भरिलें देवें पंढरीच्या ॥ ३ ॥
नवल हा देव बैसला दळणीं । नाहीं केली जनी नामयाची ॥ ४ ॥

२

श्रीमूर्ती हृदयीं असे पै बिंबली । तैंच पालटली देहभ्रांती ॥ १ ॥
धन्य माझा जन्म धन्य माझा भाव । हृदयीं पंढरिराव नांदतसे ॥ २ ॥
आशा तृष्णा कैशा मावळल्या देहीं । चित्त विठ्ठलपायीं गळोनि गेलें ॥३
नामयाची जनी विश्रांति जाहली । हृदयीं राहिली विठ्ठलमूर्ती ॥ ४ ॥

३

सरिताचे वोघ सागरीं मिळाले । विदेहीं भरले मनेमन ॥
कवणाचें स्वागत पुसावें कवणातें । मग तें ऐक्य तें तेथें कैचें ॥
नाहीं दिवसराती नाहीं कुळयाती । नाहीं मायाभ्रांती अविद्येची
म्हणे गोराकुंभार सत्रावीचें क्षीर । भोगी निरंतर नामदेवा ॥

४

वंदावे कवणाते निंदावे कवणाते । लिंपावे कवणाते कवण्यालेपें ॥१
नाहीं जया रूप नाहीं जया नाम । तेंचि व्याले ब्रह्म असंगता ॥ २
जीवनीं चंद्रबिंब दिसतें बिंबलें । परि नाहीं बिंबलें जळामाजी ॥ ३
म्हणे गोराकुंभार आत्मया नामदेव । चिद्रूप आघवा अससी साच ४

---

वरील अभंग ‘ बहिणाबाईंच्या ’ गाथ्यांत मिळाले.

# श्रीकृष्णनामनाला.

[ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरीग्रंथांत भगवान् श्रीकृष्णाला प्रसंगाप्रसंगानें जीं विशेषणें किंवा नामें दिलीं आहेत, तीं येथें एकत्र केलीं आहेत. हें नामस्मरण गोड व पुण्यप्रद आहे. ]

१ श्रीसर्वेश्वर.
२ जगदाद्य.
३ जगदादिकंद.
४ जगन्निवास.
५ जगदीश्वर.
६ जगजेठी.
७ सकललोकैकआद्य.
८ त्रैलोक्यनायक.
९ त्रिभुवनदीप.
१० विश्वमूर्ति.
११ विश्ववद्य.
१२ विश्वकंद.
१३ विश्वेश.
१४ विश्वतोमुख.
१५ ( श्री ) नारायण.
१६ ( श्री ) अनंत.
१७ ( श्री ) अच्युत.
१८ ( श्री ) मुरारी.
१९ ( श्री ) मुकुंद.
२० ( श्री ) हरि.
२१ श्रीपति.
२२ श्रीमूर्ति.
२३ श्रीरंग.
२४ श्रीमंत.
२५ वेदांतवेद्य.
२६ विबुधवनवसंत.
२७ पूर्णपूर्णिमाचंद्र.
२८ भूतभारसहिष्णु.
२९ अमूर्त ( अव्यक्त, विश्वरूप ).
३० मूर्त ( व्यक्त, चतुर्भुज ).
३१ अद्वितीय.
३२ वैकुंठ ( नाथ ).
३३ श्रीवैकुंठनायक.
३४ वैकुंठीचा राणा.
३५ वैकुंठीचा वेल्हाळ.
३६ विष्णु.
३७ महाविष्णु.
३८ शारङ्गधर.
३९ शारंगपाणी.
४० शाङ्गीं.
४१ वैकुंठपीठीचें लिंग.
४२ सांवळें ( परब्रह्म ).
४३ पुरुषोत्तम.
४४ गोविंद.
४५ गोपाळ.
४६ षड्गुणाधिकरण.
४७ षड्गुणचक्रवर्ती
४८ षड्गुण ( भगवान् ).
४९ परब्रह्मअवतरण.
५० लोकनाथनायकनायक.
५१ समस्तसुराशिरोमणि.
५२ देवराय.

५३ ( देव ) देव.
५४ देवचक्रवर्ती.
५५ नृसिंह.
५६ वराह.
५७ बळिबंधन.
५८ लक्ष्मीपति.
५९ रमावल्लभ ( रमानाहो )
६० रमाप्राणेश्वर.
६१ श्रीकमळापति.
६२ श्रीवल्लभ.
६३ लक्ष्मीलीळ.
६४ यादवेंद्र.
६५ यादववीर.
६६ यादवेश्वर.
६७ यादवराव.
६८ केशिहंता.
६९ पार्थसारथि.
७० श्री ( कृष्ण ).
७१ अश्ववाहक.
७२ श्रीकृष्ण वैकुंठीचा.
७३ श्रीकृष्ण सद्गुरु.
७४ लोककृपाळ.
७५ लोकलालनलीळ.
७६ भक्तजनवत्सल.
७७ प्रेमळजनप्रांजळ.
७८ हृदयकमळआराम.
७९ चराचरैकभाग्य.
८० निजांचा चक्रवर्ती.
८१ परमानंदपुतळा.
८२ चराचरपरमगुरु.
८३ प्रणतप्रतिपाळ.
८४ कृपानिधी.
८५ कृपापीयूषजळ.
८६ कृपाळु.
८७ कृपाळुचक्रवर्ती.
८८ कारुण्यपूर्ण.
८९ उदारांचा राणा.
९० निजजनानंद.
९१ दातार.
९२ महानंदसमुद्र.
९३ आनंदघन.
९४ भक्तकामकल्पद्रुम.
९५ कलुषकरिकेसरी.
९६ त्रितापतिमिरतमारी.
९७ चराचरपरमगुरु.
९८ चतुरचित्तचमत्कार.
९९ हृषीकेश.
१०० हृदयस्थ.
१०१ अनाम.
१०२ साक्षीभूत.
१०३ विष्वक्सेन.
१०४ समर्थ.
१०५ पुराण.
१०६ आत्माराम.
१०७ निष्कळंक.
१०८ धर्मकीर्तिधवळ.
१०९ अगाधदातृत्वें सरळ.
११० अतुलबळें प्रबळ.
१११ सत्यसेतु.
११२ शरण्य.
११३ सत्यप्रतिज्ञ.
११४ कैवल्यपति.
११५ शरणागता शरण्य.
११६ सर्वरूपरूपस.
११७ सर्वदृष्टिडोळस.
११८ सकळकळांची कळा.

११९ विश्वाच्या जीवींचा जिव्हाळा.
१२० प्रभु.
१२१ ब्रह्मेशा आराधनेयोग्य.
१२२ योगियांचा निष्कामकाम.
१२३ औदार्याचा कुरुठा ( घर. )
१२४ सर्वसुखाचा वसौठा ( आश्रय )
१२५ त्रिभुवनींचें दैव.
१२६ कृपाळुवांचा रावो.
१२७ त्रैलोक्यपटाची घडी.
१२८ आकाराची पैलथडी.
१२९. विरक्तांचा एकांत.
१३० वेदीं प्रतिपाद्य देवता.
१३१ स्नेहाचें अवतरण (मूर्ति.)
१३२ प्रेमळांचा प्रियोत्तम.
१३३ अनन्याचा सोयरा.
१३४ अनाथांचा सखा.
१३५ सुरांचा राय.
१३६ पितामहाचा पिता.
१३७ देवी लक्ष्मीयेचा भर्ता.
१३८ वैकुंठपीठींचें लिंग.
१३९ सर्वज्ञांचा शिरोमणि.
१४० निगमपद्माचा पराग.
१४१ द्वारकेचा नरेंद्र ( नाथ ).
१४२ सकळसिद्धांचा रावो.
१४३ लक्ष्मीयेचा कांत (वल्लभ, भर्ता).
१४४ यादवकुळींचा कुळदिवा.

# कृष्णार्जुनांची अन्योन्यप्रीति.

१. श्री ज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरींत ह्या गुरुशिष्यांच्या गोडीचें फारच फार मधुर वर्णन केलें आहे. देव आणि भक्त, गुरु आणि शिष्य, वक्ता आणि श्रोता यांचा परस्परसंबंध किती जिव्हाळ्याचा असतो अगर असावा हें यावरून वाचकांनीं उमजून घ्यावें. भगवंताचें अर्जुनावर अत्युत्कट प्रेम असल्यामुळेंच त्यांनीं त्याचें सारथ्यपण पत्करलें. 'पाईक पाठीशीं घातला । आपण पुढां राहिला.' भीष्मद्रोणांसारखे गुरुजन कीं ज्यांच्याशीं स्वप्नांतही वैराची कल्पना असह्य — त्या स्वजनांवर बाण सोडायचें अर्जुनाच्या जिवावर आलें. यांच्यांशीं युद्ध करावें किंवा राज्यलोभ टाकून रणांगण सोडून जावें—'येणें मोहें चित्त व्याकुळ माझें.' कर्तव्याकर्तव्याचा झगडा अर्जुनाच्या मनांत चालला तेव्हां 'सखा सर्वस्व आघवें । आम्हांसि तूं' म्हणून अर्जुन श्रीकृष्णास शरण गेला.

तूं गुरु बंधु पिता । तूं आमुची इष्ट देवता ।
तूंचि सदा रक्षिता । आपदीं आमुतें ॥ २–५९ ॥

ही अर्जुनाची व्याकुळता, मोहग्रस्तता व शरणागति पाहून देवाचें हृदय कळवळलें. ग्रीष्मकाळीं गिरिवर वणव्यानें पेटावा तसा अर्जुन दुःखशोकानें जर्जर झालेला पाहून तो करुणामेघश्याम त्यावर 'वोळला.' देवाचे विद्युल्लतेसारखे चमकणारे दंत व ती मेघगंभीर वाणी–तो उदार आतां ज्ञानामृताची वृष्टि करील, त्यामुळें तो अर्जुनाचळ निवेल व मग त्यावर नवा ज्ञानांकुर फुटेल. पहिल्या मेघधारेंत दुसरा अध्याय देवाच्या मुखानें प्रगटला.

२. अर्जुनाला धीर आला. वासराच्या हुंदड्यानें गाय पान्हावते. वासरूं पारठें असलें कीं त्याच्या हुंदड्यानें गाईला जरा त्रास झाला तरी त्याची ती उत्कंठा पाहून तिलाही प्रेमाचा पान्हा फुटतो ! अर्जुन म्हणतोः 'देवा ! कर्माचा निषेध तूंच करितोस आणि मला हें हिंसात्मक कर्म करायला तूंच सांगतोस ! मी व्यामूढ झालों म्हणून तुला विवेक पुसला. तनुमनजीवें तुला शरण आलों आणि तूंच आम्हांस उलट गोंधळांत पाडतोस ! रोगनिवारणार्थ वैद्यानें औषध द्यायचें तें रुचकर, मधुर द्यावें, तसें सर्व बाजूंनीं पूर्ण विचार करून माझें चित्त बोधेल असा एक निर्णय सांग. दुटप्पी बोलूं नकोस. देवा ! तुझ्यासारखा गुरु जोडला असतांना मी आपली इच्छा पूर्ण करून कां न घ्यावी ? दुभती कामधेनु भेटली असतांना सर्व कामना तृप्त करून कां घेऊं नयेत ? अमृतसिंधूपाशीं

यावें आणि तहानेनें मरावें असें कोण करील ? 'तैसा जन्मांतरीं बहुतीं । उपासिता तूं कमळापती' जर आज हातीं लागलास तर तुला यथेच्छ आम्हीं कां विचारूं नये ? आईचें दूध प्यायला मुलाला जशी अवेळ नाहीं तसें माझ्या मनाला येईल तें मी तुला निर्भीडपणें विचारणार! तरी आचरायला योग्य आणि पारलौकिक हित जोडून देणारें एक निश्चित तत्व सांग'—देवांनीं यावर तिसऱ्या अध्यायांत '·केवळ कर्मयोग' सांगितला.

३. विवेकाची गोष्ट आणि ती सांगणार ' जगजेठी कृष्ण ' आणि विचारणार 'भक्तराज किरीटी', मग त्या गोडीला काय पारावार आहे ? पंचमस्वर आणि सुवास किंवा सुवास आणि सुस्वाद यांच्या एकीकरणांतली गोडी त्या संवादाला आली. जें रहस्य श्रीकृष्णानें बाप वसुदेवाला सांगितलें नाहीं किंवा देवकीमातेला अगर बंधु बळिभद्राला सांगितलें नाहीं तें गुह्य अर्जुनाला सांगितलें ! अर्जुनाचें भाग्य किती थोर ! देवाची अर्जुनाशीं एकरूपता पाहून मला वाटतें हा अमूर्त परमात्मा याच्याचसाठीं साकार झाला आहे ! नाहीं तर योग्यांना न सांपडणारा, वेदार्थाला न आकळणारा, ध्यानासही झुकविणारा हा

देव—हा त्रैलोक्यपटाची घडी । आकाराची पैलथडी ।
कैसा याचिये आवडी । आवरला असे ! ॥ ४–१५ ॥

हा त्रैलोक्यरूप वस्त्राची घडी असून आकाराच्या ( नामरूपाच्या ) पलीकडचा आहे पण या अर्जुनाच्या प्रेमांत कसा गुरफटला आहे पहा ! ( हे उद्गार ज्ञानेश्वरमहाराजांचे आहेत). हा कर्मयोग मी पूर्वीं विवस्वानाला, त्यानें मनूला व मनूनें इक्ष्वाकूला सांगितला अशी परंपरा सांगून देव म्हणतात ' अर्जुना ! हें माझ्या जीवींचें निजगुज तूं मला अत्यंत प्रिय असल्यामुळें तुझ्यापासून मला चोरून ठेववलें नाहीं. आम्ही संग्रामारूढ असलों तरी तूं माझा परमसखा असल्यामुळें तुला सांगावें लागलें ! अरे !

तूं प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा ।
मैत्रियेची चित्कळा । धनुर्धरा ॥ ४–२९ ॥

अर्जुनानेंही देवाला म्हटलें ' देवा ! आई लेंकरावर स्नेह करिते यांत नवल काय ? तिचा तो स्वभावच आहे ! ' तूं संसारश्रांताची साउली । अनाथजीवांची माउली ' आहेस, तुझ्याच कृपेनें आम्ही जन्मलों आहोंत. ' पांचव्या अध्यायांत थोडा योगप्रस्ताव केला असून तो अर्जुनानें विशेष आवडीनें ऐकला तेव्हां संपूर्ण योग ऐकण्याची त्याच्या मनांत इच्छा उद्भवली आहे हें 'परचित्तलक्षणाचा रावो ' म्ह० इंगितज्ञ अशा श्रीकृष्णानें जाणलें. तेव्हां ' म्यां जें कांहीं विवरूनि पुसावें । तें आधींच जाणितलें देवें ' असें अर्जुन म्हणाला. तेव्हां देव सांगतातः—

अर्जुना ! तूं परिससी । आणि परिसोनि अनुष्ठिसी ।

तरी आम्हांसीच वाणी कायसी । सांगावयाची ? ॥ ५-१६९

तूं ऐकायला आणि ऐकून त्याप्रमाणें वागायला तयार आहेस तर आमचें सांगायला काय जातें असें म्हणून देवानें त्याकडे प्रेमदृष्टीनें पाहिलें. ज्ञानेश्वर-महाराज म्हणतात कीं ती देवाची दृष्टि ही कारुण्यरसाची वृष्टि म्हणूं कां नव्यो स्नेहाची सृष्टि म्हणूं-तिचें आम्हाला वर्णन करवत नाहीं. ती अमृताची ओतली होती कां अर्जुनप्रेम पिऊन मातली होती म्हणून अर्जुनाच्या मोहांतून बाहेर पडण्याचें तिला समजेचना ! साहव्या अध्यायांतल्या पहिल्या दहा श्लोकांत योग्याचीं दिव्य लक्षणें सांगून देव ' शुचौ देशे ' इत्यादि श्लोकांत योगरहस्य उलगडून सांगणार तों तत्पूर्वीं ज्ञानोबारायानीं अर्जुनावर भगवान् प्रसन्न होऊन त्याच्या प्रेमाला किती भुलले होते याचें अत्यंत बहारीचें वर्णन केलें आहे. ते म्हणतातः—द्वैत समूळ खंडून काढून अद्वयामृताचें पान अर्जुनाकडून करवावें तर अर्जुन माझा लाडका व मी त्याला प्रिय या द्वैतांतल्या गोडीचें सुख जाईल, म्हणून देव तसें बोलले नाहींत. ( तत्वमसि या महावाक्याचा उपदेश केला नाहीं ) तर द्वैताचा पडदा ठेवून प्रेमसुख भोगण्यापुरतीं उभयतांचीं मनें वेगळीं ठेवलीं ! याचा अहंकार ( अर्जुनपणा ) गेला व हा जर मीच झाला तर मग मी एकव्यानें काय करावें ? एकटपणांत सुख काय ? डोळेभर पाहून दृष्टि निववावी, किंवा तोंड भरून बोलावें, किंवा घट्ट मिठी मारावी असें दुसरें कोण आहे ? ऐक्य झालें तर आपल्या पोटांत न मावणारी चांगलीशी गोष्ट कोणाला सांगावी ? असें काकुळतीला येऊन योग्याचें वर्णन करण्याच्या मिषानें त्या वर्णनांतच देवानें मनानें मनास आलिंगन देण्याचें ठरविलें. अर्जुन हें कृष्णसुखाचें मूर्तस्वरूप होय. म्हातारपणीं वांझेला शेवटीं शेवटीं एकच नवसाचें मूल व्हावें म्हणजे त्या मुलाच्या मोहजालांत ती कशी सांपडतें तशीच देवाची गत झाली ! अर्जुनाच्या मोहांत देव तसाच सांपडला. देवाचा असा प्रेमातिशय पाहिला नसता तर मी वांझेचा दृष्टांत देवाला दिला नसता ! पहा बरें कोठें युद्धप्रसंग व कोठें उपदेश ! समरप्रसंग हा काय उपदेशाचा काळ ? पण प्रेम आंधळें असतें. प्रेम आणि लज्जा, व्यसन आणि शीण, वेड आणि न भुलणें हें काय कोठें शक्य आहे ? माझ्या सांगण्याचा अभिप्राय एवढाच कीं, अर्जुन भगवंतांच्या प्रेमाचें स्थान झाल्यामुळें देवाच्या सुखानें श्रृंगारलेल्या मनाला तो आरसाच जणुं मिळाला ! नवविधाभक्तींपैकीं आत्मनिवेदन भक्तीच्या अलीकडची जी सख्यभक्ति तिच्या आसनावर आरूढ झालेली मुख्य देवता म्हणजे अर्जुनच होय. एकादी सती पतीला प्रेमानें भजते व जिला तिचा प्राणवल्लभही अतिशय मानतो ती पतीपेक्षांही गौरवाला अधिक पात्र होत नाहीं काय ? तसें येथें देवापेक्षाही अर्जुनाचीच अधिक स्तुति करावी असें मला वाटतें कां कीं तो

त्रैलोक्याचें भाग्य जो श्रीकृष्णपरमात्मा त्याच्या संपूर्ण प्रेमाचा एकाकी विषय झाला ! देवकीनें याला उदरीं वाहिलें, यशोदेनें श्रम घेऊन याचें लालनपालन केलें आणि हा शेवटीं पांडवांच्या उपयोगाला आला ! तस्मात् या पांडवांच्या ( अर्जुनाच्या ) भाग्याचेंच विशेष कौतुक करावेसें मला वाटतें !

४ सातव्या व आठव्या अध्यायाच्या संधिकालांत 'साधियज्ञा'दि सप्तपदें ऐकून अर्थबोध नीट न झाल्यामुळें अर्जुन जरा गोंधळला होता. तो भानावर आला व त्यानें त्या पदाचें अर्थ देवास विचारले व देवांनीं आठव्यांत त्यास उत्तरें दिलीं. ज्ञानोबाराय म्हणतातः—कृपारूप मंदवायूच्या योगानें तीं श्रीकृष्ण-वृक्षापासून सुटलेलीं वचनफळें अकस्मात् अर्जुनाच्या कर्णरंध्रांत पडलीं. सिद्धांतांचींच अंतर्बाह्य बनलेलीं, ब्रह्मरसाच्या सागरांत बुचकळलेलीं किंवा परमानंदांत घोळलेलीं तीं मधुर वचनें होतीं. त्या निर्मळ वचनांच्या श्रवणानें अर्जुनाला आंतून ज्ञानस्फूर्तीचे नवे नवे डोहळे होऊं लागून विस्मयामृताचे घुटके तो घेऊं लागला. त्या सुखसंपत्तीच्या भोगामुळें अर्जुन स्वर्गाला कमी लेखूं लागला व त्याच्या हृदयांत सुखाच्या गुदगुल्या होऊं लागल्या. भिडेची शींव न उल्लंघितां देवाला प्रश्न कसा विचारावा यांत तो मग्न झाला. ज्ञानोबाराय म्हणतातः अहो ! श्रीगुरूला विचारावयाचें असेल त्यानें याप्रमाणें सावध व्हावें. हें वर्म एका अर्जुनालाच ठाऊक. अर्जुना ! तूं आस्थेची संज्ञा ह्म० मूर्ति आहेस, बोलल्या गोष्टीची अनास्था करणारा नाहींस म्हणून तुला मी सांगतों. हें पहा, आपलें कोणी कोणाला सहसा सांगत नाहींः—

यालागीं सुमन आणि शुद्धमती । जो अनिंदक अनन्यगती ।<br>
पैं गा गौप्यही तयाप्रती । चावाळिजे सुखें ॥ ९–४० ॥

निर्मळ मनाचा, शुद्ध बुद्धीचा, पश्चात् निंदा न करणारा व निष्ठावंत असा श्रोता भेटला तर त्याला मात्र गुजगोष्टही खुशाल सांगावी. प्रस्तुत या गुणांनीं युक्त असा तुजवांचून दुसरा कोणी नाहीं म्हणून हा राजविद्या–राजगुह्य योग मी तुला सांगत आहे.

५. अर्जुनानें कांहीं विचारायचा अवकाश कीं देव समाधानाचीं उत्तरें देण्यास तयार. वासरूं पाहतांक्षणींच गाय खडबडून उठतें, मग स्तनामुखाची भेट झाल्यावर काय तिला पान्हा चोरतां येईल ? श्रीकृष्ण दयामृताचा मेघ आणि पार्थ संनिध आलेला वर्षाकाळ, किंवा कृष्ण कोकिळ आणि पार्थ वसंत ! अहो ! जें विश्वरूप शेषाच्या ( दोन हजार ) डोळ्यांनाही दिसूं दिलें नाहीं, ज्याचा वेदांनाही पत्ता लागूं दिला नाहीं, जें गुह्य लक्ष्मीपासूनही राखून ठेवलें–तें विश्वरूप अनेक प्रकारांनीं प्रगट करून अर्जुनाला दाखविण्याचा उद्योग देवांनीं केला ! अहो ! या पार्थाचें भाग्य केवढें अगाध ! पढविलेला पोपटही असें बोलत नाहीं, करमणुकीसाठीं पाळलेला पशुही इतका हुकमांत

राहात नाहीं. पार्थाचें भाग्य किती उजळलें आहे तें मला वर्णन करून सांगतां येत नाहीं! अर्जुन रागावला कीं देव शांत राहून सहन करितो, तो रुसला कीं हा त्याची समजूत पाडतो. देव अर्जुनासाठीं कसा प्रेमपिसा झाला आहे पहा!

६. अर्जुना! अरे तूं प्रज्ञेचा प्रियपति आहेस. माझी वक्तृत्वता उपवर झालेली तिला आज तूं योग्य वर मिळाला आहेस! कां कीं जेवढें माझें बोलणें तेवढें तुझें अवधान, असा श्रोता तूं आज मला मिळालास! देवाचें भाषण हा समुद्र व त्याचा एकच घोट करून गट्ट करणारा अर्जुन हा जणुं दुसरा अगस्तिच! आकाशींचा चंद्र जसा क्षीरसागरांत प्रतिबिंबावा किंवा भिंतीवरील चित्र समोरच्या स्वच्छ स्फटिकाभिंतीवर जसेंच्या तसेंच उमटावें त्याप्रमाणें देवाचा संपूर्ण बोध अर्जुनाच्या हृदयांत उमटला. तात्पर्य, अर्जुन व श्रीकृष्ण या उभयरूपांनीं एक बोधच नटला. देव प्रेमभरानें म्हणाले "अर्जुना! माझ्या निरुपाधिक स्वरूपाबद्दल कौतुकानें अखंड बोलत रहावेसें मला वाटतें, पण काय करावें? पुसणारेंच कोणीं भेटत नाहीं! तोंड भरून तूं आज विचारलेंस तेव्हां माझा मनोरथ सफळ झाला." अरे! अद्वैतांत भाषा नाहीं, पण अद्वैताही पलीकडचा सुखभोग माझा मला द्यायला तूं साह्यकर्ता झाला आहेस. 'पुसोनि मज माझें। देतोसि सुख'.

> दोहीं वोठीं एक बोलणें। दोहीं चरणीं एक चालणें।
> तैसें पुसणें सांगणें। तुझें माझें॥ अ० १५-४५४॥

पोट भरल्यावरही धेनु दूर व्हावी असें वत्साला वाटत नसतें, तसें देव बोलून थांबले तरी अर्जुनानें देवाकडे नुस्तें पाहतच रहावें! अनन्यप्रीतीची गोष्टच अशी आहे. प्रेमाची ही जात आहे. संवादाच्या मिषानें व्यवहारापलीकडील जी परमात्मवस्तु आहे तिचा भोग घेणें ह्म० आरशांत आपलें रूप पाहून सुखावण्यासारखेंच आहे.

# मधुबिंदु.

कविः—म. पां. ओक, पुणें.

### १. गुणाढ्य.

निर्दोष ऐसा नर एकही न। मिळूं शके या जगतीं, म्हणून।
थोडेच कीं दोष जया नरांत। गुणाढय त्यालाच गणा मनांत ॥

### २. मुलें.

स्वर्गांतुनी निर्मळ जीं गळालीं। सजीव रत्नें बहूमूल्य खालीं।
संज्ञा मुलें ही खुलते जयास। देखोनियां कोण भुले न त्यांस ॥
शिशुहीन न सद्म शोभते। धनधान्यान्वित तें असे जरी।
तम दैन्यज तेथ ना वसे। चमके जैं शिशुरत्न अंबरीं ॥

### ३. जुनें तें सोनें.

जुनीं लांकडें योग्य जाळावयाला। जुनें मद्य ......
जुने मित्र ते योग्य विश्वासण्याला। जुनीं पुस्तकें योग्य वाचावयाला ॥

### ४. आत्मस्तुति.

जनांहीं स्तवावें सदा आपणाला। असें वाटतें ज्याचिया मानसाला।
स्वतःच्या मुखानें कधीं ना स्तवावें। तयें आपणां हें स्वचित्तीं धरावें ॥

### ५. तृष्णा.

तृष्णारूपी कृष्णभुजंगी ज्याच्या अंतरिं राहे।
तया नराचा तरुपरि संश्रय सुखद कुणाही नोहे ॥

### ६. तीन गुण.

उद्यम, इंद्रियनिग्रह, मितव्यय, न हे जयामधीं तीन।
गुण बाणले तयाच्या हातीं धन राहणें बहु कठिण ॥

### ७. उद्योग.

उद्योगविमुख जे कां अभिमुख त्यातें न देवही असतो।
परि जे उद्यमपर नर त्यांस परात्परहि आपुले म्हणतो ॥
कार्यें करितां करितां करण्याची शक्ति वृद्धि पावतसे।
करितां अधिक परिश्रम विश्रमही साच अधिक लाभतसे ॥

### ८. पंडित व प्राज्ञ.

पांडित्य पंडितांचें केवळ ये पंडितोपयोगास।
प्रज्ञांची प्रज्ञा परि उपयोगी हो बुधाबुधजनांस ॥
विद्या इतुकी शिकलों ऐसा मनिं दर्प पंडितां होय।
ज्ञान किती मम थोडें ऐसा प्राज्ञासि शोभवी विनय ॥

### ९ सुंदर कोण ?
मन आनंदनिकेतन तनुही ज्याची निरामया नित्य ।
ऐसा कोण न सुंदर मदनाहि ज्याच्यापुढें फिका सत्य ॥

### १०. पुष्पें.
आनंदरूप जो विष्णू तयाचींच शुचिस्मितें ।
जगीं पसरलीं रम्य पुष्परूपेंचि वाटतें ॥

### ११. आळशी व उद्योगी.
आळशांना स्वभावेंची सर्वही अर्थ दुष्कर ।
उद्योगप्रिय जे त्यांना काय दुःसाध्य भूवर ? ॥
उद्यमें बुद्धिमंतांचें बुद्धिसामर्थ्य वाढतें ।
मन्दधींचें बुद्धिमांद्य तैसें ऊनत्व पावतें ॥

### १२. खलत्व.
खलाचे ऐकणें बोल खलाचें मुख पाहणें ।
स्वयेंचि समजावें हें खलत्वाप्रति पावणें ॥

### १३ इंग्रजांची राजनीति.
गारुडी पकडी साप, पाडी पकडतांक्षणीं ।
दांत त्याचे—तशी नीती दाविती आंग्ल या जनीं ॥ १ ॥
जिंकलेल्यांस निःशस्त्र करुनी ठेविती अहा ।
जेत ह्मणुनियां मोठा तोरा मिरविती पहा ॥ २ ॥
फूट सर्वां जनामाजी, अज्ञानाचा पुरा भर, ।
दौर्बल्याची पराकाष्ठा, एकमेकांत मत्सर ॥ ३ ॥
आधारस्तंभ हे चार रोवुनी मुख्य त्यांवर ।
आंग्लांनीं बांधिलें भव्य हिंदसाम्राज्यमंदिर ! ॥

### १४. धन आणि प्रीति.
धनपूरित भांडार, प्रीतिपूरित अंतर ।
दुसरें पहिल्याहूनी श्रेष्ठ मानी सुधी नर ॥

### १५. माता.
माता मातृपणा सोडी कधींहिं न असें घडे ।
पावित्र्याचीच ती मूर्ती न तिची तोड सांपडे ॥

### १६. धन व दारिद्र्य.
समाधान मनीचें जें धन तेंचि अकृत्रिम ।
अतिभोगस्पृहा हेची जाणा दारिद्र्य कृत्रिम ॥

### १७. स्वातंत्र्य.
स्वातंत्र्य हेंचि राष्ट्राचें असे शाश्वत यौवन ॥

**१८. काव्य.**

हृत्संस्कारविशेषांचा आविष्कार मनोहर ।
जो तया काव्य हें नाम देती पंडित सादर ।।

**१९. स्त्रिया.**

अभिनव यौवन असतां पुरुषांच्या स्वामिनी स्त्रिया होती ।
सोबतिणी मध्यवयीं धात्रीकर्मास वार्धकीं करिती ।।

**२०. जनरीति.**

निवर्तले संत तया स्तवावें । जिवंत जे त्यास परी छळावे ।
हा ! हा ! जगीं हे विपरीत रीती । प्रायःकसे हो जन आदरीती ।।

**२१. गुणांमुळें छळ.**

फलभरें भरला तरु जोंवरी । दगड फेकिति लोक तयावरी ।
वसति अंगिं बहू गुण ज्याचिया । कटुवचें खल ताडिति ते तया ।

**२२. खलजिव्हा.**

हृन्मर्मकर्तनीं नच खलजिव्हेसारखी सुरी दुसरी ।

**२३. कीर्तीचा मत्सर.**

पेटतो वान्हि त्यांतून धूमजाल निघे जसें ।
पसरे कीर्ति तींतून जन्मा मात्सर्य येतसे ! ।।

**२४. सुधी.**

धीधन व्हावें परी न धनधी कधिंही सुधी नरानें ।

---


१५।२।२८ ला तयार होईल !

पृ. सं. ४५० ) **ज्ञानेश्वरांची प्रभावळ.** ( किं. रु. २

ग्रंथकारः—**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर**, बी. ए.

श्रीज्ञानेश्वरमहाराज, निवृत्तिनाथ, सोपानदेव व मुक्ताबाई व त्यांच्या प्रभावळींतले विसोबा खेचर, नामदेवराय, जनाबाई, परसा भागवत, जनमित्र नागा, चांगदेव, कान्हो पाठक, जोगा परमानंद, नरहरि सोनार, सेना न्हावी, गोरोबा कुंभार, सावता माळी, भागु महारीण, चोखा मेळा, त्याची स्त्री व मेहुणा बंका इ. २९ एककालीन संतकवींच्या निवडक उक्तींचा ज्ञानभक्तिपूर्ण संग्रह प्रस्तुत ग्रंथांत केला आहे. 'आई' ज्ञानेश्वरीची उत्कृष्ट ओळख व्हावी ह्मणून ज्ञानेश्वरींतील कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग अशा तीन मुख्य मथळ्यांखालीं ज्ञानेश्वरींतील निवडक वेचे विषयानुक्रमानें घेतले असून सर्वांस कळेल असा सुलभ गोषवारा प्रथम दिला आहे. २५०० वेंचक ओव्या व ४०० अभंग एवढा संग्रह क्रमवार घेतला असून भरपूर टीपा व प्रस्तावना दिली आहे. ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे.

**मिळण्याचीं ठिकाणें:—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें शहर.**

**तु. पुं. शेट्ये, बुकसेलर माधवबाग, मुंबई.**

# मुंबईंत श्रीशंकराचार्य.

श्रीशंकराचार्य मठ संकेश्वर आणि करवीर, यांची स्वारी मुंबईंत महिनाभर गिरगांवांत फडके यांचे गणपतिमंदिरानजीक वस्तीस आली होती. मुंबई-करांनीं त्यांना सामोरे जाऊन मोठ्या समारंभानें वस्तीस आणलें. श्रींच्या नित्य दर्शनास स्त्रीपुरुषांची गर्दी होत होती, व कथापुराणें व व्याख्यानें यांचीही झोड उडाली होती. लोकांच्या धर्मभावना उद्दीपित होण्यास श्रींच्या आगमनाची फार गरज होती व श्रीही मुंबईत एवढी धर्मश्रद्धा अद्याप आहे याबद्दल वारंवार संतोष दर्शवीत होते. कलकत्याचे सुप्रसिद्ध महामहोपाध्याय अनंत कृष्णशास्त्री पंडित व काशीचे पंडित राजराजेश्वर यांचीं वर्णाश्रम, जातिभेद, शुद्धि, पुनर्विवाह इ॰ धार्मिक व सामाजिक विषयांवर नित्य व्याख्यानें होत असत. दोन्हीही शास्त्री अनंत विद्वान् आहेत. त्यांचीं व्याख्यानें अर्थात् सनातनधर्माच्या बाजूचीं होत. दोघेही जाडे पंडित. अनंत शास्त्रयांचीं ३।४ व्याख्यानें संस्कृतांत आम्हांस ऐकावयास मिळालीं व फार समाधान वाटलें. वेदशास्त्रांचें अध्ययन दांडगे, वर्तमानकालाची जाणीव पण सनातन-धर्मप्रीति अपार, वक्तृत्व अस्खलित व रसाळ, विनय मधुर या गुणांची जोड त्यांचे ठिकाणीं उत्कृष्ट पाहिली. आमच्या महाराष्ट्रांत यांच्या तोलाचे पंडित असल्यास फार विरळ. श्रींच्या आज्ञेनें मंडपांत श्रीसमोर रा. पांगारकर यांचें 'ज्ञानेश्वरांचें अवतारकार्य व स्वधर्मानुष्ठानानें ईश्वरप्राप्ती' यांवर प्रवचन झालें. श्रीही स्वतः विद्वान् आहेत. कांहीं प्रचलित वादात्मक विषयांवर श्रींनीं आज्ञापत्रें तडकाफडकीं काढावींत अशी कित्येक नवीन पंडितांची मागणी असूनही श्रींनीं उतावीळपणा करून काढलीं नाहींत व सदर विषयांवर शास्त्रीपंडितांची चर्चा होऊं दिली यावरून त्यांचे गांभीर्याची लोकांस प्रतीति आली. नवीन विचारांची छाप कांहीं नवशिक्षित लोकांवर असली तरी बहुजनसमाज सनातनधर्माच्या बाजूचाच आहे हें नजरेस आलें. मारवाडी विद्यालयांत पुनर्विवाहाचा वाद चालू असतां जुन्या मताचा जोर होऊन नवीन मताच्या अध्यक्षास ( डॉ. सावरकर ) सभा बरखास्त करून तेथून पळ काढावा लागला. चालू पडत्या काळांत व धर्मशून्यतेच्या परिसरांत मुंबईसारख्या बकाली नगरींतही लोकांची धर्मपीठावरील श्रद्धा व सनातनधर्माची प्रीति अढळ आहे हें पाहून कोणास समाधान होणार नाहीं ? मुंबईस सनातन धर्माच्या बाजूचें वर्तमानपत्र नाहीं याची उणीव पुष्कळांस भासली. श्री मुंबईतून कल्याण, नाशीक, जळगांव इकडे जात आहेत. श्रीकुर्तकोटीस्वामी यांचीही मुंबईस स्पृश्यास्पृश्यविचार यावर दोन प्रवचनें झालीं.

# ज्ञानेश्वरांची घोंगडी.

लेखक—द. ज. माहुलीकर, बडोदें.

तुझी घोंगडी चांगली चांगली, आम्हांस कां दिली वांगली रे ॥ ध्रु० ॥
प्रगट सच्चिदानंद मुरोनि, शुद्धसत्वगुणें विणली रे ।
निर्गुण गोंडे रत्नजडित तुज, श्यामसुंदरा शोभली रे ॥ १ ॥
काम्यकर्मअविद्यात्रिगुणपंचभूतांनीं विणली रे ।
रक्तरेत दुर्गंधी जंतू नरक मूतानें भरली रे ॥ २ ॥
षड्विकार षड्वैरी मिळुनी तापत्रयानें विणली रे ।
नवा ठाईं ती फाटुनि गेली ती त्वां आह्मांस दिधली रे ॥ ३ ॥
ऋषिमुनि ध्याती मुखीं नाम गाती, संदेहवृत्ती मुरली रे ।
बाप रखुमादेविवरू विठ्ठले ! त्वत्पदिं वृत्ति मिनली रे ॥ ४ ॥

हे भगवान्, तुझी घोंगडी चांगली आहे, तुझ्या घोंगडींत सच्चिदानंद मुरला आहे, ती शुद्धसत्व गुणानें विणली आहे, तिला निर्गुणाचे गोंडे आहेत. ही घोंगडी, हे श्यामसुंदरा, तुला फार चांगली शोभते.

आमची घोंगडी कशी आहे ?

आमची घोंगडी काम्य कर्म अविद्या त्रिगुणानें युक्त, खेरीज पांच महाभूतानें विणलेली, रक्त, रेत, दुर्गंधी, जंतु, नरक, मुतानें भरलेली आहे, आणखी ती षडविकार, षडवैरी एकत्र होऊन त्रिविध तापानें विणलेली आहे. नुसती ही घोंगडी घाणेरडी आहे असें नाहीं तर फाटली पण आहे. एक दोन ठिकाणीं फाटली आहे असें नाहीं तर ती नऊ ठिकाणीं फाटकी आहे. देवा ! अशी अत्यंत घाणेरडी व फाटकी घोंगडी तूं आह्मांला दिलीस व तूं जी अविनाशी अमृत-रूप अशी घोंगडी पांघरतोस त्या तुझें ऋषीमुनि ध्यान धरतात व मुखानें तुझें गोड नांव गातात; त्यांची संदेह वृत्ति मुरली आहे.

श्रीज्ञानोबाराय ह्मणतात श्री विठ्ठलाचे पायीं मी लीन झालों आहें.

येथें " घोंगडी " ह्म० देह. या देहासंबंधीं जर विचार केला तर नरदेहा-सारखी अत्यन्त घाणेरडी असी वस्तु नाहीं. याचविषयीं श्री ज्ञानोबाराय घोंगडीच्या रूपकानें श्रीपांडुरंगाशीं बोलतात.

ईश्वरानें अनेक जीव निर्माण केले आहेत व त्यांत असे उपयोगी पडणारे जीव आहेत कीं त्यांचे शरीरापासून रेशीम निघते; काळवीटापासून कस्तुरी निघते; हत्तीच्या दांताच्या वस्तु होतात; पण मनुष्याच्या शरीरापासून कांहींच होत नाहीं. असा हा मानवदेह अतितुच्छ आहे पण या देहाचा केवढा

अभिमान ? कोणी टुकार देतां कामाचें नाहीं. या देहाला सुंदर वस्त्र, डोक्याला छान शिरस्त्राण, हातांत आंगठी; स्त्रियांचें शरीर म्हणजे अलंकारांचें संग्रहस्थान या देहाची किती तरी मंडळी आहेत ? आई, बाप, स्त्री, पुत्र, मित्र, कन्या, जामात, बंधु वगैरे पुष्कळ मंडळी आहेत. जे ते हा माझा असे म्हणतात. जोपर्यंत आपण धन, कीर्ति यांनीं संपन्न आहों तोंपर्यंत ही मंडळी अभिमानी, नाहीं तर हीच मंडळी निंदक द्वेषी होतात.

हें शरीर जरी घाणेरडें आहे तरी पण कर्तव्यकर्मांत जागें असणाराला मोक्ष देणारें आहे हें असें घाणेरडें शरीर मनुष्यास ईश्वरानें मुद्दाम दिलें असावें, कारण क्षणोक्षणीं यांतून निघत असलेली घाण पाहून मनुष्याला या शरीराचा वीट येऊन त्याचा अभिमान सुटावा, आणि परमार्थ घडावा !

मनुष्यदेहांत आलेले जे थोर पुरुष आहेत ते या अस्थिमांसानें बनलेल्या व मलमूत्र प्रसवणाऱ्या देहाचा काडीइतका अभिमान न बाळगतां व त्याच्या जोपासनेंत आयुष्याचा दुरुपयोग न करतां अविनाशी अमृतरूप अशी ईश्वराची घोंगडी आपणांस कशी मिळेल, जन्ममरणाचे परंपरेंतून सुटून अमृतरूप केव्हां बनूं, अशी इच्छा करीत विदेहकैवल्यप्राप्तीकरितां यत्न करितात.

हे भगवन् ! आम्हांला या घाणेरड्या घोंगड्या पांघरतां पांघरतां कंटाळा आला. हे नारायणा ! आपण चांगली घोंगडी पांघरतां व आम्हांला ही अशी घाणेरडी देतां ? आपण सर्वश्रेष्ठ आहां व आम्ही आपलीं लेंकरें आहोंत म्हणून ज्ञानोबाराय म्हणतात कीं, विठ्ठला ! तुझी घोंगडी सच्चिदानंदरूप, कधींहि नष्ट न होणारी न झिजणारीं अशी सुंदर आहे ती आम्हांला दे.

---

# श्री निवृत्तिनाथस्तवनार्या.

कविः—ग गो जोशी.

श्रीमन्निवृत्तिनाथा, साधी, मी ठेवितों पदीं माथा;
भवभयहरणा, त्राता आतां तूं, काम मारितो लाथा. १
होती लीन पदीं हे संत, तुझ्या, तारि कोण गात्यातें;
पाहुनि निष्ठा त्यांची, देव न हो कां प्रसन्न गात्यातें २
श्रीत्र्यंबकांत वससी तूं एकांत स्थलास पाहून;
घेऊन शिरीं पातक आलों येथें अनाथ धांवून ३
दूर न ढकली मातें, भवाब्धि—नौका तुझ्याविना कोण !
तारक, मारक भक्तां जरि धरिलासे तुवां गिरीकोण ४

देवा, निवृत्तिनाथा, प्रवृत्तिनाथास कोण गा तारी !
पडलों विषयसमुद्रीं, ग्रासिति कामादि–मकर, त्यां वारी ५
विषयेंद्रिय–संयोगें जें जें मिळतें जनांस अल्प–सुख;
त्या द्वंद्वांत बुडालों; विठ्ठल–चरणास होउनी विमुख ६
श्रुति कठ सांगे लोकां " परांचि खानी " जनांस बाह्य–मुख;
धीर–पुरुष आहे जी, वळतीं त्यांतें करोनि अंत मुख ७
श्रुतिंत तसा स्मृतिमध्यें सांगितला एक सच्चिदानंद;
परि तो विचार सारा संस्कृतिं, अज्ञां मिळे न आनंद ८
ज्ञानेशें जाणुनि हें केली " भावार्थदीपिका " टीका
संसार–सुखांधाच्या काढी ती ज्ञान–चक्षुच्या टीका. ९
ज्ञानेश घालि पाया, देऊळ करि त्यावरील नाथ–तुका;
या देवळांत रमतो त्या पुढति बृहस्पतीहि होय मुका. १०
विठ्ठल–चरणीं झाली ज्याची ती एकनिष्ठता भावें,
गातां टाळ–मृदंगीं कां त्या परमेश्वरें न तारावें ! ११
" अपिचेत्सुदुराचारो " इत्यादी वाक्य सांगते गीता;
करि जो भगवद्भजना, वैश्यस्त्रीच्या निवारि भव–शीता १२
हा भक्ति–मार्ग शिकविति निवृत्ति नाथादि–संत यां लोकां
यवनांच्या कालीं ही झाली उपकृति जनांस आलोका १३
पंढरपुरांत रमती विठ्ठल–चरणीं अनेक हे भक्त;
तरती दर्शन घेतां, जे संसारांत असति हो सक्त, १४
मुख नामोच्चार करी, कर्ण करी टाळ–नाद तो श्रवण;
दृष्टी विठ्ठल–पायीं; ऐशीं हीं इंद्रियें तुला शरण. १५
मग मन काय करी गा, येतें संसार कल्पने मरण;
जग हो विठ्ठल सारें " वसुधैवकटुंबकं " तदाचरण. १६
संन्यासी पुत्र म्हणुनि छळिती ब्राह्मण तुम्हांस हे फार;
परि साक्षात् परमेश्वर होतां, तरि दाविले चमत्कार. १७
चालवुनी भिंत तसे, वदविति रेडयामुखें कसे वेद !
मायेचा खेळ असा, ब्रह्ममध्यें दिसे न तो भेद १८
पंडित ब्राह्मण तेव्हां नाथ–तुकाराम–साधुंला छळिती
वेदार्थ आणिला हा सर्व मराठींत, ही तरी न रिती १९
सोसुनिया छळ सारा केले लोकीं अनंत उपकार
ब्रह्मस्वरूप होउनि भक्तीचें दाविलें जनां सार २०
घेउनि अवतार विभो, पवित्र केली जनांत आळंदी
क्षेत्र श्रीत्र्यंबक हें रमला येथेंचि सच्चिदानंदीं. २१

वेदांत—विषय अवघड, केला दृष्टांत देउनी सोपा
सोपान जो असे गा, मोक्षासी, जाळि वासना—कोपां २२
तो संप्रदाय आहे कारण याशी, म्हणोनि किती संत
परि भगवद्भजनीं रत, शोधिति हृदयांत इंदिराकांत २३
पौषांत वद्यपक्षीं सैकादशिस भक्तिनें जमती
श्रीत्र्यंबकांत रमती निवृत्ति—चरणांत, देव हे गमती २४
त्यासाठीं करुनी स्तव अर्पी संत—चरणांस मी भावें
जाळुनि कामादिक—रिपु, निवृत्तिच्या कां पदा न लाभावें ! २५

---

## स्फुट अभंग.

**व. ना. वैद्य** ( कल्याण )

सत्याचे आभास दावुनी मानवा । मोहक तव माया भुलवी ही'।
मोहाचें तें वेड जीवास जडुनी । सत्य सौंदर्याला पारखा ' मीं, ।
विषयाच्या तंद्रीनें हर्ष तो विषयीं । शाश्वतेला जाई विसरुनीं ।
चैतन्य फुलाचे गाभ्यांत सुवास । निराकारि वायूस मोल त्याचे ।
मधावरी भृंग वेडावुनी जाई । सुवासाचें मोल उमजेना ।
अंतरींची खूण अंतरात्मा जाणें । बाह्य प्रकृतीस ठाव नाहीं ।
सौंदर्याचें रूप आत्म्यांत विराले । चर्मचक्षुसाहीं शोधी वेडा ।
बाह्य कृष्णरूपें वेडाल्या गोपी । वृंदावनीं कान्ह्यास शोधिती त्या ।
राधेनें हृदय केलें ' वृंदावन ', । अक्षयचा नांदे तेथें कान्हा ।

---

## ' जय जय रघुवीर समर्थ '

चाल ( आनंदकंद ऐसा )

जयघोषि या समर्थें—चैतन्य चेतवीलें ॥ ध्रु० ॥
स्फूर्तीस फूलवीलें—धर्मास जागवीलें,
शिवबास जागवीलें—राष्ट्रास भूषवीलें,
एकादशाक्षरी हा—हृदयांत दिव्य मंत्र
जधिं बिंबला तयाच्या,—उसळूनि वीर्यस्फूर्ति,
आनंदकंद ऐसी—रणभूमि भासली त्या,
बेदर्द शूर निधडा—चैतन्यमूर्ति शिवबा,
परवा न त्या स्वजाची—परमार्थ राष्ट्रकार्यीं,
बाका वखत जधीं ये—शत्रू अती बलिष्ठ,

परि पाठ त्यांस देतां—व्यसनीं बुडेल चिंता,
का धर्म मायदेश—जरि धूर्त धैर्यवान,
चिंतार्णवांत बुडतां—नैराश्य ठाव देई,
सूचे न कांहीं जेव्हां—'रघुवीर' जय समर्थ,
आशाच मूर्तिमंत—स्फूर्ती मनांत दत्त,
झाणिं ठाकवी मनांत—जयघोष हा समर्थ,
ग्रहणांतुनी सुटूनी—झळके स्वराज्यभानु,
जयघोषिं या समर्थें—चैतन्य चेतवीलें,
राष्ट्रास भूषवीलें—धर्मास जागवीलें.

---

# कर्मयोग.

लेखकः–**नरहरशास्त्री जोशी** ( खरशीकर. )

१ कर्मयोग याचा अर्थ अध्यात्मदृष्ट्या कसा आहे तो आज मी आपल्या वाचकांपुढें मांडणार आहे.

२ सर्व कर्मे परमात्मसंवेदनेनें होणें; चराचरांतील चैतन्याशीं, ब्रह्माशीं, तद्रूपता पावणें; यासच वेदांतांत खरें व उच्च दर्जाचें कर्म म्हणतात. कर्माचे प्रकार चार आहेत. १ नित्य, २ नैमित्तिक, ३ काम्य आणि ४ निषिद्ध. पैकीं निषिद्ध कर्म ( वर्णाश्रमास बाधा करणारें ) वर्ज असल्यामुळें तें करावयाचें नाहीं.

नानायोनिगतः पश्चात्प्राप्य ते नरजन्महि । (कपिल मुनि.)

अनंत योनींतून भ्रमण करीत करीत अनेक तऱ्हेच्या यातना, विपत्ति व हाल भोगीत जीव हा मनुष्यत्वास प्राप्त झाला आहे. इतर कोणत्याही योनींत अप्राप्य अशी वरिष्ठ प्रकारची बुद्धि मनुष्यजन्मांतच जीवांना मिळाली आहे. या बुद्धिबलावर हृदयस्थ परमात्म्याशीं तादात्म्य पावून अत्यंत दुःखमय जन्ममरणपरंपरा खुंटविणें एवढयासाठींच मनुष्यजन्माची योजना झालेली आहे. कर्म सत्कर्म असो वा असत्कर्म असो, तें कर्म फल देतच असतें व तें कर्मफल भोगण्यास जीवाला पुनः पुनः जन्ममरणाच्या चक्रांत फिरावेंच लागतें. एवढयासाठीं सकाम कर्मे–काम्य कर्मे–करूं नयेत अशाबद्दल श्रुतिशास्त्रांची आज्ञा आहे. सकाम कर्म करून निरनिराळ्या भोगांच्या वासना वाढतात, परंतु मनुष्यजन्म विषयभोगासाठीं नाहीं, तर विषयनिवृत्तीसाठीं आहे; याकरितां मानवदेहांत असतां आपलें ईश्वरत्व न ओळखतां सकाम कर्मे करून विषयच जर वाढविले तर जन्ममरणपरंपरा कधींहि सुटणार नाहीं व जीवास आत्यंतिक सौख्य केव्हांही प्राप्त होणार नाहीं.

शेवटील पाळी मनुष्य हा जन्म ।
चुकलिया वर्म फेरा पडे ॥ १ ॥

असें तुकोबाही म्हणतात. एवढयासाठीं आपणांस परम श्रेयस्कर व पारमार्थिक आनंद मिळवियासाठीं काम्य कर्म वर्ज केलें पाहिजे. काम्य आणि निषिद्ध हीं दोन कर्मे सोडून दिलीं म्हणजे नित्य व नैमित्तिक या दोन प्रकारचीं कर्मे करण्याचा अधिकार जीवास राहतो. आतां आपलें स्वतांचें, व समाजाचें ऐहिक व पारमार्थिक श्रेय होण्यास कर्माचरण कसें असावें हें सांगण्यापूर्वी अगोदर या जगताचा सत्यदृष्टीनें विचार करूं.

ईशावास्यमिदꣳसर्वं यत्किंच जगत्यांजगत् ॥ ई. नि.
यच्च किंच जगत्सर्वं दृश्यते श्रूयतेपि वा ॥
अंतर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थितः ॥ ना. उ
यदिदं किंचिदाभाति जगज्जालं प्रदृश्यते ।
तत्सर्वममलं ब्रह्म बहिरंतर्व्यवस्थितौ ॥ यो. वा.

वगैरे वचनें पाहतां या जगताचें अंतर्बाह्य स्वरूप एकच आत्मा, ईश्वर, परमात्मा, ब्रह्मच आहे हें सिद्ध होतें.

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ॥ (भ. गीता.)
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ (भ. गीता.)

ममैव परमात्मनो नारायणस्यांशो भागोऽवयव एक देश इत्यनर्थान्तरं जीवलोके जीवानां लोके संसारे जीवभूतो भोक्ता कर्तेति यः प्रसिद्धः सनातनः पुरातनः
(श्रीमच्छंकराचार्य भाष्य.)

भावार्थ—मी जो परमात्मा नारायण त्याचा जो जीवभूत हा जीवलोकांमध्यें पुरातन अंश होय. अंश, भाग, अवयव व एकदेश हे समानार्थकच आहेत. जीवांचा लोक तो जीवलोक. लोक म्हणजे संसार. कर्ता व भोक्ता म्हणून जो प्रसिद्ध आहे तो जीवभूत असलेला माझा पुरातन अंश होय. मी एका अंशानें हें सर्व जगत् व्यापलें आहे.

३ यावरून पाहतां जीव व जगत् हे परब्रह्मरूपी सागरावरील तरंग होत. अशी खरी स्थिति असतांना आमच्या खुळ्या कल्पनेनें आम्ही जीव आहों, अशी भासमय कल्पना केली आहे. कल्पना मिथ्या आहे. परंतु या मिथ्या कल्पनेमागें वांवून जीव हा अत्यंत घाबरा होत आहे; व नसतेंच कर्तृत्व भोक्तृत्व उत्पन्न करून दुःख मात्र भोगीत आहे. परंतु जीव तोच सोऽहं, मी ब्रह्म, अहं ब्रह्मास्मि, आहे, हा वेदांन्तसिद्धांत आहे.

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ।

असें श्रीमदाचार्य सांगतात. जगत् नसून ब्रह्मच आहे. जीव नसून ईश्वरच आहे. प्रत्येक जीवाची सुखासाठीं अत्यंत धडपड असते. आपणहि सुख व्हावें म्हणूनच कर्में करीत असतों. जीवाला विषयगत सौख्य कितीही प्राप्त झालें तरी समाधान असत नाहीं. याचें कारण सर्व जगाची आत्यंतिक सुखाकडे जाण्याची इच्छा आहे. परंतु मृगजळास भुलून मृग जसे प्राणास मुकतात त्याप्रमाणें विषयांपासून निर्माण झालेलें सुख हें शाश्वत सुख नसल्यामुळें जीवास बिलकूल समाधान होत नाहीं. विषयजन्य सुख कितीही प्राप्त झालें तरी त्यांत समाधान न होतां जीव जास्त सुखाचीच इच्छा करीत असतो. जगताचें साम्राज्य प्राप्त झालें तरीही इंद्रपदाच्या सुखाची जीव इच्छा करीत असतो याप्रमाणें ब्रह्मलोकांपर्यंत सुखाची तृष्णा वाढत असतेच.

स एको मानुष आनन्दः० स एको ब्रह्मण आनंदः

आतां खरें व शाश्वत सुख पाहिजे असेल तर त्या सुखाचा झरा आपल्याच हृदयांत आहे. यासाठीं निरहंकार व निष्काम कर्म करा, जें कर्म स्वतःस व समाजास उपयोगी पडेल असें करा. ज्या कर्मानेंच जन्ममरणरूपी दृढ शृंखला तुटून जाऊन निजानंद प्रगट होईल असें कर्म करा. कर्माचें फल भोगावें लागतेंच, म्हणून वासनेनें प्रेरित होऊन कर्म केल्यास फलभोगासाठीं जन्म घेऊन नानातऱ्हेच्या सुखदुःखांनीं व्याप्त असलेलें संसाराचें चक्र सारखें डोक्यावर फिरत राहणार. अतएव **काम्य कर्म सोडा**. जन्ममृत्युरूपी बंध उत्पन्न करणाऱ्या काम्यकर्मांची संगत सोडून द्या.

४ आतां नित्यकर्म व नैमित्तिक कर्माविषयीं एकदमच विचार करूं.

यज्ञ दान तपः कर्म न त्याज्यं कार्यमेवतत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ गी. १०५

यज्ञ, दान व तप हीं कर्मे निष्कामबुद्धीनें करणाऱ्याचें चित्त शुद्ध होतें.

जियें यज्ञदान तपादिकें । इयें कर्मे आवश्यकें ।
तियें न सांडावीं पांथिकें । पाउलें जैशी ॥ —ज्ञाने० १८–१४९.

पांथिकानें ज्याप्रमाणें मार्ग चालण्याचें सोडतां कामा नये त्याप्रमाणें यज्ञ, दान व तप हीं आवश्यक कर्मेंही सोडूं नयेत.

हरपले न देखिजे । तंव तयाचा मागू न सांडिजे ॥
कां तृप्त न होतां लोटिजे । भाणें जेवीं ॥ ज्ञाने० १८।१५०

हरवलेला जिन्नस सांपडेपर्यंत जसा त्याचा माग सोडतां येत नाहीं; अथवा पोट भरल्याशिवाय जसें आपल्या पुढील पान दूर सारितां येत नाहीं;

तैसी आत्मज्ञानविखीं । जंव निश्चिती नाहीं निकी ।
तंव नोहावे यागादिकीं । उदासीन ॥ ज्ञा० १८–१५२

जोंपर्यंत आत्मज्ञानाविषयीं दृढ निश्चय झाला नाहीं तोंपर्यंत यागादिक कर्मे करण्याविषयीं उदासीन होऊं नये.

जें चालणें वेगावत जाये । तो वेगू बैसावयाचि होये ।
तैसा कर्मातिशयो आहे । नैष्कर्म्यालागी ॥ ज्ञा० १८–१५४

जो चालण्याची त्वरा करतो त्याला तीच त्वरा विसांवा घेण्यास उपयोगी पडते, तसें कर्माचें अधिक आचरण करणें हें कर्मत्यागास उपयोगी पडतें.

कर्मे कर्मबद्धता । मुमुक्षू सोडविले पंडूसुता ।
जैसा रसरीती मरता । राखिला विषें ॥ ज्ञा० १८।५।१६३

कर्मापासून मुमुक्षूस होणारी पीडा कर्मांनींच दूर करावी अथवा हे धनंजया! रसायन करण्याची ज्यास युक्ति माहीत आहे, तो वैद्य ज्याप्रमाणें विष शुद्ध करून त्याचें अमृत करून मरणाराचें रक्षण करतो.'

तैसी एके हातवटिया । कर्मे कीजति धनंजया ।
बंधकेंचि सोडवावया । मुख्यें होती ॥ ज्ञा० १८।५।१६४

याप्रमाणें धनंजया, युक्तीनें कर्मे केलीं असतां तीं बाधक असूनही मुक्त करण्यास कारणीभूत होतात. तीं कशीं ?

एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ गीता अ० १८।६
तरी महायागप्रमुखें कर्मे । निपजतांहि अचुकें ।
कर्तेपणाचें न ठाके । फुंजणें आंगीं ॥ ज्ञा० ॥ १८ ।१६६

तर पंचमहायज्ञाहि प्रमुख कर्मे यथाविधी घडत असतां जो कर्तृत्वाचा अभिमान बाळगीत नाहीं,

जो मोलें तीर्थी जायें । तया मी यात्रा करीतु आहे ।
ऐसीये श्लाघ्यतेचा नोहे । तोषु जीवीं ॥ १८ । १६७

जो दुसऱ्याजवळून पैसे घेऊन मोलानें तीर्थयात्रा करितो त्याला मी यात्रा करीत आहे, अशा मोठेपणाचा हर्ष होत नाहीं.

जो कांसे लागोनी तरे । तया पोहती ऊर्मी नुरे ।
पुरोहितु नाविष्करे । दातेपणें ॥ ज्ञा. १८-१६९

जो दुसऱ्याचे कांसेस लागून नदी उतरून पलीकडे जातो त्याला मी पोहणारा आहे—असा गर्व होत नाहीं; अथवा राजाचे उपाध्यायास राजाकरितां दुसऱ्यास आपल्या हातानें दिलेल्या दानाबद्दल अभिमान वाटत नाहीं.

आधींची फळीं आसतुटीया । कर्मे आरंभावीं धनंजया ।
परावें बाळ धाया । पाहिजे जैसें ॥ १८ज्ञा०।१७२

हें धनंजया प्रथम फळाची आशा सोडून निष्काम कर्मास आरंभ करावा-ज्याप्रमाणें दुसऱ्याचें लेकरूं पाहून ( त्याचें ठिकाणीं प्रीति न ठेवितां नुसता ) संतोष मानतो

सांडूनि दुधाची टकळी । गोंवारी गावधेनु वेटाळी ।
किंबहुना कर्मफळीं । तैसे कीजे ॥ ज्ञा. । १८-१७४ ॥

गुराखी दुधाची आशा सोडून जशा गांवांतील गाई वळतो तसें कर्म फळाविषयीं निरिच्छि असावें.

ऐसी हे हातवटी । घेऊनि जे क्रिया उठीं ।
आपणा आपुलिया गांठीं । लाहेचि तो ॥ ज्ञा. १८-१७५

या युक्तीनें जो कर्माचरण करितो त्याला आपल्याजवळ असलेल्या आत्मस्वरूपाची भेट होते.

म्हणोनि फळी लागू । सांडोनि देहसंगू ।
कर्मे करावीं हा चांगू । निरोपू माझा ॥ ज्ञा० १८-१७६

म्हणून फळाविषयीं आशा सोडून व मी कर्ता हा अभिमान सोडून कर्मे करावीं अशी उत्तम प्रकारची माझी आज्ञा आहे.

५ सारांश, जें जें कर्म होत राहणार तें तें देहबुद्धीनें युक्त न करितां आत्मसंवेदनेनें युक्त करावें. फलाशा व कर्तृत्वाहंकार सोडून जें कर्म होतें तेंच श्रेयस्कर कर्म वेदश्रुतींना मान्य आहे.

## फलाशा–त्याग ( वासनात्याग )

प्रस्तुत अशी एक समजूत झालेली आहे कीं, आत्मसुख प्राप्त होण्यासाठीं आपल्या सर्वस्वाचा त्याग झाला पाहिजे, व हा त्याग म्हणजे प्रपंचाचा, स्त्रीपुत्रांचा, घरदार वगैरेचा त्याग करून अरण्यांत रहावें–म्हणजे परत्मात्मप्राप्ति होईल. परंतु वेदांतास ही समजूत कबूल नाहीं. वेदांतांत त्याग म्हणजे वासनात्याग होय. वासनेचा त्याग होणें हीच परमोच्च स्थिती होय. वास्तविक विचार केला तर भूमीवरून चालणाऱ्या मनुष्याला ज्याप्रमाणें भूमीचा त्याग करतां येणें शक्य नाहीं, त्याप्रमाणेंच जगांत आणि पंचभूतात्मक शरीरांत राहणाऱ्या मनुष्याला बाह्य विपयांचा त्याग होणार नाहीं, चित्तांतून विषयांचा त्याग झाला पाहिजे. परंतु पुष्कळवेळा अशी स्थिति होतें कीं बाह्य विषयांचा त्याग करण्याच्या प्रयत्नांत मनुष्य विषयांचे दुप्पट ग्रहण करीत असतो. कारण जगताच्या अंतर्बाह्य निर्विषय परमात्मा असतो ही समजूत सोडून विषय सत्य आहेत ही भावना करावयाची; नंतरच या विषयांचा त्याग झाला पाहिजे अशी भावना असते. या भावनेनें केलेला त्याग, खरा त्याग नसून तो त्यागाचा फक्त भास असतो. तृणापासून सत्यलोकापर्यंत सर्व पदार्थ दुःखरूप व अनित्य आहेत, इतकेंच नव्हे तर इंद्रियगोचर होणारे सर्व विषय तत्वतः मिथ्या आहेत, या भावनेनें केलेला त्याग तो खरा त्याग आहे. चित्तांतून विषयांचा त्याग होणें–विषयांवरील आसक्ति नाहींशी होणें, हाच खरा त्याग होय. एकाद्या मनुष्यानें उत्तम पक्व झालेल्या सुंदर द्राक्षांचा घड पाहिला असतां, तो खाण्याची त्याच्याठिकाणीं इच्छा व्हावी हें स्वाभाविकच आहे, परंतु अशा स्थितींत ती इच्छा त्या मनुष्यानें क्षणभर दाबून टाकली तरी त्याच्या चित्तांतून ती नाहींशी झाली असें म्हणतां येणार नाहीं. परंतु द्राक्षांचा हा घड सांवतवाडीच्या कारागिरानें लांकडाचा केला आहे असें एकाद्या मनुष्यानें त्याला सांगितलें असतां, त्यास द्राक्षें खाण्याची इच्छा उत्पन्न होणार नाहीं. यावरून विषय दुःखरूप आहेत, मिथ्या आहेत–या दृढभावनेपासून उत्पन्न होणारा त्याग कसा सहज असतो, हें दिसून येईल. चित्तांत सर्व ठिकाणीं सर्वावस्थेंत परमात्मभावनेचा उदय असण, अंतःकरणादिकांचे सर्व व्यापार परमात्ममय होणें, पदार्थमात्राचें दर्शन झालें तरी परमात्मभावनेंत मुरून जाणें, अथवा परमात्मरूप सागरावरील

पदार्थ हे तरंग आहेत अशी भावना असणें—ज्याप्रमाणें सागर आणि तरंग यांचेमध्यें पाणीच असतें त्याचप्रमाणें परमात्मा आणि पदार्थ यांच्या अंतर्बाह्य आत्मवस्तूच सत्य आहेत अशी भावना होणें, यासच खरा त्याग म्हणतात. थोडक्यांत सांगणें म्हणजे अखिल कर्मांत आत्मसंवेदन असणें यापेक्षां वस्तूचा बाह्यत्याग करणें हें वेदांतास सम्मत नाहीं.

हें ज्ञान असून याच्या विपरीत भावना असणें हें अज्ञान होय (अ. १३–११) असें भगवंतांनीं म्हटलें आहे. अनात्मवस्तूंचा चित्तांतून निरास होणें, हें ज्ञानाचें साधन आहे, व अशा तऱ्हेचा कर्मयोग फार महत्वाचा आहे.

६. आतां संसारव्यवहार कसा आहे तें पाहूं. प्रत्येक जीवाचा संसार त्यानें व त्याच्या पूर्वजांनीं केलेल्या कर्माचें फल असतो. अमुक कर्म केलें असतां कर्त्याची जी मानसिक स्थिति असेल, जी शारीरिक स्थिति असेल, कर्म करीत असतां परिस्थिती जशी असेल त्या मानानें कोणत्याही केलेल्या कर्माचें फल उत्पन्न होत असतें. कदाचित् आपली मानसिक व शारीरिक स्थिती अनुकूल करितां येईल. येथें थोडें स्वातंत्र्य आहे. पण सभोंवतालची परिस्थिति पूर्वकर्मानें ठरलेली असते, म्हणजे तिच्या संबंधानें तो सर्वथा परतंत्र असतो. तेव्हां आपल्या संकल्पाप्रमाणें सर्व गोष्टी घडून येतात, असें सामान्यतः होत नाहीं. पुष्कळ वेळां नको त्या गोष्टी होतात, आणि हव्या असतील त्या गोष्टी होत नाहींत, हा अनुभव प्रत्येकास आहेच. आपणांस नको असेल तें होणें व हवें असेल तें न होणें, याचें नांव दुःख. प्रतिकूल परिस्थिति प्राप्त होते व अनुकूल स्थिती येत नाहीं हा अनुभव आहे. सारांश आपण पुष्कळ परतंत्र असतों, म्हणून हा संसार दुःखमय आहे! पुनः आपणांस हवी ती स्थिति प्राप्त झाली तरी ती स्थिति नित्य शाश्वतसुख देईल, किंवा सुख देणारी असली तरी आपल्या मनाची तृष्णा एथेंच संपेल असा भरंवसा मुळींच नसतो. परीक्षा पास झाली असतां आपल्याला पुष्कळ सुख होईल असें वाटणाऱ्या विद्यार्थ्याला तो पास झाल्यानंतर जें क्षणिक सुख होतें, त्याची पुष्कळता कालानें पुष्कळच कमी होते. सारांश कर्मानें होणारें फल अनिश्चित, त्यापासून प्राप्त होणारें सुख अनिश्चित, व सुख झालें तरी अनित्य. असा येथील कारभार आहे! शिवाय जीवाची आशा किंवा इच्छा अमर्याद आहे, वाटेल तेवढी संपत्ति असली तरी समाधान होत नाहीं. असमाधान हें दुःखच होय. जीवाला नित्य व शाश्वत सुख पाहिजे हें खास! उपनिषदें गीतादि ग्रंथ सांगतात कीं, जीवानें आपलें स्वकर्तव्य निष्कामबुद्धीनें व निरभिमान वृत्तीनें केलें पाहिजे. नित्य हित केलेल्या कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या अनुकूल किंवा प्रतिकूल परिस्थितीबद्दल उदासीन राहिलें पाहिजे आणि आपलें जें निर्विकार ज्ञानस्वरूप त्याच्या ठिकाणीं आपलें चित्तसर्वस्व व वित्तसर्वस्व समर्पण केलें पाहिजे.

७ विषयांचें व विषयफलाचें मात्र एकाग्र चिंतन करणाऱ्या पुरुषास हा संसार दुःखमय दिसेल, व निष्काम निरभिमानवृत्तीनें निजकर्तव्य करणाऱ्या आत्मक्रीड व आत्मरत ज्ञानी पुरुषास हाच संसार नित्य सुखमय होईल. वास्तविक संसार स्वरूपतः सुखमय अथवा दुःखमय नाहीं जीव ज्या दृष्टीनें संसाराकडे पाहतात त्या दृष्ट्यनुसार संसार सुखमय किंवा दुःखमय होतो ! साखर गोड आहे असें आपण म्हणतों, पण रोगराईनें रसनेंद्रिय बिघडलें आहे त्यास साखर कडू लागते, किंवा श्रीखंडाचें यथेच्छ भोजन झालें असतां मागाहून खीर सपक लागते. तात्पर्य रसनेंद्रिय अनुकूल असेल तर साखर गोड लागते, नसेल तर तीच साखर सपक किंवा कडू लागते. तद्वत् जीवाची वृत्ति जशी असेल त्याप्रमाणें संसार सुखमय अगर दुःखमय होईल. आपलें शरीर आपली मनोवृत्ती स्वाधीन ठेवण्यासाठीं आत्मस्वरूपाचें ध्यान करावें आणि परिस्थितीविषयीं उदासीन रहावें तरच आपला संसार आनंदमय होईल. चंचल मनोवृत्तींच्या पाठीमागें लागाल व नित्य प्राप्त होणाऱ्या अनुकूलप्रतिकूल स्थितीविषयीं आशा व भीति बाळगीत बसाल—कासाविशी कराल तर संसार दुःखमय होईल. हा वेदांताचा उपदेश नित्य अनुभवास पटण्यासारखा आहे म्हणून वेदांत्यांनीं संसार दुःखमय आहे असें म्हटलें आहे तें कामुक संसाऱ्याचें नित्यचंचल चित्त व नित्यचंचल विश्वपरिस्थितीविषयीं म्हटलें आहे. पण ज्यानें निष्काम वृत्तीचा अंगीकार करून निजकर्तव्य करण्याचा संकल्प निरभिमानबुद्धीनें केला, येणाऱ्या जाणाऱ्या परिस्थितीसंबंधानें जो तटस्थ राहिला, इतकेंच नव्हे तर ज्यानें परिस्थितीला आपलेसें केलें, त्या निजस्वरूपीं दृढ झालेल्या शुद्ध व धन्य पुरुषास हा संसार सुखमय वाटेल यांत शंका नाहीं. तात्पर्य आत्मचिंतनास उपयोगी पडतील इतक्या मात्र बेतानें सात्विक विषय प्राप्त होतील असें निष्काम वृत्तीनें कर्म करणें आणि गीतेंत सांगितल्याप्रमाणें परमात्म्याचें दयाघनत्वादि गुण व्यवहारांत आणण्याची प्रेरणा करणाऱ्या चित्ताला ज्ञानाची व लोकसेवेचीं कर्में करावयास लावणें हा निवृत्तीचा मार्ग आहे. हा खरा कर्मसंन्यास आहे. संसार दुःखमय आहे म्हणून कर्म टाकावयाचें नाहीं. तर सकाम कर्म संसाराला दुःखमयत्व देतें, म्हणून तसलें कर्म टाकावयाचें आहे.

८ याप्रमाणें संसार दुःखमय नाहीं, आणि कर्माचा त्याग करणें म्हणजे कर्मसंन्यास नव्हे, असें जर यथार्थ समजेल तर हा व्यवहारही आनंदमय होऊन त्याला परमार्थाचें स्वरूप येईल.

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणाहुतं ।
ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना: ॥ गीता ४।२४
म्हणोनि ब्रह्म तेंचि कर्म । ऐसें बोधा आलें जया सम ॥

तया कर्तव्य तें नैष्कर्म्य । धनुर्धरा ॥ ज्ञा० ४।१२

या श्लोकांत हाच भावार्थ आहे.

श्रुतीचें मनोगत असेंच आहे. सर्व कर्ता करविता परमेश्वर आहे, तो सर्वव्यापी आहे, स्वयंप्रकाश आहे, विश्वपरिस्थितीचा स्वामी आहे, असें समजून जो साधक परमात्मस्वरूपाचे अखंड ध्यानांत निमग्न राहील, व्यवहारांत परमात्म्याच्या कृतीचें नित्य अनुकरण करील आणि व्यवहारांतही परमेश्वरी स्वरूपाकडे आपल्या गुणकर्मांनीं आपल्या सोपाधिक जीवाची उन्नति होत जावी असें निजकर्तव्य करीत जाईल तो पापपुण्यातीत होऊन निर्मळ होईल, स्वयं परमेश्वर होईल, त्याचे संशय नष्ट होतील, व त्याचें वर्तन सत्यरूप व त्याची नीति आनंदरूप असेल.

९ अशा प्रकारें होणारें कर्म स्वतःस, समाजास व राष्ट्रास उन्नत्यर्थ होऊन परम सुख देणारें होतें.

ज्ञानाग्निः सर्व कर्माणि भस्मसात् कुरुते तथा ॥ गीता अ० ४।३७

या प्रमाणें सर्वकर्मांत परमात्मभाव उदयास येऊं लागणें म्हणजे फलाशारहित कर्मयोग होय व या कर्मयोगांत बंधांत घालणाऱ्या सर्व कर्मांचा निरास होऊन पूर्ण शांती प्राप्त होते. बृहदारण्यांत म्हटलें आहेः—

य एवं वेदाहं ब्रह्मास्मीती स इदं सर्व भवति ॥

मीच ब्रह्म आहे असें जो जाणतो तोच अमृत ब्रह्म होतो

ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥ ( श्वेताश्वतर उप० )

ज्याच्या चित्तांत परमात्मभावना उदित झाल्या आहेत तो सर्व कर्मपाशांतून मुक्त होतो.

क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन दृष्टे परावरे ॥ ( मुंड० उप० )

सर्व दृश्य सृष्टी कर्ममयच आहे, परंतु कर्में मात्र आत्मसत्तेंत-पारमार्थिक सत्तेंत होण्यास पाहिजेत, म्हणजे तीं कर्में बाधक होऊं शकत नाहींत. अशा तऱ्हेनें ज्ञानमय कर्म होण्यास ब्रह्मरूप कळणें जरूर आहे.

नमां कर्माणि लिंपंति नमे कर्म फले स्पृहा ।
इतिमां यो भिजानाति कर्मभिर्नुसबध्यते ॥ गीता अ० ४।१४

कर्में मला बद्ध करीत नाहींत, आणि कर्मफलाविषयीं माझी असक्ताही नाहीं तेव्हां अशा प्रकारें जो मला जाणतो त्याला कर्में बद्ध करीत नाहींत. मी कर्ता आहे असा ज्या संसारी पुरुषांचे ठिकाणीं कर्माविषयीं अभिमान असतो व त्यां कर्मांच्या फलाविषयीं ज्यांची आसक्ति असते त्यांना कर्में बद्ध करितात, हें योग्य आहे.

येषां तु संसारिणामहं कर्तेत्यभिमानः कर्मसु स्पृहातत्फलेषुच तान्कर्माणि लिंपंतीत्येवं युक्तं

परंतु त्या दोहोंचाही म्हणजे कर्तृत्वाभिमान व कर्मफलतृष्णा या दोहोंचाही माझे ठिकाणीं अभाव असलेमुळें मला कर्मे बद्ध करीत नाहींत.

या प्रकारें जो इतर कोणी मला आत्मत्वानें जाणतो, आणि मी कर्माचा कर्ता नव्हे आणि कर्मफलविषयीं माझी इच्छा नाहीं असें जो समजतो तो कर्माच्या योगानें बद्ध होत नाहीं. मी या कर्माचा कर्ता असा अभिमान माझे ठिकाणीं नसल्यामुळें देहादि संबंध घडवून आणून कर्मे मला संसारामध्यें बद्ध करीत नाहींत. शिवाय कर्मफलाविषयीं माझी आसक्ति नाहीं म्हणून मला कर्म-बंधन होत नाहीं. कर्तृत्वाभिमान व फलाविषयीं आसक्ति ही माझ्या ठिकाणीं नसल्यामुळें मला तर कर्मबंधन होत नाहींच; परंतु कर्तृत्वाभिमान व फलासक्ति यांनीं रहित असलेल्या मला जो आत्मत्वानें जाणतो म्हणजे " परमात्म्याहून भिन्न नसलेल्या माझे ठिकाणीं कर्तृत्व नाहीं व कर्मफलाची इच्छाही नाहीं " असें जो जाणतो तोही कर्मानें बद्ध होत नाहीं, असा भगवान् श्रीकृष्णांचा आशय आहे.

१० सारांश कर्मांच्या योगानें देहादिकांचा संबंध घडून त्यालाही संसार प्राप्त होत नाहीं, असें या श्लोकाचें व आचार्यभाष्याचें तात्पर्य आहे.

हें मजचिस्तव जाहलें । परी म्यां नाहीं केलें ।
ऐसें जेणें जाणीतलें । तो सुटला गा ।। ( ज्ञाने० )
य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिंच गुणैः सह ।
सर्वथा वर्तमानोपि न स भूयोऽभिजायते ।। गीता अ० १३।२३

याप्रमाणें परमात्म्याला आणि गुणासह प्रकृतीला जाणतो तो सर्व प्रकारांनीं कर्मे करीत असला तरी पुनः जन्म पावत नाहीं.

तो शरीराचेनि मैळे । करूं कां कर्मे सकळें ।
परी आकाश धुइ न मैळे । तैसा असे ।। ज्ञा० १३।१०३३

तो शरीरानें जरी सर्व कर्मे करीत असला तरी उंच धूळ उडाल्यानें आकाश जसें मळत नाहीं तसा तो प्रकृतीच्या कर्मापासून अलिप्त असतो.

आथिलेनि देहें । जो न घेपे देहमोहें ।
देह गेलिया नोहे । पुनरपि तो ।। ज्ञा० १३।१०३४ ।।

जिवंतपणीं जो देहाच्या मोहांत पडून प्रकृतीच्या आधीन होत नाहीं, तो देह गेल्यावर पुनरपि जन्म पावत नाहीं.

याप्रमाणें परमात्मज्ञानाचे ठिकाणीं सर्व धर्मासह ।चित्त समर्पित होऊन जें जें कर्म होतें तें निष्काम कर्म या संज्ञेस प्राप्त होतें. असा निष्कामकर्मयोग

म्हणजे चित्तस्वरूपाकार होणें, म्हणजे आळशीपणा अथवा ऐदीपणा नव्हे. वेदांतानें समाजांत दुर्बलत्व येतें, अक्रियता प्राप्त होते, असें म्हणणारे अज्ञानी आहेत. वेदांतरहस्य अथवा निरभिमान कर्मयोग अंगांत मुरल्यावर जबर उद्योग सहज साध्य होतात. स्वतःचें, समाजाचें, राष्ट्राचें हित त्यास सहज लीलेनें करतां येतें. त्याचें कर्म कष्टप्रद होत नाहीं.

११. लोक ज्याला कर्म म्हणतात तें ज्ञानी पुरुषाचे दृष्टीस आत्मदृष्टीनें अकर्तृत्व असतें. आपण कांहीं करीत नाहीं.

न कर्ता नच भोक्ताहं व्याप्यव्यापकवर्जितः ( अवधूत गीता )

मी या कर्माचा कर्ता व भोक्ता नाहीं, मी व्याप्य व व्यापक नाहीं, तर फक्त निजानंद परमात्मा आहे, हा सिद्धांत तो अनुभवीत असतो.

( पुढील अंकीं समाप्त. )

# अध्यात्मविचाररत्नमाला.

संपादकः—**विष्णु बाळकृष्ण महाडेश्वर,** (सरवेअर, मुंबई.)

११७. प्रश्नः—( १ ) नित्यानित्यवस्तूचा विवेक म्हणजे काय ?

उत्तरः—ह्या पिंडब्रह्मांडांत नित्य ( शाश्वत ) वस्तु कोणती व अनित्य (नाशिवंत) वस्तु कोणती ? ह्याचा सत्यासत्य विचार करणें. नित्य वस्तु म्हणजे सच्चिदानंदस्वरूप, परब्रह्म, आत्माराम श्रीवासुदेव अविनाशी ( नित्य ) होय. आणि अनित्य वस्तु म्हणजे हें सर्व जग व मायादिप्रपंच देहादिक नाशिवंत ( मिथ्या ), अशी साक्षात् प्रतीति बाणून बुद्धीचा दृढ निश्चय होणें हेंच नित्यानित्य वस्तूच्या विवेकाचें स्वरूप होय. हा नित्यानित्य वस्तूचा विवेक सर्व साधनांचें मूळ आहे.

११८. प्रश्नः—नित्य व अनित्य वस्तु कां म्हणतात ?

उत्तरः—मनुष्य स्वप्नांमध्यें ज्या वस्तु पाहतों, व त्यास मिथ्या भास असा अनुभव येतो, व आपण त्या खोट्या असें मानतों. तसें, अविद्याजागृतींतही मनुष्य ज्या वस्तु पाहतो व त्यास साक्षात् अनुभव येतो, त्यांचा सुषुप्तिअवस्थेमध्यें निरास होतो. याप्रमाणें हें स्थावरजंगमात्मक सर्व जग व जगांतील वस्तु, देहादि सर्व मायादि प्रपंच हीं सर्व नाशिवंत आहेत. ह्या सर्वांचा कल्पांतीं नाश आहे. ( विवेकप्रळय यालाच ह्मणतात. )

११९. प्रश्नः—सर्व जगाचा नाश झाल्यावर मग काय उरतें ?

उत्तरः—सर्व जगाचा नाश झाल्यावर, 'आत्मा' हा कायम राहतो. त्याला जन्म व नाश हीं दोन्हीं नाहींत. तो उत्पन्न होत नाहीं तो जन्मरहित, शाश्वत, नित्य व अनादि आहे. जग व शरीर नष्ट झालें तरी, तो नाश पावत नाहीं. आत्मा सृष्टि उत्पन्न होण्याच्या पूर्वीं होता, सृष्टिकालींही विकाररहित आहे, व जग नाहींसें झालें तरी हा कायम राहतो. आत्मा तिन्ही काळीं अबाधित आहे. आत्मस्वरूप नित्य आहे, व हें दृश्य जग अनित्य ( नाशिवंत ) आहे असा जो बुद्धीचा दृढ निश्चय होणें, तो वस्तूविषयीं उत्तम विवेक होय.

१२०. प्रश्नः—विश्व सत्य कां वाटतें ?

उत्तरः—आत्मस्वरूपाचें खरें ज्ञान सद्गुरूपासून होत नाहीं, म्हणून विश्वजग सत्य वाटतें. सद्गुरूपासून आत्मज्ञान झाल्यावर, आत्माच विश्वामध्यें नटलेला दिसतो.

१२१. प्रश्नः—( २ ) इहामुत्रफलभोगविराग म्हणजे काय ?

उत्तरः--इहलोकचे प्राप्त होणारे राज्यादि ऐश्वर्य सुखभोग प्राप्त झालेले, आणि परलोकचे स्वर्गादि भुवनीं असणारे अमृतादि सुखभोग, हे नाशिवंत आहेत असें पूर्णविचारानें जाणून, त्यांविषयीं (विष्टिप्रमाणें) अंतःकरणपूर्वक विरक्ति बाळगणें. म्हणजे देहापासून तों ब्रह्मलोकापर्यंत, प्रत्यक्ष पाहिलेल्या व कानांनीं ऐकिलेल्या, विषयांचीं भोगसुखें टाकण्याची इच्छा होणें, हेंच इहामुत्रफलभोग-विरागाचें स्वरूप होय. विवेक दृढ असला तरच, वैराग्यादि साधनें अंगीं दृढ बाणतात. दृढ विवेकावांचून वैराग्य अंध असतें, व वैराग्यावांचून विवेकही पंगु असतो.

१२२. प्रश्नः--शमदमादिषट्क म्हणजे काय ?

उत्तरः--( १ ) शम, ( २ ) दम, ( ३ ) तितीक्षा, ( ४ ) उपरति, ( ५ ) श्रद्धा, ( ६ ) समाधान, हीं सहा साधनें मिळून, एक साधनसंपत्ति होय.

१२३. प्रश्नः--( १ ) शम म्हणजे काय ?

उत्तरः--इंद्रियादि विषयसुखोपभोग क्षणभंगुर असून दुःखदायक आहेत, असें वारंवार ध्यानींमनीं ठसवून त्यांपासून मनाचा निरोध करणें, व आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपीं ऐक्य पावणें.

१२४ प्रश्नः—( २ ) दम म्हणजे काय ?

उत्तरः—पंचकर्मेंद्रियें ( १ वाचा, २ पाणी, ३ पाद, ४ शिश्न, ५ गुद, ) व पंचज्ञानेंद्रियें, ( १ श्रोत्र, २ त्वचा, ३ चक्षु, ४ जिव्हा, ५ घ्राण, ) व पंचविषय, ( १ शब्द, २ स्पर्श, ३ रूप, ४ रस, ५ गंध, ) व पंचप्राण ( १ प्राण, २ अपान, ३ व्यान, ४ उदान, ५ समान, ) व पंचउपप्राण ( १ नाग, २ कूर्म, ३ कृकल, ४ देवदत्त, ५ धनंजय, ) हीं नाशिवंत विषय-सुखापासून परतवून, म्हणजे इंद्रियनिग्रह करून, तीं नवविधभक्तीकडे लावणें.

१२५ प्रश्नः—( ३ ) तितिक्षा म्हणजे काय ?

उत्तरः—शरीराची प्रतिष्ठा फार वाढूं न देतां स्नानसंध्यादि स्ववर्णाश्रमधर्म-विहित नित्यनैमित्तिक कर्में यथासांग करीत असतां, शीतोष्णापासून पीडा होते, ती झाली तरी बेहत्तर, पण स्वधर्माचरण न सोडणें, तसेंच पूर्व प्रारब्धा-नुसार संसारांत उत्पन्न होणारीं सुखदुःखें भोगलींच पाहिजेत, म्हणून अंतः-करणाची तळमळ होऊं न देतां, विचारानें शांतपणें सहन करणें.

१२६ प्रश्नः--( ४ ) उपरति म्हणजे काय ?

उत्तरः—विहितकर्में चित्तशुद्धीसाठीं व आत्मज्ञानप्राप्तीची इच्छा उत्पन्न होण्यासाठीं ईश्वरार्पण करून, व नाशवंत विषय विषतुल्य आहेत असें जाणून चित्तवृत्ति विषयाकार होऊं न देणें.

१२७ प्रश्नः--( ५ ) श्रद्धा म्हणजे काय ?

उत्तरः--तत्ववेत्त्या श्रीगुरूच्याठिकाणीं ईश्वरबुद्धि बाळगून, त्यांच्या वचनावर, आणि वेदांतशास्त्र सांगतें, तें, सत्य आहे, त्यावर पूर्ण विश्वास ठेवणें, व तदनुरूप आचरण शुद्ध ठेवणें. अशा दृढश्रद्धेनें हृदयस्थ आत्माराम श्रीवासुदेवाचा साक्षात्कार लवकर होतो.

१२८ प्रश्नः--( ६ ) समाधान म्हणजे काय ?

उत्तरः--ऐहिक नाशिवंत विषयसुखादिकांपासून मन व इंद्रियें आवरून, हृदयस्थ, परब्रम्ह, आत्माराम, श्रीवासुदेव स्वरूपीं लावणें, अथवा चित्ताची एकाग्रता करून, शांत झालेलें मन, अध्यात्मविचारांच्या श्रवणाकडे, व महावाक्य विवरणाकडे आदरपूर्वक लावणें. किंवा त्यालाच साहाय्यभूत अशा तत्ववेत्त्या श्रीगुरूच्या शुश्रुषेकडे लावणें, ह्यापासून चित्ताची प्रसन्नता होऊन, चित्ताला समाधान प्राप्त होतें. ( इंद्रियांना पाहिजे तो विषय देऊन, तृप्त करून विषयासक्ति वाढविणें, हें कांहीं खरें समाधान नव्हे. ) हें सर्व शमदमादि षट्काचें स्वरूप होय.

१२९ प्रश्नः--( ४ ) मुमुक्षुता म्हणजे काय ?

उत्तरः--मी हा दुःखरूप भवसागर कोणत्या उपायानें तरून जाईन ? मी संसारबंधनांतून अढळ मुक्त कसा होईन ? मोक्षप्राप्तीसाठीं आत्मज्ञानाचा उपदेश करणारे परमात्म्याचे अवतार श्रीगुरुनाथ केव्हां भेटतील ? आणि मी आत्मज्ञान पावून, केव्हां मोक्ष पावेन ? अशी तीव्र उत्कंठा उत्पन्न होणें--तसेंच कैवल्यदेहापासून, तों स्थूलदेहापर्यंत जीं बंधनें अज्ञानानें कल्पिलेलीं आहेत, त्या बंधनापासून व जन्ममरण दुःखपरंपरेंतून, सद्गुरुबोधानें मुक्त होऊन आत्मारामश्रीवासुदेवस्वरूपीं, ऐक्य होण्याची इच्छा बाळगणें, याला मुमुक्षुता असें म्हणतात.

१३० प्रश्नः--सद्गुरुसेवा कां करावी ?

उत्तरः--सद्गुरुच्या सेवेनें ब्रम्हसायुज्यता मुक्ति प्राप्त होते. व आत्मसाक्षात्कार लवकर होतो म्हणून.

१३१ प्रश्नः--आत्मज्ञान कसें प्राप्त होतें ?

उत्तरः--तें केवळ तर्कशास्त्राच्या जोरावर व नुसत्या वेदादिकांच्या पठणानें, किंवा नाना विद्या व शास्त्रादिकांच्या परिशीलनानें प्राप्त होणारें नाहीं; फार तर काय, अभिप्रेत तत्वपद्धतीच्या सिद्धांतानेंही प्राप्त होणें नाहीं. त्याला निष्कामकर्मांनीं ईश्वराला प्रसन्न करून घेऊन, सद्गुरूला अनन्यभावानें शरण गेल्यानें आत्मज्ञान प्राप्त होतें. अनादि अविद्येनें बद्ध झालेल्या जीवाला ईश्वराच्या अनुग्रहाशिवाय स्वतःच्याच विशाल विद्वत्तेच्या जोरावर आत्मज्ञान होण्याचा मुळींच संभव नाहीं.

१३२ प्रश्नः--अध्यात्म विचारांचीं साधनें कोणतीं ?

उत्तरः--( १ ) सच्छास्त्रश्रवण, ( २ ) सत्समागम, हीं मुख्य आहेत.

१३३ प्रश्नः--सच्छास्त्राचीं साधनें किती आहेत ?

उत्तरः--( १ ) श्रवण, ( २ ) मनन, ( ३ ) निदिध्यासन, ( ४ ) तत्पदत्वंपद अर्थाचें शोधन, हीं चार ज्ञानसाधनें आहेत.

१३४ प्रश्नः--सच्छास्त्रज्ञानाच्या साधनाचे प्रकार किती आहेत ?

उत्तरः- ( १ ) परोक्ष, ( २ ) अपरोक्ष.

१३५ प्रश्नः--परोक्षज्ञान म्हणजे काय ?

उत्तरः—शास्त्रांच्या अध्ययनानें प्राप्त होतें तें.

१३६ प्रश्नः—अपरोक्षज्ञान म्हणजे काय ?

उत्तरः- वेदांतशास्त्राच्या अर्थाचा विचार सद्गुरुमुखानें करून जें आत्मज्ञान प्राप्त होतें, व जें स्वतःच्या अनुभवानें प्रतीतीस येतें, तें अपरोक्ष-ज्ञान होय.

१३७ प्रश्नः—सद्गुरु कसा ओळखावा ?

उत्तरः--जो हृदयस्थ निर्गुण आत्माराम. श्रीवासुदेवस्वरूप जाणतो, जो शाश्वत आणि अशाश्वत याचा विवेक करून, शाश्वत आत्मवस्तु दाखवितो. ज्याचे ठिकाणीं दया, क्षमा, शांति, वैराग्य व अपरोक्ष ज्ञान वास करते.

१३८ प्रश्नः—मोक्षप्राप्ति कशानें होते ?

उत्तरः—योग, सांख्य, कर्म व विद्या यांच्या योगानें मोक्षप्राप्ती होणार नाहीं तर जीवात्मा व परमात्मा ह्यांच्या ऐक्याच्या ज्ञानविज्ञानानेंच मोक्षप्राप्ती होते.

१३९ प्रश्नः—( १ ) श्रवण म्हणजे काय ?

उत्तरः—वेदांतशास्त्र, साधुसंतांचे पारमार्थिक ग्रंथ लक्षपूर्वक वाचणें.

१४० प्रश्नः—( २ ) मनन म्हणजे काय ?

उत्तरः--श्रवण केलेल्याचें युक्तीनें अनुसंधान करणें. श्रवण केलेल्या ज्ञानाचा विचार करून, अनुभवज्ञान प्राप्त करून घेणें.

१४१ प्रश्नः--( ३ ) निदिध्यासन म्हणजे काय ?

उत्तरः--हृदयस्थ. परब्रह्म. आत्माराम. श्रीवासुदेवाच्या स्वरूपाचें ध्यान अथवा चिंतन करणें.

१४२ प्रश्नः—(४) तत्पद त्वंपद अर्थाचें शोधन म्हणजे काय ?

उत्तरः--शुद्ध सात्विक अहंकारामुळें शून्य ब्रह्मापासून ‘ अहं ब्रह्म ’ असा ध्वनि उत्पन्न झाला. ह्यालाच “ तत्पद ” म्हणतात. तत्वमसि महावाक्यांतील ‘ तत् ’ पद, वाच्यार्थानें ईश्वराचें बोधक आहे. आणि लक्ष्यार्थानें शून्य ब्रह्माचें बोधक आहे. त्याचप्रमाणें सात्विक अहंकार अविद्या मायागुणामुळें,

अहंब्रह्मापासून 'जग व्हावें' अशी इच्छा उत्पन्न झाली. त्यालाच "त्वंपद" म्हणतात. "त्वं" पद हें वाच्यार्थानें जीवाचें व लक्ष्यार्थानें कूटस्थाचें बोधक आहे. ह्या तत्पदत्वंपद यांचा वाच्यार्थ, लक्ष्यार्थ यांचें यथार्थ ज्ञान होणें; यालाच तत्पदत्वंपद अर्थाचें शोधन असें म्हणतात.

१४३ प्रश्नः--साक्षात्कार म्हणजे काय ?

उत्तरः—हृदयस्थ आत्माराम श्रीवासुदेवाविषयीं दृढभावना व ध्यान करीत गेल्यानें, तीव्र धारणेमुळें व निदिध्यासामुळें आत्म साक्षात्कार होतो व दृढ भावना झाल्याशिवाय आत्मसाक्षात्कार होत नाहीं. यासाठीं साधकानें आत्मानुसंधान अखंड ठेवावें.

१४४ प्रश्नः—श्रवणादिक ज्ञानास प्रतिबंधक कोण ?

उत्तरः—(१) असंभावना, (२) विपरीत भावना हे दोन प्रतिबंधक आहेत. हे बुद्धीचे दोष नाहींसे होण्यास सशास्त्रश्रवण सद्‌गुरुमुखानें अवश्य केलें पाहिजे

१४५ प्रश्नः—(१) असंभावना म्हणजे काय ?

उत्तरः--वेद, शास्त्रें, गुरु, साधु, संत इत्यादिकांविषयीं संशय उत्पन्न होणें. यावेळीं वैराग्याचा अभाव असतो, व प्रज्ञा मंद असते. साधनसंपत्तीचें पाठबळ नसतें.

१४६ प्रश्नः--(२) विपरीत भावना म्हणजे काय ?

उत्तरः--अद्वितीय आत्म्याविषयीं संशय उत्पन्न होणें.

१४७ प्रश्नः—धारणा म्हणजे काय ?

उत्तर—चित्ताची अखंड स्थापना होणें.

१४८ प्रश्नः--ध्यान म्हणजे काय ?

उत्तरः—धारणेनें आत्माराम श्रीवासुदेवाच्या स्वरूपाचें अखंड अनुसंधान ठेवणें.

१४९ प्रश्नः--अभ्यास म्हणजे काय ?

उत्तरः—आत्मवस्तूची वारंवार प्रत्यावृत्ति करणें.

१५० प्रश्नः —समाधि म्हणजे काय ?

उत्तरः--निदिध्यासांनीं परिपक्वता येणें.

१५१ प्रश्नः--अध्यात्म ग्रंथ श्रवणानें काय होतें ?

उत्तरः--असंभावना व विपरीतभावना ह्या दारूण संशयाचा नाश होऊन निश्चयात्मिकाबुद्धि होतें.

१५२ प्रश्नः—अध्यात्मश्रवण करणारांचें तेज कसें असतें ?

उत्तरः—सच्छिष्याच्या अभ्यासाचें तेज मोठें अलौकिक व दिव्य असतें. त्या तेजाला 'ब्रह्मवर्चस' असें म्हणतात.

१५३ प्रश्नः--ब्रह्मजिज्ञासा केव्हां उत्पन्न होते ?

उत्तरः--आत्मानात्मविचार करून, वैराग्यसंपन्न बनून, मोक्षप्राप्तीची इच्छा करणारासच ' ब्रह्मनिष्ठा ' उत्पन्न होते.

१५४ प्रश्नः—संसार कसा प्राप्त झाला आहे ?

उत्तरः—आत्मस्वरूपाच्या अज्ञानामुळें देहादिक नाशीवंत विषयभोगामुळें संसारबंधन प्राप्त झालें आहे.

१५५ प्रश्नः--अनेक शास्त्रांचा अभ्यास केल्यानें काय होते ?

उत्तरः—मनुष्याची बुद्धिभ्रंश पावते. आत्म्याचें स्वरूप जाणण्यास अडथळा येतो. आत्मसाक्षात्कार झाला नाहीं तर, केलेला शास्त्राभ्यास व्यर्थ होय.

१५६ प्रश्नः--जिवाला मुक्ति कां मिळत नाहीं ?

उत्तरः--औषध प्यालावांचून व पथ्य केल्यावांचून, केवळ औषधाचें नांव घोकीत राहिल्यानें रोग जसा जात नाहीं. त्याप्रमाणें आत्मस्वरूपाचें अपरोक्ष ज्ञान झाल्यावांचून केवळ ' मी ब्रह्म मी ब्रह्म ' असा जप केल्यानें जीव मुक्त होत नाहीं. नुसत्या पोपटपंची ज्ञानानें मोक्षप्राप्ति होत नाहीं.

१५७ प्रश्नः--संसाराचा समूळ नाश कशानें होतो ?

उत्तरः--वेदालाच मुख्य प्रमाण मानणाऱ्या मनुष्यांची स्वधर्मावर निष्ठा असते. स्वधर्मनिष्ठ पुरुषाच्या अंतःकरणाची शुद्धि स्वधर्मनिष्ठेनें होते. अंतःकरण शुद्ध झालेल्या पुरुषाला आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपाचें अपरोक्ष ज्ञान होतें. सद्गुरूच्या आत्मज्ञानानें संसारदुःखाचा समूळ नाश होतो.

१५८ प्रश्नः—आत्मानात्मविचार म्हणजे काय ?

उत्तरः--आत्मा म्हणजे निरंतर अखंड सुखरूप व अनुभवरूप असून, सदा एकरूप आहे. तो ज्ञानस्वरूप आहे. हा अविनाशी आत्मा उत्पन्न होत नाहीं, मरण पावत नाहीं, वाढत नाहीं, क्षीण होत नाहीं, विकार पावत नाहीं. अशा आत्मविचारानें जीव व ईश्वर या उपाधीचा नाश झाला, म्हणजे केवळ एकटें आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपच उरतें, याची दृढता करणें, आणि अनात्मा म्हणजे जग, देह, प्राण, इंद्रियें मनबुद्ध्यादिक अनात्मा होत ह्या अनात्म्याचे ठिकाणीं ' मी ' अशी जी बुद्धि, हाच जीवाला अज्ञानानें बंध प्राप्त झाला आहे. हा बंधच जन्म व मरण यापासून दुःख प्राप्त होण्यास कारण आहे. नाशीवंत शरीराला ' तें सत्य आहे ' आणि ' तेंच मी आहें ' अशा दृढ समजुतीनें जीव त्याचें विषयांच्या योगानें पोषण करतो. यामुळें तो बंधास कारणीभूत होतो.

१५९ प्रश्नः--अध्यात्मविचारांचा अनुभव देहीं कसा येतो ?

उत्तरः---प्रथम आपण कोण आहों याचा विचार करून, आपण खरोखर

कोण आहों, हें सद्‌गुरूपासून समजून घ्यावें, आणि नंतर अध्यात्मविचारांचा अनुभव देहीं पहावा, म्हणजे बरोबर पटतो.

१६० प्रश्नः—मी कोण हें ओळखण्यास काय केलें पाहिजे ?

उत्तरः—सद्‌गुरूला अनन्यभावानें शरण जाऊन त्यांचेपासून आत्मज्ञान प्राप्त करून घेतलें. ॐकार शास्त्राची गुरुसंप्रदायानुरूप समजूत करून घेतली पाहिजे. गुरुखुणा जाणल्या पाहिजेत. आत्मोपासना घेतली पाहिजे.

---

## तेरावें महाराष्ट्र साहित्यसंमेलन.

येत्या ईस्टरच्या सुटींत श्री माधव मराठी वाङ्मयमंडळातर्फे ग्वाल्हेर येथें तेरावें मराठी साहित्यसंमेलन भरविण्याचें निश्चित झालें आहे. त्या प्रसंगीं बृहन्महाराष्ट्रांत म्हणजे महाराष्ट्र सोडून जगाच्या निरनिराळ्या भागांत विखुरलेल्या ज्या महाराष्ट्रीयांच्या लहान, मोठ्या वसाहती आहेत, त्या प्रत्येकीच्या वतीनें कांहीं प्रतिनिधि हजर असावेत अशी ग्वाल्हेरकरांची उत्कट इच्छा आहे. एकट्या हिंदुस्थानांतच पेशावरपासून रामेश्वरापर्यंत आणि द्वारकेपासून रंगूनपर्यंत अनेक ठिकाणीं महाराष्ट्रीयांच्या वसाहती आहेत. याशिवाय इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, आफ्रिका इत्यादि परदेशांतहि अनेक जागीं महाराष्ट्रीयांचे जमाव आहेत. कित्येक ठिकाणीं महाराष्ट्रीयांच्या संघटित संस्थाहि आहेत, तरी या संस्थांनीं अथवा तेथल्या अनेक महाराष्ट्रीयांनीं आपआपले प्रतिनिधि या संमेलनप्रसंगीं अवश्य पाठवावे, अशी त्यांस विनंति आहे, व त्याप्रमाणें इकडे कळवावें. या ठिकठिकाणच्या संस्थांनीं व व्यक्तींनीं नांवें आपल्या पूर्ण पत्त्यासह कळविण्याची कृपा करावी. संस्थांनीं सभासदांच्या यादीसह आपआपले वार्षिक रिपोर्ट पाठविल्यास फारच उत्तम होईल. असल्या प्रकारच्या माहितीच्या अभावीं वैयक्तिक आमंत्रणें पाठविणें केवळ अशक्य आहे.

**गोविंद बळवंत माकोडे,**

अध्यक्ष, प्रसिद्धिमंडळ.

---

# मध्वमुनीश्वरांची अप्रसिद्ध कविता.

## प्रल्हादचरित्र ( समाप्त )

### श्लोक.

म्हणे बा प्रल्हादा प्रगट तरी दावी तव हरी ।
असे कोणे ठाईं वद मजपुढें तूं लवकरी ॥
नये कां रे येथें लपत फिरतो कां गिरिवरी ।
बलावी युद्धाला प्रबळ तरि वैरी क्षणभरी ॥ ३४
म्हणे माझा स्वामी तव हृदयपद्मांत वसतो ।
अनंत ब्रह्मांडें रचुनि तृणकाष्टांत दिसतो ॥
असे बोले तेव्हां कनकशपु त्या त्रासुनि वदे ।
सभास्तंभीं कां रे त्वरित मजला दर्शन न दे ? ॥ ३५ ॥
पित्याच्या त्या बोलास्तवचि मग पुत्रें विनविलें ।
तया श्रीरंगाचें त्वरित हृदयीं ध्यान धरिलें ॥
वराहाच्या रूपें धरणि धरिली त्या निजमुखीं ।
सभास्तंभीं द्यावें त्वरित रिपुला दर्शन सुखी ॥ ३६ ।
स्वपुत्राच्या बोलावरुनि मग हांसे खदखदां ।
सभेच्या त्या स्तंभावरि सबळ हाणी असि तदा ॥
तये काळीं देवें त्यजुनि सहसा दूरि आळसा ।
सभास्तंभीं झाला प्रगट करि ब्रह्मांड वळसा ॥ ३७ ॥
सभास्तंभीं जाला ध्वनि अवचिता तो कडकडा ।
अनंत ब्रह्मांडें खचति समयीं ते गडबडा ।
नृसिंहाच्या नेत्रीं निघती बहु ज्वाळा भडभडा ॥
पळाले दैत्यांचे अधिप निजपायीं झडझडा ॥ ३८ ॥
नृसिंहाच्या तेजें गगनिं रविचंद्राग्नि जळती ।
सडा नक्षत्रांचा धरणिधर वाराह पळती ॥
प्रतापें दिक्पालासहित अमरां धाक सुटला ।
भुकेला कल्पांतीं प्रळयसमयीं रुद्र खवळला ॥ ३९ ॥
नृसिंहानें जानूवरि असुर धाऊनि धरिला ।
नखाग्रानें त्याचें उदर उर संपूर्ण चिरिला ॥
सभाद्वारीं संध्यासमयिं रिपुचा गर्व हरिला ।
स्वभक्ताच्या रागें मग नरडिचा घोट भरिला ॥ ४०

तयाच्या त्या दाढा घनसर मुखामाजि विकटा ।
नखश्रेणी वज्रापरिस कठिणा फार तिखटा ॥
मुखीं नेत्रीं ज्वाळा निघति जळती तै दशदिशा ।
नृसिंहाच्या दीर्घा पिवळट खटा पिंगट मिशा ॥ ४१ ॥
चतुर्बाहू पितांबर विलसतो हा कटितटीं ।
मुखीं जिव्हा लोळे रुधिर रस चाटी सरकटी ॥
करी अट्टाहासा असुर गजकुंभस्थळ चिरी ।
म्हणा रे तो आतां अभयवरदाता नरहरी ॥ ४२ ॥
तये वेळीं देवाजवळिं मग कोणीं परि न ये ।
लपाले ते ब्रह्मादिक करिती धांवा जयजये ॥
रमेनें प्रल्हादासहित चरणांभोज नमिले ।
म्हणे लक्ष्मीकांता त्रिभुवनपते विघ्न शमलें ॥ ४३ ॥
नृसिंहाच्या माथां सुर वरुषती दिव्य सुमनें ।
दुरूनीयां भूमीवरि करिति साष्टांगनमनें ॥
अनंता वाद्यांचे गजर उठती घोष बरवे ।
सभास्थानीं सिंहासनिं कमलजाकांत मिरवे ॥४४॥
रमा ज्याचे अंकीं अचल विलसे विश्वजननी ।
सुखी ज्यानें केलें मुनिजन पदांभोजभजनीं ॥
शिरीं ज्याच्या शोभे मुकुटफणि छत्राकृति दिसे ।
जयासाठीं झाले हरिहर विरच्यादिक पिसे ॥ ४५ ॥
म्हणे बा प्रल्हादा तुज बहुत बाळास साळिले ॥
तुझ्या रागें त्याला सुमति क्षणमात्रांत गिळिलें ।
सुखीं राहें आतां भजन करिं माझें अनुदिनी ।
तुझ्या भाग्याचा तो शुभ उदय झाला त्रिभुवनीं ॥ ४६ ॥
दयाळा ! म्या तूझा अमल मनिं धांवा विनविला ॥
धणी त्रैलोक्याचा अभयवरदानीं सिणविला ।
तया प्रल्हादानें हृदयकमळीं देव नमिला ॥
म्हणे स्वामी स्थापी चरणकमळीं मध्वमुनिला ॥ ४७ ॥

---

### पद ४८४.

उद्धवा शांतवन कर जा त्या गोकुळवासि जनांचे ॥ ध्रु० ॥ बा नंद यशोदा माता मजसाठीं त्यजतिल प्राण । त्यागुनी प्रपंचा फिरतो मनिं उदास रानोरान । अन्नपाणि त्यजिलें रडती अतिदुःखित झाले दीन । चा. ब. जन्मलों तैहुनि झटलें । मजलागीं तिळतिळ तुटले । कटि खांदे वाहतां घटलें । आटलें

रक्त देहाचें ॥ १ ॥ आईबाप त्यजूनी वाळें मजसंगे खेळत होती । गोडशा शिदोऱ्या आणुनी आवडिनें मजला देती । रात्रंदिस फिरलें मागें । दधि गोरस चोरूं येती ॥चा. ब.॥ तो तोडुनि आलों तटका । तो जिवा लागला चटका । मजविण त्या युगसम घटका । आठवते प्रेम जयाचें ॥ २ ॥ पतिसुतादिगृह धन त्यजिलें मजवरती धरुनी ममता । मानिलें तुच्छ अपवर्गा मजसंगें निश्चळ रमतां । मदत्तचित्त त्या गोपी नेत्रांतरि ठेवुनि समता ॥ चाल ब. तिळतुल्य नाहिं मनिं डगल्या । दृढ निश्चय धरुनी तगल्या । बहुधा त्या नसतील जगल्या । भंगले मनोरथ ज्यांचे ॥ ३ ॥ हरि आहे सुखरूप म्हणुनी भेटतांचि त्या सांगावें । सांग कीं समस्ता पुशिलें प्रत्युत्तर त्या मागावें । कथुनियां ज्ञान तयातें सांग कीं शोक त्यजावें । चा. ब. ॥ हें कार्य नव्हे तुज जोगें । मजसाठीं जावें वेगें । हे मध्वमुनीश्वर सांगे । त्या नपवे ज्ञान जयाचे ॥४॥

---

पद ४८५

जाणों हरिचे पाय । आम्ही जाणों हरिचे पाय ॥ ध्रु० ॥
नियम न जाणों यमहि न जाणों । नेणों अन्य उपाय ॥ १ ॥
परिस देउनी सोनें घेणें । जळो त्याचा व्यवसाय ॥ २ ॥
कृष्णाचें पद सोडुनि आम्हीं । मुक्ति वरूं हाय हाय ॥ ३ ॥

पद ४८६

ज्याचें पायवणी सदाशिव जटाजूट स्वयें वंदितो ।
ज्याचें रूप मनांत मध्वमुनि तो पाहोनि आनंदतो ।
जो या भक्तजनांसि संकट पडो नेदी कधीं श्रीहरी ।
तो हा व्यंकट राम राज्य करितो साम्राज्य पृथ्वीवरी ॥ १ ॥
ज्याचें पूजन पंकजाक्षण करीं क्षेराभ्य मध्यस्थळीं ।
कैलासी गिरजाधि नाम जपतो सप्रेम नामावळी ॥
ज्याचे रूप मनांत मध्वमुनि तो साम्राज्य शेषाचलीं ।
तो हा व्यंकटराय राज्य करितो साम्राज्य पृथ्वीवरी ॥ २ ॥
शेषाद्रीवर नील नीलरस हे म्यां सांवळा देखिला ।
कासीं सोनसळा विचित्र पिवळा भाळीं टिळा रेखिला ॥
ज्याचें साम्य करी असा त्रिभुवनीं नाहीं दुजा ऐकिला ।
वेदांतीं प्रतिपालके गोविंदजी एकला ॥ ३ ॥
माथां रत्न किरीट कोर करिती देखोनिया लाजती ।
कर्णीं कांचन कुंडलें झळकती माळा गळां साजती ॥
ज्याचे हस्तकीं आयुधें रणमधें दैत्यावरी घालिती ।
पायींचें बिरुदावळी रुणझुणा तीं नुपुरें वाजती ॥ ४ ॥

मायाहीन सुखरूप तो निजपदां आलासि टाकोनियां ।
स्वापुष्करणी तटे विरहसे लक्ष्मीस घेवोनिया ॥
देवा थोर तुझा अगाध महिमा ब्रह्मादिकां ना कळे ।
जे भावेंभजती तयासि हृदयीं भावार्थ तैसा फळें ॥ ५ ॥
त्रैलोक्यांत तुझाचि आश्रय मला तूं गाय मी वासरू ।
माझी तूं कुळदेवता जिवलगे तूं माय मी लेंकरूं ॥
सेवाहीन अनाथ दीन जन ते विश्वंभरें पोसिले ।
माझे तो अपराधवर्ग सदयें त्वां सर्वही सोसिले ॥ ६ ॥
नाहीं म्या नवरात्र उत्सव तुझा या लोचनीं देखिला ।
नाहीं या श्रवणीं पुराण महिमा वेदार्थ तो ऐकिला ।
नाहीं या चरणीं प्रदक्षिण कधीं देवालयीं घातलीं ।
देवा काय करुं कुबुद्धि विषयामध्येंच हे रातली ॥ ७ ॥
गोविंदा गरुडासना गुणानिधी तूं श्रीनिवासा हरी ।
कोनेरी तिमया कृपा करुनियां कामादिकां संहरी ।
कल्याणाद्भुत कामितार्थ फलदा दे भक्ति तुझी पुरी ।
प्रार्थी मध्वमुनींद्र मस्तक तुझ्या ठेऊनि पायांवरी ॥ ८ ॥
श्रीगोविंद पदांबुजद्वय मना चिंतूनी शेषाचलीं ।
पूजावें मग षोडशोपचार विधिनें वाहुनी पुष्पांजली ।
साष्टांग प्रणतीस घालुनी पुढें जोडुनिया हस्तकां ।
आरंभी मग अष्टका हरिपदीं ठेऊनिया मस्तका ॥ ९ ॥

**कवन ४८७**

करारविंदे पदारविंदे मुखारविंदीं घालितां । चरणीं वाळे वांकी रुणझुण वाजो ॥ १ ॥ निज बाळा जो जो जयजय गोकुळपाळा ॥ ध्रु० ॥ रत्नजडित मुगुट जाण । त्यासी जडलें पिंपळपान । त्याला देखोनि चंद्रसूर्य लाजो ॥ २ ॥ वनमाळा वैजयंती । वाहिलीसे भाग्यवंती तेथें जीवती वाघनखें साजो ॥ ३ ॥ सत्रावी ते कामधेनू । तिचा महिमा काय वर्णूं । तीच येऊन बाळा दूध पाजो ॥ ४ ॥ मध्वनाथ आळवितो । पाळणा मी हालवितो । पतितपावन ब्रिदावळी गाजो ॥ ५ ॥

**पद ४८८.**

तो नर गति चुकला । स्वानंदाते मुकला ॥ ध्रु० ॥ सद्गुरुवरदावाणी । नाहीं नाहीं ज्याचे श्रवणीं ॥ १ ॥ शास्त्रें पाहुनि वक्ता बोलत फार अनुभव नसतां ॥ २ ॥ धर्मवासना कांहीं । ज्याचें मानसिं तिळभर नाहीं ॥ ३ ॥ संतसंग हरिभक्ति ! क्षणभरी नये मनांत विरक्ति ॥ ४ ॥ मध्वनाथ म्हणे भाव । सद्गुरुवांचुनी कैचा देव ॥ ५ ॥

# मुमुक्षूंतील निवडक निबंध.

'मुमुक्षु' साप्ताहिकांत पहिल्या १०-१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षू' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रांसह हे नियमानें वाचावें म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपाया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल; पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्तकाचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिला**--१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद-लेखांक १।२।३।४. मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्म-महोत्सव. न्मले. १ ते ४. श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनांतून सुटावें कसें ? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ एका भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसरा**—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गणेशाची भेट. ५ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ ' कुतऱ्या थमालले थमाल आपुल्या गाई.' १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार ? १३ साधुकथा. १४ पतिपत्नीसंबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सार्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर. १९ मातृभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांताचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचे उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह. ३५ बोध आणि विनोद [ या सदराखालीं १९ स्फुटें आहेत. ]

**पत्ता—व्यवस्थापक मुमुक्षु पुणें.**

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. भक्तिमार्गप्रदीपः—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पी नें ०१२.

२. संतचरित्रमालाः—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४१ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

३. श्रीएकनाथचरित्रः—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. कविरामायणः—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. आनंदलहरीः--( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेंपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. नारदभक्तिसूत्रें:—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. ( आवृत्ति ४ थी )

७. नवविधाभक्तिः—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

८. निरंजनमाधवांची कविताः--भाग पहिला. किं. १ रु.

९. श्रीज्ञानेश्वरचरित्रः—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १०८.

१०. भक्तिमणिमालाः—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

## पांगारकरांचीं पुस्तकें.

११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळ चे प्रसिद्ध पुढारी कै॰ विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

१२–१३. मुमुक्षुंतील निवडक निबंध ( भाग १–२ ):–किं. प्रत्येकी रु. १०८

१४. मोरोपंतांचे वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु १०१२.

१५. पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचाराची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे किं. ०८.

१६. श्रीतुकारामचरित्र —श्रीतुकारामाचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा, भंडारा डोंगर व देहूचें देऊळ असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं. रु. ३.

१७. श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:– निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख–विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

१९. मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातू प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे। किं. रु. १.

२० मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ): – किं. ०४.

२१ सार्थ श्रीदासबोध: —किं. रु. ४, व्ही. पी. नें ४०१०.

२२. सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

२३ समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थ या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२४ मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु. २०४.

२५ श्रीएकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):—किं. रु. ६.

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २१ वें | माघ १८४९ | नवें वर्ष ८ वें |
| मास ७ वा | मार्च १९२८ | अंक ३ रा. |

संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.

वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही.पी. नें रु. ३-३

मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. १००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १–३ |
| २ नाममाहात्म्य ... ... ... ... | ४–६ |
| ३ देवनाथ ... ... ... ... | ७–१६ |
| ४ कर्मयोग ... ... ... ... | १८–२८ |
| ५ साभार स्वीकार ... ... ... ... | २९–३० |
| ६ गुरुप्रसादींचें चरित्र ... ... ... ... | ३१–३६ |
| ७ आत्मसंयमन ... ... ... ... | ३७–४० |


---


# निरंजनमाधवाची कविता.

**भाग १ ला, किं. १ रु.** **भाग २–३, किं. १॥ रु.**

पहिल्या बाजीराव पेशव्याचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व भक्त अशा निरंजनमाधव कवीच्या काव्याच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गायिलेलें प्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुटकाव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेंत सांगणारीं अशीं घातलीं आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जें "सुभद्रा–चंपू" नांवाचें या कवीनें केलें आहे तें छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमींचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही भाग एकत्र बांधिले आहेत.

१५३/८





१

एह्येहि कृष्ण! सकृदेव भवातिथिस्त्वं
हे भक्तवत्सल! गृहाण निमंत्रणं मे।
प्रेमाश्रुपाथपरिधौतपदांबुजे ते
आत्मानमेव कुसुमांजलिमुत्सृजामि ॥ १ ॥

**अर्थः**—हे कृष्ण! ये. ये. एकवार तूं माझा अतिथी हो. हे भक्त-वत्सल! ह्या माझ्या निमंत्रणाचा स्वीकार कर. प्रेमाश्रुजलानें धुतलेल्या तुझ्या चरणकमलावर आपल्या अंतरात्म्याची पुष्पांजळि मी वाहणार आहें.

२

एह्येहि जीवेश्वर! जीवबन्धो!
भवाब्धिमन्थोत्थित रत्नसार!।
हृदोनिधिं त्वां हृदये निधाय
प्रमीलिताक्षो हृदि निर्विशामि ॥ २ ॥

**अर्थः**—हे जीवाच्या ईश्वरा! जीवाच्या सुहृदा! ये. ये. तूं संसार-समुद्राचें मंथन करितां करितां त्यांतून निघालेलें रत्नसार तूंच आहेस. (फलकट हा संसार। येथें सार भगवंत ॥ तुकोबा) माझ्या हृदयांतला प्रेमसर्वस्व-निधि तूं आहेस. तुला मी आपल्या हृदयचौरंगावर बसवून नेत्ररूपी कपाटें किंवा द्वारें बंद करून हृदयांतच सर्वकाळ तुला कोंडून ठेवीन.

३

मयार्प्यते त्वच्चरणेऽयमात्मा
प्रतीच्छ हे स्वस्य धनं स्वयं त्वम् ।
किंचिन्निजस्वं न हि विद्यते मे
यद्दीयते त्वच्चरणे मुकुंद! ॥ ३ ॥

अर्थः—भगवन्! मी आपला सर्व जीवभाव तुझ्या चरणीं अर्पण करीत आहे. याचा तूं स्वीकार कर. हें तुझेंच धन मी तुला देत आहे. मुकुंद! तुझ्या चरणीं अर्पण करायला माझें असं कांहीं एक नाहीं. (तुझेंचि तुज म्यां दिल्हें। म्यां हें कोठोन आणिलें—रामदास). तूंच माझें सर्व धन आहेस.

४

तुकोबांचा विठ्ठल तूंची समर्थांचा राम ।
तूंचि दत्तप्रभु जगदंबा सकलमनोविश्राम ॥ ४ ॥
वासुदेवा! रामकृष्णा! भाविकजन-आराम!
संत योगी ऋषि मुनि यांचा नित्य पुरविसी काम ॥५॥

५

अहिल्या शिळा तारिली त्वां मुरारे
जडाला मला सोडिसी तूं कसा रे ।
गजा वानरा उद्धरीले स्वलीले
पशूभोग मी भोगितां कां त्यजील ॥ ६ ॥
किती नष्ट चांडाळ ते तारियेले
मला पातक्यालाच कां मोकलीलें ।
बहू काय मी सांग त्याहूनि हीन ?
पदीं लागतों मी तुझ्या दीनदीन ॥ ७ ॥

२३-२
१५३।२५

६

बन्दौ चरणसरोज तुम्हारे

सुंदरश्याम कमलदललोचन । ललितत्रिभंगीं प्राणनि प्यारे ॥ बन्दौ० ॥
जे पदपद्म सदाशिव के धन । सिंधुसुता उरते नहि टारे ॥ बन्दौ० ॥
जे पदपद्म परसि जलपावन । सुरसरिदरश कटत अघभारे ॥ बन्दौ० ॥
जे पदपद्म परसि ऋषिपत्नी । बलिमृगव्याध पतित बहु तारे ॥ बन्दौ० ॥
जे पदपद्म तात रिस आछत । मनवचक्रम प्रल्हाद संभारे ॥ बन्दौ० ॥
जे पदपद्म रमत वृंदावन । अहिसुर धरि अगणित रिपु मारे ॥ बन्दौ० ॥
जे पदपद्म परसि बृजभामिनि । सर्वस दै सुतसदन विसारे ॥ बन्दौ० ॥
जे पदपद्म रमत पांडवदल । दूत भये सब काज संवारे ॥ बन्दौ० ॥
सूरदास तेई पदपंकज । त्रिविधताप दुख हरन हमारे ॥ बन्दौ० ॥

७

जय मीराके गिरधर नागर जय तुलसीके राम ।
जय नरसीके सांवरिया जय सूरदासके श्याम ॥

---

सुधारून वाढविलेली ) **मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति

कविवर्य मोरोपंत यांच्या पाऊण लाख कवितांतून वेगवेगळ्या विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे मोठ्या प्रयासानें यांत संग्रहीत केले आहेत. १ ईश्वरभक्तिपर. २ कवि आणि कविता. ३ उपदेशपर, ४ वर्णनपर. ५ कथानकपर. ६ चक्रीरामायण व ७ विविध विषयपर—अशीं या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं असून त्यांत पंतांच्या कवितेंतील बहुतेक उत्कृष्ठ भाग आला आहे. ग्रंथाला भरपूर टीपा व कथासंदर्भ दिले असून पंतांच्या अजून अप्रसिद्ध अशा कांहीं कविता यांत दिल्या आहेत, व कोठें पंतांच्या हातच्या टीपाहि दिल्या आहेत. प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत प्रस्तावना दिली असून तींत कवितेचें लक्षण, काव्याचें वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे उत्तम गुण, काव्याची महती व पंतांची महाकवींत गणना होण्याचीं कारणें याचें साहित्यशास्त्रदृष्ट्या विवरण केलें आहे. **ह्या दुसऱ्या आवृत्तींत पंतांचें त्रोटक चरित्र नवीनच जोडलें आहे.**

# नाममाहात्म्य.

गोरखपूर येथें ' कल्याण 'नामक मासिक आज दोन वर्षें निवत असतें. याचे संपादक श्री. हनुमानप्रसाद पोद्दार हे आहेत. मासिक धर्मविषयक असून हिंदी भाषेंत निघतें. त्याचे दुसऱ्या वर्षाचे सात अंक आमचेकडे आले असून पाहिला ' भगवन्नामांक ' बराच मोठा आहे व त्यांत नाममाहात्म्यावर ३४ सुंदर लेख आहेत व साधुसंतांचीं ४१ सुबक व सुंदर चित्रें आहेत! लेख अनेक नामप्रेमी भाविकांचे आहेत व त्यांत प्राचीन व अर्वाचीन अनेक संतांचीं भरपूर वचनें घेतलीं आहेत. सदर नामांक आह्मांस फार फार आवडला व तीन दिवस तो वारंवार पाहत असतांना जो आनंद झाला त्याचा अंश आमच्या वाचकांसही मिळावा यासाठीं प्रस्तुत लेखांत त्यांतील इतस्ततः विखुरलेलीं कित्येक वचनें आम्ही घेणार आहोंत. अंक आह्मांकडे पाठविल्याबद्दल 'कल्याण'कारांचे आम्ही कल्याण चिंतितों.

१

एक भरोसो एक बल, एक आस विश्वास ।
एक राम घनश्याम हित, चातक तुलसीदास ॥

२

सर्वेषामप्यघवतामिदमेव सुनिष्कृतम् ।
नामव्याहरणं विष्णोर्यतस्तद्विषया मतिः ॥
नैकान्तिकं तद्धि कृतेऽपि निष्कृते
मनः पुनर्धावति चेदसत्पथे ।
तत्कर्मनिर्हारमभीप्सतां हरेः
गुणानुवादः खलु सत्वभावनः ॥

—श्रीभागवतस्कंध ६–२

सर्व पापी जीवांनीं पापाच्या निष्कृतीसाठीं विष्णूचें नामस्मरण हें एकच कर्म करावें कां कीं, नामस्मरणानें चित्त विष्णुमय होतें. मन पुन्हां असन्मार्गाला धांवत असलें तरी पूर्वपापकर्मांचा नाश करणार नामच समर्थ असल्यामुळें अधिक आस्थेनें नामच घेत रहावें. हरीचा गुणानुवाद हा चित्तशुद्धि करणारा आहे, सत्वसंशुद्धि त्यानेंच होतें.

३

मधुरमधुरमेतन्मंगलं मंगलानां सकलनिगमवल्लीसत्फलं चित्स्वरूपम्

१५३/२

सकृदपि परिगीतं श्रद्धया हेलया वा भृगुवर ! नरमात्रं तारयेत् कृष्णनाम ॥
—प्रभासखंड

**भावार्थः**—हे भृगुवर ! श्रीकृष्णनाम हें मधुरांत मधुर, मंगलांतलें मंगल, सकल वेदलतांचें सत्फळ असून प्रत्यक्ष ब्रह्मस्वरूप आहे. हेळणेनें सुद्धां तें एकवार घेतलें तरी मनुष्यमात्राला तारतें, मग श्रद्धेनें निरंतर घेतलें तर कोणासही तारल्याशिवाय कसें राहील ?

४

परिवदतु जनो यथातथाऽयं ननु मुखरो न ततो विचारयामः ।
हरिरसमदिरामदेन मत्ता भुवि विलुठाम नटाम निर्विशामः ॥

**भावार्थः**—( श्रीगौरांगप्रभूचा शिष्य वासुदेव म्हणतो ):—या लोकांना वाटेल तशा आमच्या निंदा व कुटाळक्या करूं देत. तोंडाळांचें तोंड कोणी धरावें ? आम्ही त्यांचा विचारच करीत नाहीं. हरिरसपानानें मत्त होऊन आम्हीं पृथ्वीवर कधीं गडबडा लोळतों, कधीं नाचतों, आम्ही सर्वदा आमच्या नामानंदांत मस्त असतों, त्यामुळें दुसऱ्याचें ऐकायलाच आम्हांला वेळ नाहीं !

५

चेतोदर्पणमार्जनं भवमहादावाग्निनिर्वापणं
श्रेयःकैरवचंद्रिकावितरणं विद्यावधूजीवनम् ।
आनंदांबुधिवर्धनं प्रतिपदं पूर्णामृतास्वादनं
सर्वात्मस्वपनं परं विजयते श्रीकृष्णसंकीर्तनम् ॥— श्रीगौरांगप्रभु.

**भावार्थः**—श्रीकृष्णकीर्तनाच्या योगें चित्तरूपी दर्पण त्यावरील मल दूर झाल्यामुळें निर्मळ होतो, संसाररूप किंवा विषयवासनारूप जो दावाग्निसंताप तो शमून जातो, आत्मकल्याणरूप कमलिनींचा विकास होतो, ज्ञानभक्तिरूप वधूला जीवदान मिळतें, आनंदसमुद्राला भरती येते, प्रतिपदीं पूर्णामृताचा आस्वाद मिळतो, सर्व विश्व आत्मानंदप्रेमांत डुबून जातें—असा हरिकीर्तनाचा सर्वत्र विजय होतो—श्रीकृष्णकीर्तन कीं जय !

६

कीर्तनादेव कृष्णस्य विष्णोरमिततेजसः ।
दुरितानि विलीयन्ते तमांसीव दिनोदये ॥
नान्यत्पश्यामि जंतूनां विहाय हरिकीर्तनम् ।
सर्वपापप्रशमनं प्रायश्चित्तं द्विजोत्तम ॥—पद्मपुराण.

**भावार्थः**—अपरिमेय प्रभावशाली अशा भगवंताच्या कीर्तनानें-सूर्योदयीं अंधार तशीं—सकल पापें दूर जातात. मनुष्यमात्रांना आनंददायक, सर्वपापनाशक, असें नामसंकीर्तनावांचून दुसरें कोणतेंही प्रायश्चित्त नाहीं.

७

हरेर्नामस्य या शक्तिःपापनिर्हरणे द्विज ।
तावत्कर्तुं समर्थो न पातकं पातकी जनः ॥—गरुडपुराण.

**भावार्थः**--हरिनामाची पापनिवारक शक्ति जेवढी आहे तेवढी कांहीं पाप्याची पापाचरणाची नाहीं !

८

चहुं युग चहुं श्रुति नाम प्रभाऊ
कलि विशेष नहिं आन उपाऊ ।
कलियुग केवल नाम अधारा
सुमिरि सुमिरि भवउतरहिं पारा ॥ तुलसीदास.

**भावार्थः**—चारही वेदांनीं चारही युगांत नामाचा प्रभाव सांगितला आहे आणि कलियुगांत तर नामावांचून दुसरा तरणोपायच नाहीं, तोच एक आधार आहे, ह्मणून नामस्मरण निरंतर करीत राहून भवसागर तरून जा.

९

पढनेकी हद समज है, समझणकी हद ज्ञान ।
ज्ञानकी हद हरिनाम है, यह सिद्धांत उर आन ॥
—कबीर.

**भावार्थः**--ग्रंथपठणाची सीमा समजूत पटणें ही आहे. समजुतीची सीमा ज्ञान ही आहे व ज्ञानाचीही सीमा हरिनाम आहे. हा सिद्धांत अन्यथा होणें नाहीं ! पहा बरें ! ज्ञानीही ज्ञानाच्या गोष्टी सांगतां सांगतां शेवटीं नाम-चिंतनावर येऊन पोंचतो तेव्हांच त्याच्या मनाची तळमळ शांत होऊन तो परमसुख पावतो.

१०

पुराननको अंत नहिं, वेदनको पार नहि,
वाणी तो अपार कहां, कहां चित्त दीजिये ? ।
लाखनकी एक कहूं, कहूं एक कोरनकी
सबही को सार एक रामनाम लीजिये ॥
—कबीर.

**भावार्थः**—पुराणांना अंत नाहीं, वेदांना पार नाहीं. शब्दशास्त्र अपार आहे. चित्त द्यावें तरी कोठें ? लाखांतली, कोटींतली एकच गोष्ट सांगतों—ती ही कीं सर्वांचें सार एक रामनाम आहे. सर्व सोडून रामनाम जपत जा.

# देवनाथ ( शके १६७६-१७४३ ).

एकनाथांच्या शिष्यपरंपरेंतला संतकवि देवनाथ हा नाथांचे भावार्थरामायण पूर्ण करणारा त्यांचा शिष्य जो गावबा उर्फ नित्यानंद याजपासून सातवा पुरुष होय. देवनाथ व त्याचा शिष्य दयाळनाथ हे वऱ्हाडप्रांतीं चांगले गाजले. या उभयतांचीं, विशेषतः देवनाथांचीं पदें महाराष्ट्रांत बरींच लोकप्रिय आहेत. एकनाथ-नित्यानंद ( गावबा )-कृष्णनाथ-विश्वंभरनाथ-मुरारनाथ-रंगनाथ-गोपाळनाथ-गोविंदनाथ-देवनाथ-दयाळनाथ अशी ही शिष्यपरंपरा आहे. एकनाथापासून देवनाथ हा नववा पुरुष. देवनाथांचे परमगुरु गोपाळनाथ यांचा मठ सातारप्रांतीं माहुलीजवळ त्रिपुटीनामक गांव आहे तेथें आहे. देवनाथांनीं आपल्या पदांत ' कृष्णातीरीं त्रिपुटीमाजी आमचें ब्रह्मई ' ' अग या कृष्णेच्या तटीं । वसताहे ब्रह्म आमुचे त्रिपुटीं ' याप्रमाणें त्यांचे उल्लेख केले आहेत व 'गोपाळनाथाष्टक' या स्तोत्रांत 'त्रिपुटीस अतीत जो त्रिपुटीं हो । वसे स्वामिचा स्वामी कृष्णातटीं हो' याप्रमाणें आपल्या परमगुरूबद्दल म्हटलें आहे. ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान इ० ज्या प्रसिद्ध त्रिपुटी ह्यांच्या पलीकडे म्ह० केवळ ब्रह्मरूप असा आमच्या गुरूचा गुरु आहे असा त्या चरणाचा भावार्थ आहे. ' नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ' हें दशकही याच अर्थाचें आहे. गोपाळनाथांचे शिष्य गोविंदनाथ हे देवनाथांचे गुरु होत. यांचा मठ बऱ्हाणपूर येथें असून तेथील मठांत उपनिषदार्थ प्रगट करणारे असे त्यांचे पांच हजार अभंग आहेत. पण ते अद्याप अप्रकाशित आहेत. यांचा धूसरगांवींही एक मठ आहे. यांनीं उत्तम गुरुसेवा केली. लोकांना भगवद्भक्तीचा उपदेश करीत हे सर्वत्र संचार करीत. हे असेच फिरत फिरत उमरावती जिल्ह्यांत सुरजी अंजनगांव येथें गेले. शहाणूर नदीच्या एका तीरावर सुरजीगांव दुसऱ्या तीरावर अंजनगांव आहे. ह्या गांवाच्या जवळ सातपुड्याच्या विशाळ रांगा लागल्या असून जवळच गाविलगड व नरनाळा हे इतिहासप्रसिद्ध किल्ले आहेत. सुरजी येथील कमाविसदार राजोपंत यांचे देवनाथ हे पुत्र. जन्म शके १६७६. बाराव्या वर्षी यांचें लग्न झालें.पण बायको लवकरच वारल्यामुळें हे मोकळे झाले ते पुन्हां प्रपंचांत पडले नाहींत. यांना बाळपणापासून तालमीचा शोक भारी होता. हे प्रथम हूड, खोडयाळ होते, पण ग्रंथवाचनाचा नाद तसाच दांडगा होता. यांची भक्ति मारुतीवर फार. जळगांव तालुक्यांतील ' हनुमंताची वारी ' येथील जागृत मारुतीची त्यांनीं आराधना केली. गुरु गोविंदनाथ यांचा अनुग्रह शके १७०२ मध्यें झाला. शास्त्र, गुरुवाक्य व आत्मप्रतीति यांची एकवाक्यता होऊन देवनाथांच्या

चेहऱ्यावर आत्मप्रभा विलसूं लागली. ते जातील तेथें त्यांची छाप पडे. शरीर तालमीनें कसलेलें, वाणी खडखडीत, निस्पृहता व निर्भीडपणा अंगभूत अशी ही स्वारी संचारार्थ बाहेर पडली आणि कवनांनीं व कीर्तनांनीं लोकोद्धाराचें कार्य २५।३० वर्षे यांनीं उत्तम प्रकारें केलें.

२ देवनाथांचा स्वतंत्र ग्रंथ एकही नाहीं. तथापि त्यांचीं पदें महाराष्ट्रांत प्रसिद्ध असून कित्येक सर्वतोमुखीं झालीं आहेत. त्यांची वाणी सुसंस्कृत असून सहज आहे. तींत प्रसाद गुण आहे. कवितेंत ओढाताण नाहीं, प्रवाह अस्खलित आहे. करुणरस व भक्तिरस हे दोनच रस त्यांच्या कवितेंत आहेत. पण दोन्ही त्यांना चांगले साधले आहेत. श्रीकृष्णभक्ति व गुरुभक्ति त्यांच्या ठायीं उत्कटत्वानें वास करीत होत्या व त्यांच्या कवितेचा एकंदर उठाव पाहतां ते स्वानुभवी सत्पुरुष होते अशी कोणाचीही खात्री होईल. रचना विशेष टाकठिकींची नाहीं पण गवाळपणाचीही नाहीं. सहजपणाचा रंग त्यांच्या कवितेंत भरून राहिला आहे. त्यांच्या कवितेचा थोडक्यांत परिचय करून देतों.

श्रावणाख्यान, अहिमहीआख्यान व कृष्णजन्माख्यान अशीं त्यांचीं तीन आख्यानें आहेत. श्रावण नामक वैश्याचा पुत्र दशरथाच्या शरसंधानानें मरण पावला तेव्हां त्याच्या आकस्मिक मृत्यूची वार्ता दशरथालाच त्यांच्या कानावर घालावी लागली. तो प्रसंगः—

वृद्ध म्हणती पुत्र तो कुठें गेला ? । राव बोले 'मम हस्तकीं निमाला' ।
पुत्रमृत्यूचा शब्द पडे कानीं । पडति धरणीसी हाय शब्दवाणी ३५
'धन्य पुत्रा बा ! स्ववंशानुसारा । वनीं मोकलुनी जासि कीं उदारा ।
अडामाजी अर्धेंचि बोढियेलें । दोर कापुनियां आंत सोडियेलें ३६
रात्रिमाजी उदकासि धाडियेलें । म्हणुनि रागें त्वां दूर गमन केलें ' ।
'पुत्र पुत्रा' बाहोनि शब्द करिती । 'तुला कष्टविलें आम्ही दिवसराती' ३७
अरे बाळा ! म्हणउनि रुसलासी । कसा एकट तूं विष्णुपदा जाशी ?
अम्हां अंधांची यष्टि घोर रानीं । कुणी चांडाळें घेतली हिरोनी ? ३८
मुखीं घालिति ते धूळ तदा साचे । फार कळवळलें चित्त तें नृपाचें ।

हें वर्णन वाचतांना वाचकाचेंही चित्त कळवळतें. वसुदेवदेवकीचा विवाह झाल्यावर वरातीचा समारंभ मोठ्या आनंदानें कंसाच्या नजरेखालीं चालला असतांना आकाशवाणी झाली कीं ' तुझ्या ह्याच बहिणीच्या आठव्या पुत्राच्या हातून तुझा मृत्यु होईल ':—

वदे ऐसी अंबरीं देववाणी । ऐकतांची दचकला कंस कानीं ।
शैलशिखरीं आदळे वज्र जैसें । तये समयीं जाहलें तया तैसें ८
म्हणे 'कैंची हे भगिनि ? मृत्युखाणी !' । रथाखालीं पाडिली धरुनि वेणी ।

घाबरी ते सुंदरी अश्रुनयनी । वदे भावा तेधवां दीनवचनीं ९.
काय कारण बा ! तूज वध कराया । काय केला अन्याय बंधुराया !
बहुत होती मजवरी तुझी माया । कशी निष्ठुरता आजि आलि हृदया १०
माय मारी बाळासि जरी हातें । कोण त्यातें मग वांचवूं पहातें ? ।
कोण त्राता तुजवीण सांग मातें ? । बंधुराया ! दे प्राणदान मातें ११

पुढें आठवा पुत्र श्रीकृष्ण जन्मतांच त्यास घेऊन वसुदेव निघाला, तेव्हां मोहव्याप्त होऊन देवकीनें शोक केला त्यावेळचा तिचा एकच उद्गारः—

घाबरला जिव निघूं पाहतो; करपद हे गळले ।
जन्मांतरिचें कोण पाप तें न कळे हें फळलें ॥
स्नेहभरें मीं स्नेहें नाहीं जाउळ माखियलें ।
पायांवरि घेउनी कुमारा नाहीं न्हाणियले ॥
नाहीं दिधली घुटी स्वहस्तें, नाहीं पाजियले ।
कुळिचें दैवत त्यातें नाहीं सटवीशी पुजिलें ॥

मातृ हृदयाचें किती यथार्थ चित्र येथें उमटलें आहे ! देवनाथांच्या कटिबंधांत ह्म० कटावांत वर्णनाचा थाट अमृतरायांच्या खालोखाल आहे. यांचे आठ दहा कटाव आहेत. ‘ कवडी कवडी करुनी जोडी, विप्रालागीं हात न जोडी, वेश्येलागीं शालजोडी, बसावयाला खाशी घोडी, पखालदाढी, जरतारी पगडी, भरुनि गुडगुडी, करिं धरुनियां ओढी...मुखांतूनी धूर काढितो, लोडीं टेकुनि सदरीं बसतो, दरवा दिसतो, तृणकाडीसम इतर लेखितो.’ हें त्यावेळच्या दरबारी माणसाचें वर्णन आहे. हे कडाके वाचण्यापेक्षां ऐकायला गोड लागतात. देवनाथांचे कांहीं अभंग व श्लोकही छापलेले आहेत, पण त्यांची पहिल्यापासून जी प्रसिद्धि आहे ती त्यांच्या पदांवरून आहे.

३ यांचीं पदें अनेक देवतांच्या प्रार्थनेची आहेत, लहानमोठीं अनेक चालींवरचीं आहेत, पण या सर्व पदांत कृष्णपर, गुरुपर व उपदेशपर पदें आहेत त्यांत त्यांची तन्मयता अधिक झालेली आहे. ते एकनाथांच्या परंपरेंतले अर्थात् भागवतसंप्रदायी असल्यामुळें साहजिकच आपल्या उपास्य श्रीकृष्णाच्या ठायीं त्यांची निष्ठा पूर्ण होती व हें कृष्णभक्तीचें रहस्य गुरुकृपेनें प्राप्त झालेलें असल्यामुळें उपास्य व सद्गुरु हे अभिन्नपणें त्यांच्या हृदयांत वागत होते. परब्रह्म, श्रीकृष्ण व श्रीगुरु हे निर्विशेषतया स्वस्वरूपीं अनुभवणें हें गुरुभक्तीचें मुख्य लक्षण त्यांचे ठिकाणीं पूर्ण बाणलें होतें. श्रीकृष्णपर पदांत श्रीकृष्णरूप, कृष्णाची बालक्रीडा, गोपींचीं गाऱ्हाणीं, मुरलीची मोहनी, वियोग व संयोग या उभय अवस्थांतील भक्तिभाग्य, धांवे वगैरे प्रकार आहेत. गुरुपरपदांत असाच अनुभवाचा रंग भरला आहे. हरिगुरुभक्तांना त्यांतील पूर्ण आनंद

भोगतां येणार आहे, इतरांना काव्यरसानुभव आपापल्या भूमिकेप्रमाणें घेतां येईल. ' सांवळें ब्रह्म मज आवडे । त्याविण अन्य हें नावडे
गुणगण गाती ह्या श्रुति निजवाणी । ज्या स्तविता शिणती योगी ब्रह्मारण्यीं ।
ब्रह्मादिकां न कळे करणी । तें हें रांगे नंदाच्या आंगणीं ॥ १ ॥
दुडदुडा धांवे वत्साचिये पाठीं । कांबळी खांदा हातीं काळी कांठी ।
भोंवतीं शोभे गोवळांची दाटी । गोजिरें रूप बरवा जगजेठी ॥ २ ॥
सांवळें ब्रह्म तें मज आवडे ॥ ध्रु० ॥

मुरलीचीं पदें फारच बहारीचीं आहेत.

मुरली वाजविली कृष्णानें । नंदाच्या कान्हानें ॥ ध्रु० ॥
रात्र जालीसे दोनप्रहर । मधूर मुरलीस्वर ।
कानीं पडताती सुस्वर । विव्हळ जालें अंतर ।
बाई मोहियलें मनमोहनें । नंदाच्या० ॥ १ ॥
बाई ऐका ग सखे ऐसी । छळितो हा हृषिकेशी ।
घालुनि मुरलिमधें मोहनिसी । वृत्ती केली पिशी ।
बाई मोहियलें मनमोहनें । नंदाच्या० ॥ २ ॥
पाहतां मुरलीचा स्वर बाई । ऐसा त्रिभुवनिं नाहीं ।
चेटकी नाटकी अगबाई । मोठा शेषशायी ।
ग्वाही दिधली वेदानें । नंदाच्या० ॥ ४ ॥
देवनाथाचें मन नादें । मोहियलें गोविंदें ।
लागुनि भजनाच्या निजछंदें । रमवीलें स्वानंदें ।
वृत्ती जालीसे तल्लीन । नंदाच्या० ॥ ५ ॥

पतिसमागमसुख भोगीत असतांना मुरलीस्वर माझ्या अंतरंगीं शिरला व मी तें सुख टाकून ' तशीच चाललिग धडक्यानें ' असा तिसऱ्या कडव्याच्या चरणाचा भावार्थ आहे. संसारांत विषयसुखाची परमावधि ज्यांत समजली जाते तें सुखही भगवत्सुखापुढें तुच्छ होय ह्म० स्वानंदाच्या गोडीपुढें विषयानंद हीन होय हें याचें वर्म आहे. श्रीकृष्णस्वरूप व कृष्णाची मुरली यांचें रहस्य सत्संगांत भाविकांना उमगतें, ' अहारे मेल्या कृष्ण्या ! वाजविली कैसी मुरली ? ' हें पदही असेंच बहारीचें आहे.

या गोविंदें मुरलीनादें मोहियलें मन गडे ।
हरिरुप अखंड नयनापुढें ॥ ध्रु० ॥
नंदनंदनें या मधुसुदनें लावियलें ग पिसें ।
कीं जनिंवनिं आपण अवघा दिसे ॥
कंसमर्दनें मुरलिवादनें अघटित केलें कसें ।
कीं आभास कांहिंच उरला नसे ॥

नवल वाटलें मला सुंदरी ।
नेणों काय जाली कसि परी ।
पाहतां यातें बाह्य अंतरीं ।
व्यापक हा चहुंकडे ॥ हरिरूप० ॥ २ ॥
कुंदरदन सुखसदन अगे हा! मदनदहनप्रियगडी ।
सांवळा क्रीडत यमुनेथडी ॥
राजस सुंदर मूर्ति मनोहर जो गोवळ-संवगडी ।
वर्णितां श्रुतिशास्त्रां सांकडीं ॥
समाधिव्युत्थानीं हरि विलसे ।
यात्विण कांहीं अन्य न भासे ।
देवनाथ गुण वर्णित ऐसें । मौन हें वाचे पडे ॥ हरिरूप० ॥ ४ ॥

मुरली तर 'समाधिसुखसंवित्ति' देणारी आहेच पण ही देवनाथांची मुरलीवरील पदेंही समाधिसुखास्वाद मिळवून देतात. गृहदार कांहीं न सुचून गोपी मुरलीच्या नादप्रवाहीं वाहवल्या याचें नवल काय ? पहा बरें:—

गीत संगित तान प्रबंधे रव मोहक त्या मुरलीचे ।
सुर किन्नर नर तल्लिन ते महिसहित अहिपति नाचे ।
वर्णनीं शिणल्या वाणी, न चले मुख वेद श्रुतीचें ।
शेषाच्या चिरल्या जिव्हा, अघटित गे करणें याचें ॥ २ ॥
मंजुळ ध्वनि सुंदर बाई ! वाजवितां पडतां श्रवणीं ।
खग मृग अति तन्मय झाले ते पिऊं विसरले पाणी ।
वृक्षाचें पत्र न हाले, रविरथु स्थिरावला गगनीं ।
सुर चकित पाहती अवघे, मुकले रस अमृतपानीं ॥ ३ ॥
तृण भक्षिती ना त्या गाई, पक्ष्यांनीं त्यजिला चारा ।
वनिं व्याघ्रवृकादिक सारे हिंसेचा त्यजिति उभारा ।
नर नारी स्तब्धचि अवघे सोडुनियां मोह पसारा ।
गर्जना मेघ न करिती मुनि त्याजिती आत्मविचारा ॥ ४ ॥
सुरअसुरादिक स्थिर झाले सांडुनियां सकळहि द्वंद्वा ।
अघटित हे लीळा न कळे वर्णितां न वदवे वेदां ।
भांबावलीं शास्त्रें साही बोलतां न शकती शब्दा ।
देवनाथ प्रभु त्या गातो निजभावें नाम प्रबंधीं ॥ ५ ॥

ह्या सुंदर पदाचें ध्रुवपद 'तनों तनों त्रों तननन श्रीहरि हा वाजवि मुरली' असें आहे. मुरलिध्वनीनें चराचर सृष्टि वेडावल्याचें मोहक वर्णन मूळ भागवतांतच आहे. नाथभागवतांत (अ. १२)ही प्रौढ वाणीनें

नाथांनीं मुरलिप्रभाव वर्णिला आहे. वामनांची ‘ वेणुसुधा ’ तर रसिक भक्त अखंड पीत आलेच आहेत. आनंदतनयादि सत्कवींनीं ‘ वृंदावनिं वाजवि मुरली हरि मंजुळ कुंजविहारी ’ इ० पदांतून मुरलीचें गायन वर्णिलें आहेच.

४ विरहानळानें तप्त झालेल्या गोपी गीतें गातात. ती हरिसी तन्मय झालेली ‘ मनोवृत्ति राधा’च त्या कृष्णसुखाची यथार्थ गोडी जाणूं शकते.

आद्य दीप श्रीकृष्ण तयाची ती राधा ज्योती ।
परम पुरुष हा दयाळ श्रीहरि त्याची ते प्रकृति ।।
हा चित्सिंधु ते चित्सरिता ऐक्यपणें मिनती ।
खचित रवि परिपूर्ण तयाची अबाधिता दीप्ति ।।

श्रीकृष्ण साक्षात् परब्रह्म. भक्तांनीं त्याला हवीं तीं रूपें देऊन वाटतील ते साज त्याच्या अंगावर चढवून आपला स्वानंद आपल्याठायीं भोगला आहे. एकपणांतला तो परमानंद. तुकोबारायांचे ‘ विराण्याचे’ ३२ अभंग पहा. त्यांत त्यांनीं स्वतःला स्त्री कल्पून ‘ आथिल्या भ्रतारें काम नोहे पुरा ’ म्ह० पहिला नवरा प्रपंच, त्याच्या संगतींत स्वसुखलालसा पूर्ण न झाल्यामुळें मी परपुरुषावर आसक्त झालें आहे, आजवर मी व्यभिचारी म्हणून डांगोरा झाला होता. पण आतां निःसंगपणें मीच जाहीर करिते कीं, मी खरोखरच ह्या परपुरुषाशीं ( उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः । गीता अ० १५ ) रत झालें आहे असें म्हटलें आहे. तुकोबांनीं परमात्म्याला ‘ पर पुरुष ’ म्हणून स्वतःला व्यभिचारिणी ठरविलें आहे. देवनाथांनीं ‘ आषक आम्ही पिसें झालों गे तुजवरुते ।’ ह्या सुंदर पदांत परमात्म्याला ‘ त्रिभुवनसुंदरी ’ म्हटलें असून आपण आषक झाल्याचें लिहिलें आहे. दोघांचाही हा आत्मविलास आहे. अद्वयानंदाचें सुख दोघांनींही भोगीत असतां ही मौज केली आहे. परमात्मा हा तर ‘ ना पुरुष ना स्त्री, ना नपुंसक । ’ असा आहे तेव्हां त्याच्यावर जी जी भक्तांनीं कल्पना करावी ती ती आत्मसुखदायकच असते.

५ वस्त्रहरण प्रसंगीं द्रौपदीनें जो प्रभूचा धांवा केला त्यावर देवनाथांनीं एक धांवा केला आहे तो ८० पद्यांचा आहे तरी अतिशय गोड आहे. समग्र गातांना भाविकाचे नेत्र ओले झाल्याशिवाय राहणार नाहींत. भक्तिरसानें भरलेला आहे. थोडा मासलाः—

जय जय हरिनारायण ॥ ध्रु० ॥
यमुना तीरविहारी । स्मरतां भवभय हारी ।
दीनोद्धर जगजीवन । जयजय० ॥ ४ ॥
मारी दुर्जन समरीं । दीन भवजळीं तारी ।
जो हरी नंदनंदन । जयजय० ॥ ५ ॥

स्मरतां नाम जयाचें । दे पद सायुज्याचें ।
तारक ब्रह्म सनातन । जयजय ० ॥ ११ ॥
स्मरतां प्र्ल्हादानीं । धांवे स्वामि निदानीं ।
हिरण्यकश्यपुमर्दन । जयजय० ॥ १४ ॥
बळहत जाले पांडव । करिती दुर्जन तांडव ।
कोणि करीना भाषण । जयजय० ॥ २२ ॥
आसुडितां वसनातें । कोणी बोलति ना ते ।
तेव्हां करि विभुचिंतन । जयजय० ॥ २५ ॥
ये ये लवकरि नाथा । तारी दीनानाथा ।
हे माधव मुरमर्दन । जयजय० ॥ २८ ॥
ये कृष्णा गोपाळा । ये ये निजजनपाळा ।
यादव कुलमणिभूषण । जयजय० ॥ २९ ॥
नायकसी वचनातें । करुणा नये मनातें ।
पाहसी कौतुक अर्जुनी । जयजय० ॥ ३२ ॥
उदास ह्या दशदिशा । येरे ये जगदीशा ।
राहसि कोठे गुंतुन । जयजय० ॥ ३३ ॥
पांडव व्यसनीं पडले । दुर्जन अतिशय भिडले ।
हरतिल लज्जा विष्णो । जयजय० ॥ ३९ ॥
ये ये कमळाकांता । पावे या आक्रांता ।
आक्रोशें करि रुदन । जयजय० ॥ ४० ॥
करुणारव परिसोनीं । गरुडावरि बैसोनी ।
ये ये लवकरि झडकण । जयजय० ॥ ४२ ॥
ये ये गे कान्हाई । कृष्णे माझे आई ।
पाहति वाट सुलोचन । जयजय० ॥ ४४ ॥
टाकुनि गरुडा मागें । येउनि द्रौपदि मागें ।
दे सतितें आश्वासन । जयजय० ॥ ४७ ॥
सद्गद होउनि चित्ता । पाहे जों अवचीता ।
दृष्टी देखे चिद्धन । जयजय० ॥ ४९ ॥

६. देवनाथांचीं गुरुवरचीं पदेंही फार सुंदर आहेत. एका पदांत त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे:—

श्रीगुरु गोविंदनाथनिरंजन पदरेणू जेव्हां वरिला ।
आत्मा मी हा ब्रह्मसनातन शुद्ध भाव तेव्हां कळला ॥
जिकडे पाहे तिकडे अवघा चराचरीं चिद्धन भरला ।

एकपणीं ऐक्यत्व लाधलें द्विधाभाव सर्वही हरला ॥

गुरुभक्ताला 'गुरुःसाक्षात् परब्रह्म' याची खूण पटलेली असते. 'समर्थ आमुचा गुरू शिरावर सूत्र तया हातीं' अशी त्याची श्रद्धा असते. देवनाथांनीं गुरुस्वरूपाचें व गुरुभक्तीचें फार गोड वर्णन केलें आहे.

(१) श्रीगुरुचरणीं रतलें मानस न दिसे मज दुसरें ।
समरस त्या चित्स्वरुपीं आतां आठव ना विसरे ॥ ध्रु० ॥
नामरूप ना गुणवर्ण ज्या पोट नसे पाठी ।
निघोट जें घनदाट घोटलें व्यापुनियां सृष्टी ॥
ध्येय ध्याता ध्यान धारणा आटोनियां त्रिपुटी ।
पाहतां पाहतां पाहणें विरालें समावलें पोटीं ॥

(२) गुरुरायाचा हस्त धरुनियां परभुवना गेलों ।
देहिंच असतां विदेहस्थितिनें जिताचि मी मेलों ॥ ध्रु० ॥
प्रपंच अजवरि सत्य मानिला रतलों मी तेथें ।
दारासुतधनमंदिरमाडया संपादुनि अर्थ ।
अनुतापाचा उदय पावला तंव अवघें व्यर्थ ।
जाणुनि मग मी शीघ्र निघालों धरिला गुरुपंथ ॥
गुरुकृपावरदान मला फळलें ।
निजगुज माझें मजला तंव कळलें ।
भवभान पूर्विचें तें समुळीं गळलें ।
आनंदामृत प्राशन करुनी अभ्यंतरिं धालों ॥ देहिं० ॥

उपदेशपर पदांत किंवा श्लोकांत धनांधांची व ज्ञानमदांधांची कानउघाडणी मौजेची आहे. धनांधांवर १५ श्लोक आहेत. त्यांतील एकच पहाः—

### श्लोक.

भावें जो हरिनाम सेवि न कदा, विश्वास नाहीं जया ।
नाहीं ज्यास परोपकार करणें, ना सर्वभूतीं दया ।
लक्ष्मी गेहिं असोनि पाळि न कदा मातापित्याबांधवा ।
ब्रह्मा वेडझवा म्हणोनि विभवा देतो अशा गाढवा ॥ १ ॥

### पद

त्यासम मूर्ख जनीं । पाहतां न दिसे या त्रिभुवनीं ॥ ध्रु० ॥
अनुभविं निज नुमगला । शब्दज्ञानें गर्वें फुगला ॥ १ ॥
धरुनि ज्ञानमदातें । करितो वाद प्रतिवादातें ॥ २ ॥
दावीं जगीं प्रशंसा । श्रीगुरुकृपें झाला हिंवसा ॥ ३ ॥
देवनाथ प्रभु नेणें । व्यर्थचि भ्रमला शब्दज्ञानें ॥ ४ ॥

शब्दज्ञान्यावर आणखीही एक पद आहे, पण तें बरेंच मोठें आहे, धनसंपत्ति असल्यास तिचा परोपकारीं वेंच करावा, ज्ञानार्जन करुनि आत्मोद्धार करावा, एरवीं तें धन व तें ज्ञान व्यर्थ होय, असें या पद्यांतून त्यांनीं सांगितलें आहे. गांवांत लोक नाहींत आणि आवार मोठें, शिरीं मंदील व हातीं तलवार, पण अंगांत वीरश्री नाहीं, चिंध्या बांधून पोट वाढविलें, पण पोटांत मूल नाहीं. तसा प्रकार मुखांत ज्ञान पण अंतरीं स्वसुखाचें समाधान नसलेल्या व नुस्त्या 'शब्दांच्या चरळ्या' लावणाऱ्या शब्दपंडितांचा—अहंभावानें कवित्व करणाऱ्या पोकळ कवींचा होय, असें देवनाथांनीं म्हटलें आहे तें यथार्थच आहे. 'जळो मागत्याचें जिणें । धिग धिक हें लाजिरवाणें' या पदांत याचकाच्या लघुत्वाचें वर्णन आहे:—

शेखीं प्रपंच ना परमार्थ । दोहीं पक्षीं बुडाला स्वार्थ ।
वदला वाणी देवनाथ । याहुनि बरवें हें मरणें ॥ ५ ॥

देवनाथांचीं बरींच हिंदुस्थानी पदें प्रसिद्ध आहेत व कांहीं कानडी पदेंही आहेत असें म्हणतात. ते सारा हिंदुस्थान फिरले होते. गुजराथ, कर्नाटक, महाराष्ट्र व उत्तर हिंदुस्थान त्यांनीं पाहिलें होतें. कथाकीर्तनें त्यांनीं हजारों केलीं होतीं व साधुसंतांचे अनेक समुदाय पाहिले होते. 'भावें भजतां हरि दास्य करी दासांचें' व 'पतितपावना रे शरण मी पातलों' ह्या दोन 'संतमालिका'वजा पदांत त्यांनीं प्राचीन व अर्वाचीन अनेक संतकवींचे उल्लेख केले आहेत. हीं पदें बारकाईनें पाहतां स्वराज्याची अखेर होईपर्यंतच्या बहुतेक कवींचा उच्चार त्यांनीं केलेला आढळतो.

नाम्याघरीं धान्याची रचवी गोणी ।
जनीसवें रानांत वेंची शेणी ।
दळी कांडी तिजसवें मोक्षदानी ॥ भावें० ॥
चोखामेळासांगातें गुरें वोढी ।
बोधल्याच्या पिकाची केली वाढी ।
सांवत्याच्या वाफ्याला पाणी वाढी ॥ भावें० ॥
एकनाथागेहीं हरी वाहे पाणी ।
कबीराच्या मागावरी शेले विणी ।
नरहरीसांगातें घडितसे लेणीं ।
सखूसाठीं अघटित केली करणी ॥ भावें० ॥

ह्या पहिल्या पदांत नरसी मेहता, मिराबाई यांचेही उल्लेख असून 'दामाजीच्या रसदेस्तव महार झाला' याप्रमाणें दामाजीचा उल्लेख आहे. दुसरें पद मोठें आहे, त्यांत अशा संतमालिकांतून आढळणारीं बहुतेक नांवें आलीं

असून बहिणाबाई, दासोपंत, श्रीधरस्वामी, महिपति, विठ्ठल कवि, विश्वनाथ, कृष्णराजगत्र, अमृतराय इ० नांवेंहीं आलीं आहेत. देवदासाची संतमालिका, मोरोपंताची सन्मणिमाला व देवनाथांची ही संतप्रशस्ती यांत वहुतेक संत-कवींचे उल्लेख आले आहेत. यांतील कित्येक संतांची अजूनही कांहीं एक माहिती लागत नाहीं. देवनाथ पेशवाईच्या समाप्तीनंतरही तीन वर्षे हयात होते, तरी प्रकृत राजकारणाचा थोडाही उल्लेख त्यांच्या कवितेंत आढळत नाहीं; नाहीं म्हणायला एका हिंदुस्थानीं पदांत त्यांनीं नानाफडणविसाच्या कारकीर्दीचे दोष दाखविले आहेत, त्यांचा इतिहासशास्त्रज्ञांनीं विचार केला पाहिजे. ' सोबी अक्कलवंत बडा है । नसीब सिकंदर है उसका ' हें त्या पदाचें पालुपद आहे. देवनाथांचे नानावरील आक्षेपः——

जो मैं करूंगा सोहि होयगा ऐसी मनमे मगरूरी भई ।
मालखजीना आपने हात खावंदके घर कच्छु न रही ।
सवाई माधवराव मुवा जद अक्कल चोदी भूल गई ।
बाजीरावकू देता गादी सोबी जानत हतासही ॥
छोटे छोटे अदमी बढाये उसीपासमे आन खडे ।
अपने आगे कछु गत नही ज्यो होय सो आप बडे ।
ना खावंदका घरही राखा ना फौजो साबूत खडे ।
मनमें मगरूरी करके गाफल ना बैरीसो जरा अडे ॥
१ गा रे श्रीरंगाला उमगा रे । नातरि शिमगा रे ॥ ध्रु० ॥
२ नंदाच्या नंदना ! नवनीरदतनु कोमलगात्रा दानव कुलकंदना ।
३ प्रियकरा भुवनसुंदरा रुक्मिणीवरा अजि गोपाळा ।
किति तरी पाहसी अंत येइ कनुवाळा ॥ ध्रु० ॥
४ येऊं दे दया, दया देवदेवा ! शरण मी तुजला वासुदेवा ।
५ माझी तुला काळजी । सांवळ्या गोपाळजी ॥
६ माझी विनवणी विनवणी हरिला सांगा ।
कधीं भेटाल पांडुरंगा ॥ ध्रु० ॥
७ पार्था ते तरले ते तरले । जे नामीं अनुसरले ॥ ध्रु० ॥
८ अमोल काया जाइल वायां । जशी कांच की फुटे फटकन् ॥ ध्रु० ॥
९. ही तनू, बहुत सुखघनु, लाधली मनु, थोर दैवें ।
हित अशांत उमजावें ॥ ध्रु० ॥
१० जय जय हरी नारायण ॥ ध्रु० ॥

हीं दहा पदें तरी प्रत्येकानें अवश्य पहावींत म्हणजे देवनाथांच्या वाणीचा प्रसाद त्यास प्राप्त होईल.

## पांगारकरांचा नवा ग्रंथ.

# ज्ञानेश्वरांची प्रभावळ.

श्रीज्ञानेश्वरमहाराज व त्यांचीं भावंडें म्हणजे वडील बंधु व गुरु श्रीनिवृत्तिनाथ व धाकटे बंधु सोपानदेव व बहीण मुक्ताबाई, त्याचप्रमाणें नामदेवराय व त्यांची घरची मंडळी व दासी जनाबाई, विठोबा खेचर, परिसाभागवत, बहिरापिसा, गोरा कुंभार, सावतामाळी, नरहरि सोनार, जगमित्र नागा, जोगा परमानंद, चोखामेळा, त्याची बायको व मेहुणा बंका, भागु महारीण इ० अठरापगड जातींचे समकालीन, समप्रेमी व समशील भगवद्भक्त एकाच वेळीं झाले व त्यांनीं श्रीविठ्ठलपायीं भागवतधर्माचा महामंत्र घेऊन तो धर्म महाराष्ट्रभर पसरिला ही गोष्ट जगविख्यात आहे. प्रस्तुत ग्रंथांत ह्या सर्वांच्या उपदेशाची चांगली ओळख करून दिली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज हे या संतांच्या प्रभावळींतले अग्रगण्य. तेव्हां त्यांच्या २५०० विषयवारीनें दिलेल्या सटीप निवडक ओंव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग व पदें ह्या ग्रंथांत घेतलीं आहेत. 'ज्ञानेश्वरीची भूमिका' या पहिल्या प्रकरणांत सद्गुरुस्तवन, कृष्णार्जुनांची अन्योन्यप्रीति, गीताशास्त्रविषयक विषय, मराठी भाषेचे व ग्रंथाचे गौरव इ० मथळ्याखालीं त्या त्या विषयावरील ज्ञानोबारायांच्या निवडक ओंव्या एकत्रित केल्या आहेत. पुढें कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग यावरील ज्ञानेश्वरांच्या सर्व शिकवणी क्रमानें व विषयवारीनें दिल्या आहेत. कर्मयोगाचे स्वधर्माचरण व सामान्य नीति असे दोन भाग केले असून त्यांच्या ३८ प्रकरणांत संपूर्ण कर्मयोग आला आहे. ज्ञानयोगाचीं २९ व भक्तियोगाचीं ३२ प्रकरणें आहेत. ह्या १० प्रकरणांत ज्ञानेश्वरींतील सर्व उत्कृष्ट ओंव्या क्रमवार आल्या आहेत. पुढें ज्ञानेश्वरी सुभाषितें २०० दिलीं आहेत, व स्फुट विषयसंग्रहांत २८ प्रकरणें आहेत. अमृतानुभव ग्रंथांतील पांच निवडक उतारे दिले असून पुढें वरील सर्व संतांचे मिळून ४०० अभंग पदें वगैरे दिलीं आहेत. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, नामदेव, जनाबाई, विसोबा खेचर इ० संतांच्या वेंचक उक्ति यांत सांपडतील. ग्रंथाला भरपूर टीपा दिल्या असून कर्म, ज्ञान व भक्ति यांवरील प्रकरणांचा गोषवारा ५० पृष्ठांत दिला आहे. प्रस्तावनेंत ज्ञानेश्वरमहाराज व त्यांची प्रभावळ, ज्ञानेश्वरीचा संतवचनांशीं पूर्ण मेळ आहे, प्रस्तुत ग्रंथांतील विषयांची संगति, इ० विषयांवर विवेचन केलें आहे. अनुक्रमणिका दिली आहे.

ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेतील संतवाङ्मयाचें मंथन करून हें नवनीतच काढलें आहे.

पृ. सं. ४८० असून किंमत अवघी दोन रुपये. ट. ख. वेगळा.

**मिळण्याचीं ठिकाणः**—१ रा. रा. **व्यवस्थापक 'मुमुक्षु'** पुणें शहर.
२

# कर्मयोग.

( मागील अंकावरून समाप्त. )

नहि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ।
यस्तु कर्मफलत्यागी सत्यागीत्यभिधीयते ॥ गी. १८।११

१ देहधारी म्हणून जो आहे, त्यानें कर्माचा निखालस त्याग करीन म्हणणें शक्य नाहीं. जो कर्मफलाचा मात्र त्याग करतो त्यालाच खरा त्यागी असें म्हणतात.

आणि हा गा सव्यसाची । मूर्ती लाहोनी देहाची ।
खंती करिती कर्माची । ते गावढें गा ॥ ज्ञा. १८।२१८

आणि अर्जुना जे देह प्राप्त झाला असतां कर्म करण्याचा कंटाळा करितात, ते मूर्ख होत.

हिंगू त्रासला घाणी । तरी कैंचे सुगंधत्व आणी ।
द्रवपण सांडोनि पाणी । कै राहे तें । ज्ञा. १८।२२१

हिंगाला जरी आपल्या घाणीचा वीट आला तरी त्याला चांगला वास कोठून येणार ? किंवा पातळपणा टाकून पाणी कोठें राहणार ?

तैसा शरीराचेनि आभासे । नांदतू जंव असे ।
तंव कर्मत्यागाचें पिसें । काइसें तरी । ज्ञा. १८।२२२

त्याप्रमाणें शरीराच्या अवस्थेमध्यें जोंपर्यंत मनुष्य नांदत आहे, तोंपर्यंत कर्मत्यागाचें वेड कसें उपयोगीं पडेल ?

या शरीराचेनि मिसकें । कर्मही लागलें असिकें ।
जितां मेलिया न ठाके । इया रीतीं । ज्ञा. १८।२२५

या शरीराच्या निमित्तानें कर्म हें पाठीस लागलें आहेच आणि जिवंतपणींच मेल्यावरही याप्रमाणें कर्म करण्याचें रहात नाहीं.

यया कर्मातें सांडिती परी । एकीचि ते अवधारी ।
जे करितां न जाइजे हारी । फळाशेचियां । ज्ञा. १८।२२७

या कर्माचा त्याग करण्याचा एकच प्रकार आहे. तो हा कीं, कर्म करीत असतां फलेच्छेच्या आधीन होऊं नये.

फळ ईश्वरी अर्पे । तत्प्रसादें बोधू उद्दीपे ।
तेथ रज्जुज्ञानें लोपे । व्याळशंका । ज्ञा. १८।२२८

कर्माचें फल ईश्वरास अर्पण केलें म्हणजे त्याच्या प्रसादानें ज्ञान उत्पन्न होतें आणि मग दोरीचें यथार्थ ज्ञान प्राप्त झाल्यावर जशी सर्पाची शंका दूर होते,

तेणें आत्मबोधें तैसें । अविद्येसीं कर्म नाशे ।
पार्था त्यजिजे जें ऐसें । तें त्यजिलें होय । ज्ञा. १८।२२९

तसा या आत्मबोधानें अज्ञानासह कर्मांचा नाश होतो. पार्था! जेव्हां कर्माचा अशा रीतीनें त्याग करावा, तेव्हांच तो खरा त्याग होय.

परी हे असो पुढती । तोचि त्यागी त्रिजगती ।
तेणें फलत्यागें निष्कृती । नेलें कर्म । ज्ञा. १८।२३२

तिन्ही लोकांत त्यागी त्यालाच म्हणतात कीं, ज्यानें कर्म करून फलत्यागाचे योगें त्याला तें न केल्याची योग्यता आणली.

२ वरील विवेचन पाहतां आत्मबुद्धियुक्त होऊन स्वाभाविक निष्पन्न होणारें जें कर्म तेंच उच्च दर्जाचें निष्काम कर्म होय. ज्या कर्मांत देहबुद्धि असते तें कर्म समाधानकारक होऊं शकत नाहीं. म्हणून प्रत्येक निमिषानिमिषाचे कर्मांत परमात्मभाव अंगांत मुरूं द्यावा. देहरूपी अधिष्ठानावर बसून मी कर्ता, मी भोक्ता आहे अशा वल्गना करून केव्हांही कल्याण होणें शक्य नाहीं. ज्या परमात्मसत्तेच्या योगानें देह व्यक्त झाला आहे, ज्याच्याच सत्तेनें त्रय अवस्थेंत कायिक, वाचिक, मानसिक कर्में होत असतात, ज्याच्या सत्तेवर अनंत ब्रह्मांडें स्थिर आहेत, केवळ ज्या आदिनाथाच्या सत्तेनें पंचमहाभूतें आपापल्या नियत कार्यांत तल्लीन आहेत, त्या परमात्मसत्तेला अंतःकरणांतून ब्रह्मांडापलीकडे झुगारून देऊन देहात्मबुद्धीच्या भासमय अधिष्ठानावर आपण कर्में करीत असतों म्हणून तें कर्म स्वतःच्या व समाजाच्याही समाधानास कारणीभूत होऊं शकत नाहीं. एवढ्यासाठीं मी कर्ता, मी बलवान हा अहंभाव धारण करून देहरूपीं तुरुंगांत बंदिवान होऊं नये. कर्ता करविता हरी म्हणजे परमात्मा आहे, त्या श्रीहरीच्या सत्तेनें सर्व कांहीं होतें अशी भावना दृढ असावी.

करणें कां नकरणें । हें आघवें तोचि जाणें
विश्व चळतसें जेणें । परमात्मेनि । ज्ञा० १२।११८.

जो परमात्मा या विश्वाचा चालक आहे, तो कर्माचा कर्ता कोण व कर्म न करणारा कोण हें सर्व जाणतो आहे. देहबुद्धीनें होणारें कर्म बंधांत पाडतें, व तेंच कर्म परमात्मबुद्धीनें झाल्यास कल्याणप्रद होतें.

बंधनं प्राणिनां राजन्नहंकारस्तु बंधकः
अहंकर्ता मयाचेदं कृतं कार्यं बलीयसा । देवी भागवत
स्कंद ५ अ. १

मी कर्ता म्हणसी । तेणें तूं दुःखी होसी ।
राम कर्ता म्हणतां पावसी । यशकीर्ती प्रताप ॥ ११
—दासबोध

सर्वत्र ईश्वर आहे. देहाच्याही अंतर्बाह्य परमात्मतत्वच आहे. त्रय अवस्थेंतील सर्व कर्मास त्याचेकडूनच स्फूर्ति मिळते. या अकर्तेपणाचे दृष्टीनें जेव्हां कर्म सुरूं होतें, तेव्हां आपलें व्यक्तित्व कोठच्या कोठें पार नाहींसें होऊन देहभावाच्या ठिकाणीं देहातीतता उत्पन्न होते. अकर्तात्मक बोधावर आरूढ होऊन कर्म ईश्वरार्पण केलें म्हणजे ' अहं कर्ता अहं भोक्ता, ' या अहंकारातीत झाल्यामुळें या कर्मांत पूर्ण समाधान होईल. परंतु यावेळीं फारच जपावयास पाहिजे. यावेळीं समाजाकडून स्तुति झाल्यास स्तुतीनें भुलून जातां कामा नये. स्तुतीस भाळलों कीं देहभाव उत्पन्न होईल, व कर्माचें शुद्ध स्वरूप नाहींसें होऊन तें कर्म बाधक होईल. मी कर्ता भोक्ता नाहीं, अशी निश्चित धारणा असते त्याचे ठिकाणीं परमात्माच व्यवहरत असतो. त्याचीं सर्व कर्मे ईश्वरी स्फूर्तीनेंच होत असतात.

यासाठीं सतत स्वरूपाच्या कल्पनेंत सर्व कर्मांचा अंतर्भाव असावा. देहातीत व्हा, अकर्तात्मबोध अंगीं बाणवून घ्या म्हणजे वाटेल त्या इच्छा सहज परिपूर्ण होतील. आपणच स्वयंपरमेश्वर होऊं. आपलें सत्तत्त्व जाणलें नाहीं तरी होणारें कर्म ईश्वरसत्तेकडूनच होत असतें. करितां खरी स्थिती बाणवून घेऊन कर्म करीत असावें.

३. मन शुद्ध करा. मनावरील अशुभ संस्कार दूर करा. म्हणजे आपलें कर्म दिव्यच आहे. ईश्वराशीं तादात्म्य करून निरहंकार वृत्तीनें कर्मे करा, आत्मस्वरूपाशीं संलग्न रहा. मनास अव्यग्र ठेवण्याची संवय करा म्हणजे सर्व मनोरथ सहज परिपूर्ण होतील, परंतु निर्विषय परमात्म्यावर आपली विषयबुद्धि होते म्हणून तें कर्म अशुद्ध होऊन त्यापासून नानाप्रकारचीं दुःखें व संकटेंच निर्माण होतात. विषय नाचवतील तसें नाचावयाचें, विषयाची कुरघोडी आपणावर करून घ्यावयाची, त्यामुळें अमोल आयुष्याचें मातेरें होत आहे, हें लक्षांत ठेवा. यासाठीं वृत्ती अंतर्मुख करून सर्ववृत्तींचा–कर्मांचा झरा ईश्वराकडे लावा, व त्याचेकडून सर्व कर्मे होऊं द्या. म्हणजे आपलें दिव्यत्व उदयास येईल व सर्व कर्मांत अकर्तात्मबोध प्रगट होईल. असें निरभिमान व निर्हेतुक कर्म झाल्यास मोठमोठाले उद्योग सहज साध्य होतात.

४. वेदांतानें सांगितलेल्या या निष्काम कर्मानें दुर्बलत्व न येतां मोठमोठालीं कर्मे करण्यास वृत्ति तयार होतात व मोठमोठाले उद्योग सहज साध्य होतात.

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वापि स इमांल्लोकान्न हंति न निबध्यते ॥ गी० १८।१७.

ज्याचे ठिकाणीं मी अमुक कर्म करितों असा अभिमान नाहीं व ज्याचें अंतःकरण अलिप्त आहे, त्यानें जरीं सर्व प्राण्यांचा वध केला, तरी तो वध करणारा ठरत नाहीं व तो वधाच्या दोषानें बद्ध होत नाहीं.

" अधिष्ठानादयः सर्वे कर्मणां कर्तारो नाहमहं तु व्यापाराणां साक्षिभूतोऽ॰प्राणो ह्यमनाः शुभ्रो ह्यक्षरात् परतः परः। केवलोऽविक्रिय इत्येवं पश्यतीत्येतत्—बुद्धिः अंतःकरणं यस्यात्मन उपाधिभूता न लिप्यते नानुशायिनी भवतीदमहं पापमकार्षं तेनाहं नरकं गमिष्यामीत्येवं बुद्धिर्यस्य न लिप्यतेऽसौ सुमतिः स पश्यति। हत्वापि स इमां लोकान् सर्वान्प्राणिन इत्यर्थः"—

अविद्यात्मक देहबुद्धीनें जीं होणारीं कर्में त्या कर्मांचा मी कर्ता नाहीं, मी तर त्यांच्या व्यापारांना साक्षीभूत आहे; मला प्राणद क्रिया नाहीं; मनाशीं माझा संबंध नाहीं, मी शुद्ध आहे, श्रेष्ठ जें अक्षर त्याहूनही मी श्रेष्ठ आहे. असें जो समजतो व ज्याचे आत्मोपाधिरूप अंतःकरण ( विषयांत ) लिप्त होत नाहीं म्हणजे माझ्या हातून हें पातक घडलें आहे त्यामुळें मला नरक प्राप्त होईल, अशा रीतीनें पश्चात्तापयुक्त होत नाहीं ( तो सुमति ) व त्यालाच जसें असेल तसें दिसतें. ह्यामुळें सर्व प्राण्यांचा वध करूनही तो वध करीत नाहीं व त्या कर्मांचा परिणाम म्हणून अधर्मफलानेंही बद्ध होत नाहीं.

ना ना चेवो आलियापाठीं। तैं स्वप्न न दिसे दिठीं।
तैसी अहंममता गा किरीटी। नुरेचि तया ॥ ज्ञाने० ॥ १८।४०८

जागृत झाल्यावर स्वप्न जसें दृष्टीस पडत नाहीं, तसा अर्जुना, मी व माझें हा अभिमान रहात नाहीं.

मग सूर्य आंधारालागीं। रिघों कां भलते सुरंगीं।
परी तो तयाच्या भागीं। नाहींचि जैसा ॥ ज्ञा० १८।४०९

मग अंधार पहाण्याकरितां जरी सूर्य हा वाटेल त्या भुयारांत शिरला तरी जसा त्यास अंधःकार भेटत नाहीं,

तैसा आत्मत्वें वेष्टिला होये। तो जयातया दृश्यातें पाहे।
तें दृश्य द्रष्टेपणेंसी होत जाये। तयाचेंचि रूप ॥ ज्ञा० १८।४१०

तसा मी आत्मा आहे, अशी ज्याचे अंतःकरणांत पूर्ण समजूत बाणली आहे, तो ज्या वस्तूकडे पाहील ती वस्तु व त्याची दृष्टि हीं त्याला आत्मरूपीच दिसतील. एकाद्या मोठ्या जलाशयांतून मोठ्या शहरांत पाणी नेण्यांत येतें, व हजारों घरीं नळांच्या द्वारें तें पाणी पुरविण्यांत येतें. लक्षांत ठेवा कीं, मूळ खजिन्यांतील पाणी स्वच्छ असेल तर, हजारों घरीं नळांच्या द्वारें येणारें पाणी स्वच्छच असूं शकेल व मूळ खजिन्यांत पाणी जर गढूळ असेल तर हजारों घरीं नळांतून येणारें पाणी गढूळच असणार हें निर्विवाद होय. त्याप्रमाणें आपलें अंतःकरण विषयवासनांनी भरलेलें नसून ईश्वरी प्रेमानें ओथंबलेलें असेल तर त्या अंतःकरणापासून बाहेर दशेंद्रियांच्या द्वारें व्यक्त होणारीं कर्में शुद्ध परमात्ममयच होतील. उलट तें अंतःकरण पातकी, विषयी, अशुद्ध

च गढूळ संस्कारांनीं भरलेलें असेल तर दशेंद्रियांच्या द्वारा प्रतीत होणारीं कर्में, विषयी व गढूळच निपजतील. म्हणून ज्याप्रमाणें द्रष्टा असेल त्याप्रमाणें त्याला दृश्य आत्मवतच दिसतें, यासाठीं परमात्मभावनेनें प्रेरित होऊन कर्में झाल्यास दृश्यविश्वही परमात्ममय आहे अशी त्या कर्मांत निश्चित बुद्धि होते.

जैसा वन्ही जया लागे । ते वन्हिचि झालिया आंगें ।
दाह्यदाहकविभागें । सांडिजे तें ॥ ज्ञा० ॥ १८।४११

अग्नि ज्या पदार्थास लागतो, तो पदार्थ जसा अग्निरूपच होतो व मग जसा दाह्य व दाहक हा भेद राहात नाहीं,

तैसा कर्माकारें दुजेया । तो कर्तेपणाचा आत्मया ।
आळूं आला तो गेलिया । कांहीं बाही जे उरे ॥ ज्ञा. १८।४१२

तसें कर्माचे ठिकाणीं द्वैत मानून तें कर्म करण्याचा आत्म्यावर आळ आलेला नाहींसा झाल्यावर जे कांहीं उरतें:—

तिये आत्मस्थितीचा जो रावो । मग तो देही इयें जाणेल ठावो ।
काय प्रलयांबूचा उन्नाहो । ओघ मानी ॥ ज्ञा. १८ । ४१३

त्या शरीरालाच अशा रीतीनें जो आत्मस्वरूपांत निमग्न झाला तो आत्मा असें कसें मानील ?

तैसी ते पूर्ण अहंता । काई देहपणें पंडूसुता ।
आवरे काई सविता । बिंबे धरिला ॥ ज्ञा. १८ । ४४१

त्याप्रमाणें अर्जुना ज्याचे ठिकाणीं अहंब्रह्म अशी पूर्ण स्थिती झाली आहे, त्याला मीं देह आहें असें कोठून वाटणार ? हें पहा सूर्याचे पडलेलें प्रतिबिंब हातांत धरलें असतां सूर्य धरला जातो काय ? ताक घुसळून लोणी काढल्यावर तें पुनः ताकांत घातलें तरी ते ज्याप्रमाणें त्यांत मिसळत नाहीं, अथवा लांकडांतून अग्नी तयार करून निराळा काढल्यावर तो लांकडाच्या पेटींत जसा कोंडून राहात नाहीं.

तैसे वेद्य वेदकपणेंसी । पाडिलें कां जयाचे ग्रासीं ।
तया देह मी ऐसी । अहंता कैंची । ज्ञा० १८।४१८

त्याप्रमाणें जाणण्याची वस्तू व जाणणारा हीं ज्याचे ठिकाणीं ऐक्य पावलीं आहेत, त्याला मी देह आहे, असा गर्व कोठून असणार ? ज्याप्रमाणें आकाश सर्वत्रच भरलेलें आहे,

तैसें जें तेणें करावें । तो तेंचि आहे स्वभावें ।
मग कोणी कर्मी वेष्टावें । कर्तेपणें । ज्ञा० अ० १८।४२०

तसें तो जें जें कर्म करतो तें तें सर्व आत्मस्वरूपच आहे, मग कोणतें कर्मानें तो आपलेकडे कर्तेपणा घेईल ?

ऐसेनि अहंकृती भावो । जयाचा बोधीं जाहला वावो ।
तरी देहा जंव निर्वाहो । तंव आथी कर्मे । ज्ञा० १८।४२२

अशा प्रकारें ज्याला आत्मज्ञानाच्या योगें कर्माच्या कर्तेपणाचा अभिमान व्यर्थ वाटत आहे, त्याचा देह आहे तोंपर्यंत त्याच्याकडून कर्मे होतातच.

४ जसें कापूर जरी संपला तरी करंड्यांत वास शिल्लक असतो, किंवा पाण्यानें जमीन ओली होऊन पाणी कमी झालें, तरी ओल शिल्लकच असते, अगर सूर्य मावळल्यावर सूर्याच्या ज्योतीचें तेज ( संधिप्रकाश ) जसें दिसतें.

नाना चाकीं भांडें झालें । तें कुलालें परते नेलें ।
परी भ्रमेचि ते मागिलें । भोवंडिलेपणें । ज्ञा० १८।४२७

अथवा कुंभाराच्या चाकावर तयार झालेलें भांडें कुंभारानें काढून घेतल्यावरही पूर्वी दिलेल्या गतीनें चाक फिरतच असतें.

तैसा देहाभिमानु गेलिया । देह जेणें स्वभावें धनंजया ॥
जालें तें आपैसया । चेष्टवीच तें ॥ ज्ञाने० अ. १८।४२८

तसा हे धनंजया, देहाचा अभिमान नाहींसा झाल्यावरही, ज्या गुणांनीं देह उत्पन्न झाला आहे, त्या गुणांच्या चेष्टा त्यांत दृष्टीस पडतील.

तया कर्मामाजी मग । संहरो अवघें जग ।
अथवा नवें चांग । अनुकरो ॥ ज्ञाने० १८।४३२

त्या कर्मांत मग सर्व जगाचा संहार होवो, अथवा नवें जग उत्पन्न होवो.

तैसा स्वस्वरूपें उटिला । जो दृश्येसीं द्रष्टा आटला ।
तो नेणें काय राहाटला । इंद्रियग्रामु । ज्ञा० १८।४४१

आत्मस्वरूपप्राप्तीच्या योगें जो द्रष्टा दृश्यासह नष्ट झाला ( पाहणारा व पहावयाची वस्तु हा भाव नाहींसा झाला ) तो, इंद्रियसमुदायानें काय कर्म केलें हें जाणत नाहीं.

सुवर्णाचिया चंडिका । सुवर्णशूळेंचि देखा ।
सुवर्णाचिया महिखा । नाशु केला । ज्ञा० १८।४४३

सोन्याच्या देवीनें, सोन्याच्या त्रिशूलानें, सोन्याच्याच महिषासुराचा नाश केला.

तो देव लसिया कडा । व्यवहार गमला फुडा ।
वांचूनि महिष शूळचामुंडा । सुवर्णचि तें ॥ ज्ञा० १८।४४५

हा सर्व प्रकार भक्ताच्या दृष्टीनें खरा असा भासतो; परंतु सोन्याच्या दृष्टीनें महिषासुर, त्रिशूळ व देवी हें सर्व सोनेंच आहे.

मुक्ताचे देह तैसें । हाले ते संस्कार वशें ।
तें न देखोनि लोक पिसे । कर्ता म्हणती ॥ ज्ञा० १८।४४७

त्याप्रमाणें जो ज्ञानी आहे, त्याच्या देहाचा व्यवहार ( देहाकडोन होणारीं सर्व कर्में ) पूर्वसंस्कारानुरूप होत असतो; परंतु हें न समजतां वेडे लोक त्यालाच कर्मकर्ता असें म्हणतात.

आणि तयां कारणेयां आंतु । घडो त्रैलोक्याघातु ।
परी तेणें केला हे मातु । बोलों नये ॥ ज्ञा. १८।४४८

आणि तो कर्म करीत असतां जरी त्यायोगें त्रैलोक्याचा घात झाला, तरी तो त्यानें केला असें म्हणूं नये.

अगा अंधारुचि देखावा तेजें । मग तो फेडिजे हें बोलिजे ।
तैसें ज्ञानिया नाहीं दुजें । जें तो मारील ॥ ज्ञा. १८।४४९.

अरे, सूर्यानें अंधार पहावा आणि मग त्याला दूर करा असें म्हणावें, त्याप्रमाणें ज्ञान्याला अशी कांहीं दुसरी वस्तूच नाहीं, कीं जिचा तो नाश करील ( त्याचे ठिकाणचा द्वैतभाव जाऊन सर्वच जग त्याला स्वस्वरूप झालेलें असतें.)

म्हणोनि तयाची बुद्धी । नेणें पापपुण्याची गंधी ।
गंगा मीनलिया नदी । विटाळु जैसा ॥ ज्ञा. १८।४५०

म्हणून त्याच्या बुद्धीला पाप व पुण्य यांचा गंधही नसतो. जशी एखादी नदी गंगेस मिळाली असतां तिचा अपवित्रपणा नाहींसा होतो.

म्हणोनि कार्यकर्ता क्रिया । हें स्वरूपचि जाहलें जया ।
नाहीं शरीरादिकीं तया । कर्मबंधु ॥ ज्ञा. १८।४५२

म्हणून जो कार्य, कर्ता व क्रिया ही त्रिपुटी आपणच झाला आहे, तो शरीरादिकांपासून होणाऱ्या कर्मापासून बद्ध होत नाहीं.

म्हणोनि आत्मयाचें केवळ । जो रूपचि जाहला निखिळ ।
तया नाहीं बंदिशाळ । कर्माची हे ॥ ज्ञा. १८।४५९.

म्हणून जो केवळ शुद्ध आत्मस्वरूपी झाला आहे, त्याला ही कर्माची बंदिशाळा नाहीं.

वरील विवेचनावरून पाहातां वेदांतानें दुबळेपणा ऐदीपणा न येतां जगदोद्धारासारखीं अचाट कर्मेंही सहज साध्य होतात. वेदांतानें सर्व कर्मांत अकर्तात्मबोध उदयास येऊन तीं कर्में स्वतःचें, समाजाचें व राष्ट्राचें अभ्युदयास कारणीभूत होतात.

५ श्रीराम, जनक, अर्जुन, श्रीशिवाजीमहाराज हे सर्वश्रेष्ठ कर्मयोगीच होते. पण यांना त्यागाचे रहस्य–सर्व कर्मांत अकर्तात्मबोध–श्रीगुरुवसिष्ठ, याज्ञवल्क्य, श्रीकृष्ण व श्रीसमर्थ रामदास यांनीं शिकविल्यामुळें व त्यांस पूर्ण बाणल्यामुळें त्यांचे हातून जगदोद्धारासारखीं थोर कर्में होऊन त्यांनीं स्वधर्मसंस्थापना केली व जगांत धर्मनीतिचें साम्राज्य सुरू केलें. अशा प्रकारचें निर्हेतुक व निरभिमान कर्म असावें.

जगाच्या अंतर्बाह्य निर्विषय परमात्मा असतां ही बुद्धि सोडून मी देह, जीव, च जगत् सत्य आहोंत अशी विषयी बुद्धि अर्जुनानें धारण करतांच अर्जुनाला मोहरूपी सर्पदंश झाला. जगत् जिंकण्यासारखा ज्याचा पराक्रम तो अर्जुन अगदीं दुबळा झाला. परंतु सद्गुरू पंचाक्षरी भगवान गोपाळकृष्ण यांनीं त्याचें विष उतरलें व त्यास खरा निष्काम कर्मयोग सांगितला. अर्जुनाची देहबुद्धि–जीवबुद्धि–पार मावळून गेली. अंतर्बाह्य आत्मरूपच झाला. इतकी स्थिति झाल्यावर म्हणजे या कर्माचा कर्ता, भोक्ता मी आहे, या मीपणाची विस्मृति होऊन सर्वत्र परमात्माच आहे अशी भावना सिद्ध होतांच कर्तव्यकर्म करण्यास तो तयार झाला. अर्जुनानें अशी कबुलीच दिली आहे कीं, '

गुंतलों होतो अर्जुनगुणें । तों मुक्त झालों तुझेंपणें ॥
आतां पुसणें सांगणें । दोन्ही नाहीं । ज्ञा. ॥ १८।१५६३

मी अर्जुन आहे, अशा उपाधींत गुंतलों होतों. आतां उपाधींतून तुमचेपणामुळें (परमात्मपणामुळें) मुक्त झालों. आतां माझेजवळ मोह आहे किंवा नाहीं हें सांगणें किंवा पुसणें या गोष्टी आपोआप नाहींशा झाल्या आहेत. त्रैलोक्याचें राज्य प्राप्त झालें तरी सुद्धां जो युद्ध करण्यास तयार नव्हता, तोच अर्जुन आतां सर्व कर्मांत अकर्तात्मबोध बाणल्यावर युद्ध करण्यास तयार झाला. इतकेंच नव्हे, तर त्यानें पितामह, गुरु, आप्त, स्वजन, सुहृद, वगैरेंचा वध केला; परंतु या सर्व कर्मांत अकर्तात्मबोध उत्तम बाणल्यामुळें अर्जुनाला पातकाचा स्पर्श झाला नाहीं

आतां करणें का न करणें । हें जेणें उठी दुजेपणें ।
तें तूंवांचुनी आन नेणें । सर्वत्र गा ॥ ज्ञा० १८।१५६५

अर्जुन म्हणतो–देवा! आपले स्वरूपावर भासमान होणाऱ्या जगाकडे पाहून हें युद्ध करावें कीं न करावें हा मला मोठाच भ्रम झाला होता, पण तो भ्रम आतां पूर्ण नाहींसा झाला आहे. जगतांसंबंधीं मिथ्या मोहमय कल्पनेनें माझ्या अंतःकरणांत आसन स्थिर केलें होतें, युद्ध करावें कीं न करावें असें जें द्वैत उत्पन्न झालें होतें तें द्वैतच तूं परमात्मा आहेस (द्वैताच्या अंतर्बाह्य परमात्मा आहे अशी माझी खात्री झाली आहे.)

ये विषयीं माझ्या ठायीं । संदेहाचे नुरेचि कांहीं ।
त्रिशुद्धि कर्म जेथ नाहीं । ते मी जाहलों ॥

आतां द्वैताविषयीं माझ्या मनांत संशय बिलकूल राहिला नाहीं, जेथें कर्म उरत नाहीं ती ब्रह्मस्थिति मी पावलों आहे. यापुढें झालेलें कर्म नैष्कर्म्यच होय.

तरी आतां तुझी आज्ञा । सकळ देवाधिदेव राज्ञा ।
करीन देई अनुज्ञा । भलतीये विषयीं ॥ ज्ञा० १८।१५७५ ॥

म्हणून हे देवाधिदेवा ! आपण जी मला आज्ञा कराल ती मी पाळीन; फार काय, वाटेल त्याविषयीं मला आज्ञा करा.

६. याप्रमाणें अर्जुनाचें अंतःकरण आत्मबोधानें पूर्ण भरून जाऊन नंतरच त्याचेकडून निरभिमानपूर्वक सुंदर व उच्च दर्जाचा निष्काम कर्मयोग घडून आला.

७. श्री शिवाजीमहाराजांना निष्काम कर्मयोगाचा उच्च दर्जाचा बोध श्रीतुकोबारायांनीं करतांच त्यांनीं धर्मसंस्थापनेच्या हिंदुपदपादशाहीच्या निष्काम कर्मयोगास आरंभ केला व श्रीसमर्थ रामदास यांजकडूनही वारंवार त्यांना आत्मबोधाचा पुरवठा होत असे. म्हणूनच शिवरायांना महाराष्ट्र आनंदवनभुवन करतां आलें.

(१) याप्रमाणें निर्हेतुक आणि निरहंकार बुद्धीनें कर्म होत जाणें ही आत्म साक्षात्काराची पायरी आहे.

(२) चित्त निरासक्त करून स्वरूपासंबंधाच्या भावना दृढ करीत जाणें हेंच खरें आणि उदात्त कर्म होय.

८. निष्काम कर्म करा म्हणजे फलप्राप्ती आपोआप होईल. एक मुलगी प्रथम गरोदर असतांना एके दिवशीं तिनें आपल्या सासूस सांगितलें कीं, हल्लीं या गरोदरपणांत मला झोंप फार येत असते, तरी माझ्या प्रसूतीसमयास मात्र आपण मला जागें करा, नाहीं तर माझ्या झोंपेंत मी प्रसूत होऊन मुलाची तजवीज करतां येणार नाहीं. हें त्या मुलीचें भाषण ऐकून सासूबाईस हसूं आलें व त्या म्हणाल्या, मुली ! आम्ही जरी तुला जागें केलें नाहीं तरी तूंच आम्हांस–इतकेंच नव्हे,–सर्व गांवांसही जागें करशील. पुढें दिवसेंदिवस जों जों गर्भ वाढूं लागला, तों तों सूनबाईच्या आंगावर गर्भतेज दिसूं लागलें, परंतु सूनबाईच्या अल्लडपणामुळें तिला तें तेज समजत नव्हतें; नंतर यथाक्रमानें प्रसूतीवेदना होऊन सुखरूप प्रसूति झाली.

गोष्टींतील तात्पर्य एवढेंच घ्यावयाचें कीं, निर्हेतुक व निष्काम कर्म करा, त्याचें फल धर्मनीतीची वाढ व सर्वतोपरी कल्याण हें आपोआप होत जाईल:

तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्त काळघडी आल्याबीण ।<br>
देखे जेतुलालें कर्म निपजे । तेंतुलें आदिपुरुषीं समर्पिजे ।<br>
तरी परिपूर्ण सहजें । जाहले जाणें ॥

त्रयावस्थेंत जें जें कर्म होईल तें तें निरभिमानपूर्वक परमात्मचरणीं समर्पित झालें; म्हणजेच तें कर्म सहज पूर्णत्वास येतें. नातींगोतीं, आप्तसुहृद, स्नेहीसोबती, सर्वस्वावर परमात्म्याची स्थापना होऊं द्या, व सर्व कर्मांत अखंड स्वरूपानुसंधान ठेवा. एखादें मोठें कार्य करणें होणें असेल तर फक्त अंमलदाराची ओळख

होऊन उपयोग होणार नाहीं. खुद्द राजेसाहेबांचा स्नेह झाला तर कशासच उणें पडणार नाहीं. म्हणून सर्व वासनेचा त्याग करून आत्म्याशीं संलग्न व्हा. आत्मराजावर प्रेम करा म्हणजे सर्व कर्में परमात्ममय व दिव्य होऊन जातील. वासनारूप कालियाचा त्याग व संहार करा. कालियाचा संहार गोपाळकृष्णावांचून होणें शक्य नाहीं. यासाठीं सर्व कर्मांचा ओघ कृष्णरूपांत जाऊं द्या. म्हणजे वासना व अभिमानरूपी सर्पांचा सहजच फडशा उडेल.

प्रणयी युवक प्रियतमेवर जसें प्रेम करतो, तसें प्रेम आत्म्यावर करा.

गुरुमूर्तीं सदा ध्यानं । यथा स्वैरिणी योषिता ॥ गुरुगीता ॥

नातरी कांताच्या मानसीं । रिगोनि स्वैरिणी जैसी ।
राहटे जारेसी । जावयालागी ॥ ज्ञा० १३।८०९

आत्म्याचें ध्यान जारिणीप्रमाणें असावें. ज्याप्रमाणें जारिणी स्त्री जारावर चित्त ठेवून पतीचें घरीं सर्व कामें करितें, एखादा चांगला पदार्थ झाल्यास परपुरुषाकरितां आधीं राखून ठेवितें, परंतु पतीचे घरीं सर्व कामधंदा करीत असताना चित्त मात्र परपुरुषाकडे लागलेलें असतें, त्याप्रमाणें संसार सुखानें करा. प्राप्त भोगास आलेलीं कर्मेंही करा, परंतु हीं कर्में करीत असतां चित्त मात्र जारिणीप्रमाणें परमात्म्याचे ठायीं समर्पित होऊं द्या म्हणजे सर्व कर्मांत दिव्यानंद सहज प्राप्त होईल. दिव्यानंद कसा मिळेल त्याची नेहमीं तळमळ हाच श्रेष्ठ कर्मयोग आहे.

आसक्ति मुळेंच सर्व बिघडतें.

९ एका साधूस रोज दूध पिण्यास देण्याचा एका संसारिक स्त्रीचा परिपाठ असे. नित्याप्रमाणें साधुमहाराज आल्यावर त्यांना दूध देण्याची तयारी झाली. चुलीवरील दूध उतरून साधूला द्यावयाचे भांड्यांत ओतीत असतां त्यांत दुधाबरोबर सायही पडली. आपल्या स्त्रियांचें प्रेम सायीवर विशेष असतें हें आपणास माहीत आहेंच. दुधाबरोबर साय पडतांच " अगबाई हें काय " असें बाईच्या तोंडून शब्द निघाले. तिनें दुधाचा प्याला आणून साधूमहाराजांपुढें ठेविला. बराच वेळ गेला तरी साधुमहाराजांकडून दुधाचा स्वीकार होईना. दूध कढत असेल निवल्यावर पितील असें वाटून बाई कांहीं बोलली नाहीं. बराच वेळ झाल्यावर दूध न घेतांच साधूमहाराज उठले व आतां मी येतों असें स्त्रीस सांगितलें. आपण दूध न घेतांच जातां, दुधाचा स्वीकार करा, असें ती स्त्री बोलली. परंतु आजच्या या दुधास स्पर्श करण्यासारखें हें दूध शुद्ध नाहीं. या दुधास आसक्तीच्या तळमळीचा विटाळ झाल्यामुळें आम्हांस पिण्याच्या योग्यतेचें राहिलें नाहीं, असें म्हणून साधूमहाराज चालते झाले. दूध घ्या हें म्हणणें ठीक आहे, पण त्यांत तळमळ वाटणें अत्यंत गैर आहे. अध्या-

त्याच्या दृष्टीनें कर्म करा. पण कर्म करीत असतां इच्छांचा, वासनांचा, पगडा तुमचे मनावर बसावा व वासनेनें अंतःकरण घेरून जावें हें बरें नाहीं. कर्म करीत जा, परंतु तें सहज लीलेनें होऊं द्या. कोणत्याही कारणानें व कर्मानें आपल्या चित्ताची समता बिघडूं देऊं नका. शंकाकुशंका, संशय, विषयावरील प्रीती–आत्म्यासंबंधीं विपरीत भावना हें अज्ञान होय. पातकी संस्कार, विषयी-भावना, हे दुष्ट काळेकुट्ट मेघ–हृदयस्थ परमात्म्याचे दर्शन होऊं देत नाहींत म्हणून सर्व संशयविषयिक वृत्तींचा त्याग करा.

## निरभिमानतेंत यश आहे.

अहंभावाचा निरास होतो तेव्हांच वास्तविक कोणताही व्यवहार होऊं शकतो. अहंकार जागृत झाला कीं स्वीकृत कार्य बिघडलेंच समजा. निरहंकार वृत्तींतच निर्दोष आणि सर्वोत्कृष्ट कामगिरी होऊं शकते. दिवा स्वतः जळून भोंवतालचा अंधकार नाहींसा करीत असतो, परंतु " मी प्रकाशिक आहे " हा क्षुद्र अहंकार अंधकाराचा नाश करूं शकत नाहीं. हा अहंकार जळाल्यावरच प्रकाश पडतो हें लक्षांत ठेवा. फुलें उमलून सर्व दिशा आपल्या परिमलानें सुगंधीत करतात, परंतु आपण फार सुवासिक व परिमलयुक्त आहों ही मीं-पणाची कल्पनाही त्यांचे ठिकाणीं नसते. मोठा वृक्ष होणें असेल तर बीजास नाहींसें झालेंच पाहिजे. यासाठीं निरहंकार वृत्तीनें आपले सर्व व्यवहार करीत जा. त्यांना अहंकाराचें गालबोट लागूं देऊं नका. ममत्व आणि अहंकार यांच्या अतीत होऊन त्यागवृत्तीनें नित्यनैमित्तिक कर्मे करीत जा म्हणजे आपला संसार यशस्वी होईल. शरीर हें कर्माकरतांच असल्यामुळें त्याला नेहमीं कर्मां-तच ठेविलें पाहिजे. परंतु चित्त हें ईश्वराचें ध्यान करण्याकरितांच देवानें दिलें असल्यामुळें त्याची एकाग्रता करा. सारांश अखंड स्वरूपानुसंधान ठेवून प्राप्त कर्मांच्या ठिकाणीं उद्यत झालें पाहिजे, हाच अभ्युदयाचा खरा मार्ग आहे.

जगद्रूपी देखावा पाहून त्याचें ओझें वाटतां उपयोगीं नाहीं. जगांतील सर्व व्यवहार करून त्यांत न गुरफटतां त्यापासून अलिप्त राहिलें पाहिजे. निष्काम कर्मयोग केल्यानें व वेदांताचें खरें रहस्य समजल्यानेंच अलिप्त राह-ण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं येणार आहे म्हणूनच प्रपंचांत राहूनही परमार्थ साधण्याची तुमची इच्छा असेल, तर प्रत्येक कर्मांत आपलें स्वरूप ओळखा. आपलें दिव्यत्व अनुभूत करा. अशा प्रकारचें परमात्मसंवेदनेनें शुद्ध कर्म होऊं लागल्यास सर्व सिद्धि दासीप्रमाणें राबतील व पूर्ण आनंदाचें साम्राज्य पसरेल, एवढें या निष्काम कर्माचें महत्त्व आहे.

# साभार स्वीकार.

**१ स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें**:—लेखक स. आ. जोगळेकर एम्. ए. प्रकाशक गणेश महादेव आणि कंपनी, पुणें, किं. रु. १॥८. टेरेन्स मॅक्स्विनी ( १८७९–१९२० ) ह्या प्रसिद्ध आयरिश देशभक्ताच्या ग्रंथाचें हें मराठी रूपांतर रा. जोगळेकर यांनीं केलें असून तें फार उत्कृष्ट झालें आहे. ७३ दिवसांच्या अन्नत्यागानंतर ह्या तेजस्वी पुरुषानें देहत्याग केला ही गोष्ट जगप्रसिद्ध आहे. आयर्लंडला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्याचा चंग बांधून यानें आजन्म तत्प्रीत्यर्थ अनेक हाल सोसून आपलें सर्व आयुष्य राष्ट्रसेवेंत खर्च केलें. इटालीचा जसा मॅझिनी तसा हा आयर्लंडचा मॅक्स्विनी. थोडक्यांत यांचें चरित्र सांगायचें म्हणजे हा आयर्लंडचा टिळक होय. टिळकांच्या सर्वगामी बुद्धीची यानें बरोबरी केली नाहीं तरी क्रांतिकारक चळवळींत हा टिळकांच्या फार पुढें गेला होता. स्वातंत्र्याची प्रेरकशक्ति, नैतिक सामर्थ्य, सामर्थ्याचें रहस्य, निष्ठा, स्त्रीधर्म, सारस्वत आणि स्वातंत्र्य, धर्म, सशस्त्र प्रतिकार इ० प्रकरणें फारच सरस आहेत व विचाराला चेतविणारीं आहेत. परतंत्र राष्ट्राला मॅक्स्विनीचे ओजस्वी विचार स्फूर्ति देणारे आहेत आणि मूळांतील ओज कायम ठेवूनही जोगळेकरांनीं मराठी भाषेची सहजता व सुलभता संभाळली आहे हें त्यांच्या लेखनकलेचें चातुर्य प्रशंसनीय आहे.

**२ बीडकरमहाराजांचें चरित्र**—लेखक लक्ष्मण गणेश बापट, डे० पोस्ट मास्तर, सोलापूर. किं. रु. २. हे सत्पुरुष पुण्यांत होऊन गेले पण पुण्यांत फारसे चमकले नाहींत. तथापि त्यांच्या चरित्रकथा ह्या ग्रंथांत वर्णिल्या आहेत त्या अविश्वसनीय मानायचें कारण नाहीं. रा. बापट यांनीं त्या इतक्या सहजपणानें व मनोरम भाषेंत लिहिल्या आहेत कीं, पुस्तक संपूर्ण वाचल्याशिवाय खालीं ठेववतच नाहीं. हे गृहस्थाश्रमी होते व 'माझ्या शिष्यांनीं झोळी हातांत धरितां कामा नये' असा त्यांचा उपदेश असे. प्रपंच धड करितां येत नाहीं तो परमार्थांत काय दिवे लावणार असें ते म्हणत. नेभळटपणा त्यांना खपत नसे. यांच्यावर श्रीअक्कलकोटच्या स्वामींचा अनुग्रह झाला होता. हे जन्मभर बडे ध्यानाभ्यासी असत. ह्यांच्या चरित्रांत अद्‌भुत चमत्कार बरेच आहेत व ते कित्येक अर्वाचीनांना न पटले तरी घेण्यासारख्या इतर पुष्कळ गोष्टी आहेत त्या घेतल्या तरी पारमार्थिकाला ह्या संतचरित्राच्या वाचनापासून निःसंशय पुष्कळ लाभ होईल. त्यांची मातृभक्ति व गुरुभक्ति, देव योगक्षेम चालवितो यावर त्यांची

अचल निष्ठा, त्यांच्या तीर्थयात्रा, त्यांची संतभेटीची उत्कंठा, त्यांचें निर्भीड व निरपेक्ष वर्तन, त्यांची सर्व कामांतील धडाडी इ० गुण खरोखर अत्यद्भुत आहेत. आम्ही यांना पाहिलें होतें, पण संतांपाशीं काय पहावें हें आह्मांस तेव्हां कळत नव्हतें. ह्या ग्रंथांतील नर्मदाप्रदक्षिणेचें व योग्याच्या भेटीचें वर्णन फारच रसाळ व उद्दीपक आहे. ' कोणत्याही स्थितींत ते निर्भय व आत्मविश्वासी असत ' यांत त्यांचें खरें वर्णन आलें. रा. बापट यांची गुरुभक्ति वाखाणण्यासारखी आहे व म्हणूनच ते प्रस्तुत चरित्र इतकें मनोवेधक व बोधप्रद लिहूं शकले आमच्या वाचकांनीं प्रस्तुत चरित्र अवश्य वाचावें, त्यांस त्यांत परमार्थाचा मेवा पुष्कळ मिळेल अशी आमची शिफारस आहे.

३ देहसार्थकता:—ले. लक्ष्मण रघुनाथ मालसे, यादो गोपाळ पेठ, सातारा. किं. रु. १॥८. रा. मालसे यांना साधुसंतांच्या ग्रंथांचा नाद चांगला असून त्यांनीं आपल्या समजुतीसाठीं वेळोवेळीं काढलेलीं धर्मग्रंथांतील वचनें मुक्तहस्तानें उपयोजून प्रस्तुत ग्रंथ वयाचीं ७५ वर्षे उलटून गेल्यावर लिहिला आहे यामुळें त्यांच्या व्यावहारिक व धार्मिक अनुभवाचाही भाग त्यांत आहे. नरदेहाची सफलता, धर्म, कर्म, योग, भक्ति, मोक्ष इ० विषयांवर संतवचनाधारें लिहिलेले हे प्रबंध वाचनीय आहेत. गीतारहस्याच्या वळणावर कर्माचा विचार यांत केलेला आहे.

कॅलेंडरें वगैरे:—१ ज्ञानोदयाचें सुंदर, सुबक व खिस्तवचनांनीं मंडित असें हें कॅलेंडर हिंदी खिस्ती लोकांच्या घरोघर असावयास पाहिजे. प्रथम दिलेले अनेक संवाद बोधप्रद व सुलभ आहेत. २ पुण्याचे एम्. आर्. जोशी, पब्लिशर व पेपरमर्चंट यांनीं प्रशस्त व जाड ब्लॉटिंग पेपरवर काढलेलें १९२८ चें कॅलेंडर सर्वांच्या उपयोगाचें व सुंदर आहे. आणखी कित्येक लहानमोठीं कॅलेंडरें आलीं आहेत. सर्वांचे आभारी आहोंत.

# गुरुप्रसादाचें एक चरित्र.

( ले० बा. दा. धारप, दादर ).

१ संतचरित्रें वर्णन करणें म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे. कारण 'संत देवाचेहि देव । संत तीर्था तीर्थराव ॥ संतासंगें वासुदेव । दास्य करी निजांगें ॥१॥ हें महात्म्य संतांचें आहे. ' जया देवाची पहातां थोरी । विश्व परिमाणु दशा न धरी ' ॥ अशा देवाचें वर्णन करण्यास प्रत्यक्ष वेदांनीं मौन धारण केलें. ' सहस्रमुखांचा ( शेष ) वर्णितां भागला. मग देवाचे देव जे संत त्यांचें चरित्र वर्णन कोणी करावें ? 'संत होऊनीयां संतास पहावें' या श्रीतुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें संतचरित्रगायनाला संतच योग्य होत. संतांनीं सुद्धा सद्गुरूचें वर्णन करतांना खालील उद्गार काढले आहेत ' आतां सद्गुरु वर्णवेना ॥ हेंचि त्याची वर्णना' ज्याप्रमाणें एकाद्या लहान मुलाला विचारावें, बाबा म्हणजे काय रे ? मुलगा उत्तर देतो, ' बाबा म्हणजे बावा. आई म्हणजे आई' त्याप्रमाणें संत म्हणजे काय? तर संत. अशी स्थिति असतां मजसारख्याकडून संतचरित्र वर्णन तें काय होणार ? परंतु सद्भक्तांनीं मनांत आणिल्यावर ' मूकं करोति वाचालम् । पंगुं लंघयते गिरिम् ॥ ' असें होऊं शकेल. एरवीं ' मज पामरासी काय थोरपण । पायाची वाहाण पायीं बरी. '.

२. श्रीतुकाराममहाराज ( आपले सद्गुरुनाथ ) शाळेंत असतांना एके दिवशीं त्यांचे शिक्षकानें त्या वेळच्या क्रमिक पुस्तकांत असलेला श्रीतुकाराममहाराजांचा अभंग ' सद्गुरुवांचोनि सांपडेना सोय ॥ धरावे ते पाय आधीं आधीं ॥ १ ॥ आपणां सारिखे करीती तात्काळ । नाहीं काळवेळ तयालागीं ॥ २ ॥ लोहो परिसाची न साहवे उपमा । सद्गुरुमहिमा अगाधची ॥ ३ ॥ तुका म्हणे कैसे आंधळे हे जन । गेले विसरोन खऱ्या देवा ॥ ४ ॥ ' समजावून सांगत होते. ते म्हणाले सर्व प्राण्यांत मनुष्य श्रेष्ठ, मानवांत अनेक जाती, त्या सर्व जातींत ब्राह्मण व ब्राह्मण कुळांत भगवद्भक्त श्रेष्ठ. अशांपेक्षां देव श्रेष्ठ. देवांपेक्षां इंद्र श्रेष्ठ, इंद्रापेक्षां ब्रह्मदेव, विष्णु, शंकर, हे श्रेष्ठ. परंतु यांचेपेक्षां सद्गुरुभक्त (संत) श्रेष्ठ व त्यांत सद्गुरु श्रेष्ठ. तेव्हां सर्व देव सद्गुरुभक्ति, ध्यान, धारणा, उपासना, भजन, पूजन करितात. सद्गुरुभक्तीशिवाय कोणाचाही तरणोपाय नाहीं. ' इंद्रचंद्र देव ब्रह्मादि करूनी ' संशयाची श्रेणी छेदन करण्यास म्हणजे

भवभ्रम–भवरोग नाहींसा करण्यास कोणींच समर्थ नाहीं. ‘ तिन्ही देव जेथून निर्माण झाले । तया देवरायासि कोणी न बोले ’ अशी मनुष्यस्थिति आहे. तरी अशा देवाचा शोध आपल्याजवळच लावावयाचा आहे. परंतु भूमिगत निधि पायाळूवांचून हातीं येत नाहीं तसा हा शोध आत्मानुभवी संताला शरण गेल्यावांचून लागत नाहीं. तुकाराममहाराज म्हणतात–‘ ज्यानें सद्गुरु नाहीं केला । त्याचा जन्म व्यर्थ गेला ॥ त्याचें सेवूं नये अन्न । त्याला विन्मुख नारायण ॥ २ ॥ ही पदरची नोहे वाणी ॥ व्यास बोलिले पुराणीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तो सूतकी ॥ व्यर्थ जाय हो नरकीं ॥ ४ ॥ ’

येणेंप्रमाणें अभंगाचें विवरण चाललें असतां महाराजांचें भाग्य उदयाला आलें असें वाटतें. त्यांच्या ठिकाणीं अष्ट सात्विकभाव उत्पन्न झाले. व त्यांनीं आपल्या शिक्षकाचे घट्ट पाय धरिले आणि म्हणाले “ आपण मला कृतार्थ करा. मला पदरांत घ्या. आज आपल्या भाषणानें, दर्शनानें माझें पुण्य फळासि आलें. आपणावांचून मला कोण आहे ? आपण मला हातीं धरिलें नाहीं तर माझी भ्रांति कशी जाईल ? माझा उद्धार कसा होईल ? अन्य देवतांची भक्ति-उपासना करावी तर ते पदाभिमानी असल्या कारणानें त्यांना कोणत्याही प्राण्याला अविनाश सुखाची देणगी देतां येत नाहीं मग प्राण्यांचें जन्ममरण हें कसें निवारण करूं शकतील ? आतांच आपण मला सांगितलें कीं प्राण्याला जन्ममरणांतून बाहेर काढण्यास सद्गुरुवांचून कोणीही समर्थ नाहीं. करितां आपण माझे सद्गुरु आहांत. तर आपण माझा अव्हेर करूं नये. मी आपणावांचून आणिकांची वास पहात नाहीं. “ तुजविण अन्य न देखों कोणी । म्हणोनि आणिकातें न मानी ॥ हा मस्तक तुझिये चरणीं । ठेविला सत्य ” ॥१॥ (मुकुंदराज) ॥ आपणच जर माझा अव्हेर केलात तर बिचाऱ्या नदीनें समुद्राशिवाय अन्य ठिकाणीं कसें जावें ? पाण्यानें जर जलचरांचा त्याग केला तर त्या दीनांचा वाली कोण आहे ? ‘ गंगा गेली सिंधूपाशीं ॥ परि तो ठाव नेदी तीशीं ॥ तिणें जावें कवण्या ठाया ॥ सांगा वेगीं पंढरीराया ॥ २ ॥ जळकोपें जळचरा ॥ बाळा माता नेदी थारा ॥ ३ ॥ तुका म्हणे आलों शरण ॥ कां गा विठो धरिलें मौन ॥ ४ ॥ अशा प्रकारें विनवणी करूं लागले व शिक्षकाचे पाय सोडनात. तेव्हां ते शिक्षक गोंधळून गेले. त्यांना वाटलें हें नसतें विघ्न उत्पन्न झालें. मी हा अभंग विवरण करून सांगितला नसता तर बरें झालें असतें ! त्यांना या मुलाची समजूत कशी करावी हें समजेना. त्यांनीं इतर मास्तरांना बोलाविलें व झालेली हकीकत निवेदन केली. ते सर्वजण बुचकळ्यांत पडले. हा काय प्रकार असावा ? मुलगा तर पाय सोडीत नाहीं व युक्ति तर दिसत नाहीं. तथापि त्या सर्वांनीं यांतून पार पडण्याकरितां त्या

मुलाला सांगितलें कीं या महाराष्ट्रांत श्री रामदास या नांवाचे अलौकिक संत होऊन गेले. त्यांनीं जगाचा उद्धार केला व अद्यापीहि जे प्राणी कायावाचा मनेंकरून त्यांना शरण जातील त्यांचा ते उद्धार करितात अशी आख्यायिका आहे. तरी तुला खरोखरच आत्मोद्धार व्हावा अशी इच्छा असली तर त्यांचे गादीवर असलेले विद्यमान पुरुष यांना शरण जा म्हणजे ते तुला मार्ग दाखवितील व तुझा उद्धार होईल. इतकें ऐकून तो मुलगा तसाच घरीं न जातां सज्जनगडावर गेला. इकडे घरीं शोध सुरू झाला परंतु मुलगा कोणीकडे गेला हें नक्की समजेना. सज्जनगडावर आल्यावर महाराजांनीं विद्यमान स्वामींचे चरण घट्ट धरिले व उद्धार करण्याविषयीं प्रार्थना करूं लागले. परंतु ‘ संतांचे ते आप्त ’ या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें असल्यामुळें त्यांना या मुलाला काय सांगावें तें कळेना. म्हणून त्यांनीं या मुलाला ‘ श्री समर्थांचे समाधीजवळ अखंड नामस्मरण कर. समर्थ दयावंत आहेत. तुला प्रत्यक्ष दर्शन देऊन पदरांत घेतील. मला स्वतःला कांहीं ज्ञान नाहीं’ असें सांगितलें. कोणतेंही कार्य सिद्धीस जाण्याकरितां कार्याच्या मानानें निश्चयाचें सामर्थ्य असावें लागतें. कार्य सिद्धीस जात नाहीं म्हणजे निश्चय लंगडा आहे असें समजावें. संतांनीं जगाच्या राहाटीला अनुसरून आपला देह ठेविला तरी त्यांनीं आरंभिलेल्या जगदुद्धाराची समाप्ति होत नाहीं. मग प्राणिमात्राला संत नाहींत असें कां वाटतें याचें उत्तर त्यांचे ठिकाणीं दांडगा अविश्वास असतो. नास्तिकपणामुळें ’ ‘ ब्रम्हसत्यं जगत् मिथ्या ’ असतां त्यांना विपरीत अनुभव येतो. आस्तिक मनुष्याला वरच्या श्रुतीचा यथार्थ अनुभव येतो. श्री नाथमहाराज म्हणतात, ‘ ते ( संत ) जगामाजीं सदा असती । जीवमात्रातें दिसती । परि विकल्पेंचि ठकिजति । नाहीं म्हणती नास्तिक्यें ॥ १ ॥ ’ त्या मुलाचा विश्वास दांडगा असल्यामुळें त्यानें निश्चय केला कीं ‘ मधुकरी मागून समाधीजवळ अखंड नामस्मरण करीत बसेन. ’ ‘ उद्धवा ज्यासी जैसा भावो ॥ त्यासी तैसा देवो ॥ ’ नाथमहाराज ॥ येणेंप्रमाणें निश्चय करून तो मुलगा गावांत मधुकरी मागून समाधीजवळ अखंड नामस्मरण करूं लागला. नामस्मरण करितांना जांभया येतात, झोंप येऊं लागते, मनांत नानाप्रकारचे कामक्रोधयुक्त विचार घोळूं लागतात. ज्यांची अनन्य शरणागति झालेली नसते, ज्यांचें संसारावरचें चित्त उडालेलें नसतें, ज्यांना ‘ सुख नाहीं कोठें आलिया संसारीं ॥ वायां हांव भरी होऊं नका ॥ १ ॥ तुकाराम. मूर्खामाजी परम मूर्ख ॥ जो संसारी मानी सुख ॥ संसार दुःखाएवढें दुःख ॥ आणीक नाहीं ॥ १ ॥ संसारसंगें सूख झालें । ऐसें देखिलें ना ऐकिलें ॥’ या रामदास्वामींच्या उक्तीचा अनुभव आला नसेल त्यांच्या ठिकाणीं सर्व प्रकारचीं विघ्नें व अडथळे संभवतात व ‘ कामक्रोध आड पडले पर्वत ॥ राहिला अनंत

पैलीकडे ' हा अनुभव त्यांचे वाट्यास येतो. परंतु आमचे महाराजांचे ठिकाणीं विघ्नांचा नायनाट होऊन त्यांना सर्व मार्ग सुकर झाला. नामस्मरण करीत बसले म्हणजे महाराज ' मी तव अनाथ अपराधी आहे. ' मला आपलें दर्शन केव्हां होईल ? वासरानें हंबरडा फोडून गाईनें पान्हा चोरिला तर वासराची स्थिति काय होईल ? मनुष्यजन्मास येऊन आत्मोद्धार करून घेतला नाहीं, सद्गुरुसेवेकरितां या शरिराचा उपयोग झाला नाहीं तर जीवजंतु व मनुष्य प्राणी यांत काय फरक ? करितां हे अनंता, हे माधवा, हे दीनबंधो, धांव घाला व दीनाचा उद्धार करा. आपल्याशिवाय मी कोणाचे तोंडाकडे पाहूं ? ' धांव पाव करी साह्य ॥ देवा तूंचि बाप माय ॥ १ ॥ तुजवीण प्रार्थू कोणा ॥ आसरा नाहीं नारायणा ॥ माझ्या जीवींची जाचणी ॥ दूर करा चक्रपाणी ॥ तुका म्हणे झालों वेडें ॥ तुम्हां घातलें सांकडें ॥ ४ ॥' याप्रमाणें करुणा भाकीत, वारंवार नमस्कार करीत, प्रदक्षणा घालीत, पुन्हां बसत. येईल तसें ध्यान करीत ' माझे जीवन तुझे पाय ॥ कृपाळू वो माझी माय ॥१॥ दिसों नेदी केविलवाणें ॥ पांडुरंगा तुझें तान्हें ॥ २ ॥ जन्म मरण तुझें हातीं ॥ आणिक नेणों दुजी गोष्टी ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा शीण ॥ कोण वारिल तुजवीण ? " अशी करुणा भाकीत. आपला कार्यभाग साधणारे लोक असाच अविश्रांत सायास करितात. त्यांना तहान, भूक, झोंप, कामक्रोधादि विकार पीडा करूं शकत नाहींत. ह्या त्यांच्या तपश्चर्येंत साधकानें आपला कार्यभाग साधण्याकरितां कसें अविश्रांत खपलें पाहिजे हें समजण्यासारखें आहे. समर्थांचा धांवा करूं लागल्यावरोवर दयाळू माऊलीनें या मुलाचा निश्चय किती टिकाऊ आहे हें पाहण्याकरितां उग्र रूप धारण केलें, व आपल्या शेपटानें त्या मुलाला झोडपूं लागले. जर हा मुलगा भिऊन पळून गेला तर याचा निश्चय कोमल कंटकाप्रमाणें मोडेल. जर समर्थ अत्यंत दयाळू माउली होते तर शरण आलेल्याला पदरांत न घेतां उग्ररूप धारण करून भेडसावूं लागले हे कसें ? बावनकशी सोनें भट्टींतच घालावें लागतें, तेव्हां त्याचा खरा कस कळतो. परीक्षा पाहिल्याशिवाय अनुग्रह करूं नये असें शास्त्र आहे. तसेंच आई आपल्या मुलाला हट्ट करितो म्हणून रागानें मारते, पण त्या मारांत गुप्त प्रेम असतें हें विसरतां कामा नये; त्याचप्रमाणें आई मारते म्हणून मुलगा आईजवळ जात नाहीं किंवा गाय वासराला लाथ मारते म्हणून वासरूं तिच्याकडे धांवत नाहीं हें जसें संभवत नाहीं, त्याप्रमाणें समर्थांनीं ९ वे दिवशीं उग्ररूप धारण करून मारही दिला. तरी या मुलानें आपला प्रेमबंध तोडला नाहीं. इतकेंच नव्हे तर निश्चयाची तीव्रता अधिकच वाढूं लागली व त्यांनीं खालीलप्रमाणें निश्चय केला.

जन्मोजन्मींचें संचीत । गुरुचरणीं जडलें चित्त ॥ १ ॥

तें तो सोडिल्या न सुटे । प्रेमतंतु तो न आटे ॥ २ ॥
दुःखें आदळलीं वरपडा । पाय न सोडीं हा धडा ॥ ३ ॥
देह जावो अथवा राहो । गुरुचरणीं दृढ भावो ॥ ४ ॥
वरि पडोत पाषाण । परि न सोडीं गुरु चरण ॥ ५ ॥
एका जनार्दनीं निर्धार । तेथें प्रगटें विश्वंभर ॥ ६ ॥

येणेंप्रमाणें ७ दिवस सतत मार खाऊन देखील हा पोर आपला निश्चय सोडीत नाहीं, तरी हें बावनकशी सोनें यांत कांहीं संशय नाहीं, हाच खरा परमार्थाला लायक आहे, असा समर्थांनीं आपल्या ठिकाणीं विचार करून यापुढें याचा अंत पाहणें योग्य नाहीं, करितां याला योग्य ठिकाण दाखवावें म्हणून एके दिवशीं या मुलाला प्रेमानें जवळ बोलावून सांगितलें. ‘ बाबा, तूं खरा दीपक असून सद्गुरुनें वरदहस्त ठेविण्याला अगदीं योग्य आहेस. मी तुझा अंगिकार केला असतां, परंतु पूर्णतम अवतार असे जे श्रीकृष्ण परमात्मा त्या महा विष्णुकडे तुला गेलें पाहिजे. तूंहि त्याचा अंश असून मलां वंद्य आहेस. करितां आतां जुन्या सांगलीस श्रीहरीचे अंतरंग विश्वनाथ नामेंकरून सत्पुरुष आहेत त्याना अनन्यभावें शरण जा ह्मणजे तुझें कार्य होईल. जातांना भिऊं नको. मी तुझें रक्षण करीन’ असा आशीर्वाद देऊन समर्थ गुप्त झाले. त्या मुलानें आज्ञा प्रमाण म्हणून तेथून निघून कृष्णातीरानें जातां जातां वाटेंत ठिकठिकाणीं खेडेगांवांत कोणी तरी त्याला बोलावून न्यावें, त्याला जेऊं खाऊं घालावें. राहण्याचा आग्रह करावा. परंतु या मुलानें कोणाकडेही राहाण्याचें टाळावें. वाटेनें जातांना मुखानें ‘सद्गुरुनाथ माझे आई मजला ठाव द्यावा पायीं ’ असा नामघोष चालवावा. श्री निळोबाराय म्हणतात. “ हेंचि परमार्थसाधन । मुखीं नाम हृदयीं ध्यान ॥ ” आतांपर्यंतच्या वर्णनांत साधकाच्या ठिकाणीं एकविध लक्षण असावें असें दिसून येईल. “ एकविध आम्ही न धरूं पालट । सांपडली वाट न संडूंचि ॥ १ ॥ ” “ तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरि होईल भाव एकविध. ” स्मरण करणें तर सद्गुरूचेंच. ध्यान करणें तरी त्यांचेंच करावें. सेवा करावयाची तर त्यांचीच. असो. अशा एकविध वृत्तीनें कृष्णाकाठानें जात असतां श्रीसमर्थांनीं याची परिक्षा पुनः एकवार पहावी म्हणून वाघाचें रूप धारण केलें. हा मुलगा नामस्मरण करीत खालीं पाहून चालला होता. इतक्यांत त्याची नजर पाण्याकडे गेली व पहातां तों एक भला मोठा वाघ पाणी पिऊन परत येत आहे व तो आपल्या समोरच येत आहे, असें पाहून त्या मुलानें “ जय सद्गुरु महाराज ” असें म्हणून साष्टांग नमस्कार घातला. इतक्यांत तो त्याचे आंगावरून उडी मारून निघून गेला व यानें उठून मागें पाहिलें तों वाघ वगैरे कांहीं नाहीं. समर्थांनीं “ भिऊं नको. आम्ही तुझें रक्षण करूं. ” असा आशिर्वाद दिलेला व हा मुलगा तर

एकविध वृत्तीनें कायावाचामनें करून सद्गुरूंच्या नामस्मरणांत व ध्यानांत रंगलेला. वाघ सुद्धां सद्गुरु स्वरूपानें भासला. यालाच म्हणतात सत्ववृत्तीची परिपक्वता. अशा स्थितींत प्रत्यक्ष काळ देखील डोळे वटारून पाहूं शकणार नाहीं, मग इतरांची कथा काय ? " शंख चक्र गदा पद्मेंसी सहित । मी तुमचा सांगाती निरंतर ॥ मागे पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघात निवारावे ॥ ". हा मुलगा नामस्मरण करीत जातां जातां सांगलीस पोंहोंचला. बरोबर सामुग्री म्हणजे एक आंगडें व एक टोपरें व लंगोटी हीच काय ती होती. श्री विश्वनाथ महाराजांबद्दल चौकशी केली. त्यावेळीं श्रीविश्वनाथदादा हे पलंगावर बसलेले होते. पुढें श्रोते बसले होते श्रीज्ञानेश्वरी ग्रंथांतील ओव्या-वर विवेचन चाललें होतें. अशा वेळीं चंद्राला पाहून समुद्र उचंबळतो, सूर्याला पाहून सूर्य विकासीनी प्रफुल्लित होतात, मेघाला पाहून मोर नाचूं लागतात व टाहो फोडतात, गाईला पाहून वासरानें शेपूट वर करून आनंदाच्या भरांत उड्या टाकीत यावें, बहुकाळानें देशांतराहून आलेल्या भ्रताराला पाहून पति-व्रता स्त्रीनें आपलीं दुःखें व शीण विसरावा, बालकाच्या रडण्यानें आईला पान्हा फुटून तिनें त्याला स्तनपान करवावें, त्याप्रमाणें सद्गुरुनाथ विश्वनाथ माउलीच्या दर्शनानें देहवृत्ती मावळून समाधिसुख भोगूं लागले. " ऐशी कळवळ्याची जाती. " कोणाला असें वाटेल कीं आम्ही उपासना घेऊन इतकीं वर्षें झालीं पण आम्हांला कांहींच अनुभव नाहीं हें कसें ? त्याला उत्तर म्हणजे या मुलाच्या पूर्व तयारीकडे पहा. हीच याची तपश्चर्या. त्याचा दृढ-निश्चय, एकविधपणा, अनन्यत्व यापैकीं आपल्या ठिकाणीं एक तरी गुण आहे कां ? असा विचार केला म्हणजे आपले प्रश्न नाहींसे होतील. आपल्या ठिकाणीं " अंतरी कपटाचा थारा । हाचि भजनासी आड वारा ॥ १ ॥ " अशी स्थिति आहे.

' रिक्त हस्तेन नोपेयात् । राजानं देवतां गुरुम् ' त्यानें आंगडें टोंपरें पुढें ठेवून श्री विश्वनाथ माउलींना साष्टांग नमस्कार घातला, तों देहभाव मावळून गेला. सद्गुरु व सत्शिष्य यांची एकमेकांना ओळख पटली. आईला आपलें तान्हें मूल चुकलेलें भेटलें म्हणजे दोघांच्या ठिकाणीं प्रेम उचंबळून मुलाचें व आईचें देहभान क्षणभर नष्ट होतें. हा संसारी जनांना अनुभव असतो. सद्गुरु दर्शनांत इतका अपूर्व लाभ होतो याचेंच पुष्कळांना आश्चर्य वाटेल, परंतु खरे परमार्थी जे असतात त्यांचा हा नित्याचा अनुभव असतो. सद्गुरुदर्शनानें परिपक्व दशेच्या सात्विक शिष्यांचीं देहवृत्ति मावळते यांत नवल नाहीं. ' देह-भाव हारपला ॥ तुज पाहातां विठ्ठला ॥ १ ॥ असा तुकाराम महाराजाचा अनुभव होता. असो सद्गुरु माउलींनीं आपला प्रेमभाव आवरून त्या मुलाला हातानें उठवून बसविलें व निरूपण पुन्हां सुरू झालें. नंतर कांहीं वेळानें श्रोते

आपल्या घरीं गेले. त्या मुलाला सद्गुरु विश्वनाथ दादांनीं ठेवून घेतलें. परीक्षा पाहिल्याशिवाय अनुग्रह होत नाहीं, व तो देऊं नये असें शास्त्र आहे. या मुलाची चौकशी करूं लागले तों त्या मुलानें आपली पूर्व हकीकत सविस्तरपणें सांगितली. श्रीदादांनीं ती ऐकून घेतली. त्यांना या मुलाबद्दल अधिकच प्रेम वाटूं लागलें. ते त्या मुलाला दररोज श्रीकृष्णचरित्र श्रवण करवूं लागले. नंतर योग्य दिवस पाहून चैत्र शु।। १५ चे दिवशीं श्रीदादांनीं त्या मुलाला अनुग्रह दिला. त्यावेळेस सद्गुरु व सत् शिष्य एकच होऊन गेले. एका दिव्यानें दुसरा दिवा लावला म्हणजे वडिल धाकुटा हा भाव उरत नाहीं, असें श्रीज्ञानेश्वर महाराज वर्णन करितात त्याप्रमाणें त्यांची स्थिति झाली.

---

# आत्मसंयमन.

( ले०:-श्री वा. जोग. )

आत्मसंयमन, इंद्रियनिग्रह वगैरे अनेक वेगळाल्या शब्दांनीं एका अमोल गुणाची महती सर्व धर्मांनीं व सर्व संतांनीं गाइली आहे. बऱ्या वाईट गोष्टी करण्यास मनुष्यांस मन प्रवृत्त करतें. एकीकडे विवेक किंवा सद्बुद्धि ही माणसास शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखवीत असते. त्याच्या उलट मन हें क्षणिक सुखाच्या जाळ्यांत त्याला लोटींत असते. हें युद्ध प्रत्येक माणसाच्या अंतःकरणांत नेहमीं चालूच असतें. ज्यांच्या आचरणांत विवेक हा प्रबळ होऊन मनःप्रवृत्ति सर्वस्वी विवेकाच्या आधीन होतात त्यांचें अंतःकरणांतील हें युद्ध संपून ते संतपदवीस पोंचतात. नित्य संवयीनें व परिस्थितीच्या योगानें ज्यांचा विवेक नष्ट झाला व मनःप्रवृत्तीच सर्वस्वी प्रबल झाल्या ते लोक विषयलोलुप होऊन अनेक प्रकारें अधोगतीस जातात. मनुष्यानें लहानपणापासून विवेकास प्राधान्य देऊन मनाच्या ओढीस आळा घालण्यास शिकलें पाहिजे. ज्या ज्या वेळीं विवेकास लाथाडून मनाच्या मागें मनुष्य जातो त्या प्रत्येक वेळीं आत्मसंयमनाची शक्ति कमी होते व मनुष्य अधोगतीच्या घसरणीस जास्त जास्त लागतो.

गति अधोगति मनाची हे युक्ति । मन लावा एकांतीं साधुसंगें ।। १ ।।
जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ।। २ ।।

होऊं नको कांहीं या मना आधीन । नाइके वचन याचें कांहीं ॥ ३ ॥
आपुलें आधीन करूनिया ठेवा । नाहीं तरी जीवा घातक हें ॥ ४ ॥
तुकाराम.

आत्मतीर्थीं सुस्नात झालिया मन । आणिक साधन दुजें नाहीं ॥
साधन तें मन करी आपुलें आधीन । यापरतें कारण आन नाहीं ॥
एका जनार्दनीं मनासी आवरी । मग तूं संसारीं धन्य होसी ॥

आपल्या सर्व धर्मग्रंथांनीं आत्मसंयमनाची महती अतिशयच वर्णन केली आहे. सर्व प्रकारच्या धार्मिक व लौकिक उन्नतीचें मूळ मनोनिग्रहांत आहे हें सार्वत्रिक धर्माचें आदितत्त्व आहे. परंतु अलीकडे १०।१५ वर्षांत स्वातंत्र्याच्या ज्या निरर्गल कल्पना पसरूं लागल्या आहेत व ज्यांमुळें उच्च शिक्षण मिळणारी नवीन पिढी अगदीं भारून गेली आहे, त्या कल्पनांमुळें मनाला सैरावैरा भटकूं देणें, त्यावर कसलाही निर्बंध राहूं न देणें हेंच खरें स्वातंत्र्य, अशी या तरुण मंडळीची समजूत झाली आहे, मनाची स्वाभाविक प्रवृत्ति जिकडे नेईल तिकडे माणसानें जावें, त्यामुळेंच खरें सुख लागेल, निसर्गाचे नियम हे मानवी मनामध्यें साहजिकपणें प्रादुर्भूत होतात, त्यांचेवर धर्माचें किंवा रूढीचें नियंत्रण घालणें म्हणजे मनुष्याला पशूचे पदवीस नेण्यासारखें आहे, धर्म व रूढी यांची वेसण ही माणसांतील माणुसकी नष्ट करणारीं साधनें आहेत, अशा प्रकारचे विचार तरुण मनास साहजिकच प्रिय वाटतात व पटतात. जो डॉक्टर रोग्यास यथेच्छ खाण्यापिण्याची मोकळीक देतो, तो डाक्टर रोग्यास प्रिय होतो. जें तत्त्वज्ञान मनुष्यास यथेच्छआहारविहार करण्यास सांगतें तें खरें तत्त्वज्ञान असें वाटतें. हजारो वर्षांच्या विचारानें व अनुभवानें आपल्या स्थानिक परिस्थितीस मानवतील असे तयार केलेले खाण्यापिण्याचे निर्बंध तुच्छ मानून झुगारून दिले जात आहेत. फार तर काय, समाजाच्या धारणास अत्यंत आवश्यक अशी नियमबद्ध भारतीय विवाहसंस्थाही नवीन मंडळीस अप्रिय वाटूं लागली आहे. मन बेलगाम मोकळें सोडून तें जें प्रत्येक माणसास सांगेल त्याप्रमाणें त्या माणसानें आपला आचरणाचा मार्ग चालवावा, या गोड दिसणाऱ्या तत्त्वासारखें घातुक तत्त्व दुसरें नसेल. अनेक वर्षांची तपश्चर्या करून मलिन वृत्तींचा उच्छेद करून निर्मळ व उच्च पायरीस गेलेल्या मनासच शुद्ध कल्पना प्रादुर्भूत होतात; प्रत्येक मनुष्याच्या विषयव्याप्त मनास शुद्ध विचार सुचणें शक्य नाहीं हा अनुभव अनादि काळचा आहे. पूर्वींच्या पिढयांस रूढीचीं व धर्माचीं बंधनें थोडींफार बंधनकारक असल्यामुळें त्यांचीं मनें आपोआपच कह्यांत रहात असत. पण नवीन पिढींत हिंदुधर्म चांगला अशी शाब्दिक बडबड पुष्कळ दिसत असूनही धर्माचीं तत्त्वें पाळणें व त्यांस अनुसरून आपलें

आचरण ठेवणें हें मुळींच होत नाहीं. पूर्वीच्या पिढींत जे लोक जुन्या धर्मतत्त्वांस नांवें ठेवीत, त्यांतील दोषस्थळें दाखवींत, व नवीन धर्मतत्त्वांचा पुरस्कार करीत असत त्यांना सुधारक किंवा धर्मलंड म्हणत असत. पण अलीकडील लोकांत धर्माच्या नांवाबद्दल शाब्दिक अभिमान आहे परंतु धर्माचें ग्रंथाचें वाचन त्यासंबंधीं विचार, धर्मानें अवश्य घालून दिलेले यांचें परिपालन यमनियम हीं मुळींच होत नाहींत हीं धर्मशून्यतेची स्थिति फार घातुक आहे. त्यापेक्षां धर्मविरोध पत्करेल, कारण कांहीं कारणांनीं समजूत पडली तर विरोधकच खरा भक्त बनतो. परंतु धर्माविषयीं उदासीन माणसाची गति अगदींच वाईट. मनाच्या लहरींच्या आधीन झाल्यानें कोणचाही नियम पाळणें अशक्य होतें. मनुष्य मी व्यक्तिस्वातंत्र्य अनुभवीत आहे अशा गोड कल्पनेमध्येंच राहून दुबळेपणानें इकडून तिकडून येणाऱ्या वाऱ्याबरोबर हेलकावे खात असतो. अमकीं अमकीं धर्मतत्त्वें मानवी प्राण्यास हितकर आहेत, तीं पूर्वजांनीं पाळलेलीं व मींही तीं पाळणें जरूर आहे अशा भावनेनें प्रेरित असलेल्या माणसांचे वर्तनांत जो सुसंगतपणा, करारीपणा, निश्चय असतो तो या नवीन मंडळींत दिसत नाहीं. जोंपर्यंत सुदैवानें सुखाचा संसार लाभेल तोंपर्यंत देहाला त्रास न देतां आयुष्य काढणें व थोडीशी आपत्ति आली कीं, गोंधळून जाऊन उदासीन व दुःखी होणें. व अखेरीस परमेश्वरानें जगांत एवढें दुःख कां उत्पन्न केलें म्हणून त्यास दोष देणें हा हल्लींच्या पिढींतील बहुतेकांचा जीवनक्रम आहे. या बिनबुडाच्या नावा लहानशा वादळाच्या वाऱ्याबरोबर समुद्राच्या तळास जातात. तेव्हां आपल्या मनःप्रवृत्ति या जीवनसार्थकाच्या मुळींच मार्गदर्शक नव्हत. हजारों वर्षांच्या अनुभवानें हितकारक ठरलेलीं आचार-विचारांचीं तत्त्वेंच आपल्यास उपयोगी पडतील, त्यांत अधिकारी विभूतींच्या सल्ल्यानें कालक्रमास अनुसरून फरक करितां येईल, निरंकुश जीवनांत इहलोक व परलोक या दोहोंचाही लाभ मुळींच नाहीं. या गोष्टी नवीन सुशिक्षित पिढीनें ध्यानांत ठेवाव्या व आचरणांत आणाव्या यांतच तिचा तरणोपाय आहे. धर्मपुस्तकांच्या नुसत्या संग्रहानें कांहीं कार्यभाग होत नाहीं. यांच्या वाचनानें ही थोडाच होतो. त्यांतील तत्त्वें आचरणांत कशीं आणतां येतील याचा नित्य विचार करून दरमहा, दरसाल, आपल्या धर्माचरणांत किती प्रगति केली, याचा आढावा प्रत्येक सुशिक्षितानें घेत असलें पाहिजे. कांहीं १०-२० मित्र मंडळींनीं एकत्र जमून पुढच्या वर्षी कोणचें धर्मतत्त्व प्रामुख्यानें आचरणांत आणावें याबद्दल वर्षप्रतिपदेस वाटाघाट करून त्याबद्दल प्रतिज्ञा करीत जावी. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे, " ही गोष्ट ध्यानीं बाळगून प्रयत्न करावा, म्हणजे फळ अवश्य मिळेल. स्वतःबरोबर आपल्या घरांतील माणसांच्या नैतिक धार्मिक उन्नतीची आपल्यावर जबाबदारी आहे. त्यांना अन्नवस्त्र देणें जितकें

आपलें अवश्य कर्तव्य आहे त्याच्याहून त्यांच्या धार्मिक सुस्थितीची तजवीज करणें हें जास्त अवश्यक कर्तव्य आहे. पण अलीकडे बायकामुलांच्या धर्मशिक्षणाकडे व धर्माचरणाकरितां पुरुषांकडून कांहीं प्रयत्न करण्यांत येत नाहींत, ही फार अनिष्ट गोष्ट आहे बायका एकमेकींचें पाहून कांहीं व्रतें व नियम करितात पण ही गोष्ट सुद्धां ज्या त्या बायकोच्या इच्छेवर सोपविण्यांत येते. तसें न होतां, प्रत्येक घरांतील कर्त्या माणसानें आपल्या घरांतील बायकांस व मुलांस त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें दररोजची पूजा, ग्रंथवाचन व स्तोत्रपठण यांजबद्दल नियम घालून दिले पाहिजेत व ते पाळण्याची सक्ती केली पाहिजे. रामदास, एकनाथ, महिपति यांच्या ग्रंथांतील कांहीं भाग नित्यनेमानें वाचलाच पाहिजे असा नियम सर्व स्त्रियांस व मुलांस कडकपणाणें पाळण्यास लाविलें पाहिजे, व त्यांतील गोष्टींबद्दल मधूनमधून घरांत चर्चा करण्यांत यावी. अशा रीतीनें नियमबद्ध आचार जर पुष्कळ वर्षें पाळला जाईल तर मनें आपोआप शुद्ध होतील, व त्यांच्या प्रवृत्ति हितपरिणामी होतील.

---


# मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन.

ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना के० इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षें पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रती थोड्या शिल्लक आहेत. पृ. सं. ६२५ किं. रु. २८४.

पत्ताः—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. भक्तिमार्गप्रदीपः—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८८ व्ही. पी. नें ८१२.

२. संतचरित्रमालाः—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं रु. १८८.

३. श्रीएकनाथचरित्रः—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ८१२.

४. कविरामायणः—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ८४.

५. आनंदलहरीः—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ८१२.

६. नारदभक्तिसूत्रेंः—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ८८. ( आवृत्ति ४ थी )

७. नवविधाभक्तिः—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ८६.

८. निरंजनमाधवांची कविताः—भाग पहिला. किं. १ रु.

९. श्रीज्ञानेश्वरचरित्रः—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १८८.

१०. भक्तिमणिमालाः—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १८८.

मुमुक्षु REG. No. B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें

११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

१२-१३. मुमुक्षूंतील निवडक निबंध ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १०८

१४. मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १०१२.

१५. पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

१६. श्रीतुकारामचरित्र:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिक-ठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुको-बांचीं भरपूर अवतरणें इ० सह. किं. रु. ३.

१७. श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भावि-कांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:--निबंधमालेचे मूळ अंक पाहून माले-वर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

१९. मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक महाकवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदा-हरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२०. मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ): -किं. ०४.

२१. सार्थ श्रीदासबोध:-- किं. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

२२. सार्थ मनोबोध:--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

२३. समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


२४. मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):--किं. रु. २०४.

२५. श्रीएकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):--किं. रु. ६.

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ( श्रीरामदास )


जुनें वर्ष २१ वें } फाल्गुन १८४९ चैत्र १८५० } नवें वर्ष ८ वें
भाग ७–८ } एप्रील मे १९२८ } अंक ४–५



संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही.पी.नें रु. ३-२

मुद्रकः- लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणे पेठ सदाशिव, घ. नं. १००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यात छापिलें.

विषय पृष्ठ.
१ श्रीविष्णुकवि महाराज यांचें चरित्र ... ... १–८०
(अपूर्ण)

---


## पांगारकरांचा नवा ग्रंथ.

# ज्ञानेश्वरांची प्रभावळ.

श्रीज्ञानेश्वरमहाराज व त्यांचीं भावंडें म्हणजे वडील बंधु व गुरु श्रीनिवृत्तिनाथ व धाकटे बंधु सोपानदेव व बहीण मुक्ताबाई, त्याचप्रमाणें नामदेवराय व त्यांची घरची मंडळी व दासी जनाबाई, विठोबा खेचर, परिसाभागवत, बहिरापिसा, गोराकुंभार, सावतामाळी, नरहरि सोनार, जगमित्र नागा, जोगा परमानंद, चोखा-मेळा, त्याची बायको व मेहुणा बंका, भागु महारीण इ० अठरापगड जातींचे समकालीन, समप्रेमी व समशील भगवद्भक्त एकाच वेळीं झाले व त्यांनीं श्रीविठ्ठ-लपायीं भागवतधर्माचा महामंत्र घेऊन तो धर्म महाराष्ट्रभर पसरिला ही गोष्ट जग-विख्यात आहे. प्रस्तुत ग्रंथांत ह्या सर्वांच्या उपदेशाची चांगली ओळख करून दिली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज हे या संतांच्या प्रभावळींतले अग्रगण्य. तेव्हां त्यांच्या २५०० विषयवारीनें दिलेल्या सटीप निवडक ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग व पदें ह्या ग्रंथांत घेतलीं आहेत. ' ज्ञानेश्वरीची ' भूमिका ' या पहिल्या प्रकरणांत सद्गुरुस्तवन, कृष्णार्जुनांची अन्योन्यप्रीति, गीताशास्त्रविषयक विषय, मराठी भाषेचें व ग्रंथाचें गौरव इ० मथळ्यांखालीं त्या त्या विषयांवरील ज्ञानोबा-रायांच्या निवडक ओव्या एकत्रित केल्या आहेत. पुढें कर्मयोग, ज्ञानयोग व भक्ति-योग यावरील ज्ञानेश्वरांच्या सर्व शिकवणी क्रमानें व विषयवारीनें दिल्या आहेत.

ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेंतील संतवाङ्मयाचें मंथन करून हें नवनीतच काढलें आहे.

पृ. सं. ४८० असून किंमत अवघी दोन रुपये. ट. ख. ८५

मिळण्याचीं ठिकाणें:—१ रा. रा. व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें शहर.

२ रा. रा. तुकाराम पुंडलिक शेटये पुस्तकविक्रेते माधवबाग मुंबई.

|| ॐ श्रीसद्गुरुसमर्थ ||

श्रीमत्परमहंस श्रीपुरुषोत्तमानंद सरस्वतीस्वामी

# ऊर्फ श्रीविष्णुकवि महाराज यांचें चरित्र.

## १ कुलवृत्तांत.

नमन प्रथम माझें सद्गुरू साधु-संता ।
करुनि भजन पूजा दाविती नीति-पंथा ।
तरुनि भवनिधी हा तारिती आणिकातें ।
बुडति विषयपंकीं, ऐशियाही दिनातें ॥ १ ॥

१. चांद्रवंशी यादवांनीं देवगिरी येथें पुष्कळ वर्षें राज्य करून सनातन वैदिकधर्म, तीर्थक्षेत्रें व हिंदुसमाज यांचें उत्कृष्ट संरक्षण केलें. पण कोणताच काल शाश्वत टिकत नसतो, त्याचप्रमाणें यादव घराण्याचीही सद्दी संपल्यामुळें श्रीरामदेवराय जाधवांच्या कारकीर्दींत अल्लाउद्दिन खिलजीच्या उत्पातांत हें नमुनेदार हिंदु राज्य बरेंच खिळखिळें केलें गेलें. चौदाव्या शतकाच्या आरंभीं रामदेवरायाचा पुत्र शंकरपाळदेव यास इ० स० १३१३ मध्यें मारून हें महाराष्ट्राचें-मराठ्यांचें-देवाब्राह्मणांचें-सनातन धर्माचें राज्य त्यानें धुळीस मिळविलें. सन १३१८ मध्यें हरपालदेव यानें पुनः स्वातंत्र्य कमविण्याचा प्रयत्न केला, परंतु शेवटीं त्याचीच सालडीं निघून या क्षात्रिय राज्याचा पूर्णपणें अंत झाला. यादवांचें राज्य बुडवूनच मुसलमानांची तृप्ति झाली नाहीं. तर त्यांनीं चातुर्वर्णीय प्रजेचा मनस्वी छळ करण्यास सुरवात केली. यावेळीं या मुसलमान बहादरांनीं गरोदर स्त्रियांची गय केली नाहीं; खेडीं उध्वस्त करून जाळण्यापोळण्यास कमी केलें नाहीं; पतिव्रतांची अब्रू घेतांनां बिलकूल शरमले नाहींत; कडव्या धर्माभिमानाचें पिशाच्यानें या धर्मवेड्या लोकांनीं असहाय हिंदु लोकांवर अत्यंत जुलूम केला. हिंदूंच्या परमपूज्य गोमाता यांचीं नरडीं चिरण्यास बिलकूल दिक्कत वाटली नाहीं. देवळांत अगणित संपत्ति सांपडते या आशेनें देवळें भ्रष्ट करणें व पूज्य हिंदु देवतांचे तुकडे पाडणें हा त्यांचा स्वधर्मच होऊन बसला. जे लोक त्यांच्या तडाख्यांत सांपडले त्यांच्या सररहा शेंड्या काढून त्यांना मुसलमान बनवून आपलें स्वराज्य व स्वधर्म खंबीर करण्याचे सर्व प्रकार त्यांनीं केलें. यावेळीं देवगिरी व त्याचे भोंवताली शें दोनशें कोसांतील लोकांची

फारच गांजणूक झाल्यामुळें चातुर्वर्णीय लोक वाट फुटेल तिकडे पळून गेले व या भयंकर परिस्थितींत प्राणाचें व स्वधर्माचें संरक्षण करण्यासाठीं ठिकठिकाणीं जाऊन राहिले. यावेळीं सातारा जिल्ह्यांत वस्ती कमी होती ती या लोकांमुळें भरून निघाली. प्राणावांचून कलेवर अथवा चंद्रविरहित अमावास्येची रात्र, तशीच क्षात्रशक्तीच्या आधारावांचून महाराष्ट्रीयांची स्थिति झाली होती.

२. कसबे धांदरफळ, ता. संगमनेर, जि. अहमदनगर हा गांव चांगल्यापैकीं होता. या गांवांत सर्व जाती अगदीं गुण्यागोविंदानें राहत होत्या. क्षात्रकुलावतंस राजाची राजधानी जवळ असल्यामुळें येथील ब्राह्मणांस उपजीविकेसाठीं दुसऱ्याचें तोंडाकडे बिलकूल पाहावें लागत नसे. ब्राह्मणवर्ग त्यागवृत्तीनें आपल्या स्वकर्मांत गढलेला असे. यादव व त्यांच्या पदरचे सरदार, मानकरी वगैरे क्षत्रिय समाज व ब्राह्मण यांचा या वेळीं फारच सलोखा होता. सुप्रसिद्ध भास्कराचार्याचा नातू ज्योतिषी म्हणून यादवांचे दरबारींच उदयास आला होता. वैश्य शूद्रही हिंदु स्वराज्यामुळें आनंदांत होते. इतर वर्णही आपापल्या अधिकाराप्रमाणें हिंदुधर्मांत राहून स्वराज्याच्या प्रेमाचे पेले प्राशन करीत होते. परंतु यादवांचें राज्य नामशेष होतांच या सर्वांचे आधार तुटून गेले व पाण्यावांचून माशांची जशी तडफड होते तशी स्थिति या लोकांची झाली. ही आपत्ति धांदरफळ या गांवावरही येऊन थडकली.

३. धांदरफळ या गांवीं ब्रह्मवृंदांचीं घरें बरींच होतीं. पण पूर्वीइतकीं हल्लीं राहिलीं नाहींत, असें अनुभवास येत आहे. चौदाव्या शतकांत हिंदी स्वराज्य नाहींसें झाल्यावर सर्वस्वी आधार तुटलेल्या या गांवच्या लोकांनीं कसे तरी दिवस काढले. पंधराव्या शतकापासून कांहीं ब्राह्मण कुटुंबें चरितार्थासाठीं देशांतर करूं लागलीं. असा क्रम चालू असतां सतराव्या शतकांत येथील जोशी वतन घराण्यांतील एक गृहस्थ कुटुंबपरिवारासह आवडत्या गांवास शेवटचा नमस्कार करून निघाले व पुष्कळ वर्षें फिरत फिरत अखेर सातारा येथें येऊन त्यांनीं वास्तव्य केलें. गांव जरी त्या गृहस्थांनीं सोडला, तरी गांवची स्मृति म्हणून त्यांनीं स्वतःचें उपनांव धांदरफळे म्हणून धारण केलें. हें धांदरफळे काश्यपगोत्री शुक्लयजुःशाखीय वाजसनेयी होत. साताऱ्यास भिक्षुकी करून त्या कालांतील ब्राह्मणांच्या शुद्धाचाराप्रमाणें हें घराणें राहिलें होतें. यापेक्षां या घराण्याची जास्त माहिती बिलकूल उपलब्ध होत नाहीं. सातारा येथें या घराण्यास राहण्यास जागा सहज मिळाली; पण इनामदारी, वतनदारी वगैरे कांहींच प्राप्त झालें नाहीं. हें घराणें साताऱ्यास जरी आलें तरीही त्याचा धांदरफळ गांवचा संबंध तुटला नव्हता. नेहमीं कार्यप्रसंगीं जाणें येणें होत असे.

४. परंपरेच्या माहितीवरून समजतें कीं, सातारच्या घराण्यांपैकींच कांहीं दिवस परत धांदरफळ येथें आलेल्या एका सात्विक, सदाचारी ब्राह्मणास शके १६६५ चे सुमारास पुत्र झाला. त्यास हा पुत्र श्रीगजाननाचे उपासनानुग्रहामुळें झाला होता म्हणून त्याचें नांव चिंतामणि असें ठेविलें. चिंतामणि वारंवार साताऱ्यास जात येत होतें. या वेळीं सातारा येथें महाराष्ट्र धर्माचें-देवाब्राह्मणांचें-हिंदवी स्वराज्य उत्तम प्रकारें चाललें होतें. श्रीगोब्राह्मणप्रतिपालक, छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांनीं यवनांचे जाचांतून महाराष्ट्र देश सोडवून त्यांचें नंदनवन बनविलें होतें. श्रीसमर्थांचेही धन्योद्गार निघाले होते कीं,—

बुडाले सर्वही पापी, हिंदुस्थान बळावलें ।
अभक्तांचा क्षयो झाला, आनंदवनभुवनीं ॥ १ ॥
उदंड जाहलें पाणी, स्नानसंध्या करावया ।
जप तप अनुष्ठानें, आनंद वन भुवनीं ॥ २ ॥

महाराष्ट्रदेवी जगज्जननि प्रतापगडवासिनी इची पूर्ण कृपा व श्रीसंतवर्य श्रीज्ञानेश्वरमहाराजांपासून तहत तीनशें वर्षें तुकारामरामदासांपर्यंतच्या साधुवर्यांनीं हिंदुधर्माबद्दल तीव्र अभिमान उत्पन्न करून ठेविला होता. 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' हें तत्व या महात्म्यांनीं महाराष्ट्रभूमींत फार खोलपर्यंत पोंचविलें. यामुळेंही यावनीय धर्मवृद्धीस मोठा बांध पडलाच होता. सर्व जनतेचें लक्ष ईश्वराच्या अवताराकडे लागून राहिलें होतें, त्याचें दृश्यफळ श्रीशिवाजीमहाराजांचे जन्मांत मिळालें. महाराजांनीं श्रीतुकारामबोवांच्या उपदेशानें व श्रीसमर्थ रामदास यांच्या अनुमतीनें हिंदवी स्वराज्य स्थापून महाराष्ट्रभूमि व धर्म यवनांचे कचाटींतून सोडविला. जिकडे तिकडे हिंदु धर्माचा जयजयकार होऊन राहिला होता. शके १६६५ ( सन १७४३ ) चे सुमारास श्रीशाहूमहाराजांची आनंददायक कारकीर्द सुरू होती. याच सुमारास चिंतामणीचा जन्म झाला. नंतर कधीं साताऱ्यास कधीं धांदरफळास राहावें अशांत त्यांचा काल गेला. चिंतामणीचें चरित्र फारसें उपलब्ध नाहीं. परंतु आख्यायिकेवरून पाहतां हे मोठे ईश्वरभक्त होते. श्रीगजाननाची व श्रीदत्ताची उपासना हे करीत असत. उत्कृष्ट संततीबद्दल हे दत्तात्रयांची नेहमीं प्रार्थना करीत. भानुदासाचे कुलावर जसा आपला अनुग्रह होता तसाच मजवर असावा, असेंही ते विनवीत असत, व "तुझ्या वंशांत संत निर्माण होतील" असा आशिर्वाद श्रीदत्तात्रेयाकडून मिळाला होता. शाहूमहाराजांचे पश्चात् सातारचे गादीवर रामराजे आले होते. सर्व सत्ता पुण्यास पेशव्यांच्या हातांत होती, तरी सातारा राजधानींत सर्व व्यवहार उत्तम चालत होते. चिंतामण-

भटजींचा योगक्षेम बरा चालू होता. त्यांनां शके १७०५ ( सन १७८३) चे सुमारास शिवराम नांवाचा एक मुलगा झाला. चिंतामणी हे शके १७४५ चे सुमारास कैलासवासी झाले व प्रपंचाचा सर्व भार शिवरामावर पडला.

५. धांदरफळ येथें उत्पन्न फार कमी झालेलें. तशांत दुष्काळ व पेंढारी लोकांची लुटालूट, यामुळें शिवरामभटजी त्रस्त झाले होते. दारिद्र्याचे कडक चटके सारखे बसूं लागले होते. शके १७३२ मध्यें त्यांना कन्या झाली, तिचें नांव **बयाबाई** ठेविलें. शके १७३५ त पुत्र झाला, त्याचें नांव **श्रीधर ऊर्फ रावजी** ठेविलें व शके १७३७ त दुसरा पुत्र झाला, त्याचें नांव **भालचंद्र** ठेविलें.

६. चरितार्थ चालविण्यासाठीं शिवरामानें आपल्या आवडत्या गांवास शेवटचा नमस्कार केला व पत्नी व लहान तीन मुलें घेऊन पूर्वींचा आधार असलेल्या सातारा शहराचा रस्ता सुधारला. वाटेनें या मंडळींचे फारच हाल झाले. सातान्यास आल्यावर ही दारिद्र्याची आग शमविण्यासाठीं भिक्षांदेही करावी लागली. याप्रमाणें दारिद्र्य भाजून काढीत होतें. तरीही शिवराम भटजी आपल्या तीर्थरूपाप्रमाणेंच श्रीदत्तात्रयाची उपासना चालवीत असत. श्रीदत्त-कृपाप्रसादानें यांना दिवस चांगले येऊं लागले, व मंगळवार पेठेंत यांनीं एक उत्तम घरही बांधलें. मुलीचें लग्न व मुलांचे व्रतबंधसंस्कारही थाटांत झाले. आपणावर देवानेंच दया केली असें समजून ते उपासनेंत फारच गढून जात असत. सातान्यास यावेळीं प्रतापसिंह महाराजांची कारकीर्द चालू होती. शिवरामभटजींचा प्रपंच प्रायः राजघराण्यांतूनच चालत असे. भोसल्यांचे आप्त श्रीमंत डफळे जत-सरकार यांचेहि वास्तव्य सातान्यास मंगळवार पेठेंत वरचेवर होत असे, व मंगळवार पेठेंतच शिवरामभटजींचें घर असल्यामुळें त्यांचा आश्रय सहजच शिवरामभटजीस मिळत असे. याप्रमाणें शिवरामभट-जींचा प्रपंच व परमार्थ उत्तम चालत होता.

७. बयाबाईचें लग्न झालें. पण दुर्दैवामुळें तिला अकालीं वैधव्यप्राप्त झाल्या-मुळें ती माहेरीं राहूं लागली. मातृपितृसेवा व ईश्वराची उपासना यांत तिचा शेवटपर्यंत उत्तम काळ गेला. शिवरामभटजींचा संसार इतरांना आदर्शभूत होता. बालविधवा असली म्हणजे तिचें आयुष्य चुलींत व कदान्न खाऊन जननिंदेचे वाग्बाण व तिरस्कार सहन करून गेलें पाहिजे, असें बहुतेक ठिकाणीं प्रतीतीस येत असतें; परंतु बयाबाईची स्थिति फारच वेगळी होती. या बाईनीं आपल्या उभयतां बंधूंचा सर्व संसार आपलेवर घेतला होता व इची सत्ता सर्वांवर चालत असे. बंधूंचीं मुलें, भावजया वगैरे सर्वजण बयाआक्कांचे आज्ञेंत वागत असत. दोघे बंधूही तिला मातेप्रमाणें मानून तिचा सन्मान ठेवीत असत. शेजारच्या स्त्रिया, लेंकी, सुना वगैरेना बयाबाईआक्कांचा फार

मोठा आश्रय मिळत असे. यावरून विधवेबद्दल तरी या कुटुंबांत अनुदार वृत्ति खचित नसल्याचें दिसून येतें.

८. उपनयनसंस्कारानंतर रावजी व भालचंद्र या दोघा मुलांस ह्या काला-प्रमाणें वैदिक शिक्षण व कर्माचें शिक्षण प्राप्त झालें. दोघेही बंधू वडिलांबरोबर राजवाडा व इतर ठिकाणीं भिक्षुकी वृत्तीस जात असत. श्रीकृष्णातीरीं जेहेकरा-पूर क्षेत्र आहे, तेथील वे. शा. सं. झिंप्रेशास्त्री यांनीं आपली कन्या रावजीस समर्पण केली. तिचें नांव गंगाबाई ठेविलें. त्रिपुटी येथील पांडुरंग बोवा दगडे यांचे कन्येशीं भालचंद्र यांचा विवाह झाला. तिचें नांव अन्नपूर्णा होतें राव-जींचें तीस वर्षांपर्यंत त्यांना वडिलांचा आश्रय होता. शके १७६५ मध्यें शिवरामभटजी कैलासवासी झाले. ह्यावेळीं रावजीस एक कन्या झाली होती. प्रसिद्ध सत्पुरुष श्रीविष्णुकवींचा जन्म होण्यापूर्वी एकच वर्ष आजोबांनीं निज-धाम गांठलें; यामुळें विष्णुकवींना पाहण्याचें भाग्य त्यांना लाधलें नाहीं ! वडि-लांच्या शिकवणीप्रमाणें अत्यंत सात्विकपणें दोघा भावांचा प्रपंच चालू होता. शिवरामभटजीही फार शुद्धाचरणी, नीतिमान् व ईश्वरभक्त असल्यामुळें दोघे-पुत्रही त्यांचेसारखेच शुद्ध, नीतिमान् व ईश्वरभजनींरत असे होते.

९. वडिलांचे पश्चात् या तिघा भावंडांनीं संसारांतील कामाची वांटणी करून घेतली. वडील बहीण बयाअक्काचे हातीं गृहव्यवस्था सोंपविली. रावजींचें अक्षर फारच सुंदर असल्यामुळें ते सतत पोथ्या–ग्रंथ–लिहिण्याचें काम करूं लागले, व भालचंद्रबोवा गांवांत भिक्षुकी करीत असत. भालचंद्रबोवांना नित्य मोठी प्राप्ति होत असे, ती घरीं येतांच बयाबाईचे स्वाधीन करण्यांत येई. रावजी रात्रंदिवस ग्रंथ लिहिण्यांत निमग्न असल्यामुळें ते गृहव्यवस्थेकडे अगर भिक्षुकीकडे फारसे पाहात नसत. त्यांचें ग्रंथलेखन म्हणजे त्या कालचा छापखानाच होय. कित्येक राजेरजवाड्यांनीं यांचेकडून ग्रंथ लिहवून घेतले आहेत. हल्लींही त्यांचे हातचे ग्रंथ सातारा प्रांतीं पाहण्यास सांपडतात. त्यावरून त्यांच्या दिव्य अक्षराची कल्पना येते. हे बंधुद्वय प्रपंचपरमार्थाचा बोजा धकवीत असतांनाच श्री प्रतापसिंह महाराजांवर इंग्रज प्रभूंची अवकृपा होऊन त्यांना राज्य चालविण्याचे दगदगींतून इंग्रजांनीं मुक्त केलें व श्रीक्षेत्र काशी येथें परमार्थ साधनांत हरिहरि म्हणावयास लावून आनंदांत काळक्रमणा करावयास ठेविलें ! नंतर प्रतापसिंहांचे बंधु शहाजी महाराज यांची स्थापना इंग्रज सरकारचे हस्तें साताराच्या शिवछत्रपतींचे सिंहासनावर झाली ! ! शहाजी महाराजांनीं निपुत्रिक होण्याचें पाप केल्यामुळें अशा पातक्याकडे गादी चालविण्यापेक्षां सन १८४८ त साताराचें राज्य इंग्रज प्रभूंनीं आपल्यांत सामील करून घेतलें. शिवछत्रपतींनीं अनेक आपत्ती सोसून यवनांच्या ताब्यांतून महाराष्ट्रभूमि मुक्त केली होती,

ती आतां चक्रनेमिक्रमानें इंग्रज सरकारच्या अधिकारांत जाऊन आंग्लप्रभूच्या वैभवाचे गोड घुटके घेण्याचा योग महाराष्ट्र देवीस प्राप्त झाला!! ही सर्व हकिकत समक्ष पाहण्याचें भाग्य रावजी व भालचंद्रबोवा यांच्या नशिबीं होतें. राजाश्रय तुटल्यावर मग मात्र सर्वांसच विपरीत प्रसंग आला. त्याप्रमाणें हेही बंधु उदासीन झाले. तथापि.

तुका म्हणे तया भार घातलिया ।
उपेक्षिना दयासिंधु माझा ॥ १ ॥

या संतोक्तीवर भर देऊन दोघा बंधूनीं संसार व परमार्थ चालू ठेवला.

---

ॐ श्रीसद्गुरु समर्थ.

## २ बालपण.

भो सद्गुरु, ताराया दीन जनालागि धरिसि अवतार ।
यास्तव नमितों तुजला, धरिली कास मी तुझी मला तार ॥ १ ॥

१. रावजी भटजी व भालचंद्रबोवा ठरल्यापद्धतीप्रमाणें संसार ईश्वरार्पण बुद्धीनें चालवीत होते. संसाराचें कार्याखेरीज यांचा काल ईशस्मरणांत जात असे. सौभाग्यवती गंगाबाई या पतिव्रता व ईश्वरावर अत्यंत प्रेम ठेवणाऱ्या असत. प्रपंचांत त्यांची वागण्याची हातोटी फार उत्तम असे.

कुटुंबं रक्षयिष्यामि आवृद्धबालकादिकम् ।
अस्ति नास्तीति पश्यामि द्वितियेसा पदेऽब्रवीत् ॥

या सप्तपदींतील प्रतिज्ञेप्रमाणें कुटुंबधर्म त्यांना उत्तम चालवितां येत असे. कुटुंबांतील बालकें, वृद्ध व इतर संसर्गी यांचें प्रेम संपादन करून त्यांचें संरक्षण करणें व घरांतील वस्तु नीटनेटक्या जपून ठेवणें, कमजास्त पाहणें हा सुगृहिणीचा धर्म आमची मातामही गंगाबाई इजमध्यें उत्तम उतरला होता. ज्यांना कुटुंबधर्म चांगले चालविता येतात त्यांना समाजधर्म सहज पाळतां येतात. या नियमानुसार गंगाबाईही गोरगरिबांचे फार उपयोगी पडे शिवाय घरांत बयाबाईंचें शिक्षणही उत्तम प्रकारचें लाभत असें. यामुळें वेदांताचा अभ्यास न करतां भूतमात्रीं नम्रत्व हे गुण या माउलींचे ठिकाणीं आपोआपच उतरले होते. म्हणूनच या घराण्यावर परमेश्वराची कृपा झाली. चिंतामणीपासून तिसरी पिढी रावजी भटजींची होती. या तीनही पिढयांत सात्विक व ईश्वरपरायण मंडळी होती. अशा सत्कुलांत उच्च दर्जाचे जीवच जन्म घेतात. " शुचीनां

श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते " या नियमाप्रमाणें या शुद्ध कुळांत कांहीं कांहीं शुद्धात्म्यांनीं जन्म घेतले.

२ शके १७५४ चे सुमारास रावजी भटजीस प्रथम कन्यारत्न झालें. या कन्येचें नांव यशोदा ठेविलें होतें. पुढें या ईश्वरपरायणकुलांत सौभाग्यवती गंगाबाईचें उदरीं शके १७६६ ( मिति नक्की सांपडत नाहीं ! ) मध्यें एक पुत्ररत्न झालें. पुत्र होतांच सर्वत्र अगदीं स्वानंद पसरला. बारा दिवस पुत्रोत्सवाचा सोहळा उत्तम प्रकारें झाला. भालचंद्रभटजींनीं या पुत्रोत्सवांत अतिशय खर्च करून सतत आनंद वाढविला. बारावे दिवशीं शास्त्रोक्त पद्धतीनें नामकरण संस्कार करून या शिशूचें " कृष्णा " असें नामकरण केलें. हाच कृष्णा पुढें संतकवि " विष्णुकवि " या नांवानें प्रसिद्ध झाला. अशी एक दंतकथा आमचे घराण्यांत आजवर ऐकिवांत आहे कीं, त्या वेळचे साताऱ्चे राजज्योतिषी यांनीं कृष्णाचें जातक वर्तवून फार आनंद प्रगट केला " हा पुत्र तुमचे वंशांत कुलदीपक होईल. पण आपल्या कुटुंबनीय मंडळीस थोडा दुःखदायकही होईल. " मुलगा कुलदीपक होणार या आशेनें मुलाकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें. हळूहळू कृष्णा बोबडें बोलावयास व रांगावयास लागला. वडिलाबरोबर यानें पूजा करण्यास बसावें, त्यांचे प्रमाणें भस्मधारण, संध्या देवपूजा आरती करून देवांस व सर्वांस नमस्कार घालावें याचे पूजेचे वेळीं रुद्राचे मंत्र याच्या बोबड्या वाणीनें सहज प्रगट होत असत.

३. यानंतर सौ. गंगाबाईस दोन मुली दोन दोन वर्षांच्या अंतरानें झाल्या. मुलींचीं नांवें काशी व सीता अशीं ठेवलीं होतीं. तदनंतरचे कालांत दोन अल्पायुषी मुलें झाल्यावर शके १७७९ मार्गशीर्ष व॥ १ रोजीं रावजींना कन्या झाली तिचें नांव रंगु ऊर्फ रमाबाई. हीच माझी मातुश्री होय. नंतर शके १७८२ मध्यें विष्णु या नांवाचा मुलगा झाला. हे विष्णुपंत हल्लीं नागपुरास आहेत. त्यानंतर भीमा नांवाची मुलगी झाली. तिचेनंतर अनंत हा मुलगा शके १७८७ चैत्र शु॥ १४ रोजीं झाला. हा अनंता माहूरचे मठांत श्री विष्णुकवींच्या तोडीचा सत्पुरुष झाला. त्याची संक्षेपतः हकीगत पुढें येईलच. नंतर शके १७९० आश्विन शु. १ रोजीं गणपति नांवाचा मुलगा झाला. हे गणपतराव हल्लीं माहुरचे आसपासच असतात. रावजींना एकंदर अकरा मुलें झालीं. पैकीं दोन अल्पायुषीं मुलें सोडून देऊन बाकी पांच मुली व चार मुलगे होते. भालचंद्रबोवास अंबाबाई नांवाची फक्त एकच मुलगी होती. ह्याप्रमाणें हें विस्तृत कुटुंब अगदीं सुखासमाधानानें कालक्रमण करीत होतें.

४. आमचा लहान कृष्णा श्री बालकृष्णाप्रमाणेंच लीला करूं लागला. याचे अंगीं हूडपणा बिलकूल नव्हता. अगदीं लहानपणींच यास अक्षर ओळख झाली

होती. चालतां येऊं लागतांच शेजारच्या शंकराचे देवळांत जाऊन देवांकडे पाहात बसावें व तेथून त्यास त्याचे मंडळींनीं घेऊन जावें. रोज पुराणश्रवणास जावें व पुराणांतील ध्रुव, प्रल्हाद, राम, कृष्ण इत्यादिकांचीं चरित्रें श्रवण करावीं, व त्या सर्व गोष्टी घरीं येतांच आतेजवळ बसून तिला सांगाव्या. यामुळें कृष्णावर धार्मिक संस्कार फार उत्तम झाले. त्या काळचे प्रसिद्ध हरिदास ह. भ. प. हरिबोवा सातपुते रहिमतपूरकर हे नेहमीं साताऱ्यास कीर्तनासाठीं येत असत. त्यांचीं अत्यंत प्रेमळ कीर्तनें राजवाडा व इतर ठिकाणीं होत असत. हरीबोवांचें व रावजीचें मित्रत्व असल्यामुळें ते नित्य यांचें घरीं येत असत. त्यांचें प्रत्येक कीर्तनास कृष्णा नियमानें जात असे, व कीर्तन श्रवण करून येतांच घरच्या मंडळीस सर्व कीर्तन सांगत असे. कीर्तनांतील भक्तीचा विषय हा हरीबोवांस वारंवार विचारून त्यांना पुरेपुरेसे करीत असे. ध्रुवप्रल्हादांना लहानपणींच परमात्मा नारायण प्रसन्न कसा झाला वगैरे हकीगती यानें विचाराव्या. शंकराचार्य, ज्ञानेश्वर यांचें लहानपणचें अलौकिक सामर्थ्य श्रवण करून मला असें होतां येईल काय असा बोवांस यानें प्रश्न करावा. यामुळें बोवांचें लक्ष कृष्णापाशीं गुंतलें व ते त्याच्या घरच्या मंडळीस नेहमीं सांगूं लागले कीं, कृष्णा हें एक अमोलिक रत्न तुमचें घरीं आहे. याची कुशाग्र बुद्धि असून ईश्वराविषयीं फार पूज्य बुद्धि आहे. यावरून हा कोणीतरी योगभ्रष्ट पुरुष असावा असें ते वारंवार म्हणत असत.

५. कृष्णानें बाल संवगडी जमवावे व आपण हरिदास होऊन श्रवण झालेल्या चरित्राचें कीर्तन करावें, नामाचा गजर मुलांसह करावा. कीर्तन व नामस्मरण हा त्याचा खेळच होता. परसांतील औदुंबराचे खालीं बसून श्रीदत्ताचे पादुकांची पूजा मोठ्या भक्तिभावानें करावी. भजन, पूजन, पुराण, कीर्तन यांत याच्या खेळाचा काल जात असे. तसाच चुलत्याबरोबर लहानपणींच सूर्यनारायणास एकशेंआठ नमस्कार घालीत असे, यामुळें त्याचें शरीर गुटगुटित झालें होतें. कृष्णा हा अतिशय देखणा, गोरा व भगवद्भक्तीचे तेजांत रंगलेला असल्यामुळें सर्वांना प्रिय झाला होता. घरच्या माणसांस तर फार कौतुक वाटेच, पण शेजाऱ्या पाजाऱ्यांस सुद्धां या मुलाचे गुण पाहून संतोष होत असे. यास हट्ट ठाऊक नसे. भावंडांशीं भांडण कधींच करीत नसे. एखादा पदार्थ मिळाल्यास तो सर्वांस वांटून देत जावा, यामुळें सर्व मुलेंही याजवर खूष असत. संत, देव, ब्राह्मण यांजविषयीं आदर, नम्रत्व, शुचिर्भूतता, सत्याची आवड, निरालस्य व मोकळी वृत्ति हे गुण याचे ठिकाणीं सहज प्रगट दिसूं लागले. हे मिळविण्यासाठीं त्यास कांहींच प्रयत्न करावे लागले नाहींत. बालपणींच हे अनेक गुण एकत्र आल्यामुळें शांति ही सहजच कृष्णाजवळ नांदूं

लागली. त्याची नयनमनोहर बालमूर्ति पाहून कोणीही सहजच मोहित होत असे व आबालवृद्ध त्याजवर फार प्रेम करीत असत व हा मुलगा श्रीकृष्णाचा अवतार आहे असें म्हणत असत.


६. वयाच्या सातवे वर्षीं फार मोठया थाटानें कृष्णाचा मौंजीबंधन संस्कार झाला. मुंज होण्यापूर्वींच याला कर्माचें वळण लागलेलें होतें. नंतर थोड्याच वेळांत तो वेदाध्ययन करूं लागला. गुरुजींच्या साह्यानें संध्या, पुरुषसूक्त, रुद्र आणि बरींच स्तोत्रें पाठ करविण्यांत आलीं. याचें पाठांतर होण्यास बिलकूल उशीर लागत नसे. आपल्या भिक्षुकी घराण्यास योग्य व उपयोगी येईल असें शिक्षण देण्यासाठीं वडिलांनीं बरेच प्रयत्न केले. परंतु हें शिक्षण कृष्णास मानवेना. ज्यानें अनेक लोकांस भक्तिपंथें स्वोद्धाराचा मार्ग चालण्याचें शिक्षण दिलें तो काय उपाध्यायपणाच्या शिक्षणांत थोडाच सांपडणार ? प्रातर्विधि आटोपून शीतोदकाचे हौदावर स्नान, संध्या, पूजा, पांचशेंपर्यंत सूर्यास नमस्कार इत्यादि आह्निक करावें. स्नानापूर्वीं बिलकूल खाऊं नये. सकाळीं व सायंकाळीं देवांस व वडील मंडळीस नमस्कार करी व भजन पूजनांत निमग्न असे. शिवाय आठवे वर्षांपासून श्रीगुरुचरित्रवाचनाचा त्यास हव्यास लागला. गुरुवारीं उपोषण करून सायंकाळीं पूजा, आरती थाटानें करावी; घरांत धान्य सांठविण्याचें अंबार असे त्यांत बसून एकांतांत ध्यानधारणा करावी. याप्रमाणें त्याचा शुचिर्भूतपणा व कर्माचार पाहून सर्व लोक आश्चर्यानें थक्क होत असत. कृष्णाचें अक्षर दिवसेंदिवस वडिलाप्रमाणेंच उत्तम तयार होत गेलें.

७. रहिमतपूरकर बोवांचें कीर्तनांत सगुणनिर्गुण, जीवशिव, जगत्ईश्वर, मायाब्रह्म यांचा विचार झालेला कृष्णा निष्ठेनें ऐकत असे व आपणास कलियुगीं देव कसा भेटेल याची पृच्छा तो सतत करीत असे. त्याचें बुद्धिबल पाहून हरिदास, पुराणिक थक्क होत, व यास आपण धंदेवाईक भक्तांनीं काय बोध करावा असें म्हणून ते कृष्णाबद्दल अत्यंत सद्गदित होत असत.

८. कृष्णा आतां नेहमीं श्रीगुरुचरित्राचीं पारायणें करूं लागला व एकांतांत बसून ध्यानधारणा व सकल साधनांचें सार जें नामस्मरण तें करूं लागला. पांडुरंग महाराज त्रिपुटीकर यांचे कडून कृष्णास कांहीं आसनांची व प्राणायामाची माहिती मिळाली. दिवसेंदिवस कृष्णा एकांतांत जास्त राहूं लागला. अनुष्ठान संपलें कीं, बाहेरील संवगड्यांस प्रल्हादाप्रमाणें हा उपदेश करीत असे, हें त्याचें आचरण पाहून घरांतील मंडळीस हा वैराग्यसंपन्न होणार व प्रपंचपाश झुगारून देणार असें वाटूं लागलें. गांवांत अगर कोस दोन कोसांत कोणी संत आल्याची बातमी लागतांच कृष्णा ताबडतोब त्याचे दर्शनास जाऊन नम्र भावानें त्याचे चरणीं लीन होत असे; व परिश्रम करून त्याचें प्रेम संपादन

करीत असे. हा संतसंगतींत राहिला म्हणजे त्यास आपलेपणाचा, घरादाराचा, आईबापांचा पूर्ण विसर पडत असे. धन्य कुल तेंच कीं, ज्या कुलांतील मुलास वयाचे बारावे वर्षी संत सहवासांत आपलेपणा मुरवितां येतो.

## वंशावळ.



बहु अवघड असे संतभेटी । परि जगजेठीं करुणा केली ॥
तुका म्हणे मग नये वृत्तीवरी । सुखाचे शेजारीं पहुडेन ॥

अशी उच्च दर्जाची स्थिति कृष्णाची होत असे. कृष्णानें आपले मातापित्यास व कुलास धन्य केलें. हा त्याचा सद्गुण त्याच्या बंधनास कसा कारण झाला व त्या मायापाशाच्या बंधांतून एकदम सुटका कशी झाली हें पुढील प्रकरणांतून वर्णन करण्यांत येणार असल्यामुळें येथें जास्त विस्तार करीत नाहीं.

---

श्रीसद्गुरु समर्थ.

## ३. विवाह व गुरुप्राप्ति.

तारुण्ययुक्त जरि रूपवतीहि भार्या ।
राहेचि तत्पर तुझ्या वचनींच कार्या ॥
कालें करूनि परि ती रडवील जाणा ।
' कोठेंहि श्रीगुरुविना सुख तें मिळेना ' ॥ १ ॥

१. मागील प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें कृष्णास संतसहवास व ईश्वरप्रेम फार आवडूं लागलें, व यासाठीं कथाकीर्तनें, पुराणें वगैरेंच्या श्रवणाचा नाद त्यास अतिशय लागला. मुलाचें हें चिन्ह पाहून याचें चित्त संसारासक्त होऊन हळूहळू प्रापंचिक भार घेण्यास कृष्णा कसा समर्थ होणार ही चिंता त्याचे वडीलास व चुलत्यास उत्पन्न झाली. यांत त्यांचे दृष्टीनें कांहींच वावगें नव्हतें. कोणासही आपल्या मुलाबद्दल असें वाटणें सहजच आहे. व याच दृष्टीनें मुलांना शिक्षण मिळत असतें. मग कृष्णाचे वडील तरी यास अपवाद कसे होणार? घरच्या प्रपंचांतील कार्यापेक्षां कृष्णाचें लक्ष संतसमागमांत अधिक गढून राहतें, हें पाहून आनंद तर होत असेच, परंतु आतांपासून हा जर वैराग्यशील बनला तर बरें नव्हे असेंही वारंवार त्यांच्या मनांत येत असे. व आतां कृष्णाचा विवाह करून पत्नीरूप पाशानें त्यास घट्ट आवळून टाकावें असे विचार घरांत सुरू झाले. मातुश्री गंगाबाईनीं तर ताबडतोब रुकार दिला, व लहानपणींच वधूवरें कशीं गोड दिसतात याचें रसभरित पुराण त्या सतत वाचूं लागल्या.

२. एकेदिवशीं ह. भ. प. रहिमतपूरकर बोवा घरीं आले असतां भालचंद्रबोवांनीं ही कथा त्यांचे जवळ सहज निवेदन केली, व कृष्णास संसारबद्ध केलें पाहिजे असें म्हणाले. त्यांचें सर्व बोलणें ऐकून घेऊन बोवांना आनंद वाटला, पण एका जीवाच्या पारमार्थिक उन्नतींत विघ्न उत्पन्न करणें बरें नव्हे असेंही ते म्हणाले. परंतु त्यांच्या सांगण्याचा कोणाच्याच चित्तावर बिलकूल परिणाम झाला नाहीं.

व कृष्णाचें लग्न यंदा केल्याशिवाय राहावयाचें नाहीं असा सर्वांचा निर्धार झाला. हा त्यांचा निर्धार पाहून कृष्णासारखा देखणा, हुषार आणि भगवद्भक्त जामात करावा अशी बोवांस इच्छा उत्पन्न झाली.

कुलं च शीलं च वयश्च रूपं विद्यां च वित्तं च सनाथतां च ।
एतान्गुणान्सप्त परीक्ष्य देया कन्या बुधैः शेषमचिंतनीयम् ॥१॥

वरपरीक्षेचें या सप्तगुणांत कृष्णा पूर्णपणें उतरत आहे असें बोवांनीं पाहिलें व रावजीकडे आपले बंधु सीतारामबोवा यांची कन्या कृष्णास करून घेण्याविषयीं विनंति केली. या भगवद्भक्त घराण्याशीं आपला संबंध होत आहे आणि वधूही वधू-परीक्षेंत बरी दिसल्यावरून सर्वांनीं बोवांची विनंति मान्य केली. वधूवरांचें घटित पाहून तिथिनिश्चय केला, व सुमुहूर्तावर कृष्णाचें लग्न झालें. **शुभ मंगल सावधान** हीं अक्षरें कानीं पडतांच श्री समर्थ रामदास सावध होऊन पळून गेले, हा विचार कृष्णाजीचें मनांत आला. पण त्याच्या परिस्थितीमुळें त्यास लग्न समारंभांतून हालतां आलें नाहीं. पुरोहितांनीं लग्नप्रयोग उत्तम पार पाडला. सीमांतपूजा, देवप्रतिष्ठा, वाङ्-निश्चय, गौरीहर, मधुपर्कपूजा, कन्यादान, लाजाहोम, सप्तपदी, ऐरणीदान, गृहप्रवेश, लक्ष्मीपूजनादि सर्व विधि यथाशास्त्र पद्धतीनें झाले.

३. विवाहविधींतील रहस्य उपाध्यायांना अगर वधूवरांच्या पित्यांना जर कळतें तर किती तरी चांगलें झालें असतें. पण फार वाईट वाटतें कीं, आम्हां आर्यांचें शोडष संस्कार जीवांची ऐहिक व पारमार्थिक उन्नति करणारे असतांही त्यांकडे समाजाचें अत्यंत दुर्लक्ष झालें आहे. सर्वच संस्कार दिव्य आहेत. प्रस्तुतचे भौतिक शास्त्राचे बोलबाल्याचें काळांत हे संस्कार ह्मणजे कर्मकचाट वाटतें. परंतु भौतिक शास्त्राची दृष्टि लावून जरी शोडष संस्कार तपासले तरीसुद्धां फार आनंददायक मर्म लक्षांत येतें. विशेषतः प्राचीन आर्यांनीं—ऋषींनीं—विवाहप्रयोग इतका सुंदर रचला आहे कीं, त्यांत वधूवर, उभयतांचीं मातापितरें व समाज या सर्वांसाठीं कांहीं प्रतिज्ञा करून ठेविल्या आहेत. त्या प्रतिज्ञांप्रमाणें वधूवर, त्यांचे मातापिता व समाज या सर्वांनीं वागण्याचें ठरविल्यास प्रत्येक कुटुंब-प्रत्येक गृह—नंदनवन झालेले दृष्टीस पडेल. यासाठीं संस्कारांत काय दिव्यत्व भरलें आहे हें उपाध्यायवर्ग व यजमानवर्ग यांनीं प्रस्तुत कालीं समजून घेणें अत्यंत जरूरीचें आहे. संस्कारांवर चिकित्सक दृष्टीनें मीं निबंध लिहिला आहे. तथापि अनेक अडचणींमुळें तो अप्रकाशित राहिला आहे. विवाहसंस्कारांतील मर्म व त्याचें दिव्यत्व व त्यावरून सुचलेले विचार मांडण्याचें हें स्थळ नसल्यामुळें फक्त किंचित्

दिग्दर्शन केलें आहे. त्यावरून समाजाचें लक्ष या विषयाकडे वेधेल अशी आशा आहे.

४. कृष्णाचा लग्नसोहळा फारच थाटाचा झाला. ह्या कालाप्रमाणें रहिमतपूरकर बोत्रांनीं देणगीही पुष्कळ दिली. वधूप्रवेश होऊन वधूचें नांव " राधाबाई " ठेवण्यांत आलें. हा राधाकृष्णांचा लहानसा गोजिरवाणा जोडा किती सुंदर दिसत आहे असें म्हणून सर्वांस आनंद झाला. गंगाबाईचे आनंदास पारावार राहिला नाहीं. यावेळीं कृष्णाचें वय १२ वर्षांचें व राधाबाईचें वय नऊ वर्षांचें होतें.

५. आतां मात्र कृष्णाचें लक्ष संतसहवासापेक्षां संसाराकडे लागेल असें वडील मंडळीस वाटूं लागलें. राधाबाई गृहकृत्यांत हुषार व विनयशील असल्यामुळें तिजबद्दल सासरचे मंडळींत प्रेम उत्पन्न होण्यास मुळींच उशीर लागला नाहीं. सर्वांची ती आवडती झाली. आतां प्रपंचाचा भार थोड्या काळांत अंशतः तरी कृष्णा उचलील असें वाटूं लागलें, व त्यास त्याप्रमाणें शिक्षणही मिळूं लागलें. परंतु कृष्णानें निराशा कशी केली याचा वृत्तांत ऐकण्यास पुढील प्रकरणापर्यंत थांबलें पाहिजे.

६. लग्नानंतर कृष्णानें कीर्तन पुराण वर्ज केलें नाहीं. पूर्वींपेक्षांही त्याची चित्तवृत्ति परमार्थसाधनाकडे जास्त ओढ घेऊं लागली. श्रीगुरुचरित्राचीं पारायणें अगदीं एकांतांत बसून करावींत, नित्य पारमार्थिक ग्रंथ वाचावेत, साताऱ्यास मंगळवार पेठेंत लोणारआळी आहे तेथें रोज याच्या पुराणास मंडळी जमत. त्या ठिकाणीं रामविजय, हरिविजय, भक्तविजयादि प्राकृत ग्रंथ अती रसाळ वाणीनें हा लहान मुलगा सांगत असे. तेथील मंडळी यास देव म्हणत असत. पुराणाचे वेळीं कृष्णा आला म्हणजे देव आला व त्याचा सुवास सुटला आहे असें म्हणून ती भाविक मंडळी कृष्णाचा फार आदर करीत असत. त्यास एकांताची फारच हौस होती. बाहेर आल्यावर सवंगडी जमवून कीर्तनद्वारां उपदेशाचें कार्य तो करीत असे. प्रल्हादाचें चरित्र या बालश्रोत्यांस त्यानें सांगावें व

गड्यांनो घ्या हरिच्या नामा । लिहितां कशास ओनामा ॥

हें शिकवावें.

कौमारे आचरेत्प्राज्ञो धर्मान्भागवतानिह ।
दुर्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थदम् ॥ भागवत ॥
बहुता जन्मा अंतीं जन्मलासी नरा । देव तूं सोयरा करी बापा ॥
॥ तुकाराम ॥

याप्रमाणें मुलांना उपदेश करून बालगोपालांच्या संगतींत कृष्णा कृष्णमय होऊन स्वतःचें देहभान विसरत असे; वृत्ति अगदीं तदाकार होत असत.

ऐसें नेणों काय अपैसें । तया तेंचि कीजे अभ्यासें ।
समाधि घर पुसे । मानसाचें ॥ ज्ञानेश्वरी अ. ६ ॥

एकांतांत समाधिसुख त्याची पाइकी करूं लागलें, व लोकांतांत बालगोपालादिकांना भगवद्भक्तीचा उपदेश करतांनाही समाधि याचें घर विचारीत येत असे. श्रीमदाद्य शंकराचार्यांनीं आठवें वर्षीं संन्यास घेऊन सोळा वर्षांपर्यंत अप्रतिम भाष्यें लिहिलीं.* श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं पंधराव्याच वर्षीं ज्ञानेश्वरीसारखा लोकोत्तर ग्रंथ निर्माण केला. श्रीनृसिंहसरस्वतींनीं आठवे वर्षीं संन्यास घेतला. वगैरे उदाहरणें कृष्णासमोर असत व तदनुरूप तोही परमार्थासाठीं अधिकारी बनत चालला. असे पुरुष योगभ्रष्ट असतात. पूर्वजन्मीं शिल्लक राहिलेला योग या जन्मीं लहानपणींच पुरा करितात.

" पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।
नहि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ गीता अ. ६ ॥

तंव कृष्ण म्हणती पार्था । जया मोक्षसुखीं आस्था ।
तया मोक्षावांचूनि अन्यथा । गति आहे गा ? ॥ १ ॥
परि एतुलें हेंचि एक घडे । जें माझारीं विसवावें पडे ।
तेंही परि ऐसेनि सुरवाडें । जो देवा नाहीं ॥ २ ॥
एऱ्हवीं अभ्यासाचा उचलता । पाउलीं जरी चालता ।
तरि दिवसा आधीं ठाकता । सोहं सिद्धीतें ॥ ३ ॥
परि तेतुला वेग नव्हेचि । म्हणऊनि विसावा तरि निकाची ।
पाठीं मोक्षु तंव तैसाची । ठेविला असे ॥ ४ ॥
ज्ञानेश्वरी अ. ६

यावरून पाहतां मागील जन्मीं जो योग होणें शिल्लक राहून विसांवा घेतला होता, तो या जन्मांत लहानपणींच सहज सिद्ध होतो.

मोटकी देहाकृती उमटे । आणि निजज्ञानाची पाहां . टे ।

---

× आचार्यांच्या भाष्यग्रंथाबद्दल पाश्चात्य तत्ववेत्ते मॅक्समुल्लर, शोपेनहार वगैरे मुक्तकंठानें स्तुति करतात. एकच उतारा देतों.

" आचार्यभाष्यासारख्या सुंदर ग्रंथाचें एखाद्या युरोपियन भाषेंत संपूर्ण भाषांतर झाल्याशिवाय तत्वज्ञानाचा इतिहास पुरा होणार नाहीं. प्रत्यक्ष सरस्वतीस सुद्धां आचार्यभाष्याची महती गातांना शीण आल्याशिवाय राहणार नाहीं. "

सर वुइल्यम जोन्स्.

सूर्यापुढें प्रगटे । प्रकाशु जैसा ॥ १ ॥
तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ।
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥ २ ॥
तिये सिद्ध प्रज्ञेचेनि लाभे । मनचि सारस्वतें दुभे ।
मग सकळ शास्त्रें स्वयंभे । निघतीं मुखें ॥ ३ ॥
अमरीं भाट होइजे । मग मृत्युलोकातें वानिजे ।
ऐसें जन्म पार्था गाजे । ते तो पावे ॥ ४ ॥

याप्रमाणें कृष्णास लहानपणींच आपोआप बोध ठसावला, व प्रभूच्या सगुण प्रेमांत स्वतःचा विसर पडूं लागला. भूकतहान, शीतउष्ण, अथवा झोंप यांची त्यास बाधा होईनाशी झाली. श्रीगुरुचरित्राचीं पारायणें व संतसहवास यांशिवाय त्याला दुसरें कांहींच सुचत नव्हतें. एकदां " सद्गुरुवांचोनि सांपडेना सोय " यावर त्यानें कीर्तन श्रवण केलें. रामकृष्णादिकांनींही गुरु केले होते, नामदेव गुरूवांचून कसा कच्चा राहिला होता वगैरेचें श्रवण केल्यावर असा मार्गदर्शक गुरु आपणांस कसा प्राप्त होईल अशी त्यास अत्यंत तळमळ उत्पन्न झाली. गुरुप्राप्तीसाठीं बाहेर कोठें जावें तर घरांतून बाहेर जाण्याची परवानगी मिळत नसे.

संसारबंधनिर्मुक्तिः कथं स्यान्मे कदा प्रभो ।
इति या सुदृढा बुद्धिर्वक्तव्या सा मुमुक्षुता ॥ अपरोक्षानुभूति ॥
संसारबंधापासुनी सुटे देवा कसा कधीं ? ।
दृढ बुद्धि अशी तीव्र मुमुक्षा तेचि बोलिली ॥

वामन पंडित.

याप्रमाणें त्याचे ठिकाणीं गुरुप्राप्तीविषयीं तीव्र तळमळ उत्पन्न झाली. अन्नपाणी गोड लागेना. कृष्णा जरी अनेकजन्मसंसिद्ध होता तरीही वर लिहिलेल्या रामकृष्णादिकांच्या उदाहरणांवरून व ध्रुवप्रल्हादांना नारायणाची प्राप्ती करून देणारे गुरु जसे भेटले तसे मला कधीं भेटतील ही तळमळ सारखी सुरू होती. एके दिवशीं गुरुचरित्राचें एकांतात पारायण केल्यावर दृष्टांत झाला कीं, तूं पांडुरंग बोवापासून उपदेश घे. दुसरे दिवशीं जन्ममरणात्मक संसारबंधापासून मुक्त होण्याचें ज्ञान गुरूपासून संपादन करण्यासाठीं मुण्डकोपनिषदांत सांगितल्याप्रमाणें.

तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥

याप्रमाणें पांडुरंग बोवाकडे जाऊन त्यांच्या चरणावर मस्तक लीन केलें व

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ॥ गींता

मला संसारबंधनांतून सुटण्यास प्रभूची कृपा कोणत्या उपायानें होईल तो उपाय सांगा अशी कळकळीची विनंति केली. शिष्य प्रज्ञावंत व अधिकारी आहे असें पाहून गुरूंनीं अनुग्रह केला व शिष्यास कृतार्थता आली. जीवशिवाचें ऐक्य घडलें; भेदाची मिरगांठ उकलली. जन्ममरणाचें बिरडें तुटून गेलें. गुरूपदेशाबरोबर ही खात्री होणारे जीव किती धन्य म्हणावे !

अभंग—पांडुरंगें सत्य कृपा मज केली । निरसोनि संदेह देहबुद्धी ॥ १ ॥
जीवशिवा शेज रचिली स्वानंदें । आउटावे पदीं आरोहण ॥ २ ॥
निजीं निजपदीं निजविला तुका । अनुहात हलरूं बाळका गाये ॥३॥

७. कृष्णाचे चुलते भालचंद्रबोवा यांचे श्वशुर पांडुरंगबोवा हे त्रिपुटीस श्री गोपाळनाथ सत्पुरुष होऊन गेले त्यांचें वंशज होत. श्रीएकनाथ महाराजांचे परंपरेंतील हा मठ आहे. देवनाथ, दयाळनाथासारखे या परंपरेंत सत्पुरुष झाले आहेत. पांडुरंगबोवास प्रापंचिक पाश कोणताच राहिला नसल्यामुळें ते मुलीच्या घरीं माडीवर राहिले होते. सुंदर ब्रह्मकर्म करून मधुकरीवर निर्वाह करीत असत व राहिलेला वेळ हरिस्मरणांत घालवीत असत.

बाहेरी कर्में क्षाळिला । भीतरीं ज्ञानें उजळिला ॥

अशी पांडुरंग बोवाची स्थिति होती.

अशा गुरूचा अनुग्रह कृष्णास होण्याबरोबर जन्माचें सार्थक झालें असें त्यास वाटूं लागलें. एक वर्षपर्यंत त्यानें श्रीगुरुसेवा उत्तम प्रकारें केली. गुरु उठण्यापूर्वीं आपण उठून त्यांची खोली स्वच्छ झाडून सारवून ठेवावी, स्नान करून त्यांना पूजेची तयारी करून द्यावी, गुरूच्या आज्ञेप्रमाणें सर्वदा वागावें व सन्निधं राहून सेवा करावी व नित्य बोधामृतपान करावें. गुरुसेवेची आवड त्याचे ठिकाणीं उत्कृष्ट उत्पन्न झाली होती.

एखादिया वेळां । श्रीगुरूचिया खेळा ।
लोण करी सकळा । जीविताचें ॥ ज्ञा. अ. १३ ॥
जो गुरुदास्ये कृशु । जो गुरुप्रेमें सर्पाषु ।
जो गुरुआज्ञे निवासु । आपणचि ॥
जो गुरु कुळें सुकुलीनु । जो गुरुबंधु सौजन्यें सुजनु ।
जो गुरु सेवाव्यसनें सव्यसनु । निरंतर ॥
गुरु संप्रदाय धर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम ।
गुरु परिचर्या नित्यकर्म । जयाचे गा ॥
गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माता गुरु पिता ।
जो श्रीगुरु सेवे परौता । मार्गु नेणें ॥
श्रीगुरूचें द्वार । तें जयाचें सर्वस्व सार ।

गुरुसेवकां सहोदर । प्रेमें भजे ॥
जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र ।
गुरुवाक्या वांचूनि शास्त्र । हातीं न शिवे ॥
श्रीगुरूचें उशिटें । लाहे जैं अवचटें ।
तैं तेणें लाभें विटे । समाधीसी ॥
जया इये भक्तीची चाड । जया इयें विषयींचें कोड ।
जो हें सेवेवांचून गोड । न मनी कांहीं ॥
तो तत्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेंचि आवो ।
हे असो तो देवो । ज्ञान–भक्त ॥ ज्ञानेश्वरी ॥ अ. १३

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम् ।
मन्त्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा ॥
गुरुर्देवो गुरुर्धर्मो गुरुनिष्ठा परं तपः ।
गुरोः परतरं नास्ति नास्ति तत्वं गुरोः परम् ॥ गुरुगीता ॥

याप्रमाणें भावना ठेवून अक्षय गुरुसेवारत असावें. " गुरोः पादोदकं पानं गुरोरुच्छिष्ट भोजनं " याप्रमाणें नित्य चरणतीर्थ व प्रसाद घ्यावा व रात्रंदिवस गुरुसेवेंत तल्लीन राहावें. याप्रमाणें एक वर्षभर क्रम चालला. नंतर एके दिवशीं शिष्याकडे पाहून—

" ब्रह्मविद् इव ते सोम्य मुखं भाति "

" बाळा तूं ब्रह्मनिष्ठ आहेस. तुझ्या मुखावर ज्ञानाची चमक दिसूं लागली आहे, " असें म्हणून सद्गुरूनीं हा आपला आवडता बाळ मांडीवर बसवून प्रेमभावानें कुर्वाळिला, आलिंगिला व डोळ्यांतील प्रेमाश्रूंनीं त्यास न्हाऊं घातलें व त्यास म्हणाले " आतां आम्हीं तुला सेवेंतून मुक्त केलें आहे, अतःपर तूं फक्त सगुण परमात्म्याचे दर्शनाची लालसा ठेव. तुझ्यामुळें माझाही उद्धार होणार आहे. " अशी गुरुच्या मुखांतील अमृतमयवाक्यें श्रवण करून सद्गुरूच्या पायांवर मस्तक ठेविलें. नंतर कृष्णाचे ठिकाणीं सगुण साक्षात्काराची तीव्र तळमळ उत्पन्न झाली व ती पुढें कशी शांत झाली हें पुढील प्रकरणांत समजणार आहे.

८. कृष्णानें चतुर्थाश्रम घेतल्यावर माहूरच्या आश्रमांत माघ शुद्ध द्वादशीस पांडुरंगबोवांची पुण्यतिथि ते करीत असत. पांडुरंगबोवांची गुरुपरंपरा माहीत नाहीं. कारण श्री विष्णुकवींनीं संन्यास घेतल्यावर संन्यास देणारे गुरु उमरखेडचे चिन्मयानंद संस्थानचे अधिपति नित्यानंदस्वामी यांची परंपरा ते चालवूं लागले व तीच परंपरा विष्णुकवींचे शिष्य चालवीत आहेत.

९. नंतर क्रमाक्रमानें रावजींच्या मुलांच्या मुंजी व लग्नें झालीं. यशोदा

त्यांचे घराजवळ दत्तोबा मांडवगणे यांस व काशी शेजारींच सदोबा काळे यांस दिली. मेढयाचे लक्ष्मणराव देशपांडे यांना सीता दिलीं. रंगुबाईस खरशी येथील सदाशिवपंत जोशी यांनां व भीमास श्रीक्षेत्र धोम येथें वामनराव जोशी यांनां दिली. विष्णुपंतांचें लग्न होऊन त्यांना पांच मुली झाल्या व त्यांचें कुटुंब निवर्तले. अनंता हा नैष्ठिक ब्रह्मचारी राहून पुढें संत झाला. गणपतरावही ब्रह्मचारीच आहेत. या घराण्याचा पुत्रसंततीकडून वंशविस्तार झालेला नाहीं.

---

श्रीसद्गुरुसमर्थ.

## ४ गृहत्याग.

सोडी आस खरोखरीच मनुजा, राहूं नको मंदिरीं ।
संगें कोणि नये तुझ्या गृह–सुता–संपत्ति वा सुंदरी ॥
ऐसा कांहिं विचार मानसिं धरी, लागे गुरूच्या पदा ।
ब्रह्मानंदचि प्राप्त होइल तुला, वारील तो आपदा ॥ १ ॥

१ दिवसेंदिवस कृष्णा मोठा होत आहे, आतां प्रपंचाचा भार घेऊन तो वडिलांना चांगली मदत करील अशी आशा वाटूं लागली. परंतु कृष्णाचें चित्त श्रीदत्तदर्शनासक्त झाल्यामुळें प्रपंचांत बिलकूल रमेनासें झालें. श्रीदत्तात्रयाचें सगुण दर्शन होऊन मला कृतार्थता कधीं येईल असें चिंतन सतत होऊं लागलें व घरांतील मंडळी तर त्याचे या विचाराचे आड येऊन संसाराचें बंधन दृढ करूं लागली. परंतु कृष्णा मात्र सारखा तळमळूं लागला.

जेव्हां वसंतऋतुयामिनि शुक्लपक्षीं । नक्षत्रराजमुख लक्षि चकोरपक्षी ।
तेव्हां म्हणेन कवि त्या बसुनी वनांत । श्रीदत्त दत्त जय श्री गुरुदेव दत्त॥१॥

अशी तीव्र चिंता सुरू असतां एक दिवस कृतनिश्चय करून कृष्णा एका नाटक मंडळीबरोबर निघून साताऱ्यापासून सोळा कोसांवर श्रीकृष्णाकांठीं कऱ्हाड क्षेत्रीं जाऊन पोंचला. नाटक मंडळीचे बरोबर गेल्यास आपले इच्छेप्रमाणें श्रीदत्तक्षेत्रांत राहून कार्यसिद्धि करावी असा त्याचा हेतु होता. कृष्णा कऱ्हाडास नाटक मंडळींत आजारी होऊन पडला. कृष्णा घरांत नाहीं असें पाहून घरची मंडळी चिंतातुर झाली. पण ज्यांचे संमतीनें कृष्णा गेला होता त्यांजकडून बातमी फुटल्यामुळें ताबडतोब भालचंद्रबोवा कऱ्हाडास गेले व कृष्णास घेऊन आले. यानंतर पांच सहा महिन्यांनीं कृष्णास श्रीनृसिंहवाडीहून चुलत्यांनीं आणलें व आतां तुला लागेल तें मी येथें पुरवितों परंतु तूं आम्हांस सोडून क्षणभर सुद्धां बाहेर जाऊं नयेस असें वारंवार परोपरीनें विनवून चुलते भालचंद्रबोवा यांनीं सांगितलें.

कृष्णाचें चित्त संसारासक्त होत नाहीं हें बरें नाहीं असें सर्वांस वाटूं लागलें. तथापि कृष्णाचे इतर गुणांमुळें त्याजवर घरची व बाहेरची मंडळी प्रेमच करीत असत. बाहेरून येण्यास कृष्णास उशीर झाल्यास सर्वजण चिंतातुर होत असत. वडील व चुलते तो आल्याशिवाय भोजनही करीत नसत. या प्रमाणें कृष्णानें आपल्या उत्तम आचरणानें सर्वांचीं अंतःकरणें आकर्षण करून घेतलीं होतीं.

२. वयाच्या चवदावे वर्षीं सौ. राधाबाई ऋतुमती झाल्या. लगेच त्यांचा गर्भाधान संस्कार थाटानें पार पडला. आतां मात्र कृष्णाचे पायांत स्त्रीरूपी शृंखला पक्की अडकली आहे; हा आतां कोठें पळून जाण्याचें भय राहिलें नाहीं; आतां प्रपंचांत त्याचें चित्त लागेल, असें सर्वांस वाटूं लागलें.

३. परमात्म्याचें सगुण दर्शन झालें पाहिजे हा ध्यास सारखा लागून राहिला होता. मधून मधून लहानशी कविता करावी ती दर्शनाचे तळमळीचीच असावी. हें लहानपणचें कवित्व उपलब्ध होत नाहीं यास इलाज नाहीं! एकदां त्याचे गुरूजवळ घरच्या मंडळींनीं विनंति केली कीं, कृष्णाचें चित्त प्रपंचाकडे वळेलसा बोध करा. गुरुमहाराजांना शिष्याचा अधिकार माहीत होताच. एके दिवशीं पांडुरंगबोवांनीं कृष्णास उपदेश केला तो असाः—भूतमात्रीं ईश्वर आहे. तो सर्वव्यापी अनंत आहे. प्रत्येक पदार्थमात्रांत त्यास पाहणें हाच सगुण साक्षात्कार आहे. करितां गृहोपाधि न सांडितां प्रपंच व परमार्थ घरीं राहून आनंदानें साधणें हेंच परमार्थसाधन होय.

आतां गृहादिक आघवें । हें कांहीं नलगे त्यजावें ॥
जें वेतें झालें स्वभावें । निःसंग म्हणवुनी ॥ ज्ञानेश्वरी अ० ५ ॥

अभंग—नामसंकीर्तन साधन पै सोपें । जळतील पापें जन्मांतरिचीं ।
नलगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥
ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ।
रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥
याहूनि आणिक नाहीं पैं साधन । वाहतसें आण विठ्ठलाची ।
तुका म्हणे आहे सोपें सर्वांहुनी । शहाणा तो धणी घेतो येथें ॥

अशा तऱ्हेनें उपदेश केला. उपदेश सांगण्याचें बंद झाल्यावर कृष्णानें सांगितलें कीं, महाराज! सगुण परमात्म्याचें दर्शन झालें म्हणजे मला संसार-परमार्थ गोड लागेल तेथपर्यंत मला कांहींच गोड लागत नाहीं, चित्त कोठेंही लागत नाहीं व वृत्ति अगदीं उदासीन झाली आहे.

गर्भाधान होऊन एक वर्ष झालें. नित्य पारायणें व संतसहवास सुख होताच. एके दिवशीं खालील अभंगावर वैराग्यपर कीर्तनाचें श्रवण झालें.

नको नको मना गुंतूं मायाजाळीं । काळ आला जवळी ग्रासावया ।
काळाचिये उडी पडेल बा जेव्हां । सोडविना तेव्हां मायबाप ॥
सोडविना कोणी पाठिची बहिणी । शेजेची कामिनी दूर राहे ॥
तुका म्हणे तुज सोडविना कोणी । एका चक्रपाणी वांचुनिया ॥ १ ॥
सोयरे धायरे संपत्तीचे लोक । निर्वाणीचा एक पांडुरंग ।
झाल्या हीन शक्ति नाक डोळे गळती । सांडोनी पळती रांडापोरें ॥
बाईल म्हणे खर मरता तरी बरें । थुंकोनिया घर नासविलें ॥

वगैरे वैराग्यपर श्रवण होऊन परमार्थाची तीव्र तळमळ सुरू झाली व ध्रुवास जसें मधुवनांत सगुण नारायणाचें दर्शन झालें, तसेंच मलाहि माझ्या श्रीदत्त माउलीचे दर्शन अरण्यांत होईल काय, असा मनाशीं सतत विचार करूं लागला. विचारमग्न स्थितींत दिवसचे दिवस जाऊं लागले, अंतःकरणांत ईश-भक्तीचा ओलावा असल्यामुळें कृष्णा फार तेजस्वी दिसूं लागला. पण त्याचें औदासीन्यामुळें सर्वांना त्याचेबद्दल चिंता उत्पन्न होऊं लागली. *

सौ. राधाबाईचें आचरण फारच उत्तम होतें.

पतिंच परया भक्तया महापुरुष सेवया ।

अगर "स्त्रीणामार्यस्वभावानां पतिरेकोहि दैवतम् ॥
" पतिरेव गुरुःस्त्रीणां. "

याप्रमाणें पति प्रत्यक्ष शंकररूप आहे म्हणून पतिसेवा उत्कृष्ट करीत असत. पतिगृहीं अनुकूल वा प्रतिकूल परिस्थितींत अत्यानंदानें वागत असत. सासू, श्वशुर, नणंद, दीर वगैरेशीं नम्रत्वानें वागावें, त्यांच्या उत्तम आचरणामुळें त्यांनीं लवकरच आपलें गृहिणीपद प्राप्त करून घेतलें. कण्व महर्षींनीं शकुं-तलेस केलेल्या उपदेशाप्रमाणें:—

शुश्रूषस्व गुरून्कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने ।
भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मास्म प्रतीपं गमः ॥
भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी ।
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः ॥ १ ॥

भावार्थ—गुरुजनांचीं सेवा करणें, सवतीशीं मैत्रिणीप्रमाणें वागणें, नवऱ्यानें

* येथवरचें चरित्र श्रीविष्णू कविमहाराज यांचे व माझें सहवासांत समजलेलें; तसेंच लेखनप्रसंगीं माझ्या पूज्य मातृदेवतेकडून तपासलेले व माझे देवमान्य मातुल श्री गुरुदास मामामहाराज यांनीं सांगितलें होतें तसें लिहिले आहे या पुढील चरित्रास प्रत्यक्ष श्रीविष्णु कवींचें कवितेचा आधार आहे."रंगपटावरी स्त्रीपुरुषाची फुटली जोडी" या आत्मवृत्त कथन करणाऱ्या सौ. राधाबाईच्या हृदयस्पर्शी पोवाड्याचा व इतर कवितेचा आणि प्रत्यक्ष त्यांचे सांगण्याचा आधार घेतला आहे.

दुखविलें असतांही त्यावर न रागावणें, सेवकजनांस सांभाळून घेणें, भाग्याचे दिवसांत चढून न जाणें, या गुणांमुळें गृहिणीपद येऊन कुटुंब दिव्य होतें.

श्वश्रूशुश्रूषणपरा नित्यं राममनुव्रतम् ।
पातिव्रत्यमुपालंब्य तिष्ठ वत्से यथासुखम् ॥ १ ॥ अ. रामायण ॥

या सीता देवीस केलेल्या तिच्या मातेचे उपदेशाप्रमाणें राधाबाई वागत असत.

स्त्रीणांच पतिदेवानां तच्छुश्रूषानुकूलता ।
तद्बन्धुष्वनुवृत्तिश्च नित्यं तद्व्रतधारणम् ॥ १ ॥
या पतिं हरिभावेन भजेच्छ्रीरिव तत्परा ।
हर्यात्मना हरेर्लोके पत्या श्रीरिव मोदते ॥

या मनुस्मृतीचे श्लोकांत सांगितल्याप्रमाणें त्या आचार पाळीत होत्या. आर्यसंस्कृतीचें पातिव्रत्य हें एक अंग आहे. प्रस्तुत आर्यसंस्कृतीचे वाभाडे निघत असतांही ठिकठिकाणीं पातिव्रत्य चमकत आहे. अशा माउली सर्वतोपरी वंद्य व धन्यच आहेत. सौ. राधाबाईबद्दल श्रीविष्णुकवींनींही

रंगपटावरी स्त्रीपुरुषांची फुटली जोडी । आतां काय खेळण्याची गोडी ।

या पोवाड्यांत राधाबाईभार्येचे फार उत्तम गुण गाइले आहेत. त्यावरून त्यांची योग्यता व अधिकार मोठा होता हें सहज ध्यानांत येईल.

पाहा पां अनुरागें भजे । जे प्रियोत्तमे मानिजे ।
ते पतीहूनि काय न वानिजे । पतिव्रता ॥ ज्ञानेश्वरी अ. ६ ॥

जी पतिव्रता आपल्या पतीची प्रीतीनें सेवा करते आणि पतीस मान्य होते, त्या पतिव्रतेची पतीपेक्षां वाखाणणी कां करूं नये ?

वर्षभर पतिपत्नीनीं फार आनंदांत काळ काढला. एके दिवशीं कृष्णाजींनीं मी संतसमागमासाठीं तीर्थयात्रेस जातों व लौकरच परत येतों असें पत्नीदेवीस सांगितलें. या हकीकतीचें वर्णन त्यांनीं स्वतः केलेल्या पोवाड्याचे आधारें त्यांचेच भाषेंत देणें बरें, असें वाटल्यावरून तसेंच वाचकांसमोर मांडीत आहे. ( पोवाडा त्यानीं पत्नीनिधनोत्तर रचला आहे. )

## पोवाडा.

रंगपटावरी स्त्रीपुरुषाची फुटली जोडी ।
आतां काय खेळण्याची गोडी ॥ ध्रु० ॥
यापरि गेले सहज आनंदामध्यें दिवस चार ।
पुढें काय सुचला विचार ॥
दैवबळानें गोड वाटला असूनि अविचार !

करावा भूलोकीं संचार ॥
द्यूत खेळतां धर्म न ऐके विहित उपचार ।
कळविला तिला समाचार ॥
ऐकुनि वाटे पडली अंगावर पर्वतधाडी ।
आतां काय खेळण्याची गोडी ॥ ५ ॥

काळगतिचा कठिण फासा ओढुनिया नेतो ।
उद्यां मी मुलखावर जातों ॥
तुजवांचुनि जळहीन मिनापरि केवळ तळमळतो ।
वल्लभे जिव व्याकुळ होतो ॥
परंतु तव संमतें तुझा मी निरोप आतां घेतों ।
परतुनि अविलंबें येतो ॥
कसें करून तरि चार दिवस हे विरहाचे काढी ।
आतां काय खेळण्याची गोडी ॥ ६ ॥

हें ऐकून राधाबाईच्या झालेल्या स्थितीचें वर्णन करितात.

ऐकुनि राधा उलटी झाली खड्गाची धारा ।
वाहाती नेत्रांतुनि धारा ॥
टाकुनि द्यावी आपुली बायको दुसऱ्याचे द्वारा ।
नव्हे हा सूज्ञांचा धारा ॥
टाकुनिया गृहदीप प्रकाशित पतिच्या आधारा ।
कोण स्त्री पडेल अंधारा ।
म्हणे कां करितां ब्रह्मगांठिची तुम्ही सोडासोडी ॥
आतां काय० ॥ ७ ॥

येईन तुमच्या समागमें मी, तुम्ही मजला न्यावें ।
एवढें वचन ऐकावें ॥
मला वाटतें आपण वनामधें आनंदानें राहावें ।
ऋषींचे पुण्याश्रम पाहावे ॥
चार दिवस निश्चिंत वनाचें वैभव भोगावें ।
आपुल्या सेवेंत वागावें ॥
खाऊनि ओला सुकला पाला करूं सुकृत जोडी ॥
आतां काय० ॥ ८ ॥

आहाहा ! काय ही पतिचरणीं निष्ठा ! राधाबाईचें भाषण ऐकून रामायणांतील सीतारामाच्या भाषणाचें स्मरण होतें. राम वनवासास जातेवेळीं सीतादेवीचा सेप मागावयास गेले. सीतादेवीनें मी बरोबर येतें असें सांगितलें. रामांनीं

वनवासाचें भयंकर चित्र रंगविलें. त्यानें सीतादेवी घाबरली तर नाहींच, पण तिचें भाषण आर्यांच्या उच्च संस्कृतीचें दर्शक कसें झालें तें पाहूं. सीता म्हणते. प्रभुराज,

यस्त्वया सह स स्वर्गो निरयो यस्त्वया विना ॥

आपल्याबरोबर अरण्यांत वा कोठेंही असेन तरी स्वर्गसुखांतच असेन। पण आपल्यावांचून मोठ्या राज्यपदावर असेन तरी जेथें आपलें चरण नाहींत तेथें राहणें मला नरकासमच आहे.

"अग्रतस्ते गमिष्यामि मृद्नंती कुशकंटकान् "

आपणाबरोबर अरण्यांत चालत असतांना दर्भ, गवत, कांटे, दगड वगैरेही मला फुलासारखे मऊ लागतील. सीतादेवीच्या भाषणाप्रमाणेंच राधाबाई आपल्या पतीशीं बोलल्या. धन्य आहे या पतिव्रता माउलींची ! व ज्या समाजांत अशा पतिनिष्ठस्त्रिया आहेत, तो समाजही धन्यच आहे.

४ राधाबाईच्या भाषणानें कृष्णास इकडे आड इकडे विहीर अशी स्थिती झाली. घरीं प्रेमळ पतिव्रता स्त्रियेचें प्रेम ओढीत होतें तर पुढचे बाजूस श्री दत्तदर्शनाची तळमळ सारखी ओढ घेत होती, अशा स्थितींत कृष्णावर कोणत्या बुद्धीचा पगडा बसला, हें त्याच्याच शब्दांत पाहूं--

अधिकचि तळमळ वाटे पडेना चैनचि क्षणमात्र ।
सती गुणगंभीर प्रियपात्र ॥
जागत बसली, नाहिं लाविला नेत्राला नेत्र ।
सोडिली झोप सप्तरात्र ॥
परंतु मोठें दैवगतीचें चरित्र विचित्र ।
अचेतन केलें जसें चित्र ॥
आठवे दिवशीं त्या संधीमध्यें साधिली घरफोडी ।
आतां काय० ॥ ९ ॥

राधाबाई सात दिवस सारखी जागत राहिली होती. आठवे दिवशीं रात्रीं तिला झोंप लागतांच कृष्णानें हळूच कोणास न कळवितां आपल्या अत्यंत आवडत्या सातारा शहरास रामराम ठोकला. मातापित्यांचा, बंधुभगिनींचा, प्रियतम पत्नीचा एकदम त्याग केला. घरांतून बाहेर पडल्यावर एकवार घराकडे कृष्णानें दृष्टि टाकून शेवटचें डोळे भरून त्याचें दर्शन घेतलें. देवतांना नमस्कार केला; पण त्यासरसे कृष्णाचें नेत्रांतून गंगायमुनांचे पूर लोटल्याशिवाय राहिले नाहींत, पण समर्थ रामदासांचें उदाहरण व श्रीदत्तदर्शनाची तळमळ यामुळें कृष्णानें मन खंबीर करून धूम ठोकली, तो उजाडेपर्यंत पळतच होता.

जसा काय नळ दमयंतीचें अर्धवस्त्र कापी ।
तेव्हां ती गेली होती झोंपी ॥
तशी दुष्टानें धेनु घातली व्याघ्राच्या खोपीं ।
असूनीं जिवाची संगोपी ॥
त्या दुष्कर्माचेही झाडें पटती अद्यापी ।
कुणी नसे मज ऐसा पापी ॥
अन्यायाविण त्या साध्वीची केलि मानमोडी ।
आतां काय० ॥ १० ॥

कृष्णानें तडक धूम ठोकली तो कोठेंही विश्रांति न घेतां उजाडपर्यंत चालला. नंतर मोठीं शहरें सोडून आडरस्त्यानें जाण्याचा क्रम ठेविला. त्या वेळीं आतांसारखीं आगगाड्या, मोटारी वगैरे प्रवासाचीं साधनें बिलकूल नव्हतीं. यामुळें पायींच प्रवास करावा लागत होता. रोज स्नानसंध्या आटोपून सोय असेल तेथें माधुकरी मागावी, व सकाळसंध्याकाळ चालत असावें. आठदिवस घराकडील मंडळींचें व प्रियपत्नीचें स्मरण होऊन डोळ्यांतून अश्रुपात होत असे. वाटेनें कृष्णाचे अतिशय हाल होत असत. पाऊस, ऊन, चिखल, काटे यांचे आघात सोसावे लागत असून झोंप नीट मिळत नसे. मधुकरीस वेळेवर गेला तर मिळायची. नाहींतर नुसते पाण्यावर राहावें लागत असे. हें वृत्त विष्णुकवि महाराज अगदीं संक्षेपतः कथन करीत असत व तेंही अगदीं क्वचित् प्रसंगीं. पुढील प्रकरणांत आपण कृष्णास माहुरास पोचवूं व त्याचेपुढील प्रसंगांत त्याचें घराकडील हृदयद्रावक प्रसंगाकडे वळूं. हा काळ फारसा दूरचा नाहीं. कृष्णा घरांतून अठरावे वर्षी निघाला व दोन वर्षांत माहुरास पोंचला.

---

ॐ श्रीसद्गुरुसमर्थ.

## ५. तीर्थयात्रा व माहूरला गमन.

१. कृष्णाची स्वारी घरून निघाली ती पंढरपूर कोल्हापूर, बेळगांव, हुबळी, वरून हंपी–विरूपाक्षास जाऊन पोंचली. धन्य कृष्णा ! तुझ्यांत केवढें अचाट वैराग्य बाणलें होतें ! समर्थ स्त्री–पाशांत सांपडण्यापूर्वी पळून गेले. कृष्णास पत्नी उत्तम आज्ञाधारक, वय तरुण, वरीं सर्व तऱ्हेचें आनुकूल्य; असें असतां ईश्वरप्राप्तीच्या तळमळीमुळें इतक्या सर्वांचा त्यानें त्याग केला, हें केवढे शूरत्व आहे ! एखादा शूर रणकर्मांत अगर वाघास पकडण्यास डरणार नाहीं, पण स्त्रीच्या नेत्रकटाक्षांत मात्र त्याचें शूरत्व विरघळून जातें. " कः शूरः " या प्रश्नास आचार्यांनीं उत्तर दिलें आहे कीं, " यो ललना–लोचन–बाणैर्न व्यथितः " याप्रमाणें कृष्णाची स्थिति उत्कृष्ट वैराग्याची होती.

वनिता मनोरम एकांतीं । आपण होउनि पुरुषा प्रार्थी ।
तेथें जो निर्विकल्प चित्तीं । तोचि शंकर म्हणा ये ॥ मुक्तेश्वर ॥

रूपवती सभाग्य उदार तरुण । एकांतीं प्रार्थी स्वयें येऊन ।
ज्याचे विकार न पवे मन । तरी तो नारायण नर नव्हे ॥ श्रीधर ।
मद्यपानं महापापं नारीसंगस्तथैवच
तस्माद्द्वयं परित्यज्य तत्वनिष्ठो भवेन्मुनिः ॥ अवधूतगीता अ० ॥ ८ ॥
वेधा द्वेधा भ्रमं चक्रे कांतासु कनकेषु च ।
तासु तेष्वप्यनासक्तः साक्षाद्भर्गो नराकृतिः ॥ १ ॥

तरुणीची संगति सोडून विषयावर लाथ मारून ज्यांनीं ईश्वरप्राप्तीचा लाहो घेतला ते नर नसून साक्षात् नारायणच आहेत. ब्रह्मांडांतील जीवांस कामिनी आणि कांचन यांचेसारखा दुसरा मोह नाहीं. या मोहास देवसुद्धां बळी पडतात. अशीं उदाहरणें पुष्कळ देतां येतील, परंतु श्रीएकनाथ महाराज यांच्या भाषेंत थोडीं उदाहरणें देत आहे--

निकट विषय स्त्री संगती । मन क्षोभे विषयासक्ती ॥
क्षणार्ध स्त्रीसंगप्राप्ति । पडले अनर्थी सज्ञान ॥ १ ॥
स्त्रीदर्शनें कामासक्त । देवेंद्र झाला भगांकित ॥
चंद्र कलंकिया येथ । केला निश्चित गुरुपत्न्या ॥ २ ॥
सौभरी तपस्वी तपयुक्त । तो मत्स्य-मैथुनास्तव येथ ।
करुनि सांडिला कामासक्त । संग अनर्थ स्त्रियांचा ॥ ३ ॥
कामिनीसंग अति दारुण । शिवासी झालें लिंगपतन ।
प्रमदासंगें सज्ञान । ठकले जाण महायोगी ॥ ४ ॥
नारदें विनोददृष्टीं । कृष्णपत्नी मागितल्यासाठीं ।
तो नारदी केला गंगातटीं । जन्मले पोटीं साठ पुत्र ॥ ५ ॥
॥ नाथभागवत अ. २६ ॥

मोठमोठया देवऋषींची ही अवस्था, तेथें मानवांचा काय पाड असणार ? प्रतिसृष्टि करणारे महा तपोनिष्ठ विश्वामित्र ऋषि यांनींहि साठ हजार वर्षांचें तप कामिनीसंगांत खर्च केलें.

दुर्लभं मानुषं जन्मं भारते तत्र दुर्लभम् ॥

या श्लोकाचें या ठिकाणीं स्मरण झाल्यावांचून राहात नाहीं. भारतवर्षांत ईश्वरासाठीं तनमनधन, सर्वस्व खर्च करणारे महात्मेच या विषयापासून सुटले. ज्यांना ईश्वरावांचून दुसरा विषय गोड वाटत नाहीं, तेंच या कांताकनकपाशांतून निवृत्त होतात. आमचे कृष्णाजींनींही हा मोहपाश भर तारुण्यांत

कसा दूर केला हें समजून त्यांच्या शूरत्वाची व वैराग्याची कल्पना येते. कांहीं जीव प्रपंचास कंटाळून, स्त्रीशीं पटत नाहीं म्हणून वैराग्य धारण करितात. पण तें आपलें वैराग्यच !! कृष्णाची स्त्री पूर्ण अनुकूल, पतिसेवा-परायण असून त्याजवर प्रपंचाची जबाबदारी बिलकूल नव्हती. अशा स्थितींत हा पाश त्यानें तोडला. धन्य कृष्णा ! भाग्यवान कृष्णा !!

दुर्लभं त्रयमेवैतद् देवानुग्रहहेतुकम् ।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ॥

हें दुर्लभत्रय कृष्णास प्राप्त झाले. सद्गुरु परमात्म्याच्या कृपेनें मनुष्यत्व प्राप्त होऊन तीव्र मुमुक्षुत्वही प्राप्त झालें व संतांचा सहवासहि आतांपर्यंत होताच. पुढेंही कसा मिळत गेला हें विशद करूं. कृष्णा दत्तदर्शनलालसेनें वाटेचें हाल. विसरला त्यानें सुखदुःख बाजूस सारलें. दत्तदर्शनावांचून इह-पर भोग तुच्छ वाटूं लागले.

ब्रह्मादि स्थावरान्तेषु वैराग्यं विषयेष्वनु ।
यथैव काकविष्टायां वैराग्यं तद्धि निर्मलम् ॥ ( अपरोक्षानुभूति )
ब्रह्मादिकपदें तुच्छें दुःखदोषानुदर्शनें ।
वाटती काक विष्ठाशीं तेंचि वैराग्य निर्मल ॥ ( वामन पंडित )

या वैराग्यभाग्याचे आधारावर त्याचे ठिकाणीं तितिक्षा उत्तम तयार झाली.

सहनं सर्व दुःखानां तितिक्षा सा शुभा मता ( अपरोक्षानुभूति )
सहनं सर्व दुःखानामप्रतीकारपूर्वकम् ।
चिंता-विलापरहितं सा तितिक्षा निगद्यते ॥ ( विवेकचूडामणि )
सोसणें सर्व दुःखांचें अप्रतीकार पूर्वक ।
चिंता-विलाप रहित तितिक्षा तीस बोलिजे ॥

याप्रमाणें कृष्णानें प्रवास चालू ठेविला. कृष्णासारखे उच्च कोटींतील भाग्यवान पुरुष विरळाच असणार. त्याचें हें चरित्र समजल्यास मुमुक्षूंस तीव्र वैराग्य उत्पन्न होईल अशी आपल्या आचरणानें त्यानें तयारी करून ठेविली आहे.

२ दक्षिणेकडील तीर्थक्षेत्रें फिरत फिरत कृष्णा हंपी विरूपाक्षास गेल्याचें कथानक वर आलेंच आहे. हंपी येथें श्रीमच्छंकराचार्यांचें मठांत जाऊन श्रीचरणीं लीन झाला. श्रीस्वामीमहाराजांना महाराष्ट्र भाषा चांगली येत असे. आचार्य व कृष्णा यांचेमध्यें संवाद झाला तोः—

प्रश्न-आपण कोठून आलां ?
उत्तर-साताऱ्याकडून.
प्रश्न-आपलें नांव काय ?

उत्तर—माझें नांव विष्णु अगर विष्णुदास.

प्रश्न—घरीं परिवार काय आहे ?

उत्तर—मातापिता, बंधुभगिनी, स्त्रीही आहे.

प्रश्न—त्यांना सोडून कां फिरत आहां ?

उत्तर—परमात्म्याचें सगुण दर्शन व्हावें व आपणासारख्या महात्म्यांची संगति घडावी ही वासना दृढतर आहे.

कृष्णाचे बोलण्यांतील ईश्वरविषयक प्रेम व सत्संगाची आवड पाहून आचार्य संतोष पावले व वाटेल तितके दिवस मठांत राहण्याबद्दल आज्ञा दिली. आतां यापुढें कृष्णा असें न लेखितां विष्णुदास या नांवानें लेखणें प्राप्त झालें आहे. आपल्या कृष्णा नांवानें कदाचित् घरच्या मंडळीस आपला तपास लागेल व आपणास आपलें ध्येय प्राप्त न होतांच परतावें लागेल या भीतीनें त्यानें आपल्या धाकटया भावाचें विष्णु हें नांव ठेवून घेतलें. आचार्यमठांत रोज नित्यकर्म, गुरुचरित्र पठण, आचार्य मुखांतून आचार्यभाष्याचें श्रवण, वगैरेत विष्णुदासाचा काळ उत्तम जाऊं लागला. रोज एकादा श्लोक, आर्या वगैरे करून आचार्यपदीं समर्पण करीत असे. त्याचें आचरण पाहून आचार्यांचें फारच प्रेम विष्णुदासावर जडलें.

३ सातारा सोडल्यास एक वर्ष होत आलें. आचार्यमठांत सत्संगति उत्तम होती व कशासच कमी नव्हतें, परंतु विष्णुदासास श्रीदत्तदर्शनाची तळमळ असल्यामुळें तेथें राहण्यास बरें वाटेना. वर्ष भरतांच " शैल्य पर्वतास जावें " असा दृष्टांत झाल्यावरून विष्णुदासांनीं आचार्यचरणीं मस्तक लीन करून शैल्य पर्वतावर जाण्यास आज्ञा मागितली. आचार्यांनीं विष्णुदासाची तळमळ पाहून सद्गदित अंतःकरणानें कृपाशीर्वादपूर्वक जाण्यास अनुज्ञा दिली. विष्णुदासास सोबत–संगतीची जरूरी नव्हतीच. एकट्याचा प्रवास फार उत्तम होतो असें ते सांगत असत. या प्रवासांत भाषेची अडचण असल्यामुळें त्यांना फार कष्ट झाले. पण त्यांच्या निधड्या निश्चयापुढें मार्गांतील दुःखें, संकटें कःपदार्थ ठरलीं. अतीशय हाल भोगीत भोगीत शैल्य पर्वताचे पायथ्याशीं स्वारी आली. तेथें मराठी भाषा बोलणारे हैद्राबादेकडील दोन सोबती मिळाले. श्रीमल्लिकार्जुनास पूजा अभिषेक करण्यासाठीं सवा रुपाया कर द्यावा लागतो. हें समजतांच विष्णुदास फार कष्टी झाले, कारण त्यांचेजवळ व्यावहारिक द्रव्य बिलकुल नव्हतें, व या देवास व्यावहारिक द्रव्याशिवाय भक्त मंडळाची पूजा घेण्यास मनाई होती. ही तऱ्हा पाहून विष्णुदास अगदीं खिन्न झाले, व तसाच पहाड चढूं लागले, परंतु मन फारच अस्वस्थ झालें. त्यांचे सोबती एक मैलभर पुढें जाऊन विश्रांति घेत बसले व विष्णुदास एका झाडाखालीं खिन्नांतःकरणानें बसले.

कामदा—नवसिं घेऊनि द्रव्य पावसी । तरी आम्हा कसीगे निभाविसी ।।
बधिर दूबळे अंध लंगडें । खचित रेणुके सांग एवढें ।। १ ।।
कटक कुंडलें गोफ साखळ्या । हार तुरे हिरे जाइच्या कळ्या ।।
कुठुन आणुं मी उंच लूगडें । खचित० ।। २ ।।
जडित दागिने घालिसी नवे । भुषण आइचें हें नव्हे नव्हे ।।
मनिं विचारुनी तूंचि रोकडें । खचित० ।। ३ ।।
पतित मी आहे थोर पातकी । म्हणुनि प्रार्थना बाई ईतकी ।।
कठिण हें तुला काय सांकडें । खचित० ।। ४ ।।
जननिची कृती चित्तिं नाठवे । अळसलीस कीं काय नूठवे ।।
दिनदयाळ हें ब्रीद नावडें । खचित० ।। ५ ।।
भगवती मला कां न तारिसी । शरण आलिया काय मारिसी ।।
तव कृपांबुधी खंड कां पडे । खचित ।। ६ ।।
जरि असाहि त्वां अंत पाहिला । तरि तुलाचि म्यां देह वाहिला ।।
ढकलिसी मला कां पलीकडे । खचित० ।। ७ ।।

( विष्णुकवि. )

याप्रमाणें मनोमय प्रार्थना करूं लागले. श्रीसद्गुरु दत्तात्रय माउले ! तुझ्या दर्शनाचे आशेनें सर्व संसारावर पाणी सोडून अतिशय कष्ट भोगून येथवर आलों. पण मज अभाग्यास आपलें सगुण दर्शन नाहींच पण पूजासुद्धां होऊं नये काय ? तरी माउले, कृपावंत हो. अशी निश्चळ मनानें प्रार्थना केली. तों शेजारच्या झाडाखालीं एक रुपाया व वर एक पावली होती. ती पाहतांच विष्णुदासास अत्यानंद होऊन तेथें अंतःकरण सद्गदित होऊन प्रेमाश्रू ढाळले.

ज्यानें ज्यानें जैसें ध्यावें । तैसें व्हावें कृपाळे ।।

ही तुकारामोक्ति प्रतीतीस आल्याचा स्वानंद गगनांत मावेना. तावडतोब सवा रुपाया हातांत घेऊन पुढें गेलेल्या सोबत्यांस गांठलें व त्यांना सवा रुपाया दाखवून श्रीकृपेचें अगाध सामर्थ्य वर्णन केलें. तो कल्पवृक्ष असावा अशा समजुतीनें तिघेही परत फिरले व तेथील झाडाखालीं कल्पना करूं लागले. परंतु पुनः लाभ कोणासच झाला नाहीं. हृदयस्थ नारायणच कल्पतरु आहे. तो कृपासागर आहे. " कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे " असा तोच कल्पवृक्ष आहे; हें विष्णुदासाच्या प्रतीतीस आलें.

४. श्री शैल्य पर्वतावर कांहीं दिवस आनंदांत राहून यात्रेचा सोहळा पाहिला.

श्रीशैल्यशिखरं दृष्ट्वा पुनर्जन्म न विद्यते ।।

शैल्यशिखराचें दर्शन पार्वतीचे टेकडीवरून ध्यावें लागतें. पुण्यवानास फार लौकर दर्शन होतें. विष्णुदासासही लौकर दर्शन होऊन श्रीशंकराची यथासांग

पूजा करतां आली. येथेंही संतसहवास झाला. तथापि दर्शनाची लालसा पुरी झाली नाहीं. ती पुरी होण्याबद्दल सारखी तळमळ चालू असतां एके दिवशीं दृष्टांत झाला कीं, " आतां तूं श्रीक्षेत्र मातापुरीं यावें. तेथें अत्र्याश्रमांत मी आहें, शिवाय जगन्माता श्रीरेणुकादेवी येथें आहे. येथें आल्यावर आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील. " हा दृष्टांत झाल्यावर शैल्यपर्वतास वंदन करून विष्णुदास निघाले. मुखानें सतत नामस्मरण करावें, रोज एखादी कविता करावी, असें भ्रमण करीत करीत स्वारी अक्कलकोटास आली. तेथें श्रीदत्तावतारी स्वामी समर्थांच्या आश्रयानें एक महिना काढला. अक्कलकोटास विष्णुदास फार आनंदित झाले. श्रीस्वामी समर्थांनीं माहुरास जाण्याबद्दल आज्ञा करतांच तेथून निघाले. ही गोष्ट शके १७८६ मध्यें घडली. या कालांत श्रीस्वामी समर्थांच्या अलौकिकत्वाचा परिमळ सर्वत्र सुटून अक्कलकोट पुण्यस्थळ होऊन राहिलें होतें.

५ भ्रमण करीत करीत विष्णुदास मोगलाईंत शिरले. श्रीगोदातीरचीं क्षेत्रें पाहात पाहात माहूरच्या रस्त्यास लागले. वाटेंत गोदातीरीं श्रीक्षेत्र बासर आहे तेथें श्रीसरस्वती देवीचें मंदिर आहे. व जवळच व्यास नारायणाची मूर्ति आहे. तेथें विष्णुदास गेले. तेथें श्रीगंगास्नान, मधुकरी वगैरे नित्यक्रम झाला. येथें सरस्वतीचें मंदीर गांवापासून दूर आहे, व जंगलही बरेंच आहे. सरस्वतीचे मंदिरांत कांहीं सेवेकरी राहिले होते. हेही मंदिरांतच राहिले. रात्रीं देवीच्या आरतीचा वगैरे समारंभ होऊन सर्व मंडळी निजली. विष्णुदासास दत्तदर्शनाचे तळमळीनें झोंप मुळींच लागेना म्हणून मंदिरांतून उठून व्यासाचें देवळांत गेले. तेथें बराच वेळ प्रार्थनेंत घालवून परत मंदिरांत येत असतां एक मोठा ढाण्या वाघ सरळ आपले अंगावर येत आहे असें पाहिलें. त्यावेळीं सामान्य पुरुषाची बोबडीच वळली असती. परंतु विष्णुदास बिलकूल न डगमगतां " ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेर्जुन तिष्ठति " या भगवदुक्तीप्रमाणें भूतमात्रीं दत्तात्रय आहे अशी भावना करून श्रीदत्तस्मरणांत वाघाचे पुढें लीन झाले. बराच वेळ देहभानविरहित अवस्थेंत गेला. याच अवस्थेंत प्रत्यक्ष श्रीसरस्वती येऊन तिनें " मी तुझेबरोबर मातापुरास येतें व तुझ्या जिव्हाग्रीं वास करतें " असें सांगितलें. विष्णुदासांची समाधि उतरली व पुढें पाहतात तों वाघ पाठ फिरवून मुकाट्यानें जात आहे. समाधींत सरस्वतीमातेचा झालेला आशीर्वाद पाहून त्यांचा आनंद त्रिभुवनांत मावेनासा झाला. नंतर मंदिरांत येऊन देवीचे चरणीं मस्तक ठेविलें. पण हें आनंददायक वृत्त ऐकून आपलें कौतुक करणार येथें कोणीच नाहीं याबद्दल हुरहुर वाटून अंतःकरण भडभडलें व या ठिकाणीं मातापिता व पांडुरंगमहाराज यांचें स्मरण झालें. रात्रभर जागत राहून सकाळीं स्नानसंध्या आटोपून हे सिद्ध–ठिकाण विष्णुदासांनीं सोडलें.

येथून निघण्यापूर्वीं श्रीसरस्वतीदेवीची " जयदेवी जयदेवी जय मंगलनिलये, ओवाळूं आरती कमलोद्भव तनये " ही आरती व वाग्देवीस्तोत्र तयार केलें.

६. वासरक्षेत्रापासून माहूर सुमारें चाळीस कोस आहे. या प्रवासांत वाटेंत वाढवणें येथील श्रीपरमेश्वराचें दर्शन घेऊन फिरत फिरत स्वारी श्रीक्षेत्र मातापूर येथें जाऊन विश्रांति पावली. प्रथम माहूरक्षेत्रीं श्रीदेवदेवेश्वरासंन्निध वास्तव्य केलें. तेथें जपतपादि अनुष्ठान करून गांवांत मधुकरी मागावी. देवदेवेश्वर हें दत्तात्रयाचें निद्रास्थळ असून येथें महानुभावपंथी महंत असतात. हें ठिकाण फारच चांगलें आहे. अशा ठिकाणीं अनुष्ठान करून सतत श्रीदत्तदर्शनाचें चिंतन करण्यामुळें हा काळ झरझर जाऊं लागला. श्रीदत्तशिखरावर जाऊन श्रीदत्तात्रयदर्शन, तसेंच श्री सौभागिनी अनुसूयामाईचें दर्शन घेऊन पुनीत झालें. विश्वस्वामीणी श्रीरेणुकेचें सिंहाद्रि पहाडावर दर्शन होतां क्षणींच जन्माचें सार्थक झालेसें वाटलें. तेथें त्यांचें इच्छित ध्येय प्राप्त झालें वगैरेची हकिकत पुढें देणार आहें. माहूरक्षेत्रीं विष्णुदास शके १७८६ त गेले. त्यांचे सहवासांत असतां त्यांनीं स्वमुखें हंपी विरूपाक्ष, शैल्यपर्वत, अक्कलकोट व वासरक्षेत्र येथील हकिगती सांगितल्या होत्या त्याच येथें वर्णन केल्या आहेत. त्यांनीं अवांतर तीर्थें, क्षेत्रें पुष्कळच केलीं. परंतु त्यांचें वर्णन ऐकण्यास न मिळाल्यामुळें मला लिहितां आलें नाहीं. सर्व हकिगतीची विष्णुदासांजवळ रोजनिशी असती तर ती परमार्थजिज्ञासूस उत्तम मार्गदर्शक झाली असती. आतां वाचकांनीं सातारा येथें त्यांचे घरीं काय स्थिति झाली हें पाहण्यासाठीं पुढील प्रकरण वाचण्याची तयारी ठेवावी.

---

॥ ॐ श्रीसद्गुरुसमर्थ ॥

## ६ विरह.

१. एका रात्रीं आपल्या प्रियपत्नीला झोंप लागलीसें पाहून कृष्णा घरांतून बाहेर पडल्याचें वर्तमान मागील एका प्रकरणावरून समजलें आहेच. कृष्णा आपल्या भावाचें विष्णु हें नांव धारण करून तीर्थें क्षेत्रें पाहात पाहात श्रीक्षेत्र माहूरला जाऊन पोंचल्याचेंही वर्तमान गत प्रकरणांत आलेंच आहे. आतां कृष्णा गेल्यानंतर सातार्‍यास त्याच्या घरीं काय हकिगत झाली ती पाहणें आहे.

२. पहांटे प्रहर रात्रीचे सुमारास सौ. राधाबाई जागी होऊन पाहते तों पतिराज जाग्यावर दिसेनात व घरांत शोध करतांही सांपडेनात. त्यांचीं वस्त्रें पात्रें पाहतांही जाग्यावर नाहींत हें पाहतांच तिचें अंतःकरणांत भयानें धस्स झालें. सात दिवस जागी राहून आज मला कशी झोंप लागली असें म्हणून

राधाबाई ओक्साबोक्शीं रडूं लागली. तिचें रडें ऐकून घरांतील मंडळी जागी झाली. सासूबाईंनी विचारतां राधाबाईंनीं आठ दिवसांची हकीगत सांगितली, व आपणा सर्वांचा मायापाश तोडून कृष्णा निघून गेला अशी सर्वांची खात्री झाली. गंगाबाईंनीं गाईसारखा हंबरडा फोडला, व हे कृष्णा, कृष्णा, अरे बाळ, सखया कसारे निष्ठुर होऊन मला वनवासी करून सोडून गेलास, असें म्हणून त्या मूर्च्छित झाल्या. बयाबाई, रावजी, भालचंद्रबोवा सर्वच शोकाकुल झाले. रावजींनी अश्रुपूर्ण नयनानें बंधूकडे पाहिलें. बंधु म्हणाले, दादा, शोक करूं नका. पूर्वी दोन वेळ जसा मी त्यास परत आणला, तसाच आतांही परत घेऊन येईन. भालचंद्रबोवांच्या मुखांतील ही वाक्यें म्हणजे प्रेतास परत प्राण आणण्यासारखीं होतीं. तथापि राधाबाईंनीं हे प्रयाण पूर्वीप्रमाणें नव्हे असें म्हटलें, तरी एक दोन दिवस थांबण्याबद्दल भालचंद्रबोवा म्हणाले. सकाळीं ही वार्ता आळींत पसरतांच आळींतील मंडळी यांचे घरीं येऊन शांतवन करूं लागली. भालचंद्रबोवा लगेच कृष्णाचे तपासास रवाना झाले. ते आतां कृष्णास घेऊन येतील अशी आशा सर्वांस उत्पन्न झाली.

टाकुनि गेला पती सतीला त्या निजल्या जागीं ।
जाहली दचकुन ती जागी ॥
अकस्मात दुर्विषार शंभर विंचवांची नांगी ।
टोंचल्या वाटति सर्वांगीं ॥
दुःखाग्नीमध्यें करपलिं गात्रें जशीं सगळीं वांगीं ।
विपत्तीस झाली विभागी ॥
रडे पडे आक्रोशे ओरडे आरडे शिर फोडी ।
आतां काय० ॥

भालचंद्रबोवा आशेचा किरण दाखवून गेले तथापि राधाबाई व गंगाबाई यांना बिलकुल विश्वास वाटेना. त्यांनीं शोक आवरल्यासारखें दिसत होतें. तथापि त्यांनीं अन्नपाणी सोडलें होतें. राधाबाईच्या डोळ्यांतील पाणी बिलकूल खळत नव्हतें. भालचंद्रबोवा येण्याची सर्वजण पांखरासारखी वाट पाहात होते.

३. भालचंद्रबोवा निघाले ते कऱ्हाड, औदुंबर, भिलवडी, श्रीनृसिंहवाडी, कोल्हापूर, रहिमतपूर, माहुली, धोम, वाई, महाबळेश्वर पाहून पंधरा दिवसांनीं परत आले. ते येण्यापूर्वीं त्यांच्या वाटेकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलें होतें. कृष्णा आतां येईल, मग येईल, अशा चिंतनांत मंडळी असतांना एकदाचे भालचंद्रबोवा घरीं आले. ते घरांत विषण्णमुख व अत्यंत कळाहीन स्थितींत आले. त्यांना पाऊल उचलवत नव्हतें. त्यांना रस्त्यांत पाहतांच रावजींनी मोठयानें " भाऊ, माझ्या कृष्णास आणलेंस ना ? " हीं अक्षरें भाऊस वज्रा-

घात केल्यासारखीं लागलीं. भालचंद्रांनीं घरांत जाऊन दुःखाचा हंबरडा फोडला. त्यासरशी सर्व मंडळी बायापोरें त्यांच्याजवळ येऊन प्रत्येकानें मुक्त कंठानें हंबरडे फोडले. माझ्या प्राणसख्या कृष्णा, अरे कृष्णा, अरे बाळा, आतां तूं कोठेंरे दिसणार ? असें म्हणून रावजींनीं धाडदिशी अंग भूमीवर टाकलें. गंगाबाईची स्थिति तर फार विलक्षण झाली. माझा बाळ आतां परत येत नाहींना ! तो येत नाहीं, असें समजूनही माझे प्राण अझून कुडींत राहत आहेतना ? इतकें बोलून त्या मूर्च्छित झाल्या. राधाबाईच्या शोकास तर पारावार नाहींसा झाला. किती मी अभागी चांडाळीण. प्रभु एकटे अरण्यवासांत जात असतां मला मात्र काळ–झोंप लागावीना ? आतां मी कुणाची सेवा करूं, असें म्हणून त्यांनीं किंकाळी फोडली. त्यासरशीं त्या बेशुद्धच झाल्या. त्यांच्या किंकाळीचा कर्कश व दुःखसूचक आवाज ऐकून शेजारीपाजारी त्यांचे घरीं धांवले व या त्रिवर्गास सावध करण्यास लागले. रावजी सावध झाले व कपाळास हात देऊन सचिंत बसले. गंगाबाईंनीं डोळे उघडले व माझ्या बाळा, मनमोहन कृष्णा, येरे माझ्या, जवळ ! तुला एकदां डोळेभर पाहूं दे, मग तूं कोठेंही जा. असें म्हणून बाळ कृष्णा ! अशी मोठयानें आरोळी मारली. व पाहतात तो कृष्णा जवळ येईना व तो कोठून येणार ? बाळा, भेटत नाहींसना म्हणून त्यांनीं अतिशय मोठयानें आक्रोश केला. राधाबाई तर फार वेळपर्यंत सावधच झाल्या नाहींत. दुःखाचा पहिला झटका निघून गेला. आठ पंधरा दिवस या घरीं दुःखाचें साम्राज्य पसरलें होतें. राधाबाईंनीं अन्नत्याग केला. रहिमतपूरहून ह. भ. प. हरीबोवा आले व त्यांनीं राधाबाईंस शांत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, बोधाच्या गोष्टीही सांगून पाहिल्या, परंतु त्यांचा शोक बिलकूल कमी होईना.

४. आळींतील कृष्णाचे बालमित्र येऊन त्यांनींही त्याच्याबद्दल अतिशय दुःखित व्हावें. आमच्या सवंगड्यांतील साक्षात् कृष्ण आम्हांस दुःखोदधींत लोटून चालता झाला, याप्रमाणें कृष्णाचे गुण आठवून मुलें फार शोक करीत असत. त्यांचें घरीं शांतवन करण्यासाठीं मंडळी येत त्यांचेकडून शांतवन तर होत नसेच, उलट ती मंडळीच शोकमग्न होत.

५. रानावनांतून फिरतांना माझ्या कृष्णास हिंसक जनावरांपासून भय वाटलें असेल, त्यावेळीं त्यास धैर्याचा हात कोणीं दिला असेल ? माझा कृष्णा या लोकीं असेल काय ? धरणी माते माझ्या लेंकरास आतां सर्वस्वी तूंच माय आहेस. तूं त्याचें पालन कर. त्याचे तहानभुकेचे वेळीं तूंच आतां लक्ष ठेव. सूर्यनारायणा, माझ्या लाडक्यावर कधींही तापूं नकोस. देवतांनो माझ्या जिवलगास तुम्ही आतां सांभाळा. माझ्या हरिणीच्या पाडसा कृष्णा, तुला वाटेनें

भूक लागल्यास कोण रे खायला देईल ? बाळ, लहानपणीं तुला जरा आजार झाला कीं, माझ्या जीवाचें पाणी होत असे. तुला दृष्ट फार झटदिशी व्हावी. तेव्हां अंगारे, दोरे, गंडे करतांना माझा जीव किती तरी खालवर होत असे. पण आतां तुला श्रमानें काय काय वेदना होत असतील व त्या तूं कोणास सांगत असशील रे ! तुला भूकतहानेची बाधा होत असेल हें मला समजूनही माझे प्राण या कुडीचा लोभ धरून राहिले आहेत. वारा आला कीं त्यास विचारावें, माझा बाळ खुशाल आहेना ? गंगाबाई जेवत असतां मागें कृष्णा उभा आहे काय असा भास होऊन त्यांनीं त्यास हांक मारावी, निजल्या असतांना कृष्णा, ती मला रामराय वनवासास गेल्याची गोष्ट सांग म्हणून ओरडत उठावें. एखादें वेळीं स्वप्नांत कृष्णा दिसावा, जागें होऊन पाहावें तों कोणीच नाहीं असें समजून मूर्च्छित व्हावें. माझा निजसखा कृष्णा भूमींतून, आकाशांतून, कोणीकडून कधीं परत येईल काय असा त्यांना सारखा ध्यास लागला होता. पुत्रप्रेमानें विव्हळ होऊन घरांत त्या सतत कृष्णास हांका मारूं लागल्या. त्यांना कृष्णाचें वेडच लागल्यासारखें झालें होतें. मंडळी जमल्यावर गंगाबाईच्या शोकास पारावार उरत नसे. ही पहा माझ्या लाडक्याची गुरुचरित्राची पोथी, हा त्याचा पाट, ही त्याची ताटवाटी. लहान असतां मी आपल्या पायावर घेऊन या ठिकाणीं त्याला ऊन पाण्यानें न्हाऊं घालीत होतें; या अंगणांतील उन्हांत तो खेळत असे. हा त्याचा टाळ पहा. हा टाळ वाजवून तो रोज भजन–कीर्तन करीत असे. निरनिराळ्या वस्तूंकडे पाहून त्यांचा संबंध कृष्णाशीं कसा होता हें बोलण्यांत त्यांचें दुःखभारानें जड झालेलें हृदय थोडेंसें हलकें होत असे. त्याच्या सर्व आठवणी होऊन त्याच्या लीलेंत त्या विलीन होत असत.

६. श्रीराम वनांतून परत येत नाहींत असें समजतांच दशरथानें प्राणाचा त्याग केला पण मी मात्र बाप नसून काळ आहे. माझे प्राण या देहास सोडीत नाहींत. पुत्रापेक्षांही मला माझ्या देहाची आसक्ति फार आहे असें वारंवार म्हणून रावजी विव्हळ होत असत. त्यांनीं देवास पुष्कळसे नवस केले, आपण व ब्राह्मणद्वारा अनुष्ठानें करविलीं, स्वतः तपासासाठीं श्रीदत्तात्रयांचीं सर्व ठिकाणें हिंडले, गाणगापुरास चार महिने राहून मधुकरी मागून श्रीगुरुचरित्राचीं पारायणें केलीं. अक्कलकोटास श्रीस्वामीसमर्थांजवळही थोडा वेळ राहून निराश होऊन घरीं आले. सर्व तऱ्हेचे उपाय करून पाहिले तरी कृष्णा भेटत नाहीं असें समजून हताशपणें कालक्रमणा करूं लागले.

७. कृष्णाच्या बंधुभगिनींनाही अत्यंत दुःख झालें. तें वर्णन करण्याची शक्ति माझ्या लेखणींत नाहीं. कृष्णानें सर्वांची निराशा केली होती. त्यानें

काढलेल्या चित्राकडे पाहून सर्वांचीं अंतःकरणें भडभडून येत असत.

८. राधाबाईंनीं व्रतेंवैकल्यें, उपासतापास करण्यास सुरवात केली. रहिमतपूरकर बोवा सर्वांचें शांतवन करून आधार देत कीं, कृष्णा मोठा भगवद्भक्त आहे. तो ईश्वराची कृपा संपादन करून तुम्हास लौकरच भेटेल यांत संशय नाहीं. अशा आशेचे तंतू कोणीं दाखविले म्हणजे सर्वांस जरा बरें वाटावें; पण आमच्या डोळ्यांचें कृष्णास पहाण्याचें भाग्य असेल काय? " मन चिंती तें वैरी न चिंती " या म्हणीप्रमाणें त्याजविषयीं निरनिराळे तरंग उठत असत. चंद्रावांचून चांदणें, प्राणावांचून शरीर अगर देवावांचून जसें मंदिर तसें कृष्णावांचून रावजींचें घर शून्य दिसूं लागलें. हळूहळू दिवस, महिने, वर्षें जात चाललीं, तरी कृष्णाचा पत्ता लागेना, यामुळें हें कुटुंब फारच शोकग्रस्त झालें. दोन वर्षांनंतर राधाबाईस माहेरीं नेलें. रहिमतपूरकर बोवा यात्रेस जाणार होते त्यांचेबरोबर राधाबाईनींही जावें व शक्य तितके उपाय करून कृष्णाचा तपास लावावा असें त्यांच्या सासरच्या व माहेरच्या मंडळींनीं ठरविलें. रहिमतपूरकरबोवाबरोबर राधाबाई यात्रेस निघाल्या. यात्रा हें त्यांचें ध्येय नसून पतिशोध हें त्यांचें साध्य होतें. त्या साध्यासाठीं चुलत्याबरोबर यात्रा करूं लागल्या. प्रत्येक मुक्कामावर स्त्रीपुरुषसमाजांत पतीची चौकशी करीत असत.

प्रयाग काशी मथुरा वृंदावन गोकुळ शाळा ।
धुंडिल्या अनेक वनशाळा ॥
कृष्णा वेण्या गंगातट मठ दाही दिशेला ॥
शोधितां पावे निराशेला ॥
करितां जप तप व्रत खचलें मन तें उपदेशाला ।
दया मग आली जगदीशाला ॥
दाखवि नाना कला चरित्रची विचित्र गारोडी ।
आतां काय० ॥

दोन वर्षें तीर्थक्षेत्रें उदंड धुंडून पाहिलीं, परंतु कोठेंच पत्ता लागला नाहीं. यात्रा करून हें मंडळ परत रहिमतपुरास आलें. कृष्णाचा पत्ता यात्रेंतही लागला नाहीं हें समजून पुनः घरची मंडळी फारच शोकग्रस्त झाली. तो प्रसंग वर्णन करतांहि येणार नाहीं.

९. साध्वी राधाबाईचे दिवस फार कष्टमय होऊं लागले. त्या कधीं सातान्यास तर कधीं रहिमतपुरास असत. त्यांनीं व्रतेंवैकल्यें फारच निश्चयानें केलीं. अश्वत्थास, मारुतीस व तुळशीस ओलेत्यानें लक्ष लक्ष प्रदक्षिणा घातल्या. अखंड नामस्मरण चालू ठेविलें. नित्य वडिलांची सेवा, तुळशी-

अश्वत्थप्रदक्षिणा, अतिशय उपोषणें, पुष्कळसा जप असें अखंड व्रत चालू ठेविलें. औदुंबरक्षेत्रीं जाऊन तेथें श्रीदत्तचरणीं धरणें धरून बसल्या. सात दिवस सारखीं उपोषणें करून ओलेत्यानें सेवा केली. याप्रमाणें त्यांनीं खडतर तप सतत सुरू ठेविलें होतें. त्यांची ही पतिनिष्ठा पाहून सर्वांचे मनांत त्यांचे विषयीं आदर उत्पन्न झाला व देवा, इचे मनोरथ पूर्ण कर असे सर्वांचे आशीर्वाद मिळूं लागले.

१०. ही स्थिति सतत टिकली नाहीं. दहा वर्षें होऊन गेलीं तरी पतीचा शोध नाहीं या दुःखांत राधाबाई व घरांतील मंडळी सांपडली असतां हाडावर वाण सोडणारे निंदकांचे वाक्प्रहार सुरू झाले. होतां होतां बारा वर्षें झाल्यावर मग तर फार कठिण प्रसंग येऊं लागले. बारावर्षें गेलेला इसम परत येत नाहीं, यावरून तो मृत झाला पाहिजे अशी दुष्ट कल्पना करून जनांकडून निरनिराळे अपवाद येऊं लागले. राधाबाई आतां सवाष्ण राहिल्या काय? असा संशय उत्पन्न करून घेऊन जिकडे तिकडे निंदा सुरू झाली. पुढें पुढें तर राधाबाईस हळदीकुंकवास जाण्याची बंदी झाली. हौदावर पाणी आणण्यास उघडपणें जातां येईना. समाजाकडून अशी विटंबना होऊं लागल्यामुळें त्यांचें पतिविरहाग्नीनें तप्त झालेलें मन अधिकच पेट घेत राहिलें. आतां पतिप्राप्तीची आशा त्यांचे मनानें सोडली. व त्या परमात्म्याजवळ मरण मागूं लागल्या. धरणी माते, मला आतां पोटांत घे, असें वारंवार विनवूं लागल्या. सासरमाहेरच्या मंडळींनीं मात्र त्यांनां बिलकूल दुखविलें नाहीं. उलट कृष्णा भगवद्भक्त आहे, त्याचेवर देवदया होऊन तुला सुखाचे दिवस दिसतील असा तिला धीर देत असत. आणखीही निरनिराळे कुतर्क जनसमूहांतून सुरू झाले. आमच्या समाजांत हा दोषच आहेसें वाटतें. परिस्थितीनें दीन केलेल्यांना आधार देऊन त्यांचें जीवन अमृतमय करण्यास कोणीच झटत नाहींत. उलट त्यांचे वर्मावर डाग देऊन त्यांचें कष्टी जीवित कष्टतर करावयाचें. आमचे समाजाच्या लक्षांत ही गोष्ट कधीं येईल ती येवो. प्रस्तुत मात्र राधाबाईची स्थिति फारच शोचनीय झाली होती.

११. शकुंतलेस पुत्र होऊन ती पित्याचे आश्रमांत राहिली होती. त्यावेळीही जननिंदा सुरू होईल असा विचार करून कण्व महर्षींनीं तिला तिच्या पतीकडे पाठविलें, त्यावेळीं म्हटलें आहे कीं,

नारीणां चिरवासोहि बांधवेषु न रोचते ।
कीर्तिचारित्र्यधर्मघ्नस्तस्मान्नयत माचिरम् ॥
सतीमपि ज्ञातिकुलैकसंश्रयां जनोऽन्यथा भर्तृमतीं विशंकते ॥
(अभि. शाकुं. ५-१७)

सुंदर प्रौढ समर्थ वनिता । चिरकाळ पितृगृहीं वसतां ।
लोकनिंदेचा अवचिता । पाषाण पडे मस्तकीं ॥ ( मुक्तेश्वर )
वनिता सुंदर तरुण । पितृगृहीं वसतां अनुदिन ।
लोकनिंदेचे वाग्बाण । हृदयीं पूर्ण खोंचती ॥ ( श्रीधर )

शकुंतलेच्या कथेशीं एवढ्यापुरतें राधाबाईचें साम्य आहे. प्रत्यक्ष विष्णुकवि पोवाड्यांत म्हणतात.

अशी इकडे मग झाली षोडश वर्षांची भरती ।
तिकडे खबर नसे पुरती ॥
म्हणती वाटे विपरीत सुकृत गति शर्ताशर्ती ।
कल्पना विविध जन करिती ॥
दुःशब्दाचे इंगळ पडती त्या साध्वीवरती ।
ऐकुनि हळहळती गरती ॥
कां झाला हरि कंटक ? संकट—सागर—नावाडी ।
आतां काय० ॥

इतके जनापवाद येत होते. तरी भुकाळलेलें जनावर हिरव्या गवताची आस धरून जसें पुढें पुढें चरण्यास जातें तसेंच राधाबाई पतिप्राप्तीबद्दल परमात्म्याची प्रार्थना एकनिष्ठ मनानें करीत असत. वर्मीं झोंबणारें दुःशब्द निमूटपणें सोसून ईश्वरावर भार घालून त्या दिवस काढीत असत. त्यांच्या या तपश्चर्येस सोळा-वर्षांनंतर उत्कृष्ट फल कसें आलें हें पाहण्यासाठीं आणखी थोडा वेळ वाचकांस थांबावें लागणार आहे.

---

ॐ श्रीसद्गुरु समर्थ.

## ७ माहूर येथील वास्तव्य.

१. विष्णुदास श्रीदत्तात्रयांचें निद्रास्थान श्रीदेवदेवेश्वर येथें जाऊन राहिल्याचें मागें एका प्रकरणावरून समजलेंच आहे. ते तेथें जपतपादि अनुष्ठान करून मधुकरीवृत्तीवर निर्वाह करीत असत. थोड्या कालांत त्यांचें साध्य त्यांना साधलें. नरजन्माचें सार्थक झालें. परमात्म्याचे सगुण दर्शनाचा आनंद प्राप्त झाला. वारंवार त्यांना सगुण दर्शन होत असल्यामुळें त्यांचें रुक्ष बनलेलें जीवन अत्यंत प्रेममय बनलें. त्यांना साक्षात्कार कसा झाला याचा इतिहास त्यांना विचारला तर ते सद्गदित होत असत व प्रभु फार दयाघन आहे, माउली अत्यंत कृपाळू आहे, असें म्हणून त्यांचे नेत्र भरून येत असतांना मीं अनुभविलें आहे. त्यांनीं ही गोष्ट केव्हांही प्रगट केली नाहीं, किंवा त्यांनां परवा-

-नगीही नसेल. पण त्यांच्या मधुर कवितेंतून त्याचा ठसा मात्र ठिकठिकाणीं पाहाण्यास सांपडतो.

पद

काय कारण पुसा रेणुकेला । माझा त्याग कशास्तव केला ॥ ध्रु० ॥
झाला वर्षाच्यावर एक महिना । तरि अझुनि सय कां हो येइना ॥
अशी अगदींच करूं नको दैना । तुझ्याविण मला बाप आई ना ॥
दूर काननिं पडलों अकेला ॥ माझा० १ ॥

" रेणुके काय बाई तरि तुजला वाटतें " या पदांत म्हणतात—

वर्षेंही दोन झालीं वर महिने अकरा ।
तरि अझुनी भेट नाहीं आईची लेंकरा ॥

यावरून त्यांना वारंवार सगुण दर्शन होत होतें हें ध्यानांत येईल.

कामदा— प्रगटली महानंदीं राजसा । दिनमणी आला मंदिरा जसा ॥
लपति काजवे शत्रु ते किडे । खचित रेणुके सांग एवढें ॥

याशिवाय आणखीही पुष्कळ ठिकाणें दाखवितां येण्यासारखीं आहेत. त्यांपैकीं पुढें थोडीशीं प्रगट करण्याचीं आहेत. हीं पदें माहुरास गेल्यावर पुष्कळ दिवसांनीं लिहिलीं आहेत. ते जगदंबेची उपासना करूं लागल्यावरचीं हीं पदें आहेत. तो प्रसंग पुढें येणारच आहे.

२ देवदेवेश्वरीं कृतार्थता आल्यावर घरची आठवण होऊन तळमळ सुरूं झाली. पण ईश्वरीप्रेम व दुसऱ्या एका बंधनांत सांपडून माहूरलाच कायम वास्तव्य झालें. माहूरचे पोलीस पाटील श्रीमंत रेणुराव देशमुख यांनीं बोवांचें सात्विक वर्तन, त्यांची चित्रकला व त्यांची कविता पाहून आपल्या घरीं त्यांना मोठ्या आदरानें आणून ठेविलें. व त्यांजवर अत्यंत प्रेम केलें. त्या प्रेमाचें बंधन बोवांना बाधलें व तेथें वास्तव्य करणें प्राप्त झालें. रेणुराव फार मोठे धाडशी व शूर पुरुष होते. ते वाघाची शिकार नेहमीं करीत असत. शिकार करीत असतांच ते व्याघ्रमुखांत पडून गतप्राण झाले. मगतर बोवांना या प्रेमळ मित्राच्या संसाराचें ओझें वागविण्याचा प्रसंग आला.

पोवाडा.

श्री दत्तात्रयनिद्रास्थळ निळ आवळी महासिद्ध ।
देवदेवेश्वर सन्निध ॥
त्या स्थळिं केलें तप मागुनियां मधुकरी शुद्ध ।
कटाक्ष न सोडी प्रारब्ध ॥
तदनंतर मातापुरीं केला बहुनाटक छंद ।
जोडिली कविता कटिबंद ॥

परंतु झाली त्या स्वप्नीची स्मृति थोडि थोडी ।
आतां काय० ॥
रेणुराव सरदेशमुख रणशूर आखाड्यांत ।
राहिलों त्यांच्या वाड्यांत ॥
त्या पुरुषासी जडला स्नेहसंबंध थोडक्यांत ।
अडकला कांसव हंड्यांत ॥
तो झाला नर गत व्याघ्राच्या पडुनि जबड्यांत ।
ज्याचे गुण गावे पवाड्यांत ॥
मग त्यामागें गृहपत केली पाटिल पासोडी ।
आतां काय खेळण्याची गोडी ॥

देशमुखांच्या चरित्रावर एक त्यांनीं पोवाडाही केला होता. विष्णुदासांनीं रेणुरावाचे घरची सर्व व्यवस्था आपणाकडे घेऊन घर उत्तम प्रकारें चालविलें. सरकारी कामें स्वतः न करितां गुमास्त्याकडून करवीत असत. गुमास्ते, कारकुनांनीं चुका कराव्या व त्यांचे वरिष्ठांनीं विष्णूकवीची कविता ऐकून व त्यांचें समदर्शित्व पाहून सहज माफी करावी असेहि प्रकार कांहीं वेळां झालें.

३. श्रीसरस्वतीचे कृपाप्रसादानें ते शीघ्र कवि बनले. सहजस्फूर्तींतून अक्षरें निघावीं व त्यांचे प्रबंधच बनावे. यामुळें माहूरची सर्व मंडळी बोवांवर फार प्रेम करूं लागली. श्री. राजेसाहेब उदाराम जहागिरदार यांचें तर बोवावर अतिशय प्रेम असे. त्याचप्रमाणें देवडींतील राजे कुंवरसिंग जहागिरदार यांनीं तर त्यांना प्रत्यक्ष गुरूच मानिलें होतें. गांवांतील गृहस्थ–भिक्षुक वगैरे सर्वांचीं अंतःकरणें बोवांकडे आकर्षित झालीं. यामुळें माहुरांतून सुटणें कठीण झालें. बोवांनीं घराकडे जाण्याची गोष्ट काढली कीं, मंडळींनीं डोळ्यांत अश्रु आणावे व आम्हांस टाकून आपण गेलां तर आमचे प्राणही राहणार नाहींत असें म्हणावें. याप्रमाणें सर्व मंडळीचें अत्यंत प्रेम बोवांवर जडल्यामुळें विष्णुदास माहुरास कायमचे राहिले.

४. माहुरास नाटकें रचिलीं व कांहीं मंडळीकडून त्यांचे प्रयोगहि उत्तम रीतीनें करविले. त्यांपैकीं एकदोन मंडळी विद्यमान आहेत. त्यांना चित्रें काढण्याचा मोठा शोक असे, त्यामुळेंही त्यांच्या लोकप्रियतेंत भर पडली. त्यांच्या शीघ्र कवित्वामुळें ते कोणासही तात्काळ बोध देत असत. त्यामुळें लोक सत्यानें व धर्मानें वागूं लागले. लोकांतील कुबुद्धि त्यांच्या सहवासानें दूर झाली, व घरोघर समाधान नांदूं लागलें. नंतर कांहीं दिवस मुलें शिकवून

तयार करण्यासाठीं त्यांनीं शाळा घातली. मुलांकडून कांहींएक न घेतां अध्यापन करीत असत.

५. त्यांचे ठिकाणचें भक्तिप्रेम पाहून माहूर प्रांतांतील संतही फार संतोषित होत असत. प्रसिद्ध श्रीचिन्मयानंद संस्थान उमरखेड यांचे तीन शिष्य प्रसिद्ध आहेत. १ गोचरस्वामी, उमरखेड; २ तुकाराममहाराज येहळेगांवकर; व ३ रावसाहेब शेवाळकर हे होत. हे तिघेही अधिकारसंपन्न महात्मे होते. एकदां रावसाहेबांची स्वारी माहुरास आली. त्यांनीं विष्णुकविकृत भक्तिप्रेमानें ओथंबलेली कविता पाहिली व 'लक्ष्मणशक्ति' हें आख्यान खुद्द त्यांचेच मुखानें ऐकून फार आनंद व्यक्त केला व विष्णुदासांस जवळ बसवून त्यांनीं विचारलें--

रावसाहेब--आम्ही सांगूं तें तुम्ही मान्य कराल काय ?

विष्णुदास--होय; खात्रीनें मान्य करीन.

रावसाहेब--तुम्ही विचार न करतां मान्यता कशी दिलीत ?

विष्णुदास--संतजनाकडून हितच होत असतें हें मला माझ्या गुरुमहाराजांनीं शिकविलें आहे.

हें ऐकतांच रावसाहेबांना अत्यंत हर्ष झाला व विष्णुदासांस कडकडून भेटून म्हणाले--बोवा, तुमचें कवित्व व तुमची श्रद्धा पाहून मी तर थक्कच झालों आहे. तुमच्या भक्तिप्रेमानें ओथंबलेल्या कवितासरितेचा ओघ यापुढें श्री जगन्माता रेणुकेच्या स्तवनाकडे वळवावा, व एवढयाच करितां तुमचें वचन घेतलें. असें ह्मणतांच विष्णुदासांनीं रावसाहेबांच्या चरणीं मस्तक लीन करून आज्ञा मान्य केली. दोघांनाहि अत्यंत आनंद झाला. लगेच बोवांनीं जगदंब स्तुतिपर पद करून रावसाहेबांस समर्पण केलें. तेव्हां त्यांनींहि जगदंबा तुह्मांस दर्शन देऊन सतत स्वानंदांत ठेवील असा बोवांस आशिर्वाद दिला. याप्रमाणें माहूर व त्याच्या परिसरांतील भाग यांतील सर्व मंडळींचें चित्त विष्णुदासांकडे वेधलें. भक्तिप्रेमाचा ओलावा ज्याच्या अंगीं नाहीं त्यांनाहि ईश्वराकडे जाण्याचा मार्ग खुला व्हावा या हेतूनें ते शृंगारपर लावण्या करीत असत. त्यांच्या लावण्या म्हणण्यास फार उत्तम आहेत. कांहीं लावण्यांतून उत्तान शृंगार दिसेल तर बऱ्याच लावण्या द्व्यर्थी असून त्यांतून एकसारखा वेदांत भरलेला दिसतो.

जे कां विषयपर जन । न करिती लीला श्रवण ।
त्यास शृंगाररस दावून । वेधी मन आपणांकडे ॥ श्रीधर ॥

विषयी जनांची वृत्ति प्रभूकडे लागावी व संतसहवासाचा दुर्लभ लाभ त्यांना थोडा तरी व्हावा, या शुद्ध हेतूनें ते लावण्या करूं लागले, व त्यांचा उप-

योगही चांगला झाला. कांहीं नायकिणींनीं त्यांजकडून लावण्या तयार करून घेतल्या व गाण्याचे बैठकींत ख्याल, गज्जल ऐवजीं विष्णुकवींच्या लावण्याच लोकांस फार प्रिय होऊं लागल्या. लावण्यांचें दान करतांना "अधर्मानें वागणार नाहीं" अशी त्यांजकडून शपथ घेऊन त्यांस लावण्या करून देत असत. बहुजनसमाजाचें चित्त त्यांच्या लावण्यानीं विष्णुदासांकडे फार आकर्षित झालें. प्रसिद्ध साहित्याचार्य श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं सन १८९७ च्या सुमारास प्रसिद्ध केलेल्या वीरतनय नाटकांतील एका पदास ह्या कवींच्या "निरभ्रशुभ्र नक्षत्रातुल्य ही ललना कोणाची" ह्या सुप्रसिद्ध लावणीची चाल दिली होती; इतकेंच नव्हे तर ती लावणी त्यांस पुण्यास कॉलेजमध्यें शिकत असतां उत्तम तऱ्हेनें म्हणतां येत होती. त्यांना विष्णुदासांचे लावण्याबद्दल फार आदर आहे. विष्णुदासांची कविता नुकतीच यवत-माळाच्या शारदाश्रमाचे श्री. यशवंत खुशाल देशपांडे एम्. ए. एल्एल्. बी. यांनीं प्रसिद्ध केली आहे. प्रस्तावना श्री० अच्युत सिताराम साठे एम्. ए एल्.एल्. बी. ॲडिशनल जज नागपूर यांनीं लिहिली आहे. प्रस्तावनेंत पृ. ५ यांत ते लिहितात कीं,

"मध्यप्रांतांत जेलरचें काम केलेले श्री. नारायण तात्याजी कुंटे हे कळवितात कीं, पंचवीस तीस वर्षांमागें कांहीं वऱ्हाडच्या लावण्या अमेरिकेंत पाठविण्यांत आल्या, त्यांमध्यें या संग्रहांतील नंबर १५१

"निरभ्र शुभ्र नक्षत्रतुल्य ही ललना कोणाची ?
चपल दृष्टि सुविलोल लोचनीं उपमा हरिणीची"

या लावणीची फारच प्रशंसा झाली होती."

बोवांचा सहवास थोडा तरी व्हावा अशी इच्छा करून पुष्कळ लोक त्यांचे दर्शनास येऊं लागले. कोणत्याही वृत्तीचा मनुष्य असो यांचेजवळ आला व थोडा वेळ बोलत बसला कीं तो शांत होत असे. त्यांचे ठिकाणीं आपपर भाव नसल्यामुळें सर्व दर्जाची मंडळी यांचे सहवासानें समाधान पावत असत. माहूरच्या भोंवतालच्या टापूंतून कित्येक लोक यांना आपले घरीं मोठ्या आदरानें बोलावीत असत. त्यांचें साधुत्व व कवित्व पाहून ते त्यांचे सहवासामुळें आपणांस धन्य मानीत असत. आतां हा पाल्हाळ न देतां पतिव्रता साध्वी राधाबाईची तपश्चर्या उदयास येऊन तिचें फल पतिदर्शनांत कसें झालें, ही हकीगत ऐकण्यास वाचकांचे कर्ण भुकेले आहेत, त्यांची तृप्ति करूं व त्याचे पुढील प्रकरणांत त्यांचें व्यावहारिक चरित्र संपवूं व नंतर पारमार्थिक चरित्राची हकिगत थोडीशी कथन करूं.

॥ ॐ श्रीसद्गुरुसमर्थ ॥

## ८ शोध व पत्नीभेट.

१. सौ. राधाबाई लोकनिंदेचे वाग्बाण सोशीत कालक्रमणा करीत होत्या. परमात्म्यावर निष्ठा ठेवून त्याची कृपा होण्यासाठीं नानाविध साधनें करीत होत्या. तरीही त्यांचें उद्दिष्ट त्यांना प्राप्त होईना पंधरा वर्षें झालीं तरीही पतिराजांचा शोध—समाचार कळला नाहीं. मग मात्र त्या अत्यंत विव्हळ झाल्या. व यापुढें पतिवांचून जगणें फार वाईट आहे, यास्तव त्या ईश्वराकडे मृत्यु मागूं लागल्या. जनस्वभावाचे मस्तकीं पडणारे इंगळ सोसणें अति असह्य होऊं लागलें. कांहीं सात्विक मंडळी अजूनही त्यांना धैर्य देत. दमयंतीस नळाची प्राप्ति झाली तशीच तुम्हांस तुमच्या पतीची भेट होईल, पण थोडा दम धरा असें म्हणून घरची मंडळी त्यांना शांतवीत असत.

तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्तकाळ घडी आल्यावीण ॥

यापुढें प्राप्तकाळ येऊन माझा " देव " मला भेटणार याविषयीं त्या निराश होऊं लागल्या.

पोवाडा.

सकळ जगावर तुझी भगवंता करुणामृतवृष्टी ।
असुनी मज करसी कष्टी ॥
बाप नव्हे तो साफ बुडविते दुःखामधें सृष्टी ।
यमाहुनि निर्दय परमेष्टी ॥
फळें शुभाशुभ काय असे हें नकळे अदृष्टीं ।
आतां कधीं पति पाहीन दृष्टीं ।
आई धरणी, घे मज पदरामधें उदरामधें ओटी ॥
आतां काय० ॥
अशा परीनें त्या साध्वीचा अवलोकुनि शोक ।
कृपेनें शांतविती लोक ॥
भ्रतार भेटेल पलटल विपरित काळाचा झोक ।
आतां त्वां राहावें विनधोक ॥
मेघ वर्षती परि न दिसती गगनाला भोंक ।
ईश्वरी चरित्र अवलोक ॥
धैर्य धरोनि हृदय—बिळामधें पंचप्राण कोंडी ॥
आतां काय खेळण्याची गोडी ॥

अशा दुःखमय स्थितींत दिवस जात असतां पति भेटल्याची सुखस्वप्नें

त्यांना पडूं लागलीं. आतां आपणांस भाग्याचे दिवस येणार असें वाटून त्यांच्या वृत्ति सहज आनंदानें उत्तेजित होत असत. भावी सुखदुःखाचे प्रसंग अगाऊच सूक्ष्म मनास दिग्दर्शित होत असतात याचा अनुभव राधाबाईस येऊं लागला होता.

२. सातारा येथें आपल्या वराजवळच रावजींनीं आपली कन्या काशी इला रा. **सदाशिव बाबाजी काळे** यांना दिली होती. यांचा धंदा सराफीचा होता व आगगाडीची सोय झाल्यामुळें हे व्यापारासाठीं लांबवर प्रवास करीत असत. एकदां **सदोबा काळे** व्यापारासाठीं जालना, परभणीकडे गेले. तेथें त्यांना विचार सुचला कीं, आपली कुलस्वामिणी जगन्माता मातापुरवासिनी श्री रेणुका आहे, व इतक्या जवळ आलों आहों तर थोडे श्रम झाले तरी घ्यावेत, परंतु माहूरला जाऊन यावें, असा संकल्प त्यांस उठतांच ते माहुरास गेले. राधाबाईच्या एकनिष्ठ सेवेचें फलच सदोबांना माहुरास जाण्याच्या इच्छेंत झालें. सदोबांनीं वे. काण्णव या उपाध्यायांचे घरीं बिऱ्हाड लाविलें. दुसरे दिवशीं मातृतीर्थावर क्षौरादिविधि करून कुलस्वामिणी जननीची भोगीपूजा केली. आतां उद्यां दत्तदर्शन घेऊन साताऱ्याकडे वळावें असा त्यांचा विचार झाला.

३. उपाध्यायाचे घरीं रात्रीं मुलें अभ्यासाला बसलीं असतां त्यांचीं अक्षरें व त्यांचे कित्ते सदोबांच्या पाहण्यांत आले. अक्षर ओळखीसारखें दिसतांच ते मुलांना म्हणाले, बाळांनो ! या अक्षराचें वळण साताऱ्याकडील आहे. तुम्हांस कोण शिकवीत आहे ? इतकें म्हणतांच उपाध्याय म्हणाले, आमच्या येथें साताऱ्याकडीलच बोवामहाराज आले आहेत, ते मुलांना शिकवितात. त्यांचे नांव कृष्णाजी आहे काय ? असें सदोबांनीं आशापूर्ण भावनेनें विचारलें, पण त्यांचें नांव विष्णुदास आहे असें ऐकतांच सदोबांची निराशा झाली. तथापि या बोवांचे मला दर्शन करवाल काय ? असें विचारतांच, होय करवूं, असें उत्तर मिळालें. सकाळीं लांबूनच भेट झाली व आपण भोजनोत्तर फिरावयास याल काय ? असें सदोबांनीं विचारतांच 'होय येईन' असें बोवा म्हणाले. सदोबांनीं कृष्णास ओळखिलें, पण विष्णुदासांनीं मात्र त्यास ओळखलें नव्हतें. क्षौर केल्यामुळें सदोबा विद्रूप दिसत होते व बोवा आपल्या व्यवसायांत निमग्न असल्यामुळें जास्त विचार अगर चौकशी त्यांनीं केली नाहीं.

४. ठरल्या प्रमाणें दुपारीं श्री विष्णुदास पुढें व सदोबा मागें असें चालत चालत सोन्यापिरापर्यंत गेले व दोघेही तेथें बसले. सदोबाच्यानें आतां निमिषाचाही धीर धरवेना. ताबडतोब उठून विष्णुदासाच्या गळयास घट्ट मिठी मारून अरे कृष्णा ! म्हणून हंबरडा फोडला. विष्णुदास निमिषभर विस्मित झाले. पण थोड्याच वेळांत हे आपले मेहुणे सदोबा आहेत असें समजतांच

आमचे वैराग्यसंपन्न बोवामहाराज यांनीं वैराग्य दूर झोकून मुक्तकंठानें किंकाळी फोडली व सदोबाचे अंगावर अंग टाकून पडले. दोघांनाही हें प्रेम आवरेना. कोणाच्याही मुखांतून शब्द फुटेना, एकमेकांकडे पाहावें व डोळ्यांतून टप टप अश्रू गाळावे असा बराच वेळ गेल्यावर उभयतांनीं नेत्रांचें जळ विसर्जून अस्फुटपणें बोलण्यास सुरवात केली. " तूं मला भेटलास यामुळें माझी यात्रा आज सफल झाली. कृष्णा कसारे तूं निष्ठुर झालास ! घरीं काय प्रकार झाले ते तुझ्या लक्षांत सुद्धां येऊं नयेना ! आई, बाप, बंधु, भगिनी, साध्वी पतिव्रता स्त्री यांचा त्याग करून तुला मोक्षप्राप्ती होईल अशी कां तुझी खुळी कल्पना आहे ? तूं सर्वांचा फार अपराधी आहेस. परंतु श्री जगदंबेचे कृपेनें तूं या स्थळीं मला भेटलास, हें सर्वांचें भाग्य उदयासच आलें आहे; आतां मात्र मी तुला बरोबर घेतल्याशिवाय येथून जाणार नाहीं, हें लक्षांत ठेव." अशीं सदोबांनीं कांहीं रागानें व कांहीं प्रेमानें बोलणीं केलीं. विष्णुदासांनीं त्यांचे पायावर डोकें ठेवून माझे सर्व अन्याय क्षमा करा, अशी सदोबास विनंति केली.

५. माझे हातून मातृपितृसेवा तर झाली नाहींच, पण त्यांना मीं दुःखांत मात्र लोटलें आहे, असें म्हणून मातृप्रेमानें विव्हळ होऊन बोवा वारंवार रडूं लागले. घरची मंडळी सुखरूप आहेतना ? असें विचारल्यावर सर्व क्षेम वर्तमान कळविलें, सर्व क्षेम आहेत, पण चंद्रावांचून जसें चांदणें अगर प्राणावांचून जसें शरीर तशींच तुझ्यावांचून तुझ्या घरच्या मंडळींची स्थिति झाली आहे. याप्रमाणें प्रेमालाप काढीत सदोबांनीं माहुरास आठ दिवस वास्तव्य केलें. या अवकाशांत घरून निघाल्यापासून आतांपर्यंतचें चरित्र विष्णुदासांकडून व गांवांतील मंडळीकडून त्यांनीं समजून घेतलें. सदोबास आपल्या मुक्कामींच विष्णुदासांनीं ठेवून घेतलें होतें, व पंधरा वर्षांतील सातार्‍याकडील सर्वांची हकीगत समजून घेत असत. सदोबा असतांना बोवांनी आपले नित्य व्यवसाय बाजूस ठेविले होते.

पोवाडा.

सदोबा काळे होते मेहुणे राहात शेजारीं ।
सहज ते आले माहूरीं ॥
मनिं खुण पटलि भेट जाहली मग तिसरें प्रहरीं ।
उठल्या आनंदाच्या लहरी ॥
वृत्तांत कळवुनि क्षेम कुशल मग पत्र सुविस्तारी ।
घेउनि गेले माघारी ॥
सकळ जनाला वृत्तांत कळला मग तोंडातोंडीं ।
आतां काय० ॥

सदोबांनीं त्वरेवर साताऱ्यास निघण्याची तयारी करा, असा ध्यास घेतला. बोवा येथून जाणार हें समजल्यावर माहूरचे लोक उदासीन झाले व आम्हां सर्वांस आपले बरोबर न्यावें असें सर्वजण म्हणूं लागले. इतकेंही करून आपण निघालांत तर आम्ही सर्व मंडळी घरें दारें सोडून तुमच्या मार्गांत आडवे पडून राहूं. एकदां साताऱ्च्या मंडळीस विरहाग्नींत भाजलेंत, आतां आम्हांस विरहाग्नीनें भस्म करा म्हणजे आपल्यास बरें वाटेल. अथवा आपला अवतारच दुसऱ्यास वेदना करण्यासाठीं आहेसें वाटतें. अशा निरनिराळ्या मंडळीकडून त्यांच्या जाण्यास हरकती होऊं लागल्या. श्री. राजेसाहेब उदाराम यांनीं सांगितलें कीं, सदोबांनीं तिकडे जाऊन बोवांच्या सर्व मंडळीस घेऊन येथें यावें, येथें त्यांच्या मंडळीस बिलकुल कमीं पडूं देणार नाहीं. बोवांचें मन साताऱ्याकडे ओढ घेई परंतु माहूरच्या मंडळींचे प्रेमपाश गळ्याशीं घट्ट बसले होते, ते बिलकूल तुटेनात. सदोबांना सर्व स्त्रीपुरुषांनीं विनंति करून सांगितलें कीं, बोवांस नेण्याचें तुम्ही केल्यास आमच्या मनाची स्थिति फार वाईट होईल, तरी तुम्ही त्यांना घेऊन जाऊं नये. शेवटीं सदोबांनीं निक्षून विचारतां बोवांनींही घरच्या सर्व मंडळींना येथें पाठवावें; तसें होत नसेल तर पुढें मीच घरीं येईन, असें सदोबास खात्रीपूर्वक सांगीतलें व स्वहस्तें लिहून सदोबाबरोबर तीर्थरूपांना सविस्तर पत्र दिलें. पत्रांत खालीलप्रमाणें मजकूर होता.

" मीं तुम्हांस दुःखांत सोडून आलों, मला तुमची सेवा बिलकुल झाली नाहीं. वगैरे लिहून सातारा सोडल्यापासून आतांपर्यंतची हकीगत लिहिली व मला येथें श्रीजगज्जननी रेणुकामाऊली व श्रीदत्तात्रयांचा आश्रय आहे. त्या मायबापांच्या सेवेंत आयुष्य खर्च होणार आहे. तरी आपण सर्वांनीं येथें राहण्यास यावें. आपणास सद्गुरुकृपेकरून कांहींच कमी पडणार नाहीं. मी आपणाशीं बेइमानी केली, त्याजबद्दल मला पश्चात्ताप होत आहे. तरी आपण क्षमा करून इकडे येण्याची कृपा करावी. मी चातकासारखी चोंच पसरून बसलों आहे तरी आपलें दर्शनरूपी स्वातिबिंदु घालून मला शांत करावें,

हें एकेक काय आतां । निवेदिजेल अनंता ॥
मी राशी आहे समस्ता । अपराधांची ॥ ज्ञाने० अ० ११ ॥

श्लोक—तारो या भवसागरांत अथवा मारो, करो आपदा ।
अन्याला परि जाइना शरण मी सोडूनि त्यांच्या पदा ॥
सिंहाद्रीवरि जी अखंड जगदोद्धारावया राहिली ।
श्रीदत्तात्रय तो गुरू, परम ती श्रीरेणुका माउली ॥ १ ॥

याप्रमाणें मी या मायबापांचे प्रेमपाशानें बद्ध झालों आहे. कदाचित् आपणांस

येण्यास नच झालें तर तसें मला पत्रद्वारें कळवावें. म्हणजे मी आपले दर्शनास येईन व आपणांसह इकडे परत येईन. वगैरे "

६. सदोबा माहूर सोडून निघाले. त्यांना पोंचविण्यास फार लांबपर्यंत बोवा गेले होते. शेवटीं एकवार उभयतांनीं कंठ मुक्त करून पुष्कळ अश्रू ढाळले व कडकडून भेटले आणि सदोबा मागें पुढें पाहात साताऱ्याच्या मार्गास लागले.

७. साध्वी राधाबाई जनाकडून निंदा सहन करीत पण देवावर भरंवसा ठेवून रहिमतपुरास माहेरीं होत्या. एके दिवशीं त्या श्रीविठ्ठलमूर्तीचें यथासांग मनोभावें पूजन करून प्रदक्षिणा घालीत असतां एकदम अव्यक्त उच्चार कानीं पडला कीं, " तुझें इच्छित ध्येय या महिन्याचे शेवटीं प्राप्त होईल. ' हें ऐकतांच त्यांना फिरून चैतन्य आल्यासारखें वाटलें. यापुढील कालांत त्या आनंदभरांत निमग्न असत. त्यामुळें त्यांचीं नित्यकर्मे नीट चालेनात. या आनंदाचें आशेवर त्या धुंद असत. साताऱ्यासही भालचंद्रबोवांनीं देवीची फारच कडकडीत उपासना चालविली होती. त्यांनाही देवीचे कृपेनें आनंदाचीं सुखस्वप्नें पडूं लागलीं होतीं. सर्व मंडळीचें लक्ष कृष्णाच्या बातमीकडे लागून राहिलें होतें.

रहिमतपुरीं सद्भावें पूजन विठ्ठलाचें केलें ।
तयाचें पुण्य फळा आलें ॥
पाषाणमूर्ति प्रत्यक्षचि ती संक्षिप्तचि बोले ।
आतां तुझें कार्य सिद्ध झालें ॥
या महिन्याचे अंतीं जाईल वर्तमान कळलें ।
बोलुनि असें मौन धरलें ॥
त्या काळीं तिस वाटे मिळाला लक्ष लाभ कोडी ।
आतां काय० ॥

राधाबाई साताऱ्यास आल्या व त्यांनीं भावी आनंदाचें वर्तमान कळविलें. सदोबा व्यापारासाठीं कोठेंही न जातां पुण्यास आले व तेथून पस्तीस कोस एका दिवसांत साताऱ्यास पायानें प्रवास करून आले. ते आधीं सासुरवाडीस गेले, व रस्त्यावरूनच " तुमचा कृष्णा सांपडला " अशी त्यांनीं आरोळी ठोकली. त्यासरसे घरांतील सर्व मंडळी बाहेर आली. माझा कृष्णा आहे ना ? असें म्हणून गंगाबाईनीं हंबरडा फोडला. रावजींनीं तर सदोबास मिठी मारली, व माझा कृष्णा दाखवा, कृष्णा दाखवा असा टाहो फोडला. राधाबाईही रडत जवळच होत्या. " तुमचा कृष्णा सुखरूप आहे; काळजी करूं नका " असें सदोबांनीं सांगितल्यावरून सर्वजण कृष्णाची हकीकत ऐकण्यासाठीं सर्वांगाचे

कान करून तयार झाले. मग सदोबांनीं माहूरची हकीकत सांगितली. हकि-गत ऐकून सर्व मंडळींना चैतन्य प्राप्त झाल्यासारखें वाटलें. देहांतून गेलेले प्राण पुनः परतावेत तशी सर्वांची स्थिति झाली. माझा कृष्णा कधीं येणार असें विचारतांच लौकरच भेटेल असें त्यांनीं सांगितलें. रात्रभर या घरीं आनं-दातिरेकानें कोणास झोंप लागली नाहीं. पंधरा वर्षांनंतर आज कृष्णाची बातमी समजल्यामुळें सर्व आनंदित झाले. श्री शंकराचार्य नदींत बुडत असतां संन्यास घेण्यास मातुश्रींची परवानगी होतांच तरून आले. मुलगा कोठें तरी जिवंत राहील हा विचार आचार्यमातेस झाला. तसाच विचार या मंडळींनी करून " कृष्णा आहे " असें समजून समाधान मानून घेतलें.

८ दुसरे दिवशीं गांवांतील मंडळी यांचे घरीं जमा झाली. कृष्णाचा समा-चार ऐकून सर्वत्र आनंद पसरला. निंदकांची फजिती झाली व तेच लोक राधाबाईची स्तुती करूं लागले. " या माउलीनें पतिप्राप्तीस्तव जे कष्ट केले त्यांचें हें फळ आहे " असे उद्गार निंदकांच्या मुखांतून निघाल्यावांचून राहिले नाहींत. रावजींचे आप्त सोयरे त्यांना भेटून गेले. सदोबांनीं पत्र रावजीस दिलें. पत्र पाहून कृष्णा तूर्त येत नाहीं म्हणून सर्वांस वाईट वाटलें. पुढें काय विचार करावयाचा याजबद्दल वाटाघाटी सुरू झाल्या. रावजींनां दुसरीं लहान मुलें होतीं. मुलांमुलींचीं लग्नें वगैरे चालूं होतींच. अशा प्रसंगीं येथील प्रपंच आटोपून सर्वांनीं माहूरला जाणें अशक्यच होतें. कृष्णास आणण्यासाठीं विष्णु-पंत माहूरला गेले. ते तेथें पंधरा दिवस राहिले. त्यांनाही बरसातीनंतर येईन असें विष्णुदासांनीं सांगून त्यांनां परत साताऱ्यास रवाना केलें.

बरसात संपली तरी कृष्णा येत नाहीं, असें पाहून सौ. राधाबाई व त्यांचे बरोबर अनंतरावांनीं माहुरास जावें व कृष्णास युक्तिप्रयुक्तीनें घेऊन यावें असा विचार ठरला. यावेळीं अनंतरावास तेरावें वर्ष लागलें होतें. शके १८०० तील बरसात संपतांच राधाबाईची जाण्याची तयारी झाली. साताऱ्याहून निघतांना सर्वत्रांस त्या कडकडून भेटल्या व सर्वांच्या गळा पडून पुष्कळ रडल्या. तूं जाऊन कृष्णास एकवार घेऊन ये व पुन्हां वाटल्यास तुम्ही माहु-रास परत जा, असें सर्वांनीं सांगितलें. या म्हणण्यास त्यांनीं आनंदानें संमति दिली व सर्वांचे आशीर्वाद ग्रहण करून त्या निघाल्या. राधाबाईसारखी सून मिळण्याचें भाग्य फार थोड्यांचे नशिबांत असतें असें सर्वजण म्हणूं लागले. गंगाबाईनीं सूनबाईस पोटाशीं धरून सांगितलें, " मुली, आजवर तुझे आचर-णानें मी सर्व दुःख विसरलें होतें. आतां तूंही जात आहेस; पण बाळ, पतीशीं अत्यंत विनयपूर्वक वाग व उभयतां राधाकृष्ण परत येऊन मला एकवार तुम्हांस मांडीवर घेण्याचें सौख्य लाभूं द्या. माझा बाळ मला भेटून माझ्या

डोळ्यांचीं पारणीं फिटतील असें कर. तुम्हां राधाकृष्णांचा जोडा पाहण्याचें माझें भाग्य उदयास आणा " असें वारंवार डोळ्यांत आसवें आणून सूनबाईस सांगितलें. आईनें कृष्णाच्या प्रेमाच्या वस्तु त्यांचेबरोबर दिल्या. अनंतराव शरीरानें काडीपैलवान होते. तथापि दादास भेटण्याच्या उत्कट इच्छेमुळें ते निघाले. कृष्णास लवकर घेऊन या असें सर्वांनीं सांगून प्रवास सुखकर होण्याबद्दल वडिलांनीं आशिर्वाद दिले. अनंतास संभाळून ने वगैरे निरोप देऊन लांबपर्यंत या साध्वी, सुशील राधाबाईस घरच्या मंडळींनीं पोंचविलें.

९. सातारा ते पुणेपर्यंत बैलगाडीचा प्रवास झाला. नंतर वऱ्हाडांत आकोल्यापर्यंत आगगाडीनें प्रवास झाला. पुढें साठ कोसांचा बैलगाडीचा प्रवास केला. या प्रवासांत अनंतरावास अमांशाचा विकार झाला. त्यांची प्रकृति अगोदरच अशक्त असे व त्यांत प्रवासाचे कष्ट, ठिकठिकाणचें मिळेल तसें पाणी प्यायचें, यामुळें त्यांना विकार झाला. अनंतराव सतत रडूं लागले. देश परका, भाषा थोडी परकीच वाटूं लागली, तथापि राधाबाईंनीं त्यांची उत्तम शुश्रूषा करून ते उभयतां माहुरास येऊन पोंचले. राधाबाईस आपल्या अनंत जन्मांचें सार्थक पतिदर्शनाबरोबर झाल्यासारखें वाटलें. त्यांनीं पतिचरणास घट्ट मिठी मारली व अतिशय प्रेमाश्रु गाळले. अनंतरावांस बंधूचें आज पहिल्यानेंच दर्शन झालें होतें. सर्वांना हा दिवस फार आनंदाचा गेला.

वृत्तांत कळला सतिला विठ्ठलसंकेताचे दिवशीं ।
पावला रुक्मिणीपति नवसी ॥
मग त्या नाहीं पारावार थोर आनंदासी ।
चढली राज्यपदीं दासी ॥
मग अविलंबें लगबग करुनी आली माहुरासी ।
भेटली नार भ्रतारासी ॥
परंतु राहिली होती अंगीं कर्ममळी थोडी ॥
आतां काय० ॥

यापुढें कृष्णा ऊर्फ विष्णुदासास " बोवामहाराज अगर नुसतें महाराज " या नांवानें आम्ही संबोधणार आहोंत.

१०. कै० रेणुराव देशमुखांच्या वाडयांतच बोवांचा प्रपंच सुरू झाला. त्यांच्या प्रपंचांतच यांचा संसार विलीन झाला. राधाबाईच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. त्या पातिव्रता धर्मानें पतिसेवा व कुटुंबधर्मानें प्रपंचांतील कार्यें करूं लागल्या. अनंतरावांसही बोवांनीं ठेवून घेतलें.

॥ॐ श्री सद्‌गुरू समर्थ॥

## ९. गृहस्थाश्रम व पत्नीवियोग.

१. अनंतराव यांचें चरित्र विष्णुकवींच्या चरित्राशीं निगडित झाल्यामुळें त्यांची माहिती येथें देणें जरूर झालें आहे. अनंतरावांच्या जन्मापूर्वींच त्यांनीं सातारा सोडला होता. माहुरास अनंतरावांचें वास्तव्य बारा वर्षें झालें. या बारा वर्षांत बोवांच्या प्रपंचपरमार्थाचाही जम उत्तम बसला होता. अनंतरावांस योगाची माहिती बोवांनीं सांगितली. सहा वर्षें अनंतरावांनीं आपलें दादाजवळ पुष्कळ अभ्यास केला. नंतर अनंतराव तेथें शाळा घालून विद्यार्थ्यांना विद्यादान करूं लागले. त्यांचा विद्यार्थीवर्ग हल्लीं विद्यमान आहे. श्रीमंत जगज्जीवन बाबासाहेब उदाराम राजे जहागिरदार यांना अनंतरावांनीं शिकविलें व इतरही मंडळी यांच्या शिष्यवर्गांत असत. अनंतराव माहुरास असतांना बोवामहाराजांचा पत्रव्यवहार साताऱ्यास होत असे. साताऱ्याहून गेलेल्या प्रत्येक पत्रांत आपण एकवार येऊन भेटावें, आम्ही आतां वृद्ध झालों आहोंत, काळाचा भरंवसा लागत नाहीं, तरी आपण जरूर येण्याचें करावें असा मजकूर असावयाचा. परंतु बोवामहाराजांचे अधिकाधिक लोकप्रियतेमुळें साताऱ्यास जाण्याचा योग केव्हांच जमला नाहीं.

२. सातारा येथील मंडळी कृष्णाची वाट पाहून थकून गेली व आतां या जन्मांत कृष्णाची भेट होणें अशक्य आहे, असें समजून काळ कंठू लागलीं. अनंता गेला त्यासही दोन वर्षें होत आलीं, तरी तोही परत येत नाहीं हें पाहून आईबाप फारच निराश झाले. दोन वर्षांनंतर शके १८०२ ( सन १८८० ) चे चैत्र मासीं बोवांचे धाकटे बंधू विष्णुपंत माहुरास गेले त्यांनाहि महिनाभर ठेवून घेतलें. नंतर त्यांचेजवळही मातापित्यास क्षेम समाचाराचें पत्र देऊन त्यांना साताऱ्यास रवाना केलें. विष्णूबरोबर तरी कृष्णा येईल अशी आशा होती तीही विफल झाली, अनंताही आला नाहीं दिवसेंदिवस रावजी व भालचंद्रबोवा निराशेमुळें संसारांत उदासीन झाले. यापुढील दिवसांत संसाराचा गाडा कसा तरी ढकलीत होते. या बंधूंचें परस्परांवर अकृत्रिम प्रेम असे.

३. शके १८०५ भाद्रपद व० १२ रोजीं भालचंद्रबोवांनीं इहलोकची यात्रा संपविली. भाळू हा माझा आत्मा होता, तो गेल्यावर माझें जगणें कठीण आहे असें रावजी म्हणत असत. रावजींनींही एक महिन्यानंतर आश्विन व० १२ रोजीं स्वर्गलोकीं गमन केलें. एका महिन्यांत दोघे बंधू गेल्यानें घरांतील मंडळींचा आधार तुटल्यासारखा झाला. त्यांचीं क्रियाकर्मांतरें विष्णूचे हस्तें

झालीं, व आतां प्रपंचाचा भार सर्वस्वी विष्णूवर पडला. या वेळीं विष्णुपंतांचें वय सुमारें तेवीस वर्षांचें होतें. विष्णुपंतांचें लग्न साताऱ्यास झालें होतें. मंगळवार पेठेंतील सावळाराम चरेगांवकर यांनीं आपली कन्या त्यांस दिली होती. सावळाराम यास दुसरी संतति नव्हती. त्यांचे बंधु अनंत बाबाजी चरेगांवकर हे वऱ्हाडांत शिक्षक म्हणून गेले. त्यांनीं मु. जवळें, ता. पुसद, जि. यवतमाळ येथें फार मोठी इस्टेट केली आहे. हल्लीं अनंत बाबाजींचे चार चिरंजीव असून ते सुस्थितींत आहेत.

४. विष्णुपंतांनीं घरीं राहून भिक्षुकी करण्याचें नाकारलें, व नोकरीसाठीं हिंडत असतां उमरावतीस त्यांना शिक्षकाची नोकरी मिळाली. आतां घरीं फक्त गणपतराव राहूं लागले. परंतु ते लहान असल्यामुळें प्रपंचभार ओढण्यास समर्थ झाले नाहींत. त्यांचें लग्न झालें नव्हतें; त्यांनींही स्वतःस पोटाचा व्यवसाय पाहण्यासाठीं सातारा सोडला व त्यांची मातुश्री गंगाबाई तर एकटी राहण्याच्या प्रसंगामुळें हताश झाली. ज्या घरांत नित्य पंचवीस मनुष्यें असायचीं तेथें एकट्या वृद्ध गंगाबाईस राहण्याचा प्रसंग आला ! नंतर गंगाबाई आपल्या मुलीच्या घरीं राहूं लागल्या व घरास कुलूप लाविलें तें कायमचेंच लागलें !

५. माहुरास अनंतरावांनीं शाळा सोडून कांहीं दिवस श्रीदत्तशिखरावर नोकरी केली. नंतर थोडे दिवस करोडगिरी (दस्तुरी) खात्यांत नोकरीस होते. ते साताऱ्यास जाण्यासाठीं नेहमीं उतावळे होत असत. अखेर शके १८११ सालीं ते माहूर सोडून साताऱ्यास आले. त्यांचें अक्षर फार उत्तम असल्यामुळें साताऱ्च्या वृत्तसुधा, बोधसुधाकर, छापखान्यांत लेखकाची नोकरी करून पुण्यास गेले. पुण्याचे चित्रशाळेंत कांहीं दिवस व मनोवेधक चित्रकला छापखान्यांत कांहीं दिवस नोकरी केली. हे चित्रें फार उत्तम काढीत असत.

६. अनंतराव पुण्यास राहिल्यावर त्यांनीं आपल्या मातुश्रीस पुण्यास नेलें. या वेळीं अनंताचें लग्न व्हावें व आपली इच्छा अंशतः तरी पूर्ण व्हावी, असें गंगाबाईस वाटत होतें. पण अनंताचें भवितव्य या पाशांत अडकण्याचें नसलेमुळें लग्न झालें नाहीं. शके १८१३ मार्गशीर्ष शु. १२ रोजीं पुण्यास गंगाबाईंनीं देह ठेविला. शेवटपर्यंत त्यांना कृष्णाचा ध्यास असे. पण या जन्मीं कृष्णास भेटण्याची इच्छा सफल झाली नाहीं ! मातुश्रीचें और्ध्वदेहिक कर्म करण्यासाठीं अनंतराव धोमक्षेत्रीं सौ. भीमाबाईचे घरीं गेले. विष्णुपंत व गणपतराव हेही धोमास आले. खरशीहून माझी मातुश्रीही धोमास गेली, मातुश्रीचे उत्तरसंस्कार यथाविधि झाले. नंतर अनंतराव पुण्यास, विष्णुपंत नागपुरास व गणपतराव स्वतंत्र धंद्यासाठीं निघून गेले. या प्रसंगानंतर हीं सर्व भावंडें एकत्र जमण्याचा योग कधींच आला नाहीं. विष्णुपंतांनीं सातारा सोडला ते पुन्हां

अद्याप सातान्यास मेले नाहींत. त्यांना पुत्रसंतति न होतां पांच मुली होऊन त्यांची पत्नी निवर्तली. अनंतराव व गणपतराव ब्रह्मचारीच राहिले. याप्रमाणें या नांवारूपास आलेल्या घराण्याचा पुत्रसंततीकडून शेवट झाला !

७. सातारा येथील घराची व्यवस्था, घर पडून त्यांतील दगडमाती, लांकडें नाहींशीं होईपर्यंत सदोबा काळे यांचे चिरंजीव नारायणराव काळे पाहात असत. आतां सातारा येथें फक्त घराची जागा मात्र दाखविण्यापुरती आहे. याप्रमाणें कालचक्र फिरून या उत्तम घराण्याचा सातान्यांतील कारभार आटोपला !

८. माहुरास विष्णुकवींना मातुश्री वारल्याचें समजून फारच दुःख झालें. खऱ्या सत्पुत्रास मातृवियोग कसा तापदायक होतो याचें दृश्य विष्णुदासांच्या एका पत्रावरून ध्यानांत येण्यासारखें आहे. मातृप्रेम ही काय अमोल चीज आहे व ती आर्यांचें अंगीं कशी बाणली आहे हें या पत्रावरून समजेल. पाश्चात्य संस्कृतीच्या अनुकरणानें आमच्या समाजावर या बाबतींत विरुद्ध परिणाम घडूं लागल्याचीं उदाहरणें ठिकठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येत आहेत. तथापि आर्यसंस्कृतींत मातृप्रेमास कसें उच्चस्थान आहे हें आतां आपण पाहूं.

श्रीजगदंबा प्रसन्न.

क्षेमकुशळ मित्ती माघ व. ११।१८२० बुधवार

चिरंजीव रा. रा. अनंतराव धांदरफळे ( मु. धोम ) यासी—

९. कृष्णा ऊर्फ विष्णुदास मु. माहूर, हल्लीं मु. ता. पुसद अनेक आशिर्वाद विशेष. आपलेकडोन दोन पत्रें आलीं तीं पावलीं. आपला मजकूर सर्व समजून आला. बहुत दिवसांपासून आपलें पत्र न आल्यामुळें आम्हांस मोठी काळजी लागली होती. आम्ही आपलेकडे पत्र पाठवून समाचार घ्यावा तर आपला पत्ता बिलकूलच लक्षांत राहिला नाहीं. त्या योगानें निरुपाय झाला. असो.

१०. इकडे विशेष कारण असें घडून आलें कीं, आम्ही माहूर येथें असतां मातोश्री गंगाबाई प्रकृति बिघडून अस्वस्थ झाल्या, त्याबद्दल आपण दोन पत्रेंही पाठविलीं. आमचें त्यांचे दर्शनार्थ येणें झालें नाहीं. पुढें त्या परधामास गेल्या, तेंही पत्रद्वारें समजलें. नंतर चित्ताचे ठायीं असा कांहीं विषाद प्राप्त झाला कीं, (न मातुः परदैवतम्) मातुश्रींचे आपण पूर्ण अपराधी आहोंत. या पापाचे झाडे आपल्यास देणें लागतील, चुकणार नाहींत, व मातुश्रीचा अपराधी जो दुष्ट त्याजवर हरिहर—ब्रह्मदेवही कृपा करण्यास समर्थ नाहींत. तर या दुःखाचा परिहार व या पापापासून मुक्त करून व कृपाकरून तारण्यास आईच समर्थ आहे. त्यांवांचून इतर उपाय लक्षावधिही केल्यास वाळूचे घाण्याप्रमाणें व्यर्थच जातील, हें पूर्ण जाणून श्रीजगज्जननी रेणुकेचे पाय धरिले व त्याच जननीला प्रसन्न करण्यास यज्ञयाग दान—तप—व्रतादिक शतशःही साधनें केल्यास कांहींच उपयोग

न होतां उलट खेदास कारण होईल, हें जाणून शरणांगतीवांचून दुसरी युक्ती कांहीं उपयोगी नाहीं म्हणून सर्व जपतपादि खटपट सोडून तिचें नामस्मरण करीत असतों; व करुणाकर स्तवन तिचेंच कृपेनें जें जें होईल तें तें करीत असतों." ( यापुढील मजकूर कविता छापण्याची योजना, व श्रीजगदंबेची तसबीर तयार करविण्याबद्दलचा आहे. मीं पत्रांतील मजकूर कारणापुरता येथें घेतला आहे. )

११. विष्णुदास महाराजांना मातृप्रेम केवढें होतें हें पत्रावरून ध्यानांत येईल. त्यांना अध्यात्मबोध उत्तम झाला होता, तरी मातृप्रेमाबद्दल त्यांचे उद्गार पाहून श्रीशंकराचार्यांच्या नांवावर प्रसिद्ध असलेले देव्यपराधक्षमापन स्तोत्राचें स्मरण झाल्यावांचून राहात नाहीं. एका पदांत ते म्हणतात.

आम्ही चुकलों जरितरि कांहीं तूं चुकुं नको अंबाबाई ॥ ध्रु० ॥
आम्ही कुपुत्र म्हणवुनि घेऊं । तुं नको कुमाता होऊं ॥
आम्ही विषय–ढेंकळें खाऊं । तूं प्रेमामृत दे खाऊ ॥
आम्ही रांगूं, तूं उभि राही ॥ आम्ही० ॥

" कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति " याप्रमाणेंच विष्णुदास म्हणत आहेत.

१२. माहुरास राधाकृष्णांचा प्रपंच उत्तम चालावयाचा. परंतु विष्णुदास महाराज ज्या घरीं होते त्या घरीं साध्वी राधाबाईबद्दल थोडा अनादर असे. महाराजांबद्दल पूज्यभाव होता. राधाबाईंना तेथें अतिशय काबाडकष्ट करावे लागत असत. सर्वांपुढें हांजी हांजी करावी; घरांत सत्ता बिलकुल चालत नसे. मिळेल तेव्हां खावें; असा जाच होत होता. परंतु या साध्वी माउलीनें पतिचरणीं निष्ठा ठेवून अशा हालांतही दिवस काढले. परमेश्वरकृपेनें राधाबाई गरोदर राहिल्या व आतां आपलें सर्व दुःख संपून आनंदांत काळ जाईल असें चिंतन त्या करूं लागल्या. परंतु गरोदरस्थितींतही त्यांचें काबाडकष्ट कमी झाले नाहींत. नऊ महिने पूर्ण झाले, तरीही महाराजांचें लक्ष स्त्रीच्या कष्टाकडे वळेना. त्यावेळीं विष्णुपंत माहुरास आले होते. त्यांनीं दादांना निकरावर येऊन सांगितलें व दादांनींही त्यांचें ऐकून ताबडतोब गृहत्याग करून दुसरीकडे बिऱ्हाड केलें. कै. गोविंदराव चांभारे यांनीं व त्यांची सुशील पत्नी यमुनाबाई यांनीं राधाबाईंचें बाळंतपण व्यवस्थित रीतीनें केलें, परंतु संतति मात्र अल्पायु झाली. आणखी एक अल्पायु संतति झाली होती.

१३. स्वतंत्र प्रपंच थाटल्यावर महाराजांना सर्व तऱ्हेचा आनंद प्राप्त झाला.

आतां गृहादिक आवडे । हें कांहीं नलगे त्यजावें ।

जें घेते झालें स्वभावें । निःसंग म्हणवुनी ॥ ज्ञा. अ. ५ ॥

अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः ।
अंतस्त्यागी बहिःसंगी लोके विहर राघव ॥
(योगवासिष्ठ)

जो अंतरीं दृढ । परमात्मरूपीं गूढ ।
बाह्यंतरी रूढ । लौकिक भागु ॥
जो इंद्रियां आज्ञा न करी । विषयांचें भय न धरी ।
प्राप्त कर्म नाव्हेरी । उचित जें जें ॥ ज्ञा. अ. ३ ॥

असा बोध महाराजांचा होता. श्रीहरिस्वरूपावर संसाराचे ठसे उमटले आहेत. चित्सागरावर प्रपंचरूपी लहरी दिसत आहेत. प्रपंच पूर्ण परमात्म्यानें व्यापला आहे. पदार्थमात्र ईश्वर आहे. अशी सुंदर प्रेममय भावना असल्यामुळें बोवांचा प्रपंच उच्च दर्जाचा जमला. प्रपंचपरमार्थ एकच आहेत; यांत सांडणें व मांडणें कांहीं नाहीं. अंतःकरण परमात्मप्रेमानें भरून गेलें असल्यानें सर्व जगच प्रेममय ईश्वर आहे, असें बोवांच्या प्रतीतीस आल्यामुळें सातारा सोडणें, पत्नीत्याग करणें वगैरेबद्दल नंतर त्यांना वाईट वाटत असे. पण हा सुंदर उच्च दर्जाचा बोध पटण्यास्तव इतकें विरोधी चित्र निघावें लागलें तेव्हां आनंद तयार झाला. महाराजांच्या पारमार्थिक मतांचा परामर्श पुढील प्रकरणांत घ्यावयाचा असल्यामुळें येथें पाल्हाळ करीत नाहीं. गांवांत व परगांवीं महाराजांचा कीर्तिपरिमल सतत वृद्धिंगत होत होता.

१४. गृहस्थाश्रमांतील सर्व व्यवहार आश्रमधर्माप्रमाणें चालले होते. नित्य पंचमहायज्ञ, अतिथीस अन्नदान, भजनपूजनादि सर्व यथास्थित चालू होतें. राधाबाई सुगृहिणी होत्या. जे पदार्थ पतीस तेच अतिथीस देत असत. याप्रमाणें राधाकृष्णांचा प्रपंच परमार्थ उत्तम झाला होता.

पोवाडा

तेथें जाहला ताप असा कीं जीवाचि त्यागावा ।
तरी तो कशासि मग गावा ॥
परंतु नाहीं कधीं वंचिलें पतिच्या मनोभावा ।
पाहुनि जन म्हणति वाहवा ॥
गरोदर झाली असतां नाहीं क्षणभर वीसांवा ।
जाच तो तिनेंचि सोसावा ॥
प्रसूत काळाच्या संधित गृहगति बाहेर काढी ॥
आतां काय० ॥
पाहुनि तो क्रूर कुनष्ट पर्या वाटलें आश्चर्या ।

उतरली सखिची मुखचर्या ॥
मित्रोत्तम गोविंद दामोधर, यमुना तद्भार्या ।
जाहलें साह्य अडित कार्या ॥
घालिति संकटिं आप्त परी जन देती धैर्या ।
वाटलें नवल तें सूर्या ॥
तेव्हां पतिची मती शुद्धिवर आली जिरली भोंडी ।
आतां काय० ॥
तप्तांगावर सदा पाझरे चंद्रामृत किरण ।
पावलें स्वस्थांतःकरण ॥
लक्ष्मीपतिनें धनधान्यादिक भरपूर सुवर्ण ।
पुरविलीं बहुवस्त्राभरणं ॥
जी जी वासना धरिली ती ती केली परिपूर्ण ।
जाहला सकळ शोक हरण ॥
दैवें कंटक-वनीं लाभली कल्पद्रुम झाडी ।
आतां काय० ॥
सकळही केले पूर्ण मनोरथ जय तुळशीमाते ।
आतां नको दाऊं दुःख मातें ॥
अखंड सौभाग्य हें रक्षुनि करि या देहाते ।
आनंदे मुक्त पतीहातें ॥
जसें जसें दैवामध्यें लिहिलें तसें तसें होतें ।
चुकेना नर हो कदापि तें ॥
भविष्यकाळाकडे मनानें मग घेतलि ओढी ।
आतां काय० ॥

महाराजांचा प्रपंच श्रीएकनाथमहाराजांच्या प्रपंचासारखा होता. भूतमात्रीं ईश्वर आहे, असें समजून सुंदर अकर्तात्मबोधावर प्रपंच होत होता. अशा उत्तमावस्थेंत पतिसमीप देहत्याग व्हावा, एवढीच वासना राधाबाईस राहिली, व त्या देवाची तशीच प्रार्थना करूं लागल्या. त्यांची पतिभक्ति पाहून ग्रामवासी लोक आश्चर्यानें थक्क होत. सर्व लोक त्यांनां ' मायबाई ' या नांवानें संबोधीत असत.

१५. शके १८१४ ज्येष्ठ शु. २ रोजीं साध्वी पतिव्रता राधाबाई यांनीं नामस्मरण करीत पतिपरमात्म्यासंनिध जड कलेवराचा त्याग केला. पत्नीचे निधनानें वैराग्यशील बोवांनाही धक्का बसल्यावांचून राहिला नाहीं. राधाबाईच्या आचरणाबद्दल गोष्टी निघाल्या असतां श्री. बाबासाहेब उदाराम राजे यांच्या

मातुश्रीच्या नेत्रांवाटे खळखळा अश्रुपात होत असतांना मीं पाहिलें आहे. धन्य राधाबाई; या माउलीनें आपल्या पवित्र आचरणानें आमचें मातृकुल धन्य केलें व सासरमाहेरच्या कुलांस भूषणभूत होऊन राहिली.

पोवाडा—

भेटायास्तव आई पार्वती पिता शंकरासी ।
म्हणे मी जातें माहेरासी ॥
सकळ पावलें शुभ मंगळ सौभाग्य भरपुरासी ।
लाभलें सुख संसारासी ॥
ज्येष्ठ शुद्ध द्वितीया दिनिं दक्षिणायन दशहारासी ।
मिळाली गौरीहारासी ॥
वाटे सुखसिंधूच्या बुडाली आधें मधें होडी ।
आतां काय० ॥
कामिनी–वांचुन काय करावें उजाड सदनासी ।
निघूनी जावें अरण्यासी ॥
सांगावें तरि काय कर्महिन दुःख धन्यांसी ।
दाऊं ने दिनमुख अन्यासी ॥
काय करावें उत्तम कनकांबर धन धान्यासी ।
टाकुन व्हावें संन्यासी ॥
गेली वाया बाळी बुगडी नथ लुगडीं साडी ।
आतां काय० ॥
प्रपंच–भुवनांगणीं सुशोभित द्राक्षाची वेली ।
मंडपीं होती पालवली ॥
प्रारब्धानें मुळासकट ती उपटुनिया नेली ।
जगांतुनि या नाहींशी केली ॥
संसाराची सर्व उभली येथुनिया सरली ।
सुखाची सरिता ओसरली ॥
परि काळानें केळ कोंवळी कापिली आघाडी ।
आतां काय० ॥

यानंतर महाराजांनीं सर्व संसाराचें सत्पात्रीं दान केलें. ज्याला जी वस्तु योग्य त्यास ती समर्पण करून आपण स्वतः लंगोटी लाविली, व लिंबाचा पाला भक्षण करून राहूं लागले.

१६. या प्रकरणांत विष्णुदासमहाराजांच्या सातारा व माहूर येथील प्रपं-

त्याचा निरास झालेला आहे. महाराजांचें प्रापंचिक चरित्र येथें संपलें आहे. त्यांच्या पोवाड्याचें शेवटचें एक कडवें येथें दिल्यावांचून राहवत नाहीं.

अरस नाहीं सरस आहे खिरस गाईचा ।
मिळेना बहु महागाईचा ॥
घ्यावा मासला मधुर केवळ साखर साईचा ।
आहे बहु तुमच्या सोईचा ॥
सुगंध पुष्पासहित पसरला वेल जाईचा ।
पोवाडा राधाबाईचा ॥
विष्णुकवीची घांट वाजली सुटलि रेलगाडी ।
आतां काय खेळण्याची गोडी ॥ ३२ ॥

महाराजांच्याच शब्दांत हें त्यांच्या काव्यकलेचें वर्णन आहे.

—— ॐ ——

## ॐ श्री सद्‌गुरुसमर्थ.

## १० भक्तिप्रेम व परमार्थविचार.

१. पत्नीनिधनोत्तर महाराजांनीं संसारांतील सर्व वस्तूंचें दान करून आपण अगदीं मोकळे राहिले. आतां त्यांना व्यावहारिक पाश बिलकूल राहिला नव्हता. उरलेलें आयुष्य श्रीजगदंबामातेचें चिंतनांत खर्च करण्याचा त्यांनीं निश्चय केला व ते माहूरच्या आसपास राहूं लागले. महागांव येथें त्यांचें वास्तव्य फार होत होतें. तेथील मडके यांचे घराण्याशीं त्यांचा फार घरोबा होता. महाराजांचे आशीर्वादामुळें या मंडळींचें कल्याण झालेलें आहे. महाराजांचें चरित्रांत चमत्कार हेच आहेत कीं, यांची कृपादृष्टि वळेल तिकडे मनोरथ—पूर्ति व्हावी.

तो जयाकडे वासू पाहे । तेउती सुखाची सृष्टी होये ।
तो म्हणे तेथ राहे । महाबोधु ॥ ज्ञानेश्वरी ॥

बाकी इतर गारुडी चमत्कार होण्याबद्दल त्यांच्या मनांतही येत नसे. सर्व बंधनांतून सुटून जीवास या एकाच जन्मांत निरतिशय स्वानंदाचा लाभ करून देणें हा सर्व चमत्कारांतील अद्‌भुत चमत्कार होय, व हा अद्‌भुत चमत्कार महाराजांचे ठिकाणीं असलेला मीं अनुभविला आहे, व माझे कित्येक बांधव हा चमत्कार अनुभवीत आहेत.

२. महाराजांनीं सर्वस्वाचा त्याग केला व ते मोकळे झाले. तथापि हा खरा त्याग झाला नाहीं. अंतःकरण सद्‌गुरुप्रेमानें पूर्ण भरून प्रत्येक वृत्तींत श्री रेणुकामातेचें दर्शन होईल त्यावेळीं खरा त्याग बाणला असें होईल व मग या

त्यागांत अनेक प्रपंचाचे बोजे अंगावर असले तरी हरकत नाहीं, असें निश्चित मत त्यांच्या आत्मप्रतीतींत उतरण्यास कारण झालें तें—

३. एकदां मातृतीर्थाचें कांठावर मुखानें मातेचें नामस्मरण करीत हातानें भाजी खुडीत होते. पण मनश्चक्षूसमोर सतत पत्नी दिसत असे. अत्यंत प्रेमाच्या वस्तूबद्दल असें होणेंच वाजवी आहे. कारण पत्नीकडे ते आत्मदृष्टीनें पाहत असत. तथापि त्यांनीं आपल्या रेणुकामातेस प्रार्थना केली कीं, आतां माझे जड नेत्रांसही तुझ्या सगुण मूर्तीवांचून कांहीं दिसूं नये.

## पद

आई, खरंच ग । जें केलंस तें बरंचग ॥ ध्रु० ॥
माझी धनदौलत बायको । तुझ्या मनांत वाटली नको ।
जन्माची फटफट । कर्माची खटखट ।
झटपट केलिस दूरचग । आई खरंचग ॥

हें बारा कडव्यांचें पद करून जगदंबेस शरण गेले व खालील अष्टक तयार केलें. अष्टक फार उपयुक्त असल्यामुळें देत आहे.

## श्लोक

तुझ्यासाठीं शास्त्रासहित शिकलों गायनकला ।
जगामाजीं केल्या त्यजुनि भय वेव्हार नकला ॥
तुझ्यापायीं माझा अजवर पहा देह झिजला ।
अहा कांते कांते अझुन तरि तूं सोड मजला ॥ १ ॥
मला कष्टीलें जोंवरि रवि म्हणे मी उजडलों ।
जरा भ्यालों नाहीं जननिजनकाला बिघडलों ॥
तुझ्यासाटीं केला नुतन खडिचा उंच मजला ॥ अहा० २ ॥
कशाला एकांतीं म्हणसि रतिचें घ्या सुख चला ।
पहा तारुण्याचा भर उतरला जोर खचला ॥
प्रपंचाच्या भारें श्रमुनि जिव हा स्वस्थ निजला ॥ अहा० ३ ॥
जरी ताडी नाकीं पद तरि न सोडी खर खरी ।
तशा कर्में आली गत अशि वयाला खरखरी ॥
फजीतीचा धंदा विषय अतिमंदा समजला ॥ अहा० ४ ॥
न सोसे दुःखाची मज जड शिळा साच रडलों ।
पहा श्रीविष्णूच्या पदतळिं बळीसा चिरडलों ॥
न यावें स्वप्नीं त्वां म्हणुनचि विनंती हि तुजला ॥ अहा० ॥ ५ ॥
तुझा मी तूं माझ्यासम उतरुनी आलिस कशी ।

भवाग्नीच्या कुंडीं ढकलुनि मला गेलिस कशी ।
परत्राचा रस्ता मजविण कसा गे उमजला ॥ अहा० ६ ॥
अम्ही आत्मध्यानीं बसुनि दृढ झालों निबरची ।
नको मारूं आतां उगि हृदयिं घालून बरची ॥
यमाजीचा माथा धडधड नगारा गरजला ॥ अहा० ७ ॥
कधीं नाहीं गेलों तरि जपतपालागिं विजनीं ।
रमानाथाच्या ही क्षणहि रमलों नाहिं भजनीं ॥
कधीं नाहीं भावें हरहर महादेव पुजिला ॥ अहा० ॥ ८ ॥
सदा चिंताग्नीचे बसति शरिरीं तप्त चटके ।
म्हणोनी गायीले नित अनुभवें सप्त चुटके ।
करो विष्णूदासावरि हरि कृपेचा गरजला ॥ अहा० ॥ ९ ॥

अष्टकांत जनस्वभावाचें सुंदर चित्र रेखाटल्यामुळें सवंग दिलें आहे. यापुढें ध्यानांत केव्हांही पत्नी आली नाहीं. आतां वेळ मोकळा असल्यामुळें कविता फारच प्रेमपूर्ण होऊं लागल्या. महागांवच्या खड्ल्यावर सन १८९२ सालीं फौजदारींत काम सुरू झालें त्यावेळीं त्यांनीं

नका खाऊं हे जहर दादा पैसा सरकारी । नाडले पाटील पटवारी ॥

हा हृदयस्पर्शी पोवाडा केला आहे. त्यांत जनस्वभावाचा परिपोष उत्तम वठला आहे. पोवाडा कवितेच्या पुस्तकांत छापला आहे.

४. त्यांच्या कवितेचें विवेचन अगर परीक्षण करण्याचा अधिकार मला नाहीं. तें काम विद्वानांचें आहे. साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें कवितेंत दोष दिसतील. परंतु विष्णुकवि हे नुसते कवि नसून ते संत होते. संत हें त्यांचें प्रधानांग व कवि हें गौणांग होतें. शास्त्र हें समाजाच्या व्यवस्थितीसाठीं असतें. शास्त्राचा अम्मल समाजांतील जीवमात्रावर चालतो व तो तसा चालत आहे म्हणूनच समाजबंधनें विस्कळीत होत नाहींत व याच सद्गुणांमुळें प्राचीन आर्यांनीं घातलेली शास्त्रमर्यादा आर्य लोक पाळीत आहेत, म्हणून अनंतकाल आर्यांची परंपरा शुद्ध राहिली आहे. अशी जरी स्थिति आहे तरी सर्व शास्त्रांचें ध्येय जें ब्रह्मप्राप्ति तें ज्यांना सहज प्राप्त झालें आहे, त्यांचेवर शास्त्रांचा अम्मल चालू शकत नाहीं. महाराजांच्या अखिल वृत्तींतून निजानंदाचा झरा वाहत असल्यामुळें त्यांना कृत्रिम शास्त्रांचें बंधन लावणें योग्य होणार नाहीं.

झाली स्वेच्छाचि विधि । स्वैर झाला समाधी ॥
दशे ये मोक्ष ऋद्धि । बैसों धापे ॥ अमृतानुभव ॥ ९ ॥
शिवरूपतया सार्धं यस्य भाति स्वभावतः ।

स्वेच्छाचारसमाचारं तस्य साचीचशूलिनः ॥ सूतसंहिता ॥
एवं शिवानुभवें जाण । शिवचि असे परिपूर्ण ।
तेथें अन्यथाभान । तुटोनचि गेलें ॥ १ ॥
तो हर्ष विषादातीत । कर्तव्याभिमानरहित ॥
करी आतां येथ । अविधि तो काई ॥ २ ॥
अहो हा विधीचा द्योतक। म्हणोनि विधीचा नव्हे पायिक ॥
आतां स्वभावे याची वर्तणूक । तोचि विधि ॥ ३ ॥
यापासून स्वभावें घडे । ते कांहींच अविधि न पडे ॥
वर्ततां विधि सांगडे । परि विधीचा नव्हे ॥
( शिवकल्याण स्वामी )
तैसे संकल्पोनी काढिले । जयाचे मनचि चैतन्य जाहलें ।
तेणें एकदेशी परि व्यापिलें । भुवनत्रय ॥ १ ॥
आतां कर्ता कर्म करावें । हें खुंटले तया स्वभावें ।
आणि करी जरी आघवे । तरि अकर्ता तो ॥ ज्ञा. अ. ४ ॥

वरील उताऱ्यावरून पाहतां संतांचें वाङमयास शास्त्रदृष्टीचें बंधन लावणें योग्य होणार नाहीं.

५. वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध पंडित रावजीशास्त्री पाध्ये उमरखेड. यांनीं व्याकरण व वेदांतशास्त्राचें अध्ययन श्रीक्षेत्र काशी येथें केलें होतें. उमरखेडास त्यांची संस्कृत पाठशाळा होती. त्या भागांतील हल्लींचा पुराणिक वर्ग त्यांच्याच शिष्यपरंपरेपैकीं आहे. उपर्युक्त शास्त्री विष्णुकवींची कविता ऐकून आनंदित झाले व त्यांनीं कवींना भेट देण्याविषयीं पत्र लिहिलें. त्याचें उत्तर त्यांनीं बऱ्याच आर्या व श्लोकबद्ध करून पाठविलें.

आर्या — किंबहुना तूं पार्था इतकें ध्यानांत ठेउनी पाहे ।
एक्यांशीं सर्व जगीं परमात्मा मी असूनिया राहे ।
श्लोक—लाभात्रा स्वहितार्थ लाभ म्हणुनी देहीं बहू जाणता ।
आत्म्यावांचुनि श्रेष्ठ लाभ दुसरा सांगा तुम्ही कोणता ॥
होऊ ने स्वहितार्थ-घात क्षगती हें ही बहू जाणता ।
आत्म्यावांचुन श्रेष्ठ लाभ दुसरा सांगा तुम्ही कोणता ॥ १ ॥

६. महाराजांनां आत्मसाक्षात्कार होऊन त्यांना वारंवार त्यांच्या रेणुका मातेचें दर्शन होत होतें, याजबद्दल व त्यांचे आत्मतृप्तीचें उद्गार कसे आहेत हें त्यांच्याच वाणीनें पाहूं.

अभंग- माझी रेणुका माउली । कल्पवृक्षाची साउली ॥
जैसी वत्सालागी गाय । तैसी अनाथासी माय ॥

हांकेसरसी धाई धाई । वेगें धांवतची पाई ॥
आली तापल्या उन्हांत । नाहीं आळस मनांत ॥
खालीं बैस घे आराम । मुखावरती आला घाम ॥
विष्णुदास आदरानें । वारा घाली पदरानें ॥

"विपुल दयाघन गर्जे" या जगदंबेच्या आरतीचा शेवटचा चरण असा आहे--

ऐकुनी करुणावाणी हृदयीं सप्रेमें द्रवली हो ।
प्रसन्नमुख जगदंबा अंबा प्रसन्न जाहलि हो ॥
अजरामर वर द्याया प्रगटुनि पुढें उभी राहिली हो ॥
भक्तांकित अभिमानी विष्णुदासाची माउली हो ॥
जी निज इच्छामात्रें सूत्रें हालवी कौतुकें हो ॥

"माझी लाज तुला जगदंबे" हें पद पहा. त्यांत

विष्णुदासासम जड तरले । वदूं किती ऐसे अचंबे ॥

येथें यापेक्षां पाल्हाळ न देतां एवढेंच लिहितो कीं, ते पूर्ण साक्षात्कारी होते.. त्यांचे ठिकाणीं प्रेमलक्षणा भक्ति बाणली होती. मुक्तीवरील भक्ति त्यानीं वरली होती. याजबद्दल त्यांचे मुखांतून निघालेले परमामृत मला श्रवण करण्यास सांपडलें. त्याचा आस्वाद वाचकासाठीं देण्याचा मोह मला आवरत नाहीं.

प्रवृत्ती निवृत्तीचे आटोनिया भाग । उतरलें चांग रसायन । तुकाराम ॥

प्रवृत्ति, निवृत्ति, मीतूं, जीव, शिव, सगुण- निर्गुण, माया--ब्रह्म या सर्वांची आटणी करून जें एकपण।विरहीत सार निवडलें त्या रसायनाचे नांव अथवा

सुखीं सुख मुरे प्रेमें चिदानंद उरे । बापरखुमादेवीवरू विठ्ठलु रे ॥

याप्रमाणें सुख सुखाचे ठिकाणीं मुरलें. नंतर जो एक स्वानंद तयार झाला त्याच स्वानंदाचें नांव दत्तात्रेय, रेणुका, रामकृष्ण, विठ्ठल आहे. ही स्वानंदमय मूर्ति

तें चालतें ज्ञानाचें बिंब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ ॥

अशी आहे. ( आर्यांची मूर्तिपूजा किती उच्च दर्जास पोंचली आहे हें पहा. ) असा हा परमात्मा सर्वातीत व सर्व उपाधीविरहित आहे. तो अत्यंत आनंदमय आहे. त्याचे ठिकाणीं अत्यंत आनंदाची जी आवड तीच ब्रम्हांड होय, म्हणजे परमात्म्याचे आनंदाचा विकास जगद्रूपानें झाला आहे. अनिर्वचनीय प्रेमसागरावर अत्यंत प्रेमाच्या लहरी उठतात त्याचेंच नांव जगत्. त्यांपैकीं एका लहरीचें नांव जीव आहे.

हें परिसतां जरि कानडें । तरी जाण पां पार्थ उघडें ।
कृष्णसुखाचेंचि रूपडें । वोतलें गा ॥ ज्ञानेश्वरी अ. ६ ॥

भगवान श्रीकृष्णाचे अंतःकरणांतील अत्यंत प्रेमाची व्यक्त मूर्ति अर्जुन आहे. त्याप्रमाणें सर्व चराचरांतील वस्तुमात्र परमात्म्याच्या सौंदर्याचा विकास आहे.

म्हणौनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें ।
तैसा नोहे उखितें । आघवें मीचि ॥ ज्ञा. अ. १४ ॥

या ठिकाणीं तत्वमस्यादि महावाक्यांचा व द्रष्टा–दृश्य–दर्शन या त्रिपुटीचाही लय होऊन फक्त प्रेमरूप परमात्मा अनंतत्वांन झळकतो, अशी त्यांची परमार्थाची विचारसरणी होती. खालील त्यांची कविता पहा.

साकी—दाता तूंचि त्राता तूंचि पतितपावन तूंची ।
पूर्णब्रह्म सनातन तूंचि जगिं जगजीवन तूंची ॥
भूताकृति तूंची । प्रकृति विकृति तूंची ॥ १ ॥
देवहि तूंचि देविहि तूंचि शिवगणपति गण तूंचि ।
विश्वीं विश्वेश्वरही तूंचि विश्व पटांगण तूंचि ॥
कमळापति तूंची । कमलोद्भवही तूंची ॥ २ ॥
बालक तूंची पालक तूंची चालक मालक तूंची ।
तारक तूंची मारक तूंची भवाब्धिपारक तूंची ॥
गृहवर्धन तूंची । पापपुण्य धन तूंची ॥ ३ ॥

श्री. रावसाहेब शेवाळकरांनीं त्यांना अंबेची उपासना करण्यास सांगितलें व तें त्यांनीं सहज कबूल केलें. कारण दत्त तीच रेणुका आहे अशी त्यांची श्रद्धा असे. श्रीदत्ताच्या आरतीचें शेवटचें कडवें:—

तूं गुरु माउलि कृपेची साउलि धरि तूं दयाळु गडेहो ।
ये आइ म्हणतां येसी लगबग नेसुनियां लुगडें हो ॥

सद्गुरूस आई म्हणून हांक मारतांच लुगडें नेसून तयार. जसें ध्यान करावें तसा परमात्मा तयार आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांपासून सकल संतांनीं ज्या मुक्तीवरील भक्तीचा अंगिकार केला ती भक्ति विष्णुकवींनीं आपलीशी केली. या भक्तिप्रेमांत जीव हा परमात्म्याचें प्रेमस्वरूप असल्यामुळें जीवदशा नष्ट करा व मोक्ष मिळवा, अशी ज्ञानी पंडितांची खटपट भक्तांस करावी लागत नाहीं. येथें मोक्षही पाईकी करतो.

ब्रह्मज्ञान द्वारिं येतें काकुलती । अव्हेरिलें संतीं विष्णुदासीं ॥
रिघों पाहे माजी बळें त्यांचें घर । दवडिती दूर म्हणोनिया ॥
तुका म्हणे येथें न चले सायास । पडिलें उदास त्याच्या गळां ॥ १ ॥

केवळ ज्ञानमार्गांत ज्ञानाचा अभिमान उत्पन्न होण्याचा संभव असल्यामुळें त्यांचें जीवन रुक्ष होतें.

नवल अहंकाराची गोठी । विशेषे नलगे अज्ञानापाठीं ॥
सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवीं ॥ ज्ञा० ॥

परमोच्च भक्तियोगांत अभिमानच स्वरूपाकार होतो, म्हणून सकल पूज्यवर संतवर्यांनीं हा भक्तिप्रेमाचा सोहळा उपभोगिला व सर्व जीवांना स्वानंदाचा मार्ग खुला करून दाखविला.

अभंग—भक्तिप्रेमाविण ज्ञान नको देवा । अभिमान नित्य नवा तयामाजी ॥
प्रेमसुख देई प्रेमसुख देई । प्रेमेविण नाहीं समाधान ॥
रांडिवेनें जैंवि शृंगारु केला । प्रेमेंविण गेला ज्ञानी तैसा ॥
एका जनार्दनीं प्रेम अतिगोड । अनुभवी सुरवाड जाणतील ॥ १ ॥
भक्तिप्रेम सुख नेणवे आणिकां । पंडितां वाचकां ज्ञानियांसी ।
आत्मनिष्ठ जरि झाले जीवन्मुक्त । भक्तिप्रेम–सुख दुर्लभ त्या ॥
अभेदुनि भेद स्थापिला पैं जगीं । वाढावया अंगीं प्रेमसुख ।
तुका म्हणे कृपा करिल नारायण । तरिंच हें वर्म ठाया पडे ॥ २ ॥

शिवाय—

घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिती सांडवीन ॥
तीर्थभ्रामकांसी आणीन आळस । कडू स्वर्गवास करीन भोगें ॥
सांडवीन तपोनिधी अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥
ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरि ऋणी देव ऐसा ॥
धन्य म्हणवीन या लोकिंच्या लोकां । भाग्यें आम्हीं तुका देखियेला ॥
नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिती भाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं ।
दावी मज रूप गोपिकारमणा । ठेवूं दे चरणावरी माथा ॥

या संतवर्यांप्रमाणेंच विष्णुकवींनींही मुक्तीवरील भक्तीचा स्वानंद चाखला होता. व हा स्वानंद ते सर्वांस वांटीत असत.

जे पुरुषार्थ सिद्धि चौथी । घेउनिया आपुले हातीं ।
रिगाला असे भक्तिपंथी । जगा देतु ॥ ज्ञा० ॥

अखिल चराचर श्रीगुरूचा स्वानंद आहे ही प्रतीती उतरली म्हणजे जीवास बंधन राहात नाहीं व अत्यंत सुखाचा सोहळा भोगण्यासाठीं व अनंत जीवांस देण्यासाठीं भक्त व देव हें नातें शिल्लक ठेवितात. यांत दिसावयास द्वैत परंतु प्रतीति मात्र अद्वैताची असते.

दिसे द्वैताचा छंदु । परि कसा उमटे अभेदू ।
एवं देहाकृती तत्वविदु । झांकोळेना ॥ शिवकल्याण ॥

याप्रमाणें उच्च दर्जाचा बोध ठसल्यामुळें महाराज अत्यंत प्रेमळ बनले होते. रेणुका मातेच्या अंतःकरणांतील स्वानंदाचें नांवच जीव आहे.

तो जीव आपला आत्यंतिक आनंद घेण्यासाठीं आपल्याच स्वरूपाची प्रार्थना करीत असतो.

पद ( चाल—वसंतीं बघुनि मेनकेला. )

कृपा कर श्रीअंबाबाई । माहुरगडवासिनी दयाळे, दर्शन मज देई ॥ धृ. ॥
दयाळे अंत नको पाहूं । ये लवकर, करि करुणा, मजवरि निष्ठुर नको होऊं ।
धीर कुठवरी धरूनि राहूं । काळ मला लागला गिळाया चंद्र जसा राहू ॥
सोसेना मला यातना ही । अझुनी माझी दया बये । तुज कशी येत नाहीं ? ॥
कृपा कर० १ ॥
सोडुनी ब्रह्मस्वरूपासी । मी जीव झालों पहाव्रयास्तव तुझिया रूपासी ॥
सोडुनी गृहधनधान्यासी । आली साठी, तुजसाठी मी झालों संन्यासी ॥
वासना जडलि तुझ्या पायीं । म्हणुनि येवढ्या खटकर्माच्या पडलों अपायीं ॥२॥
मज नको दाऊं माय दुसरी । दीन जननि तूं म्हणुनि दीन मी बसलों तुझ्या वसरीं ॥
अवघे दोष, रोष विसरी । अवगुण पोटीं घालूनि ओटिंत घेइ; पदर पसरी ॥
तुझी किती वर्णूं चतुराई । करिशि राइचा पर्वत मेरू पर्वताचि राई ॥ ३ ॥
तूं मूळ पीठिंची वेल्हाळा । अखंड तुझिया आनंद भुवनीं उदंड सुख सोहळा ॥
दाखवी सुंदर रूप डोळा । सकल भूषणालंकृत नादर पीतांबर पिंवळा ॥
तूंचि जगताची रामाई । तूं पार्वती शिव, राम-सिताबाई विठ्ठल-रखमाई ॥४॥
भ्रमरवत् भवकाननिं भ्रमलों । श्रमलों दमलों म्हणुनि भवाश्रमिं विश्रांतिस आलों ॥
लागला तुझा हृदयिं लोलो । विष्णुदास म्हणे सद्गुरुकृपेनें "पुरुषोत्तम" झालों ॥
आतां पद नमुनि-प्रार्थना ही । दे दर्शन मज, याविण दुसरा स्वार्थ सत्य नाहीं ॥५॥

या अत्यंत प्रेमाच्या तळमळींतच लीनपणा धारण करून स्वानंदाची प्रतीति घेण्याची हतोटी संतांना साधलेली असते. आपणही विष्णुकवि महाराजांच्या शब्दांत प्रेमरस घोटूं.

पद—रेंणुके मजला मुळ धाडी । आतां या दुःखांतुन काढी ॥धृ०॥

यांतील निस्सीम भाव पहा—

भेटतां भार्गवरामासी । पावतील प्राण आरामासी ॥
जोगवा मागेन सुखवासी । अथवा राहीन उपवासी ॥
परि मी येईन तुजपाशीं । वांचवी अथवा दे फांशी ॥
वल्कलें अथवा दे साडी ॥ आतां या दुःखांतुन काढी ॥

"आई, तुझ्या मी दर्शनासि योग्य नाहीं कां ?" हें पद पहा—

---

१ उत्कृष्ट २ छंद.

हा भवानि म्या तुलाचि देह अर्पिला ।
सोडुनी अन्नपाणि रानिं लिंब वर्पिला ॥
अपमान मान राग लोभ निरपिला ।
अझुनि कां न भेट देसि लपसी बाई कां ॥ आई० १ ॥
माझे अपराध कांहीं आठवूं नको ।
आपुलें तु सदय हृदय बाटवूं नको ।
व्याघ्रमंदिरासि वत्स पाठवूं नको ।
विष्णुदास म्हणे नयेचि ऐकुं कांहिं कां ॥ आई० २ ॥

तसेंच खालील पदांत मौज पहा—

कधीं भेटशील आई जगदंबे खचित सांग तूं मला मला ।
जोंवरि आहेत प्राण कुडिमधें तोंवर पाहुं दे तुला तुला ॥ धृ० ॥

परिस्थितीचें वर्णन—

राज्य कठिण हें आलें कलिचें वर्तमान भलें नव्हे नव्हे ।
प्रजा-वृत्ति-धन हरण कराया निघति कायदे नवे नवे ॥
घरोघरीं अंधार परंतु रस्तोरस्तीं दिवे दिवे ॥
दया, धर्महि न माय लेंकरा उठे माराया जिवें जिवें ॥
काय उफराटें कर्म म्हणावें कसे कांटे आले फुला फुला ॥ जोंवर० ॥

प्रेमभाव—सत्वर आतां ने मज माहेरिं ठेवूं नको सासरीं सासरीं ।
दे साडी मज जुनी पुराणी, नको सोन्याची सरी सरी ॥
जळो दुसऱ्यांचे हार पितांबर आईची येइ ना सरी सरी ।
जवळ बसुनिया गोड बोल मशि, नको दमडी नासरी परी ॥
विष्णुदास म्हणे आइ रेणुके तुझ्या नमितों पाऊला पाऊला ॥ जोंवर०॥

महाराज भजन करीत असतांना त्यांचें अंतःकरण प्रेमानें गहिंवरून कंठ दाटून येई, मुखांतून शब्द न फुटतां नेत्रांतून प्रेमाश्रू वाहत असत. रेणुका " आई " व मी तिचा " पुत्र " ही त्यांची अखंड भावना असे.

पद—मी लेंकरूं तूं माय । रेणुके, मी लेंकरूं तूं माय. ॥ धृ० ॥
तूं विश्वाची स्वामिणी मोठी । परि मी जन्मलों तुझ्याच पोटीं ।
यामधें संशय काय ॥ रेणुके १ ॥

श्री विष्णुकवींच्या अप्रकाशित राहिलेल्या कवितांपैकीं येथें थोडया दिल्या-वांचून राहवत नाहीं.

---

१ पै-अडका—

श्लोक—

मोठ्यावरीच बहुधां अइनें रुसावें । अंकीं लहान मुल घेउनिया बसावें ॥
मोठें पहात बसतें दुर यद्यपीतें । मांडीवरीच लघु बालक दुग्ध पीतें ॥ १ ॥
देणें रुकारचि पडे शरणांगतीला । ठेवी स्वदास दगडापरि संगतीला ॥
लावून पायरि करी चटकोनि टाकीं । खाऊनि तांबुल वरीच थुकून टाकी ॥२॥
हेवा नसे तिळभरी ध्रुव चांदणीचा । श्री रेणुके तरि करी तरु अंगणींचा ॥
राहूं उभेंचि न बसूंहि कुठें न हालूं । डोलूं सदोदित परी तुजसीं न बोलूं ॥३॥
बाई तुला कशि नये किंव माणसाची । जातातित प्राण निघुनी तुझि आण साची॥
मीं दीनवाणि रडतां तुज सौख्य वाटे। मारूं नकोचि दुखतील तुझे खवाटे॥४॥
हे कामक्रोधमदमत्सर लांडगे हो । निष्ठूर फोडिति हडें खळ दांडगे हो ॥
होते अतीशय मला यमयातना ही। आशा तुझी म्हणुन कीं जिव जात नाहीं॥५॥
तो सार्वभौम नृपश्रेष्ठचि पुंडलीक । आसोत अन्य असतीलचि मांडलीक ॥
मातेसि पाठ हरिलाहि न मूख दावी । मातेचि त्यास ममता किति वो वदावी॥६॥
एकानं माय वधिली निजशस्त्रहातें । वा दूसऱ्यान वधिलीचि अशस्त्र-घातें ॥
मातापित्यासि तिसरा प्रतिबंध दावी । त्रैमूर्तिचीहि महिमा किति हो वदावी ॥७॥
अंबे तुझेचि स्वपुतें शिर कांपलेलें । किंचीत मात्र न दिसेंचि संतापलेलें ॥
जें कां अनंदमय वैभव भाव दावी । पुत्रावरी प्रिति तुझी किति हो वदावी ॥८॥

साक्या—

अफु देउनियां निजवी अवघी लेंकरें लेंकुरवाळे ।
मजकरितां ये हळूं नको वाजवुं कंकणें नूपुरवाळे ॥
अडवील बहुजागीं। होईल पृथ्वी जागीं ॥ १ ॥
तुज श्रमवाया व्यर्थ जन्मलों । गर्भिच गळलों कां न ।
वाटल वंगळ आई तुज म्हणतां मज वंगळ लोकानं ॥
वाइट दोघांस । घाल मुखीं दो घांस ॥ २ ॥
जें जें पाहिन मी स्थुळ सूक्ष्म रुप अणु–रेणुकां हीं ।
तें तें आहे म्हणेन माझी माउलि रेणुकांहीं ॥
लागो हें ध्यान । तुझ्याचि अनुसंधान ॥ ३ ॥
मी जगदंबे तुजला गाणें कळेल तसें गाईनं ॥
परि वत्साच्या दर हंब्री प्रति हंब्रावें गाईनं ॥
न दिसे मग न्यून्या । हें सुखकर अन्योन्या ॥ ४ ॥

असे श्लोक, दिंड्या, आर्या, साक्या, अष्टकें, आरत्या किती तरी बहारीच्या आहेत. त्यांतील एकेक कल्पना फार रम्य, शब्द लालित्य, रचना सौंदर्य पाहून कोणतेही स्थितींत मन सुप्रसन्न होतें. या कवींची उज्वल प्रतिभा पाहून

अत्यंत आनंद वाटतो. अनेक विषयांवर कविता आहेच. पण भक्तिप्रेम-भावाची कविता फार उच्च दर्जाची आहे. पण ती सर्व येथें देतां येत नाहीं. श्रीरामकृष्ण परमहंसांप्रमाणेंच त्यांचें प्रेम रेणुका जननीवर होतें. भक्तिप्रेमामध्यें दंग होऊन माहूर प्रांतीं ते नित्य लिंबाचा पाला भक्षण करून अनेक लोकांना आपल्या रसाळ वाणीनें भक्तिसुखामृत पाजीत असत. गुरु आणि आई यांपेक्षां श्रेष्ठ दैवत नाहीं. माहूर क्षेत्रीं श्रीरेणुका आई व जगद्‌गुरु दत्तात्रय हीं दोन्हीं दैवतें आहेत म्हणून या क्षेत्रास "जवा आगळे" काशी म्हणतात. म्हणूनच या तीर्थापेक्षां त्यांना अन्य तीर्थास जावेसें वाटलें नाहीं.

अयोध्या पुरीं द्वारका पुण्य क्षेत्रीं । प्रयागीं त्रिवेणीं महातीर्थयात्रीं ।
भ्रमावें परंतू परंतू परंतू । आई रेणुके रेणुके रेणुके तूं ॥

एक हरदास आपलीं कीर्तनें चांगलीं होऊन नांवलौकिक वाढावा व द्रव्य प्राप्तिही व्हावी अशा हेतूनें गाणगापूरला अनुष्ठान करीत होता. तेथें त्यास दृष्टांत झाला कीं, "तूं माहुराला विष्णुकवींकडे जा म्हणजे तुझा हेतु पूर्ण होईल." त्याप्रमाणें हरिदासबोवा माहुरला विष्णुकवींकडे आले व त्यांस त्यांचे सहवासाचा फारच आनंद झाला. हरदासांचें इच्छित कार्य झाल्यावर ते काशीयात्रेस जाण्यास निघाले व विष्णुकवींना काशीस येण्याबद्दल त्यांनीं फार आग्रह केला. विष्णुकवि श्री रेणुका आईचे चरण सोडून दुसऱ्या तीर्थक्षेत्रांस जाण्यास तयार नसत. तथापि हरदासांच्या फार आग्रहामुळें त्यांजबरोबर कुबेरपर्यंत गेले. तेथें सकाळीं उठतांच "आईस सोडून दुसऱ्या तीर्थक्षेत्रांस जाण्याचें मला कारण नाहीं, माझ्या मायेचे चरणाजवळ सर्व तीर्थें आहेत" असें सांगून ते परत माहुरास आले. नंतर त्यांना समाधान वाटलें.

नाहीं दया आलि बया तुजसारखीला ।
येईल काय सखये दुसऱ्या सखीला ॥
द्वारीं तुझ्याचि मरणें निर्धार केला ।
जाणार नाहिं तुज सोडुनि द्वारकेला ॥

असा त्यांचा कृतनिश्चय होता.

शके १८१९ सांत त्यांनीं मौनव्रत चालू ठेविलें असतां महागांवीं उमरखेडचे वे. शा. सं. नानाशास्त्री अयाचित यांजकडून रेणुकामाहात्म्य व कालिकाखंड श्रवण केलें व त्यांना 'विपुल दयाघन गर्जे' ही आरती व इंदिरेची तसबीर प्रसाद दिली. ते अखेरपर्यंत लिंब सेवन करीत असत व त्याच्या गोळ्या संग्रहीं ठेवीत असत. एकदां देवीचे पुजारी दत्तोपंत यांना देवीचे गाभाऱ्यांत सर्पदंश झाला म्हणून त्यांना मठांत आणलें. महाराजांनीं संग्रहांतील लिंबाची गोळी पाण्यांत कोळून त्यांना पाजतांच सर्पाचें विष उतरलें. दत्तोपंत

देवींची पूजा अद्याप करीत असतात. कांहीं मंडळींनी महाराजांस काशीयात्रेस नेण्याचा बेत केला. दहाबारा कोसावर जाऊन तेथून परत यावें असे प्रसंग बरेच वेळां घडले. कै. ह. भ. प. नारायणबोवा दुसखेडकर (खानदेश) हे गृहस्थाश्रमी सत्पुरुष यांचे जिवलग होते. त्यांचे आजोबा बाळानंद महाराज हे सिद्ध पुरुष होऊन गेले. त्यांनीं माहूरला " चरणावती " तीर्थावर तपश्चर्या केली. तेव्हां साक्षात् दत्तांनीं दोन प्रहरीं फकीर वेषानें त्यांना पंचधातूची दत्त-मूर्ति प्रसाद म्हणून दिली. विष्णुकवींनीं त्यांचें ओवीबद्ध चरित्र लिहिलें आहे. तसेंच श्रीदत्तशिखरावरील सत्पुरुष संतोष भारती महंत महाराज यांचें पारमार्थिक चरित्र ओवी वृत्तांत लिहिलें आहे. नारायणमहाराजांच्या आग्रहावरून एकदां त्यांचे गांवीं आपल्या रेणुकामायेच्या तसबिरीसह गेले होते. तेव्हां "रेल गाडींत बसून चाल " हें पद त्यांनीं केलें.

पुढील प्रकरणांत त्यांच्या चतुर्थाश्रमाचें वर्णन येऊन त्यांतच आश्रमाची योजना वगैरे संक्षेपतः वर्णन येईल.

--:०:--

ॐ श्रीसद्‌गुरुसमर्थ.

## ११ आश्रमवास.

१. श्री विष्णुदास महाराजांचा कीर्तिपरिमल सर्वत्र पसरला होता. कुबेरचे जहागिरदार श्रीमंत बाबासाहेब यांनीं शके १८२३ माघमासीं कुबेरास मोठा यज्ञ केला. त्या यज्ञसमारंभास मोठया आदरानें विष्णुदासांस नेलें होतें. तेथें त्यांनीं चतुर्थाश्रम घेण्याची इच्छा दर्शवितांच बाबासाहेबांनीं सर्व सिद्धता केली. व उमरखेड येथील श्री चिन्मयानंद संस्थानचे अधिपति श्री. प. प. नित्यानंद सरस्वती स्वामीमहाराज यांनीं माघ शु. १० रोजीं श्रीविष्णुदास यांनां चतुर्थाश्रम दिला. पूर्वांग उत्तरांग प्रायश्चित्तें सशास्त्र पद्धतीनें झालीं व विष्णुकवींचें " श्री पुरुषोत्तमानंद सरस्वती " हें नामकरण झालें. सातारचा कृष्णा, माहूरचे विष्णुदासकवि आतां पुरुषोत्तम झाले. क्षराक्षरातीत तृतीय पुरुष पुरुषोत्तम गीतेच्या पंधराव्या अध्यायांत

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥

या श्लोकांत वर्णिल्या प्रमाणें ते झाले. स्वामीमहाराजांच्या मुळें आमचें कुळ पावन व धन्य झालें आहे.

२. संन्यास घेण्यापूर्वीपासूनच त्यांचे जवळ शिष्य राहूं लागले होते. संन्यासी म्हणजे एकांतांत राहून जगाशीं संबंध तुटलेला अशी बहुतेकांची समज आहे. पण हे स्वामी महाराज कट्टे कर्मयोगी बनले. लोकसंग्राहकतेसाठीं त्यांनां बराच खटाटोप करावा लागला. श्रीचीच इच्छा तशी आहे असें ते नेहमी म्हणत असत. एकदां अयाचितवृत्तीनें राहण्याचा त्यांनीं निर्धार केला, तों अतिशय धान्य वगैरे येऊं लागलें; मग मात्र त्यांचा विचार झाला कीं, माउलीच्या इच्छेनेंच उपाधि येत आहेत. तर त्यांस हरकत करण्याचें माझें काम नाहीं. कर्मकर्तृत्व माऊलीचें आहे, अशा सुंदर बोधावर महाराजांनीं शिष्यवर्गासह आश्रम चालविला.

श्री दत्तशिखराचे दक्षिणेस श्री अनसूयामाईचे पूर्वेस गडाखालीं काळेपाणी ( कज्जलतीर्थ ) या नांवाचें सुंदर तीर्थ आहे. त्या तीर्थावर झोंपडी बांधून स्वामीजींची स्वारी बरेच दिवस सशिष्य राहिली होती. एका जाग्याचा अभिमान उत्पन्न होऊं नये व शरीरांत जोंपर्यंत ताकद आहे, तोंपर्यंत ठिकठिकाणीं अरण्यवासाची मौज उपभोगावी या हेतूनें ते सशिष्य ठिकठिकाणीं हिंडत असत. व लोकांना भगवद्भक्तीचा व स्वधर्माचा उपदेश करीत असत.

साक्या——

धर्म बुडाला कली वाढला नीतीवर पडला छापा ।
पावलि गायत्री गति वंध्या संध्या म्हणती छापा ॥
हातिं दारुचीं पात्रें । लोपलीं अग्निहोत्रें ॥ १ ॥
संत समागम अतां कशाचा? अवघा कीरस्तान ।
झालि असार्थक गति या लोकीं परलोकीं रस्ता न ॥
मरि पडली स्वहिता । पशुवत विकिती दुहिता ॥ २ ॥
सांप्रत काळीं अशीच फिरली मर्जि काय देवाची ।
सोडुनि वेदाध्ययन ब्राह्मण अर्जि कायदे वाची ॥
सोंवळें आटोपी । पायीं बूट शिरीं टोपी ॥ ३ ॥
कोतवाली ऋणकरी शिपाई जमादार आमीन ।
मीन असते तरि जागृत राहते झोंपीं जाती अमीन ॥
चोरांच्या गास्ति । फिरती रस्तोरस्तीं ॥ ४ ॥
हुजूर तहशिलदार तपशिली कोतवालि अमिनाही ।
अरोपि यानें कबूल व्हावें बोलावें अम्ही नाहीं ॥
चोरांचे शाहू । कर म्हणती पैशा हूं ॥ ५ ॥
हा जिव जावो अथवा राहो परी न हरपो पैसा ।
पैशासाठीं बाळ कांपिती शिव हरहर हा पैसा ॥
देवही पैशाला । पावति बघुनि दुशाला ॥ ६ ॥ ( विष्णुकवि )

अशा प्रकारें जनतेंत हीनाचार झालेला पाहून त्यांनां फार वाईट वाटे व स्वधर्मरत होण्याबद्दल ते फार कळकळीनें सांगत असत. आपले पूर्वज महर्षि यांचे वृत्तीकडे पाहा व आर्यभूमि सनातन वैदिक धर्मानें पुनः तेजस्वी करण्याचें यश घ्या, असें ते सर्वांस सांगत असत. सर्व जातींवर त्यांचें प्रेम सारखेंच असे. अस्पृश्यांतील लोकही त्यांनीं भक्तिमार्गास लाविले आहेत. मुसलमानांचाही त्यांनीं केव्हांहि अनादर केला नाहीं. मुसलमानांच्या सूफी पंथांतील भक्तिप्रेमा-बद्दल त्यांनां फार आदर वाटत असे. यामुळें सर्व समाजांत ह्यांचेविषयीं आदर उत्पन्न झाला होता. बराच काळ फिरण्यांत घालविल्यावर शके १८२८ च्या आरंभीं श्री उनकेश्वरीं ते जाऊन राहिले. तेथें प्राचीनकालीं शरभंगऋषीचा आश्रम होता. शरभंगांचा ताप दूर होण्यासाठीं श्रीरामचंद्रांनीं तेथें उष्णपाणी काढून दिलें, त्याचीं कुंडें हल्लींही आहेत. अशा या पवित्र ठिकाणीं कांहीं काल काढला. येथें श्री. व्यंकटराव देशपांडे सिंदखेडकर यांनीं त्यांची व्यवस्था उत्तम ठेविली होती. तेथें त्यांचेजवळ खंडेराव, दत्तोपंत हरीदास, सुंदरगीर, रानडे व आणखी तीन मंडळी कायमची होती. नित्य पुष्कळ मंडळी यांजकडे दर्शनास येत असत. याच ठिकाणीं त्यांचें दर्शन मला झालें. त्याची हकीगत संक्षेपतः देत आहे.

२. शके १८२८ चे ज्येष्ठ मासीं सातारा जिल्ह्यांत मी आपल्या खरशी गांवीं असतां दृष्टांत झाला कीं, 'मी माहुरास तुमची वाट पाहात आहे, तरी तुम्हीं, तुमची मातुश्री, वडील बहिण सौ. चिंगुताई व चि. सौ. बगुताई (लहान बहीण) इचा चार वर्षांचा मुलगा दत्तात्रय असें चौघांनीं यावें. वाटेंत आमची मंडळी तुम्हांस भेटतील." हा प्रकार पाहून आम्हीं आश्चर्यचकित झालों. माझ्या मातुश्रींची व त्यांची ओळख नव्हती म्हटलें तरी चालेल. तसेंच त्यांचा आमचा पत्रव्यवहारहि बिलकूल नव्हता. नंतर आम्हीं निघण्याची तयारी केली. बरसात नजीक आलेली व वऱ्हाडांतील जमिनीचा चिखल, याची कल्पना न करतां भावनेच्या भरीं पडून मृगनक्षत्र लागण्याचे आधीं दोन दिवस आम्हीं चतुर्वर्ग निघालों. धामणगांव स्टेशनांत उतरेपर्यंत पर्जन्य बिलकूल नव्हता. तेथें जातांच अतीशय पर्जन्य पडला. यवतमाळास बैलगाडीनें पोंचलों. तेथून जवळ्यास चरेगांवकरांचे घरीं जाण्यास मोठ्या मुष्किलीनें गाडी मिळविली. पाऊस अतोनात पडल्यामुळें कसेंतरी जवळ्यास जाऊन पोहोंचलों. तेथें श्रीविष्णुकवि महाराज उनकेश्वरीं आहेत असें समजलें. तेथून आम्हीं पुढें निघालों. दृष्टांताप्रमाणें वाटेंत महाराजांचे शिष्य हरिदास व सुंदरगीर भेटले, व आम्हीं हा अवघड प्रवास संपवून महाराजांचे चरणीं ज्येष्ठ व. १२ रोजीं उनकेश्वरीं पोहोंचलों.

४. श्रीविष्णुकवि महाराजांचे दर्शन होऊन सर्वांस आनंद झाला. आम्हीं बरेच दिवस राहावें अशी त्यांची फार इच्छा होती. "तुमचेवर श्रीदत्तकृपा पूर्ण आहे व त्यांच्याच कृपेनें तुमची आमची दुर्लभ भेट झाली आहे; यापुढें आनंद करणार श्रीदत्तात्रय समर्थ आहे. आमचा लहान भाचा दत्तात्रय हा योगभ्रष्ट महात्मा आहे" असें त्यांनीं सांगितलें. आषाढ शु० २ रोजीं त्यांचे माझें गुरुशिष्याचें नातें झालें. वारंवार इकडे येत जा म्हणजे योग वगैरेची माहिती तुम्हांस देईन. एखादा शिष्य अधिकारी झाला तर आमचा सुद्धां उद्धार करील. गुरुसेवेसारखें दुसरें साधन नाहीं, तथापि सेवा झाली तरच कृपा असें मात्र समजूं नका.

अभंग—शिष्याची जो नेघे सेवा । मानी देवा सारिखें ।
त्याचा फळे उपदेश । आणिका दोष उफराटे ॥
त्याचें खरें ब्रह्मज्ञान । उदासीन देहभावीं ।
तुका म्हणे सत्य सांगें । येवोत रागें येतील ते ॥ १ ॥

अशी त्यांची हातोटी असे. शिष्यांवर त्यांचें मुलासारखें प्रेम असे. शिष्यांनीं सेवा केली तरी ठीकच, नाहीं केली तरी ते आनंदच मानीत व म्हणत कीं माझ्या जननी माउलीचे घरांत सर्वांचा सारखाच अधिकार आहे. कोणी ज्ञानी व्हा, कोणी सेवा करा, कोणी समाधि लावा, कोणी अनुष्ठानें करा अथवा कोणी स्तब्ध पडून रहा; पण मातेच्या दरबारांत सर्व लेंकरें सारखींच आहेत, असा त्यांचा बोध सर्व शिष्यांस मिळत असल्यामुळें त्यांचे जवळ राहण्यास पुष्कळ मंडळी येत. आम्ही चतुर्वर्ग आनंद पावून उनकेश्वराहून यवतमाळास अतिशय कष्ट भोगीत आलों. वाटेंत पावसामुळें अतीशय हाल झाले. या प्रवासाचें स्मरण आम्हांस कायमचें राहिलें आहे. यवतमाळास श्री. वामनराव सवाई ओव्हरसिअर आमचे आप्त होते त्यांचे येथें आल्यावर त्यांनीं आमच्या या प्रवासाबद्दल फार आश्चर्य व्यक्त केलें.

अष्टौ मासांस्तु प्रवसेत् सदा कार्यवशाद्द्विजः ।
वर्षाकाले न गन्तव्यं प्रवासे सुखमिच्छता ॥
( देवीभागवत स्कं. ६।२६ )

याप्रमाणें बरसातींत रेल्वेपासून दूर प्रवास करणें फार धोक्याचें आहे असा इशारा वाचकांस स्वानुभवावरून देत आहे.

५. मातापूर क्षेत्राच्या पंचक्रोशींत उत्तरद्वार म्हणून पैनगंगेच्या तीरावर

---

१ दत्तात्रय वयाच्या नवव्या वर्षापासून योगमार्गात प्रवीण झाला. तो समाधि उत्कृष्ट लावित असे. हा बारावे वर्षी पुण्यास प्लेगनें वारला! त्याचें चरित्र मुमुक्षूचे पौष व. ६ शके १८३६ या अंकीं मीं प्रसिद्ध केलें आहे.

वऱ्हाडांत श्रीसिद्धेश्वर हें सिद्धस्थान अरण्यांत आहे. तेथें शके १८२८ च्या मार्गशीर्ष मासीं महाराज राहण्यास गेले. तेथें बऱ्याच परिश्रमानें झोंपड्या तयार झाल्या व एक वर्षभर या सिद्ध ठिकाणीं शिष्यगणासह आनंदानें कालक्रमणा केली. संन्यास घेतल्यावर त्यांनीं कविता फारशी केली नाहीं. पूर्वी त्यांनीं कविता पुष्कळ केली. परंतु ज्यांनीं वाचण्यास नेली त्यांनीं ती परत केली नाहीं! शरीर जरेनें व्याप्त होऊं लागलें व आतां अखेरची वेळ जननीचे चरणीं साधावी हा हेतु धरून माहूर येथें राहण्याचा मनोदय श्री बाबासाहेब उदाराम राजे यांना कळविला. त्यांनीं अति आनंदानें महाराजांच्यासाठीं झोंपड्या बांधविल्या व शके १८२९ चे पौषमासीं सिद्धेश्वर सोडून महाराज माहुरास गेले. झोंपड्या तयार झाल्या नव्हत्या म्हणून माहूर येथें वे. भाऊदेव यांचे घरीं कांहीं दिवस राहून झोंपड्या तयार होतांच आश्रमांत राहण्यास गेले.

६. मातृतीर्थाचे अलीकडे डाव्या बाजूस हा पुरुषोत्तमाश्रम आहे. ही जागा सरकारांतून महाराजांचे नांवें झाली आहे. येथें लहान लहान सुंदर झोंपड्या बांधविल्या; झाडी तोडवून त्या जाग्यावर फुलझाडें लाविलीं. आश्रमांत रामतीर्थ या नांवाची बारव ( विहीर ) आहे. पर्जन्य भरपूर झाला तर या तीर्थाचें पाणी बारा महिने पुरतें. महाराज राहण्यास आल्यावर आश्रम फार उत्तम रीतीनें तयार झाला. आश्रमांत जातांच त्रैतापानें तापलेला जीव क्षणभर तेथील देखावा पाहून शांत होतो. कण्वाश्रम, अत्र्याश्रम, भरद्वाजाश्रम, वसिष्ठाश्रम वगैरेचा देखावाच हा आश्रम आहे असें वाटतें.

७. येथें ध्यान, धारणा, भजनपूजनादि नित्यकर्में, अन्नसंतर्पण वगैरे फार उत्तम होऊं लागलें. गडाखालील मंडळींनीं दरसाल मठासाठीं धान्य देण्याचें ठरविलें. गांवांत रोज मधुकरी मागण्याचा क्रम सुरू झाला. श्रीदत्तशिखराचे महंत श्रीदत्तराम भारतीमहाराज यांचा आश्रय मठास आरंभीं चांगला होता. कांहीं दिवस रोज चार मनुष्यांचा शिधा देत असत; नंतर कांहीं दिवस दोन मनुष्यांचा देऊं लागले व मठास ठिकठिकाणाहून धान्य येत आहे असें समजतांच त्यांनीं आपला आश्रय बंद केला. हल्लींही अडचणीचे प्रसंगीं महंत महाराजांकडून मदत होत असते.

८. पुण्यास अनंतराव मामा छापखान्यांत नोकरीवर असतांना बारीक कामें पुष्कळ करावीं लागत. तीन तीन दिवस झोंप न घेतां रात्रीच्या रात्री चित्रकलेच्या कामांत खर्च होऊं लागल्या. यामुळें त्यांचे मस्तकांत वायु शिरून ते आजारी झाले. मग ते नोकरी सोडून श्रीक्षेत्र धोम येथें आपली बहीण सौ- भीमाबाई इचे घरीं गेले. तेथें बारा वर्षें राहून खडतर जपतपादि अनुष्ठानें व ध्यानयोग करूं लागले. धोमास कृष्णंभटजी म्हणून एक तपस्वी अधिकारी

संपन्न होते ते मामांचे गुरु होत. मामांना परमार्थाची प्राप्ति उत्तम व्हावी व त्यासाठीं प्रकृति सुधारावी या हेतूनें वांईचे श्री. नानासाहेब रिसबूड यांचे व श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांचे मातुल श्रीमंत मामासाहेब यांनीं अतीशय साह्य केलें व त्यांचेचमुळें माझी प्रकृति सुधारून परमार्थ करण्यास शरीर तयार झालें असें मामा म्हणत असत. शके १८२८ चे कार्तिकांत मामा पंढरपुरास गेले व तेथून ह भ. प. नारायणबोवा दुसखेडकरांबरोबर माहुरास पोंचले. श्रीविष्णुकवींना ते सिद्धेश्वराच्या मुक्कामांत येऊन भेटले. तेथपासून शेवटपर्यंत मामा माहूरच्या आश्रमांत होते. मामांचा ध्यानयोग फार अप्रतिम असे. त्यांची शरीरयष्टि अशक्त असल्यामुळें सहजच ते स्वस्थ बसून ध्यानयोगास लागले. त्यांची झोंपडी स्वतंत्र होती. त्यांची कविता ज्ञानपर व उपदेशपर आहे.

श्रीगुरुदासमहाराज ऊर्फ अनंतराव मामा यांचे कृतीचे उद्गार —

## १ पद

( चाल–असा धरि छंद–थोडी बदलून )

आलि दया माझि सुदैवा । दिला हातिं सुखाचा ठेवा ॥
सद्गुरुदेवा । दिला हातिं० ॥ धृ० ॥
भ्रमस्वरूपी मिथ्या माया । जळीं पाहिली जळरूप छाया ॥ सद्गुरुदेवा० १ ॥
वैराग्याचें सुटलें वारें । अहंभावाचे सुकले फवारे ॥ स० २ ॥
मोडून गेले पाप कर्वत । जळून गेले पुण्यपर्वत ॥ स० ३ ॥
आपपर उरला नाहीं भाव । स्त्री पुरुषांचें नाहीं नांव ॥ स० ४ ॥
अनादिसिद्ध माया माउली । सारी मत्स्वरुपांत मावली ॥ स० ५ ॥
मजसह अनंत पृथ्वी सारी । समुळ बुडाली अवचित सारी ॥ स० ६ ॥
अनुभवोनियां सुख संपदास । निर्वाणीं बोले गुरुदास ॥ स० ७ ॥

हें पद त्यांच्या ध्यानयोगांतील अनुभवाचें आहे.

## २ ओंव्या

दशेंद्रियासहित मन । केलें तुजसी समर्पण ।
नुरलें बोलाया दुजेपण । निराळेंपण श्रीगुरु ॥ १ ॥
आपण माझा अंगिकार केला । तेणें माझा मीपणा नेला ॥
मीतूंपण हा भावचि मेला । नाहीं उरला श्रीगुरु ॥ २ ॥
सरितासागर भेटी होतां । द्वैत दृष्टी न दिसे पाहतां ।
इंधनाग्नी समरसता । नुरे द्वैतता श्रीगुरु ॥ ३ ॥
आतां तरी मीं हा कुठला । मीं–तूं–चा खटला तुटला ।
कठिण मायामृत घट फुटला । भवनिधी आटला श्रीगुरु ॥ ४ ॥
समभागानें भाग उडाला । निःशेष बाकी ब्रह्मचि उरला ।

तंव कृपे गुरुदासोद्धरला । भवनिधी तरला श्रीगुरु ॥ ५ ॥

## ३ पद

( चाल–जाऊं कामाला )

हा संदेह खोटा । शांतीवरि मारिल गोटा ॥ ध्रु० ॥
मिथ्या मिथ्यत्वेंही माया खरी म्हणशील जरी ॥ मूर्खा खरी० ॥
मिथ्या मिथ्यत्वें नामरूपा तूं स्मरशील जरी ॥ मूर्खा० ॥
अभेद वस्तुचा तूं मिथ्या करशील भेद जरी ॥ मूर्खा० ॥
तरि होईल तोटा । शांतीवरि मारिल गोटा ॥ १ ॥
अहंकाराचें मिथ्या ओझें माथीं घेसी जरी ॥ मूर्खा० ॥
निज प्राप्तीची तूंच स्वताहा खटपट करिसी जरी ॥ मूर्खा० ॥
तुज शोधाया तूं चौऱ्यांशींत गरगर फिरसी जरी ॥ मूर्खा० ॥
तरी होईल तोटा ॥ शांतीवरि० ॥ २ ॥
ध्येय स्वरूपा विसरुनियां तूं ध्याता होसी जरी । मूर्खा० ॥
सिद्धचि असे त्या साधायातें बळें जासील जरी ॥ मूर्खा० ॥
श्रीगुरुदासा अभिन्नातें पहासील भिन्न जरी ॥ मूर्खा० ॥
तरी होईल तोटा ॥ शांतीवरि ० ॥ ३ ॥

यापेक्षां जास्त पदें देतां येत नाहींत ! त्यांची कविता प्रसिद्ध होणें आहे. गुरुदासमामांचे ध्यानांत तयार झालेलें वाङ्मय फार उच्च दर्जाचें आहे. तें प्रसिद्ध करण्याचा आमचा मनोदय आहे. याप्रमाणें या आश्रमांत विष्णुकवि ऊर्फ पुरुषोत्तमानंद सरस्वती स्वामी व श्रीगुरुदास मामा हे दोघे बंधु सत्पुरुष चमकूं लागले.

दिवसेंदिवस मठाचा उत्कर्षच होत गेला. अनेक लोकांना अन्नदान व ज्ञान-दान होत असल्यामुळें पुष्कळ लोकांचें लक्ष मठाकडे वेधलें.

महाराज रात्र व दिवस मिळून दोन अगर तीन तास झोंप घेत असत. त्यांचा नित्यक्रम खालीं लिहिल्याप्रमाणें होता.

पहांटे ४ ते ६ पर्यंत श्री जगदंबेची काकड आरती व ध्यान. नंतर शौच-मुखमार्जनादि करून तीनशेपर्यंत नमस्कार घालावेत. नंतर कांहीं ग्रंथवाचन स्नानसंध्या, नंतर तास अर्धा तास बाहेर बसून सर्वांना उपदेशपर विवरण व्हाव-याचें. अमुकच विषयावर विवेचन ठरलेलें नसायचें; परंतु नित्य श्रवणार्थी मंड-ळींना ही वेळ फार आनंदाची जात असे. सहज बोलणें हितउपदेश, याप्रमाणें आपल्या सहज संभाषणानें परमार्थाची समजूत उघडपणें देत असत. नंतर श्री-ची पूजा, अल्पाहार, थोडी निद्रा व तिसरे प्रहरीं अध्यात्म ग्रंथांचें वाचन, सायं-काळीं स्नानसंध्या, धूपारती, नंतर पुनः सकाळ प्रमाणें बाहेर बसून फार रसाळ

वाणीनें उपदेशामृत पाजीत असत. नंतर ध्यानयोग करून श्रीची आरती भजन झाल्यावर ज्ञानेश्वरी, भागवत व तुकारामाच्या अभंगाचें वाचन होत असे. या वेळीं रात्रीचे ११ वाजत असत. आतां आम्हांस वाईट वाटतें कीं, त्यांचें मुखांतील हे अमृतबिंदु लिहून ठेविले असते तर फार बरें झालें असतें. ( मीं थोडा प्रयत्न केला होता. पण माझें तेथें राहणें थोडें असे. मी दरसाल जात असे. ते अत्यंत प्रेमानें महिना पंधरा दिवस, कधीं दोन महिने, मला राहून घेत असत. ) त्यांच्या वाक्सुधा प्रसिद्ध करण्याचा योग आल्यास मला पुष्कळच सुधा देतां येतील. दिवसेंदिवस शिष्यवर्ग वाढत चालला. मोर्शीचे श्री. केशवराव अमीन वकीलासारख्या सुशिक्षितापासून अस्पृश्य वर्गापर्यंत त्यांचे शिष्य झाले आहेत. प्रेम या विषयावर महाराज भाषण करूं लागले म्हणजे श्रोत्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालत असत. सर्वांस आईच्या उपासनेचे महत्व कथन करीत असत. महाराज समदर्शी असल्यामुळें त्यांचें प्राणीमात्रांवर सारखें प्रेम असे. मठांत मोठमोठे साधुसंत येऊन वास्तव्य करूं लागले. त्याचप्रमाणें वऱ्हाड-मोंगलाईंतील सरकारी अधिकारीही महाराजांच्या दर्शनास येऊन आनंद पावून जात असत. कोणी कसाही नास्तिक असो, महाराजांचें दर्शन होतांच तो त्यांचे चरणीं लीन होत असे. त्यांचेवर श्रद्धा ठेवणाऱ्यांची उन्नति खात्रीनें होत असे. हेच त्यांचे चरित्रांतील चमत्कार आहेत. त्यांचे सहज झालेलेही चमत्कार आहेत. पण जीवास कृतार्थता देण्याच्या त्यांच्या चमत्कारापुढें त्या चमत्कारांचें महत्त्व नाहीं.

मठांत धर्मशाळा वगैरेची फार जरूरी आहे. नांदेड जिल्ह्यांत कामोल हा जहागिरीचा गांव आहे. तेथील जहागिरदार श्री. दादासाहेब व अण्णासाहेब यांनीं महाराजांचे चरणीं संकल्प केला कीं, त्यांचें संकट दूर होऊन आनंद व्हावा म्हणजे मठांत मंदिर बांधण्याची योजना करूं. पुढें त्यांचें कार्य मनासारखें सिद्ध झालें. ही मंडळी आपलें वचन केव्हांही पुरें करण्यासारखी आहेत.

श्री. बाबासाहेब उदाराम राजे यांना तर स्वामीमहाराज व त्यांचे बंधु श्री. गुरुदासमहाराज यांनीं संकटप्रसंगीं फार साह्य दिलें होतें. ईश्वरकृपा व संतांच्या आशिर्वादानें संकटें निवारण होऊन त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांचीं कार्यें झालीं आहेत व होत आहेत. श्री. बाबासाहेब, त्यांचे बंधु नानासाहेब व पुत्र श्रीमंत भाऊसाहेब यांची हा आश्रम आपलाच आहे अशी भावना कायम आहे. हल्लींही मठास सर्वतोपरी त्यांचाच आश्रय आहे. सद्गुरुनाथ या घराण्यावर पूर्ण कृपा करो. आम्हांसही ही मंडळीं आप्त व यांचे घर माहेर असें वाटतें.

सुप्रसिद्ध दत्तावतारी श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामींचा मुक्काम या आश्रमांत तीन दिवस होता. रात्रीं दोघेही स्वामी फार वेळ एकांतांत बसत असत. आश्रमांत साधुसंतांनीं यावें व आम्हांस दर्शन देऊन कृतार्थ करावें यासाठींच वृद्धापकाळीं माउलीचे साउलीस राहिलों आहों असें ते वारंवार म्हणत असत.

पूर्वाश्रमींचे बंधु विष्णुपंत या आश्रमांत दोन तीन वेळ आले होते. धाकटे बंधु गणपतराव हे तर इकडे निम्मा काल घालवितात. त्यांचा योगाभ्यास चांगला आहे. सदोबा काळे यांचे चिरंजीव नारायणराव काळे व त्यांचे पुत्र रामभाऊ हे महाराजांचे व दुसरे पुत्र गोविंदराव हे गुरुदास महाराजांचे शिष्य आहेत. धोमच्या बहिणीचे चिरंजीव आप्पा हेही महाराजांचे शिष्य आहेत. थोरली वहीण यशोदा इची मुलगी गं. भा. चंद्राबाई अंबिके याही माहुरास जाऊन महाराजांचा उपदेश घेत्या झाल्या. माझ्या मातुश्रीस त्यांचाच अनुग्रह होता. याप्रमाणें महाराजांनीं आपल्या कुळांतील बहुतेकांवर अनुग्रह केला आहे. महाराजांचे प्रकृतीस दिवसेंदिवस क्षीणता येत चालली, तशी त्यांची इच्छा अशी असे कीं, साताऱ्याकडील पूर्वाश्रमासंबंधीं मंडळींपैकीं कोणी तरी येथें राहून आश्रम चालवावा. महाराज सर्वसंगपरित्यागी होते. तसा दुसऱ्याचा अधिकार नसल्यामुळें कोणासच ही गोष्ट शक्य होईना. गुरुदासमामा कसल्याच उपाधींत पडत नसल्यामुळें मठाचा बोजा ते अंगावर घेत नसत. ती० गणपतरावमामाही निरुपाधिक राहण्यांत आनंद मानीत असल्यामुळें मठ चालविणें त्यांचेकडूनही जमेना. मला ते मठांत राहण्याबद्दल आग्रह करीत. पण माझ्यामागें विविध कार्यें असत हें त्यांना माहीत असल्यामुळें ते माझ्या कार्याबद्दल अत्यंत आदरभाव दर्शवीत असत, व "सर्व ठिकाणीं तू लक्ष ठेवावेंस" इतकेंच म्हणत असत.

त्यांचे पट्टशिष्य खंडेराव, हरिदास, दत्तोपंत, सुंदरगीर इत्यादि होत. पैकीं दत्तोपंत मठाचें कार्यासाठीं बाहेर पडले ते परत आले नाहींत! खंडेराव व सुंदरगीर एकनिष्ठपणें गुरुसेवारत असत. हरिदास कांहीं दिवस महागांवीं रहात असत. गुरुभक्त अंबादासपंत हे सहज गुरुसेवा घडावी म्हणून माहुरास उदारामराजे यांचेकडे नोकरीस राहिले होते. हे कुटुंबासहित तेथें होते. त्यांनीं मठ चालवावा असें ठरल्यासारखें होतें. हे सुशिक्षित व भाविक आहेत. परंतु दुर्दैवानें त्यांची पत्नी निवर्तल्यामुळें ते उदासीन होऊन दिग्रजला राहूं लागले.

खंडेराव हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. परभणी जिल्ह्यांतील रहिवासी होत. त्यांचे बंधु, आप्त वगैरे मंडळी त्यांचे गांवीं आहेत. यांना फारशी भाषा चांगली अवगत आहे. हे ईश्वरप्राप्तीचा हेतु मनांत धरून घराबाहेर पडले. तीर्थयात्रा करितां करितां विष्णुकवींची कीर्ति ऐकून त्यांचें दर्शनास आले व त्यांचे सेवेस

राहिले व सेवाबलावर ते स्वतःच गुरुरूप बनले. ' तुका म्हणे आळी । जेंवि नुरेचि वेगळी ' ' सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ' असा योग्यांना सुद्धां असाध्य खडतर सेवाधर्म आचरण्याचा बऱ्याच शिष्यांनीं प्रयत्न केला. पण शेवटीं खंडेराव व सुंदरगीर हे दोघेच शिष्य महाराजांचे कसोटीस उतरले, व त्याचा मोबदला महाराजांनीं त्यांना भरपूर दिला (तो कसा याचें वर्णन पुढें आलेंच आहे.)

गुरुर्देवो गुरुर्धर्मो गुरुनिष्ठा परं तपः ।
गुरोः परतरं नास्ति नास्ति तत्वं गुरोः परम् ॥
न गुरोरधिकं तत्वं न गुरोरधिकं तपः ।
तत्वज्ञानात्परं नाऽस्ति तस्मै श्रीगुरवेनमः ॥ १ ॥
(गुरुगीता).

याप्रमाणें खंडेरावांनीं भावना ठेविल्यामुळें त्यांना गुरुरूप होतां आलें.

सुंदरगीर हे गोसावी आहेत. त्यांची जन्मभाषा हिंदी आहे. यांना चांगलेंसें मराठी बोलतां येत नाहीं. शके १८२६ सालीं महाराजांजवळ येऊन त्यांनीं उपदेश घेतला, व गुरुसेवेंत तनमन खर्च करूं लागले. रात्रंदिवस गुरुकार्या-खेरीज जपतपानुष्ठान बिलकूल माहीत नसे. एके दिवशीं गुरुकृपा होऊन फुलें तोडीत असतांना प्रत्यक्ष श्रीदत्तदर्शन झालें. नंतर ते मराठींत अभंग, पदें करूं लागले. त्यांतील अभंग खालीं दिले आहेत. त्यांची कविता गुरुस्तुतिपर आहे; पण ज्यानें वेदांत, पुराणें, इतिहासाचें बिल्कूल परिशीलन केलें नाहीं तो केवळ गुरुसेवेनें कसा योग्यतेला चढतो हें या चरित्रावरून समजेल. दत्तदर्शन झालें, आतां गुरुसेवेंत काय आहे ? वगैरे नास्तिक भाव त्यांच्यांत शिरला नाहीं. आमरण गुरुसेवेचा संकल्प केला आहे व श्रीगुरुकृपेंकरून त्यांचा हा संकल्प शेवटास जाईल ही खात्री आहे. यांच्या चरित्रावरून वेदांताचा रुक्ष काथ्याकूट करणारे थोर का गुरुसेवक थोर याची कल्पना सहज होईल. गुरुसेवेचें सामर्थ्य हल्लींच्या नास्तिक काळांतही गोचर होत आहे. या चमत्कारापेक्षां दुसरे गारुडी चमत्कार मला विशेष वाटत नाहींत.

अभंग—दत्तमूर्ति आली ध्यानीं । ज्ञान सांगे निरवाणी ॥
तीही लोकीं माझी सत्ता । कोणी नाहीं मजपरता ॥
माझें राहण्याचें ठिकाण । तुला सांगतों मी खूण ॥
रेणुकेचे[1] हृदयीं वास । तेथें करितों निवास ॥
गुरुसेवक म्हणे मनीं । मनीं झालों मी उन्मनी ॥ १ ॥
सर्व सोडुनिही आशा । मग पहावा तमाशा ॥

1 महाराजांची उपासनेची जगदंबेची तसबीर.

वरी काय तें पाहावें । शरीरीं शोधुनि पहावें ॥
डोळे भरूनी पाहिलें । पुढें उभे ते राहिले ॥
उभे राहिले पळभर । डोळां पडली झापड ॥
गुरुसेवक म्हणे कळकळ । मनीं लागली हळहळ ॥ २ ॥
गुरुरायाचे कृपेनें । झालें दत्ताचें दर्शन ॥
मला नाहीं बुद्धिबळ । मला नाहीं भक्तिबळ ॥
नाहीं मला ज्ञानबळ । नाहीं मला योगबळ ॥
नाहीं मला शांतीबळ । नाहीं मला सेवाबळ ॥
सेवकाचा प्रतिपाळ । माथे करीं तूं सांभाळ ॥ ३ ॥

श्रीएकनाथ महाराजांनीं ब्राह्मणाचा मूक जड मुलगा गावबा यास आपले अर्धवट राहात असलेलें रामायण पुरें करण्यास सामर्थ्य दिलें. तद्वतच सुंदरगिरावर गुरुकृपा झाली. ' मूकं करोति वाचालं ' याचा अनुभव येतो.

महाराजांचे पुष्कळ शिष्य आहेत. त्यांचीं नांवें समजणें शक्य नाहीं. कांहीं मंडळी उपदेश घेऊन त्यांच्या आज्ञेनुसार भक्तिपंथ वाढवीत आहेत. कांहीं गृहस्थधर्मानें आहेत. तथापि सर्वांवर त्यांची कृपा समान असे.

---

ॐ श्रीसद्गुरुसमर्थ.

## १२. अखेर.

मी दरसाल गुरुमहाराजांचे दर्शनास माहूरला जात असे. शके १८३८ चे मार्गशीर्षांत माझी कै. पत्नीदेवी[1] फार आजारी व माझे गांवीं प्लेग असल्यामुळें माझें जाणें झालें नाहीं. पौषमासीं मला त्यांचा दृष्टांत झाला कीं, " आम्ही एक वर्षाचे आंत समाधि घेणार आहोंत. तरी येऊन जावें. " तथापि मला जातां

---

१ कै. मत्पत्नीदेवी अधिकारसंपन्न होती. एकवार तिचें माहूरला जाणें झालें होतें. श्री विष्णुकवि महाराज व गुरुदास मामा महाराज तिचे ठिकाणचा बोध पाहून आनंद व्यक्त करीत असत. माझें प्रत्येक पत्रांत महाराज तिला स्वतंत्र एक पत्र लिहीत असत. ती शके १८४० त पौषमासीं प्रसूतिज्वरानें वारली. तिचें चरित्र गृहिणीरत्नमाला मासिकांत सन १९२० चे सप्तंबर अक्टोबरचे अंकांत **साध्वी लक्ष्मीबाई जोशी** म्हणून प्रसिद्ध झालें आहे. शके १८४३ चे चैत्राचे मुमुक्षूतही एका साध्वीचें "चरित्र" म्हणून प्रसिद्ध झालें आहे. नंतर गृहिणीरत्नमाला मासिकांत तिचे अप्रसिद्ध लेख व पुराणें ५।६ प्रसिद्ध झालीं आहेत. स्त्रियांस संसार सांभाळून गृहिणी, सुमाता कसें बनतां येतें, व प्रपंचच परमार्थ होऊन संसारांत कसा आनंद प्रगट होतो हें लक्ष्मीदेवीच्या चरित्रावरून व तिचे लेखांवरून सहज ध्यानांत येईल फार थोर योग्यतेची ही स्त्री होऊन गेली.

येईना. त्यांच्या माझ्या प्रेमांतील कांहीं गोष्टी समक्ष भेटीवांचून उकलणाऱ्या नव्हत्या व मला तर जातां येईना. गांवांकडील प्लेग लौकर आटोपेना व पत्नीची प्रकृति बरी होईना. पत्नीदेवीस थोडें बरें वाटल्यावर श्रावणमासीं मी हैद्राबादला गेलों, व काय वाटेल तें होवो जातांना गुरुमहाराजांचें दर्शन झाल्याशिवाय घरीं जायचें नाहीं असा निश्चय करून हैद्राबादहून मी व श्रीरामचंद्र महाराज निघालों. बासर, कामोल, कुबेर, वाढवणें या मार्गानें भाद्रपद व. ३० रोजीं माहुरास जाऊन पोंचलों. या प्रवासांत पर्जन्यामुळें आमचें अतीशय हाल झाले होते. तेथें गेलों तों श्रींगुरुमहाराजांनीं मौन धारण केलें होतें, "आतां तूं आला आहेस तर महाराज बोलूं लागतील असें कर" असें मला गुरुदास मामा म्हणाले. रात्रीं मी महाराजांची प्रार्थना केली कीं, वारंवार दर्शन होणें मजसारख्या फार लांब राहाणाऱ्यास शक्य नाहीं. तरी आपले मुखांतून कृपापूर्ण शब्द ऐकण्याची वासना पुरी करावी. सकाळीं महाराज बोलूं लागलेले पाहातांच सर्वांस आनंद झाला. अत्यंत कृपापूर्ण कळवळ्यानें महाराज म्हणाले " बाळाभाऊ ( मी ) तुम्ही इतके श्रम करून आलां आहां व आम्हीं मौनस्थ असावें हें मला बरें वाटेना. तुम्ही आतां अंतःकरण खुलें करून सर्व प्रश्नांचा निकाल करा. "

श्रीगुरुदासमामा व माझा बेत ठरून महाराजांस एकांतांत आपले पश्चात मठाचें काय करावयाचें हें विचारलें. हें विचारतांच त्यांना अत्यंत समाधान झालें व एवढ्याचसाठीं तुझी मी सारखी वाट पाहात होतों, असें म्हणाले. आतां तुला वाटेल तशी व्यवस्था कर असा त्यांनीं अभिप्राय कळविला. नंतर गुरुदास मामांचे विचारानें मठाची योजना करून महाराजांचे पश्चात् कशी व्यवस्था व्हावी याजबद्दल व्यवस्थापत्र तयार करून महाराजापुढें ठेविलें. त्यांनीं आनंदानें त्यावर सही केली.

या खेपेंत त्यांचें प्रेम मजवर अतोनात दिसलें. रात्रंदिवस जवळ घेऊन आनंद व्यक्त करीत असत, व त्यांचे सहजोद्गार निघत कीं,

देखा बालकाचिया धणी धाइजे । कां शिष्याचेनि जालेंपणें होइजे ॥
हे सद्गुरुची एकलेनि जाणिजे । कां प्रसवतिया ॥ ज्ञा. अ. ८ ॥

रामचंद्रमहाराजासह शके १८३०. तील दसरा होतांच माहूरहून निघालों. निघतांना मीं आपल्या कृपाळु गुरुमाउलीस घट्ट मिठी मारिली व म्हटलें कीं, पुनर्दर्शन दुर्लभ होणार व मला तर आपण फार दूर ठेविलें आहे ! महाराजांनीं माझे डोळे पुसून, भेट होणार नाहीं असें चिंतन करूं नये. आईचे कृपेनें वारंवार भेटी होतील असें चिंतन ठेवावें असें मला म्हटलें. नंतर माझ्या गुरु माउलीनें मला कुर्वाळून आलिंगून जाण्यास आज्ञा दिली. मी त्यांना प्रदक्षिणा

घालून वारंवार चरणीं मस्तक ठेवून चित्तांत श्रीचरण व डोळ्यांत मूर्ति सांठवून घरीं आलों तों पुनः प्लेग सुरूं झाला होता. म्हणून मी मुंबईस राहिलों.

मुंबईस ठाकुरद्वारीं ज्ञानेश्वरीवर माझीं प्रवचनें सुरूं होतीं. पौष शु० ७ रोजीं दिग्रसहून अंबादासपंतांची तार आली कीं "महाराज आजारी आहेत, आपण त्वरित यावें." तार पोंचतांच लगेंच निघालों.

पौष शुद्ध प्रतिपदेपासून महाराजांची प्रकृति क्षीण होऊं लागली. त्यांना आजार बिल्कूल नव्हता. नंतर खंडेराव या सच्छिष्यांस चतुर्थाश्रम देऊन मठाधिकारी केलें. पूर्वींच ठरविल्याप्रमाणें आश्रमाचे मध्यभागीं समाधीची जागा बांधून तयार केली. पौष शु० ७ शनिवारीं रात्रीं "आई" ची आरती झाली कां? असें विचारलें. आरती झाल्यावर आईचें तीर्थ व थोडें गाईचें दूध प्राशन केलें; नंतर आतां "आमच्याशीं कुणी बोलूं नका" असें सांगून महाराज सिद्धासन घालून बसले, व मुखानें सतत ॐ काराच्या जपास सुरवात केली. गुरुदासमामा, सर्व शिष्य मंडळी, श्री. बाबासाहेब उदाराम राजे व गांवांतील पुष्कळ मंडळी जवळ बसून होती. महाराजांचे शब्द बाहेर फुटेनात तरी हलके हलके ॐ चा ध्वनि निघत होताच. अखेर पौष शु० ८ शके १८३९ रविवारीं पहांटे चार वाजतां आम्हां सर्वांचा सगुण परमात्मा विदेह कैवल्यांत लीन झाला. सर्वत्र एकदम निबिड अंधःकार झाला. सर्व मंडळीच्या शोकसागरास पूर आला. आतां स्वामीजींचें पुनर्दर्शन संपलें म्हणून प्रत्येकानें हृदयें मोकळीं सोडून धाय मोकलली. तो शोकरस लिहिण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं. अर्ध्या तासानंतर महाराजांचे मस्तकातून शंखाचा ध्वनि निघाल्याचें सर्वांनीं ऐकलें.

## पद

( चाल—जाई परतोनी )

पुरुषोत्तमस्वामी ॥ श्रीगुरु ॥ धृ० ॥
पौषशुद्ध अष्टमि रविवारीं । गेले निजधामीं ॥ श्रीगुरु० ॥ १ ॥
त्याग तनूचा करुनी झाले । लिन आत्मारामीं ॥ श्रीगुरु० २ ॥
शके अठराशे एकुणचाळिस । शुभ पिंगल नामीं । श्रीगुरु० ३ ॥
सिद्धासनाऽरुढ अखंड होऊन । रत ॐ कार नामीं ॥ श्रीगुरु०४ ॥
गुरुदास म्हणे सिंहनाद ऐकुनि । कृतार्थ झालों मी ॥ श्रीगुरु०५ ॥

सूर्यावांचून जग, चंद्रावांचून चांदणें, प्राणावांचून शरीर तसा महाराजांवांचून मठ शून्य उदासीन झाला. नंतर सशास्त्र पद्धतीनें पूजा—अर्चा यथासांग झाली. गांवांतील आबालवृद्ध स्वामींच्या शेवटच्या दर्शनास आले होते. मुसलमानांचे गुरु आपल्या मंडळीसह येऊन त्यांनींही समाधीचे कामीं साह्य केलें.

त्यांचे सर्व संस्कार गुरुदासमामांनीं यथासांग केले. नंतर भजनाचे आनंदांत समाधीचें कार्य पुरें झालें. महाराजांचें कलेवरही डोळ्याआड होण्याबरोबर सर्वांना अतीशय दुःख झालें. सर्वांनीं अवभृत स्नान करून मठांत प्रसाद घेतला. आतां महाराजांचें पुनः दर्शन मिळणार नाहीं म्हणून खेद करीत मंडळी आपापले घरीं गेलीं.

मी तिसरे दिवशीं तेथें पोंचलों. वाटेंतच गुरुमहाराज ब्रह्मीं लीन झाल्याचें समजलें होतें. दर्शन झालें नाहीं याजबद्दल अत्यंत तळमळ वाटली. नंतर संन्याशाचें शास्त्रपद्धतीप्रमाणें और्ध्वदेहिकविधि गुरुदास मामांचे हस्तें यथासांग पार पडला. तीन दिवस उत्सव झाला. भजन, पूजन, पुराणें, कीर्तनें, झालीं. अन्नसंतर्पणही सर्व जातींस झालें. दोन दिवस समाधीपुढें त्यांचे एकनिष्ठ शिष्य नरहरी बोवा खरशीकर यांचीं गुरुभक्तीनें ओथंबलेलीं कीर्तनें झालीं. महाराज जड देहानें गेले असले तरी आतां ते सर्वांच्या मनबुद्धींत राहिले आहेत. त्यांची कृपा सर्वांवर आहे. त्यांचें नामस्मरण, ध्यान करणारास ते अगदीं जवळ आहेत, अशी समजूत सर्वांची गुरुदासमामांनीं केली. स्वामीमहाराज यांना पित्यासम मानणारे श्री. बाबासाहेब उदारामराजे यांनीं यावेळीं मठांत राहून सर्व तऱ्हेनें साह्य करून प्रसंग पार पाडला.

नंतर महाराजांचे समाधिमंदिर बांधण्याची योजना सुरू झाली. मदनापूरच्या भिवराबाई पाटलीणबाईनीं पांचशें रुपये देऊन वर्गणीस सुरवात केली. पुष्कळ मंडळींनीं भराभर मदतीदाखल द्रव्य पाठविलें. त्यांचा नामनिर्देश करणेंही अशक्य आहे. मदनापूर, वरूड, अरणी, कोळंबी, वगैरेकडून पुष्कळच मदत मिळाली. श्रीगुरुदासमहाराज बाहेर बिलकूल जात नसत. एकदां पुण्यतिर्थीचा उत्सव झाल्यावर श्री. मामांसह मी गडाखालीं गेलों. ठिकठिकाणीं लोकांनीं मामांचें अपूर्व स्वागत केलें. मी नित्य कीर्तनद्वारा धर्मजागृति करीत असे. हा दौरा यशस्वी झाल्यावर श्री मामा वरचेवर शिष्य मंडळीचें बोलावण्यावरून जाऊं लागले. शके १८४२ सालीं गुरुभक्तिपरायण श्रीरंगनाथ महाराज यांनीं पुढाकार घेऊन काशीयात्रेची तयारी केली व श्री. मामा, रंगनाथमहाराज, मी, गणपती पाटील वरूडकर व हिराबाई काशीयात्रा करून आलों. मामांचा शिष्यवर्ग वाढूं लागला, व मामांचे द्वारा समाधिमंदिरास फार साह्य झालें. शके १८४४ सांत लहानसें टुमदार समाधिमंदीर तयार झालें. दरसाल तेथें पुण्यतिथीचा उत्सव वाढत्या प्रमाणावर होत आहे. मठास स्थावर उत्पन्न नसतांही एवढा मोठा खर्च चालत आहे ही श्री जगदंबेचीच कृपा होय.

प्रापंचिकांचे मरण अशुभ असून अशौच धरावें लागतें, पण संतांचा

मृतोत्सव आनंददायक होतो, यांतील वर्म वाचक जाणतीलच. महाराजांची थोडीं मतें नमूद करून हें प्रकरण संपवितों.

महाराजांचा वराच वेळ ध्यानयोगांत जात असे. भक्तिपूर्वक कर्मयोग आचरून अकर्तात्मबोधाचें ज्ञान ते सर्वांस सुलभपणें देत असत. भूतमात्रीं ईश्वर आहे म्हणून सर्व जगताचें ऐहिक पारमार्थिक कल्याणाची चिंता करीत असत. भौतिक शास्त्रांत पुढारलेल्या राष्ट्रांकडे पाहून त्यांना बरें वाटे, परंतु या राष्ट्रांना खरा आनंद या शास्त्रानें प्राप्त होणार नाहीं, त्यांना केव्हां तरी आर्यतत्वज्ञानास शरण यावें लागेल, त्याशिवाय त्यांना शांति मिळणार नाहीं, असें ते म्हणत असत. तसेंच भरतखंडानेंही सर्वशास्त्रपारंगत होणें जरूर आहे, आपला सनातन वैदिक धर्म व "विश्वधर्म" भविष्यकाळीं होईल असें ते निश्चितपणानें म्हणत असत. स्वधर्म हा राष्ट्रोन्नतीचा पाया आहे; म्हणून स्वधर्मवान् व्हा. आपल्या पूर्वजांच्यां कृतीकडे आदरानें पहा त्यांनीं अविश्रांत श्रम करून अबाधित सिद्धांत कसे निश्चित केले आहेत तिकडे लक्ष द्या, असें ते वारंवार सांगत असत. स्वामी रामतीर्थांच्या वाङ्मया-बद्दल त्यांना अत्यंत आदर वाटे व भारतभूमि पूर्वीसारखी वैभवशाली व्हावी अशी त्यांची सतत उपास्यदेवतेकडे प्रार्थना असे.

एकवार मिळणाऱ्या दुर्लभ नरजन्माचें सार्थक सद्गुरुमाउलीपदीं लीन होऊन व सोपें साधन नामस्मरण करून करावें, असा त्यांचा मुख्य उपदेश असे. अधिकारपरत्वें प्राणायामादि योगही सांगत. परमार्थजिज्ञासूंस अत्यंत उपयोगी पडणारीं त्यांचीं कांहीं पत्रें मजजवळ आहेत. त्यांच्या आख्या-यिका प्रसिद्ध करण्याचा योग आल्यास प्रापंचिक व पारमार्थिकांसही ह्या मार्ग-दर्शक होतील.

देह ठेवण्यापूर्वीं जिव्हाळ्याचे शिष्य खंडेराव यांना स्वतः चतुर्थाश्रम दिला व आपल्या उपास्य देवतेच्या पुत्राचेंच नांव "भार्गवराम" आपल्या लाडक्या पुत्रास दिलें. याप्रमाणें पूर्वींचे खंडेराव आतां भार्गवानंदस्वामी बनले. हल्लीं हेंच मठाधिकारी आहेत. हे स्वामी भूतमात्रीं नम्र, निरलस व शांत आहेत.

श्रुतिस्मृतिमविज्ञाय केवलं गुरुसेवया ।
तेवै संन्यासिनः प्रोक्ता इतरे वेषधारिणः ॥ गुरुगीता ॥

---

१ साधुवर्य रंगनाथमहाराज हे महाराजांचे शेवटचे शिष्य आहेत. हे सोळा कोसांवरून त्यांना साष्टांग नमस्कार घालीत आले होते. गुरुमहाराजांचे समाधीपूर्वी सात दिवस त्यांनीं अनुग्रह घेतला. हे गृहस्थाश्रमी, शांत व ज्ञानी पुरुष आहेत. यांचाही शिष्यवर्ग वाढत आहे.

## पांगारकरांचीं पुस्तकें.

१. भक्तिमार्गप्रदीपः—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पी. नें ०१२.

२. संतचरित्रमालाः—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. १. १०८.

३. श्रीएकनाथचरित्रः—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. कविरामायणः—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. आनंदलहरीः—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. नारदभक्तिसूत्रेंः—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. ( आवृत्ति ४ थी )

७. नवविधाभक्तिः—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचे नऊ प्रकारांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

८. निरंजनमाधवांची कविताः—भाग २ व ३ किं. १॥ ६.

९. श्रीज्ञानेश्वरचरित्रः—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १०८.

१०. भक्तिमणिमालाः—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

## पांगारकरांचीं पुस्तकें

**११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै॰ विष्णुबुवा जोग यांनी केलेल्या सविस्तर अर्थासह. कि. ८५.

**१२-१३. मुमुक्षूंतील विचारक निबंध** ( भाग १--२ ):-कि. प्रत्येकीं रु. १८८

**१४. मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. कि. रु. १ १२.

**१५. पारिजातकाचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. कि. ८८

**१६. श्रीतुकारामचरित्र**:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिक ठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सह्या असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ॰ सह कि. रु. २.

**१७. श्रीतुकारामचरितामृत**:—तुकोबांचे प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. कि. ८५.

**१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. कि. ८१०.

**१९. मुक्तेश्वर** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. त्या कवित्याचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. कि. रु. १.

**२०. मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ):—कि. ८४.

**२१. सार्थ श्रीदासबोध**:- कि रु. ४, व्ही. पी. नें ४८१०.

**२२ सार्थ मनोबोध**--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. कि. ८१२.

**२३. समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे**:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० कि. रु. २.


**२४ मोरोपंत** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—कि. रु. २८४.

**२५ श्रीएकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):—कि. रु. ६

पत्ता:— व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| जुनें वर्ष २१ वें | वैशाख १८५० | नवें वर्ष ८ वें |
|---|---|---|
| मास ९ | जून १९२८ | अंक ६ |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही.पी.नें रु. ३८३

मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका




| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण. | १–२ |
| २ महाभारतांतील सुभाषितें. | ३–५ |
| ३ सामराज कवि. | ६–८ |
| ४ गोविंद शास्त्री पेंडसे यांचें पुण्यस्मरण. | –९ |
| १० मद्रास येथील पार्थसारथी. | १०–१२ |
| ११ श्रीमध्वमुनीश्वर चरित्र. | १३–१६ |
| १२ श्रीविष्णुकवि चरित्र ( समाप्त ). | ८१–१०४ |
| १३ प्रस्तावना व हकीकत. | १०५–८ |


## सूचना

**विष्णुकवीचें चरित्र**–मागील व या अंकीं मिळून पुरें झालें आहे. सदरहु चरित्र स्वतंत्रपणें मिळण्याचीही सोय केली आहे. वे. **नरहरशास्त्री खरशीकर** यांनीं प्रस्तुत चरित्र किती व्यवस्थित व रसभरित लिहिलें आहे हें सांगण्याची गरज नाहीं. प्रास्ताविक चार शब्द लिहिण्याचें आम्हांस झालें नाहीं, तथापि प्रस्तुत चरित्र आम्हांस आवडलें म्हणून आम्ही आमच्या वाचकांस तें प्रथम सादर केलें आहे.

ल. रा. पांगारकर
गंगानिवास
नाशिक

123 ता. 24/6/26





## १ श्रीकृष्णनमन.

नमो नलिननेत्राय वेणुवाद्यविनोदिने ।
राधाधरसुधापान–शालिने वनमालिने ॥ १ ॥

## २ सप्तविभक्तिपर श्रीकृष्णस्तव.

कृष्णो रक्षतु मां चराचरगुरुं कृष्णं नमस्ये सदा
कृष्णेनैव सुरक्षितोऽहमसकृत्कृष्णाय दत्तं मनः
कृष्णादेव समुद्भवज्जगदिदं कृष्णस्य दासोस्म्यहम्
कृष्णे भक्तिरचंचलाऽस्तु भगवन् हे कृष्ण तुभ्यं नमः ॥ २ ॥

## ३ श्रीकृष्णमंत्रमाहात्म्य.

शत्रुच्छेदैकमंत्रं सकलमुपनिषद्वाक्यसंपूज्यमंत्रं
संसारोत्तारमंत्रं समुचितसमये संघनिर्याणमंत्रम्
सर्वैश्वर्यैकमंत्रं व्यसनभुजगसंदष्टसंत्राणमंत्रं
जिव्हे ! श्रीकृष्णमंत्रं जप जप सततं जन्मसाफल्यमंत्रं ॥ ३॥

## ४ श्रीकृष्णमणि.

भक्तापायभुजंगगारुडमणिस्त्रैलोक्यरक्षामणिः
गोपीलोचनचातकांबुदमणिःसौंदर्यमुक्तामणिः
यः कान्तामणिरुक्मिणीघनकुचद्वंद्वैकभूषामणिः
श्रेयो देवशिखामणिर्दिशतु नो गोपालचूडामणिः ॥ ४ ॥

## ५ श्रीकृष्णकोटि ( गौरचैतन्य. )

सौंदर्ये कामकोटिः सकलजनसमाह्लादने चंद्रकोटिः
गांभीर्येंभोधिकोटिस्त्रिदशविटपिनां कोटिरौदार्यसारे
वात्सल्ये मातृकोटिर्मधुरिमणि सुधाक्षीरमाध्वीरकोटि-
र्गौरोदेवः स जीयात्प्रणतरसपदे दर्शिताश्चर्यकोटिः॥ ५ ॥

---

---

## वाचकांस विनंती.

रा. रा. पांगारकर यांची प्रकृति आज ३--४ महिने असावी तशी नसल्यानें मुमुक्षुसाठीं त्यांनीं कांहीं लिहिलें नाहीं, आणि ऑफिस पुण्यास, राहणें नाशकास, घरगुती अडचणी व प्रकृति यामुळें वस्ती मुंबईस, अशी त्रिस्थळीं झाल्यामुळें अंकाची कांहींशीं आबाळ झाली असल्यास ग्राहकांनीं क्षमा करावी अशी त्यांची विनंती आहे. श्रीहरीकृपेंकरून प्रकृति लवकर यथापूर्व सुधारेल व मुमुक्षुकडे त्यांना पूर्ण लक्ष देतां येईल अशी उमेद आहे. यवतमाळ व धुळें येथील वाचकांनीं तक्रारी केल्या आहेत. त्याही छापण्याची सोय व राहणें एकत्र झाल्यानें दूर होतील.

व्यवस्थापक, मुमुक्षु, पुणें.

# किं. २ रु. ) ज्ञानेश्वरांची प्रभावळ ( पृ. सं. ४८०

**ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

**महाराष्ट्र** ( प्रो. शं. वा. पेंडशे एम्. ए. ):—" या पुस्तकांत ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरकालीन इतर साधुसंत यांच्या कृतींतील सुंदर व बहुमोल भाग एकत्रित करण्यांत आला असून त्याला मार्मिक प्रस्तावनाही जोडली आहे. रा. पांगारकरांसारख्या जुन्या वाङ्मयांत कसलेल्या व मुरलेल्या विद्वानानें अनेक दिवस आपल्याशींच गुणगुणून काढलेले हे वेंचे किती उत्कृष्ट आहेत हें पुस्तक वाचल्यावांचून समजणार नाहीं.

**केसरी**:—" सामान्य वाचक, भाविक व अभ्यासक या सर्वांना हा ग्रंथ आपापल्या दृष्टीनें उपयुक्त वाटेल. मराठी भाषेच्या विश्वविद्यालयांतील अभ्यासक्रमांतही हा ग्रंथ नेमण्यासारखा आहे. "

**रणगर्जना**:—" ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन इतर सुमारें २८ संत कवि यांच्या कवितेंतील निवडक वेंच्यांचें हें पुस्तक रा. पांगारकर यांनीं मोठ्या परिश्रमानें व कसोशीनें तयार केलें आहे. प्रस्तावनेंत ज्ञानेश्वरांच्या संप्रदायाची व त्यांच्या वाङ्मयसेवेची खुलासेवार माहिती दिली आहे, व ज्ञानेश्वरींतील कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग यावरील ज्ञानेश्वरींतील विवेचनाचा विस्तृत गोषवाराही दिला आहे व या सर्व प्रकरणांची भाषाही फार प्रेमळ व गोड आहे. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांतील निवडक २५०० ओव्या म्हणजे ज्ञानेश्वरांचें सारसर्वस्व होय. एकंदर ग्रंथाची रचना मोठ्या कुशलतेनें केली असून जुन्या मराठी कवितेच्या सहृदय भोक्त्यांपुढें रा. पांगारकर यांनीं हें सुंदर ताटच ठेवलें आहे. या एकाच ग्रंथावरून पांगारकरांचा ज्ञानेश्वरी ग्रंथाचा व्यासंग केवढा दांडगा व जिव्हाळ्याचा आहे याची कल्पना सहज होईल. पुस्तक जाड ग्लेज कागदावर सुंदर टायपांत छापलेलें असून जाड पुठ्ठ्याचें बाईंडिंगही मजबूत आहे. ५०० पृष्ठांच्या मानानें किंमत रु. २ ही अगदींच माफक आहे. "

**स्वतंत्र हिंदुस्थान**:—ज्ञानेश्वरांच्या व इतर संतांच्या कृतींचा पूर्ण अभ्यास करून त्यांत कृतविद्य झालेल्या पांगारकरांनीं ही ज्ञानेश्वरांची प्रभावळ सिद्ध केली आहे. प्रभावळीची मध्यदेवता श्रीज्ञानोबाराय हेच होत. ज्ञानेश्वरींचें सार विषयवारीनें यांत काढलेलें असल्यामुळें पिकलेल्या कलिंगडांतील लालगाभा हातीं दिल्याप्रमाणें सदर ग्रंथ मोठा गोड झाला आहे. ग्रंथाचे प्रारंभीं ग्रंथपरिचय करून देणारा एक अत्यंत प्रेमळ प्रबंध दिला आहे. "

**१ व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें शहर.**
**२ तुकाराम पुंडलीक शेट्ये, बुकसेलर,**
**माधवबाग, मुंबई. ४**

# श्रीमहाभारतांतील सुभाषितें.

## १ धर्म.

धर्म एको मनुष्याणां सहायः पारलौकिकः । –१३–१११
धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ॥ –३–३१३
धर्मंहि यो वर्धयते स पंडितः । १२–३७२
धर्मे सुखकला काचित् धर्मे तु परमं सुखम् । १२–२७१
धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मेण विधृताः प्रजाः । १२--१०९
धर्मो हि परमा गतिः । १२--१४७

**भावार्थः**—मनुष्यमात्राला परलोकांतही साहाय्य करणारा सखा एक धर्म मात्र आहे; धर्माला तुम्ही मारलेत तर धर्म तुम्हांला मारील व धर्मपालन केलेत तर धर्म तुमचें पालन करील; धर्माची वृद्धि करतो तो खरा पंडित. सर्व सुखें धर्मपरिपालनापासून होतात–धर्मांतच परमसुख आहे; समाजाचें धारण करितो (त्याला विस्कळित होऊं देत नाहीं) म्हणून त्याला धर्म म्हणतात; धर्म हीच परमगति आहे.

## २ ब्राह्मण व क्षत्रिय.

ब्रह्म वर्धयति क्षत्रं क्षत्रतो ब्रह्म वर्धते । [ १२--७३ ]
ब्रम्ह क्षत्रेण सहितं क्षत्रं च ब्रम्हणा सह ।
संयुक्तौ दहतः शत्रून् वनानीवाग्निमारुतौ [ ३--१८५ ]
ब्राम्हणस्यहि देहोऽयं न कामार्थाय जायते ।
इह क्लेशाय तपसे प्रेत्य त्वनुपमं सुखम् ॥ [ १२–३२१ ]
क्षत्रियाणां बलं तेजो ब्राम्हणानां क्षमा बलम् [ १--१७५ ]
राज्ञाहि पूजितो धर्मस्ततः सर्वत्र पूज्यते । [ १२-७५ ]

**भावार्थः**—ब्राह्मण क्षत्रियाला व क्षत्रिय ब्राह्मणाला वाढवितात, ह्म० परस्परांच्या उन्नतीला साहाय्यक होतात; ब्राह्मण व क्षत्रिय एक झाले तर ते–पवन व अग्नि एक झाल्यानें जशीं अरण्यें जाळून भस्म करितात–तसे शत्रूंचा निःपात करितात; ब्राह्मणाचा देह हा क्षुद्र काम व अर्थ यांच्या साधनासाठीं नाहीं–तर ब्राह्मणांनीं या लोकीं तीव्र तप आचरावें व परलोकींचें शाश्वत सुख

मिळवावें यासाठीं ब्राह्मणदेह आहे; क्षत्रियांचें बल तेज व ब्राह्मणांचें बल क्षमा. राजांनीं धर्माचा मान ठेवला तरच लोक ठेवतात.

---

## ३ भार्या व पति.

अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ।
भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥ ( १--७४ )
भार्याहीनं गृहस्थस्य शून्यमेव गृहं भवेत् । ( १२--१४४ )
असहायस्य लोकेस्मिन् गृहयात्रासहायिनी ( ,, )
भार्यायां रक्ष्यमाणायां प्रजा भवति रक्षिता ।
प्रजायां रक्ष्यमाणायां आत्मा भवति रक्षितः ॥ ३--१२ ॥
नास्ति भार्यासमं किंचित् नरस्यार्तस्य भेषजम् ( १२--१४४ )
नास्ति भार्यासमो बंधुर्नास्ति भार्यासमा गतिः ।
नास्ति भार्यासमो लोके सहायो धर्मसंग्रहे ॥ ( १२--१४४ )
नहीदृशमनायुष्यं लोके किंचन विद्यते ।
यादृशं पुरुषस्येह परदारोपसेवनम् ॥ ( १३--१०४ )
पतिर्हि देवो नारीणां पतिर्बंधुः पतिर्गतिः ।
पत्या समा गतिर्नास्ति दैवतं वा यथा पतिः ( १३--१४६ )
पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
पुत्रस्तु स्थाविरे भावे न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ( ३१--४६ )
पुत्र आत्मा मनुष्यस्य भार्या दैवकृतः सखा ( ३-३१३ )
यः सदारः स विश्वास्यः । ( १--७४ )
शाश्वतोऽयं धर्मपथः सद्भिराचरितः सदा ।
यद्भार्यां परिरक्षन्ति भर्तारोऽल्पबला अपि ॥ ( ३--१२ )
श्रिय एताः स्त्रियो नाम सत्कार्या भूतिमिच्छता ।
पालिता निगृहीता च श्रीः स्त्री भवति भारत ॥ ( १३--४६ )
सा भार्या या प्रियं ब्रूते स पुत्रो यत्र निर्वृतिः ।
तन्मित्रं यत्र विश्वासः स देशो यत्र जीव्यते ॥ ( १२-१३९ )

**भावार्थः**—भार्या ही पुरुषाचा अर्ध आहे. ( स्त्री + पुरुष = पुरुष ). भार्या अत्यंत श्रेष्ठ असा मित्र आहे. धर्मार्थकाम ह्या त्रिविध पुरुषार्थांचें मूळ

आहे, फार काय पण मोक्षाचें ( तारणाचें ) ही मूळ भार्याच आहे; भार्या नाहीं तें गृह शून्य अरण्यच होय; ह्या लोकांत मनुष्य खरोखर असहाय आहे, पण भार्या ही संसारयात्रेंतील साहाय्यकर्ती आहे; भार्येच्या रक्षणानें अपत्यरक्षण होतें व अपत्यरक्षणानें आत्मरक्षण होतें; संसाररोगावर भार्या ही अत्युत्तम औषधी आहे; भार्येसारखा धर्मजीवनांत दुसरा कोणी साहाय्यक नाहीं; परदारसेवनासारखें आयुष्यनाश करणारें दुसरें कांहीं नाहीं; भार्येला पति हा देव, बंधु, सद्गति, परमदेव आहे. पिता बाल्यांत, भर्ता तारुण्यांत व पुत्र वृद्धपणांत रक्षक असून स्त्रीला स्वतंत्रपणांत ठेवतां येत नाहीं. विवाहित पुरुष विश्वासयोग्य आहे, तसा दाररहित पुरुष नाहीं. भर्ता अल्पबल असला तरी त्याला स्वभार्येचें रक्षण केलेंच पाहिजे—हा सज्जनांचा मार्ग असून धर्ममार्ग हाच आहे. श्रीप्रमाणें स्त्रीचें पालन व निग्रहण केलें असतां स्त्रीच खरी श्री आहे असें अनुभवाला येतें. मंजुळ भाषणानें पतीला रमविते ती भार्या.

---

## सामराज कवि.

ले० गोविंद रामचंद्र राजेपाध्ये, बी. ए.

१. सामराजाचें ‘ रुक्मिणीहरण ’ काव्य “ महाराष्ट्र कवी ” मध्यें प्रसिद्ध झालें आहे. त्यांत कवीनें स्वतःसंबंधीं कांहीं माहिती दिली नाहीं. परंतु सामराजाचें ‘ मुद्गलाख्यान ’ नांवाचें काव्य असून त्यांत कवीनें आपल्याविषयीं जी माहिती दिली आहे म्हणून प्रसिद्ध झालें आहे ती माहिती अशीः—बापाचें नांव लक्ष्मण, आईचें नांव काशी, भागिनीचें नांव मंदाकिनी, गोत्र शाकल्य. कवीची कांहीं अधिक माहिती मी आज देत आहे.

२ सामराज हे पंडितराव राजोपाध्ये शाकल्यगोत्री यांचे घराण्यांतील होत. या घराण्यांतील पूर्वज मल्हारभट व प्रभाकरभट हे शहाजी राजे भोसले यांचे पुरोहित म्हणून त्यांचे आश्रयास होते. यांचा उल्लेख “ राधामाधवविलासचंपू ” या काव्यांत आला आहे. यांपैकीं मल्हारभटाची वंशावळ कामापुरती पुढें देत आहे.

मल्हारभट = बाबाजी भोसले

लक्ष्मणभट = मालोजी भोसले

प्रथम स्त्रीपासून | द्वितीय स्त्रीपासून

मल्हार भट उर्फ भास्कर भट = { शहाजी, शिवाजी, संभाजी } | शामभट उर्फ सामराज

गदाधर भट उर्फ मुद्गल भट=शाहू ( शके १५५२-१६५१ ) | सदाशिव भट ( दत्तक लक्ष्मण भटास ) | वासुदेव भट | लक्ष्मण भट

सदाशिव भट ( दत्तक )

शामभट

सदाशिवभट

नारायणराव ( आप्पासाहेब )
हल्लीं हयात आहेत.

३. वरील वंशावळींतील पुरुष भोसले यांचे वंशांतील कोणत्या पुरुषाशीं समकालीन होते हें समदर्शक दोन आडव्या रेघांनीं दर्शविलें आहे. शामभट उर्फ सामराज यांचा वंश हल्लीपर्यंत दिला आहे. सामराज हे मल्हार भटाचे सापत्न बंधु. मल्हारभट शहाजीचे दरबारांत असून त्यांस श्रीशिवाजीमहाराजांनीं आपल्या राज्याभिषेकसमयीं पंडितरावाचे अधिकार दिले होते. पुढें संभाजीनें हे अधिकार कलुशास दिले. नंतर पुन्हां शाहूराजानें हे अधिकार आपल्या राज्याभिषेकसमयीं मल्हारभटाचे पुत्र मुद्गलभट यांस दिले. मल्हारभट हे संभाजीचे वधाचे सुमारास क्षेत्र आरवीस रहात होते. ते तेथेंच वारले.

४. शामभट ऊर्फ सामराज हे राजारामाबरोबर चंदीचंदावरास व तेथून पन्हाळ्यास गेले. पुढें राजारामाचे पश्चात् सामराजाचे पुत्र लक्ष्मणभट हे पन्हाळ्याहून सिंहगडास आले व तेथें ताराबाईच्या आश्रयानें राहूं लागले. तेथेंच ते निवर्तल्यावर त्यांचे पुत्र सदाशिवभट हे करवीराकडे ताराबाई व संभाजी

यांचे बरोबर गेले व तेथें त्यांनीं जहागीर संपादन केली. यांचेच वंशज हल्लींचे कोल्हापुरचे राजोपाध्ये हे होत.

५. राजारामाचे मृत्युसमयीं सामराज हयात नसावे असें दिसतें. कारण त्यावेळीं पन्हाळ्याहून सिंहगडास आल्याचा उल्लेख त्याचा पुत्र लक्ष्मणभट याचे संबंधानें बखरींत आढळतो; सामराजासंबंधानें आढळत नाहीं. संभाजीचा वध शके १६११ चे सुमारास झाला. त्यानंतर सामराज राजारामाबरोबर गेला. तेथून राजारामाचे मृत्यूपर्यंत म्हणजे सरासरीनें शके १६२२ पर्यंत केव्हां तरी सामराजाचा अंत झाला असावा व तो पन्हाळ्यास झाला असावा. कदाचित् राजारामाचे मृत्यूपूर्वीं एक दोन वर्षें म्हणजे शके १६२० चे सुमारास झाला असावा. यापूर्वींच १०।१२ वर्षें त्याचा वडील बंधु मल्हारभट आरवीस निवर्तला होता.

६. शहाजीच्या दरबारांतील म्हणून वर उल्लेख केलेल्या प्रभाकरभटानें बाळंभट नामक पुत्र दत्तक घेतला होता. या दत्तकासंबंधीं एक कागद शके १५९६ म्हणजे शिवराज्याभिषेकवर्षाचा उपलब्ध आहे. त्यावर ' शामभट आरवीकर ' अशी एक साक्ष आहे. साक्षीदार सामराज होय. कारण पंडितराव राजोपाध्ये यांचे पूर्वींचें आडनांव आरवीकर असेंच होतें.

७. वरील घराण्यापैकीं कांहीं पूर्वकालीन व्यक्तींस गोस्वामी असेंही उपनांव लावलेलें आढळतें. राधामाधवविलासचंपूंत ' शामगुसाई ' या नांवाचा उल्लेख आहे. शामगुसाई यानें जयरामास एक समस्या घातली व तिचें समाधान जयरामानें केलें असें त्या काव्यांत म्हटलें आहे. त्यावेळच्या या घराण्यांतील इतर कांहीं व्यक्तींप्रमाणें गोस्वामी हें उपनांव शामभटास ही लावलें असण्याचा म्हणजे शामगुसाई ही व्यक्ति सामराजच असण्याचा संभव आहे. सामराजाच्या वडील भावाचा या काव्यांत उल्लेख आहेच. तसा त्याचाही असणें साहजिक आहे.

८. यावरून असें दिसतें कीं सामराजानें शहाजी, शिवाजी, संभाजी व राजाराम या चारही कारकीर्दी पाहिल्या असाव्या. राजदरबाराशीं त्याचा निकट संबंध असल्यामुळें त्यासंबंधीं माहिती त्याला असणें कठीण नव्हतें. मल्हारभटासंबंधानें रा. मा. वि. चंपूंत उल्लेख आहे तो " तदनन्तरं पुरोहितधुरंधरैर्धिषणाधिक-बुद्धिविशारदैर्मल्लारि—भट्टैरेका समस्या व्यतारि " असा आहे. यावरून मल्हारभट हा बुद्धिवान् व विद्वान् होता हें उघड दिसतें. त्याचप्रमाणें त्याचा बंधु सामराज हाही व्युत्पन्न असावा यांत नवल नाहीं.

९. रा. मा. वि. चंपूचा काळ कै. राजवाडे यांनीं शके १५७५ चे सुमारचा ठरविला आहे. चंपूंत उल्लेख केलेला शामगुसाई हा सामराजच असल्यास त्यावेळीं सामराजानें आपली काव्यें केलीं नसावीं असें वाटतें; कारण

केलीं असल्यास त्यांचा उल्लेख शामगुसाई असा न करितां शामकवि असा जयरामानें केला असता. दुसरी गोष्ट अशी कीं मुद्गलाख्यान काव्यांत सामराजानें आपल्या भगिनीचा उल्लेख केला आहे; बंधूचा केला नाहीं. यावरून 'मुद्गलाख्यान' काव्य कवीनें आपला बंधु मल्हारभट निवर्तल्यावर म्हणजे शके १६११ नंतर केलें असावें असें वाटतें. 'रुक्मिणीहरण' काव्यांतही 'आतां असे अंत समीप आला" असें सामराज म्हणतो. यावरून हें काव्यही कवीनें उतारवयांतच केलें असावें असें दिसतें. सामराजाचें 'रुक्मिणीस्वयंवर' या नांवाचें आणखी एक काव्य आहे व त्याची हस्तलिखित प्रत राजोपाध्ये यांजकडूनच भारत इ. सं. मंडळांकडे गेली असल्याचें कै. रा. भावे लिहितात. हें काव्य कवीनें वरील दोन काव्यांपूर्वी कदाचित् केलें असेल.

१०. वर दिलेली सामराजासंबंधीं माहिती मुद्गलाख्यानकर्त्या सामराजाला पूर्णपणें लागू पडते, यांत शंका नाहीं. कारण त्यांत कवीनें आपलें कुलदैवत, गोत्र, बापाचें नांव हीं दिलीं आहेत व हीं राजोपाध्ये यांचे घराण्यांतील शामभटाशीं तंतोतंत जुळतात. या बाह्य पुराव्यावरून मुद्गलाख्यानकर्त्या सामराजाचा पत्ता लागतो. हा पत्ता लागल्यावर मुद्गलाख्यानाचा कर्ता सामराज व रुक्मिणीहरणकाव्याचा कर्ता सामराज हे दोन्ही एकच आहेत हें प्रस्तुत हातीं आलेल्या मुद्गलाख्यानाच्या हस्तलिखित प्रतीवरून स्पष्ट होतें. दोन्ही काव्यांत प्रारंभींचा नमनाचा श्लोक एकच आहे, वृत्तें तशींच आहेत. दोन्ही काव्यांवर एककर्तृत्वाचा छाप पडला असल्यामुळें रुक्मिणीहरणकर्ता शामभट राजोपाध्येच होय यांत संशय राहत नाहीं. राजदरबारविषयक ज्ञान त्यास होतें हें उघडच आहे. आतां त्याच्या काव्यांची पूर्वापरता ठरणें अवश्य आहे.

# गोविंदशास्त्री पेंडसे यांचें पुण्यस्मरण.

१. सुमारें ४८ वर्षांपूर्वी उपरोक्त सच्चरितवान् भागवतपारायणशील व सांप्रदायी बालबोध सत्पुरुष ब्रह्मीभूत झाले; त्या समयीं त्यांचें वय सुमारें ७५ वर्षांचें होतें. यांनीं आजन्म कोरान्न मागून श्री भागवत ग्रंथाचें अध्ययन, अध्यापन केलें; व त्या वेळच्या पिढींत भागवत संप्रदायाचें नवचैतन्य भरलें. त्यांचा शिष्यवृंद अद्यापही येथें दरवर्षी त्यांच्या पुण्यतिथीस येथील खासबारदारांचे वाडयांत, जेथें त्यांच्या पादुका आहेत त्या ठिकाणीं येऊन प्रसाद ग्रहण करून पादुकापुढें यथाशक्ति फूलपाकळी वाहून व मनोभावें वंदन करून आशीर्वाद घेत असतो.

२. यांचे शिष्यमंडळींत मोठमोठे व सर्व प्रकारचे स्त्रीपुरुष येतात. उत्तर हिंदुस्थानांत व इतरत्रही यांचे शिष्य विखुरले आहेत. दिवसेंदिवस यांचे वेळची पिढी स्मृतिप्राय होऊं लागल्यामुळें, त्यांचें चरित्र आतां नवपिढीस अवगत करून देण्याची अवश्यकता भासूं लागली व तिणें आम्हाजवळ त्याविषयीं मागणी केली; म्हणून या विनंतिपत्रद्वारें, त्यांच्या सर्व चाहत्यांस व शिष्यवर्गास अशी कृतज्ञतापूर्वक विनंति आहे कीं, ज्यांना ज्यांना म्हणून या पुण्यशील शास्त्रीबुवांविषयीं नवीन पिढीच्या चारित्र्यास उद्बोधक, वळण लावणारी व अद्भुत अशी प्रत्यक्ष माहिती असेल त्यांनीं त्यांनीं ती आपल्या आठवणींच्या रूपानें खालील पत्त्यावर अवश्य धाडण्यास विसरूं नये. ती माहिती येतांच आम्ही तिचें पृथक्करण करून त्यांचें सचित्र चरित्र त्यांच्या आठवणींच्या शिकवणीसह गोष्टीरूपानें एक स्मरणी म्हणून आधुनिक तरुण व बालपिढीसाठीं तयार करून येत्या त्यांच्या पुण्यतिथिसमयीं शास्त्रीबुवांचा प्रसाद म्हणून त्यांस सादर करूं.

सर्वांचा नम्र,

**वि. व. मोडक.**

शास्त्रीय ज्ञान–भांडार, शाहूपुरी कोल्हापूर नं. ३.

---

# मद्रास येथील पार्थसारथी.

**( लेखकः—वि. कृ. कामत. )**

( १ ) गेल्या डिसेंबर महिन्यांत मी दक्षिणयात्रेस निघालों. कांहीं थिऑसफिस्ट व कांहीं इतर मित्रांच्यामुळें मद्रासची कांग्रेस व आडयार येथील डॉ. बेझंटबाईची कानव्हेन्शनही पाहणेस मिळाली. कांग्रेसची हकीगत अनेक वृत्तपत्रांतून व कान्व्हेन्शनची हकीकत " धर्मजागृति " नामक मासिकांतून विशद रीतीनें प्रसिद्ध झालीच आहे. यात्रेकरूच्या नात्यानें मी अवांतर गोष्टी ज्या या प्रांतीं पाहिल्या त्या ' मुमुक्षु ' च्या वाचकवर्गासाठीं किंचित् द्याव्या म्हणतोः—

आमचे सुहृच्छ्रेष्ठ व भगवत्कृपापात्र महाशय ल. रा. पांगारकर यांजकडून प्रेमाची भेट म्हणून आलेलें " श्रीज्ञानेश्वरांची प्रभावळ " हें नवीन सुंदर पुस्तक मला श्रीतुकारामद्वितीयेच्या उत्सवांत फार उपयोगी पडल्यामुळें ' मुमुक्षु ' वाचकांसाठीं–प्रतिभेटवजा–कांहीं फारच गोड असे श्रीकृष्णोपासकवर्गांत मला येथें सांपडले ते कांहीं श्लोकही सोबत आज पाठविले आहेत.

( २ ) भरतखंडांत श्रीशंकरदेवाचीं द्वादश ज्योतिर्लिंगें प्रसिद्ध आहेत. तशींच श्रीविष्णुदैवताचीं उडपी, व्यंकटगिरी, पंढरपूर वगैरे जीं आठ प्रसिद्ध

मोठीं क्षेत्रें आहेत त्यांतच मद्रास येथील श्रीपार्थसारथी हें फार जुनें व मोठें देवस्थान होय. मद्रास शहरीं जुनीं नवीं अनेक देवालयें आहेत त्यांपैकीं हें देऊळ नसून स्वतंत्र क्षेत्र समजलें जातें. शहराची वस्ती त्या सभोंवतीं नंतर झाली.

( ३ ) कौरवपांडवांच्या भारतीय महायुद्धानंतर श्रीकृष्णदेव सारथ्यकर्मामुळें फार श्रमूनभागून विश्रांतिस्थान शोधीत एकदा इकडे आले होते व तेथील तलावावर हवा खात बसले असतां त्यावेळच्या लक्ष्मीनरसिंह देव नामक येथील मुखत्यारी दैवतानें त्यांस आपणाकडे पाहुणा म्हणून ठेवून घेतलें, व त्याचे हातपायकर्णमुखादि अवयवांस युद्धांतील बाणादिकांचे लागलेले घाव बरे करून सोडलें, अशी इकडे प्रेमाची आख्यायिका आहे. मग कांहीं दिवसांनीं पाहुणेच यजमान झाले व यजमानांनीं जणु पेनशन घेऊन ते रिटायर झाले, म्हणुन आतां मुख्य देव श्रीपार्थसारथीच समजला जातो ! लक्ष्मीनरसिंह, श्रीवरदराज, श्रीरंगनाथ, वेदवल्ली, श्रीसीताराम, भरत वगैरे उपदेवता मानल्या जातात ! सुप्रसिद्ध रामानुजाचार्यांची प्रसादसंपन्न अंडाल नामक मिराबाईप्रमाणें फारच थोर संतीण–देवीप्रमाणें पूजिली जाणारी–ही येथें स्थापन केलेली दिसते.

( ४ ) गोमांतक प्रांतीं ज्याप्रमाणें श्रावणमासीं सर्व लहानमोठ्या देवस्थानांत जाईजुईच्या फुलांनीं स्पेशल पूजा बांधली जाते, तशी या प्रांतीं फाल्गुन महिन्यापासून फार उष्णता हवेंत सुरू झाल्यामुळें ‘ दमनोत्सव ’ नांव देऊन सुगंधी हिरवीगार वनस्पति मरवा दवणा त्यांनींच पूजा बांधून वाहनें वगैरे काढून वसंतोत्सवाप्रमाणें थाट करितात.

( ५ ) गेल्या फाल्गुनी पौर्णिमेच्या दिवशीं श्रीपार्थसारथी प्रमुख गांवांतील इतर देवांचीं वाहनें व पालख्या वगैरे त्रिप्लिकेनच्या Beach म्हणजे वाळवंटावर वाजत गाजत सकाळीं आठ वाजतां गेलीं होतीं. तो देखावा फारच प्रेक्षणीय होता. उत्सवमूर्ती किंवा तदधिष्टान पादुका वगैरे समुद्राच्या पाण्यांत स्पर्शासाठीं नेतांक्षणीं एकाद्या यज्ञाचे शेवटील अवभृथ स्नानाप्रमाणें आबालवृद्ध हजारों स्त्रीपुरुष महापर्वणी समजून समुद्रांत स्नान करूं लागतात. मोठ्या लाटा आल्या म्हणजे हुशार व धीट स्त्रीपुरुष वर उड्या मारून लाटांचा मार चुकवितात; भित्रीं माणसें खालीं वाकून विनम्र होऊन अंगावरून लाट जाऊं देतात; पोहणारे लोक निर्भयपणें पोहूं लागतात, कांहीं मुलें भयानें किंकाळी फोडूं लागतात, भजनी मंडळीचा घोष ठिकठिकाणीं चाललाच असतो. नारळ, खारका, मरवा, दवणा देवास अर्पण करण्यासाठीं पंढरी, आळंदी, देहूप्रमाणें लोकांची बारी लागलेली असते, वगैरे वगैरे प्रकार फारच बघण्याजोगे असतात.

सुमारें बारा वाजतां दोनप्रहरपर्यंत प्रेक्षकगण आपापल्या घरीं परत जातो. देव व पुजारी मात्र वाळवंटांत मुद्दाम उभारलेल्या मंडपांत सायंकाळपर्यंत राहतात. मग रात्रीं वाजत गाजत निरनिराळ्या रंगाच्या दारूची आतषबाजी होत होत देव परत येतात. पाठीमागून शेंपन्नास ब्राह्मण वेदघोषही करीत उघड्या अंगानें कुणी भस्म व कुणी त्रिपुंड्र धारण केलेले येत असतांना पाहून आनंद होतो.

( ६ ) मागच्या आठवड्यांत श्रीपार्थसारथी देवाचा " तप्प " नांवाचाही उत्सव तीन दिवस झाला. देवाची ती एक जलक्रीडाच आहे. गोमांतकांत यांस ' सांगड ' उत्सव म्हणतात व दोन लहान नावा किंवा एक मोठी नाव शृंगारून देवाच्या तलावांत रात्रीं फिरवितात. देव फारच शृंगारलेला असतो. मद्रासेंत पार्थसारथीचा तलाव फारच मोठा आहे. गोव्याप्रमाणें इकडे लांबट नाव किंवा होडी न घालतां सुमारें शें दोनशें लोक बसण्याजोगा तो एक जणुं चौकोनी विमानाप्रमाणें फारच सुंदर मंडपच मखरांनीं युक्त असा केलेला असतो. इकडे up-to-date फॅशनप्रमाणें इलेक्ट्रिकची सोय असल्यामुळें त्या मंडपावर सुमारें एक हजारापेक्षां अधिक विजेचे दिवे निरनिराळ्या रंगाचे पेटलेले होते ! पाण्यांत हा मंडप तीन प्रदक्षिणा घेतो. दोन तीन तास ही मौज चाललेली असते. आठदहा हजार लोक सभोंवतीं कांठावर बघत बसलेले असतात.

( ७ ) देवाचा उत्सव करा, घरांत लग्नमुंजी मुलाबाळांच्या करा; इलेक्ट्रिक दिव्यांच्या शोभेच्यापायीं शेंकडो रुपये नित्य परदेशीय कंपनींत किंवा परदेशीय वस्तूंत खर्च करण्याची संवय आम्हांस लागलेली आहे, असाही विचार मनांत येऊन थोडासा खेदही होतो. " कालाय तस्मै नमः "

( ८ ) पार्थसारथीची मूर्ति ( मूळविग्रह ) फारच भव्य म्हणजे पंढरपुरच्या विठोबारायाच्या मूर्तीपेक्षां दुप्पटीहून अधिक आहे !

या मूर्तीच्या व धातूच्या बनविलेल्या धाकट्या उत्सवमूर्तीच्या मुखावरील व्रण घालविणेस किती किती रासायनिक प्रयोग कित्येक चिकित्सक भक्तांनीं केले म्हणतात. पण ते जातच नाहींत असें सांगतात. पार्थभक्ताचें सारथ्य केल्याचें स्मारक म्हणून ते मुद्दाम देवाजीनें मुखावर धारण केले आहेत !

श्री पार्थसारथीचे ध्यानाचे श्लोक येथें येणेप्रमाणें म्हणतात: —

अग्रे कृत्वा कमपि चरणं जानुनैकेन तिष्ठन्
पश्चात्पार्थं प्रणयरसजुषा चक्षुषा वीक्षमाणः ।
सव्ये तोत्रं करसरसिजे दक्षिणे ज्ञानमुद्राम्
आबिभ्राणो रथमधिवसन्पातु नः सूतवेषः ॥ १ ॥

एका गौरांगप्रभूच्या उपासकाकडे श्रीराधादेवीचें ध्यान मिळालें तें असें:—

अमलविमलकांतिं नीलवस्त्रां सुकेशीम्
शशिधरसमवक्त्रां कंजनाक्षीं मनोज्ञाम् ।
स्तनयुगगतमुक्तां दामदीक्षां किशोरीं
व्रजपतिसुतकांतां राधिकामाश्रयामि ॥ ९ ॥

---

# श्रीमध्वमुनीश्वर यांचें संक्षिप्त चरित्र.

( लेखक—प्रल्हाद व्यंकटेश गुर्व्वी. )

## प्रकरण १ लें.

भगवान् प्रभु श्रीरामचंद्रांनीं आपला वनवासांतील बराच काल ज्या ठिकाणीं घालविला त्या पुण्य नाशिकक्षेत्रांत गणेशनामें एक माध्वसांप्रदायी ब्राह्मण राहात असे. तो आपला चरितार्थ भिक्षुकीवर चालवी. प्रापंचिक सुखाची सर्व प्रकारें अनुकूलता असतांही पोटीं संतान नसल्यामुळें त्याच्या चित्तास समाधान नव्हतें.

एके दिवशीं गणेश असाच विमनस्क स्थितींत बसला असतां अकस्मात् शिवनामाचा घोष त्याच्या कानीं आला. चौकशी करितां भाविकांचा मेळा महाशिवरात्रीनिमित्त त्रिंबकेश्वरास जात असल्याचें समजलें. त्याबरोबर आपणही जावें अशी त्यास इच्छा होऊन त्यानें पत्नीस आपला मनोदय कळविला. संतानाभावीं तिच्याही ठिकाणीं विरक्ती बाणली असल्यानें तिनेंही पतिसमवेत जाण्याचें ठरविलें. दुसऱ्या दिवशीं मेळ्याबरोबर निघून हें दंपत्य त्रिंबकेश्वरीं पोहोचलें. गणेशानें शिवरात्रीस उपवास करून शंकरास अभिषेक केला व दुसऱ्या दिवशीं नैवेद्य समर्पून ब्राह्मणसुवासिनीस पंक्तीस घेऊन पारणा केली.

परंतु तेथून जाण्यास त्याचें मन घेईना. शेवटीं पुत्रप्राप्तीस्तव तेथेंच अनुष्ठान करण्याचें ठरवून त्यानें अनुष्ठानास प्रारंभ केला. कांहीं काल लोटल्यावर यास दृष्टांत जाहला कीं ‘ तुला एक पुत्र होईल. ’ त्यावर गणेशानें आनंदानें अनुष्ठानाची सांगता करून स्वगृहीं गमन केलें. कालांतरानें पत्नीच्या ठिकाणीं

गर्भसंभव होऊन ती यथाकाल शुभ मुहूर्तावर दिव्य पुत्ररत्न प्रसवती झाली. बऱ्याच दिवसांनीं, व त्यांत देवाच्या प्रसादानें झालेल्य पुत्राचें मुखावलोकन करून त्या वृद्ध मातापितरांस धन्यता वाटली. त्रिंबकास पांचवें वर्ष लागल्यावर त्याचें मौंजिबंधन करून पित्यानें त्याजकडून द्विजोचित अध्ययन करविलें.

बालपणापासून त्रिंबकास देवादिकांचीं देवालयें पाहाणें, देवदर्शन, पुराणश्रवण इत्यादि गोष्टींचा नाद असे. त्याच्या कुटुंबांतील आराध्य-दैवत श्रीरामचंद्र होतें. सायंकाळीं गोदाकाठीं सायंसंध्या उरकून देवदर्शन करण्याचा त्याचा रोजचा क्रम असे. एके दिवशीं नित्याप्रमाणें देवदर्शन वगैरे करून त्रिंबक घरीं जात असतां मनाचे ठिकाणीं इच्छा उत्पन्न झाली कीं, सप्तश्रृंगीस मातुश्रीच्या दर्शनास जावें. घरीं पोहोंचतांच त्यानें आईबापांस आपला हेतु निवेदन केला. परंतु मुलगा एकुलताएक, लहान वय, म्हणून त्याजवरच त्यांचा सर्व जीव. अर्थात् सप्तश्रृंगीस इतक्या लांब जाण्यास परवानगी मिळण्याची आशाच नको. परंतु त्रिंबकास प्रिय जें देवदर्शन त्याविषयींची त्याची इच्छा कशी दबणार ? रात्रीं झोप येईना, अंतःकरणास सारखी तळमळ लागली. शेवटीं सकाळींच उठून आईबापांस न कळवितांच जाण्याचें त्यानें ठरविलें, तेव्हां त्यास स्वस्थ वाटलें.

दुसरे दिवशीं अरुणोदयापूर्वींच उठून मुकाट्यानें त्रिंबकाची स्वारी मार्गास लागली. तोंडानें हरिनामाचा जप चालूच होता. नाशकापासून सप्तश्रृंगी सत्तावीस मैल आहे. वाटेंत विश्रांति घेत घेत स्वारी सप्तश्रृंगीस पोहोंचली. चुकलेलें पाडस आईस भेटण्यास आतुर होतें त्याप्रमाणें त्रिंबकास झालें होतें. मंदिरांत प्रवेश करून देवीचें दर्शन होतांच स्वारीनें अंगणीं लोळण घेऊन नानाप्रकारें मातुश्रीचें स्तवन केलें. नंतर पुन्हां एकांत दर्शन घेतलें; तेव्हां ह्याच ठिकाणीं तपाचरण करावें अशी इच्छा होऊन लागलीच दुसऱ्या दिवसापासून मातुश्रीजवळ तपाचरणास आरंभ केला. कंदफलमूलादि भक्षून वृत्ति चालविली. बराच कालपर्यंत त्रिंबकाची पूर्ण निष्ठा व भक्ति पाहून जगदंबा दर्शन देती झाली. जगदंबेची ती भव्य तेजःपुंज मूर्ति अवलोकून त्रिंबकास फार संतोष वाटला. डोळे भरून त्यानें तें ध्यान न्याहाळिलें. जगदंबेनें ' वर माग ' म्हणतांच ' मला पूर्णब्रह्मदर्शन द्या ' असा वर त्रिंबकानें मागितला. तो ऐकून जगदंबेस आनंद झाला. ती म्हणाली " कलियुगाच्या ठायीं पूर्णब्रह्मदर्शन दुर्मिळ आहे व गुरुकृपेशिवाय ब्रह्म कळणें नाहीं. याकरतां तुजवर गुरूचा अनुग्रह झाला पाहिजे. " त्रिंबकानें उत्तर दिलें, " आपले चरणच मला गुरूच्या ठिकाणीं आहेत. " जगदंबा म्हणाली " बाळ, आम्हां स्त्रीजातीस गुरूपदेश देण्याची परवानगी नाहीं; याकरतां दुसऱ्या कोणा-

करून उपदेश घे." त्रिंबक म्हणाला "असें आहे तर कोणाचा उपदेश घ्यावा याविषयीं आज्ञा व्हावी." हें ऐकून जगदंबेनें आज्ञा केली "माझ्या दोनही प्रदक्षिणा तूं कर. मोठी प्रदक्षिणा करतेवेळीं मार्गांत जो कोणी तुला प्रथम भेटेल त्याचा तूं उपदेश घे म्हणजे तुझा वर तुला कालांतरानें राजसदन क्षेत्रीं प्राप्त होईल." इतकें बोलून जगदंबा अंतर्हित झाली.

जगदंबेचे ते शब्द त्रिंबकास अमृततुल्य वाटले. नंतर जगन्मातेच्या आज्ञे-प्रमाणें त्रिंबकाची स्वारी मोठ्या आनंदानें प्रदक्षिणेस निघाली. वर ज्या दोन प्रदक्षिणा सांगितल्या त्यांपैकीं लहान प्रदक्षिणा आठ मैलांची असून मोठी सुमारें १५ कोसांची आहे. लहान प्रदक्षिणा संपविल्यावर त्रिंबकानें मोठ्या प्रदक्षिणेस सुरवात केली. आपणांस आतां गुरुचरण दिसणार ह्या विचारानें त्याचें मन अगदीं आनंदभरित झालें होतें. डोंगराळ प्रदेश असल्यानें आंगाला झोंबणारा गार वारा वाहात होता. रस्त्यानें कांटे व खडे यांचा सुकाळ असून क्वचित् वन्य पशूंचे प्रवाशास भयभीत करणारे आवाज ऐकू येत असत. अशा स्थितींत रामनामाचा जप करीत त्याचें मार्गक्रमण चालूं होतें. अर्धी प्रदक्षिणा होते न होते तोंच एक अक्राळविक्राळ व्याघ्र भयंकर गर्जना करीत आपल्या-कडेच येत असल्याचें त्रिंबकास दिसलें. अशा प्रसंगीं कितीही धैर्यवान् पुरुष असता तरी त्याची गाळण उडाल्यावांचून राहती ना. तथापि त्रिंबकानें नाम-स्मरण करीत धीरानें मार्गक्रमण चालूं ठेवलें. शेवटीं वाघोबाची स्वारी जवळ येऊन ठेपली तेव्हां मात्र त्रिंबकाचा धीर सुटला. आतां कांहीं याच्या तडाख्यां-तून आपण सुटत नाहीं अशी त्याची खात्री झाली. प्राणावर बेतली म्हणजे दुबळ्यासमुद्धां एक प्रकारचें अवसान येतें. तो मनांत म्हणाला, "मरण केव्हां तरी यायचेंच. मातुश्रीच्या आज्ञेप्रमाणें चालावें म्हणजे झालें." इतक्यांत तो विक्राळ व्याघ्र अधिकच भयंकर डरकाळ्या फोडीत फारच जवळ येऊन ठेपला व आतां झडप घालणार तोंच त्रिंबकास जगदंबेच्या आज्ञेचें स्मरण झालें. "जो प्रथम भेटेल तोच तुझा गुरु" हे तिचे शब्द आठवून व हे आपणास प्रथम भेटले तेव्हां हेच आपले गुरु असें जाणून त्रिंबकानें वाघापुढें साष्टांग नमस्कार घातला. इतक्यांत काय चमत्कार झाला पहा. भयंकर व्याघ्र नाहींसा होऊन त्या ठिकाणीं श्रीशुकाचार्यांची देदीप्यमान मूर्ति प्रगट झाली. सर्व देवादिक अन्य रूपें धारण करून सप्तशृंगीस दर्शनास येत असतात. आज त्रिंबकाच्या प्रदक्षिणेची वेळ व श्रीशुकमहाराजांची जग-दंबेच्या दर्शनास जाण्याची वेळ एक झाली. त्रिंबकाच्या प्रदक्षिणेचा हेतु महा-राजांनीं अंतर्दृष्टीनें जाणला व त्रिंबकाची निष्ठा पाहून त्यांनीं आपलें स्वरूप प्रगट केलें. त्रिंबकानें नमस्कार करून जगदंबेची आज्ञा महाराजांस विदित केली.

महाराजांनींही भूमिका तयार जाणून उपदेश दिला व आज्ञापिलें कीं ' जगदुद्धारार्थ जनास सदुपदेश करावा. ' नंतर योगबलेंकरून योगींद्र श्रीशुकमहाराज अंतर्धान पावले+

गुरुमहाराजांचा हात मस्तकीं पडतांच त्रिंबकास हें विश्व परब्रह्मस्वरूप दिसूं लागलें. देहाभिमान गलित होऊन सर्वत्र चैतन्य प्रतीत झालें व अहंकाराचा नाश होऊन आत्मस्वरूपाचा बोध झाला. याविषयीं मध्वमुनीच प्रेमानें म्हणतात—

श्रीगुरु शुकमुनिचे पायीं । प्रेमें ठेविली म्यां डोई ॥
माझा केला अंगीकार । मस्तकीं दिधला अभयकर ॥
कर्णद्वारें उपदेशिलें । ब्रह्मीं ब्रह्मांड कोंदलें ॥
मध्वनाथासी फावलें । आनंदी आनंदमय जाहलें ॥ १ ॥

गुरुमहिमा वर्णितांना मध्वमुनि म्हणतात—

मी ब्रह्म ऐसें कळलें सद्गुरुच्या मुखें ॥ धृ० ॥ होतां मी ठाउकें । निरसलीं भव दुःखें ॥ भरलें भुवनत्रय अवघें स्वरूपसुखें ॥ १ ॥ विवरितां महावाक्य । जालें लक्षांसी ऐक्य ॥ मध्वमुनीश्वरसख्यें ॥ २ ॥

ऐसा गुरुचा अगाध महिमा न कळे बाई आगमानिगमा ॥ धृ. ॥

सद्गुरुरायें धरितां हस्तकीं । तेव्हां चित्त झालें स्वस्थ कीं । अभयकर ठेवितां मस्तकीं । ब्रह्मस्वरूप भासे समस्त कीं ॥ १ ॥ शरण गेलें त्याचिया चरणा । तयासि आली माझी करुणा । चुकविलें जननमरणा । भेटविलें जानकीरमणा ॥ २ ॥ आत्मारामाचिया भेटीसाठीं । रिघत होतें गिरिच्या कपाटीं । पडलें साधनकचाटीं । मध्वनाथें चुकविली आटाआटी ॥ ३ ॥

---

अपूर्ण

---

+ मध्वमुनीस काशीच्या कोणा अद्वैतानंद नामक संन्याशाचा अनुग्रह होता असें श्री. चांदोरकर आपल्या संतकविकाव्यसूचींत म्हणतात. तथापि हें विधान अगदीं निराधार आहे हें उघड दिसतें. मध्वमुनीच्या संबंध उपलब्ध कवितेंत अद्वैतानंदाचा उल्लेख नाहीं. उलट आमच्या विधानास पोषक असे भरपूर पुरावे कवितेंत सांपडतात. याशिवाय " नारायण विधि नारद व्यास । श्रीशुकयोगींद्र मध्वनाथ " ॥ हा त्यांच्या शिष्यमंडळींत प्रचलित असलेला पाठही आमच्या विधानास पुष्टिकारक आहे.

याप्रमाणें गुरु असतां स्वामीजी गुरुसेवेंत अतीशय मग्न होते, व गुरूंच्या पश्चात्‌ही गुरुसेवाच करीत आहेत. प्राणिमात्र गुरुरूपच आहेत, त्यांच्या उपयोगीं पडणें, त्यांत मी मोठा स्वामी आहे, वगैरे भाव त्यांचेजवळ असत नाहीं. ‘ मानापमानयोस्तुल्यः ’ अशी त्यांची उच्च दर्जाची वृत्ति आहे. सुंदरगीर तर मठाचे प्राण आहेत. मठाचा सर्व कारभार रात्रंदिवस शारीरिक कष्ट सोसून ते करीत असतात. हरीदासबोवा यांना तीर्थयात्रा करण्याची इच्छा असल्यामुळें ते जाऊन येऊन असतात. तेही परमार्थांत चांगले अधिकारी आहेत. गृहस्थाश्रमी शिष्यांचें व इतर मंडळींचें मठास चांगलें साह्य होत असते. श्री. बापूराव पांडे उटीकर इजारदार व त्यांचे बंधु आपाराव, आण्णा, वामनराव तसेंच आबाराव इजारदार यांचें मठाकडे चांगलें लक्ष आहे. श्री. भाऊराव इजारदार ( करंजीकर ) हें तर मठाशीं अगदीं आपलेपणानें वागतात. मठास कांहीं कमी पडूं द्यायचें नाहीं असा यांचा बाणा आहे. रा. रंगनाथ देशपांडे व बाबाराव धानोरकर हेही मठाचे हितास फार जपत असतात. भाऊराव व बाबाराव यांनीं लहान लहान नंबरही ( जमीन ) मठास समर्पण केले आहेत. वे. माधव भटजी ढाणकीकर व श्री. माधवराव नाईक मास्तर अर्णीकर हे उत्सवास उत्साह आणणारे पुढारी होत. नाईक यांच्या मागें प्रापंचिक पाश नाहीं. त्यांनीं गुरुसेवा म्हणून मठाचा बराचसा बोजा अंगावर घेतला आहे. ‘ तनमन–धन माझें सद्‌गुरु पाय तूझे ’ असा त्यांचा निश्चयाचा आचार आहे, व म्हणूनच अर्णीकर भक्तमंडळींचेंही त्यांचेवर फार प्रेम आहे. अरणीहून दरसाल उत्सवास पुष्कळ मंडळी भजन करीत येतात. ती वेळ ऐन हंगामाची. परंतु ही भक्तमंडळी पुण्यतिथीचा हंगाम साधण्याकरितां त्या प्रापंचिक हंगामावर एक सप्ताह पाणी सोडून हा ‘ सप्ताह ’ साधितात. लल्लुसिंग, मदनापूरची पाटील मंडळी, वरूडची पाटील मंडळी, राजाराम, सटवाजी, बहिरु वगैरेंचें मठाकडे फार लक्ष आहे. इमारतीसाठीं वरूडचे पाटलाचे चिरंजीव गणपती पाटील यांनीं एकदम सहाशें रुपये श्री. मामांचे स्वाधीन केले होते. महाराजांचे सवंगडी सखाराम रंगारी महागांवकर हे महाराजांच्या लीला वर्णन करतात त्यावेळीं कसलाही मनुष्य सद्गदित होतो. महाराजांच्या प्रशिष्य मंडळीपैकीं श्री. चंपतराव पाटील, गणपतराव, पर्वतराव साकूरकर या मंडळींचेंही मठाकडे चित्त वेधलें आहे. ज्यांचा नामनिर्देश करतां येत नाहीं अशीही पुष्कळच मंडळी आहेत. या सर्वांवर कृपा करून सर्वांचे मनोरथ पूर्ण करणार श्रीगुरुमाउली समर्थ आहे.

अनेक स्त्रीपुरुष महाराजांच्या कृपेनें तरले आहेत. तथापि एका विदुषीबद्दल चार शब्द लिहिल्यावांचून हें चरित्र पूर्ण करणें महाराजांनाही पटणार नाहीं. सौ. हिराबाई या महाराजांसन्निध आल्यास सुमारें वीस वर्षें झालीं.

एळंवच्या गोपाळजी पाटलांच्या या भगिनी व काळेश्वरच्या पाटलांच्या पत्नी होत. वयाच्या तीस वर्षें पावेतों नवऱ्याचा संसार यथासांग केला. त्यांचें लक्ष लहानपणापासून परमार्थाकडे असल्यामुळें सहजच सासरच्या केवळ प्रपंची मंडळींना त्यांचे नामस्मरणादिक चाळे व शुद्ध आचार, खानपानादिकांतील स्वच्छपणा हे खपेनात. तेव्हां निरुपाय होऊन हिराबाई नवऱ्याचें दुसरें लग्न करवून आपण पांढरें पातळ नेसून बाहेर पडल्या त्या श्रीदत्तशिखरावर कांहीं दिवस राहिल्या होत्या. त्यांनीं संत समागमांत तीन वेळां काशीयात्रा केल्या व शके १८२८ त त्या श्रीविष्णुकवींचे सहवासास राहिल्या. महाराजांचें त्यांजवर फारच प्रेम असे. मराठा जातीची स्त्री पण अधिकार फार मोठा आहे. त्या परमार्थांत निष्णात आहेत. त्यांचें ध्येय त्यांना प्राप्त झाल्यामुळें प्रारब्धक्षय होईपर्यंत त्या मठांत वास्तव्य करून राहणार आहेत. धन्य आहे या माउलीची!

श्रीगुरुदास महाराजांनीं महाराजांचे पश्चात् मठाचें कार्य उत्तम वाढीस लाविलें. शके १८४६ सालीं पुण्यतिथीचा उत्सव होतांच श्रीगुरुदास मामांची प्रकृति कफानें बिघडली व गुरुदास ऊर्फ अनंतराव मामा पौष व. १ रोजीं स्वस्वरूपीं लीन झाले. त्यांचीही समाधि श्रीविष्णुकवींच्या शेजारींच उजवे बाजूस केली आहे. महात्मे पुरुष नित्यमुक्त असलेमुळें त्यांचा जीवात्मा कोणत्या लोकीं वास करणार अगर राहणार हा प्रश्नच उद्भवत नाहीं. म्हणून अशा महात्म्यांचें निधनही आनंदपर होतें.

नहि सद्यो मुक्तिभाजां सम्यग्दर्शननिष्ठानां गतिरागतिर्वा क्वचिदस्ति । "न तस्य प्राणा उत्क्रामन्तीति" श्रुतेः ब्रह्मसंलीनप्राणा एव ते ब्रह्ममया ब्रह्मभूता एव ते ॥ आचार्यभाष्य ॥ गीता अ. ८ श्लो. २४ ॥

भावार्थ—विलंब न होतां मुक्तीला जाणारे जे उत्कृष्ट ज्ञानी पुरुष त्यांचें कोठेंही अथवा कोठूनही गमन अथवा आगमन संभवत नाहीं. "न तस्य प्राणा उत्क्रामन्ति" अशी श्रुति आहे. त्यांचे प्राण ब्रह्माचें ठिकाणीं लीन झालेले असतात. ते ब्रह्मवेत्ते पुरुष ब्रह्मय म्हणजे ब्रह्मरूपच बनलेले असतात.

याप्रमाणें या पवित्र कुळांत श्रीविष्णुकविमहाराज व श्रीगुरुदासमहाराज यांनीं जन्म घेऊन कुळास पवित्र केलें.

कुलं पवित्रं जननी कृतार्था ।
वसुंधरा पुण्यवतीच तेन ॥
धन्या माता पिता धन्यो धन्यो वंशः कुलं तथा ।
धन्याच वसुधा देवी, गुरुभक्तिः सुदुर्लभा ॥ गुरुगीता ॥

माता-पिता, वंश, कुल, पृथ्वीसुद्धां या महात्म्यामुळें धन्य होते!

या चरित्रलेखनसमयीं माझ्या परमपूज्य मातृदेवतेकडून पुष्कळच माहिती

मिळाली म्हणूनच मला चरित्र लिहितां आलें. माझी माता फाल्गुन शु. ४ शके १८४९ रोजीं गुरुमाउलीचे स्मरणांत कैलासवासी झाली. तिचा ध्यानयोग फार चांगला असे. हें चरित्र छापून निघालेलें तिला पाहतां आलें नाहीं, याबद्दल वाईट वाटतें.

दुसरे प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणें श्रीविष्णुदास यांच्या भाऊबंदांपैकीं हल्लीं ती० विष्णुपंत व ती० गणपतराव हे दोघे बंधु विद्यमान आहेत. ती० विष्णुपंत पेन्शन घेऊन नागपूरकडे आहेत, व ती० गणपतराव हे बहुधा माहूरचे आसपास असतात. त्यांचा सर्वच काल परमार्थांत खर्च होत आहे.

हल्लीं माहूरचे आश्रमांत कोणी तरी नेता पाहिजे आहे. मठांतून धर्मप्रसाराचीं कार्यें सतत चालून जनतेस ज्ञानदान मिळावें अशी इच्छा आहे. ही इच्छा पूर्ण करणार श्रीगुरुमहाराज समर्थ आहेत. मठांत अद्यापि धर्मशाळा वगैरे इमारतींची फार जरूरी आहे. यथाकालीं करून घेणार श्रीसमर्थ आहेत.

॥ॐ श्री सद्गुरु समर्थ॥

# उपसंहार.

श्रीमत्सद्गुरु पुरुषोत्तम–स्वामीचे पदीं सदा नमन ।
राहो कदापि न मळो विषयेच्छेच्या अघोर पंकिं मन ॥ १ ॥

श्रीसंतवर्य विष्णुदास कवि ऊर्फ श्री पुरुषोत्तमानंद सरस्वती स्वामीमहाराज यांचें चरित्र यथामति वर्णन केलें आहे. भर तारुण्यांत पतिनिष्ठ पत्नीचा त्याग करून ईश्वरप्राप्तीसाठीं अरण्यें, वनें धुंडाळणें, दूरदेशीं जाऊन एका साधारण बुद्धिमान जीवास गुरुत्वाचा मान लाभावा व हजारों लोकांस कृतार्थ होण्याचा बोध देतां यावा, यावरून परमात्म्यास चित्तसर्वस्व समर्पित झालें कीं, सर्व वृत्तींत परमात्म्याची सुंदर प्रतीति होते व अशी प्रतीति तयार होणें हेंच मनुष्यजन्माचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य श्रीविष्णुकवींनीं उत्तम पार पाडलें, म्हणूनच त्यांचें चरित्र लिहिण्याचा सुयोग आला आहे. प्रत्येकानें अकर्तात्मबोधावर आरूढ होऊन संसार चालविल्यास कशाचेंही उणें पडणार नाहीं, व सद्गुरुकृपे-करून सर्व मनोरथ पूर्ण होऊन अभ्युदय व निःश्रेयस हीं दोन्हीं प्राप्त होतील.

शेवटीं महाराजांचें चरणारविंदीं त्यांचा अत्यंत लाडका पुत्र प्रार्थना करीत आहे कीं, गुरुमाउली, आपलें भरतखंड पूर्वीसारखें वैभवशाली होऊन आपणा-सारखे संत घरोघर अवतीर्ण होवोत; व त्यांच्या द्वारा अखिलविश्व आनंद-मय होवो.

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥
जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ २ ॥
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥
किंबहुना सर्व सुखीं । पूर्ण होउनि तिन्हीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ ४ ॥ ज्ञानेश्वरी अ. १८ ॥

याप्रमाणें आशा पूर्ण करणार श्रीगुरुमाय समर्थ आहे.

माझा यत्किंचित् अधिकार व बुद्धि नसतां मजकडून चरित्रलेखन केलें. परंतु ‘ बोलविता धनी वेगळाचि ’ आहे आपण गुरुमाउलीनें माझ्या जिव्हाग्रीं बसून जें बोलविलें तेंच लिखित झालें आहे. ही सर्व आपलीच कृपा आहे.

वांचूनि पढे ना वाची । ना सेवाही जाणे स्वामीची ।
ऐशिया मज ग्रंथाची । योग्यता कें असे ।। १ ॥
सायिखडेयाचें बाहुलें । चालवित्या सूत्राचेनि चाले ।।
तैसा मातें दावित बोलें । स्वामी तो माझा ।। ज्ञानेश्वरी अ०१८ ।।

याप्रमाणें त्यांचेच कृपेनें जी स्फूर्ती झाली ती त्यांचेच प्रसादामुळें लिहिली

गेली. ही चरित्ररूपी श्रीगुरुमाउलीची अल्पशी सेवा सद्‍गुरुमाउलीपदीं अनन्य भावानें समर्पण करीत आहे.

शेवटीं त्यांनीं केलेलें एक उत्कृष्ट अष्टक व श्रीगुरुदासमहाराजकृत त्यांची आरती देऊन पुरें करतों.

अष्टक, श्रीरेणुकास्तव.

श्रीमातापुरवासिनी भगवती चिंतामणी शारदा ।
चिंतीतों तुज त्यासहीत नमितों श्रीसद्गुरू नारदा ॥
पावे सत्वर, श्रेष्ठ नाममहिमा जाणूनियां अ.पुळा ।
श्री अंबे जय रेणुके, जननि गे, कां राग आला तुला ॥ १ ॥
जन्मापासुनि घोर पाप अवघें म्यां ठेविलें साधुनी ।
माते ! तूंचि पतीतपावन, मला सांगीतलें साधुनीं ।
जाळी पातक यज्ञ-अग्नितनये, ही कापसाची तुला ।
श्री अंबे, जय रेणुके, जननि गे, कां राग आला तुला ॥ २ ॥
कापाया निकरें जरी निजकरें तो राम धावें गळां ।
नाहींची जिव जाहला, तरि तुझा प्रेमांतुनी वेगळां ॥
चित्तीं निर्दयता तुझ्या न उमटे, कांटे न येती फुलां ।
श्रीअंबे, जय रेणुके, जननि गे, कां राग आला तुला ॥ ३ ॥
अद्यापी मज कामक्रोध खळ हे शत्रू पहा गांजिती ।
अद्यापी तव नाम पावन कथा आभंग गंगा जि ती ॥
अद्यापी नच उष्णता प्रगटली श्रीलक्ष्मीबंधुला ।
श्रीअंबे, जय रेणुके, जननि गे, कां राग आला तुला ॥ ४ ॥
अज्ञानीं पडलों अम्ही पतितची अन्याय केले, करूं ।
टाकावें तरि कां कुपोदरिंच तें जें नायकें लेकरूं ॥
नाहीं विन्मुख जाहला रवि कधीं त्रासूनिया केतुला ।
श्रीअंबे, जय रेणुके, जननि गे, कां राग आला तुला ॥ ५ ॥
आतां योग्य नव्हे कुदोष अमुचे चित्तांमधें ठेवितां ।
केला नाहिंस कां विचार पहिला ऐसें करंटे वितां ॥
श्रेष्ठत्वासि न ये परीस शिवल्या सोन्याचिया धातुला ।
श्रीअंबे, जय रेणुके, जननि गे, कां राग आला तुला ॥ ६ ॥
हा बाई बसला कसा दगडसा दारीं ऋणाईत कीं ।
कां घाई करितो उदंडचि नसे लज्जा तृणा ईतकी ॥
ऐसेंही म्हणतां मि बाइ तुझिया या सोडिना पाउला ।
श्रीअंबे, जय रेणुके, जननि गे, कां राग आला तुला ॥ ७ ॥
तारी या व्यसनीं दिनासि अथवा मारी जगन्नायके ।

येथूनी उठ जा परी कुणिकडे हें बोलणें नायके ॥
देवो दुग्ध किं उग्र माय विषही प्यावेंचि लागे मुला ।
श्रीअंबे, जय रेणुके, जननिगे, कां राग आला तुला ॥ ८ ॥
ऐसा पातकि शंकराहि न मिळे भावार्थ यावा मना ।
नाहीं पालटलें त्रिविक्रमरुपें जें नाम तें वामना ॥
माझा त्याग करील क्षारचि तुझ्या सत्कीर्तिच्या सिंधुला ।
श्रीअंबे, जय रेणुके, जननिगे, कां राग आला तुला ॥ ९ ॥

( पुढील कडवीं उपलब्ध नाहींत ! ! )

## आरती.

( चाल–आरती ज्ञानराजा )

जयजय गुरुमूर्ती । पुरुषोत्तम सरस्वति ।
ओवाळूं महाराजा । जीव शिवात्म ज्योति ॥ जयजय० ध्रु० ॥
तुझे गुणानुवाद । गातां चारहि वेद ।
म्हणती नेति नेति । मनीं पावूनि खेद ॥ जयजय० १ ॥
आदिमध्य आणि अंत । रहित तूं अनंत ।
जाणती ब्रह्मज्ञानी । स्वानुभवीक संत ॥ जयजय० २ ॥
रेणुका आदिमाया । पदीं वाहून काया ।
स्वरूपीं लीन होसी । केलें ‘ चारित्र ’ गाया ॥ जयजय० ३ ॥
देहांतीं केली लीला । शिरिं सिंहनाद केला ।
दाविली मोक्ष–वाट । बहु आनंद झाला । जयजय० ४ ॥
विनवी ‘ गुरुदास ’ । माझें तुझ्या पदास ।
अखंड रत व्हावें । मन न हो उदास ॥ जयजय० ५ ॥

## अभंग

शेवटची विनवणी । संतजनीं परिसावीं ॥
विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हांसीं ॥
आतां फार बोलूं काय । अवघें पायां विदित ॥
तुका म्हणे पडलों पायां । करा च्छाया कृपेची ॥ १ ॥

## श्लोक.

तारो या भवसागरांत अथवा मारो करो आपदा ।
अन्याला परि जाइना शरण मी सोडूनि त्यांच्या पदा ॥
सिंहाद्रीगिरिं, रेणुकासमिप जो, गुंफेमधें राहिला ।
श्रीकृष्णा ‘ पुरुषोत्तमासि ’ अजि म्यां हा लेख अर्पीयला ॥ १ ॥

ओम् ।

**श्री सद्गुरुनाथार्पणमस्तु.**

ॐ श्रीसद्गुरु समर्थ.

# श्रीविष्णुकवींच्या काव्योदधींतील कांहीं निवडक वाग्रत्नें.

## १ ईशवंदन ( शिखरिणी. )

नमस्ते श्रीविद्याधर, गुणनिधे श्रीगणपती ।
नमस्ते वाग्देवी, विजय-वरदे श्री भगवती ।
नमस्ते श्रीदत्तात्रय, गुरुकृपाऽनंदलहरी ॥
नमस्ते श्रीनारायण, दिनदयाळा नरहरी ॥ १ ॥

---

## २ देवाजवळ मागणें ( मालिनी. )

ऋतुशिल जलवृष्टी, तुष्टिपुष्टी असों दे ।
सुखमय करि सृष्टी, दुःख दृष्टीं नसों दे ।
हरि-हर-परमेष्ठी पृष्ठिं रक्षोत मार्गें ।
जयजय जय वंदे मातरं-मातरं गे ॥ १ ॥
हरशिल भय, चिंता, संकटें, माउली ! तूं ।
करिशिल स्वकरांची सर्वदा साउली तूं ॥
म्हणवुन गुण गायी विष्णुस्वामी अभंगे ।
जयजय जय वंदे मातरं-मातरं गे ॥ २ ॥

---

## ३ भक्तीनेंच ईश्वरप्राप्ति होते.

( शिखरिणी. )

न घेवो ये नानाविध जप-तपें साधुनि करें ।
मिळे भक्तीनें श्रीपतिच म्हणती साधु निकरें ॥
निज स्कंधीं घेती, निकट बसती वानर हरी ।
नमस्ते श्री नारायण, दिन-दयाळा नरहरी ॥ १ ॥

### घनाक्षरी.

नको साधन धन कांहीं । काम स्तवनाचें नाहिं ।
तुला रेणूके बाइ । 'आइ' बोलणें पुरे ॥ १ ॥
मंत्र-तंत्रांच्या युक्ति । शास्त्र-कविता-व्युत्पत्ति ।
नव्हे भुक्ति न घड मुक्ति । तुझ्या भक्तीवांचुनी ॥ २ ॥

तुझा धुंडितां गांव । कोठें लागेना ठाव ।
म्हणुनि जपतों तुझें नांव । मला पाव रेणुके ॥ ३ ॥
करुनि दंडाकृति पृष्ठीं । पाहति मुरडुनियां दृष्टि ।
होति साधकजन कष्टी । तुझ्यासाठिं रेणुके ॥ ४ ॥
गुहा–पर्वत–नदि कांठि । तनू टांगुनि उफराटि ।
पडुनि कर्माच्या हट्टीं । करिति कोटि साधनें ॥ ५ ॥
सकल धर्मांचे बोल । काय बोलुनिया फोल ।
नये भक्तीचें मोल । ब्रह्मगोल तोलितां ॥ ६ ॥

---

**४ शरणांगति** ( दिंडी. )

अखिल पतितांची दुरितकृती केली ।
पतितपावन ही कीर्ति आयकेली ॥
म्हणुनि पडलों येउनी तुझ्या दारीं ।
लाज याची रेणुके, तुला सारी ॥ १ ॥
सर्व माझे अजि हारले उपाय ।
म्हणुनि अंबे धरियले तुझे पाय ॥
विष्णुदासासी दीनजनानि, तारी ।
लाज याची रेणुके, तुला सारी ॥ २ ॥

---

**५ माईचे सान्निध्यांत पूर्ण समाधान** ( चामर. )

पवित्र मातृ-क्षेत्र धन्य वास पुण्य–आश्रमीं ।
अंब दर्शनासि भक्त-अभक्त येति आश्रमीं ॥
म्हणुनि विष्णुदास नीज–लाभ पावला फुका ।
धर्म-अर्थ-काम-मोक्ष-कल्पवृक्ष रेणुका ॥ १ ॥

---

**६ भक्तांच्या प्रेमाचा विषय एक ईश्वरच असतो.**

**वसंततिलका.**

गेली बहीण, जननी, दिवि तेंवि तात ।
गेली वधू प्रमुख मानिलि जी हितांत ॥
ही जाहली अशि, असो, जरि सर्व हानी ।
तूं एकवेळ तरि दर्शन दे भवानी ॥ १ ॥

---

### ७ जगत्कल्याणार्थ देवाजवळ मागणें.
**वसंततिलका.**

शक्ती असो जग-हितास्तव अंगिं बाकी ।
यावीण कांहिं नलगे मजलागिं बाकी ॥
हे विष्णुदास विनवी मृगराज-यानीं ।
तूं एकवेळ तरि दर्शन दे भवानी ॥

---

### ८ सगुणांत निर्गुणानंद अथवा द्वैतांत अद्वैत.
**पद.**

कृष्ण, गोविंद, गोविंद । अवघाचि, येथें भरला ब्रह्मानंद ॥ ध्रु० ॥
जेथें तेथें गोकुळांत । द्वारीं, बाहेर देउळांत ।
जणुं तंतु । पाठीं भासे लांब-रुंद ॥ कृष्ण० १ ॥
भासे यमुनेचें पाणी । मच्छ, कच्छ, चक्रपाणी ।
वाळवंटीं । ऐलपैल कांठीं द्वंद्व ॥ कृष्ण० २ ॥
येथें कोण कोणा लक्षी । हरी झाला वृक्ष पक्षी ।
मूळ-शाखा । फळ-पुष्पांचा सुगंध ॥ कृष्ण० ३ ॥
गोपी, गोपाळ, गवळी । गाय जांभळी ढवळी ।
बहुरंग । रंगिं रंगला मुकुंद ॥ कृष्ण० ४ ॥
त्याचें बोलणें, चालणें । कृष्ण-नाम देणें घेणें ।
विष्णुदासा । मनोमनीं कृष्ण-छंद ॥ कृष्ण० ५ ॥

---

### ९ दंभनिषेध.

गुरुजी लिया मंत्र तेरा । दिल् तो भटक रहा मेरा ॥ ध्रु० ॥
अहं सोहं अजप-जपका बाजा बजत हय् कानन मों ।
नही उखाडी परनारी की । सुरत गई जो मनमों ॥ १ ॥
बहुत अंगकू बभुत लगाकर, पेहेना भगवा कपडा ।
आलक पुकारत आगे भगत है, पिछे पेटका लकडा ॥ २ ॥
बैठा शिरपर जटा बढाकर, पीवे गांजा घोटा ।
चेले जमाये जमा जमाकर, अंदर सट्टाबट्टा ॥ ३ ॥
दुनिया खातर झूटा ढोंगी, बनूगये जोगी बच्चा ।
आत्मग्यान जबलग नहि पावे, तबलग चेला कच्चा ॥ ४ ॥
विष्णुदास कहे वोही सच्चा, पूरा मुरशद कहेना ।
मेरा मुझकू रूप बतावें, आगे पकडकर आयना ॥ ५ ॥

## १० विषयानंद व योगानंद यांचें तुलनात्मक वर्णन:--

पद.

तुम्हाला पावलि जगदंबा । आम्हाला भलि लागली बाबा ॥ धृ० ॥
तुम्ही पंचामृतस्नान घालितां, उटणें लावुनि अंगा ।
अमुच्या नयनाच्या तुंब्यांतुन, वाहे झुळझुळ गं[1]गा ॥ १ ॥
तुम्ही घालतां गोठपाटल्या, बाळया-बुगडया, कंठा ।
आम्ही वाजवित उगीच बसलों; अनुहो[2]ताचा घंटा ॥ २ ॥
तुमच्या अरत्यापरत्या होती पंक्ति तुपाच्या धारी ।
बिन तेलाचा[3] दिवा लावुनी बसतों अम्ही अंधारीं ॥ ३ ॥
तुमची दक्षिणा पानसुपारी, अत्तर फ़ूल चमेली ।
अमुचि वासना वांझ[4] बायको लटकी मायच[5] मेली ॥ ४ ॥
विष्णुदास म्हणे तुम्ही तिला तरि इच्छित धन मागावें ।
आम्ही तर डोळे लावुनि पं[6]हावें । तोंड मिटु[7]नियां गावें ॥ ५ ॥

---

## ११ प्रेम-कलह. (चामर)

जो गुन्हा करी अधीक तो प्रितीस आगळा ।
मी तसा कधीं न कांहिं वाइ ! कापिला गळा ।
हाचि न्याय अनुभवासि दाखला अला मला ।
हें विहीत काय, सांग, माय रेणुके, ! तुला ॥ १ ॥
काय जन्म घातलासि, लाविलीस काळजी ।
काळजांत इंगळीच खोंचलीस काळजीं ॥
ही जराचि धाड धाडलीस खावया मला ।
हें विहीत काय, सांग, माय रेणुके ! तुला ॥ २ ॥
काय लीहिलेंसि दैविं गर्भवास सोसणें ।
काय दीधलेंसि जन्म मृत्युलागिं पोसणें ॥
काय लाविलेंस नित्य तोंड वासणें मला ।
हें विहीत काय, सांग, माय रेणुके ! तुला ॥ ३ ॥
आद्य मध्य-आवसानिं सर्व विश्व चाळसी ।

---

१ त्राटकमुद्रा करतांना नेत्रांतून पाणी येतें. २ अनुहतध्वनीचे नाद. ३ स्वयंप्रकाशमान. ४ निर्विषय, निर्फल, निष्काम, निर्ममत्व. ५ माया. ६ समाधिसुख घ्यावें. ७ मौन–साच लाटिकें दोन्हीं । बोलोनि न बोले जाहला मौनी । जो भोगितां उन्मनी । भारायनो ॥ ज्ञानेश्वरी. अ. १२।२०९.

होसि तूं तरूण, वृद्ध, बाळ खेळ खेळसी ।
विष्णुदास व्यक्त नामरूप गूण कां मला ।
हें विहीत काय, सांग, माय रेणुके ! तुला ॥ ४ ॥

---

## १२ आत्मनिवेदन ( भुंजगप्रयात. )

कधीं आपुलें दाविसी मूळ पीठ ।
मिळो ना मिळो खावया गूळ पीठ ॥
नुपेक्षी मला आदिमाये ! परंतु ।
आई रेणुके, रेणुके, रेणुके ! तूं ॥ १ ॥
तुझ्यापाशिं राहीन खाईन भाजी ।
जगामाजिं सांगेन ही माय माझी ॥
नुपेक्षी मला आदिमाये ! परंतु ।
आई रेणुके, रेणुके, रेणुके ! तूं ॥ २ ॥
बरा नाहिं कां मी धुया लूगडें हो ।
अशा पूरवावी दयाळू गडे, हो ॥
नुपेक्षी मला आदिमाये ! परंतु ।
आई रेणुके, रेणुके, रेणुके ! तूं ॥ ३ ॥
तुला प्रार्थना हीच जोडूनि पाणी ।
तुझ्या द्वारिं राहीन, वाहीन पाणी ॥
नुपेक्षी मला आदिमाये ! परंतु ।
आई रेणुके, रेणुके, रेणुके ! तूं ॥ ४ ॥
जिवाहूनि आतां करूं काय दान ।
आईनें रुसावें असा कायदा न ॥
नुपेक्षी मला आदिमाये ! परंतु ।
आई रेणुके, रेणुके, रेणुके ! तूं ॥ ५ ॥

---

## १३ प्रेमभाव.

ओंव्या ( चाल दळणाची )

आदि नमन गणपतिला । गणांसहित सरस्वतिला ।
शुभ मंगळाऽरंभ केला । ओंवी गाईन रेणुकेला ॥ धृ० ॥
तुला होइल आई नजर । तुझा मुखचंद्र नादर ।
तुझें सगुणरूप सुंदर । शोभे पिंवळा पीतांबर ॥ १ ॥
तुला पाहतां मोह करपला । जड–देहभाव हरपला ।

शुभ मंगळाऽरंभ केला । ओवी गाईन माउलिला ॥ २ ॥
नको उगि मजवर गुरगुरूं । तूं बाप, माउली, गुरू ।
मी अनाथ दिन लेंकरूं । नको माझी उपेक्षा करूं ॥ ३ ॥
धन दौलत नलगे मला । डोळे भरून पाहुं दे तुला
शुभ मंगळाऽरंभ केला । ओवी गाईन माऊलिला ॥ ४ ॥

---

## १४ वात्सल्य ( भुजंगप्रयात. )

तुझी आसती कोटि ब्रह्मांड, बाळें । तसें घेइ पोटीं मलाही दयाळे
नको दूसऱ्या गर्भवासासि धाडूं । नको रेणुके आपुलें ब्रीद सोडूं ॥ १ ॥
तुझ्या भेटिची लागली आस मोठी । परी येति हे आडवे शत्रु कोटि ॥
नको भीड त्यांची धरूं, माझि तोडूं ॥ नको० ॥ २ ॥
तुझा पुत्र हा वाटल्या तारणें हो । तुझा शत्रु हा वाटल्या मारणें हो ।
नको दूसरा याविणें खेळ मांडुं । नको० ॥ ३ ॥
अम्ही लेंकरांनीं रडावें, रुसावें । अमा देउनी त्यांचि डोळे पुसावे ।
नको कायदा हा तुझा तूंचि मोडूं ॥ नको० ॥ ४ ॥
गडे येउनी तूं कडे घे मुक्यानें । करी शांत आलिंगुनीया मुक्यानें ।
नको विष्णुदासा—प्रती तूं विभांडूं ॥ नको० ॥ ५ ॥

---

## अभंग.

आपुलिया बाळा आपुलीया करीं । मारी परि दूरी धरूं नको ॥ धृ० ॥
आपुलीया हातें कांपावी ही मान । जगांत अपमान करूं नको ॥
श्वानापरी ठेवी आपुल्या संग्रहीं । परी परगृहीं धाडूं नको ॥
वाढवावें प्रेम पुरवावें कोड । ममतेचा मोड मोडूं नको ॥
भवनदीमाजीं चाललों वाहात । आतां मागें हात काढूं नको ॥
विष्णुदास म्हणे अगे जगन्नाथे । जननीचें नातें सोडूं नको ॥ १ ॥

---

## १५ भेटीसाठीं उत्सुकता.

### पद ( चाल—विनंती करुनि चित्त वळवा )

रेणुके मजला मुळ धाडी । आतां या दुःखांतुन काढी ॥ धृ० ॥
तुझ्याविण मी तिळ—तिळ तुटतें । कठिण दिन काटयावर कठतें ।
भेटिच्या साठीं उरिं फुटतें । पडेना चैन मला कुठं तें ॥
निरोधुनि मन, डोळे मिटतें । घडोघडिं दचकुन परि उठतें ।

पडलें भव चिंतेच्या रहाडी । आतां या० ॥ १ ॥
पती येउं देइना शेजारीं । फजिती करितो बाजारीं ॥
सवतिनें गांजियलें भारी । ऐकिलें असशिल परभारीं ॥
मंडळी सासरची सारी । मला सुख देति न संसारीं ॥
अडकलें मेल्यांचे दाढीं । आतां० ॥ २ ॥
भेटतां भार्गवरामासी । पावतिल प्राण आरामासी ॥
जोगवा मागिन सुखवासी । अथवा राहिन उपवासी ।
परि मी येइन तुजपाशीं । वांचवी अथवा दे फांसी ।
वल्कलें अथवा दे साडी । आतां० ॥ ३ ॥
वाटते लटकी कां घाई । नव्हे ही लटकी कां घाई ॥
धाडिते सांगुनि सुचना ही । उपेक्षा करणें बरें नाहीं ॥
खचित मी बाई, तुझ्यापायीं । टाकितें उडि गंगा--डोहीं ॥
पडो या जगण्यावर धाडी । आतां० ॥ ४ ॥
शुभासनिं आश्विन मासाची । स्थापना घटि नव दिवसांची ।
विलोकिन यात्रा वर्षाची । तोरणें येतिल नवसाची ॥
परम दिनदयाळ तूं साची । माउली विष्णुदासाची ।
वसशी मृगराजाचल पहाडीं । आतां या दुःखांतुनि काढी ॥ ५ ॥

---

## १६ आत्मतृप्तीचे उद्गार.

जिव जावो वा राहो परंतु नाम तुझें दृढ धरूं ।
विष्णुदास म्हणें स्वयें उद्धरुनि आणिकांते उद्धरूं ॥ १ ॥

---

ॐ श्रीसद्गुरुसमर्थ.

# श्रीविष्णुकविकृत अप्रकाशित कविता.

## परिशिष्ट २ रें.

### श्लोक. वसंततिलका.

श्री पुण्यक्षेत्रस्थळ माहुर एकवीरे । तीर्थोदकीं दुरितपंक अनेक वीरे ।
श्री रेणुके ! विमळ दावि, पदारविंदे । नारायणी जय जगज्जननी अनंदे ॥ १ ॥
आमंत्रितों तुज मि कुंकुम अक्षतांनीं । ये माझिया हृदय-मंदिरिं मोक्षदानी ।
माते तुझे विभव मंडप शोभिवंत । देतात मान गरिबांप्रति भाग्यवंत ॥ २ ॥
माझीहि माय जशि तूं अवघ्या दिनांची । लाऊन घेशि उगि कां उपनाधि नांची[1]
देती सहस्त्रवदनादिक वेद ग्वाही । देणार नाहिं स्वपुता[2] जननी दगा ही ॥ ३ ॥
अंबे तुलाचि म्हणतात, दिनाचि आई । सांभाळ वेद श्रुतिच्या वचनासि बाई[3] !॥
नाहीं मि दीन जननी अशि मात्र वाणी । काढूनिया करुं नको करुणेसि वाणी
जीवाचि जीवनकळा अई रेणुका तूं । कापव्यकापुरुष नको अणुरेणु कातू ॥
निंदेसि[4] पात्र करिसी मुळ कां कवीला । मुंगे टपून असती गुळ-काकवीला ॥५॥
आनंत नामिं गुणिलें, गुण गायकांनीं । मीही म्हणून करितों गुणगूण कानीं ॥
झेपे गरूड गगनीं निज आवसानें । आम्हीं स्वपक्ष असतां उगि कां बसावें ६
मोठयावरीच बहुधा अईनें रुसावें । अंकीं लहान मुल घेउनिया बसावें ॥
मोठें पहात बसलें दुर यद्यपी तें । मांडीवरीच लघु बालक दुग्ध पीतें ॥ ७ ॥
ते पोहणार बुडती एकदां उडाणीं । नौकेमधींच बसुनी तरती अडाणी ॥
ज्ञानाभिमान धरुनी फसतो शहाणा । अंबे तुझ्या सतत मीं वहातों वहाणा ८
आसून ज्ञान खळग्यामधिं कां पडावें । मूर्खानं ग्रंथ इतके तरि कां पढावे ॥
मौनेंचि मीन गिळितो बगळा झऱ्यांत । बोलोनि गोड पडतो शुक पिंजऱ्यांत९
देणें रुकारचि पडे शरणांगतीला । ठेवी स्वदास दगडापरि संगतीला ॥
लावून पायरिं करी चउकोनि टाकी । खाऊनि तांबुल, वरीच थुंकून टाकी १०
हेवा नसे तिळभरी ध्रुवचांदणीचा । श्री रेणुके ! तरि करी तरु अंगणींचा ॥

---

१ नाहीं नाहीं म्हणण्याची व्याधी. २ स्वतःच्या मुलास. ३ कमनाई. ४ तूं कृपाळुपणानें वागावेंस. निष्ठुरपणानें वागशील तर आमचेकडून तुझी निंदा होईल. निंदा किंवा स्तवन करणें हें आमचें काम आहे. मुंगळे गुळास जसे टपून बसतात तसे आम्ही असतों, यासाठीं आमचें मुखांतून निंदाक्षरें निघूंच नयेत अशी तूं ऐस.

राहूं उभेचि न हसूंहि कुठें न हालूं । डोळूं सदोदित परी तुजसी न बोलूं ११
किंवा सदैव आपुल्या बसवी समोर । माते करून अदरें शुक-हंस-मोर ॥
किंवा पशूपरि तरी गृहिं माय पोसें । देहांतरीं सहज होइल पायपोस ॥ १२ ॥
देतालदान श्रमलीस विशाळवाणी । सोडूनि सत्रि वसलीस खुशाल वाणी ॥
हाका अशा मि जगतांमधिं मारुं कां न । डाकाचि लक्षुमिगृहीं पडला रुका न१३
पाळूनि आधि सदनांतरिं पांखराला । नेऊनि माय ढकलूं नये आखराला ॥
जाता न घेतिल अतां अरणांत ऽजाति । आधेमधेचि तनुही कुरणांत जाती१४
कीं द्यावयासि बळि आणुनि बोकडाला । या टेंविलेसि दृढ बांधुनि लांकडाला ॥
अंबे अनाथ वृक व्याघ्र बळी नहो मीं । तत्रापि ब्रह्मबिज हें तुं बळीं न होमी
बाई तुला कशि न ये किव माणसाची । जाताति प्राण निघुनी तुझि आण साची
मी दीनवाणि रडतां तुज सौख्य वाटे । मारूं नकोचि दुखतील तुझे खवांटे१६
कां हो तुझें प्रगट नाम न ये गुणाला । याची असे निरट लाज तरी कुणाला ॥
त्वां सोडिल्या सुपथ हा जननीपणाचा । श्री रेणुके ! खचितची मग मी कुणाचा ।
नामामृतासि दुसरें रस साधनांचें । कां इच्छितेस गण हे नवसा धनाचे ॥
त्वां सोडिल्या सुपथ हा जननीपणाचा । श्री रेणुके ! खचितची० ॥ १८ ॥
तूं शाहणी चतुर लक्षणि सद्गुणाची । जाणोनि सर्व अमुच्या मनिंच्या खुणाचि
त्वां सोडिल्या सुपथ हा जननीपणाचा । श्री रेणुके ! खचितची० ॥ १९ ॥
माते स्वगर्भि नव्हतां नवमास लाहो । त्वां दाविला स्तनरसें नव मासला हो ॥
लागून गेलि सुरुची अधरास आई । आतां तुझ्या धरिन कीं पदरास बाई २०
हे काम क्रोध मद मत्सर लांडगे हो । निष्ठूर फोडिति हडें खळ दांडगेहो ॥
होते अतीशय मला यमयातना ही । आशा तुझी म्हणुन कीं, जिव जात नाहीं२१
विकल्पनाहि फिरवी जिव गर्गराचि । दुर्वासनाहि तनु चावित कर्कराचि ॥
होते अतीशय मला यम यातना ही । आशा तुझी म्हणुन कीं, जिव जात नाहीं२२
आली जरा झरझरा हलवीत मुंडी । घालील ही अवदसा मृति-होमकुंडीं ॥
होते अतीशय मला यमयातना हो । आशा तुझी म्हणुन कीं, जिव जात नाहीं२३
हे काळदूत कसतीच कसूनि पाशीं । ते जेवला न म्हणती अथवा उपाशीं ॥
होते अतीशय मला यमयातना ही । आशा तुझी म्हणुन कीं, जीव जात नाहीं२४
ऐसाचि दुःसह सदा दुरवास राहो । त्वां सांडिलें म्हणुनिया दुर वासरा हो ॥
सोडोनि लोभ पडलीस आइच्या सदावी । त्याची जगीं दुरदशा किति हो वदावी
तो सार्वभौम नृपश्रेष्ठचि पुंडलीक । आसोत अन्य असतीलचि मांडलीक ॥

---

५ पोषण कर. १ दरोडा. २ पै. ३ गांवाबाहेर, अरण्यांत. ऽ जातिविशेष. ४मसणत
५ यूपस्तंभ. ६ मी दीन आहे. ७ होमांत भस्म करूं नको. ८ खांदे. ९ ध्यास.

मातेसि पाठ हरिलाहि न मुख दावी । मातेचि त्यासि ममता किति हो वदावी ॥२६
शापेंचि पर्तलि दया सतिची पतीला । संतापशांतक दिला उपशाप तीला ॥
झाली शिळा मुखकळा परि हास्य दावी । श्री राघवीं प्रिति तिची किति हो वदावी ॥
पार्थासि कामिनि निशा उठली कुभद्रा । तो कामतात बदली बनली सुभद्रा ॥
मुद्रा हिरोनि मग त्या सखयासि दावी । भक्ताचि प्रीति हरिला किति हो वदावी॥
अंकीं शिरें स्वरिपुनीं जरि स्थापियेलीं । त्यानें धरोनि कशि चर्चर कापियेलीं ।
सद्धर्मताचि मधुकैटभिं थोर दावी । निष्ठूरता हरिचि ही किति हो वदावी॥२९॥
एकॉन माय वधिली निजशस्त्र हातें । बॉ दूसऱ्यांन वधिलाचि अशस्त्र घातें ॥
मातापित्यासि तिसरा प्रतिबंध दावी । निष्ठूरता हरिचि ही किति हो वदावी॥३०
जी उठवी विरथ बालक थापटोनी । तोडी रथीं त्रिकुट ताल कथा पटोनी ॥
जी विश्वरूप पट त्या रणरंगिं दावी । अंबे गितेचि महिमा किति हो वदावी ३१
अंबे गिता हि हृदयांतरिं सांठवावी । अंबे गितेचि जननी मनिं आठवावी ॥
पार्थासि कृष्ण गुढ हा जयलाभ दावी । अंबे तुझीहि महिमा किति हो वदावी३२
अंबे तुझोंचि स्वपुंते शिर कापलेलें । किंचीत मात्र न दिसेचि संतापलेलें ॥
जें कां अनंदमय, वैभव भात्र दावी । अंबे तुझीहि महिमा कितिहो वदावी ३३
टाकूनियां तुं हृदयस्थित माउलीला । कां पाहतोसि जगतांतिल माउलीला ॥
कारे असा तरि मना पडलासि दावीं । मूर्खा तुझी मुढदशा कितिहो वदावी ३४
तूं एक काम करितां करिती अनंत । तूं दोन काम करितां करिसी अनर्थ ॥
तूं एक नाम जप टाकुनि सर्वधर्म[११] । तारील नामाचि तुला श्रुतिसार वर्म ॥३५॥

---

१ पुंडलीक मातृसेवेंत निमग्न असतां त्यास वर देण्यासाठीं प्रत्यक्ष श्रीविष्णु त्याचे संनिध आले, परंतु त्यानें मातेकडे पाठ फिरवून विष्णूकडे मुख केलें नाहीं. एवढी त्याची मातृभक्ति थोर होती. २ अहल्येची. ३ गौतमाला. ४ रामदर्शन होईल या उःशापामुळें तिला आनंद झाला त्याचें व्यक्त रूप तिचें शिलावस्थेंतही हास्यमुख होतें. ५ मधुकैटभ दैत्यांनीं विष्णूच्या मांडीवर मस्तकें ठेविलीं, व विष्णूनें तीं कापलीं ( शत्रू होते तथापि मांडीवर मान ठेवलेल्यांचीं मस्तकें कापणें हा निष्ठुरपणाच आहे. ) ६ परशुरामानें. ७ बाप. ४ श्रीरामानें. ८ श्रीकृष्ण. ९ मोहग्रस्त होऊन रथाखालीं उतरलेल्या अर्जुनास उत्तम बोध सांगितला व विश्वरूप दाखवून त्यास शोक–मोहापासून मुक्त होतां आलें, त्या गीतेची महिमा किती वर्णन करावी ? १० गीताश्रवणानंतर कृष्णांनीं अर्जुनास विजयप्राप्ती करितां जगदंबेची स्तुति करण्यास सांगितली. तेव्हां अंबे तूंच जगज्जननी आहेस. तुझा महिमा वर्णन करणें अशक्य आहे. ११ सर्वधर्मान्-परित्यज्य मामेकं शरणंव्रज " एका माते शरण ये सर्व धर्मासि टाकुनी " म्हणजे ' मोक्ष-यिष्यामि मा शुच ' तुला स्वानंदाची प्राप्ति होईल. हें एक कर्म असतां तूं व्यर्थ भ्रमून द्वैताचें चिंतन करतोस त्यामुळें अनर्थ होत आहेत.

कां धांवतोसि तुं तिच्या उगि पाठिमागे । ये आपुल्याचि सदनीं फिर पाठिमागें॥
नानाकृती न गवसे बहु चंचलाची । नामेंचि साउलि धरी निज अंचळाची३६
येथून प्रार्थुन तुला नमितों शुभांगे । येथेंचि ये तु अळशावर माय गंगे ।
तेथें नयेचि तरि कां म्हणतों असा मीं । श्री रेणुकेचि परस्वाधिन मी असामी॥
श्रीविठ्ठलासि म्हणती जननी विठाई । कीं यावयासि करुणाघन शीघ्र ठाईं ॥
वाटेल वाइट विटेलचि चोखटाई । काढील माय अमुची म्हणतां खटाई ॥३८॥
पुत्रासि आणि पितयासि सदा अबोला । ऐशासि काय तरि ठेउनि स्नेह बोला !
सारंगपाणि-प्रभु तो, सुत पंचबाणी । दोघे विनाश करिताति प्रपंचबाणी ॥३९॥
श्री क्षीरसिंधु परि त्याहि रमा-पित्याला । संगोपितां कधिं नयेचि अमा पित्याला॥
तूं माउली मुळपिठाचि भली पिठाई । कां दूर घोटुं[4] त्यजुनी अयती मिठाई ॥
येथेंचि माझि धनलक्षुमि मोक्षकासी । कां तोडुं जोडुं परोक्ष परोक्ष काशी ॥
क्षेत्रज्ञ क्षेत्र क्षर अक्षर सत्रसाक्षी । श्रीरेणुका जननि सुंदर सारसाक्षी ॥ ४१ ॥
नाहीं दया अलि बया तुजसारखीला । येईल काय सखये दुसऱ्या सखीला ॥
द्वारीं तुझ्याचि मरणें निरधार केला । जाणार नाहिं तुज सोडुनि द्वारकेला ॥४२॥
घात्या तुला निजसुता परि लोक सारे । शत्रूपरी मिच परी गमलों कसा रे ॥
आइ लेंकराचि ममता कशि तोडितोशी । पापाचि जोडि अजुनी किति जोडि-
तोसी ॥ ४३
शत्रू मला छळिति तूं नसतीस जेव्हां । येतां गृहीं मग तुला दिसती न तेव्हां ॥
आतांचि तूं मग पुन्हां जुपतीं कबाडीं । माझीं समग्र तुजला दिसते लबाडी॥४४॥
जाऊं नको गरुडपक्षिणि माय कोठें । हे काळ-व्याळ, खळ धुंडिति कोटि कोटे ॥
ठेवीत जाइ सहसा अपुल्यासवेंची । लागेल स्वर्ग उडणें मजही सवेंचि ॥४५॥
माते समर्पिलि तुलाहि सुवर्णकंठी । देणें पडेल मजलाहि सुवर्णकंठी ।
घेणें प्रशस्त न गमे अनुमानिकाला । त्वां भेटिअंतिं करणें अवघा निकाला ॥
देऊं नको क्षिरपुरी वट कोरडेची । ठेवूनि लोभ करि भाषण कोरडेंचि ॥
या पायि बाइ रड हा सुटतो रड्याचा । ऐकून घोष घन कंकणतोरड्याचा ४७
लावण्य श्री प्रगटली गृहिं राजसा हो । दे कोंदणी जंव समग्र हिरा जसा हो ॥
जो होय इंद्र भजतां पदपंकजासी । तो येतसे न भजतां पद रंक जासी ॥४८॥
नेत्राश्रुचें दिनमुखें अवरोनि पाणी । अंबे विनंति कारितों पसरूनि पाणी ॥
दे कीर्तनामृत सदा-रस याचकां हो । माझ्याचि पात्रिं करतीस प्रपंच कां हो॥४९॥
माझ्याहि मान्य करणें आई गायनाला । गंगोदकीं मिसळल्या तयिं काय नाला ॥
कार्यांत कारण असें अवलंबनाचें । बिंबाचि सोय धरुनी प्रतिबिंब नाचे ॥५०॥

---

१ पदराची. २ भागीरथीस प्रार्थना. ३ तुला माय म्हणतांच आमचा खटपणा राहत नाहीं. ४ घोटित बसूं, अटवीत बसूं. ५ पक्ष्यांचीं घरें- कोटरें=कोठीं.

दैवें दिलें धरुनिया दरवेशिणीला । झालों अखंड अधि सादर वेसणीला ॥
सूत्रीं इच्या गवसलों मुढ माकडें हो। खांद्यावरी शिरिं बसूं अथवा कडे हो ५१
आतां न बोलुं तरि अक्षरही चकार। आल्या पुढेंचि भवबंधन मोचकार ॥
सूज्ञांसि गोष्टि करणें बहुशा कशाला । सूर्यापुढ मिरविणें शतशा मशाला ॥५२॥
तोंडींच नामरस अमृतवल्लि पोटीं । जीच्या फळोंफळिं अनंत ब्रह्मांड कोटीं ॥
साक्षात मूळपिठ-वासिनि-रेणुका ही। कांक्षा नकाचि नर हो मनिं आणुं कांहीं ५३
हे बोबडे परि उणे गमती न बोल । आईच दाटुनि म्हणे गमतीनं बोल ॥
कौतूक मानि मुखि लाउनि अंगुलीला । जी वर्णवीच अरुणापरि पंगुलीला ५४
केली स्तुती जननि आजि यथामतीनं । दे भेट माय क्षण लोचन थामती न ॥
त्या द्रौपदीचि, विदुराचि कणीच भाजी । घे ही सुपारि भरडी चिकणीच माझी
झाला अनंद शुभ-मंगल पाडव्याला । आनंदिचा सकळ जंगल पाड-व्याला ॥
आलीं वसंततिलका लतिका मोहोरा। आई त्वरीत इकडे फिरवी मोहोरा ॥५६॥
संभावना पुजन भोजन दक्षिणाही । सूवर्ण-पत्र-फल पुष्प, प्रदक्षिणा ही ॥
श्री रेणुकेप्रतिं समर्पुनि विष्णुदास । जोडोनि हात प्रितिच्या धुपवी उदास ॥५७॥

---

## आर्या

ये जगदंबे धांवत टाकुन मागें करील पवेन मनां ।
म्हणतिल सुर त्वत्पदां या आयोग्याचि किंर्करा लेपव नमनां ॥ १ ॥
या संकटिं ये पायीं, बाइ ! तुजवीण प्राण तळमळती ।
वंदुनि नयनाश्रूनें प्रक्षालिन जरि स्वपादतळ मळती ॥ २ ॥
जातें नयनाश्रूजळ माते ! तव अवक्रपादशे वाया ।
मज सन्मुख जगदंबे ! करि यास्तव अवक्रपाद सेवाया ॥ ३ ॥
नाहीं तसाऽपराधी भार्गवसा मी तपीळ पद राशी ।
यास्तव अंबे बसलों बळकट घालीत पीळ पदरासी ॥ ४ ॥
अइ ! तुजसाठीं गुरुची जपतों जपमालिका मि नावडती ।
जैशी वश्य कराया निजपतिला भजति कामिं नावडती ॥ ५ ॥
श्रीमंतकामिं गुंतुन विसराशि गरिबाचि लाज राखाया ।
ताटापुढेंचि बसल्या मिळतें उच्छिष्ट मांजरा खाया ॥ ६ ॥
आई बाई म्हणतां गोष्ट कधीं एक ही न आयकसी ।
झालिस कां ? जगदंबे, अगदींच अशि प्रेमहीन आइ कशी ॥ ७ ॥

---

१ भयंकर २ वारा ३ मन ४ चाकराला ५ लपवून घे ६ नमस्कारानें ७ पायाचे तळवे ८ सरळ पाय.

तुज चिंतितांचि चित्ता चिंता पाठीसि लाविली सगळी ।
मी तरि कशास घालूं ऐशा निष्ठूर माउलीस गळीं ॥ ८ ॥
अंबे ! वधूहि वधलिस, केलिस तनु नागवी प्रपंचांत ।
आतां तव नामें हा मागतसे भीक विप्र पंचांत ॥ ९ ॥
त्वां जरि बहुविधचिंता–संकट-दुःखेंहि दाविलीस मज ।
तरि मी शरण कुणाला नाहीं जाणार माउली समज ॥ १० ॥
सोडुनि कल्पलता ही आतां कोठें मि जाउं दैवारे ।
ह्मणताति संत येथें सद्भाग्याचें सदा उदयवारे ॥ ११ ॥
पाय तुझे पाहूं दे जोंवरि आहेत प्राण देहांत ।
बुडतों भवसागरिं या काढ तुला माझि आण, दे हात ॥ १२ ॥
जिव-धन क्षयकर्त्याची काय करावी सुपाकशाला हो ।
घातक चिंतामणिची मात्रा वैद्याचि त्या क्शाला हो ॥ १३ ॥
भार्गवरामाधिक म्यां मोठा अपराध काय केला हो ।
पापी म्हणूनि धरिला चित्तिं तुझा माय रेणुके लाहो ॥ १४ ॥
छळितो मला अहाहा हा आहंकार काय हानिकर ।
उचित तुला जगदंबे ! मजवरती सांग काय हा निकर ॥ १५ ॥
कविता करितां थकलों घे ही दौत लेखणी कागद गे ।
दे दर्शन जगदंबे ! देशी मजला बहूत कां ग दगे ॥ १६ ॥
सुखसंवादे पुण्यश्लोकाच्या मूळपीठ नायकिला ।
वाटें पापिष्ठाचा जातो लघुशब्द नीट नायकिला ॥ १७ ॥
भेटि न देतां मुक्ती देशिल अंबे परी सवंगानें ।
किमयागार पुटाविण काय करावा परीस वंगानें ॥ १८ ॥
अंबे ! तुलाचि गावें, बोलावें तुजसि या सुखापरतें ।
सूवर्णामृतभोजन हें यापुढ तुच्छ मोक्ष खापर तें ॥ १९ ॥
करुनि वधावा दुर्गे त्वां आहंकार हा उपायशतें ।
महिषासुरमर्दनिं जें सत्यचि मानिन तुझें कृपा यश तें ॥ २० ॥
दुर्वासनाहि गादवि दंडी ती दुर हाणिती उदंडचि हो ।
त्यांते हि न मानी मग मी तों दुर्बळ मुळीं अदंडचि हो ॥ २१ ॥
मद-रानडुक्कराची टक्कर सोसावयास मुसकल कीं ।
त्यांतुन त्या खवळीतो लाउनि हा अधिक दुष्ट फुस कलकी ॥ २२ ॥
चंद्रापरी क्षमेची शोभवि तप लक्ष्मी क्षमाशीला ।
यास्तव अवक्षमेच्या वारावे तूं अभक्ष माशीला ॥ २३ ॥

---

१ छंद.

किति विनवूं जगदंबे ! करुणा तुज कांहिं यावयासाठीं ।
पहा भर उमर खचली आलि जरा बाइ या वया साठीं ॥ २४ ॥
आनंदीच्या सदनीं कल्पलता–द्रुम अराम अमराई ।
अक्षयिं अनंद तेथें येईना यम हराम अमराई ॥ २५ ॥
मज माझ्या आइकडे मजवर ममता असोन सोन्याची ।
साजणि काय करावी माय परावी असोन सोन्याची ॥ २६ ॥
मोठी उदार अंबा–बाई श्रुति जी वदे उदारांत ।
ती तूं कृपणचि झालिस, काय तुझ्या जीव देउं दारांत ॥ २७ ॥
पडला सुर-नंदिनिच्या आज दुधाचा घरांत तोटा कीं ? ।
जो रोष दोष योगचि करुणेच्या सागरांत तो टाकी ॥ २८ ॥
तूजपुढें मि म्हणेना मोक्षाचें राजतकत कधिं नामी ।
सुंदर रुप हें पाहिन गाइन नाचिन तक्तक् धिन्ना मी ॥ २९ ॥
तूं जगदंबे अपुली मजला वर भक्ति दे वरायास ।
तुज ऐसी माय नसे जागीं दुसऱ्या शक्ति देवरायास ॥ ३० ॥
अपवर्ण संकराची धड हिंदी ही न पारशी कविता ।
करितां उगें न राहे हें मन मतिहीन फार शिकवीतां ॥ ३१ ॥
तरि काय जाणुंजाणें मायेची माय मावशी मामी ।
तूं माय रेणुके मज मायेची माय मावशी मामी ॥ ३२ ॥
तूं दीनजननि म्हणुनी करितों मी इतकि दीन काकुलती ।
त्वां लाविलीस हृदयीं चिंतेची रात्रदीन कां कुलेती ॥ ३३ ॥
कां मज सताविसी तूं दीनाची माय होनें दीनाला ।
घालुनि पोटीं होटीं नीवडल्या काय हो नदी नाला ॥ ३४ ॥
तूंही तशीच मीही आलों आहों जसा तसा गांवा ।
हा अपमान मुखानें काय तरी मानवांत सांगावा ॥ ३५ ॥
अंबे भेटीवांचुनि जाऊ येथूनि काय माघारी ।
क्षुधितचि गगनीं जाती येती बघतां न चंद्रमा घारी ॥ ३६ ॥
माते ! कळेल तिकडे जातों परि पाय एकदां दावी ।
काय करूं गे पडला बाप विधाता सदा कदा दावी ॥ ३७ ॥
परि माय लेंकराचा लागुं नये वाद अन्य कानातें ।
तूं दिनजननी मी दिन आहे अर्थात न्यून कां नातें ॥ ३८ ॥
अळ काढिल्या अईनें घ्यावी मग कां न मुरड लेकानें ।
दुर्व्यसनांचे अगोदर शिक्षेस्तव कां न मुरडले कान ॥ ३९ ॥

---

२ कामधेनूच्या. १ राजसिंहासन, २ कोलती = विस्तु ३ होऊन–असून. ४ डाही.

शरणांगतासि अंबे ! दे तव सन्मान कायदा साचा ।
विष्णूदास म्हणे या धरसि न अभिमान काय दासाचा ॥ ४० ॥

———

## कामदा.

जय नमोस्तुते श्री नमोस्तुते । आदि नमोस्तुते प्रार्थितों तुतें ।
जननि देशि कीं । लक्ष ईकडे । खचित रेणुके ! सांग येवढें ॥ १ ॥
अदि भवोद्भवे विश्वनायके । तुज अनंत आनंत बाळकें ।
तरि तयांत कां मीच नावडे । खचित रेणुके ! सांग येवढें ॥ २ ॥
बहुत वाढ संसार व्यापसा । कुथसि कां मला द्यावया पसा ।
तुज त्यजून जावें कुणीकडे । खचित रेणुके० ॥ ३ ॥
दुध दिल्या क्षुधाकाळिं मांजरा । तुजसि येइना काळिमा जरा ।
समिप पाळिल्या काय बीघडे ? । खचित रेणुके० ॥ ४ ॥
म्हणसि तूं मला माझें लेकरुं । अशि वशीकृती काय मी करूं ।
चटक चाटकें चूटकें कुडें । खचित रेणुके० ॥ ५ ॥
बहुत असति गे लेकुरें तुला । परि तुं एकची माउली मला ।
समचि तोलिसी कां न पारडें । खचित रेणुके० ॥ ६ ॥
नवसिं द्रव्य घेऊन पावशी । तरि अह्मां कशी गे निभाविशी ।
बधिर दूबळे अंध लंगडे । खचित रेणुके ॥ ७ ॥
कटक कुंडलें गोफ साखळ्या । हार तुरे हिरे जाइच्या कळ्या ।
कुठुन मीं अणूं उंच लूगडें । खचित रेणुके० ॥ ८ ॥
असं सताविशी कां ग लेंकुरा । अडुनि मागसी तूप शर्करा ।
वरण भात पोळ्या कढी वडे । खचित रेणुके० ॥ ९ ॥
जडित दागिने घालिसी नवे । भुषण आइचें हें नव्हे नव्हे ।
मनिं विचारुनी तूंचि रोकडें । खचित रेणुके० ॥ १० ॥
पतित मी असे थोर पातकी । म्हणूनि प्रार्थना बाइ ! ईतकी ।
कठिण हें तुला काय साकडें । खचित रेणुके० ॥ ११ ॥
जननिची कृती चित्तिं नाठवे । अळसलीस कीं काय नूठवे ।
दिनदयाळ कीं ब्रीद नावडे । खचित रेणुके० ॥ १२ ॥
भगवती मला कां न तारिसी । शरण आलिया काय मारिसी ।
तव कृपांबुधी खंड कां पडे । खचित रेणुके० ॥ १३ ॥
अधिच कापितो शत्रु हा गळा । करिसि तूंहि कां कोप आगळा ।
वधिसि पाळुनी जेंवि शेरडें । खचित रेणुके० ॥ १४ ॥

जरि असाहि त्वां अंत पाहिला । तरि तुलाचि म्यां देह वाहिला ।
ढकलिसि मला कां पलीकडे । खचित रेणुके० ॥ १५ ॥
बहिण बाप तूं माय मावशी । सुशिल नाम हें कां गमाविशी ।
किंव कशी नये ऐकुनी रडे । खचित रेणुके० ॥ १६ ॥
बहिण द्रौपदी सचिरांबरें । स्वकरिं झाकिली श्रीपितांबरें ।
मजसि ठेविसी काय ऊघडें । खचित रेणुके० ॥ १७ ॥
खुटलि वाटची वाट पाहतां । अटलि शाइही पत्र लीहितां ।
करुं वृथा किती तोंड कोरडें । खचित रेणुके० ॥ १८ ॥
काधिं उठोनि कैवारे चालसी । काधिं बसूनि सन्नीध बोलसी ।
काधिं रडें तरी लाविसी कडे । खचित रेणुके० ॥ १९ ॥
विषयव्याळ जंजाळ सोसेना । जळुनि जाइना द्वाड वासना ।
काधिं कुबुद्धिचें काढिसी मढें । खचित रेणुके० ॥ २० ॥
बघु न देति श्रीमूख रेखडें । स्वरिपु लोचनीं घालिती खडे ।
परि तुला कसें चैनची पडे । खचित रेणुके० ॥ २१ ॥
मजवरीच गे प्रेम थोड का । परशुरामची काय लाडका ।
भवधि तो तरे काय मी बुडे । खचित रेणुके० ॥ २२ ॥
चतुर तूं गुणाचि आई कशी । वचन एवढें कां न ऐकशी ।
करुं गती कशी मीं तुझ्यापुढें । खचित रेणुके० ॥ २३ ॥
उगिच कामदा वृत्त वांचणें । तव कृपेविना व्यर्थ वांचणें ।
पिकुन काय एरंड लांकडें । खचित रेणुके० ॥ २४ ॥
स्तुतीच ऐकुनी या कृपा करा । प्रियचि मानुनी भाजिभाकरी ।
जशि दशीन्त्र चंद्रा स्पृहा चढे । खचित रेणुके० ॥ २५ ॥
तुझि स्तुतीच तूं विश्वनायके । तुंचि वदोनियां तूंचि आयके ।
मज कशासि आढयत्व एवढें । खचित रेणुके० ॥ २६ ॥
कर धरूनि चाळून चालवीं । अपण बोलुनी बाळ बोलवीं ।
नवल मानुनी घेतसे पुढें । खचित रेणुके० ॥ २७ ॥
भुजगभावना जों नुठेचि ती । आइ लुचाडिचे तोंड ठेचिती ।
शिशुसि धांवुनी घेतसे कडे । खचित रेणुके० ॥ २८ ॥
करिंच ब्रह्म येईल धुंडितां । आइ नये तुझें रीण फेडितां ।
पदनतासि देतांहि चामडें । खचित रेणुके० ॥ २९ ॥
किति किती तुझे गूण आठवूं । किति किती कृपामृत साठवूं ।
किति किती गुणूं गूण आकडे । खचित रेणुके० ॥ ३० ॥
मिठ मिरें दहीं भात रायतें । वदनिं घालिसी ग्रास आयते ।

अवाडि ठेविसी टोपि अंगडें । खचित रेणुके० ॥ ३१ ॥
तुंचि ऋणी ऋणांतूनि काढिसी । जनन मृत्युचे पाश तोडिसी ।
समुळ शत्रुचे पाडसी हुडे ॥ खचित रेणुके० ॥ ३२ ॥
शशिकले तुझें सत्य लेंकरूं । अमृत प्राशुनी पथ्य कां करूं ।
अवडतें न कां भक्षुं वावडें । खचित रेणुके० ॥ ३३ ॥
सुरभिची अली तोंडिं कास या । करुं मनोरथीं वाणि कासया ।
विषयभूमि कां चाटुं पोपडे । खचित रेणुके० ॥ ३४ ॥
पदतळांबिज जो रंग लालसा । नयनिं तो पहायाचि लालसा ।
काधिं तरी असें दैव ऊघडें । खचित रेणुके० ॥ ३५ ॥
काधिं धरून अद्वैत भावना । सम बघेन ब्रह्मांडभूवना ।
काधिं तरी असें दैव ऊघडें । खचित रेणुके० ॥ ३६ ॥
काधिं टळोनि जाईल मीपणा । काधिं दिसेन मी मीच आपणा ।
काधिं तरी असें दैव ऊघडें । खचित रेणुके० ॥ ३७ ॥
काधिं निराशनीं निंब वर्पुनी । कधिं अशाहि टाकीन कर्पुनी ।
काधिं तरी असें दैव ऊघडे । खचित रेणुके० ॥ ३८ ॥
काधिं उपाधि होतील या मना । कधिं अरोग्य वाटेल या मना ।
कधिं तरी असें दैव ऊघडे । खचित रेणुके० ॥ ३९ ॥
जिव रथस्थ मी नरतनूरथीं । आइ तूं होइ सद्बुद्धि सारथी ।
काधिं तरी असें दैव ऊघडे । खचित रेणुके० ॥ ४० ॥
मनचतुष्ट वाग्दोर घे करीं । फिरवि अश्व इंद्रीयसंगरीं ।
काधिं तरी असें दैव ऊघडे । खचित रेणुके० ॥ ४१ ॥
वचकलों भ्रमें शत्रु भंगितां । भ्रम हरीतसे बोधुनी गिता ।
काधिं तरी असें दैव ऊघडे । खचित रेणुके० ॥ ४२ ॥
विजय वीजया बाणिं देउनी । बसवि आत्म स्वस्थानिं नेउनी ।
कधिं तरी असें दैव ऊघडे । खचित रेणुके० ॥ ४३ ॥
बहुत बोलणें कोण कोणचें । परत मिष्ट पक्वान्नि लोणचें ।
रुचति हे तुला शब्द वावडे । खचित रेणुके० ॥ ४४ ॥
स्वगुण रत्न श्रीमाय शीकवी । मग मलाचि तूं मानशी कवी ।
करिन पाठ सूकीर्तिचे धडे । खचित रेणुके० ॥ ४५ ॥
शिशुसवें पदें माय घोकिती । मग दुराक्षरें ही निघो किती ।
सुरस तीळ संक्रांतिचे पुडे । खचित रेणुके० ॥ ४६ ॥
शिशुच शोभवी माउलीपण । सजल पारदाऽश्रीत दर्पण ।
असति कोटिच्या पोटिं शेकडे । खचित रेणुके० ॥ ४७ ॥

खटकती तुझ्या पायिं जोडवी । खट कपाळिं या बाइ जोडवी ।
खटचि कां न होतील चोपडे । खचित रेणुके० ॥ ४८ ॥
प्रगटली महानंदि राजसा । दिनमणी अला मंदिरा जसा ।
लपति काजवे शत्रु ते किडे । खचित रेणुके० ॥ ४९ ॥
सुरभि कल्पवृक्षाचि साउली । सदय विष्णु दासाचि माउली ।
गरजती जसे सिद्ध चौघडे । खचित रेणुके सांग येवढें ॥ ५० ॥

याशिवाय साक्या, दिंड्या, कटाव, अभंग इत्यादि उत्कृष्ट काव्य अप्रकाशित आहे. तें प्रकाशित करण्यास सामर्थ्य देणारे श्रीसद्‌गुरु समर्थ आहेत. इतकें लिहून हें पुस्तक सद्‌गुरुचरणीं समर्पित करतों.

समाप्त.


---

# जाहिर विनंती.

माहुर येथील श्रीगुरुमहाराजांचा **श्रीपुरुषोत्तमाश्रम (विष्णुवाडी)** या नांवाचा मठ अरण्यांत असून तेथील सृष्टिसौंदर्य फार मनोहर आहे. प्रस्तुतकाळीं अरण्यवास होणें दुर्लभ आहे, पण या आश्रमांत कांहीं दिवस राहून मनास शांती मिळविण्याचा योग मुमुक्षूंनीं साधावा अशी विनंति आहे. माहूर येथें मातृतीर्थाचें अलीकडे हा आश्रम रस्त्याचें डावे बाजूस आहे. आश्रमांतील विहिरीचें पाणी पुरत नसल्यामुळें विहीर फोडण्याचें काम हल्लीं सुरू आहे. विहिरीस जिवंत पाणी लागलें तर फार चांगलें होणार आहे. विहिरीस लागणारा सर्व खर्च यवतमाळचें श्री. शेट **गोकुळदास** मारवाडी करीत आहेत. तसेंच येथें येणाऱ्या लोकांसाठीं मोठ्या धर्मशाळेची अत्यंत आवश्यकता आहे. हीं कामें हळूं हळूं करून घेणार समर्थ आहेत. या मठ संस्थेतून उत्तरोत्तर धर्म प्रसाराचें कार्य व आर्यसंस्कृति व सनातन वैदिक धर्म पूर्ववत वैभवशाली होण्याबद्दलचें कार्य होण्यास स्फूर्ति देणार श्रीसद्‌गुरु समर्थ आहेत.

**नरहरशास्त्री खरशीकर.**

## श्रीमत्परमहंस श्रीपुरुषोत्तमानंद सरस्वति
## ऊर्फ विष्णुकवि महाराज-माहूर.



जन्मशक १७६६ समाधिशक १८३९

# श्री संतवर्य गुरुदासमहाराज
# ऊर्फ अनंतराव मामा—माहूर.



जन्म चैत्र शु. १४ — १७८७

समाधि पौष. व. १ — १८४६

ॐ श्री सद्‌गुरू समर्थ

श्रीमत्परमहंस श्रीपुरुषोत्तमानंदसरस्वती स्वामी

ऊर्फ

# श्री विष्णुकवि महाराज यांचें चरित्र.




लेखक व प्रकाशक

नरहरशास्त्री जोशी, खरशीकर.



( लेखकानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )



आवृत्ति पहिली.

किंमत बारा आणे.

शके १८५० ] [ सन. १९२८

प्रकाशकः-रा. नरहर शास्त्री खरशीकर
( मु॥ खरशी पो, मेढें ( सातारा )
मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे हनुमान प्रेस
३०० सदाशिव पेठ, पुणें शहर.

# प्रस्तावना.

नगर जिल्ह्यांतील धांदरफळें या गांवाचे जोशी उपनामक कुटुंब यवनांच्या भयंकर त्रासामुळें जन्मभूमि सोडून परंतु जन्मभूमीच्या स्मरणार्थ धांदरफळें हें उपनाम धारण करून साताऱ्यास येऊन राहिलें होतें. या कुळांत शके १६६५ चे सुमारास चिंतामणि नामक अपत्य झालें. हे चिंतामणि गणेश व दत्त उभयोपासक होते. यांस श्रीदत्तांचा "तुझ्या वंशांत संत निर्माण होतील" असा दृष्टांत झाला होता. चरित्रनायक कृष्णा म्हणजे विष्णुकवि हे या चिंतामणीपासून चवथी पिढी. यांचें वास्तव्य कांहीं वर्षें साताऱ्यासच होतें. श्रीविष्णुकवींचें बालपण संतसेवा व भगवत्सेवा यांतच तत्परतेनें गेलें होतें. ही गोष्ट पुढील चरित्रग्रंथावरून आपणांस दिसून येते. यांच्या ठिकाणीं वैराग्य अत्यंत कडकडीत वसत होतें. यांचा विवाह वयाचे बारावें वर्षीं झाला. पुढें ६ वर्षांनीं हे ईश्वरसाक्षात्काराच्या नितांत तळमळीनें १५ वर्षांची मधुरवयाची सुंदर पत्नी, माता, पिता या सर्वांचा त्याग करून घराबाहेर पडले.

प्राकृत जनाचें अंतःकरण अत्यंत अल्प अशाही संसारसुखांतच कृतकृत्यता मानतें. परंतु संतजन ईशसाक्षात्कारानेंच कृतकृत्यता मानतात.

वेदांताचा अधिकारी कोण ? याचा विचार करीत असतां नित्यानित्यवस्तुविवेक इहामुत्रफलभोगविराग इत्यादि चार विशेषणांनीं जो युक्त असेल तोच अधिकारी, त्यालाच ब्रह्मविचार करितां येतो आणि ब्रह्मसाक्षात्कार होत असतो, असें सांगितलें आहे.

श्रीसंत विष्णुकवि हें विवेकवैराग्याचें उत्तम उदाहरण आहे. बालपणापासूनच शुद्ध वृत्ति, शुद्ध आचरण, ईश्वरनिष्ठा, ईश्वरसाक्षात्काराची तीव्र लालसा आणि सर्वसंगपरित्याग हीं साधनपरंपरा संतविष्णुकवींच्या ठिकाणीं मूर्तिमान वसत असलेली आश्चर्यभूत आहे. उत्तम साधनपरंपरेचें रसभरित प्रतिपादन एकादा वक्ता किंवा ग्रंथकार करील परंतु त्या साधनपरंपरेचें अनुष्ठान करणें हें फार अवघड आहे.

सर्वच उपदेशक व वक्ते, विद्यार्थीवर्गानें असें वागावें, गृहस्थानें तमुक करावें असें सांगत असतात. धार्मिक, औद्योगिक किंवा राजकारणविषयक सभांमधून वक्ते अनेक साधनांचें निरूपण करतात, पुराणिक हरिदास पुराणकीर्तनामध्यें, कनककांताविषय निःसार आहेत, जग मिथ्या आहे, असें सांगत असतात, परंतु पुराणांतील वांगीं पुराणांत. स्वतः आचरणाच्या नांवानें भोपळ्याएवढें पूज्य आणि म्हणूनच संतविष्णुकवि यांच्यासारखें उदाहरण हें अत्यंत अपूर्व आणि संतजनास नितांत रमणीय आहे यांत संशय नाहीं.

असो, संतविष्णुकवि यांनीं आयुष्याच्या पूर्वभागांतच ईश्वरसाक्षात्कार प्राप्त करून घेतला आणि आयुष्याचा उत्तरार्ध लोकोद्धारार्थ खर्च केला हेही संतसज्जन पद्धतीला अनुसरूनच झालें.

स्वतः कृतकृत्य झाल्यावर विचारशून्य आणि आडमार्गानें जाणाऱ्या परंतु सुखेच्छु अशा प्राकृत जनांस सन्मार्ग दाखवून ताळ्यावर आणण्यास संतांवांचून अन्य कोण समर्थ असणार ? अंध जनांना खड्यांत पडूं न देतां चांगल्या मार्गानें नेण्याला समर्थ कोणी असेल तर अंध नसून डोळस मनुष्यच समर्थ आहे.

संतविष्णुकवि यांनीं आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत पुष्कळ लोकांस सन्मार्ग-प्रवण केलें. उत्कृष्ट आचरणाचा धडा सन्निध राहणाऱ्या व दर्शनास येणाऱ्या अनेक लोकांस स्वतःच्या आचरणानेंच दिला. प्रत्यक्ष आचरणाचा परिणाम केवळ उपदेशानें होणाऱ्या परिणामापेक्षां तीव्र आणि स्थिर असतो. उपदेशाचा परिणाम तात्कालिकही असूं शकतो, श्मशानवैराग्याप्रमाणें तो मनावर कांहीं वेळ उमटला तरी त्यावर तर्क-वितर्क सुरु होऊन कदाचित् मागाहून तो उपदेशजन्य परिणाम दुर्बल होतो आणि कदाचित् अजिबात नाहींसाही होण्याचा संभव असतो.

पण जो उपदेशक आपण इतरांस जसा उपदेश करितों तसें वागणें आपलें आद्य-कर्तव्य असें समजतो; अर्थात ज्याचा विचार, उच्चार आणि आचार यांत ऐकमत्य असतें त्याचा उपदेश लोकांस जास्त पटतो. म्हणजे अर्थात त्या उपदेशकाच्या आचरणाचाच ठसा लोकांच्या मनावर ज्यास्त ठसतो व खोलवर जातो आणि चिरकालिक होतो. "बोले तैसा चाले। त्याचीं वंदावीं पाउलें" या वाक्यावरून हेंच तत्व व्यक्त होतें. "लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण' या निंदा करण्याच्या वाक्यावरून देखील असाच ध्वनि निघतो. संतविष्णुकवींच्या नितांत शुद्ध अशा आचरणाचा परिणाम लोकांवर फार झाला.

संतविष्णुकवी हे मोठे रसिक कविही होते. त्यांचा अनेक विषयांवरील कवितासंग्रह मोठा असून त्यापैकीं कांहीं नुकताच छापून प्रसिद्ध झाला आहे. कोणी यांचेपाशीं कांहीं नवीन कविता करून मागितल्या तर ते तशा कविता करून देत. पण त्या मनुष्याकडून चांगल्या आचरणाची शपथ करवून मग त्यास कविता करून देत असत. यांच्या कवितांच्या संबंधानें विशेष उल्लेख ४० व्या पृष्ठांवर आढळेल. त्यांची कविता भक्तिप्रेमानें रसरसलेली आहे. त्यापैकीं थोडी कविता या पुस्तकाचे शेवटीं जोडली आहे.

संतविष्णुकवींच्या काव्यासंबंधानें येथें कांहीं लिहितां येत नाहीं. तो एक बराच मोठा विषय आहे.

संत विष्णुकवि यांचे भागिनेय, संत विष्णुकवींचे चरित्रकार आणि ज्यांच्यावर विष्णुकवींचा अनुग्रह झाला आहे असे श्रीयुत नरहरशास्त्री खरशीकर यांनीं मला या चरित्राला प्रस्तावना लिहिण्याची विनंति केली होती. परंतु माझा लेखनाचा व्यवसाय नाहीं, त्यामुळें मला तसें कांहीं लिहितां यावयाचें नाहीं. कोणत्याही विषयाचा व्यासंग असल्यावांचून ती गोष्ट करितां येत नाहीं. म्हणून प्रस्तावना लिहिण्याचें काम मी केलें नाहीं. तोंडानें नाहीं न म्हणतां हातानें नाहीं म्हणावें या म्हणीच्या आश्रयानें चार शब्द लिहिले आणि तेवढ्यानेंच सज्जन ही सेवा गोड करून घेतील अशी आशा आहे.

शेवटीं एवढेंच सांगावयाचें कीं, असे सदाचरणनिष्ठ ईश्वरीसाक्षात्काराचे, जनतेला सन्मार्गास लावणारे सज्जन फारच विरळ असतात. त्यांचें दर्शन प्रत्यक्ष झालें नाहीं तरी त्यांच्या चरित्रवाचनानें त्यांच्या स्वरूपाची कल्पना घेऊन त्यांचे मानसदर्शन घ्यावें. आणि आपणही कृतार्थ होण्याच्या मार्गाला लागावें एवढेंच आपलें कर्तव्य होय.

वांई प्राज्ञपाठशाला<br>
ज्येष्ठ व॥ ८ शके १८५०

नारायणशास्त्री मराठे.

॥ ॐ श्री सद्गुरुसमर्थ ॥

# हृद्गत

श्रीमत्परमहंस श्रीपुरुषोत्तमानंदसरस्वती उर्फ श्रीविष्णुकवि महाराज हे माझे मातुल च गुरु होत.

त्यांची कविता प्रासादिक असून फार उत्कृष्ट आहे. ती कविता प्रकाशित करण्याची जबाबदारी मजवर होती. त्याची योजना कशी करावी या चिंतनांत माझे कित्येक दिवस गेले. शेवटीं शके १८४८ सांत ही कविता प्रसिद्ध करण्याचा मजवर असलेला भार यवतमाळच्या शारदाश्रमाचे चालक **श्री. यशवंत खुशाल देशपांडे** एम.ए.एल.एलबी व **श्री. दत्तात्रय बापूराव महाजन** बी.ए. या महोदयांनीं आपलेवर घेऊन प्रकाशनाची योजना तयार केली. कवितेच्या पुस्तकास महाराजांचे चरित्र जोडावें असें ठरून त्यांनीं चरित्र लिहिण्याबद्दल मला कळविलें. मीं चरित्र लेखनास सुरवात केली. त्यावेळीं मी फारच संकटमय स्थितींत होतों. माझी परमपूज्य मातृदेवता वाताचे आजारानें अत्यवस्थ असल्यामुळें मला बिलकूल सवड मिळेना, व चरित्र लवकर तयार व्हावयास पाहिजे होतें. पण माझ्या गुरुमाउलीनें अशा बिकट प्रसंगीं मला स्फूर्ति देऊन हें चरित्र लिहून घेतलें आहे. चरित्र लिहून कवितेचें पुस्तकांत छापण्यासाठीं पाठविलें. पण चरित्र कवितेच्या पुस्तकांत सात्र छापणें अशक्य झाल्यामुळें **श्री. देशपांडे** यांनीं माझ्या पुस्तकावरून सारांश काढण्याचें बिकट काम करून कवितेचें पुस्तकास संक्षिप्त चरित्र जोडलें व त्यांनीं हें चरित्र लवकर प्रसिद्ध करण्याबद्दल मला प्रोत्साहन दिलें. कवितेचे पुस्तकास विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहिणारे सुप्रसिद्ध **श्री. अच्युत सिताराम साठे एम. ए. एल एलबी.** ऑडिशनल जज्ज नागपुर. यांनीं समक्ष व पत्रद्वारें चरित्र प्रसिद्ध करण्याबद्दल मला उत्तेजित केलें; व आपल्या प्रस्तावनेंतही " **कवितेच्या पुढील भागाबरोबर रा. खरशीकर शास्त्री यांनीं लिहिलेलें चरित्र प्रसिद्ध होईल तर चरित्र लेखनाचा गोडसा मासला वाचकांस मिळेल**" असें लिहून ठेविलें आहे.

चरित्र लवकर प्रसिद्ध करावें, पण ही योजना कशी सिद्धीस जाणार, या चिंतनांत असतां माझी व भागवतोत्तम ह. भ. प. लक्ष्मणराव पांगारकर यांची भेट झाली. त्यांनीं चरित्र मुमुक्षूंतून प्रसिद्ध करण्याचें आश्वासन दिलें, म्हणूनच हें चरित्र माझ्याकडून इतक्या लवकर प्रसिद्ध होत आहे.

श्रीविष्णुकवि महाराजांचे एकनिष्ठ शिष्य **श्री. केशवराव अमीन वकील** मु. मोर्शी जि. अमरावती यांनीं अंशत: द्रव्यसहाय्य केल्यामुळेंही चरित्र छापलें गेलें आहे. शिवाय महाराजांचे घराण्यांतील **श्री. काशिनाथ गणेश श्रोंद्रफळे** हुजुर डेप्युटी कलेक्टर, अहमदनगर यांनींही मला उत्तेजन दिल्यामुळें चरित्र प्रकाशित झालें आहे.

सातारा येथील माझ्या मातुल घराण्याची वाताहात झाल्यामुळें कोणाचीही जन्मटिपणें सांपडत नाहींत ! पण माझ्या **मातृदेवतेचें** साह्य व माझे परमपूज्य मातुल **श्री. गुरुदास ऊर्फ अनंतराव मामा** यांचें मदतीनें मीं कांहीं टांचणें करून ठेविलीं होतीं त्यांचा उपयोग या चरित्रलेखनास झाला आहे. चरित्र लिहितांना चिकित्सक व भाविक

दृष्टीचा उपयोग केला आहे. भाविकपणा जरा कमी केला तर आधुनिक विद्वानांस चरित्र पटेल अशी सूचना माझ्या एकदोन मित्रांनीं केली, परंतु संतांचें चरित्रांतून भाविकदृष्टि वगळली म्हणजे शिल्लक काय राहणार ? नराचा नारायण कर्तृत्वावांचून भावनेवर होतां येईल हें म्हणणें जरी थोडें धाष्टर्याचें असलें तथापि भावना दृढ धरून–भावनेनें ध्येय तयार करून–त्या अनुरोधानें कार्यरत होऊन कृतकृत्यता येणें हेंच सर्व संतांच्या चरित्रांत प्रामुख्यानें दिसत आहे व तीच दृष्टी याही प्रसंगीं ठेविली आहे. सर्व चरित्र विश्वसनीय आहे.

तीं. **विष्णुपंत मामा** यांनीं महाराजांचे सातारा येथील लहानपणाच्या हकीगतीचें टांचण पाठविलें त्यांचा मला फार उपयोग झाला. माझ्या **मातृदेवतेचें** साह्य तर अप्रतिम झालें, पण तिच्या बंधूचें चरित्र प्रसिद्ध झालेलें पहाण्यापूर्वीच तिचा अंत झाला यामुळें मला अत्यंत वाईट वाटत आहे.

मला प्रोत्साहन देणारे श्री. **देशपांडे, साठे, महाजन** यांचें व ह. भ. प. **पांगारकर** यांचे व श्री. **अमीन वकील** यांचे मजवर फार उपकार झाले आहेत. हें उपकारऋण फेडणार सद्गुरु समर्थ आहेत.

माझे परममित्र बंधुवर्य **अंबादासपंत अनसिंगकर** मु. दिग्रस, यांचें साह्य अमोल आहे, त्यांनीं केलेल्या वारंवार सूचना व वचनांची निवड याबद्दल मी कृतज्ञतापूर्वक कांहीं न लिहिणेंच त्यांना आवडेल, बाकी त्यांच्याबद्दल लिहिण्यास मजजवळ पुरेसे शब्द नाहींत. त्यांजवर कृपा करणार त्यांचे सद्गुरू समर्थ आहेत. प्रस्तावना लेखक वाई येथलि प्राज्ञपाठशाळेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध विद्वद्वर्य गु. ब्रह्मश्री नारायणशास्त्री मराठे हे लाभले याजबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत.

पुस्तकांत दिलेले दोन फोटोचे ब्लाक धोम येथील माझे मावसबंधु **आपाजी वामन** जोशी यांचा मुलगा चि. **गोविंद** यानें तयार करून दिले आहेत. त्या कलेंत उत्तरोत्तर तो प्रवीण होवो अशी सद्गुरुंकडे प्रार्थना आहे.

महाराजांची अप्रकाशित कविता बरीच आहे, ती प्रसिद्ध लवकरच होईल अशी आशा आहे. तसेंच त्यांचीं सुमारें **पंधरा आख्यानें** फारच उत्कृष्ट आहेत. त्या आख्यानास गद्याचा पोषाख चढवून प्रकाशित करण्याचा माझा विचार आहे; व त्याचें दृश्य मुमुक्षुद्वारें लवकरच दिसूं लागेल. **श्री. गुरुदास महाराजांचें ध्यान-योगांतील वाङ्मय फार उच्चदर्जाचें आहे.** तेंही प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. तें प्रसिद्ध झाल्यास परमार्थ जिज्ञासूंस अत्यंत मार्गदर्शक होईल. याप्रमाणें वाङ्मयप्रकाशनाचें कार्य करून घेणार श्री सद्गुरू समर्थ आहेत.

ज्यांचे कृपेनें चरित्रलेखन पूर्ण झालें आहे त्या गुरुमाउलीचरणीं अनन्य लीन होऊन या कार्यांत साह्य करणाऱ्या मंडळींचें अभीष्ट चिंतीत आहे. सर्वांवर कृपा करणार श्रीगुरू माउली समर्थ आहे, त्या श्रीगुरुमाउलींचें स्मरणांत येथें विश्रांति घेतों.

मु. खरशी,—पो. मेढें.
जि. सातारा,
ज्येष्ठ कृ. १० शके १८५०

सद्गुरुदास
**नरहरशास्त्री जोशी, खरशीकर.**

# विषयानुक्रमणिका.


| प्रकरण | विषय | पृष्ठें |
| --- | --- | --- |
| १. | कुलवृत्तांत ... ... ... | १ ते ६ |
| २. | बालपण ... ... ... | ७ ते ११ |
| ३. | विवाह व गुरुप्राप्ति ... ... | १२ ते १८ |
| ४. | गृहत्याग ... ... ... | १९ ते २४ |
| ५. | तीर्थयात्रा व माहूरला गमन ... | २५ ते ३० |
| ६. | विरह ... ... ... | ३१ ते ३६ |
| ७. | माहूर येथील वास्तव्य ... ... | ३७ ते ४० |
| ८. | शोध व पत्नीभेट ... ... | ४१ ते ४७ |
| ९. | गृहस्थाश्रम व पत्नीवियोग... ... | ४८ ते ५५ |
| १०. | भक्तिप्रेम व परमार्थविचार ... ... | ५६ ते ६६ |
| ११. | आश्रमवास ... ... ... | ६७ ते ७६ |
| १२. | अखेर ... ... ... | ७७ ते ८३ |
| १३. | उपसंहार ... ... ... | ८४—८६ |
| २ | परिशिष्ट १ लें ( वाग्रत्नें )... ... | ८७—९३ |
| ३ | परिशिष्ट २ रें ( अप्रकाशित कविता ) | ९४-१०४ |


# शुद्धिपत्र व कांहीं सुधारणा.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ५ | ५ | जेहेकरा- | जेहेकटा- |
| ५ | ८ | होतें | होतें. |
| ६ | २४ | पडे | पडे. |
| ९ | ३३ | परिश्रम | परिप्रश्न |
| १० | १२ | चंदाबाई | चंद्राबाई |
| ,, | १५ | बनु | बगु |
| १२ | १९।२२ | शोडष | षोडश |
| १३ | ३ | ह्या | त्या |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १६ | ६ | कृपा मज केली | केला अनुग्रह |
| ,, | २५ | सर्पाषु | सपोषु |
| १९ | ३२ | सुख | सुखं |
| २२ | ३३ | सेप | निरोप |
| २३ | ५ | असेना | असेन |
| ,, | १३ | आड इकडे | आड तिकडे |
| २६ | ११ | हाल विसरला | हाल विसरला. |
| २७ | ९ | यापुढें | यापुढें त्यास |
| ४७ | २० | थोर | थारा |
| ४९।५१।५३ | मथळा | शोध व पत्नीभेट | गृहस्थाश्रम व पत्नीवियोग. |
| ५४ | २५ | उभली | उभारी |
| ५७ | १४ | खटल्यावर | पटवाऱ्यावर |
| ५८ | १७ | उमरखेड. | उमरखेडकर |
| ,, | २४ | असूनिया | भरूनिया |
| ,, | २८ चे पुढें— हें पत्र पाहून शास्त्रीबोवांनीं कवींची भेट घेतली. व ते फार आनंदित झाले. कवींच्या लावण्याचा ते वेदांतपर अर्थ लावून प्रवचनें करीत असत. | | |
| ६३ | २१ | नासरी | नासरी[१] |
| ६४ | ५ | चटकोनि | चडकोनि |
| ६४ | ५ | थुकून | थुंकून |
| ,, | १४ | वधिलीचि | वधिलाचि |
| ,, | २५ | रेणुकां हीं | रेणु कांहीं |
| ६९ | ४ | दत्तात्रय | दत्तात्रेय |
| ७२ | ७ | मिथ्या | बुध्या |
| ९० | ३२ | आरायनो | आरायेना |
| ९६ | ३ | परिहास्य यावरची टीप ४ थी आहे. | |
| ,, | टीपेंतील आंकडे ५।६।७।४ याचे ठिकाणीं ४।५।६।७ समजावेत. | | |
| ,, | १२ | गितेचि | गितेचि[१०] |
| ,, | १४ | स्वपुते[१०] | स्वपुते |

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षकाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पी. नें ०१२.

२. **संतचरित्रमाला:**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्र:**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रें:**—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे किं. ०८. ( आवृत्ति ४ थी )

७. **नवविधाभक्ति:**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

८. **निरंजनमाधवांची कविता:**—भाग २ व ३ किं. १॥ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्र:**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १०८.

१०. **भक्तिमणिमाला:**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

## पांगारकरांचीं पुस्तकें.

११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै॰ विष्णुबुवा जोग यांनी केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ८५.

१२–१३. मुमुक्षूंतील निवडक निबंध ( भाग १–२ ):–किं. प्रत्येकीं रु. १८८

१४. मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १८१२.

१५. पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचाराची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ८८.

१६. श्रीतुकारामचरित्र:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सह्या असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें ६० सह किं. रु. २.

१७. श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ८५.

१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख–विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ८१०.

१९. मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२०. मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ): —किं. ८४.

२१. सार्थ श्रीदासबोध:—किं. रु. ४. १ली पी. नें ४८१०.

२२. सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ८१२.

२३. समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


२४. मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु. २८४.

२५. श्रीएकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):—किं. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

|| श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ||

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २१ वें | ज्येष्ट १८५० | नवें वर्ष ८ वें |
| मास १० | जुलै १९२८ | अंक ७ |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही.पी. नें रु. ३-३

मुद्रकः–लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण | १ |
| २ मोरेश्वरकृत वीरभद्र चरित महाकाव्य | २—४ |
| ३ हर्डीकर यांचा शिव विजय | ५—८ |
| ४ पहिले सुधारक व मराठी ग्रंथकार | ९—२३ |
| ५ गोंदवलेकर महाराजांची गुरुपरंपरा | २४ |
| ५ मध्वमुनीश्वरांचें संक्षिप्त चरित्र | २५—४० |

# निरंजनमाधवाची कविता,

भाग १ ला किं. १ रु.　　भाग २–३ किं. १॥ रु.

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्याच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गायिलेलें ग्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुटकाव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेंत सांगणारीं अशीं घातलीं आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जे " सुभद्रा—चंपू " नावाचें या कवीनें केलें आहे. ते छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमींचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही भाग एकत्र बांधविले आहेत.



## अभंग.

१

मी तंव अनाथ अपराधी । कर्महीन मतिमंदबुद्धी ।
तुज म्यां आठविलें नाहीं कधीं । वाचे कृपानिधी मायबापा ॥ १ ॥
नाहीं ऐकिलें गाइलें गीत । धरिली लाज सांडिलें हीत ।
नावडे पुराण बैसले संत । केली बहुत परनिंदा ॥ २ ॥
केला करविला नाहीं उपकार । नाहीं दया आली पीडितां पर ।
करूं नये तो केला व्यापार । वाहिला भार कुटुंबाचा ॥ ३ ॥
नाहीं केलें तीर्थाचें भ्रमण । पाळिला पिंड करचरण ।
नाहीं संतसेवा घडलें दान । पूजावलोकन मूर्तीचें ॥ ४ ॥
असंगसंगें घडले अन्याय । बहुत अधर्म उपाय ।
न कळे हित करावें तें काय । नये बोलूं आठवूं तें ॥ ५ ॥
आप आपण्या घातकर । शत्रु जालों मी दावेदार ।
तूं तंव कृपेचा सागर । उतरीं पार तुका ह्मणे ॥ ६ ॥

२

आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरी तारीं मारीं ।
जवळीं अथवा दूरी धरीं । घालीं संसारीं अथवा नको ॥ १ ॥
शरण आलों नेणतपणें । भावभक्ती कांहींच नेणें ।
मतिमंद सर्वज्ञानें । बहु रंक उणें रंकाहूनी ॥ २ ॥
मन स्थिर नाहीं माझे हातीं । इंद्रियें धांवतां नावरती ।
सकळ खुंटलिया युक्ती । शांतिनिवृत्ती जवळी नाहीं ॥ ३ ॥
सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविला जीव ।
आतां करीं कळे तो उपाव । तूंचि सर्वठाव माझा देवा ॥ ४ ॥
राहिलों धरूनि विश्वास । आधार नेटीं तुझी कास ।
आणिक नेणें मी सायास । तुका ह्मणे यास तुझें उचित ॥ ५ ॥

---

# किं. १ रु. ) ज्ञानेश्वरांची प्रभावळ ( पृ. सं. ४८०

## ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

**महाराष्ट्र** ( प्रो. शं. वा. पेंडशे एम्. ए ):—" या पुस्तकांत ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरकालीन इतर साधुसंत यांच्या कृतींतील सुंदर व बहुमोल भाग एकत्रित करण्यांत आला असून त्याला मार्मिक प्रस्तावनाही जोडली आहे. रा. पांगारकरांसारख्या जुन्या वाङ्मयांत कसलेल्या व मुरलेल्या विद्वानानें अनेक दिवस आपल्याशींच गुणगुणून काढलेले हे वेंचे किती उत्कृष्ट आहेत हें पुस्तक वाचल्यावांचून समजणार नाहीं.

**केसरीः** " सामान्य वाचक, भाविक व अभ्यासक या सर्वांना हा ग्रंथ आपापल्या दृष्टीनें उपयुक्त वाटेल. मराठी भाषेच्या विश्वविद्यालयांतील अभ्यासक्रमांतही हा ग्रंथ नेमण्यासारखा आहे. "

**रणगर्जनाः**—" ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन इतर सुमारें २८ तसं कवि यांच्या कवितेंतील निवडक वेंच्यांचें हें पुस्तक रा. पांगारकर यांनीं मोठ्या परिश्रमानें व कसोशीनें तयार केलें आहे. प्रस्तावनेंत ज्ञानेश्वरांच्या संप्रदायाची व त्यांच्या वाङ्मयसेवेची खुलासेवार माहिती दिली आहे, व ज्ञानेश्वरींतील कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग यावरील ज्ञानेश्वरींतील विवेचनाचा विस्तृत गोषवाराही दिला आहे व या सर्व प्रकरणांची भाषाही फार प्रेमळ व गोड आहे. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांतील निवडक २५०० ओंव्या म्हणजे ज्ञानेश्वरांचें सारसर्वस्व होय. एकंदर ग्रंथाची रचना मोठ्या कुशलतेनें केली असून जुन्या मराठी कवितेच्या सहृदय भोक्तयांपुढें रा. पांगारकर यांनीं हें सुंदर ताटच ठेवलें आहे. या एकाच ग्रंथावरून पांगारकरांचा ज्ञानेश्वरी ग्रंथाचा व्यासंग केवढा दांडगा व जिव्हाळ्याचा आहे याची कल्पना सहज होईल. पुस्तक जाड ग्लेज कागदावर सुंदर टायपांत छापलेलें असून जाड पुठ्याचें बाइंडिंगही मजबूत आहे. ५०० पृष्ठांच्या मानानें किंमत रु. २ ही अगदींच माफक आहे. "

**स्वतंत्र हिंदुस्थानः**—ज्ञानेश्वरांच्या व इतर संतांच्या कृतींचा पूर्ण अभ्यास करून त्यांत कृतविद्य झालेल्या पांगारकरांनीं ही ज्ञानेश्वरांची प्रभावळ सिद्ध केली आहे. प्रभावळीची मध्यदेवता श्रीज्ञानोबाराय हेच होत. ज्ञानेश्वरींचें सार विषयवारीनें यांत काढलेलें असल्यामुळें पिकलेल्या कलिंगडांतील लालगाभा हातीं दिल्याप्रमाणें सदर ग्रंथ मोठा गोड झाला आहे. ग्रंथाचे प्रारंभीं ग्रथपरिचय करून देणारा एक अत्यंत प्रेमळ प्रबंध दिला आहे. "

**१ व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें शहर.**
**२ तुकाराम पुंडलीक शेट्ये, बुकसेलर,**
**माधवबाग, मुंबई. ४**

# मोरेश्वरकृत

# वीरभद्रचरित महाकाव्य.

**ले.—कल्याण श्रीराम अंबेवाडी, बेळगांव.**

१. संशोधनाचें कार्य युगानुयुगें जरी चाललें तरी पण मानवी बुद्धि ही ईश्वरी बुद्धीच्या दृष्टीनें कोती असल्या कारणानें संशोधकाला कांहीं शोध असहाय्य बनवितात. आज सरासरी पाऊण शतक झालें, महाराष्ट्र काव्यांचें संशोधन चालू आहे; पण संशोधकांची दृष्टि चुकवून कोपऱ्याखातेंऱ्यांत कित्येक काव्यें पडलेलीं आहेत! कित्येक काव्यांना कसर लागलेली आहे, कितीकांनीं आपणांजवळची ही अज्ञात काव्यसंपदा शेणशितोडयाच्या मोलानें उकिरडयावर फेंकून देऊन महाराष्ट्रकाव्याला तेवढया बाजूनें नुकसानींत आणलें आहे.

२. कोतें शिक्षण, दुबळी बुद्धि व पांचवीला पूजलेली गरिबी—इतक्या साहित्यानें संसाराच्या कर्मक्षेत्रावर उभा असतांना साहाजिकपणें काव्य-प्रांगणांत कोण कोण 'विषये समुपस्थित' आहेत हें पहाण्याकरितां दृष्टि वळली. तोंवर आपापल्या साहित्यानें तयार असलेले कविवीर जमलेले नजरेंत भरले. तो तेथें जमलेला दोनतीन हजारांचा रथीमहारथींचा तांडा पाहतां-क्षणींच आमची छाती दडपली; ह्या महानुभावांतून आपल्याशीं कोण कोण झुंज खेळावयास तयार होणार हें पहाण्यास्तव एकेकाच्या नांवनिशीनें हजेरी घ्यावयास सुरवात केली. तों मोरेश्वर नामक कोणी प्रथमच हजर झाले आहेत!

३. मोरेश्वर हे कोठील रहाणारे अगर ह्यांचे वंशज कोण ह्याची कांहींच माहिती मिळत नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, ज्यावेळीं महाराष्ट्र-कवि मोरोपंत जन्मले त्यावेळीं ह्या मोरेश्वरांनीं चित्रकूट पर्वतावर बसून वीर-भद्रचरित काव्य लिहिलें.

४. हें काव्य दक्षप्रजापतीच्या यज्ञप्रसंगावर स्कंदपुराण केदारखंडांतून कथा घेऊन लिहिलें आहे. त्याचे प्रसंग ५१ आहेत. ह्या ग्रंथाचा लेखन-काल कवींनीं श्रावण शु॥ ३ वर्षाऋतु उत्तरा नक्षत्र शके १६६३ असा दिला

आहे व समाप्तिकाल दुर्मतिनाम संवत्सर मार्गशीर्ष शु॥ ३ रोज सोमवार असा दिला आहे. प्रस्तुत प्रत बहुतेक कृष्णाबाईच्या उगमस्थानाजवळ विनायकशास्त्री ह्यांच्या घरीं लिहिली गेलेली आहे.

५. ह्या ग्रंथांत दोन वंशावळी सांपडतात. त्या खालीं दिल्या आहेत :—

एकनाथ स्वामींचें वंशसंतान.

| | |
|---|---|
| मल्हारी | २ रुद्र |
| \| | \| |
| उद्धव | विरूपाक्ष |
| \| | \| |
| गणेश—गुरु नृसिंहसरस्वती. | यम्माजी |

ह्याशिवाय महादेव दीक्षित असें आणखी एकाचें नांव आढळतें.

मला पहावयास मिळालेल्या प्रती :—

१. कानविंदे--संपादक ' परीक्षक '
२. मुचंडी रामचंद्र बाबाजी.
३. हुदलीकर देशपांडे.
४. अक्कतंगेरहाळ देशपांडे.

ह्याशिवाय पुष्कळ कुटुंबांतून ह्या ग्रंथाचें पठनपूजन केलें जातें. हा ग्रंथ बहुतेक ज्यांची कुलदेवता वीरभद्र आहे अशांच्या घरीं मिळतो. जास्त माहिती ग्रंथ हातीं येतांच मूळ प्रत व संस्कृत पुराण ह्याच्याशीं ताडून परीक्षणात्मक दृष्टीनें देण्याचा विचार आहे.

---


# भक्तिमणिमाला.

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाची रहस्यें अमृत...मधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवतांतील श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५०, किं. रु. १॥.

पत्ता:--व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

23 ५/२
२५।५।२८

# हर्डीकरांचा शिवविजय.

१ **अंताजी रामचंद्र हर्डीकर** यांनीं श्रीशिवविजय नामक शिवछत्रपतींच्या चरित्रावर पांडवप्रतापाच्या नमुन्यावर ३१ अध्यायांचा एक सुंदर ओवीबद्ध ग्रंथ लिहून तो इ. स. १८९० मध्यें प्रसिद्ध केला. त्याची द्वितीयावृत्ति १९०९ मध्यें निघाली. शिवाजीच्या चरित्राची गोडी मराठी वाचकांस लागून त्यांच्यांत देशभक्तीचा संचार व्हावा अशा हेतूनें रा. हर्डीकर यांनीं त्यावेळीं उपलब्ध झालेले इतिहासग्रंथ पाहून ' कथानकांत निराधार गोष्टी बिलकूल न घालतां ' सदर ग्रंथ रचला आहे. याची भाषा अर्वाचीन व सुलभ असून ग्रंथ फार नामी उतरला आहे. पंधरा वर्षांच्या मुलामुलींस हा सहज समजेल व आवडेल असा गोड व स्फूर्तिदायक आहे. ग्रंथकाराची इतिहासदृष्टि सोज्ज्वल व देशभक्ति रसरशित पण समर्याद आहे.

पवित्र देश आर्यावर्त । पूर्वापार जगद्विख्यात ।
जन्म पावलों त्या देशांत । ईशइच्छेकरूनी ॥ ३३ ॥
सत्पुरुषांचा अनुग्रह । कांहीं घडला हितावह ।
इतिहासांचा समूह । कांहीं कांहीं विलोकिला ॥ ३५ ॥
आर्यमातेची मूर्ती । पूर्वकाळीं कैशी होती ।
प्रस्तुत कैशी दिसे स्थिति । मना येऊं लागलें ॥ ३६ ॥
लागला तोचि निजध्यास । तळमळ लागली चित्तास ।
दुजें नाठवे रात्रंदिवस । आर्यमातेवांचुनी ॥ ३७ ॥
हा ! हा ! स्वधर्म बुडाला । लुप्त झाल्या विद्या कला ।
लक्ष्मीनें ठाव सोडिला । द्वीपांतरा चालली ॥ ३८ ॥
आर्यमाता दुःखें रडे । कानीं येती हंबरडे ।
तें ऐकतां हृदय धडधडे । नेत्रीं अश्रू लोटती ॥ ३९. ॥

२. देशोद्धाराची मनाला अशी तळमळ लागली असतांना कवीनें शंकराची प्रार्थना केली:—

जय भक्तकामकल्पद्रुमा । जय अघनाशना अमितविक्रमा ।
किती वर्णूं तव महिमा । ब्रह्मादिकां अगम्य ॥ ५६ ॥
सद्धर्म लक्ष्मी पराक्रम । याहीं त्यजिलें आमुचें धाम ।
तूं पुरविता भक्तकाम । म्हणूनि शरण पातलों ॥ ५७ ॥

मग बोले कैलासपती । प्राणी जैशीं कर्में करिती ।
तैशींच फळें पावती । मृत्युलोकामाझारी ॥ ६७ ॥
सुखामागें येई दुःख । दुःखाअंतीं पुन्हा सुख ।
ऐशीं एकामागें एक । सुखदुखें धांवती ॥ ६४ ॥
व्यर्थ चिंता करूं नका । भलत्या भरीं भरूं नका ।
काळ येईल पूर्वींसारखा । सौख्यदाता तुम्हांतें ॥ ६५ ॥
आर्यमातेची करावी सेवा । ऐसा मनीं असेल हेवा ।
तरी सांगेन तो धरावा । मार्ग तुवां बालका । ६८ ॥
पूर्वीं यवनीं धर्म बुडविला । गोब्राह्मणां त्रास दिधला ।
मग मी अवतार धरिला । धर्मोन्नतिकारणें ॥ ६९ ॥
धरून मानव देहाप्रती । मी झालों शिवछत्रपती ।
अंगें भोगून नाना विपत्ति । गोब्राह्मण प्रतिपाळिले ॥ ७० ॥
तें माझें अवतार चरित । परम मंगल रसभरित ।
तुवां वर्णावें समस्त । चित्तीं भाव धरूनी ॥ ७१ ॥
या चरित्रवर्णनेंकरून । होशील पवित्रांतःकरण ।
आर्यपुत्रां समाधान । तव ग्रंथें होईल ॥ ७२ ॥

× × ×

पूर्ण होतां ग्रंथरचना । दाखवी समस्त आर्यजनां ।
तया लाभ होतील नाना । ग्रंथ वाचितां सप्रेमें ॥ ७७ ॥
पूर्वजांची परिसतां ख्याती । तच्चरित्रीं जडेल प्रीती ।
पूर्वजपराक्रम चित्तीं । घोळूं लागतील सहजची ॥ ७८ ॥
शिवभूपें कैसें केलें । कैसें स्वदेहा कष्टविलें ।
गोब्राह्मण प्रतिपाळिले । कैशापरी सर्वदा ॥ ७९ ॥
कैसें स्वराज्य थाटिलें । कैसे म्लेंच्छ पराभविले ।
जीवित्व तुच्छ मानिलें । कैसें स्वधर्माकारणें ॥ ८० ॥
कैसें केलें रणकंदन । कैशा युक्तिप्रयुक्ति योजून ।
सुखी ठेविले स्वजन । कैशापरी सर्वदा ॥ ८१ ॥
शिवभूपाचें चित्र चरित्र । शुभदायक परम पवित्र ।
हें परिसतां आर्यपुत्र । आनंदयुक्त होतील ॥ ८२ ॥
मनीं बाणेल देशाभिमान । ठसतील चित्तीं पूर्वजगुण ।
वाटेल करावें अनुकरण । पूर्वजांचें प्रीतीनें ॥ ८३ ॥
देशकल्याणा हांव धरावी । तरी कैशी वृत्ति असावी ।
शरीरसुखा लाथ द्यावी । कैशापरी कळेल ॥ ८४ ॥

जनीं ऐक्य करावें । महापुरुषाचें चरित्र गावें ।
आपुलेंपण न टाकावें । प्राण गेल्या कधींही ॥ ८८ ॥
भगवंत कृपा करील । थोड्या दिनीं काळ फिरेल ।
पूर्व दिवस दाखवील । सन्मार्गानें चालल्या ॥ ८९ ॥

३. ग्रंथांत मधून मधून पुढील सुंदर ओव्या आल्या आहेत:—

या भरतखंडामाझारी । होते क्षत्रिय राज्याधिकारी ।
ज्यांचा प्रताप उर्वीवरी । गाजतसे सर्वदा ॥ १० ॥
धर्मनीतीनें राज्य करिती । गोब्राह्मणां प्रतिपाळिती ।
प्रजा पुत्रवत् मानिती । धर्म रक्षिती निजबळें ॥ ११ ॥
कली होत चालला प्रबळ । क्षत्रिय मोडत गेले सकळ ।
बुडाले राजवंश निर्मळ । फूट पडली ठायीं ठायीं ॥ १२ ॥
गेले पूर्वींचे पराक्रम । ग्लानी पावत चालला धर्म ।
होऊं लागलें पापकर्म । आर्यावर्तामाझारी ॥ २८ ॥ ( अ. २ )

स्वधर्म-रक्षणा-कारण । देऊं म्हणती आपला प्राण ।
ऐशा पुण्यपुरुषावीण । कोणा आप्त न मानी ॥ ४ ॥
गृहकलहें कोण वाढला । कलहें कोण नाश न पावला ।
कलहें कोण धन्य झाला । विचार याचा करावा ॥ २८ ॥

× × ×

गौरवर्ण मुख प्रफुल्ल । रम्य आकृति नेत्र विशाल ।
शोभायमान मुखकमल । मनोहर दिसतसे ॥ १०७ ॥
डोळे भरून यवनी पाहिली । मग शिवमूर्ती बाजूस वळली ।
आबाजीस तयेवेळीं । राव बोले मंजुळ ॥ १०८ ॥
'हे स्त्री भगिनीसम दिसते । बहु दीनत्वें खालीं पाहते ।
अंतःकरण गहिंवरतें । इजलागीं पाहूनी ॥ १०९ ॥
'पुण्यप्रताप अलौकिक । दुष्टजनां लावील धाक ।
होईल सद्धर्म संरक्षक । लोक म्हणती ' महात्मा ॥ ११३ ॥
धर्म-स्थापनेचा हव्यास धरिला । तो काय मोहे विषयसुखाला ।
अंतरात्मा असे रंगला । धर्मविजय रंगांत ॥ ११५ ॥
वस्त्रें भूषणें समर्पूनी । मधुरशब्दें सांत्वन करूनी ।
पावती केली त्वरें यवनी । श्वशुरगृहीं नृपानें ॥ ११९ ॥ ( अ. ५ )

\+ + +

सर्व होऊं एकवट । तरीच होतील कृत्यें अचाट ।
पुरवूं शत्रूंची पाठ । सर्व एकत्र होउनी ॥ ७६ ॥ ( अ. ६ )

स्वदेश-संरक्षणाकारणें । केवीं तनुमनधन समर्पणें ।
कैशी असती राजकारणें । श्रोतीं सादर परिसावीं ॥ १४७ ॥ (अ. १०)

*　　*　　*

स्वारीवरी जातां लष्कर । स्त्रिया न न्याव्या बरोबर ।
ऐसें आज्ञापी नृपवर । सर्व स्वीय सैनिकां ॥ १०८ ॥
रांड-भांड-वेश्या–वनिता । लष्करामाजी कोणी नेतां ।
नृप शिक्षा करी तत्वतां । देहांताची तयातें ॥ १०९ ॥
स्त्रीमुखाच्या भरीं भरेल । तो काय पराक्रम करील ।
पराभूत सहजीं होईल । स्त्रीलंपट मानव ॥ ११० ॥ ( अ. १४ )

*　　*　　*

तारुण्याच्या ऐनभरांत । कुतूहल असतें जागृत ।
सृष्टिचमत्कार शोभिवंत । वाटती पहावे पुनः पुन्हा ॥ ३० ॥ ( अ. २७ )

---


# मोरोपंत–चरित्र आणि काव्यविवेचन.

ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मोरोपंताच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षे पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रति थोड्या शिल्लक आहेत. पृ. सं. ६२५ किं. रु. २.

पत्ताः—व्यवस्थापक “ मुमुक्षु ” पुणें शहर.

# पहिले सुधारक व मराठी ग्रंथकार

## गोपाळ हरि देशमुख ( १८२२—१८९२ )

### १ गोपाळराव देशमुख

१. गोपाळरावांचें शिक्षण बेताचेंच झालें होतें. पण त्यांनीं घरीं जन्मभर जो अचाट व्यासंग ठेवला त्यामुळें ते एवढया नांवालौकिकास चढले. १८४१–४४ पर्यंत ३ वर्षें पुण्यांतील त्यावेळच्या एकुलत्या एक इंग्रजी शाळेंत त्यांनीं काढलीं व तीन वर्षांतच स्कूल-बोर्डाची शेवटची परीक्षा पास झाले व त्यांना लागलेच सरदारांच्या एजंटाच्या कचेरींत कारकुनाची असामी मिळाली. त्यांच्या चळवळ्या स्वभावाप्रमाणें ते कधीं स्वस्थ बसत नसत. तर सामाजिक, शिक्षणविषयक वगैरे चळवळींत उत्साहानें पडत. १८४७ मध्यें भाऊ महाजन यांनीं सुरू केलेल्या 'प्रभाकर' नामक वर्तमानपत्रांत त्यांनीं 'लोकहितवादी' ह्या टोपण नांवाखालीं इ. १८४८ सालीं शंभर पत्रें लिहिलीं. तीं पुढें १८७८ मध्यें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं. ह्या 'शतपत्रां'चा मालाकारांनीं लागलाच चांगला समाचार घेतला. १८४८ मध्ये ज्ञानप्रकाश व १८६४ मध्यें इंदुप्रकाश यांत यांनीं लेख लिहिले. १८४६ मध्यें हे मुन्सफीची परीक्षा उतरले व क्रमानें मुन्सफ, प्रिन्सिपाल सदर अमीन, असिस्टंट इनाम कमिशनर, अ० जज्ज, जॉइंट जज्ज वगैरे हुद्दयावर सारखे चढतच गेले. अमदाबादेस ते १८६७–७६ पर्यंत स्मालकॉज कोर्टाचे जज्ज होते. नाशीक, ठाणें इ. ठिकाणीं काम केल्यावर १८७७ मध्यें यांनीं पेन्शन घेतलें व आयुष्यांचीं शेवटचीं १५ वर्षें पुण्यास राहून काढलीं. तेथेंहीं ते सर्व चळवळींत असत.

### २. लोकहितवादींचीं मतें.

१. **लोकहितवादी** ह्या टोपण नांवाखालीं गोपाळराव देशमूख यांनीं 'प्रभाकर' पत्रांत पत्रव्यवहार सुरू केला. तीं शंभर पत्रें शतपत्री या नांवानें प्रसिद्ध आहेत. पहिलें पत्र १९ मार्च १८४८ रोजीं प्रसिद्ध झालें. पंचविशीच्या उंबऱ्यांत पाऊल टाकल्या वेळचे अर्धकच्चे विचार या शतपत्रींत प्रगट झाले आहेत. विद्या नाहीं, विचार नाहीं, अनुभव नाहीं, अशा अवस्थेंत प्रगट झालेले हे विचार. निबंधमालेनें यांचा उच्छेद करण्यास कंबर बांधली नसती तर लोक पार विसरूनही गेले असते. अव्वल इंग्रजींत पांच चार बुकें वाचून थोडया फार अधिकारावर चढलेल्या उच्छृंखल माणसाचें हें बहकणें आहे. समा-

जाची काळी बाजू तेवढी उजेडांत आणून तेवढ्यावरून दुसरी उजळ बाजू जणूं नाहींच अशा थाटांत लोकहितवादीनें हें थैमान घातलें आहे. कांहीं ठिकाणीं भाषेंतला सभ्यपणाहि ते विसरले आहेत "ब्राह्मण लोक अनिवार झाले आहेत व मूर्ख आहेत. याचें कारण त्यांस सुशिक्षा नाहीं. श्रीमंताचें पोर असलें तर त्यास भट वेद शिकवितात, मग जसा गुरु टोणपा तसा शिष्य टोणपा होतो. हें अक्षरें तोंडानें उरांत रक्त पडेतोंपर्यंत घोकून पाठ करितात. त्यापेक्षां दगड फोडावयाची मजुरी कां सांगत नाहींत ?... वर्तमान-पत्रे व बुकें या द्वारानें ज्ञान मिळविणें हें तर त्याचें कुळाचे शत्रू व वाचणें व लिहिणें त्यांचे बापाचे वैरी असे लोक आहेत. शास्त्रें पुराणें घेऊन बस-तात. पुराणांत मूर्खपणा भरला आहे ... कोणीं म्हणतो हे इंग्रज (जळचर) आहेत, कोणीं म्हणतो हे वानर आहेत, त्यांस रामाचा वर आहे, तेव्हां माझे मनांत येतें कीं तुम्ही बोलतां हे डुकर आहां ... कित्येक जुन्या ठशांचे लोक शंख करितात कीं, वेदविद्या बुडाली. पण महाराज ही विद्या हवी कोणाला ? दोन अध्याय अध्ययन घनपाठची टोणप्यापेक्षां बरें. एक एक अक्षर मागेंपुढें उलटें सुलटें पाठ केलें म्हणजे कांहीं दूध निघतें कीं काय ? दश-ग्रंथी म्हणून मिरवितात हे तर मला बैल असे वाटतात." (पत्र नं. ६२) "शेंकडों गृहस्थ रोज गीता, विष्णुसहस्रनाम वाचतात. हा मूर्खपणा आहे कीं नाहीं बरें ? असे फक्त पाठ करणारे यांस कांहीं कळत नाहीं ... ... संन्याशी चोऱ्या करितात, ब्राह्मण भडवेपणा, दरोडे इ० अपराधास अनुसरले आहेत. त्यांस मोक्ष कसा होईल ?" (पत्र नं. ६३). "ज्याला शहाणपणा व ज्ञान मिळवावयाचें असेल त्यानें इंग्रजी भाषा व त्या भाषेंतील तर्जुमे तरी वाचीत जावे. इंग्रजी विद्या फार सुधारली आहे. त्यांजमुळें त्यांतील भूगोलावर एक ग्रंथ पढलेला व संस्कृत किंवा इतर भाषेंत सर्व जमा केलें तर एकाची बरोबरी व्हावयाची नाहीं असें आहे. कारण इंग्रज लोकांनीं विद्या फार सुधारल्या; यांजमुळें त्या शुद्ध आहेत. संस्कृत पढलेले भ्रमिष्ट, मताभिमानी, अर्थाचा अनर्थ करणारे असे असतात. पुष्कळ लोक संध्या झाल्यावर स्तोत्र-पाठ करितात. परंतु केवळ सडकेवर माती वहाण्याची मजुरी व स्तोत्रपाठ सारखाच आहे." (पत्र नं. ६९) "मुळीं एकदां संस्कृत भाषेच्या झऱ्याचें पाणी जो प्याला त्याची भ्रांती जावयास ९० वर्षें शिकविलें तरी उपयोग नाहीं." (पत्र नं. ९७). "स्नानसंध्या हे केवळ पोकळ आचरण आहे. यांत कांहीं उपयोग नाहीं. चार ब्राह्मण लाऊन अभिषेक करावा त्यापेक्षां चार मजूरदार लावून रस्ता नीट करावा हें चांगलें; कारण ती लोकहिताची मजूरी आहे. यास्तव स्नानसंध्या करण्यांत कांहीं पुण्य नाहीं." (नं. ३६) "एक

इंग्रजींतील विद्वान आणि शंभर संस्कृतांतील पंडित आणि एक लक्ष कारकून दोन लक्ष भट हे सारखे कदाचित् होणार नाहींत ... संस्कृतांतील सर्व पुस्तकें जर जमा केलीं तर फार तर एक कोठडी भरेल. इंग्रजीमध्यें तर कोट्यावधि ग्रंथ आहेत. इंग्रजी विद्वानांप्रमाणें मला धर्मिष्ठ कोणींच दिसत नाहीं. कारण कीं इंग्रजींत ईश्वराविषयीं अनेक ग्रंथ आहेत." ( नं. ३१ ) "संस्कृतांत चांगली विद्या नाहीं व उपयुक्त ज्ञान नाहीं, हें सर्व विद्वानांनीं ठरविलें आहे." ( पत्र नं. १०१ ).

"सांप्रतचे गव्हरनरसाहेबसरजार्ज क्लार्क यांनीं लोकांचे सुधारणेकडे लक्ष देऊन जज्जसाहेब हेन्री ब्रौन यास सुचविलें कीं पुण्यांत लायब्ररी स्थापण्याचा बेत करावा. त्यानीं ता. २८ जानेवारी साल मजकुरी सर्व लोकांची सभा जमवून त्यांस हा मजकूर निवेदन केला. सर्वांनीं अनुमोदन दिलें ता. ७ फेब्रुवारी (१८४८) पासून पुण्याची लायब्ररी सुरू झाली. अद्याप (२६ मार्च) गृहस्थांपैकीं कोणी ग्रंथ वाचावयास व ज्ञान संपादन करावयास येत नाहींत. शाळेंतील विद्वान मंडळीं, ज्ञानेच्छु व विद्याभ्यासी मात्र येतात. सरदार लोक येत नाहींत. त्यांविषयीं मला वाटतें कीं आम्हीं थोर, चार शिपाई, घोडे, अबदागीर बरोबर घेतल्याशिवाय बाहेर कधीं पडत नाहीं. तेव्हां या लायब्ररींत मुलासारखें शिकण्यास जावयाची त्यांस लज्जा वाटत असेल. सांप्रतकाळीं तर आपले शास्त्रांत व देशांत काय आहे व इंग्रज लोक हे कोठून येऊन राज्य करितात व यांची व्यवस्था काय आहे, हें कोणास माहित आहे कां म्हणून विचारलें तर नाहीं म्हणून बहुतेक शपथ करतील; तेव्हां कोणाचे अमलांत आपण आहों हें ज्यांस कळत नाहीं त्यांचें अज्ञान काय वर्णावें ? मला फार दुःख वाटतें कीं, आपले लोक ज्ञान संपादन करणें हें लहान मुलाचें काम असें समजतात, आणि शिकत नाहींत......नेटीव लोक आतां आळस व गर्व न करतील तर फार चांगलें होईल. हल्लीं लायब्ररींत ३०० बुकें आहेत व अखबारा चार आहेत. पुढें सुधारेल अशीं आशा आहे." ( पत्र नं. ३ ) "शिमग्याच्या दुराचारांत मूर्ख आणि लबाड लोकच आहेत असें नाहीं. बहुत संभावित शाहणे, व थोर लोक अंशतः त्यांत मिसळतात. पुणें द्रव्यानें हलकें आहे खरें, परंतु दुष्कर्मांत येथील लोक द्रव्यवान् शहरापेक्षां अधिक आहेत व बहुत लोक आपलें सामर्थ्याची पराकाष्ठा करून रांडांचे ताफे बाळगण्याचा खर्च जीवादारभ्य करितात. शिमग्याचे पांच दिवस लोक नर्कवास करितात; कारण कीं पांच दिवस त्यांचे कानीं, मुखीं, मनीं व चित्तीं पातकाशिवाय दुसरें कांहीं नसतें. कुरीअर नामक इंग्रजी पत्रानें लिहिलें आहे कीं, सरकारनें हा सण बंद करण्याचा प्रयत्न करवा, परंतु सरकार प्रस्तुत असें करीलसें दिसत नाहीं.

सरकार स्वतंत्र नाहीं. त्यास विलायतेहून अधिकाऱ्यांचीं पत्रें वारंवार येतात कीं, हिंदु लोकांचे रिवाजास व चालीस व धर्मास अगदीं अटकाव करूं नये. आमचे लोकांचें महात्म इकडे कांहीं नाहीं तरी विलायतेस मोठें आहे." (पत्र नं ४) पुण्यांत त्यावेळीं फार बोकाळलेल्या शाक्त मार्गावर नं. ६ चें पत्र आहे. मद्य, मांस व स्त्री ( स्वीय व परकीय हा भेदाभेद न पाहतां ) यांचें यथेच्छ निर्लज्ज सेवन यास शाक्तपंथ म्हणतात. नं. ८ व १३ मध्यें जुन्या समजुती किंवा वाईट चाली यांबद्दल ४० कलमें दिलीं आहेत. ब्राह्मणांचें अज्ञान, ब्राह्मणांचें महत्त्व, ब्राह्मणांचा आळस, पुनर्विवाह व केशवपन, खोटा दानधर्म, संस्कृतांतील शास्त्रें लबाड व भट आपमतलबी, लांच खाणें व खोटें बोलणें, अर्थशून्य ब्राह्मणविद्या, देवपूजा, पुराणांतील अज्ञान, आचारधर्म, भटांनीं लावून दिलेलें वेड, देवळें व नेमधर्म, ब्राह्मणांचें ईश्वरी ज्ञान, इ० अनेक विषयांवर लोकहितवादींनीं इतकें भारूड लिहिलें आहे व त्यांत कोठें कोठें सत्य असलें तरी इतकें विपर्यस्त व एककल्ली विचाराचें भारूड उभें केलें आहे कीं, त्यांतून बाहेर पडून निर्मळ विचारांच्या हवेंत क्षणभर मोकळेपणानें मनास संचार करूं द्यावा असें वाटतें. इंग्रजी राज्य, इंग्रजी विद्या व कला, इंग्रजांची राज्यपद्धति, इंग्रजांचे ग्रंथ व शास्त्रें, इंग्रजांचें शहाणपण यांनीं त्यांचें चित्त इतकें भारून टाकलें होतें कीं आपलें सर्व वाईट व इंग्रजांचें सर्व चांगलें असा ग्रह सामान्य वाचकाचा व्हावा.

## ३ विविध प्रकाराची माहिती.

असे हे पुष्कळ भरकटले आहेत ! गोपाळराव हे स्वतः ब्राह्मण असून ब्राह्मण्यावर इतके कोरडे त्यांनीं ओढले आहेत कीं, पुढें जो सत्यशोधकी पंथ निघाला त्याचे उत्पादक ज्योतीबा फुले हे नसून गोपाळराव देशमुख लोकहितवादी हेच आहेत असें निभ्रांत म्हणावेसें वाटतें. प्रभाकरांत त्यांनीं ९९ पत्रें लिहिलीं व शंभरावें 'शतपत्रांचा इत्यर्थ' हा लेख लिहिला. त्यानंतर त्यांनीं आठ पत्रें पुनर्विवाहपक्षमंडनार्थ लिहिलीं. हीं १०८ पत्रें 'लोकहितवादी' या सहीनें त्यांनीं लिहिलीं. प्रभाकरांत २ वर्षें लिहिल्यावर बारा वर्षें त्यांनीं अध्ययनांत घालविलीं. या काळांत त्यांनीं इतिहास व धर्मशास्त्रें यांचें अध्ययन बरेंच केलें. मग आपल्यापाशीं ज्ञानाचा बराच सांठा झाला असें वाटल्यावर १८६२ च्या आगष्ट महिन्यांत पुन्हां लेखणी हातीं घेतली व 'इंदुप्रकाशांत' लेख लिहिण्यास सुरवात केली. शिंदे, होळकर, गायकवाड, निजाम, प्रतिनिधि, साताराचा वंश, पूर्वीची माहिती, पुणें दप्तर, युरोपखंडांत प्रवास, मराठी राज्यांतील शिक्के, प्राचीन कालाविषयीं, इ० ऐतिहासिक विषयांवर लेख लिहिले. 'वृत्तवैभव' पत्रांत १८६३ च्या आक्टोबर महिन्यांत हिंदु,

लोकांची प्राचीन विद्या ' हा पहिला लेख लिहिला व तेथून २।३ वर्षें वृत्त-वैभवांत ते सारखे कांहींना कांहीं लिहीत होते. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास कां नाहीं ? ब्राह्मणांची मूळ पीठिका, हिंदुस्थानचें स्थित्यंतर, मुसलमानांविषयीं बरीच विस्तृत माहिती, पारशी, शीक व इस्रायल लोकांविषयीं माहिती, ग्रंथ, इंग्रज सरकार, वारकरी, संपत्ति, चार युगें, धर्माचे निमित्तानें कायदा करून घेणें, राजाविषयीं निबंध, धर्मसंबंधी माहिती, लेखांक १ ते १५, वेदांत्यापेक्षा धादांती बरा, विद्वान् कोण, चांगला कोण, फड व पेशवाईंतील माहिती, मोलवान् दागिने, संगीत शास्त्र, कायद्याची माहितगारी, लेखांक १ ते १४ इत्यादि विविध विषयांवर त्यांनीं आपली लेखणी सारखी चालविली होती. पुढें कित्येक वर्षांनीं प्रभाकर, इंदुप्रकाश, व वृत्तवैभव यांतील सर्व लेख ११०० पृष्ठांच्या एका लठ्ठ पुस्तकांत त्यांनीं छापून प्रसिद्ध केले. शिळा-प्रेसवर छापलेलें हें पुस्तक चार रुपयांस मिळत असे. इंदुप्रकाश व वृत्तवैभव यांत लोकहितवादींचें धोरण जरी पूर्वींचेंच कायम राहिलें तरी भाषेंतील ग्राम्यपणा गेला, माहिती भरपूर व भरींव येऊं लागली. समाजाला सौम्यपणानें शिक-विण्याचा मार्ग त्यांनीं धरिला. निबंधमालाकारांनीं प्रखर टीका केली ती प्रायः प्रभाकरांत आलेल्या शतपत्रींवर केली त्या शतपत्रीमुळें जुना समाजही फार खवळला होता. नवीन विचारांच्या लोकांस त्यांतील बरेचसे विचार जरी मानवले तरी त्यांतील पोरकट भाषापद्धति त्याज्यच वाटली. त्यांतील विचार व भाषा यांचा वारसा जोतिबा फुले यांनीं व त्यांच्या अनुयायांनीं उचलला, व सुधारणानुकूल विषय–पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, जातिभेद, केश वपन–सुधारक पंथाच्या प्रवर्तनास कारणीभूत झाले. शतपत्रींतही चार दोन लेख फार सुंदर आले. त्यांतच राष्ट्रीय सभा व राजकीय चळवळी यांचें बीजः न कळत पेरलें गेलें. गोपाळराव पेन्शन घेऊन पुण्यास येऊन राहिल्यावर त्यांनीं ' लोकहितवादी ' नामक मासिक सुरू केलें. त्यांत कांहीं ऐतिहासिक विषयांवर लेख लिहिले व कांहीं स्फुट लेख, ग्रामरचना, स्थानिक स्वराज्य, दयानंद स्वामींचें चरित्र इ. लिहिलें. ' आगमप्रकाश ' नामक तंत्रशास्त्रावरचा ( शाक्तपंथी ) ग्रंथ, स्वाध्याय नामक एक स्वतंत्र ग्रंथ, गुजराथचा इतिहास, गीतातत्व, सुभाषित अथवा सुबोध वचनें, लंकेचा इतिहास, पृथ्वीराज चव्हाणाचें चरित्र, ऐतिहासिक गोष्टी ( भाग १।२ ) यांत इंदुप्रकाश व वृत्तवैभव यांत लिहिलेले बरेच लेख समाविष्ट केले आहेत—इत्यादि ग्रंथ पेन्शन घेण्याच्या आंत बाहेर जुळवून लिहिले व नंतर लगेच प्रसिद्ध केले.

## ४ मद्यपानाचा निषेध.

" स्वदेशाचे हितास झटावें ही मुख्य धर्मसुधारणा आहे. स्वदेशास जें हितावह तें करावें. जसें आपण मातोश्रीस वंद्य मानतों व तिच्या पोटीं आले ते सर्व बंधुप्रेमानें वागतात, तद्वत् या जमिनीवर जे आपण आहों ते ते सर्व एकमेकांचे बंधु आहोंत. या जन्मांत ही संधी लोकांवर उपकार करण्याची आहे. आयुष्याचा व्यय दुसऱ्याचे हिताकरितां करावा. तो व्यय सुखकारक आहे " ( पत्र नं ६७ ). नं. ७६ चा लेख मद्यपानावर आहे. त्यांत म्हटलें आहे, " अलीकडे इंग्रजी राज्य झाल्यापासून लोकांस सद्गुण लागावयाचे ते एकीकडे राहून महान् भयंकर व त्वरित वृद्धि पावणारा असा एक दुर्गुण लोकांमध्यें प्रगट झाला आहे व तो कोणता म्हणाल तर दारू पिणें. पूर्वीचें राज्यांत दारू कोणी पीत नव्हते व उत्पन्नही करीत नव्हते. ब्राह्मण व मराठे राज्य करणारे. तेव्हां ते दारू उत्पन्न करणारास नीच मानीत. हल्लींचे सरकारची फार विपरीत वर्तणूक आहे. द्रव्याची आशा धरून दुर्गुणावर उत्पन्न करितात आणि प्रसिद्धपणें दुर्गुण वाढूं देतात. अद्याप हा दुर्गुण लोकांत विस्तीर्ण व दृढ झाला नाहीं तोंपर्यंत सहज मोडतां येईल. मद्यपान करणें हें फार वाईट आहे. येणेंकरून द्रव्य, शक्ति, बुद्धि हीं नाशाप्रत पावतात. पोरेंबाळें उपाशी मरतात. इंग्रज लोक उद्योगी मोठे परंतु त्याची बुद्धि हिंदु लोकांइतकी नाहीं. हिंदु लोक ब्राह्मण वगैरे यांची बुद्धि बहुत जलद व समज चांगला पण आळसानें व्यर्थ गेली. इंग्रज लोक दारू वगैरे मादक पदार्थ भक्षण करितात, येणें करून त्यांचे बुद्धीस जरा येते. सोपा मुकद्दमा त्यांस समजतो पण तक्रारीचा व घोटाळ्याचा मुकद्दमा त्यांस किती समजाविला तरी समजत नाहींत, मग न समजतांच हूकूम देतात, हें आम्ही नित्य पाहातों. आमचें अन्न निर्मळ व इंग्रज लोकांचें अन्न बुद्धि मंद करणारें जड आहे. . . त्यांचे देशाची हवा शीतळ आहे, याजमुळें ते उद्योगी असतात. आमचे देशांत हवा उष्ण, येणेंकरून लोक आळशी आहेत. ते जर मद्य मांस खाऊ लागले तर फारच आळशी होतील. हें व्यसन मोठें घातकी. लागलें तर सुटत नाहीं. यास्तव शासन नेमून याजपासून लोक परावृत्त केले पाहिजेत. परंतु हें दारू पिणारांचेंच राज्यांत होईल काय ? ते आपण स्वतां दारू पितात. परंतु टाकतील तर त्यांसही चागलें आहे. . . . ते उत्पन्नावर व लोभावर दृष्टि देत असतील. तरी हें करणें सरकारास योग्य नाहीं. सरकारची मातोश्री लोक आहेत. त्यास त्यांजला रोगी, आळशी, अशक्त करून मग त्यांचें पोषण कसें होईल ? हा बदलौकिक करणारे उत्पन्नाची बाब सोडून देतील तर चांगलें होईल. . . . आम्हांस पक्केपणीं

समजलें आहे कीं शास्त्री, पंडित व गृहस्थ मिळून पांचशें असामी पुण्यांत दारू पिणारे आहेत. बाजीराव राज्यावर होता तेव्हां जे त्यांचे अंकित होते त्यांच्या स्त्रिया त्यानें भ्रष्ट करून कुनीति केली त्यास प्रतिकार कोणाच्यानें करवला नाहीं. तंत्रशास्त्र व शाक्तमत हें नर्काचें द्वार आहे. " . . . " सर्व लोकांस सारखे मानून विद्या शिकण्याचा सर्वांचा हक्क आहे. " ( नं. ७७ ). " मनुष्याचें कल्याण करावें. देवाचें भय धरून नीतीनें चालावें म्हणजे ईश्वर प्रसन्न होतो. " [ ले. ३६ ].

---

## ५ नाना फडणीस.

" मराठे लोकांत अशी म्हण आहे कीं नाना फडणीसासारखा शाहणा कोणी नाहीं, परंतु मला वाटतें कीं, आतां इंग्रज लोकांमध्यें सहस्रशः नानापेक्षां शाहणे आहेत. मेंढ्यास मेंढया वळतां आल्या म्हणजे तो कांहीं घोडेस्वार होत नाहीं. नानाची कीर्ति होण्याचें कारण एवढेंच कीं, मूर्खांचें सभेंत तो थोडासा शाहणा, गांवढा जोशी गांवढयांत पंडित........आज जर नाना असता तर त्याला लोक वेडे म्हणूं लागते व तो पळूनही जाता. " ( पत्र नं. ४१ ) " इंग्रज लोक हे या देशांत ईश्वरानें गुरु पाठविलें आहेत. " (नं. ५२)

---

## इंग्लिश राज्यापासून फळ.

" सांप्रत हिंदु लोक एकत्र बसले म्हणजे सहज गोष्टी निघतात कीं, हिंदुस्थानची पुढें गत कशी होईल ? लोक अगदीं भिकारी होत चालले. व्यापार, धंदा, रोजगार हीं अगदीं नाहींशीं झालीं. घरें ओसाड पडत चाललीं. पदार्थांच्या किंमती उतरल्या. पैसा नाहींसा झाला. इंग्रजी लोक एकापाठीमागें एक आपलीं राज्यें, संस्थानें, जहागिरी, पेन्शनें घेत चालले. कोणी शिपाई राहिला नाहीं. तेव्हां पुढें या प्रजेची गत कशी होईल ?......याविषयीं आह्मांस काय वाटतें तें लिहितों. ज्या गोष्टी ईश्वर घडवून आणतो त्या वाइटाकारितां नसतात. हिंदुस्थानचे लोक फार मूर्ख व धर्मकर्म सोडून अनाचारास प्रवर्तले. तेव्हां त्यांस ताळ्यावर आणण्यास परदेशांतील सुधारलेले लोक यांची व त्यांची गांठ घालून देण्यापेक्षां उत्तम उपाय दुसरा कांहीं नाहीं. यास्तव ईश्वरानें या देशांत इंग्रजांची प्रेरणा केली आहे...देश चांगला होण्यास दोनचारशें वर्षें लागतील. तोंपर्यंत या लोकांस दुःख आहे. वर्णसंकर होईल व देश बुडेल हें कांहीं भय बाळगूं नये. वर्णसंकर होत नाहीं व देश बुडत नाहीं, मूर्खपणा मात्र बुडेल. ... लोक चहों देशांत जाऊन व्यापार करूं लागतील, विद्वान् होतील, आपले देशांत कापड वगैरे जिन्नस तयार करावयास शिकतील. तेव्हां

सुखी होतील. लोक शाहणे झाले म्हणजे हळूच इंग्रजांजवळ म्हणतील, आम्हांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लमेंट द्या. आपले लोक त्यांमध्यें बसूं लागले म्हणजे हळूच म्हणतील कीं, तुम्हांसारखेच आम्ही शाहणे आहोंत. मग आम्हांस अधिकार कां नसावे? मग बहुमत आपलें झालें म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे. इकडील लोक राज्याचे कारभार चांगले करूं लागले, लाच खावयाचें सोडून दिलें म्हणजे बहुतकरून मोठालीं गवर्नरीचीं सुद्धां कामें यांचे हातीं येतील. मग इंग्रज व्यापार मात्र करून राहतील. आपले लोक पार्लमेंट व स्वराज्य भोगतील. राज्यकारभारांत व व्यापारांत त्यांस महत्व प्राप्त होईल आणि मग परदेशांशीं देखील व्यापार करितील. असे हे लोक प्रबळ झाले म्हणजे इंग्रजांस कांहीं दिवसपर्यंत आभारी मानतील. कारण कीं त्यांचे योगानें हे ज्ञानी झाले. परंतु ज्या काळीं इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कानू बनवावयाचा आग्रह करतील त्याकाळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील, आणि इंग्रजांस सांगतील कीं, तुह्मी आपले देशास जावें. आतां आमचे देशाचा कारभार आह्मांस चांगला करितां येतो. तुमचें गुरुत्व नको. तुह्मी पाहिजे तर व्यापारापुरतें येत जा, आमचे प्रजेचें जसें आम्ही रक्षण करितों तद्वत् तुमचेंही करूं, परंतु तुमचें वर्चस्व नको. याप्रमाणें नवीन राज्यस्थिति चांगले रीतीची होईल परंतु यास दोनशें वर्षें तरी पाहिजेत."

( ले० ५४ प्रभाकर ता. १ एप्रिल १८४९ ),

---

## ७ हिन्दु लोकांनीं काय करावें.

" सवतीचे मुलाची काळजी कोण करितो ? तेव्हां आमचे लोकांनीं एकत्र होऊन पार्लमेंट मागावें आणि मुंबई, कलकत्ता अशा ठिकाणीं तें नेमून तेथें कांहीं इंग्रज व आपले सर्व जातींचे शाहणे शाहणे लोक त्यांत ठेवावे आणि त्यांचे हुकुमानें कारभार करावा. विलायतेचे बादशाह जातीसही नाहीं म्हणवणार नाहीं. विलायतेंत पार्लमेंट असावें व येथें नसावें अशी कांहीं आम्ही चोरी केली नाहीं. हा एक मोठा उपाय साध्य व्हावया जोगा आहे. दुसरा तूर्त दरिद्र मोडण्यास उपाय असा आहे कीं, ब्राह्मणांनीं आपल्या मूर्खपणाच्या समजुती सोडून आणि केवळ कारकून व भट हे दोनच रोजगार आम्ही करूं असें म्हणूं नये. आणखी पुष्कळ रोजगार आहेत ते दिवसेंदिवस इंग्रज घेत चालले. सावकारी, शेतकी वगैरे इंग्रज करूं लागले. हेच रोजगार आपले लोकांनीं करावे. कांच, कापड, सुरी, कात्री, लांकडी सामान, घडयाळें, यंत्रें इ० पुष्कळ इंग्रज इकडे खपवितात. हीं सर्व आपले लोकांनीं करावयास शिकावें व येथें जो माल खपणार नाहीं तो दुसऱ्या देशांस घेऊन जावा व विकावा. याविषयीं शोध करावा

व इंग्रजांचे देशचें सामान बंद करावें, किंबहुना आपलें सामान त्यांस द्यावें, परंतु त्याचें आपण घेऊं नये. जो इकडे उत्पन्न होईल, तितकाच माल घ्यावा. विलायती कापड घेऊं नये. आपल्यांस जाडीं मोठीं कापडें नेसावयास लागलीं तर काय चिंता आहे ? परंतु आपले देशाचें रक्षण करावें. "

[ नं. ६० ता. १३ मे १८४९ ]

---

## ८ शतपत्रींतील शेवटची प्रार्थना.

"माझी तुम्हां सर्वांस एवढीच विनंति आहे कीं, तुम्हीं सर्वजण विचार करण्यास लागा, वाचावयास लागा, नवीन ग्रंथ व वर्तमानपत्रें वाचा, तुमचे शेजारीं काय होत आहे याचा विचार करा. इंग्रजांमध्यें किती एक चांगले गुण आहेत व ते तुम्हांस प्राप्त व्हावे म्हणून ईश्वरानें त्यांची तुमची संगत घातली आहे हें लक्षांत आणा, सारासार पहा, आंधळ्यांची माळ लागली म्हणून तीच परंपरा चालवूं नका. धर्मशील, ईश्वरतत्पर व्हा, या गुणांवाचून सर्व व्यर्थ आहे. सत्य बोला, दुष्टवासना सोडा, ईश्वरसंबंधीं व धर्मसंबंधीं ज्ञान सर्व लोकांत वृद्धिंगत करा. आळस सोडा. तुमच्यामध्यें वास्तविक बुद्धिमान असेल त्यास पुढारी करा व त्याचें अनुमतानें चाला. सर्व लोकांची जूट असूं द्या. आपसांत फूट नसावी हें ध्यानांत वागवा. सर्व देशाची काळजी प्रत्येकजणानें करावी. राज्य कसें चाललें आहे व राजा कोण, त्याची वर्तणूक कशी हें पाहत जा. माहितगार व्हा. संपत्तीवर लक्ष देऊन आळसांत राहूं नका. पैसा खाऊं नका, रांडबाजी करूं नका, प्रपंचसंसार भलाईनें करा, आपले शत्रूस देखील वाईट इच्छूं नका, शरीरानें व मनानें देखील पाप करूं नका, प्राणीमात्रावर दया करा, पण क्षमा न करण्याचा प्रसंग येईल तेथें क्षमा करूं नका, मुलांस शहाणीं करा, सर्व लोकांची काळजी करा, देव सोडूं नका. " ( ले. १०० ).

## त्यांचे मुख्यमुख्य ग्रंथ.

१. **गुजराथ देशाचा इतिहासः**—यांत गुजराथेंतील पूर्वीची हिंदु राजघराणीं व त्यांत प्रख्यात झालेले पुरुष, नंतर मुसलमानी व मराठी अंमलांतील राज्यकर्ते यांची हकीकत १८५६ मध्यें फॉर्बस् साहेबानें प्रसिद्ध केलेल्या " रासमाला " नामक गुजराथच्या इतिहासावरून मराठींत लिहिली आहे. ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति १८९४ मध्यें निघाली. प्रस्तावनेंत गोपाळराव लिहितात, " विद्याशौर्यपराक्रमरूपी जागृतावस्थेंत लौकिकाचीं, कीर्तिप्रसाराचीं व बुद्धिमत्तेचीं कामें आर्यावर्तांतील लोकांकडून प्राचीन काळापासून घडत आलीं...पण उदयास्त हे पदार्थमात्रास जसे लागलेले दिसतात तसे राष्ट्रीय

स्थितीसही चिकटलेले आहेतच. हिंदुस्थान निद्रावश झाल्यावर ज्या गोष्टी घडल्या त्या इतिहासांत नमूद आहेतच. मुसलमानांची कारकीर्दही हिंदूंच्या निद्रेंतील मध्यावधींत घडली...झोंप लागली आणि दारावर पाहरा करणारा कोणीच राहिला नाहीं, तेव्हां चोरांनीं व लुटारूनीं घरांत शिरून सर्व चीजवस्त सांवडून न्यावीं, त्याप्रमाणें भरतवर्ष निद्रावश झाल्यावर परदेशीय मंडळी गुरु, शिक्षक, उपदेशक, व्यापारी, उदमी, वैद्य इ. रूपांनीं तस्कर होऊन घरांत शिरली व होतें नव्हतें त्या सर्वांचा कबजा आपलेकडे घेऊन, उलट तेच आपल्याला घराचे मालक असें म्हणूं लागले !" ह्या ग्रंथांत माहिती पुष्कळ असून ग्रंथाची भाषा कशी साधी व भारदस्त आहे हें एका अवतरणावरून दिसतें.

**२. गीतातत्व** ( १८८० ):—मूळ गीतेंतून १८ तत्वें काढलीं असून ह्या विषयानुरोधानें मूळ श्लोक व त्यावरील वामनी समश्लोकी अशा क्रमानें दिले आहेत. ह्या आर्यसमाजी पुरुषाचें गीतेकडे लक्ष होतें एवढेंच यावरून दिसतें.

**३. आगमप्रकाशः**—हा तंत्रशास्त्रापैकीं एक ग्रंथ संस्कृतांत असून तो गोपाळरावांनीं प्रथम गुजराथी भाषांतरासह व नंतर मराठी भाषांतरासह व टीकेसह १८८४ मध्यें प्रसिद्ध केला. निगम ह्म० वैदिक शुद्ध मार्ग व आगम ह्म० मंत्रतंत्रांचा वाममार्ग. ह्या आगमप्रकाशांत शाक्तमार्गाचा पुरस्कार केला असून मद्यमांस परस्त्रीसेवनाचा दुष्ट मार्ग प्रतिपादिला आहे. व बहुवार प्रशंसिला आहे ! दुसरे उत्तमोत्तम ग्रंथ सोडून गोपाळरावानीं हाच ग्रंथ निरूपणास कां घेतला हें सांगतां येणें कठिण आहे. कदाचित् या मिषानें जुन्या समाजास चावे घेणें त्यास सोइस्कर वाटलें असावें व तसे त्यांनीं शेवटीं शेवटीं घेतलेही आहेत.

**४ स्वाध्याय** ( १८८० ):—लोकहितवादींच्या उच्छृंखळ मतांचा ओघ १८५० च्या आंत बाहेर वाहूं लागला व तो ३० वर्षांनीं आटत आला आणि थोडे सुविचार स्फुरूं लागले अशा संधिकालांतला हा ग्रंथ आहे. निबंधमालेंतील प्रखर टीकाही त्यांच्या डोळ्यांवरचें मिथ्याग्रहांचे पटल दूर करण्यास थोडीशी कारण झाली असली पाहिजे. 'पुराणें ह्म० केवळ शिमगा होत' हें पूर्वीचें मत बदलून पुराणांतही ग्राह्यांश बराच आहे असें "कृतांतकटकामलध्वजजरा दिसों" लागल्यावर त्यांना वाटूं लागलें. " अर्वाचीन साधुसंतांनीं मात्र पुराणांची खरी योग्यता ओळखिली होती असें दिसतें. पुराणांतील पुष्कळशीं वर्णनें म्हणजे कवीची लापिका किंवा रसभरित काव्य एवढी खूणगांठ मनाशीं बांधली म्हणजे पुराणांचा उद्देश ईश्वराचे

ठिकाणीं मनुष्यांची भक्ति वाढवावी असाच होता असेंच म्हणणें भाग आहे. मुख्य गोष्टी कोणत्या व अलंकारभूत कोणत्या याचें भान कवींना व वाचाकांना न राहिल्यामुळें खऱ्याचें खोटें होऊन घोंटाळा झाला आहे. तरी देखील अज्ञानी लोक, स्त्रिया, मुलें वगैरे यांच्यासमोर पुराणांनीं स्त्रीपुरुषांच्या चारित्र्याचे चांगले आदर्श पुष्कळच ठेवले व त्यामुळें हिंदुस्थानांतल्या स्त्रियांइतक्या सदाचरणी, धार्मिक, विनम्र, पापभीरु, सुशील अशा स्त्रिया इतर देशांत सांपडणार नाहींत. सर्वांनीं विचारपूर्वक पुराणांतील तत्वार्थांचें ग्रहण केल्यास पुराणांनीं एकंदरींत लोकांवर उपकारच केले आहेत असें म्हणावें लागेल. धर्माचें सौलभ्य पुराणांनीं करून दिलें, तोच क्रम त्यांतील रहस्य ओळखून प्राकृत साधुसंतांनींही चालू ठेवला. " जन्मभर पुराणांवर व जुन्या संस्कृतीवर प्रहार करणाऱ्या पुरुषाच्या तोंडून पोक्त वयांत हे उद्गार निघावे हा पुराणमताचा विजयच होय. स्वाध्याय ग्रंथांत यासारखे सुविचार कोठें कोठें प्रगट झालेले असले तरी जन्मभर जे विचार लोकहितवादींच्या उशापायथ्यांशीं धिंगाणा घालीत होते तेच याही ग्रंथांत प्रकट झालेले आहेत.

५ स्वाध्याय ( १८८० ):—लोकहितवादींच्या उच्छृंखल मतांचा हा ग्रंथ मूळ ८८ पृष्ठांचा असून त्यांस २५ परिशिष्टें जोडलीं आहेत व त्यांची पृष्ठसंख्या २३८ आहे ! ह्या ग्रंथांतही माहिती भरपूर असून लोकहितवादींच्या मतांचे ' कायम ठसे ' यांत उमटले आहेत. क्वचित् वयोमानाप्रमाणें भाषेंत सौम्यता आलेली आहे. स्वाध्याय ह्म० वेदाध्ययन हा जुना अर्थ. यांनीं स्वाध्यायांत सर्व प्रकारच्या बहुविध ज्ञानाचा समावेश केला आहे. या ग्रंथांत संहिता, ब्राह्मणें, आरण्यकें, उपनिषदें, मंत्रविचार, यज्ञ, धर्मशास्त्र, पुराणें, इ० चा विचार सांगितला आहे. परिशिष्टांत शाखभेद, उपवेद व वेदांगें, स्मृति, माहात्म्यें, निरुपयोगी ग्रंथ, कलियुग, स्त्रीनिंदा, आर्यग्रंथांचे वर्ग, उपनिषत्सिद्धांत, पतितपरावृत्तिनिर्णय, बालविवाह, विधवाविवाह, बौद्ध व जैन मत, वर्णभेद व जाति, भूगोल, इतिहास, नवीन तर्क व विद्या, राज्यमीमांसा इ० विषयांची त्यांनीं आपल्या मताप्रमाणें चर्चा केली आहे. आज ह्या विषयांचा सागोपांग विचार करण्यासारखीं साधनें अधिक उपलब्ध झालीं असून अधिक सारासार विचार करणारे पुरुषही सांपडतील, तथापि त्यावेळच्या मानानें गोपाळरावांनीं ह्या ग्रंथांत आपला बहुश्रुतपणा बराच दाखविला आहे. वेदवेदांतगृह्यसूत्रें यांतील वचनेंही प्रमाणार्थ दिलीं आहेत, तथापि ग्रंथ पद्धतशीर, प्रमाणबद्ध व शास्त्रीयपद्धतीनें लिहिलेला नसल्यामुळें व स्थळोस्थळीं ग्रंथकाराच्या अपरिपक्व मतांचाच पाल्हाळ फार असल्यामुळें हा अल्पकाळही समाजांत मान्यता पावला नाहीं.

६. **पृथ्वीराज चव्हाण**:—दिल्लीचे शेवटचे क्षत्रिय महाराज पृथ्वीराज चव्हाण यांचें हें चरित्र ' चंद ' कवीच्या चारण भाषेंतील ' पृथ्वीराजरासा ' नामक काव्य ग्रंथाधारें द्विवेदी यांनीं गुजराथींत केलें. त्यावरून लोकहितवादी यांनीं मराठींत त्याचें भाषांतर केलें. याची तिसरी आवृत्ति १८९९ सालीं निर्णयसागर प्रेसनें प्रसिद्ध केली. हें पुस्तक फार सुंदर असून कर्त्याच्या हयातींत बरेंच लोकप्रिय झालें होतें. तरुणांचें अशा पुस्तकाकडे लक्ष जाणें फार जरूर आहे. दिल्लीचा शेवटचा हिंदु राजा आपापसांतल्या झगडयांमुळें कसा पदच्युत झाला व हिंदुस्थानास पारतंत्र्याची रात्र तेणेंकरून सुरू झाली हा बोधप्रद इतिहास ह्या ग्रंथावरून कळून येतो.

७. **ऐतिहासिक गोष्टी**:—ह्या प्रथम तीन भागांत छापल्या होत्या. पण पुढें (१८९२) त्या निर्णयसागर छापखान्यानें ' ऐतिहासिक क्रमानें शिस्त लावून ' दोन भागांत पुन्हां प्रसिद्ध केल्या. पहिल्या भागांत मराठेशाहींतील गोष्टी, पेशवाईंतील, इंग्रजींतील, शिंदेशाहींतील, होळकरशाहींतील, गायकवाडींतील गोष्टी; दक्षिणेंतील सरदारांच्या गोष्टी; इतर मराठे सरदारांच्या गोष्टी; मराठी राज्यांतील किरकोळ माहिती; मोंगल बादशाहाच्या गोष्टी; इतर मुसलमान बादशहांच्या गोष्टी; रजपुतांच्या गोष्टी अशा संक्षेपानें दिलेल्या एकंदर २९४ गोष्टी आहेत ! दुसऱ्या भागांत विविध प्रकारची उपयुक्त माहिती दिली आहे. स्थलवर्णन, लोकवर्णन, ग्रंथ, ग्रंथकार, साधुपुरुष वगैरे; धर्म व धर्मप्रवर्तक; किती एक चालीरीति; उपयुक्त माहिती; उपदेशपर गोष्टी, किरकोळ टिपणें इ० २४३ मथळ्यांखालीं विलक्षण माहिती दिली आहे. स्थलवर्णनांत चार धाम, पंचप्रयाग, अष्टविनायक, सप्तपुऱ्या, मायजीची यात्रा, पंजाबांतील यात्रेचीं ठिकाणें, उन्हाळीं, लेणीं, हेमाडपंती इमारती, भुयारें, अजमीरचा पीर, गुजराथेंतील देवळें, पुणें, नाशीक इ० शहरें, धातुपाषाणाच्या खाणी, गायनांतील राग वगैरेची पुष्कळ माहिती आहे. ' लोकवर्णनांत ' ब्राह्मणांच्या जाती, पाटील-कुळकर्णी, रजपूत, भाट, लिंगाईत, तोडे लोक, कात्रे लोक, गोत्रेकरणी, भुताळे, पारशी इ० विषय आहेत. ' ग्रंथकारांच्या ' सदराखालीं वेद-ब्राह्मणें, स्मृति, सूत्रें, संहिता, पुराणें, उपपुराणें, टीका व भाष्यें, अप्पयादीक्षितादि संस्कृत ग्रंथकार, मुकुंदराजादि प्राकृत कवि, फेरेस्ता, मिराबाई इ० विषयावर माहिती दिली आहे. पुढें अनेक पंथांचे प्रवर्तक यांची माहिती आहे. ' उपयुक्त माहिती ' या सदराखालीं तर जैनांपासून टालेमीपर्यंत सर्व कांहीं आहे. दोन्ही भागांत मिळून जेवढी माहिती दिलेली आहे तेवढी वागवणारा पुरुष गोपाळराव देशमुखासारखा गेल्या शतकांत हिंदुस्थानांत दुसरा कोणी झाला नसेल! या गोष्टी वाचतांना आपण काय साऱ्या हिंदुस्थानचा प्रवास करीत आहोंत

कां एखादा अद्भुत मनोरा पहात आहोंत असें वाटतें! लोकहितवादींचीं विचित्र मतें पाहून उत्पन्न झालेला क्षोभ तत्काळ जिरतो व त्यांची प्रचंड साहसिकता, दीर्घोद्योग, बहुश्रुतपणा, बुद्धीचें व्यापकत्व, इ० गुणांच्या स्मरणानें अत्यंत विस्मय वाटतो. त्यानां त्यांच्या काळीं बोलता चालता ज्ञानकोश म्हणत असतील! ह्या एका पुरुषाला ही विविध-विषयांवरची माहिती त्या काळीं कशी एकत्रित करितां आली? कां याच्या हातीं जेवतां, खातां, लोकांशीं बोलतां— सर्वकाळ कागद पेन्सील होती व हा सारखी पुस्तकांतून, कोटांतून, प्रवासांतून कोणाशींहि बोलतानां, कांहींही कर्म करितांना सारखीं टिपणें घेत होता—काय असेल तें असो, याच्या बहुविध ज्ञानाची कमाल आहे खरी! माहितींत मोठी खोली आहे किंवा सर्व माहिती बिनचूक आहे असें नाहीं, तरी ही इतकी विविध प्रकारची माहिती एका पुरुषाला असणें म्हणजे नवलाचीच गोष्ट आहे. दोन तीन नमुने दाखवून हा विषय पुरा करितों.

## बापूशास्त्री शुक्ल यांचा जाब.

बापूशास्त्री शुक्ल हे जार्व्हिस साहेबांजवळ मराठी शिकवण्यास होते व साहेबांचेंहि त्यांचें ठायीं फार प्रेम असे. एके दिवशीं कर्नल जार्व्हिस हे त्यांस म्हणाले कीं ' बापूशास्त्री, तुमचें लोकांनीं, इंग्रजांस काढण्याची मसलत केली तर तुम्ही कोणीकडे राहाल '? तें ऐकून बापूशास्त्री यांनीं उत्तर केलें कीं ' खरें पुसाल तर आम्ही आपले लोकांकडे जाऊं. परंतु तुह्मांसारखें जे आमचे मित्र आहेत त्यांस जीव देऊन बचावूं; त्यांजविषयीं आम्ही कधींहि विश्वासघात करणार नाहीं." तेव्हां साहेब बोलले कीं ' तुम्ही खरी गोष्ट आहे ती सांगितली हें ऐकून मला संतोष झाला!' (ऐ. गो. भा. १–१५९)

## सखारामबापूचा अभिप्राय.

इंग्रजांनीं बोलणें लाविलें कीं ' आमचा वकील पुण्यास असावा ' तेव्हां दरबार भरला. तमाम मुत्सद्दी व सरदार यांस पाचारण केलें. तेव्हां सखाराम बापू बोकील यांनीं सांगितलें कीं "पेशव्यांचा वकील लंडनास ठेवावा, आणि इंग्रजांचा वकील पुण्यास आणावा; तर बरोबरी होईल. एकपक्षी वकील घेतल्यास आपल्या घरचा भेद बाहेर जाईल आणि दुसऱ्याचे घरचा भेद मात्र आपणास मिळणार नाहीं व येणेंकरून फजीती होईल आणि इंग्रज कलकत्त्यास वगैरे वाढत चालले त्याप्रमाणें येथेंही प्रवेश होऊन पसरतील!" परंतु हा बेत नाना फडणविसास ठीक वाटला नाहीं आणि त्यांनीं संमति दिल्ही. त्यावरून मिस्तर मालीट पुण्यांत येऊन राहिले. [ऐ. गो. भा. १–६६]

## औषधांचे कारखाने.

आतांसारखीं पेशवे कारकीर्दींत इस्पितळें नव्हतीं, तरी मोठे लोक वैद्यांचा

संग्रह करीत, व त्यांजकडून मोठमोठीं रसायनें, तेलें व चूर्णें तयार करवीत व त्यांचे येथें जे मागावयास येतील त्यांस तीं देत. सोलापूरकर जोशी यांची बाजीरावानें जप्ती केली तेव्हां त्यांचे घरीं तीन लाख रुपयांच्या मात्रा वगैरे वैद्यकीचे पदार्थ सांपडले ! रास्ते यांचे घरीं कारींचे २५० खल सुरू असत, आणि मोठालीं रसायनें तयार ठेवीत. [ ऐ. गो. भा. १–१३९ ].

## ताजकुंवर इचें शौर्य.

ताजकुंवर म्हणून ठाकूर जातीच्या क्षत्रियाची मुलगी कानपुराजवळ किसोरा गांवांत राहत असतां तिला नेण्याकरितां पठाणांनीं हल्ला केला. तेव्हां तिचे वाड्यास कोट व बुरूज होते त्यांजवर तिनें जाऊन तीरकमठ्यानें ८० पठाण मारले ! शेवटीं तिचा उपाय चालत नाहीं असें पाहून तिच्या भावानें तिचें शिर उडवून दिलें ! तिच्या शूरत्वाचें वर्णन हिंदुस्थानांत घरोघर करीत असतात. [ ऐ. गो. भाग १–२९० ].

## ठिकठिकाणचे पुजारी.

पंढरपूरचे पुजारी यांस बडवे म्हणतात. सप्तशृंगचे पुजारी यांस भोपे म्हणतात. त्रिंबकचे तुंगार, व्यंकोबाचे दासरी, तुळजापूरचे भुते, जेजूरीच्या खंडोबाचे वावे, मथुरेचे चोबे, कलकत्त्याच्या कालीचे पंडे, काशीचे गंगापुत्र, द्वारकेचे गुगुळिये, यलंमा व बनशंकरीच्या भाविणी, गयेचे गयावळ, प्रयागचे प्रयागवळ इ० [ ऐ. गो. भाग २–१७६ ].

## मराठी ग्रंथकार.

इंग्रजी ग्रंथांतून मराठी तर्जुमे करण्याचें काम प्रथम सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे यांनीं केलें. त्यांचे इसापनीति व बाळमित्र हे ग्रंथ फार प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत. बापू जोशी साष्टीकर यांनीं पुढें निघंट म्हणून वैद्यशास्त्राचा ग्रंथ केला. पुढें बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग वगैरे आले. प्रथम जर्व्हिस साहेब यांनीं सर्व्हेची पाहणी करण्याची विद्या शिकविली व गणिताचीं बुकेंही प्रसिद्ध केलीं. पुढें डॉक्टर तयार करण्याकरितां बुकें झालीं. त्यानंतर हरि केशवजी, गोविंद नारायण वगैरे पुष्कळ ग्रंथकार झाले व होत आहेत. परंतु हें ग्रंथकर्तृत्वाचें काम अद्यापि बहुत शिल्लक आहे व लोकांस अजून ह्याबद्दलची असावी तशी रुचिही नसून ज्ञानवृद्धीस आपले लोक फार पराङ्मुख व उदासीन आहेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे ! ( ऐ. गो. भाग २–९८ )

## नाशीक.

" पूर्वीची १२–१२ व १८–१८ पायल्यांची धारण जाऊन लोकांस महर्गता शके १७८० च्या कपिलाषष्ठीपासून प्राप्त झाली. नाशीकक्षेत्र फार द्रव्य-

वान् असून सोन्यारुप्याचे दागिने घालून बायका गोदावरीवर पाण्यावर येत त्यांचे हातांतील शेरभर सोनें रोज गंगेचे घाटावर झिजत असे असें म्हणतात. अजबसिंग, हरिपंत भावे, पेंढारी, अमृतराव पेशवे यांनीं येथील द्रव्य लुटून नेले. ”

[ ऐ. गो. भा. २–३५ ].

## तात्पर्य.

ह्यांनीं लोकहितार्थ लेखनवाचनाचा व्यासंग जन्मभर ठेवला होता. हे अत्यंत निरलस, निर्व्यसनी, बहुश्रुत व परोपकारी पुरुष सरकारांत व लोकांत मान्यता पावलेले होते, यांचे विचार त्यावेळच्या मानानें फार पुढें गेले होते. हे सुधारणामतवादी होते. निबंधमालाकारांनीं यांच्या मतांचा पुढें पुरा समाचार घेतला. यांचीं मतें विसरून यांच्या दीर्घोद्योगाचें स्मरण करावें; आपल्या देशाची, धर्माची, भाषेची, उद्योगधंद्यांची अभिवृद्धि व्हावी; लोकांनीं आळस झाडून देशासाठीं उद्योगनिरत व्हावें ही त्यांनीं अहर्निश तळमळ बाळगिली होती. पृथ्वीवरील राष्ट्रें विद्यावैभवसंपन्न आहेत आणि हिंदुस्थानचे लोक मात्र अज्ञानांधकारांत बुडून गेले आहेत याबद्दल त्यांना अत्यंत खेद वाटे, व म्हणून देशाला चार धक्के देऊन जागृत करण्याचा त्यांनीं ग्रंथलेखनद्वारां प्रयत्न केला. त्यांनीं जुन्या समाजाचा उपहास केला व त्यांना त्या समाजानें तोच अहेर केला. त्यांनीं सुधारणेस अनुकूल असे ३२ ग्रंथ लिहिले व शेंकडो व्याख्यानें दिलीं. धर्म, जाति, शास्त्रें, बालविवाह, आचारधर्म, भिक्षुकवर्ग, हिंदुधर्म, संस्कृतभाषा या सर्वांवर लोकहितवादींनीं टीकास्त्रांचा बेताल व कठोर मारा केला. “ मी कोणाची मजुरी पत्करिली नाहीं, कशाची अपेक्षा, आशा किंवा इच्छा धरिली नाहीं, लाभावर किंवा द्रव्यावर नजर देऊन कीर्ति व्हावी या हेतूनें लिहिलें नाहीं. इतके जे श्रम केले ते फक्त लोकांस त्यांची वास्तविक स्थिति कशी आहे ती कळावी, त्यांनीं सुधारावें, त्यांस इहलोकीं सुखवृद्धि व्हावी, परलोकाचें साधन घडावें व आपले दीर्घ काळापासून दृढ ग्रह झाले आहेत त्यांपैकीं कांहीं अविचारानें व मूर्खपणानें जडलेले आहेत ते कमी व्हावे किंवा नाहींसे व्हावे इतक्याच हेतूनें मी यथामतीनें व स्वइच्छेनें वेतनावांचून श्रम केले आहेत ” असें त्यांनीं म्हटलें आहे. हे आर्यसमाजी होते व घरीं पार्थिवपूजाही नित्यनेमानें करीत ! यामुळें नव्या व जुन्या लोकांची यांना टीका सोसावी लागे. त्यांच्या विचारांचा ओघ नवीन काळाकडे चालला होता पण त्यांचें स्वतःचें जुनें वळण सुटलें नव्हतें ! त्यांनीं आपल्या चिरंजीवास विलायतेस विद्याभ्यासार्थ पाठविलें. पण फायनेन्स कमिटीवर साक्ष देण्याकरितां यांना सरकारानें आमंत्रण केलें त्यावेळेस लोकहितवादीनें आमंत्रणाचा अव्हेर करून जातीच्या अमलास्तव विलायतेस जातां येत नाहीं

असें सरकारास पत्रद्वारें कळविलें. तें पत्र प्रसिद्ध झालेलें आहे. प्रसंगीं स्वदेशाचें कल्याण करण्याचा आणि स्वदेशबांधवांच्या गुरुस्थानीं प्रतिष्ठित होण्याचा व खरें धैर्य प्रत्यक्ष दाखविण्याचा समय आला असतां बरींवाईट कारणें सांगून टाळावा ह्यांत काय भूषण असेल तें असो. कित्येकांच्या डोक्यांत असें वेड शिरलें आहे कीं, आपण रामदास, ल्यूथर, तुकाराम इत्यादिकांचे अवतार आहोंत. परंतु तशी कृति करण्यास जेव्हां ते प्रवृत्त होतात तेव्हां 'रासेलस नामक कादंबरींतील पंख लावून उडणाऱ्या यंत्रशास्त्रयांप्रमाणें त्यांची दशा होते." [वि० वि०].

---

# गोंदवलेकर महाराजांची गुरुपरंपरा.

लेखक—(रंगनाथ केशव साकळे,) यवतमाळ.

आपण आपल्या संतचरित्र-मालेंत श्री साधु गोंदवलेकर महाराजांचें लहानसें चरित्र दिलें आहे. त्यांत पान २२८ वर महाराजांची गुरुपरंपरा दिली आहे, ती अशीः—" आदिनारायण-ब्रह्मा-वशिष्ठ-राम-रामदास-कल्याण-बाळकृष्ण-चिंतामणि-रामकृष्ण-तुकाराम-ब्रह्मचैतन्य ह० गोंदवलेकर महाराज;" व पुढें खालीं त्याच पानावर लिहितां कीं, "समर्थांची परंपरा कल्याण स्वामींकडून चालू झाली व त्या परंपरेंतले गोंदवलेकर आहेत इ०"

गोंदवलेकर महाराज हे समर्थांच्या परंपरेंतले नव्हेत. त्यांचे गुरु श्रीतुकाराम महाराज येहळेगांवकर हे आदिनाथ संप्रदायांतले आहेत, व त्यांची परंपरा निराळी आहे. श्री तुकाराम महाराजांचें दर्शन लेखकाला अनेक वेळां झालें आहे. श्री तुकाराम महाराजांचे गुरु श्री चिन्मयानंद यांची समाधि उमरखेड येथें आहे. गोंदवलेकर महाराजांचे प्रसिद्ध शिष्य महाभागवत कुर्तकोटी (प्रस्तुत शंकराचार्य संकेश्वर व करवीर) यांनीं तीन चार वर्षांपूर्वी मुद्दाम येऊन येहळेगांव व उमरखेड येथील समाधींचें दर्शन घेतलें आहे. चिन्मयानंदांचे मुख्य शिष्य पांच. १ मुरवाजी २ श्रीनिवास ( बाबा महाराज ) ३ गोचरस्वामि ( सहजानंद ) ४ रावसाहेब शेवाळकर ( पूर्णानंद ) आणि ५ तुकाराम महाराज ( ब्रह्मानंद ) शेवटल्या तीन मूर्तीसंबंधानें कांहीं कथा मागें पुण्याच्या जगद्धितेच्छु वर्तमानपत्रांत आल्या होत्या.

तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा येहळेगांव येथील नित्य पाठांत आहे तीः-

१ आदिनाथ २ मच्छिंद्रनाथ ३ गोरक्षनाथ ४ मुक्तातटेश्वर ५ चक्रपाणि ६ विमलाचांगदेव ७ जनार्दन ८ नरहरि ( नृसिंह ) ९ विश्वेश १० केशवराज ११ बोपया १२ हरिदास १३ कान्हया १४ सदानंद १५ कृष्ण १६ शामसुंदर १७ अनंत १८ प्रल्हाद १९ नागया २० एकनाथ ( नानादेव ) २१ विठ्ठल किंकर २२ चिन्मयानंद २३ तुकाराम (ब्रह्मानंद) व २४ गोंदवलेकर महाराज.

---

## मध्वमुनीश्वरांचें संक्षिप्त चरित्र.

( मागील अंकावरून चालू )

नंतर त्रिंबकानें प्रदक्षिणा पुरी करून पुन्हा जगदंबेचें दर्शन घेतलें व नाशिकचा रस्ता धरला. मुक्काम करीत करीत स्वारी घरीं येऊन दाखल झाली. आईबाप सोडल्यास त्रिंबकास फार दिवस झाले होते व पुत्रवियोगानें वृद्धापकाळीं त्यांनाही फार दुःख होऊन तेही झुरणीस लागले होते. मुलास पाहातांच पित्यानें त्यास प्रेमभरानें आलिंगिलें; नेत्रांत अश्रूंचा पूर लोटला. तो आवेग ओसरल्यावर गणेशानें सर्व हकीकत विचारली. एकंदर वृत्तांत ऐकून त्यानें स्वतःस धन्य मानून घेतलें व पुत्राच्या ठिकाणीं त्याचा स्नेह अधिकच वृद्धिंगत झाला.

कांहीं दिवसांनीं योग्य मुहूर्तावर त्रिंबकाचा विवाह उरकण्यांत आला.

---

## प्रकरण २ रें.

सद्गुरूची कृपा झाल्यापासून त्रिंबकाच्या ठिकाणचा द्वैतभाव पार मावळला. याविषयीं मध्वमुनि रूपकांत म्हणतातः—

सद्गुरु बेडर भेटे ज्या मानवा । तयाचा जाणावा भाग्योदय ॥ १ ॥
ब्रह्मारण्यामध्यें बेडर घेउनि गेला । ज्ञानखड्गें केला जीवघात ॥ २ ॥
द्वैतवासनेची होती जी बोखटी । ती केली मोकळी धोकटी जी ॥ ३ ॥
लौकीक लज्जेचें होतें जें अंबर । तें नेलें दिगंबर जालों आतां ॥ ४ ॥

लौकीकबंधनापासून आतां तो मुक्त झाला असल्यामुळें त्याचें वर्तन लोकदृष्टीला स्वैर आहेसें वाटूं लागलें. "आम्हीं नागवे भोपळे । खेळों त्रिभुवनीं मोकळे" अशी त्याची वृत्ति झाली होती. त्रिंबक माध्वसांप्रदायी होता म्हणून मागें सांगितलेंच आहे. परंतु आतां त्याला शिवविष्णु हे सारखेच होते. शिवरात्रीस उपवास, स्मार्तांच्या घरीं अन्नभक्षण इत्यादि वीरवैष्णवांच्या सांप्रदायाविरुद्ध होत असलेलें त्याचें आचरण पाहून तेथील वैष्णवांचा तिळपापड झाला. त्यांनीं त्यास अपंक्त केलें व सांगितलें कीं सद्धर्माविरुद्ध तुमचें वर्तन घडत आहे. याबद्दल तुम्हांस प्रायश्चित्त घ्यावें लागेल. त्रिंबकानें त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला परंतु मंडळीनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. शेवटीं त्यांच्या समजुतीकरतां त्यानें प्रायश्चित्त घेण्याचें कबूल केलें. लगेच मंडळीनें तयारी करून

आपल्या समजुतीप्रमाणें त्यास प्रायश्चित्त दिलें. त्रिंबकास त्याबद्दल कांहींच विधिनिषेध वाटला नाहीं व त्याचें वर्तन पूर्ववत चालूंच राहिलें.

आपली हा मुळींच पर्वा करीत नाहीं असें पाहून कांहीं मंडळीनीं मध्वाचार्यांकडून त्यास शिक्षा करविण्याचा विचार केला. त्यांनीं पत्र लिहून आचार्यांस सर्व हकीकत कळविली. स्वामींनींही तिकडे येऊं त्यावेळीं विचार करूं म्हणून कळविलें. लवकरच स्वामी संचार करीत करीत नाशिक मुक्कामीं येऊन दाखल झाले. मंडळी त्या प्रसंगाची वाटच पाहून होती. नित्याप्रमाणें स्वामी संध्यापूजनादि कर्में करीत असतां मंडळी दर्शनास येत जात होती. कांहीं उपद्व्यापी मंडळींनीं त्रिंबकासही तेथें आणून बसविलें. स्वामी त्यावेळीं मानसपूजेंत गुंतले होते. पूजेंत नित्याप्रमाणें मूर्तीस अलंकार अर्पण करीत असतां रत्नमाला घालूं लागले तों ती लहान पडूं लागली व स्वामी घोटाळ्यांत पडले. स्वामींची मुद्रा चिंतातुर पाहून त्रिंबकानें नम्रपणें सुचविलें “ महाराज, कानांतील कुंडलें काढून घेऊन नंतर माला समर्पण करावी. ” आपल्या मनांतील अडचण जाणून तिचा निरास करणारे गृहस्थ कोण म्हणून स्वामींनीं चौकशी केली. त्यावर ज्याविषयीं आपणांस पत्र आलें होतें तेच हे गृहस्थ असें लोकांनीं त्यांस कळविलें. स्वामींनीं तत्काळ जाणलें कीं हा मनुष्य सामान्य नसून याची योग्यता फार मोठी असली पाहिजे. त्यांनीं लगेच ‘ मुनिमहाराज ’ म्हणून त्यांस नमस्कार केला. हा चमत्कार पाहून तेथें जमलेल्या मंडळीस फार नवल वाटलें. त्रिंबकास शिक्षा लावण्याकरतां चंग बांधून आलेली मंडळी तर फारच खजील झाली. स्वामींनीं मंडळीस सांगितलें कीं, तुम्ही अज्ञानामुळें ह्याची योग्यता जाणत नाहीं. हा पुरुष सामान्य नसून जगाच्या कल्याणार्थ याचा अवतार आहे. तरी तुम्हीं याच्या वाटेस जाऊन विघ्न करूं नये. इतकें बोलून स्वामी आपल्या पूजेस लागले व त्रिंबकही स्वामींस नमस्कार करून घरीं परतला. त्या दिवसापासून ‘ मध्वमुनि ’ व ‘ मध्वनाथ ’ ह्या नांवानें त्याची लोकांत प्रसिद्धि झाली.

लवकरच ही वार्ता शृंगेरीचे श्रीशंकराचार्य नाशकास आले असतां त्यांच्या कानावर गेली. तेव्हां त्यांस वाटलें कीं असे जे गृहस्थ आहेत त्यांची भेट व्हावी. त्याप्रमाणें त्यांनीं गांवांतील शिष्टमंडळीकरवीं त्रिंबकास बोलावून आणलें. उभयतांची भेट होऊन कांहीं वेळ ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी झाल्या. मध्वमुनींची योग्यता पाहून आचार्यांस परम संतोष वाटला व त्यांनीं मध्वमुनींस ‘वरदपरात्पर’ म्हणून गौरविलें. लोकांनाही आतां मध्वमुनींची वास्तविक योग्यता कळून त्यांजविषयीं आदर उत्पन्न झाला.

कांहीं दिवस गेल्यावर मुनीश्वरांनीं तीर्थाटनास जाण्याचा विचार केला. प्रथम नाशकापासून जवळच असलेल्या भृगुऋषींच्या स्थानाकडे जाऊन

( हल्लींचें भगूर ) तेथें गजाननापाशीं अनुष्ठान केलें. गजाननानें प्रसन्न होऊन वरप्रसाद दिला कीं आजपासून तुम्हीं कवित्वरूपानें ईशस्तवन करीत जावें. तेव्हांपासून मध्वमुनि कवित्व करूं लागले. येथून पुढें त्रिंबकेश्वरास गेले. शंकराची पूजा करून ब्राम्हणभोजन घातलें. नंतर मध्वनाथांची स्वारी जेजुरी, मयुराद्रि, शेषाद्रि, रामेश्वर, परळी इत्यादि स्थळीं जाऊन त्या त्या देवतांची पूजाअर्चा, स्तवन करीत करीत अहमदनगर जिल्ह्यांतील पारनेरास येऊन पोहो-चली. त्या स्थळीं शिवलिंग गुप्त होतें. त्याची स्थापना करून प्रसिद्धि केली. पूजाअभिषेकादि करून ब्राह्मणभोजन घातलें. तेथून निघून मुनीश्वर नाश-कास परत आले. यात्रा निर्विघ्नपणें पार पडली म्हणून लगेच माउंदें करण्यांत आलें.

यानंतर कांहीं दिवसपर्यंत मध्वमुनींचें नाशकासच वास्तव्य होतें. त्या अव-धींत पूर्वीप्रमाणेंच त्यांचा क्रम चालू होता. पुन्हां तेथील ब्रह्मवृंदानें त्यांजवर अन्यतऱ्हेचे दोषारोप करून प्रायश्चित्त देण्यासाठीं गंगेंत नेलें, तों काय चम-त्कार घडला पहाः—सप्तशृंगीस एक कुष्ठी ब्राह्मण, कुष्ठ नाहींसें व्हावें एतदर्थ देवीजवळ अनुष्ठान करीत बसला असतां त्यास दृष्टांत जाला कीं नाशकास मध्वमुनिनामें ब्राह्मण आहे त्यास उदयीक तेथील मंडळी प्रायश्चित्त देणार आहेत. तो स्नान करूं लागला असतां तूंही त्याच प्रवाहांत खालच्या बाजूस स्नान कर म्हणजे तुझें कुष्ठ दूर होईल. यावर ब्राह्मणानें गडबडीनें नाशकास येऊन मध्वमुनींचा तपास केला. तों ते स्नानास गेल्याचें कळलें. ब्राह्मणानें त्वरेनें गंगेवर जाऊन दृष्टांताप्रमाणें स्नान करतांच त्याचें कुष्ठ नाहींसें झालें. हा चमत्कार अवलोकून लोकांनीं त्यास पुसलें असतां त्यानें सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून आपण विनाकारण सत्पुरुषाचा छळ केला असें वाटून सर्व मंडळी मध्वमुनीस शरण गेली.

मध्वमुनींचा पुन्हा तीर्थाटनास जाण्याचा विचार झाला व पुन्हां नाशकास येणें होणार नाहीं म्हणून स्त्रीस सांगितलें. यावेळीं मध्वनाथास एक मुलगा झाला होता. आपल्यामागें, गृहस्थाश्रमास योग्य अशा तऱ्हेनें वागण्याविषयीं स्त्रीपु-त्रांस त्यांनीं उपदेश केला. प्रपंचांतच परमार्थाकडे लक्ष देत जा म्हणून सांगि-तलें व मध्वमुनि जावयास निघाले. मध्वमुनि नाशिक सोडून जाणार ही बातमी गांवांत कळतांच लोक जमा झाले व आम्हांस सोडून जाऊं नका म्हणून महा-राजांस विनवूं लागले. परंतु त्यांचा जाण्याचा निश्चय झाला होता. शेवटीं लवकरच तुमच्याआमच्या भेटीचा योग येईल असें आश्वासन देऊन मुनिमहा-राज पंचवटींत रामचंद्राच्या दर्शनास गेले. लोकांचा निरोप घेऊन स्वारी पुण-तांब्यास जाण्यास निघाली.

चांगदेवांनीं प्रत्यक्ष प्रगट होऊन मध्वमुनींची भेट घेतली. चांगदेवांचा निरोप घेऊन ते कोपरगांवास गेले. तेथें बेटांत कचेश्वराचें स्थान आहे. कचेश्वराची पूजा करून व ब्राह्मणभोजन घालून नाथमहाराज नेऊर येथें आले. संकटेश्वराची पूजा करून एक दिवस तेथें मुक्काम केला. त्यानंतर ते त्रिस्थळीस जाण्यास निघाले. प्रवरासंगम, टोकें व कायगांव हीं तीन गांवें नदीकांठीं अगदीं जवळजवळ आहेत. या ठिकाणीं प्रवरेचा गोदावरीशीं मनोहर संगम झाला आहे. टोकें व प्रवरासंगम यांच्यामध्यें प्रवरानदी असून प्रवरासंगम व कायगांव गंगेच्या कांठीं समोरासमोर आहेत. संगमावर गांव आहे म्हणून एका गांवचें नांव प्रवरासंगम पडलें आहे. ह्या तीन क्षेत्रांस मिळून त्रिस्थळी म्हणतात. येथें मात्र महाराजांचा मुक्काम बरेच दिवस होता. प्रवरासंगमास घोटेश्वर व संगमेश्वर, टोक्यास सिद्धेश्वर व कायगांवास मुक्तेश्वर अशीं महादेवाचीं स्थानें आहेत. त्यांच्या पूजा करून व यथाशक्ति ब्राह्मणांस अन्नदान करून त्यांनीं ब्राह्मण संतुष्ट केले.

नंतर मध्वमुनि नेवाश्यास गेले. तेथील मोहिनीरूप पाहून त्यांस फार आनंद वाटला. मोहिनीराजाचें पूजन करून नानाप्रकारें स्तवन केलें व नैवेद्य समर्पण करून प्रसाद घेतला. येथून ते औरंगाबादेस जाण्यास निघाले. औरंगाबादेविषयीं एक दंतकथा तेथील लोकांत प्रसिद्ध आहे ती अशी:—औरंगजेब बादशहा शिकारीहून परत येत असतां एक चमत्कार त्यानें अवलोकन केला. तो असा कीं, तेथें एक ओहोळ आहे, त्या ठिकाणीं एक वाघ व हरीण जवळजवळ पाणी पीत होते. पाणी पिणें झाल्यावर ते दोघेही शांतपणें आपापल्या मार्गानें निघून गेले. ते पाहून औरंगजेबास वाटलें कीं ही पुण्यभूमि आहे. त्यानें गांवाचें पूर्वीचें खडकी हें नांव बदलून औरंगाबाद असें ठेविलें व ती एका सुभ्याची राजधानी केली. असो. औरंगाबादेस विसा मोरो नांवाचे मोंगलांचे एक अधिकारी होते. त्यांच्या पदरीं अमृतराय नांवाचे गृहस्थ असत. त्यांची कचेरींत जाण्याची व मध्वमुनींची त्यांच्या घरीं भिक्षेस जाण्याची वेळ एक होई. असा कित्येक दिवस क्रम चालला असतां एके दिवशीं अमृतरायास राग येऊन त्यांनीं भोंदू म्हणून मध्वमुनींची बरीच अवहेलना केली. सद्‌गुरूंनीं जाणलें कीं, अमृतराय बृहस्पतीचा अवतार असून मायाजाळांत गुरफटला आहे. त्याची मुक्तता केली पाहिजे. ते म्हणाले " अमृतराया, तुझें नांव तर फारच गोड आहे. परंतु कृति मात्र वाईट आहे. तुला ईश्वरानें उत्तम वाणी दिली आहे, तिचा उपयोग लोकांच्या कुचेष्टा करण्यांत न करतां जर ईशस्तवनाकडे केलास तर तुझेंच कल्याण होईल. एरवीं तिचा कांहीं उपयोग नाहीं. " इतकें बोलून मध्वमुनि चालते झाले त्यांचे ते स्पष्ट कानउघाडणीचे शब्द अमृतरायजींच्या कानांत सारखे घुमू लागले. विचाराअंतीं रायजीस आपल्या

वर्तनाचा पश्चात्ताप होऊन ते मध्वनाथास शरण गेले. सद्गुरूनींही त्यांस उपदेश करून योग्य मार्ग दाखविला. त्या दिवसापासून अमृतरायजींचा वर्तन-क्रम पार बदलून गेला.

औरंगाबादेस मध्वमुनींचा मुक्काम असतां एक गोष्ट घडली ती अशीः— औरंगाबादेस जासूदपुरा म्हणून एक विभाग आहे. त्या पुऱ्यांतील आडावर एके दिवशीं बायका पाणी भरीत असतां एकीच्या पोहऱ्यांत एक ताजें त्रिद-लयुक्त बिल्वपत्र आलें. जवळपास एकादें देवस्थान नसल्यानें तें येथें कसें आलें याविषयीं चमत्कार वाटून तिनें तें इतर स्त्रियांस दाखविलें. त्यांनाही नवल वाटून त्या आपापल्यापरी नाना तर्क करूं लागल्या. शेवटीं एक पोक्त बाई म्हणाली, "बायांनो, गांवांत मध्वमुनि नांवाचे एक साधुपुरुष आले आहेत. त्यांना ही गोष्ट आपण कळवूं म्हणजे झाल्यास कदाचित् उलगडा होईल." ही सूचना सर्वांस मानवून कांहीं स्त्रिया मध्वमुनींकडे आल्या व त्यांस सर्व हकीकत विदित केली. मध्वमुनि लागलीच त्या कूपाजवळ गेले व तें बिल्वपत्र पाहून त्यांनीं जाणलें कीं आडांत शंकराचें लिंग असलें पाहिजे. त्यांनीं आसपासचे लोक जमवून आडांत शोध केला. परंतु कांहीं सांपडलें नाहीं. गुरुमहाराजांस वाईट वाटलें. त्यांनीं शंकराची स्तुती करून दर्शन देण्याविषयीं आळविलें. लोक घरोघर निघून गेले व मध्वनाथही जवळच विश्रांतीसाठीं पडले. तों त्यांस झोंप लागली. झोंपेंत त्यांना एक स्वप्न पडलें. स्वप्नांत शंकरांनीं येऊन सांगितलें कीं मी कूपांत उजव्या बाजूस कपारींत आहे तेथून मला वर काढून घे. जागें झाल्यावर मध्वमुनींनीं लोकांस आप-णांस पडलेलें स्वप्न सांगितलें व पुन्हा शोध करण्याविषयीं विनंति केली. लोकांनीं आडांत उतरून सांगितल्या ठिकाणीं पाहिलें तों शंकराचें लिंग हातास आलें. तें त्यांनीं मध्वमुनींच्या स्वाधीन केलें. त्यांनीं कूपाजवळच त्याची स्थापना करून तेथें अनुष्ठानास प्रारंभ केला. कैलासनाथानें प्रसन्न होऊन 'इच्छित माग' म्हटल्यावर "गंगोदकानें आपलें पूजन करावें अशी इच्छा आहे. तरी येथेंच गंगा निर्माण करावी" असा त्यांनीं वर मागितला. त्यावर शंकर म्हणाले. "हे मुने, ह्या ठिकाणीं यवनांची वस्ती बहुत असल्यानें गोहत्यादि अनेक पापें नित्यशः होतात. तस्मात् अशा ठिकाणीं गंगा येणें नाहीं. तथापि तुझी इच्छा आहेच तर ती राजसदन क्षेत्राचें ठिकाणीं पूर्ण होईल." इतकें बोलून गिरिजारमण गुप्त झाले.

पुढें मध्वमुनि औरंगाबादेजवळच असलेल्या साताऱ्यास गेले. तेथें मल्हारी म्हाळसाकांत पुजून त्यांनीं हरसुली क्षेत्राचा मार्ग धरला. हरसुलीस तीर्थांत स्नान करून शिवप्रार्थना केली व स्वारी पुन्हा औरंगाबादेस परत आली.

मध्वमुनींचे समकालीन निपटनिरंजन नांवाचे सत्पुरुष औरंगाबादेस बेगमपुऱ्यापलीकडे अरण्यांत राहात असत. त्या भागास पहाडसिंगपुरा असें म्हणतात. हा भाग हल्लीं जोधपूर संस्थानच्या ताब्यांत आहे. निपटमहाराजांच्या आश्रमीं मध्वनाथांनीं ज्ञानेश्वरी सांगितली ती निपटनिरंजन, मानपुरीबुवा, सुभानशहा व शाहनूर हमवी (ही मंडळीही तत्कालीन सत्पुरुषांपैकींच होती.) यांनीं श्रवण केली. कार्तिक वद्य ११ स पोथीची समाप्ति झाली. त्याच जागीं सध्यां निपटनिरंजन यांची समाधि असून तेथें कार्तिक वद्य ११ पासून त्रयोदशीपर्यंत दरसाल उत्सव होतो. हा व मध्वनाथांनीं जे जे उत्सव केले ते सर्व उत्सव, मध्वनाथांचे सांप्रदायिक शिष्य श्रीनाथराव जाहगिरदार हे पूर्वजांपासून चालत आल्याप्रमाणें आजतागायत करीत असतात.

---

# प्रकरण २ रें.

औरंगाबादेहून मध्वमुनि शेंदूरवादें येथें गेले. तेथें नदीकांठीं असलेल्या स्वयंभू श्रीगजाननाचें दर्शन घेऊन फार स्तुति केली. खामगंगा नदीकांठीं असलेल्या अश्वत्थवृक्षाखालीं त्यांनीं आश्रम केला व इतःपर तेथेंच कालक्रमण करण्याचें ठरविलें. तो वृक्ष अद्याप पावेतों विद्यमान असून त्या आश्रमाच्या जागीं त्यांच्या शिष्यांनीं प्रचंड मठ बांधिला आहे.

मध्वमुनीश्वरांनीं शेंदूरवाद्यास कायमचें वास्तव्य केल्याचें वर्तमान औरंगाबादेस समजलें तेव्हां अमृतरायादि शिष्यमंडळी महाराजांच्या दर्शनाकरितां शेंदूरवाद्यास आली. अमृतरायजींस आतां संसाराचा पूर्ण तिटकारा येऊन आंगीं विरक्ति बाणली होती. त्यांनीं सद्‌गुरूस सांष्टांग नमस्कार घालून उपदेश देण्याविषयीं विनम्रपणें विनंति केली. मध्वनाथांनींही त्यांचा भाव जाणून त्यांस अनुग्रह दिला.

एके दिवशीं योग्य समय पाहून शिष्यांनीं सद्‌गुरूस पुसलें "महाराज, आपण दुसरीं प्रसिद्ध क्षेत्रें सोडून ह्याच ठिकाणीं वास्तव्य केलें, तेव्हां ह्याही क्षेत्राचा महिमा माहीत व्हावा अशी चरणांपाशीं विनंति आहे." त्यावर सद्‌गुरु सांगते झाले.—

हे अमृतरायादि प्रिय शिष्यांनो, मी आतां ह्या क्षेत्राचा महिमा सांगतों तो श्रवण करा. एके समयीं आदिनाथ शंकर फिरत फिरत सहज ब्रह्मलोकाचे ठायीं प्राप्त झाले असतां ब्रह्मदेव निद्रिस्त होते. त्यांस त्यांनीं जागें केलें. निद्राभंग झाल्यामुळें ब्रह्मदेवानें कोपयुक्त होऊन जांभई दिली तेव्हां त्या जांभईपासून एक विशाळ पुरुष निर्माण झाला. तो रक्तवर्ण असून त्याचें सौंदर्य

कामासही लज्जित करीत होतें. त्या पुरुषास समोर पाहून ब्रह्मदेवानें विचारलें "हे पुरुषा, तूं कोण आहेस? कोठून आलास? आणि मजकडे तुझें काय काम आहे?" तो पुरुष विस्मित होऊन म्हणाला "जृंभेपासून झालेला मी तुमचा पुत्र असतां तुम्हीं असें कसें पुसतां? मजवर कृपा करून माझें नांव मला कळवा. माझें भक्ष्य कोणतें व माझें कार्य काय तेंही मला सांगा." ब्रह्मदेव म्हणाले "तुझा देह रक्तवर्ण असल्यानें तुला सिंदूर हें नांव होवो. त्रैलोक्यापेक्षांही तुझें सामर्थ्य अधिक होईल व क्रोधयुक्त होऊन ज्याला ज्याला तूं आलिंगिशील त्याचे त्याचे शतशः तुकडे होतील. तुला पंचमहाभूतें, देव, दानव, मनुष्य, लोकपाल, काल, नाग, यक्ष, सजीव किंवा निर्जीव, यांजपासून दिवसा किंवा रात्रीं कधींही भय नाहीं. त्रैलोक्यांत तुझी इच्छा असेल त्या ठिकाणीं रहा." ह्या वरानें संतुष्ट होऊन सिंदूरानें गर्जना करून त्रैलोक्य कंपित केलें व ब्रह्मदेवाची स्तुति करून व त्यास प्रदक्षिणा करून तो आपल्या स्थानाप्रत जाण्यास निघाला. मार्गांत त्याच्या मनांत शंका उत्पन्न झाली कीं, आपण कोणत्याही प्रकारें जप, तप, दान वगैरे कांहींएक न करतां ब्रह्मदेवानें वर कसे दिले? ते खरे आहेत कीं खोटें आहेत? वराची प्रचीति पहाण्या-करितां तो ब्रह्मदेवाकडेच परत आला व दंड ठोकून व भयंकर गर्जना करून तो ब्रह्मदेवास कवटाळण्यास तयार झाला. ब्रह्मदेव म्हणाला "केवळ पुत्र स्नेहानें अन्यांस दुर्लभ असे वर मी तुला दिले असतां तूं माझाच नाश करूं पाहतोस, तस्मात् हे दुष्टा, तूं दैत्य होशील व परमात्मा गजानन अवतार घेऊन तुला मारील. तुझ्या मृत्यूमुळें त्याचा देह सिंदूराप्रमाणेंच आरक्त होऊन तो सिंदूरप्रिय होईल." इतकें बोलून भयामुळें ज्याचें सर्वांग घामानें डबडबलें आहे असा तो ब्रह्मदेव विष्णुलोकाप्रत पलायन करता झाला. भगवान् विष्णूनें त्यास धीर देऊन भीतीचें कारण विचारलें असतां ब्रह्मदेवानें सर्व हकीकत सांगितली. इतक्यांत तो दैत्य ब्रह्मदेवाच्या पाठोपाठ तेथें येऊन पोहोंचला. विष्णु त्यास म्हणाले "मी आपल्या विश्वपालनाच्या कामांत नेहमीं गुंतलेला असतों, आणि हा ब्रह्मदेव ब्राह्मण असल्यानें ह्याशीं युद्ध करणें तुला योग्य नाहीं. तुझ्याशीं युद्ध करण्यास शंकर योग्य आहेत, त्यांना जिंकलें असतां त्रैलोक्यांत तुझी कीर्ति होईल." हें ऐकून तो दैत्य उड्डाण करून कैलासीं आला व नंदीभृंगीगणयुक्त व्याघ्रांबरचंद्रकलाधारी अशा त्या ध्यानस्थ शंकरास पाहून बोलला कीं "ह्या गोसाव्याशीं युद्ध करण्यांत काय अर्थ आहे? तथापि मी आल्यासरसें ह्याच्या सुंदर स्त्रीस नेईन." असें बोलून पार्वतीला आकाशमार्गें घेऊन चालला. तेव्हां सर्वजण वरामुळें उन्मत्त झालेल्या त्या दैत्यापुढें आपला कांहीं उपाय चालत नाहींसें पाहून हाहाःकार करूं लागले. शंकरानें ध्यान विसर्जन करून क्रोधयुक्त होऊन कोणतें संकट प्राप्त

झालें म्हणून विचारलें असतां गणांनीं सर्व हकीकत निवेदन केली. शंकर तावडतोब नंदीवर आरूढ होऊन त्या दैत्याच्या पाठोपाठ गेले व गिरिजेस परत करण्याची त्यास आज्ञा केली. तथापि त्या उन्मत्त दैत्यानें शंकराचा उपहास केला व युद्धास सिद्ध झाला. तोंच एकाएकीं आकाशांत कोटिसूर्याप्रमाणें देदीप्यमान विनायकमूर्ति द्विजरूपानें प्रगट होऊन तिनें आपला परशु त्या दोघांच्यामध्यें घालून दैत्याचें निवारण केलें. विनायक म्हणाले " हे दैत्या, त्या त्रैलोक्यजननीला मजजवळ ठेव व शंकराशीं युद्ध कर. जो विजयी होईल त्यानें तिला घ्यावी. " हें ऐकून सिंदूरानें पार्वतीला विनायकाजवळ ठेविलें आणि तो शंकराशीं युद्ध करूं लागला. दोघेही युद्धविशारद व तुल्यपराक्रम असल्यानें त्यांचें घनघोर युद्ध झालें. शेवटीं शंकरानें आपल्या त्रिशूलानें दैत्यास घायाळ करून भूमीवर पाडलें. तेव्हां विनायक म्हणाले " तूं युद्धांत हरल्यामुळें गिरिजेची आशा सोडून चालता हो. " त्यावर तो दैत्य स्वस्थानाप्रत जाऊन त्रैलोक्यास पीडा करूं लागला असतां सर्व धर्मकृत्यें बंद पडलीं, वेदघोष बंद झाला व कित्येक ऋषि प्राणास मुकले. अशी स्थिति झाली तेव्हां सर्व देव बृहस्पतीच्या सांगण्यावरून विनायकास शरण गेले व त्यास सर्व हकीकत सांगितली विनायकांनीं देवास अभयदानपूर्वक सांगितलें " हे देवहो, मी गजाननरूपानें गिरिजेच्या पोटीं जन्म घेऊन त्या दैत्यास मारीन. तुम्ही निश्चिंत असा. " त्याप्रमाणें योग्य समयीं विनायक गजाननरूपानें गिरिजेच्या पोटीं जन्मून, त्या दैत्याशीं युद्ध करण्यास तयार झाले. त्या अल्पवयीं गजाननास अवलोकन करून सिंदूरानें त्याचा उपहास केला. त्यावेळीं ज्यास सहस्र शिरें, सहस्र नेत्र, व सहस्र पाय असून ज्याचें सर्वांग उत्तम वस्त्रें भूषणें व दिव्यगंध यांनीं युक्त आहे असें विराटस्वरूप गजाननानें धारण केलें. तथापि तो दैत्य न भितां खड्ग उपसून गजाननावर धांवला. त्या समयीं गजाननानें दैत्यास आपल्या दोन हातांनीं दाबून त्याचें रक्त आपल्या सर्वांगास लाविलें. दैत्याच्या विनंतीवरून गजाननानें त्यास आपल्या अर्धांगांत रहाण्यास जागा दिली. त्यामुळें भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारा असा तो गजानन पृथ्वीवर सिंदूरवदन व सिंदूरप्रिय ह्या नांवांनीं प्रख्यात झाला. सर्व देवांनीं आनंदित होऊन जयघोष केला व गजाननाची अनेक प्रकारें स्तुती करून ते स्वस्थानाप्रत जाते झाले. ज्या ठिकाणीं हें युद्ध झालें तें क्षेत्र ' राजसदन ' नांवानें विख्यात झालें. सिंदुराचा त्या ठिकाणीं वध झाला म्हणून ' सिंदूर ' असेंही त्याला म्हणूं लागले. ब्रह्मदेवानें त्या ठिकाणीं गजाननाची स्थापना केली व अशा पवित्र ठिकाणीं एकादें तीर्थ असावें म्हणून जवळच ब्रह्मदेवानें आपला कमंडलू स्थापन केला. हे अमृतरायादि सज्जनहो, तेंच राजसदन क्षेत्र कलियुगांत

' सिंदूरवध–शेंदूरवादें ' या नांवानें प्रसिद्ध असून, तो कमंडलु ' भागीरथी–तीर्थ ' म्हणून प्रसिद्ध आहे.

महाशिवरात्रीस मध्वमुनि वेरुळास गेले. त्या दिवशीं उपवास करून घृष्णेश्वरास अभिषेक केला. तेथून तें शुकदरीकडे जाण्यास निघाले. दरी अवलोकन करतांच साष्टांग नमस्कार करून महाराज आंत प्रवेश करते झाले. गुरुमहाराजांचें निवासस्थान पाहून महाराजांस आनंद वाटला, व प्रेमभरानें गुरुस्मरण करतां करतां त्यांची समाधी लागली. थोड्याच वेळांत श्रीशुकाचार्य महाराज तेथें प्रगट झाले. तेव्हां त्यांच्या तेजेंकरून ती सर्व दरी प्रकाशमान झाली. आचार्यांनीं शिष्याच्या मस्तकीं हस्त ठेऊन समाधि उतरविली. गुरुराजास समोर पाहून मध्वनाथांनीं साष्टांग नमस्कार घातला व उभयतां गुरु शिष्य स्वानंदसुखसंभाषणांत दंग झाले.

तेथून मध्वमुनि देवगिरीस ( दौलताबादेस ) जाण्यास निघाले. मार्गांत त्यांना अत्रितनयाचें दर्शन घडलें. धन्य तो महाभाग कीं ज्यासाठीं परमेश्वर स्वयमेव वारंवार अवतीर्ण झाला! दौलताबादेस गडावर जाऊन त्यांनीं तेथील तीर्थांत स्नानसंध्यादि उरकून जनार्दनपंताची भेट घेतली. मध्वमुनीच्या आगमनाची वार्ता मानपुरीबुवांस कळतांच ते गडावर आले व आपल्या मठांत चलण्याविषयीं महाराजांस विनंती केली. त्यांच्या विनंतीस मान देऊन मुनीश्वरांनीं एक दिवस मठांत वास्तव्य केलें. रात्रीं त्यांना स्वप्न पडलें. स्वप्नांत दौलताबादेची कालिकादेवी येऊन म्हणाली " मला येथें यवनांपासून फार उपसर्ग पोहोंचतो, याकरतां मला येथून दुसरीकडे घेऊन चल. " त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं मध्वमुनि देवीस शेंदूरवाद्यास नेण्याकरतां देवीच्या देवळांत गेले व आपल्या बरोबर येण्याविषयीं तिची प्रार्थना केली. देवी म्हणाली मला एकाद्या गाडींत ठेव म्हणजे गणपती गाडी हांकील. तूं गाडीपुढें चालून मार्ग दाखव. मात्र चालतांना जर मागें पाहशील तर त्याच ठिकाणीं मी

---

टीप––शेंदूरवादें हा गांव औरंगाबाद जिल्ह्यांतील गंगापूर तालुक्यांत असून औरंगाबादेपासून आठ कोसांवर आहे. औरंगाबादेहूनच तेथें जाणें सोइस्कर आहे. गाणपत्यांचें हें महत्त्वाचें क्षेत्र असून येथें खानदेश, वऱ्हाड, मध्यप्रांत इत्यादि दूरच्या ठिकाणाहून लोक दर्शनाकरतां येतात. याशिवाय या गांवाची आणखी एका गोष्टीकरतां प्रख्याति आहे. भागीरथी तीर्थाच्या पाण्यानें गणपतीस स्नान घालून न्हाणीवाटें तें तीर्थ धरतात. हें पाणी शेतांत शिंपडलें असतां शेतांतील उंदीर नाहींसे होतात असा आज कित्येक वर्षांचा अनुभव आहे. हें पाणी नेण्याकरतांही दूरदूरचे पुष्कळ शेतकरी नेहमीं तेथें येतात.

राहीन. ” त्याप्रमाणें करण्याचें कबूल करून मध्वनाथांनीं मूर्ति घेऊन शेंदूरवाद्याचा रस्ता धरला. दौलताबादेहून तीन कोस आले असतील इतक्यांत त्यांना भान न राहून गाडी किती मागें राहिली हें पहाण्याकरतां त्यांनीं मागें पाहिलें. मागें पाहिल्याबरोबर गाडी होती त्या ठिकाणींच थांबली, व देवी म्हणाली ‘ मी याच ठिकाणीं राहणार आहे. ’ मध्वनाथांनीं तेथेंच ती श्री कालिकेची वालुकामूर्ति स्थापन करून उत्सव केला. त्या दिवशीं आश्विन शु॥ १५ होती. तो उत्सव अद्याप दरसाल मध्वनाथांचे शिष्यघराण्याकडून होत आहे. ज्या स्थळीं मध्वनाथांनीं मागें वळून ( टोंकून ) पाहिलें त्या ठिकाणास टोकी असें म्हणतात. टोकी हा गांव औरंगाबाद जिल्ह्यांतील गंगापूर तालुक्यांत आहे. ह्या कालिकादेवीविषयीं स्कंदपुराणांत खालीलप्रमाणें कथा आहे:— पूर्वी नागासुरनामें एक दैत्य होता. तो देवादिकांस आजिंक्य होऊन त्यांना पीडा करूं लागला. तेव्हां सर्व देवांनीं त्या दैत्यास मारण्याविषयीं शंकराची प्रार्थना केली. शंकरानें देवगिरीस त्या दैत्याचा वध केला. शंकराच्या इच्छेवरून पार्वतीही शंकराबरोबर देवगिरीसच राहिली तीच देवी कालिकादेवी या नांवानें प्रख्यात झाली.

कालिकेच्या मंदिराची यवनांनीं मशीद बनविली. ती व शंकराचें देवालय अद्याप दृष्टीस पडतात.

मध्वनाथ मार्गशीर्ष शुद्ध ११ स लखमापुरास बालाजीच्या उत्सवास गेले व तेथून वरखेड्यास जाऊन नागेश्वराचें दर्शन घेऊन परत शेंदूरवाद्यास आले. दशहार आला तेव्हां नाथांची स्वारी सावखेड्यास गेली. तेथें गंगाकांठीं स्नानसंध्यादि नित्यकर्मे आटपून बेटांत नरसिंहाचें स्थान आहे ( हल्लींचे देवालय व घाट त्यांच्या शिष्यांनीं बांधिला आहे ) तेथें जाऊन नरसिंहाची पूजा केली आणि नंतर स्तवन करण्यास प्रारंभ केला. सामराजांनीं संतुष्ट होऊन दर्शन दिलें, व मध्वमुनी पुन्हां शेंदूरवाद्यास आले. फाल्गुन वद्य षष्ठीच्या उत्सवाकरतां ते पैठणास गेले. तेथें एकनाथांची भेट घेऊन व पांडुरंगाचें दर्शन करून परत आले. पुढें आषाढी व कार्तिकी एकादशीस पंढरीस वारीस जाण्याचा त्यांनीं नेम धरला व तो बरींच वर्षें चालला. मध्वमुनि वृद्ध होत चालले तसतसें पंढरीस जाण्याचें त्यांना फार कष्टप्रद होऊं लागलें. एका खेपेस तर त्यांना शीतज्वराची बाधा होती व कार्तिकी एकादशीकरितां तर पंढरीस जावयाचें होतें. महाराज जाण्यास निघाले व एक मैल गेले असतील तों शीतज्वरानें जास्त जोर केल्यामुळें त्यांस पुढें पाऊल टाकवेना त्यावेळीं आपला शीतज्वर कोणी तरी घेईल ह्या हेतूनें मध्वनाथांनीं रस्त्यावर असलेल्या वृक्षांस विचारलें, “ वृक्षांनों, तुम्हांपैकीं कोणी तरी माझा शीतज्वर घ्या म्हणजे मी श्रीपांडुरंगाच्या दर्शनास पुढें जाईन, नाहींपेक्षां माझी ही वारी टळेल. ” असें म्हणून त्यांनीं

जवळच्या चिंचेच्या वृक्षास कवटाळलें तोंच काय चमत्कार घडला पहा—त्या वृक्षांतून एक यक्षीण निघाली आणि नाथमहाराजांस साष्टांग नमस्कार करून आपला सर्व वृत्तांत निवेदन केला व आकाशमार्गें गमन करती झाली. त्यावेळीं त्या चिंचेचीं पानें व शेंडा झडून गेला व तिची वाढ कायमची खुंटली. आज ही ती चिंच तशा स्थितींत असून थोटी चिंच या नांवानें प्रसिद्ध आहे. अस्तु. नाथांच्यानें पुढें जाववेना तेव्हां ते परत आश्रमास आले. आपली वारी चुकणार व श्रीपांडुरंगाचे चरण अंतरणार हा विचार मनांत येऊन त्यांस फार दुःख झालें. चित्तास स्वस्थता मुळींच वाटेना. मन जाण्याकरतां आतुर झालें होतें, परंतु देहदौर्बल्यापुढें उपाय नव्हता. त्या तळमळींतच नाथांनीं श्री पांडुरंगास पत्र लिहिलें:—

परब्रह्म निर्गुणा तूं अलेखा । कळेना तुझी वेदशास्त्रासि लेखा ॥ नसे वर्णना तूझिया रूपलेखा । लिहावें कसें त्या स्थळीं पत्रलेखा ॥ १ ॥ अधिष्ठान तें पत्र कोरें पहावें । वरी मायीक कैसे लिहावें ॥ करी द्वैत भक्ताघरीं शेषशायी । म्हणोनी लया जाय निःशेष शाई ॥ २ ॥ स्वयें जाणसी जे कळा देखणी हो । कसे तीस लीहील हे लेखणी हो ॥ स्वसंवृत्ति जी जाणती वैखरी हो । स्वरूपीं लया जाय ही वैखरी हो ॥ ३ ॥ तुझें नाम हें सद्गुरू दीनबंधु । अनाथांसि विश्रांति कारुण्यसिंधु ॥ दयाळा मला आपुलेंसे करावें । स्वभक्तांमधें रंक ऐसें गणावें ॥ ४ ॥ चित्र कृत्रिम कृत्रिम भिंती । विश्व मायिक असें भगवंतीं । यापरी मिरविशी तुं महंती । मध्वनाथ लिहीतो हीच विनंती ॥ ५ ॥

यावर पांडुरंगानें स्वप्नांत येऊन सांगितलें "तूं कष्टी होऊं नकोस; मीच तुजकरतां येथें उद्धवभट जोशी यांच्या घराच्या दक्षिण भिंतींत आलों आहें." मध्वनाथांनीं ही गोष्ट गांवांतील शिष्ट मंडळीस सांगून भिंत पाडण्यास उद्धवभटाची अनुज्ञा विचारली. उद्धवभटजी म्हणाले, "मी गरीब आहे. भिंत पाडली तर आमच्यानें ती पुन्हां बांधवणार नाहीं. श्रीपांडुरंगाचें दर्शन झालें तर भिंत बांधण्याचा खर्च मी मागणार नाहीं, मात्र दर्शन न झाल्यास खर्च तुम्हांस द्यावा लागेल." मंडळीनें ही गोष्ट कबूल केली व भिंत पाडण्यास आरंभ केला. दुपारपर्यंत अर्धी अधिक भिंत पाडून झाली तरी कांहींच पत्ता नाहीं. मंडळी गडबड करूं लागली. कांहीं मध्वमुनीस नांवें ठेवूं लागले व कांहीं ती भिंत बांधण्याच्या खर्चाच्या तजविजीस लागले. दोन प्रहरीं मंडळी आपल्या घरीं गेली व मध्वनाथही तेथेंच विश्रांतीसाठीं निजले. रुक्मिणीकांतानें पुन्हां स्वप्नांत येऊन सांगितलें "आणखी थोडी भिंत पाडण्याची राहिली आहे तेवढी पाडली म्हणजे माझें दर्शन होईल." जागें झाल्यावर मध्वनाथांनीं उद्धवभटास आपणास

पडलेलें स्वप्न सांगितलें. मंडळीस पुन्हा बोलावणें केलें परंतु कोणीं लक्ष दिलें नाहीं. शेवटीं उद्धवभट, नाथमहाराज व आणखी एकदोघेजण भिंत पाडूं लागले, पाडतां पाडतां कुदळीचें टोंक श्रीपांडुरंगाच्या मस्तकास लागलें व त्यामुळें कोंच पडून रक्त बाहेर आलें. रक्त पाहून, पांडुरंगासच कुदळ लागली असा तर्क केला. नंतर हातांनींच विटा, माती वगैरे बाजूस करून पांडुरंगाची मूर्ति मध्वनाथांनीं बाहेर काढली.

प्रेमासि मध्वमुनिच्या सहचर विठ्ठला तुलतुलसी ।
प्रगटसि सिंदुरग्रामीं स्निग्धें गंधाक्षतासवें तुलसी ॥ १ ॥

काय त्या मूर्तीचें स्वरूप वर्णावें ? पांडुरंग विटेवर उभे असून दोन्ही हात कटीवर ठेविले आहेत, हृदयावर वत्सलांछन असून बाजूस बाळगोपाळांच्या दोन मूर्ति आहेत, व नुकतीच पूजा केल्याप्रमाणें मस्तकीं ओलें गंध असून गळ्यांत ताजी तुळसीमाला आहे असें तें सुंदर गोजिरें स्वरूप मध्वमुनींनीं न्याहाळून पाहिलें. त्यावेळीं नाथांस गहिंवर आला व नेत्रांतून आनंदाश्रु दाटले. त्या दिवशीं मार्गशीर्ष शुद्ध १४ होती--

पूर्वीं जो जाहला निशीथसमयीं कृष्णाष्टमी रोहिणी ।
मासीं श्रावण सौम्यवासर दिनीं भक्तारिसंहारिणी ॥
तो हा सिंदुरीं मध्वनाथसदनीं मार्गे बुधे रोहिणी ।
मध्यें शुक्ल चतुर्दशीं प्रगटला गोपाळ चूडामणी ॥ १ ॥

आज मध्वनाथांच्या डोळ्याचें पारणें फिटलें. आज जगदंबेनें दिलेल्या वराचें फळ मिळालें. आज मध्वनाथांच्या जीवाचें सार्थक झालें. मध्वनाथांच्या अनंत जन्मींचें पुण्य आज फळलें. आजि पुरले नवस । धन्य काळ हा दिवस ॥ असेंच त्यांनीं म्हटलें असेल. खरोखरच धन्य तो दिवस; धन्य ते मध्वमुनि आणि धन्य ती भक्तासाठीं धांव घेणारी प्रभु माउली. असो. मस्तकास जखम झाली होती तीस नाथांनीं उपचार केला. ती खूण अद्यापपावेतों दिसत आहे.

मूर्ति सांपडल्याची वार्ता हां हां म्हणतां गांवभर झाली. नंतर सर्वांनीं मिळून उद्धवभटांचे घरींच श्रीपांडुरंगाची स्थापना केली. मध्वनाथांनीं श्रीपांडुरंगाचें षोडशोपचारें पूजन करून आरती केली:--

पंढरिराया तुजविण वाटे परदेश । म्हणोनियां या यात्रेचा धरिला उद्देश ॥
स्वप्नामध्यें येउनि केला उपदेश । पत्राचें तें उत्तर जाणत्रि जगदीश ॥ १ ॥
जयदेव जयदेव जय पांडुरंगा । चरणीं वाहे कलिमलनाशिनी गंगा ॥ धु० ॥
आषाढी कार्तिकी भक्तजन येती । दर्शनमात्रें पूर्वज वैकुंठा नेती ॥ पांडुरंगा तुझें दर्शन जे करिती । पत्रपुष्पफलदक्षिणा देती ॥ २ ॥ जयदेव० ॥ पंढरपुराहूनि आलासे निकट । शेंदूरवाडक्षेत्रीं झालासि प्रगट ॥ आतां आपुला महिमा

दाखवी उत्कृष्ट । दर्शनमात्रें हारी सर्वें संकष्ट ॥ ३ ॥ जयदेव० ॥ राजसदन-क्षेत्रीं धरिला रहिवास । भागीरथीचे तीरीं उद्धरणीवास । मध्वनाथाचा पाहुनि विश्वास । तारावया आला–भेटाया आला लक्ष्मीनिवास ॥ ४ ॥ जयदेव० ॥

असो. मूर्ति सांपडल्यावर पांच दिवसपर्यंत मध्वनाथांनीं मोठा उत्सव केला. तेव्हांपासून दरसाल ते तो उत्सव करीत असत. उत्सवास पैठणचे एकनाथ, पैठणचे निंबराज इत्यादि सत्पुरुषांचे वंशज अगर त्यावेळीं हयात असलेले इतर सत्पुरुष स्वतः येत असत; व मध्वनाथांच्या पश्चात् त्या त्या सत्पुरुषांचे वंशज उत्सवप्रसंगीं उपस्थित राहून ते ते प्रसंग आजही पार पाडीत आहेत.

बरेंच वय झालेलें पाहून मध्वमुनीश्वरांनीं आपला अवतार संपविण्याचा विचार केला व त्याप्रमाणें अमृतरायजीस कळविलें. दरसालप्रमाणें श्रीपांडुरंगाच्या उत्सवास प्रारंभ झाला. मार्गशीर्ष शुद्ध १५ च्या दिवशीं मध्वनाथांनीं आपल्या शिष्यमंडळीस जवळ बोलावून सांगितलें कीं आज आमचा अवतार संपणार आहे, यास्तव मी आतां तुम्हांस प्रसाद देतों तो तुम्ही घ्यावा. असें म्हणून त्यांनीं अमृतरायांस हांक मारली. अमृतराय गुरूस साष्टांग नमस्कार घालून बद्धपरिकर होऊन उभे राहिले. तेव्हां सद्‌गुरूंनीं आपल्या कंठींची माला काढून ती रायजींच्या गळ्यांत घातली व म्हटलें “ मीं आजपर्यंत कथेचा क्रम चालविला व आतां यापुढें तूं तो क्रम चालवावा. ” मल्हारबाबा यांस बोलावून त्यांस आपल्या पूजेंतील श्रीरामचंद्राची मूर्ति दिली. उद्धवभट यांस श्रीपांडुरंगपूजेचा अधिकार दिला, व मल्हारनानास ज्ञानेश्वरीची पोथी होती ती दिली. याप्रमाणें कोणास कांहीं कोणास कांहीं प्रसाद देऊन अमृतरायांस कीर्तनास आरंभ करण्यास आज्ञा केली, व आपण पद्मासन घालून बसले. अंगावर धूतवस्त्र धारण केलें असून त्याचा एक पदर तोंडावरून घेतला होता. कीर्तनांतील ब्रह्मनिरूपण संपलें व रामनामाचा जेव्हां गजर झाला तेव्हां अमृतरायांनीं सद्‌गुरूस साष्टांग नमस्कार घातला. त्यावेळीं कांहींच चलनवलन दिसेना म्हणून त्यांनीं स्वतः नाथांच्या मुखावरील वस्त्र बाजूस केलें तों सद्‌गुरु आत्मस्वरूपांत विलीन झाल्याचें दृष्टीस पडलें. त्याबरोबर सर्वांनीं “सद्‌गुरु मध्वनाथ महाराज की जय” असा घोष केलाः——

हेमंत मार्गेश्वर शुक्लपक्षीं । तिथीच पूर्णा कलिकाल लक्षी ॥
सायान्हके प्राण प्रयाण पावे । श्रीमध्वनाथ स्वरूपीं समावे ॥ १ ॥

अशा प्रकारें सद्‌गुरु मध्वनाथ महाराजांनीं कीर्तनांत हरिनामाचा गजर चालू असतां शके १६५३ मार्गशीर्ष शु॥ १५ या दिवशीं सायंकाळीं आपला अवतार संपविला. त्या दिवशीं पौर्णिमेसह प्रतिपदा असून निर्याणकालीं प्रतिपदा लागली होती. याशिवाय दुसऱ्या दिवशीं संपूर्ण प्रतिपदा होती.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे वद्य प्रतिपदेस शिष्यमंडळीनें मध्वनाथांस समाधी दिली व अमृतरायांनीं कीर्तन केलें. तेव्हांपासून मध्वनाथांचे शिष्य ही पुण्यतिथी दरसाल प्रतिपदेस करीत आहेत. एकंदर उत्सवाचा कार्यक्रम खालील-प्रमाणें आहे:—

( १ ) विजयादशमीच्या मुहूर्तावर निमंत्रणपत्रिका रवाना होतात.

( २ ) मार्गशीर्ष शु॥ ५ स गंगातटाकीं ( खामगंगा ) ध्वजारोपण.

( ३ ) मार्गशीर्ष शु॥ ११ स मंडप उभारणें.

( ४ ) मार्गशीर्ष शु॥ १३ स कोठींचें दर्शन वगैरे.

( ५ ) मार्गशीर्ष शु॥ १४ स–तिसरे प्रहरीं दिंडी निघून पांडुरंगापाशीं एकनाथाच्या वंशजांचें कीर्तन. नंतर गांवांतील सर्व देवतांस उत्सवास येण्याविषयीं निमंत्रण, नंतर समाधीपुढें कीर्तन व त्यानंतर पंगत, पंगतीनंतर रात्रीं पुन्हां कीर्तन, कीर्तनानंतर रात्रभर गोंधळ. शिवाय आजपासून भागवतसप्ताहास प्रारंभ होतो.

( ६ ) मार्गशीर्ष शु॥ १५:—नवीन आलेल्या हरदासांच्या हजऱ्या, नंतर कीर्तन, पंगत, पुन्हां सर्व जातींस मुक्तद्वार पंगत. रात्रीं कीर्तन, कीर्तनानंतर गोंधळ.

( ७ ) मार्गशीर्ष वद्य १:—नवीन आलेल्या हरदासांच्या हजऱ्या, नंतर अमृतरायच्या मुलीचे वंशज तळेगांवकर यांचें कीर्तन, आज पुण्यतिथि असल्यानें समाधीस लघुरुद्राचा अभिषेक व आराधना, नंतर पुरणवरणाची पंगत, रात्रौ कीर्तनानंतर गोंधळ.

( ८ ) मार्गशीर्ष वद्य २:—हरदासांच्या हजऱ्या, नंतर कीर्तन. चार वाजल्यापासून पैठणकर निंबराजांचे वंशज काल्याचा प्रसंग करतात, नंतर पंगत व गोंधळ.

( ९ ) मार्गशीर्ष वद्य ३:—हरदासांच्या हजऱ्या, कीर्तन, कीर्तन झाल्यावर चक्री, चक्रीनंतर संभावना म्हणजे बिदागी. सायंकाळीं नित्याप्रमाणें ब्राह्मणांची पंगत. पंगतीनंतर छबीना निघून वाळवंटांत एकनाथमहाराजांच्या वंशजांचें कीर्तन. तेथून मठांत आल्यावर समाधीपाशीं कढावप्रसाद.

( १० ) मार्गशीर्ष वद्य ४:—मठांतून पांडुरंगाकडे सकाळीं दिंडी. आज पांडुरंगाची मूर्ति देवघरांतून बाहेर मखरांत आणून बसवितात—तेथें पैठणकर निंबराजांचे वंशज ललीत करतात. ललीतांतच तीर्थप्रसाद वांटण्यांत येतो. व दिंडी परत मठांत येते. नित्याप्रमाणें ब्राह्मणांची पंगत. आज भोजनास मोदक व सिद्धान्न असतें.

( ११ ) मार्गशीर्ष वद्य ५:- --श्रीमद्भागवताची समाप्ति व सत्यनारायणपूजन.

याप्रमाणें चतुर्दशीपासून पंचमीपर्यंत मोठा उत्सव होतो. उत्सवास दूरदूरचे विद्वान् व भाविक लोक येतात. समाधीलाच लागून बांधलेल्या भव्य मठांत उत्सवाचा कार्यक्रम होतो व मठांतच पाहुण्यांस उतरण्याची सोय आहे. परगांवच्या आलेल्या मंडळीस सकाळीं शिधा मिळतो व ते सायंकाळीं पंक्तींत प्रसाद घेतात. हा व नाथांनीं केलेले इतर सर्व उत्सव मध्वनाथांचे सांप्रदायिक शिष्य वंशपरंपरा ( हल्लीं श्रीनाथराव जहागिरदार ) करीत आले आहेत.

इतर उत्सव खालीलप्रमाणें होतात:—

१. चैत्र शु॥ ६ स अमृतरायजीचा उत्सव औरंगाबादेस.
२. आषाढ शु॥ ११ स पांडुरंगाचा उत्सव औरंगाबादेस.
३. श्रावण व॥ ८ स जन्माष्टमीचा उत्सव औरंगाबादेस.
४. आश्विन शु॥ १५ स देवीचा उत्सव टोकी मुक्कामीं.
५. कार्तिक वद्य ११ स निपटनिरंजनांच्या समाधीपाशीं ज्ञानेश्वरी ग्रंथाचा उत्सव औरंगाबादेजवळ पहाडसिंगपुऱ्यांत.
६. मार्गशीर्ष शु॥ १४ पासून श्रीपांडुरंगाचा उत्सव शेंदूरवादें येथें.
७. महाशिवरात्रीस शंकराचा उत्सव औरंगाबादेस जासूदपुऱ्यांत.

मध्वनाथांस एक सत्यनाथ नांवाचा मुलगा होता. तो व नाथांचें कुटुंब या दोघांचाही काल नाथांच्या समोरच झाला. सत्यनाथाची समाधि मध्वनाथांच्या समाधि शेजारींच मागच्या बाजूस आहे. सत्यनाथाची पुण्यतिथी मार्गशीर्ष वद्य ४ स होते.

हे सर्व उत्सव करण्याकरतां मध्वनाथांच्या अमृतराय, भोजराज वगैरे शिष्यमंडळीनें निजामाकडून सुमारें ३००० रुपये वसुलीचा मांडवें नांवाचा गांव, जहागीर मिळविला असून सुमारें ३००० रुपये नक्त नेमणुकी मिळतात. शिष्यपरंपरा खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

श्रीमध्वनाथमहाराज
|
शिष्य अमृतराय
|
शिष्य भोजराज — शिष्य मल्हारपंत
|
पुत्र विश्वंभर ( निपुत्रिक ) — पुत्र जीवनराम
|

पुत्र व्यंकटराव

पुत्र शिवराव पुत्र कृष्णराव ( निपुत्रिक )

पुत्र गणेशराव

पुत्र चंपतराव, श्रीनाथराव, शिवराव, जीवनराव
( हयात ) ( हयात ) ( हयात )

---

# कांहीं आख्यायिका.

—:०:—

मल्हाररावनामें नाथांचे एक शिष्य होते. एके दिवशीं नाथांनीं त्यांस बोलावुन म्हटलें " आपल्याला उद्यां पांडुरंगाकरतां अलंकार आणण्यास औरंगाबादेस जावयाचें आहे. उद्यां एकादशी आहे, याकरतां भुईमुगाचे लाडू देवाच्या नैवेद्यास बरोबर घ्या. " त्याप्रमाणें मल्हाररावांनीं आपल्या स्त्रीस सांगितलें. पतीच्या आज्ञेप्रमाणें तिनें भुईमुगाचे लाडू करून शिवाय मुलगाही कदाचित् बरोबर जाईल म्हणून त्याजकरतां दळाचे लाडू करून ठेविले. ही गोष्ट मल्हाररावास माहीत नसल्यामुळें निघतेवेळीं त्यांनीं फक्त एकच डबा घेतला व मध्वमुनीबरोबर ते जाण्यास निघाले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं वाटेंत मध्वनाथांनीं स्नानसंध्या झाल्यावर पूजेच्या वेळीं नैवेद्याकरतां लाडू मागितले. मल्हाररावांनीं डबा उघडला तों त्यांत दळाचे लाडू ! त्यावर मल्हारराव संकोचानें निरुत्तर होऊन स्वस्थ राहिले. नाथांनीं पुनरपि हांक मारून विचारांत कां पडलास म्हणून विचारलें. मल्हारपंतांनीं भीत भीत लाडूचा डबा मुकाटयानें पुढें ठेवला. मध्वनाथांनीं डबा उघडला तों काय चमत्कार ? आंत भुईमुगाचे लाडू असलेले मल्हारपंतांनीं पाहिले. नैवेद्य समर्पण करून उभयतां औरंगाबादेस गेले व अलंकार विकत घेतले. गुरुमहाराज आल्याचें कळतांच शिष्यमंडळी जमा होऊन त्यांनीं सद्गुरूची पूजा केली, व द्वादशीस ब्राह्मणभोजन करून त्यांना शेंदूरवाद्यास रवाना केलें.

( अपूर्ण. )

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. भक्तिमार्गप्रदीपः—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतले होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ॥८ व्ही. पी. नें ॥१२.

२. संतचरित्रमालाः—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १॥८.

३. श्रीएकनाथचरित्रः—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ॥१२.

४. कविरामायणः—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ॥४.

५. आनंदलहरीः—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ॥१२.

६. नारदभक्तिसूत्रेंः—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ॥८. ( आवृत्ति ४ थी )

७. नवविधाभक्तिः—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ॥६.

८. निरंजनमाधवांची कविताः—भाग २ व ३ किं. १॥ रु.

९. श्रीज्ञानेश्वरचरित्रः—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १॥८.

१०. भक्तिमणिमालाः—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १॥८.

मुमुक्षु REG. No. B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी के० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

१२-१३. मुमुक्षुंतील निवडक निबंध ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १०८

१४. मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १०१२.

१५. पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

१६. श्रीतुकारामचरित्र:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सह्य असे सात फोटो, तुकोबाचीं भरपूर अवतरणें इ० सह किं. रु. २.

१७. श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबाचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

१९. मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२०. मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ): —किं. ०४.

२१. सार्थ श्रीदासबोध:—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

२२. सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१४.

२३. समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं रु. २.


२४. मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु. २०४.

२५. श्रीएकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):—किं. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ( श्रीरामदास )


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २१ वें | अधिक श्रावण (पुरुषोत्तम मा.) १८५० | नवें वर्ष ८ वें |
| मास ११ | आगस्ट १९२८ | अंक ८ |

संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.

वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही.पी. नें रु. ३-२

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

विषय पृष्ठ.


| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण | १ |
| २ सीताकल्याण ऊर्फ सीतास्वयंवरोत्सव | ३–१० |
| ३ भागवतधर्ममीमांसा | ११–१६ |
| ४ श्यामगुसाई, श्यामभट आर्वीकर व सामराज कवि. | १७–१९ |
| ५ बभ्रूवाहनाख्यान | २०–२७ |
| ६ श्रीदत्ताचें पद | २८ |
| ७ लक्ष्यालक्ष्यरहस्य | २९–३५ |
| ८ जगीं सर्व सूखी असा कोण आहे ? | ३६–३९ |


## सूचना.

**सपटेंबर** महिन्यापासून ज्यांचें वर्ष सुरू होतें त्यांनीं हा **अंक हातीं पडतांच** पुढील वर्षाची वर्गणी **रुपये तीन म ऑ. नें पाठवावी**, म्हणजे त्यांजकडे व्ही. पी. पाठविण्याचें कारण पडणार नाहीं. आमचे श्रम वांचून त्यांचे दोन आणे वांचतील. त्यांच्या नांवामागें असलेल्या आंकड्यांत पहिला आंकडा ९ आहे. नऊ हजारी वर्गणी-दार सारे सपटेंबरचे असें समजावें.


# निरंजनमाधवाची कविता.

**भाग १ ला किं. १ रु.** **भाग २–३ किं. १॥ रु.**

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्याच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गायिलेलें ग्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत त्रिबोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुटकाव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेंत सांगणारीं अशीं घातलीं आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जे " सुभद्रा–चंपू " नावाचें या कवीनें केलें आहे. ते छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमींचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही भाग एकत्र बांधविले आहेत.

# मंगलाचरण

वर्ष ८ अंक ८.



१

विठ्ठलासी पाहे विठ्ठलासी ध्याये । विठ्ठलासी गाये सर्वकाळ ॥ १ ॥
विठ्ठल हा वृत्ति विठ्ठल जपणें । चित्त वित्त मनें सर्वकाळ ॥ २ ॥
सबाह्य विठ्ठल दाटे घनवट । दशदिशा अफाट विठ्ठलचि ॥ ३ ॥
नामा म्हणे तुम्ही विठ्ठल होऊन । अभंग भजन करीतसां ॥ ४ ॥

२

मृगजळीं पाहतां दिसतसे जळ । परि तें कोरडेंचि केवळ ॥ १ ॥
तेवीं दिसे जगदाभास । अवघा मिथ्या साभिलाष ॥ २ ॥
जेथें मिथ्या द्वैत भाविक । पहातां जनार्दनची एक ॥ ३ ॥
तरंग हरपले पाणी । शरण एका जनार्दनीं ॥ ४ ॥

३

मी तूं ऐसी परी । जैसे तरंग सागरीं ॥ १ ॥
दोहींमाजी एक जाणा । कृष्ण द्वारावती राणा ॥ २ ॥
तंतु वस्त्र दोनी एक । तैसें जगासी व्यापक ॥ ३ ॥
देव भक्त ऐसी बोली । भ्रांति निरसेनासी जाली ॥ ४ ॥
सरिता सागरीं मिनल्या । तैसें होय भ्रांति गेल्या ॥ ५ ॥
एकाजनार्दनीं कृपा । भ्रांति कैसी जगीं पहापां ॥ ६ ॥

## पांगारकरांचा नवा ग्रंथ

# ज्ञानेश्वरांची प्रभावळ.

श्रीज्ञानेश्वरमहाराज व त्यांचीं भावंडें म्हणजे वडील बंधु व गुरु श्रीनिवृत्तिनाथ व धाकटे बंधु सोपानदेव व बहीण मुक्ताबाई, त्याचप्रमाणें नामदेवराय व त्यांची घरची मंडळी व दासी जनाबाई, विठोबा खेचर, परिसाभागवत, बहिरापिसा, गोराकुंभार, सावतामाळी, नरहरि सोनार, जगमित्र नागा, जोगा परमानंद, चोखामेळा, त्याची बायको व मेहुणी बंका, भागु महारीण इ० अठरापगड जातीचे समकालीन, समप्रेमी व समशील भगवद्भक्त एकाच वेळीं झाले व त्यानीं श्रीविठ्ठलपायीं भागवतधर्माचा महामंत्र घेऊन तो धर्म महाराष्ट्रभर पसरिला, ही गोष्ट जगविख्यात आहे. प्रस्तुत ग्रंथांत ह्या सर्वांच्या उपदेशाची चांगली ओळख करून दिली आहे. श्रीज्ञानेश्वर-महाराज हे या संतांच्या प्रभावळींतले अग्रगण्य. तेव्हां त्यांच्या २५०० विषयवारीनें दिलेल्या सटीप निवडक ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग व पदें ह्या ग्रंथांत घेतलीं आहेत. 'ज्ञानेश्वरीची भूमिका' या पहिल्या प्रकरणांत सद्गुरुस्तवन, कृष्णार्जुनांची अन्योन्यप्रीति, गीताशास्त्रविषयक विषय, मराठी भाषेचे व ग्रंथांचे गौरव इ० मथळ्यांखालीं त्या त्या विषयांवरील ज्ञानोबारायांच्या निवडक ओव्या एकत्रित केल्या आहेत. पुढें कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग यावरील ज्ञानेश्वरांच्या सर्व शिकवणी क्रमानें व विषयवारीनें दिल्या आहेत.

ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेंतील संतवाङ्मयाचें मंथन करून हें नवनीतच काढलें आहे.

पृ. सं. ४८० असून किंमत अवघी दोन रुपये, ट. ख. ८५.

मिळण्याचीं ठिकाणें:— १ रा. रा. व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें शहर.
२ रा. रा. तुकाराम पुंडलिक शेट्ये बुकसेलर
माधवबाग मुंबई.

२३
२
२१।७।२८

मद्रासमधील

सीताकल्याण

ऊर्फ

# सीतास्वयंवरोत्सव

ले:—**चंदापुरीदास, मद्रास.**

१. भक्तीचीं अनेकविध अंगें भागवतांत सांगितलीं आहेत, त्यांतच जयंत्यादिउत्सव, एकादशी–शिवरात्र इ. व्रतें व इतर पर्वकाळांमध्यें करण्याचे महोत्सव येतात. हे उत्सव देशभेदाप्रमाणें व संप्रदायभेदाप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं, निरनिराळ्या प्रकारचे व निरनिराळ्या पद्धतीनें करण्यांत येतात. महाराष्ट्रापेक्षां मद्रास इलाख्यांत अत्यंत प्राचीन अशीं रामेश्वर, शिवकांची, विष्णुकांची, वेंकटगिरि, पार्थसारथी वगैरेसारखीं पुष्कळ मोठमोठीं देवस्थानें आहेत; तेथें निरनिराळ्या महिन्यांत निरनिराळे मोठे उत्सव होत असतात, व त्यावेळीं हजारों यात्रा जमत असते. येथील हे उत्सव बहुतेक तंत्रागमोक्त विधीनें केले जातात आणि ते फारच प्रचंड असल्यामुळें सर्वसाधारण लोकांना देवाचें दर्शनसुख दुरूनच घ्यावें लागतें. स्पर्श तर मुळींच नाहीं. अर्चन अर्चकाच्या हस्तेंच करावें लागतें व तेवढयावर सर्व समाधान मानून घ्यावें लागतें. यामध्यें 'भक्तिरस' घोंटण्याची संधि मिळत नाहीं. हा भक्तिरस भजनानंदांतच पूर्णपणें मिळत असतो.

* * * *

२. मद्रास इलाख्यांत असे भजनोत्सवही बहुतेक सर्व गांवांत सर्व समाजांत होत असतात. त्यांपैकींच **रामकृष्णजयंत्यादि उत्सव** व **सीताकल्याण, रुक्मिणीकल्याण, राधाकल्याण,** ( कल्याण म्ह. येथील भाषेंत विवाह ) हे उत्सव अनेक ठिकाणीं खासगी रीतीनें करण्यांत येतात. 'सीताकल्याण' हा उत्सव रामजयंतीनंतर कृष्णजयंतीपूर्वीं केव्हां तरी करण्यांत येतो. 'रुक्मिणीकल्याण' हा उत्सव कृष्णजयंतीनंतर कार्तिकापूर्वीं व 'राधाकल्याण' हा उत्सव मार्गशीर्ष महिन्यांत करण्यांत येतो. त्यांपैकीं 'सीताकल्याणोत्सव' परवां आषाढ शु. १३ ( ता. १।७।२८ ) रविवार रोजीं झालेला पहाणेचा योग आला, त्याचें वर्णन मुमुक्षूच्या महाराष्ट्रीय वाचकांकरितां द्यावेंसें वाटल्यावरून देत आहें.

* * *

३. हा उत्सव मद्रास–त्रिप्लिकेनमध्यें कै० **वेंकटरमण अय्यर** यांचे घरीं श्रीयुत स्वामीनाथ अय्यर यांच्या नेतृत्वाखालीं श्रीयुत **आर्. व्ही. कृष्णस्वामी** यांनीं आपल्या खर्चानें केला. पूर्व दिवशीं म्ह. शनिवारीं रात्रौ कार्यक्रमास सुरवात झाली. भजनाच्या जागीं उंच टेबलावर श्रीरामपंचायतनाची सोनेरी व जडावाचें काम केलेली सुंदर लिखावट भव्य तसबीर मांडलेली होती. आजूबाजूस श्रीराधाकृष्ण, श्रीबाळकृष्ण वगैरेंच्याही तशाच सुंदर मूर्ति व्यवस्थित मांडलेल्या होत्या. पुढ्यवर कै० वेंकटरमण अय्यर यांचा फोटोही मधोमध ठेवलेला होता. ह्या सर्व तसबिरी नानाविध फुलांच्या हारांनीं सुशोभित केल्या होत्या. हीं फुलेंच फक्त १० रुपयांचीं होतीं. रात्रौ सुमारें ९ वाजतां भजनास सुरवात होऊन तें बारावर एक वाजेपर्यंत चाललें होतें. येथें अशा कोणत्याही उत्सवांत श्रीजयदेवकवींच्या 'गीतगोविंद' काव्यांतील संपूर्ण अष्टपदीचें भजन करण्याचा संप्रदाय आहे. हें अष्टपदीचें भजन म्हणजे सर्व संस्कृत भाषेंत. सदरहु अष्टपद्या तज्ज्ञ पुरुषांनीं म्हटल्या म्हणजे फारच गोड लागतात. संस्कृतज्ञ श्रोत्यांना त्या ऐकून प्रेमाचे पाझर फुटतात. ह्या अष्टपद्यांमध्यें शृंगाररसही आहे, परंतु तो करुणरसाशीं मिश्र असल्याकारणानें व तो श्रीहरिविषयक असल्याकारणानें, खऱ्या (भावारूढ) हरिभक्तांची स्थिति श्रीराधादेवीच्या स्थितीप्रमाणें विमल प्रेममय होऊन त्यांच्यांत अश्रु, पुलक, कंप, खेद, गद्गद, रुदन इत्यादि भाव उत्पन्न होतात. असो.

* * * *

४. हें भजन चाललें असतां मध्यंतरीं मंडळीस गंधानुलेपन करण्यांत आलें. हें उगाळलेलें दाट गंध येथें बाजारांत गोळ्यागोळ्यांनीं विकण्यांत येतें. यांत गुलाबपाणी मिसळून तें बासुंदीइतकें पातळ करितात व दोन्ही हातांस व पोटपाठीस बाळंतिणीस अगदीं तेल लावल्याप्रमाणें लावतात. हें काम रा. स्वामीनाथ अय्यांनीं मोठ्या प्रेमानें केलें.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे रविवारीं सकाळीं सर्वांचीं स्नानें व उपाहार वगैरे आटपल्यानंतर ८॥च्या सुमारास पुन्हा अष्टपदीस सुरवात झाली. त्यावेळीं आसपासची व जवळच्या गांवची मंडळी बरीच जमली. या मंडळींतही अष्टपदीचें भजन जाणणारे कांहीं लोक होते, त्यामुळें हें भजन रंगत चाललें. भजनाचें साहित्य म्हणजे सुराची पेटी व मुख्य म्हणणाऱ्याचे हातीं एक टाळाची जोडी यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं. नेमलेलीं पदें म्हणून झाल्यानंतर सुमारें १० वाजतां सर्व भजनमंडळी उठून घराबाहेर आली व भजनाचा गजर करीत त्याच गल्लींत थोड्या अंतरावर असलेल्या श्रीयुत दोरस्वामी अय्यंगार यांच्या घरीं गेली. मंडळी घरासमोर येतांच घरच्या मालकाच्या दोघा वयस्क (तरुण) मुलांनीं रस्त्यावर साष्टांग नमस्कार घातला व मंडळीस आदरानें

आंत नेलें. ह्या भजनी मंडळीबरोबर सुवासिनी स्त्रियाही आलेल्या होत्या. भजनी मंडळी घरच्या दिवाणखान्यांत देवतार्चन मांडलें होतें त्यासमोर बसली व बायका घरच्या बायकांत जाऊन मिसळल्या. त्यानंतर येथील रिवाजाप्रमाणें वधूपक्षाकडील व वरपक्षाकडील स्त्रियांनीं गाणीं म्हणावयाचीं असतात, त्याप्रमाणें म्हणण्यांत आलीं. नंतर देवास आरति करून घरच्या मालकांनीं ह्या (वधूपक्षाकडील) सर्व भजनमंडळीस खडीसाखर, केळीं व ताक पिण्यास देण्यांत आलें. ह्या घरांतून परत निघतांना, बायकांनीं फुटाण्याचे दोन मोठे लाडू, पानें, सुपाऱ्या व केळीं वगैरे रुखवतासारखे जिन्नस मोठया परातींत घेऊन भजनी मंडळीबरोबर भजनाच्या गजरांत मूळच्या घरीं आल्या. त्यानंतर पुन्हा अष्टपदीच्या भजनास सुरवात होऊन गीतगोविंद संपूर्ण झाल्यानंतर, दुपारीं १२ वाजणेच्या सुमारास जमलेल्या समुदायांत लग्नाच्या अक्षता वांटण्यांत आल्या व प्रत्यक्ष लग्नांतल्याप्रमाणें अंतरपाट धरून नेमलेलीं मंगलाष्टकें म्हणण्यास सुरवात झाली. (ह्यांपैकीं कांहीं संस्कृत व कांहीं तेलगू भाषेंतील होतीं.) प्रत्येक 'सुमुहूर्त सावधान' ह्या शब्दाबरोबर थोडथोडया अक्षता देवावर घातल्या जात असत. शेवटच्या मंगलाष्टकाच्या वेळीं अंतःपट काढून घेण्यांत येतांच स्त्रीपुरुषसमुदायाकडून मंगलाक्षताचा वर्षाव करण्यांत आला व टाळांच्या प्रचंड गजरांत श्रीरामनामभजनाचा गजरही पांच मिनिटें झाला.

* * * *

५. त्यानंतर 'गोपीगीत' म्हणण्यांत आलें. हे गोपीगीतांतील संस्कृत श्लोक भजनांतील मुलेंही म्हणत होतीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. गोपीगीतानंतर 'उलूखल क्रीडा' म्हणजे लोखंडाच्या लहान उखळांत तांदूळ घालून कांडण्याचा विधि झाला. हें कांडण्याचें मुसळ हळदीकुंकवाच्या पट्टयांनीं व टोंकाला आम्रपल्लव बांधून सुशोभित करण्यांत आलें होतें. उखळांत तांदळाबरोबर आंगठीही टाकण्यांत आली होती. चौघाचौघांनीं मिळून मुसळ धरून गाणें म्हणत तांदूळ कांडावयाचे व त्या कांडलेल्या तांदळामधील मूठभर तांदूळ एका ताम्हणांत घालून त्या ताम्हणांत तें मुसळ धरून देवासमोर (५।१० पावलें) चौघांनींही नाचत जावयाचें व ते तांदूळ देवाच्या पुढयांत तबकांत घालावयाचे आणि तसेच मागच्या पायीं (देवाकडे पाठ न करितां) फिरून तें मुसळ त्या उखळांत ठेवावयाचें. पुन्हा दुसऱ्या चौघांनीं उठून तसेंच करावयाचें, असें ४।५ वेळ करण्यांत आलें. कांहीं प्रतिष्ठित गृहस्थ प्रेक्षक होऊन स्वस्थ बसले होते, त्यांना त्यांच्या सलगीच्या मित्रांनीं ओढून काढून तांदूळ कांडण्यास व नाचण्यास लावलें! ही एक गंमत पहाण्यासारखीच होती.

* * * *

६. ह्या विधीचा हेतु काय असावा कोण जाणे, परंतु भागवतांत गोपींनीं केलेली ' अनुकरणलीला ' म्हणून जी वर्णिली आहे, त्यास अनुसरूनच ही आहे यांत संशय नाहीं.

**" नृत्यं भगवदग्रेच तथा वीणादिवादनम् ।**
**कृष्णलीलाद्यभिनयः श्रीभागवतसेवनम् ।**

या श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें श्रीकृष्णलीला अभिनयपूर्वक करणें, त्याच्यापुढें नाचणें, गाणें, तंतुवाद्यें वाजविणें वगैरे हे सर्व भगवदुपासनेचे मार्ग आहेत. ह्या कृष्णलीलांचे, रामलीलांचे अभिनय कीर्तनांत कसे करून दाखवावे याबद्दलचें वर्णन श्रीएकनाथ महाराजांनीं आपल्या भागवतांत उत्तम प्रकारें केलेलें आहे. रामजयंतीनंतर सीतास्वयंवर करावें, त्यांत प्रत्यक्ष धनुष्य आणून रामानें केल्याप्रमाणें धनुर्भंगाचा आविर्भाव करून दाखवावा वगैरे सांगितलें आहे. (सांप्रतच्या उत्सवांत ही एक मात्र उणीव आम्हांस भासली ). उत्तर हिंदुस्थानांत काशी, प्रयाग, मथुरा, वृंदावन वगैरे क्षेत्रांत भरतभेट, रामलीला वगैरे भाग लहान मुलांस ते ते वेष देऊन, लहानशा नाटकाप्रमाणें करून दाखविण्यांत येतात; व हें दृश्य काव्य केवळ शब्दकाव्यापेक्षां सर्वसाधारण लोकांच्या मनावर अधिक परिणाम करितें. रामकृष्णादि वेष घेतलेल्या त्या मुलांना मेरे ठाकूर, मेरे ठाकूर, ( हे माझ्या प्रभो, माझ्या प्रभो, ) असें म्हणून तिकडील लोक भक्तिभावानें वंदन करितांना पाहून तटस्थ लोकांसही प्रेमाचे पाझर फुटल्यावांचून रहात नाहींत. जर अचेतन मूर्तींत देवाची भावना करितां येते, तर सचेतन गोजिरवाण्या लहान मुलांस ते देवाचे वेष घालून त्यांच्यामध्यें देवाची भावना कां करितां येऊं नये ? देवदर्शनाचें सुख त्यांच्या पायावर डोकें ठेवून व त्यांना सद्गदित कंठानें 'हे प्रभो, हे परमात्मन्' असें म्हणून आलिंगन देऊन कां घोटतां येऊं नये ? असें भगवद्भावाचें सुख जे घोटतात ते धन्य होत. विद्वानांच्या ठिकाणीं ह्या भावाचा अभाव झालेला असतो व अज्ञान्यांच्या ठिकाणीं तसा अभाव नसतो. म्हणून शहाण्या लोकांपेक्षां भोळे लोक लवकर तरून जातात. भोळे भाविक मला फार आवडतात, असें नाथ भागवतांत १२ व्या अध्यायांत वर्णिलें आहे, त्याचें वर्म हेंच आहे. ' अनुकरणलीला ' करीत असतां, आपला आतांचा आपलेपणा व आतांचा आतांपणा विसरून जाऊन आपण त्या कालांत व त्या रूपांत तद्रूप होतों. ही एक प्रकारची **सगुण** ' अहंग्रहोपासना ' आहे. कृपाळू संतांनीं जडजीवोद्धारार्थ कितीतरी हे गोडगोड उपाय योजून ठेविले आहेत ! या उपायांचें हें वर्म जाणून आपली देहबुद्धीची क्षुद्रकरमणुकीची वृत्ति टाकून, या उत्सवनिमित्तानें तद्रूपतेचा अभ्यास करितात ते पुरुष धन्य होत.

* * *

७ 'उलूखलक्रीडा' आटपल्यानंतर दोन वृद्ध संतांना (भजनी गृहस्थांना) खुर्चीवर बसवून परातींत त्यांचे पाय ठेऊन ते पुष्कळशा पाण्यानें धुण्यांत आले व त्यांच्या पायांवर गंध-कुंकुम-पुष्पें वगैरे घालून त्यांची धूपदीप-नैवेद्य वगैरे उपचारांनीं यथोक्त पूजा करून त्यांचें तीर्थ सर्वांनीं घेतलें. त्यांना आरति करून त्यांच्या सभोंवती प्रदक्षिणा घातल्या. त्यांना गंधलेपन करून त्यांच्या गळ्यांत पुष्पहार घातले. याचप्रमाणें जमलेल्या इतर मंडळींच्या अंगासही उत्तम प्रकारें गंधलेपन करून सर्वांच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालण्यांत आल्या. भजनोत्सवांत अशा प्रकारची 'संतपूजा' यापूर्वीं श्रीरमावल्लभदास संप्रदायांत मात्र पहाण्यांत आली होती. भजनाचे विवक्षित प्रबंध (पदें, अभंग वगैरे) म्हणत असतां मध्येंच संस्कृत प्राकृत श्लोक म्हणणें ही पद्धत रमावल्लभदास संप्रदायाप्रमाणें येथील संप्रदायांतही दिसून येते. महाराष्ट्रीय इतर संप्रदायांत अशी पद्धत आढळत नाहीं. तेव्हां ही श्रीकृष्णभजन-पद्धति रमावल्लभदासांनीं येथील या फार जुन्या संप्रदायांतून घेतली असावी असें अनुमान होतें. संतपूजा झाल्यानंतर भजनीं मंडळींनीं टिपऱ्या घेऊन भगवंताच्या रासलीलेचें अनुकरण केलें. ह्यावेळचे निरनिराळे नाच, निरनिराळीं पदें व निरनिराळे भगवन्नामाचे गजर कांहीं लोकांच्या करमणुकीखातर झाले असतील तर होवोत, पण एक दोन चांगल्या सुशिक्षित गृहस्थांची या भजनाचे वेळीं 'भावजागृती' होऊन ते साश्रुजल नेत्रानें भजनांत अट्टाहासानें नामाचा गजर करीत न लाजतां नाचूं लागले. संतांनीं रूढ केलेल्या भजनमार्गाचा उद्देश तर हाच मुख्य आहे.

* * *

" हरिकथाश्रवण, परीक्षिती सुजाण। ऐके तें आपण, अंगें होय " ॥
असें श्रीएकनाथमहाराज म्हणतात. पुराण—कीर्तनाच्या अथवा भजनाच्या वेळीं जें कानांत पडेल, तद्रूप आपण व्हावयाचें, असा त्याचा अर्थ आहे. प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत भगवत्प्रेम असतें, पण तें सुप्त म्हणजे निद्रित असतें. तें वर लिहिल्याप्रमाणें अनुकरणलीला दर्शनानें व भजन-कीर्तनानें जागृत होतें. अंतरांतील प्रेम लोकलज्जेमुळें दबलेलें असतें, त्यास ह्यावेळीं खुल्या दिलानें बाहेर येण्यास संधि मिळते. 'नंग्यांच्या गांवांत वस्त्र नेसून फिरतो तोच वेडा ठरतो.' तशा गांवांत नंगेपणानें फिरण्याला लाज वाटून उपयोग नाहीं. परमार्थाच्या आड येणारी लज्जारूपी राक्षसीण हिला ठार मारण्याकरितांच संतांनीं हा सामुदायिक भजनमार्ग सुरू केला आहे. ह्यांत सामील होऊन अट्टाहासानें भगवन्नामाचा गजर करणें, करुणापर अभंगाच्या वेळीं, (आणि असेच अभंग देवाकडे द्वितीय पुरुषी संबोधनानें बोलण्याचे निवडले पाहिजेत)

अभंगकर्त्या सत्पुरुषांच्या भावाशीं तादात्म्य पावून ते उद्गार त्या भावानें बेंबीच्या देंठापासून काढून देवास आळविणें, ही संधी अशा सामुदायिक भजनामध्यें साधितां येते, आणि ही जो साधतो तोच शहाणा. तात्पर्य, भजनाच्या वेळीं कवितेंतील अर्थाकार वृत्ति करून जो भजन करील अर्थात् कवीच्या भावाशीं तादात्म्य पावेल, त्यावर त्या मूळ कवीप्रमाणें त्या साधूप्रमाणें भगवत्प्रसाद लवकर होईल, असें निश्चयानें जाणावें. नसलेस—

"करितां देवाचें दर्शन । आडवें आलें रागज्ञान ।
तेणें धरूनियां मन । स्वरामार्गें नेलें ॥
भेटों जातां राजद्वारीं । बळेंचि धरिला बेगारी ।
कळावंता तैसी परी । कळेनें केली ॥"

असें होईल. याकरिता—

"मन ठेवूनि ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी ।
तोचि ये संसारीं । धन्य जाणा" ॥ (दा. बो.)

याप्रमाणें भजन आटपण्यास सुमारें १॥ वाजला. त्यानंतर नैवेद्य, आरती वगैरे होऊन भोजनाचा समारंभ झाला. ह्यावेळीं तेलगू, तामिल व रामानुज हा भेदभाव मावळून गेलेला दिसला.

\+ × +

८. भोजनोत्तर, मंडळी पानसुपारी खाण्यास माडीवर बसली असतां तेथें ह. भ. प. रामचंद्र कृष्ण कामत चंदगडकर यांनीं नामस्मरणासंबंधानें लिहून आणलेला लेख वाचून दाखविण्यांत आला. त्या लेखाचें तामिलमध्यें भाषांतर तेथील वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध गृहस्थ ह. भ. प. कोदंडरामय्यर (बी. ए. बी. एल्) ज्यांनीं **ज्ञानेश्वरीचें तामिलमध्यें भाषांतर** करून छापलें आहे व जे पंढरीचे वारकरी असून ज्यांनीं त्रिप्लिकेनमध्यें श्री पांडुरंगाचें मोठें देऊळही बांधलें आहे, त्यांनीं त्या लोकांस समजावून दिलें. लेखांतील **रामकृष्णहरि** नामाचें विवरण, त्या नामानें धरण्याच्या व अभ्यसिणेच्या भावना फारच गंभीर व परिणामकारक असल्यामुळें लोकांना तो लेख फारच आवडला. कर्नाटकांत व महाराष्ट्रांत सामुदायिक पद्धतीनें नामजपाचीं अनुष्ठानें चालल्याची माहितीही लोकांस सांगण्यांत आली. ती ऐकून '**रामकृष्णहरि**' नामाचा **सहाकोटीजप** सामुदायिक पद्धतीनें करण्याचें कांहीं लोकांनीं ठरविलें. हा तेथें (त्रिप्लिकेनमध्यें) लवकरच सुरू होईल अशी आशा आहे. (मद्रासमध्यें रायापेठेंत 'अयोध्या' भवनांत परमकृष्णभक्त श्रीमती विशालाक्षी अंमानीं आपल्या श्रीगौरांगगुरुकुल संस्थेंत वरील नामाच्या सहा कोटी जपास मे महिन्यांतच सुरवात केली असून तो ६ महिन्यांत संपविण्याचा संकल्प आहे.)

ह्या नामजपयज्ञाच्या चर्चेनंतर देवापुढें वरील 'विणावादनपटु' श्रीमती विशालाक्षी देवीचें थोडा वेळ भजन झालें. संध्याकाळीं ५ वाजतां बायकामंडळींचें भजन होणार होतें, पण कांहीं अडचणीस्तव राहून गेलें. अशा ह्या कल्याणोत्सवांत, पुरुषांचा कार्यक्रम आटपल्यावर सायंकाळच्या वेळीं २।३ तास बायकांचा कार्यक्रम असतो व त्यावेळीं मध्यें समई वगैरे ठेवून त्यासभोंवतीं मुली व जाणत्या बायकाही हातांनीं टाळ्या वाजवीत किंवा टिपऱ्यांवर भजन करीत असतात. व तें फारच प्रेक्षणीय असतें असें म्हणतात; असो.

* * *

९. रात्रौ उपसंहारात्मक भजन होऊन श्रीसीतारामाची 'मंचकशय्या' झाली. यावेळीं महाराष्ट्रांतील ललिताप्रमाणें थोडया विनोदाचीही कविता म्हणण्यांत आली. हे भजन करणारे गृहस्थ श्री० **रामचंद्र अय्यर** ऊर्फ **हरिपंतलु** या नांवाचे असून यांचें पांठातर फारच दांडगें आहे. म्हणण्याचें अंगही यांना चांगलें असून आठ आठ तास भजन करीत राहिले तरी दमत नाहींत! हे मद्रासमधील कॉर्पोरेशन स्कूलचे हेडमास्तर आहेत. इकडे कोठेंही असा सार्वजनिक मोठा भजनोत्सव झाला म्हणजे यांना आग्रहानें बोलावून नेतात. यांनीं उपसंहारात्मक भजनाच्या वेळीं तेलगु, तामिल, कानडी, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचींही पदें म्हटलीं. त्यांतील इंग्रजी भाषेचीं तीं पदें वाचकांच्या केवळ करमणुकीकरितां खालीं दिलीं आहेत.—

(किष्किंधाकांडांत श्रीरामाच्या पहिल्याच भेटींत मारुतिरायानें आपली ओळख रामास करून दिली, तो प्रसंग—)

पद. [ चाल—दे मज दिव्यमति । सरस्वति० ]

This is my biography । Oh Raghava ।
    This is my biography ॥ ध्रु० ॥
I am the son of famous Vayu ।
    Anjaneya by name ॥ Oh Raghava ॥
There is monkey-king named Sugreeva ॥
    I am the minister of him ॥ Oh Raghava ॥ 2 ॥
He has a brother, named Vali ।
    Who is ruling very cruelly ॥
This is my biography ॥ 3 ॥

(खालील पद मारुतिरायांनीं रावणाला आपली ओळख करून देतांना सांगितलेल्या उद्गाराचें आहे. त्यांनीं हें दोन चालींवर म्हणून दाखविलें. परंतु चाली देण्यास बरोबर आठवत नाहींत. तरी 'इस तन धन की कौन बढाई' या चालीवर हें साधारणतः म्हणतां येईल.)

Hear my news, Pratapa Lankesha ।

Without giving ears to elsewhere ॥ ध्रु० ॥
I am a monkey, Rama's doota ।
Come in search of chaste Seeta ॥ १ ॥
Seeta is the wife of Rama
Who is the son of Emperor Dasharatha ॥ २ ॥
Rama killed, famous Wali ।
By whom you were tied and taken ॥ ३ ॥
If you do not leave his wife ॥
You will soon lose your life ॥ ४ ॥

( ललितांतील एक लहानशी करमणूक एवढयाच दृष्टीनें हीं पदें वाचावीं. )

हें सर्व आटपल्यानंतर सीतारामापुढें केशरी दूध रुप्याच्या भांडयामधून ठेवण्यांत आलें व त्या पदार्थाच्या निवेदनाचें पद व शय्येचें प्रेमळ पद म्हणून झाल्यावर, देव झोंपी गेले असें मानून, सर्व तसबिरींवर रेशमी वस्त्र झांकण्यांत आलें.

लग्नाच्यावेळीं सीतादेवीला मंगळसूत्र खरेंखुरें सोन्याचें—सुमारें अर्धा तोळा वजनाचें—करून आणलें असून तें दोऱ्यांत ओंवून गळयांत मेणानें चिकटविण्यांत आलेलें होतें; त्याचप्रमाणें जरीचा एक खणही अर्पण करण्यांत आलेला होता. तसेंच श्रीरामरायाला अहेरादाखल एक नवें उपरणें अर्पण करण्यांत आलें होतें. श्रीयुत आर. व्ही. कृष्णस्वामी हे सुशिक्षित असून रेल्वेंत एक मोठे नोकर आहेत. हे जन्मतः शैव पण कृष्णोपासक आहेत, तथापि हे सीताकल्याणोत्सव दरवर्षी करितात. यंदा कांहीं अडचणीमुळें हा उत्सव करण्याची त्यांजकडून थोडी दिरंगाई झाली. तेव्हां श्रीमारुतिरायांनीं स्वप्नांत येऊन त्यांना तो करण्याबद्दल अगत्याची सूचना दिली व त्यांनीं वरील उत्सव केला. स्वप्नांत देवादिकांच्या मूर्तीचें दर्शन-संभाषण-वगैरे हें काय थोतांड आहे असें कित्येकांस वाटेल. पण ' जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे, ' यापेक्षां याचें उत्तर देतां येणें शक्य नाहीं. वरील कृष्णस्वामी अय्यांनीं कांहीं वर्षांपूर्वी हिंदुस्थानांतील सर्व तीर्थयात्रा केल्या होत्या. यंदांही त्यांनीं यात्रेकरितां दोन महिन्यांची रजा घेतली असून रेल्वे कंपनीकडून सर्व हिंदुस्थानांत फिरण्याचा सेकंडक्लासचा पास त्यांना मिळाला आहे, व ते लवकरच यात्रेस निघणार आहेत. हे कुठल्याही देवदर्शनास गेले तरी कृष्णस्वरूपानेंच त्या मूर्तीला पाहतात. वरील उत्सवांतील त्यांच्या मूर्ती ह्या जडमूर्तीप्रमाणें भासत नसून प्रत्यक्षच आहेत असें त्यांस दिसतें, व त्या भावनेनें प्रेमळांस ते त्या मूर्ति दाखवितात. धन्य आहे अशा भक्तोत्तमांची !

*　　　*　　　*

॥ श्रीपांडुरंग प्रसन्न. ॥

# भागवतधर्ममीमांसा

( ले० ह० भ० प० धुंडिराज रामचंद्र महाराज, पंढरपुर )

लेखांक १

॥ विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥ १ ॥
॥ आइकाजी तुम्ही भक्तभागवत । कराल तें हित सत्य करा ॥२॥

—तुकाराम.

१ कांहीं शतकांपासून आमच्या या भारतभूमींत " मतामतांचा गलबला ! कोणी पुसेना कोणाला । जो जे मती सांपडला । तयासी तेचि थोर " । या समर्थवचनाप्रमाणें पारमार्थिक म्हणविणाऱ्या वर्गामध्येंही प्रतिपक्षाविषयीं द्वेष, मत्सर, ईर्ष्या, इ० इ० दुष्ट विकारांचा प्रसार होत आहे. प्रत्येकास इतराहून भिन्न असें आपलें कांहीं तरी वैशिष्ट असावें असें वाटत असतें, व हीच अनेक मतांच्या उद्भवाची पूर्वपीठिका आहे. पहा, एका अद्वैतांतच कितीतरी प्रकार. शांकराद्वैत, रामानुजांचें विशिष्टाद्वैत, वल्लभांचें शुद्धाद्वैत, निंबार्क भास्कराचार्यांचें द्वैताद्वैत, अप्पय्या दीक्षितांचें शिवाद्वैत, चिदद्वैत इ० इ०

२ या बहुतांच्या बहुत मतांनीं एखाद्या परमार्थमार्गांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या साधकाची किंकर्तव्यमूढ अवस्था होणें, किंवा प्रविष्ट झालेल्यांची सत्यपथदर्शनाभावीं दिशाभूल होणें मुळींच अशक्य नाहीं. मतामतांच्या गलबल्यांत शब्दच्छलावांचून दुसरें काहीहीं निष्पन्न होत नसतें, व या शब्दच्छलानें खरी आध्यात्मिक प्रगती तर दूरच राहते, पण व्यावहारिक जीवामध्येंही जी मात्सर्याची प्रवृत्ति कमी प्रमाणांत असते तीच दुष्ट अशांतिमूलक प्रवृत्ति भक्तभागवत म्हणविणाऱ्या वर्गामध्यें सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असतें हें सद्यःकालीं त्या समाजाचें सूक्ष्म निरीक्षण ज्यांनीं केलें असेल त्यांच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

३ माध्व, रामानुज, शिवोपासक या परस्परांमध्यें अकस्मात भेटीचा योग आल्यास " वाक्याभासान्स्वस्वपक्षे योजयन्त्यप्यलज्जया " या विद्यारण्यांच्या उक्तीप्रमाणें वाक्याभासात्मक प्रमाणांनीं लागलीच वितंडवादाला सुरुवात होते ! शिवभक्त म्हणतोः—

चक्रांकिततनुर्यत्र तत्र कोऽपि न संविशेत् ।
यदि तिष्ठेन्महापापी सहस्रब्रम्हहा भवेत् ॥ १ ॥
संतप्तशंखचक्राद्यैर्लिंगैरंकितविग्रहैः ।
पश्यतो नरकप्राप्तिर्जायते नात्र संशयः ॥ २ ॥

या शिवभक्ताच्या कोटिक्रमावर वैष्णवांजवळही प्रमाणाची उणीव नसतें. नंतर तोही खालील प्रमाणें पुढें करितो:—

सर्वभूतदयायुक्तं वैष्णवं द्वेष्टि यो नरः ।
स चांडालो महापापी रौरवं नरकं व्रजेत् ॥ १ ॥
शैवान्पाशुपतान्दृष्ट्वा लोकायतिकनास्तिकान् ।
विकर्मस्थान्द्विजान्शूद्रान्सवासा जलमाविशेत् ॥ २ ॥

४ उपासकवर्गातील या निंद्यप्रकारांमुळें उपासनेचें खरें हृद्गत काय आहे याची जाणीव उपासकवर्गांतून नष्ट होत चालली आहे. उपासनेमध्यें भेदभाव, उच्चनीच कल्पनांचा सुळसुळाट, द्वैत, असावेंच लागतें असा या विपथमार्गी उपासकांचा परंपरेच्या अंधश्रद्धेमुळें गैरसमज झालेला असतो. पण ती त्यांची दिशाभूल आहे. लो० टिळक म्हणतात:—

"भागवतधर्मास द्वैत किंवा विशिष्टाद्वैत मताचाच स्वीकार केला पाहिजे अशी जी कित्येकांची समजूत झालेली आहे ती चुकीची आहे."

५ खऱ्या अद्वैतांतच भागवतधर्माचें रहस्य आहे. भागवतधर्मास संकुचित कल्पना मान्य नाहींत. ईश्वराविषयीं एकदेशी भावना भागवतधर्मास अभिप्रेत नाहीं. एकदेशी उपासनेचें फळही संकुचित अर्थात् नाशिवंत असेंच प्राप्त होतें. पण भागवतधर्माचा उद्भव अशा संकोचात्मक अर्थात क्षयिष्णु फलास देण्याकरितां झाला नाहीं, तर या परधर्माचरणानें परम शांति प्राप्त होऊन अखंड शाश्वत सुखाचा लाभ करून देण्याकरितांच त्याचा अवतार आहे. भागवतधर्माचें स्वरूप अत्यंत व्यापक आहे, म्हणून त्या धर्माचें आचरण करणाऱ्यांनींही आपली बुद्धि व्यापकच करणें अवश्य आहे. जडसृष्टि देखील हरिरूपच आहे. 'सरित्समुद्रांश्च हरेः शरीरं' म्हणून 'यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः' ही भागवतधर्माची शिकवण आहे.

६ सर्वव्यापित्वाची जाणीव अंतःकरणांत न बाळगतां जी परमात्म्याची उपासना होते ती व्यर्थ आहे असें श्रीमद्भागवतांत म्हटलें आहे.

अहं सर्वेषु भूतेषु भूतात्मावस्थितः सदा ।
तमवज्ञाय मां मर्त्यः कुरुतेऽर्चाविडंबनम् ॥ १ ॥

**यो मां सर्वेषु भूतेषु सम्यगात्मानमीश्वरम् ।**
**हित्वार्चां भजते मौढ्याद्भस्मन्येव जुहोति सः ॥ २ ॥**
भा० स्कं० ३–२९

सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत परमात्मा व्याप्त असल्यामुळें भूतद्वेष हा परमात्मद्वेषच आहे असें श्रीएकनाथ महाराज म्हणतातः—

**परमात्मा जो श्रीहरी । तो अंतर्यामीं सर्व शरीरीं ।**
**तेथ पराचा जो द्वेषकरि । तेणें द्वेषिला हरि निजात्मा ॥ ५-१५**

७ भगवंतास जाणावयाचें असेल तर त्याची व्यापकता सर्वत्र सम असल्यामुळें त्याला सर्वत्र पाहिलें पाहिजे. कांहीं मर्यादित स्थानींच तो आहे ही भावना चुकीची आहे. केवळ स्वतःच्या हृदयांतच तो आहे असें नसून तो ‘ सर्व भूतांतरात्मा ’ असल्यामुळें एकदेशी उपासनेचा तेथें उपयोग नाहीं. ‘ सर्वस्यचाहं हृदि संनिविष्टः ’ या भगवदाज्ञेकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. एके ठिकाणीं भक्ति व दुसरें ठिकाणीं द्रोह हें

**तोंडीं घास डोइये टोला । ऐसा भजनार्थ तो झाला ।**
**तो जाण सर्वस्वें नागवला । वैरी आपुला आपणचि ॥ए० भा०**

या श्रीएकनाथमहाराजांच्या शासनावरून अत्यंत गर्ह्य ठरतें. अशा भेदभावनेनें ईश्वरास एका स्वरूपांत पूज्य व दुसऱ्या स्वरूपांत अपूज्य मानल्याप्रमाणें होतें. अशी भक्ति पूर्ण फलदायिनी होऊं शकत नाहीं. न्या० मू० रानडे यांनींही भागवत धर्माची व्याख्या अशी व्यापकच केली आहे. ते म्हणतातः—

“भागवतधर्माचें आणखी एक लक्षण म्हटलें म्हणजे त्यांत विश्व ही ईश्वराची कृति एवढीच समजूत नाहीं, तर ईश्वर हा विश्वाचा आत्मा, तो त्यांत अंतर्गत आहे व त्यास चेतना देतो अशी भावना आहे, आणि शेवटीं परधर्मसहिष्णुता, स्वार्थत्याग, मनुष्याविषयींच प्रेम नव्हे तर सर्व जीवमात्राविषयींचें प्रेम ह्या विषयींचें शिक्षण देणें हें भागवतधर्माचें प्रधान अंग आहे.”

८ वैष्णवांना त्यांच्या धर्माची जाणीव करून देणाऱ्या श्रीतुकोबारायानांहीं “ ऐसें भाग्य कई लाहता होईन । अवघे देखे जन ब्रह्मरूप ” अशीच मागणी श्रीपंढरीरायाजवळ केली आहे. याचें कारण त्यांना परमार्थमार्गांतील या सर्वश्रेष्ठ तत्वाची पूर्ण जाणीव होती, व शेवटीं या तत्वजिज्ञासेची पूर्णता म्ह० आत्मौपम्यता ही त्यांच्या अंगीं किती बाणली होती हें त्यांच्या ‘ तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥ १ ॥ ” ‘ तंतु पट जेवी एक । तुका विश्वेसी व्यापक ” इ० इ० शेंकडों वाचनांवरून सिद्ध होतें. खऱ्या वैष्णव धर्माचें

रहस्य त्यांना पूर्णपणें समजलें होतें, म्हणूनच परमार्थमार्गांत प्रवेश केल्यानंतरही ज्यांची दिशाभूल झालेली आहे अशा ' भक्तभागवत ' वर्गाला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला होता, व या अधिकारारूढ होऊनच त्यांनीं सर्व भक्त भागवतांना खरें भागवत धर्माचें रहस्य किती व्यापक आहे याची जाणीव करून दिली आहे.

॥ विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥ १ ॥

९ श्रीमद्भगवद्गीतेमध्यें श्रीकृष्णांनीं अर्जुनास जीं चतुर्विध भक्तांचीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांत " प्रियो हि ज्ञानिनोत्यर्थमहं स च मम प्रियः" " ज्ञानी त्वात्मैव मे मतं " म्हणून ज्ञानी भक्तांचा जो विशेष गौरव केला आहे, त्याचें रहस्यही हेंच आहे. वासुदेवः सर्वमिति । ही भागवत धर्माचरणाची पराकाष्ठा आहे, व ती अशा ज्ञानी भक्तानांच प्राप्त होते. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतातः—

म्हणोनि असो हे इयापरि । तो देखे ज्ञानाची वारवारी ।
तेणें संसरलेनि करि । आप विश्व ॥ १ ॥
हे समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो ।
म्हणोनि भक्तांमाजी रावो । ज्ञानिया तोची ॥ २ ॥ अ० ७

१० भागवतधर्माच्या सर्वश्रेष्ठ वाङ्मयांत कोठेंही भक्तीची संकुचित व्याख्या केलेली आढळावयाची नाहीं. सर्वांनीं वरील तत्वानुसारच भक्तीचें लक्षण केलें आहे. श्रीमद्भागवतांत देवहूतीस उपदेश करितांना कपिल महामुनी खालीलप्रमाणे भक्तीची व्याख्या करितातः—

मद्गुणश्रुतिमात्रेण मयि सर्वगुहाशये ।
मनोगतिरविच्छिन्ना यथागंगाम्भसोऽम्बुधौ ॥
लक्षणं भक्तियोगस्य निर्गुणस्य ह्युदाहृतं ।
अहैतुक्यव्यवहिता या भक्तिः पुरुषोत्तमे ॥ भा० ३–२९.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं तर अनेक ठिकाणीं अशा व्यापक दृष्टीनेंच भक्तीचें लक्षण केलें आहे. उदा० अ० १४

म्हणोनि विश्वपण जावें । तैं मातें ध्यावें ।
तैसा नव्हे आघवें । सकटचि मी ॥
ऐसेनि माते जाणिजे । ते अव्यभिचारी भक्ति म्हाणिजे ॥
जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत ।
हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ (ज्ञा०)

श्री एकनाथ महाराज ह्मणतातः—

**भक्ति म्हणजे सर्वांभूतीं । सप्रेम भजन युक्ती ॥**
**मज पाहतां निजात्मपुष्टी । सर्व भूतीं भगवद्‌दृष्टी ॥**
**हेचि भक्ति माझी गोमटी । ब्रह्मांडकोटीतारक ॥** ए० भा०

तसेंच श्री तुकाराम महाराज ही म्हणतातः—

**भक्ति ते नमावी जीव जंतुभूतें । शांतऊनि उत कामक्रोध ॥** तु०

११ उपासकाचें अंतःकरण एकदेशी असतां कामा नये. कारण एकदेशी भावनेंत देहाभिमानाचा ( अहंकाराचा ) उद्भव होत असतो. भक्त अहंकार-रहित असावयास पाहिजे. भक्तांचे पर्वतप्राय अपराध परमात्मा सहन करील पण अभिमान मात्र सहन करणार नाहीं. कारण,

अभिमान नाहीं तुका म्हणे त्यासी । नेदी आणीकासी करूं देव ॥ तु० ॥

म्हणून उपासकानें 'जगाधाकुटें' व्हावयास पाहिजे, तेव्हांच परमात्म्याची जवळीक प्राप्त होते.

श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं 'सततं कीर्तयंतो मां' या श्लोकावरील आपल्या भाष्यांत भक्तांची वृत्ति किती अहंकाररहित असतें हें स्पष्टपणें दर्शित केलें आहे.

**आदिब्रम्हाकरुनि । शेवटीं मशक धरुनि ।**
**माजि समस्त हे जाणोनि । स्वरूप माझें ॥**
**मग वाडधाकुटें न म्हणती । सजीव निर्जीव नेणती ।**
**देखिलिये वस्तू उजू लुंठिती । मीचि म्हणुनि ॥**
**नमितां मानापमान गळाले । म्हणोनि अवचिता मीचि झाले ।**
**ऐसे निरंतर मिसळले । उपासिती ॥**

उपासकास असें समत्व प्राप्त झाल्यानंतरच जी उपासना होते तीच सर्व-श्रेष्ठ उपासना भागवतधर्मास मान्य आहे, म्हणूनच श्री. ज्ञा. म. नीं. । अर्जुना हे गुरवी भाक्ति । सांगितली तुजप्रती ॥ म्हणून अशा अहंकारशून्य उपासने-सच 'गुरवी' म्ह० श्रेष्ठ भक्ति म्हटलें आहे.

१२ श्रीकृष्ण भगवंतास अति प्रियतम अशा निष्काम कर्माचरणाचें ( म्ह० कर्तृत्वमद व फलास्वादरहित कर्माचरणाचें ) रहस्यही हेंच आहे. कर्तृत्व व भोक्तृत्व हे दोन्ही धर्म अहंकाराचे आहेत. निष्काम कर्मयोगांत अहंकाराचा लोप असतो. शरीर असेपर्यंत कर्मत्याग होणें शक्य नाहीं, पण निरहंकार वृत्तीनें कर्माच्या ठिकाणीं ब्रह्मभावना ठेवून केलेलें जें कर्म तें नैष्कर्म्यच होय. श्री. ज्ञा. म. म्हणतात.

**म्हणऊनि ब्रम्ह तेंचि कर्म । ऐसें बोधा आलें जयासम ।**
**तया कर्तव्य तें नैष्कर्म्य । धनुर्धरा ॥ अ० ४–२४ ॥**

अहंकार गेला कीं, अंतःकरण व्यापक होतें व " जनीं वनीं अवघा देव " ही श्रेष्ठ भावना उदयास येते. अर्थात् ह्या सत्वसंपन्न अवस्थेंत म्ह० निरहंकार वृत्तींत देहेंद्रियांकडून होणाऱ्या क्रियेला कर्म म्हणतांच येत नाहीं. ह्याच निष्काम कर्मयोग व यांसच भागवतधर्मांत महत्व दिलें आहे.

१३ सांप्रदायाच्या सत्यस्वरूपाकडे दुर्लक्ष करून अंधश्रद्धापूर्वक शुष्क अभिमान बाळगिल्यामुळें संकोचात्मक क्षुद्र भावनांचा उद्भव होत असतो, आग्रह बळावतो व या हट्टामुळेंच अंतःकरणांत प्रतिपक्षाविषयीं मात्सर्यादि दुष्ट विकाररूपी अंकुर उत्पन्न होतात. कित्येक शैव--वैष्णव–रामदासी व वारकरी सांप्रदायिकांतील परस्पर द्वेषाच्या उत्पत्तीचें मूळही वरील तत्वांतच गोंवलें गेलें आहे, पण भागवतधर्म अशा आग्रहास किंवा हट्टास आपली मान्यता देत नाहीं. तो उपरिनिर्दिष्ट व्यापक उपासनेलाच महत्व देत असतो. लो. टिळक एके ठिकाणीं म्हणतात.

" भक्ति मुख्य धरून प्रतीक गौण आहे किंवा विधिभेद असला तरी उपासना एकाच प्रकारची होते असें भागवतधर्म स्पष्टपणें सांगत असतां भागवत धर्मीयांनीं सुद्धां शैवांशीं तंटे करीत बसावें हें आश्चर्य आहे. "

म्हणून श्री तु. म. नीं या शैव वैष्णव वादाचे—

**हरिहराभेद । नाहीं नका करू वाद ॥ १ ॥**
**एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेचे ठायीं ॥ २ ॥**

या एकाच अभंगानें खंडण करून 'भेदाभेदभ्रम अमंगळ' म्हणून उपासक वर्गास " विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म " हा मंगल मार्ग दाखवून दिला आहे.

---

॥ श्री ॥

# श्यामगुसाई, श्यामभट आर्वीकर व सामराज कवि.

[ ले०-प्र. धों. कानिटकर बी. ए. एल्एल्. बी. न्यायाधीश भोर.]

१. गेल्या जून महिन्याच्या " मुमुक्षू "च्या अंकांत श्रीयुत गो० रा० राजोपाध्ये बी. ए. यांनीं " सामराज " कवीवर दहा कॉलमी निबंध लिहून मथळ्यांत दर्शित केलेल्या तीन व्यक्ति भिन्न नसून, तिन्ही नांवें एकाच व्यक्तीचीं आहेत असें प्रतिपादन केलें आहे. " मुद्गलाख्यान " कर्ता सामराज हाच ' रुक्मिणीहरणकर्ता ' सामराज असून तोच बंगळूर शहरीं शहाजी राजे यांचे दरबारांत " श्याम गुसाई " या नांवानें प्राकृतभाषाकवी म्हणून शके १५७५ ते १५८० या काळांत रहात होता. शहाजीराजे यांचे पुरोहित मल्हारभट यांचा श्यामभट ऊर्फ सामराज ऊर्फ श्याम गुसाई हा बंधु असून, त्यानें शके १६११ नंतर ' मुद्गलाख्यान ' काव्य केलें व पुढें त्यानेंच शके १६२० पूर्वीं " रुक्मिणीहरण " व " रुक्मिणीस्वयंवर " हीं काव्यें लिहिलीं असावींत, असा राजोपाध्ये यांचे लेखाचा निष्कर्ष आहे. परंतु त्यांचीं अनुमानें सर्व बाजूंनीं परीक्षण केल्यास पटण्यासारखीं नाहींत; व श्यामगुसाई, श्यामभट आर्वीकर व सामराज कवि या भिन्न व्यक्ति होत्या असें मानणें सयुक्तिक आहे व तें या लेखांत तज्ज्ञांच्या परीक्षणार्थ सादर करण्यांत येत आहे.

२. श्रीयुत राजोपाध्ये यांनीं दिलेली मल्हारभटाची वंशावळ व शामभट ऊर्फ सामराज याची माहिती शके १७७० सालीं लिहिलेल्या " न्यायशास्त्री पंडितराव " यांचें बखरीचे आधारानें दिल्याचें दिसतें. सदर बखर " भारतवर्ष " मासिकांत कै० रा. ब. पारसनीस यांनीं प्रसिद्ध केली आहे व त्याच आधारानें श्री. राजोपाध्ये यांनीं आपला लेख लिहिल्याचें दिसतें. श्री० राजोपाध्ये हे मल्हारभटाचे वंशज आहेत अशी माहिती या लेखकास त्यांचेपासूनच मिळाली आहे, मल्हारभट, प्रभाकरभट व श्याम गुसाई यांचा उल्लेख राधामाधव विलासचंपूत आला आहे. राजोपाध्ये यांचें मूळ आडनांव आर्वीकर असून, कुलदैवत मुद्गल आहे व मुद्गलाख्यानकर्ता सामराज यानें सदर काव्यांत स्वत:बद्दल दिलेली माहिती शामभट आर्वीकर यास पूर्ण लागू पडते याबद्दल भिन्नमत नाहीं.

३. राधामाधव विलासचंपूंत, जयराम कवीनें संस्कृतज्ञ व शास्त्रज्ञ अशा ३५ दरबारी मंडळींचा उल्लेख केला आहे व त्या दरबारी मंडळींत मल्हारभट व प्रभाकरभट यांचा उल्लेख आहे. व त्यानंतर सुमारें ३५-४० प्राकृत भाषाभिज्ञ आगंतुक कवि जयरामानें सांगितले आहेत, त्यांत श्यामगुसाई याचा उल्लेख असून त्यानें जयराम कवीस हिंदी भाषेंत समस्या घातली आहे. ( पहा राजवाडे यांची रा. मा. वि. चंपूची प्रस्तावना ). जयराम कवि बंगलूर शहरीं शहाजी राजे यांचे दरबारीं ५ वर्षे होता. यामुळें दरबारी व आश्रित यांचा त्यास पूर्ण परिचय होता. श्याम गुसाई हा मल्हारभटाचा बंधू असता तर जयरामानें त्याचा तसा उल्लेख साहजिक केला असता. श्यामगुसाई संस्कृतज्ञ असता तर त्यानें संस्कृतांत समस्या घालणें साहजिक होतें. शिवाय श्यामगुसाई याचा उल्लेख दरबारी मंडळींत केलेला नसून आगंतुक प्राकृतभाषाकवींत केलेला आहे. यावरून श्यामगुसाई म्हणजे शामभट आर्वीकर नव्हे हें उघड दिसतें. " रुक्मिणीहरण " कर्ता सामराज संस्कृतज्ञ असून राजदरबाराशीं पूर्ण परिचित असल्याचें त्याचे काव्यावरून दिसतें. तेव्हां तो दरबारपरिचय सिद्ध करण्याकरितां श्यामगुसाई म्हणजें सामराज अशी कल्पना राजोपाध्यांनीं केली असावी. तसेंच श्यामगुसाई याची विद्वत्ता सिद्ध करण्याकरितां राजोपाध्ये यांनीं एक कोटिक्रम लढविला आहे, तो त्यांचेच शब्दांत देणें बरें:--" मल्हारभट हा विद्वान् व बुद्धिमान् होता हें उघड आहे. त्याचप्रमाणें त्याचा बंधु सामराज हाही व्युत्पन्न असावा यांत नवल नाहीं. " हें अनुमान तर्कशास्त्रशुद्ध नाहीं, ही गोष्ट कोणींहि कबूल करील. वरील विवेचनावरून श्यामगुसाई हा शामभट आर्वीकर किंवा मुद्गलाख्यानकर्ता सामराज नव्हे असें सिद्ध होतें.

४. आतां " रुक्मिणीहरण"कर्ता सामराज व " मुद्गलाख्यान कर्ता " सामराज हे दोघे एकच आहेत अगर भिन्न आहेत तें पहावयाचें आहे. श्री. राजोपाध्ये यांचे मतें या दोन व्यक्ती भिन्न नाहींत, व त्यास त्यांनीं दोन कारणें दिलीं आहेत. ( १ ) दोन्ही काव्यांत प्रारंभींचा नमनाचा श्लोक एकच आहे; ( २ ) वृत्तें तशींच आहेत. या दोन गोष्टींवरूनच दोन्ही ग्रंथाचें एककर्तृत्व मानणें सशास्त्र होणार नाहीं. दोन्ही काव्यांत नमनाचा श्लोक एकच आहे, परंतु भाषापद्धति भिन्न आहे, यावरून एकानें दुसऱ्याचा नमनाचा श्लोक घेतला असावा हें जास्त संभवनीय आहे. वृत्तें तशींच आहेत या गोष्टीस मुळींच महत्व देतां येत नाहीं. कारण हींच वृत्तें योजून वामन पंडित, विठ्ठल, नागेश वगैरे तत्कालीन कवींनीं काव्यरचना केली आहे. नागेशाच्या सीतास्वयंवरांत नमनाच्या श्लोकाचा पहिला चरण वरील दोन्ही काव्यांच्या पहिल्या चरणाप्रमाणें शब्दशः सारखाच आहे:—तो असा:-वंदी, मना, पाय

गजाननाचे. । ' परंतु यावरून नागेशाचें कर्तृत्व कोणीही मानणार नाहीं.

५. एककर्तृत्व ठरविण्यास, कवींची प्रतिभा, भाषापद्धति, शब्दसंपत्ति, वर्णन करण्याची शैली, ओज, प्रसाद, माधुर्य, कल्पकता इत्यादि गोष्टींत पूर्ण साम्यता असावी लागते. "रुक्मिणीहरण" कर्ता सामराज, भागवत, पुराणें व पंचमहाकाव्यें यांशीं पूर्ण परिचित असून, तितकी विद्वत्ता मुद्गलाख्यान काव्यांत दिसून येत नाहीं. सामराजानें रु. ह. काव्यांत संस्कृत, प्राकृत, फार्सी व देशी शब्दांची योजना केली आहे. मुद्गल काव्यांत मराठी व नेहमीं प्रचारांत असलेले संस्कृत शब्द दृष्टीस पडतात. स्वभावोक्ति हा सामराजाचा विशिष्ट गुण असून, मुद्गलकाव्यांतील स्वभावोक्ति उठावदार नाहीं. रु. ह० काव्यांत जो ओजोगुण आहे त्याचा पूर्ण अभाव मुद्गल काव्यांत आहे. रु. ह. काव्यांतील प्रसाद व माधुर्य मुद्गलकाव्यापेक्षां श्रेष्ठ दर्जाचें आहे. "निपट"हा शब्द सामराजाचा आवडता असून, रु. ह. काव्यांत सुमारें १०० वेळ आला आहे. मुद्गलाख्यानांत तो एकवार सुद्धां आला नाहीं मुद्गलाख्यानांत करूनशानें, मागत्यान् अशीं गांवढळ रूपें आलीं आहेत. तशीं रु. ह. काव्यांत नाहींत. रु. ह. काव्यांत फार्सी शब्द असंख्य आहेत; मुद्गल काव्यांत चारपांचच यावेत हें आश्चर्य आहे. तोच प्रकार देशी शब्दांचे बाबतींत आहे. रु. ह. काव्यांत सामराज आपणास "श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्त कवि" असें विशेषण लावतो; तसें "मुद्गलाख्यानांत" नाहीं. काव्यांच्या पूर्वापर कालाप्रमाणें एकाच कवीचें ओज, प्रसाद, माधुर्य व कल्पकता यांत फरक होत जाईल. परंतु भाषापद्धति व शब्दसंपत्ति या बाबतींत न समजून येण्यासारखा फरक केव्हांही पडणार नाहीं. प्रारंभींच्या काव्यांत कवीची वर्णनें सरस व पाल्हाळीक असतील व पुढील काव्यांत विचार गांभीर्य अथवा उच्चभावना यांचा परिपोष झाला असेल. मुद्गलाख्यान काव्य श्रीयुत राजोपाध्ये यांचेपासूनच या लेखकास मिळालें आहे. तें वाचून पहातां वर नमूद केलेल्या गोष्टी प्रामुख्यानें निदर्शनास आल्या. त्यावरून रु. ह. काव्य व मुद्गलाख्यान यांचे कर्ते भिन्न असावेत असें बहुतांशीं वाटतें. दोन्ही काव्यांच्या कर्त्यांचें नांव "सामराज" असल्यामुळें श्रीयुत राजोपाध्ये यांची दिशाभूल झाली असावी.

६. भारत इ. सं. मंडळाकडे सामराजकृत रुक्मिणीस्वयंवराची हस्तलिखित प्रत राजोपाध्ये यांजकडून गेल्याचें श्रीयुत राजोपाध्ये लिहितात. ती प्रत उपलब्ध झाल्यास वरील संशयाची निवृत्ति होईल. भा. इ. सं. मंडळानें तें काव्य आपल्या त्रैमासिकांतून अगर स्वतंत्र प्रसिद्ध करावें अशी सदर मंडळास विनंति करून हा लेख पुरा करितों.

---

श्रीदत्तस्वामीसमर्थ.

# बभ्रुवाहनाख्यान.

( लेखकः—नरहरशास्त्री जोशी. मु. खरशी; जि. सातारा. )

---

## पूर्वरंग.

### अभंग.

हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ॥ १ ॥
ठेविलें अनंतें तैसेचि राहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ॥ २ ॥
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥ ३ ॥
तुका म्हणें घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं ॥ ४ ॥

१ श्रीसंतवर्य तुकाराम महाराज यांजवर श्रीबाबाजीराय सद्गुरूंनीं अनुग्रह केला. सद्गुरूंचा वरदहस्त कृपाप्रसाद होतांबरोबर अहंसोहं, जीवशिव, मी तूं, जग-ईश्वर, माया ब्रह्म-वगैरे सर्व भेदभाव मावळून सर्वावस्थेंत स्वानंदाची प्रतीति झाली. जगत्‌रूपानें श्रीसद्गुरुनाथच प्रकाशित आहेत. अखिल ब्रह्मांड गुरु-माउलीचे शुद्धस्वरूपसौंदर्य आहे असा आनंद भोगीत असतां सहजोद्गार मुखावाटे बाहेर पडले त्यांपैकीं,

हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ॥

हाही अभंग सहज स्फूर्तींतीलच आहे. अभंगाचें यथार्थ विवरण माझ्या-सारख्याकडून होणें कठीण आहे. तथापि आपण वाचक श्रोते संतसज्जन आहांत. म्हणून आपण जेवढें बोलवाल तेवढेंच बोलावयाचें आहे.

प्रभु तुम्हीं महेशाचिया मूर्ती । आणि मी दुबळा अर्चितसे भक्ती ॥
म्हणोनि बोल जऱ्ही गंगावती । तऱ्ही स्वीकाराल कीं ॥ ज्ञानेश्वरी अ.९॥

महाराज, आपण शंकराची मूर्ती आहांत, आणि मी गरीब तुमची भक्तीनें पूजा करीत आहे, म्हणून बेलाच्या ऐवजीं माझ्या बोलरूपीं निर्गुडीचा तुम्हीं स्वीकार करणार नाहीं काय ? अस्तु.

२ 'हेंचि थोर भक्ती आवडते देवा ।' कोणची भक्ति देवास आवडतें ? या ठिकाणीं भक्ति म्हणजे काय हें प्रथम थोडक्यांत पाहूं. ज्यांत देव आणि भक्त विभक्त राहत नाहींत ती भक्ती. व देवभक्तांचें जें सुंदर ऐक्य तेंच भक्त-पण. नारदऋषींनीं भक्तिसूत्रांत "परमप्रेमरूपा अमृतस्वरूपा" भक्ती ही प्रभू-विषयीं अत्यंत प्रेमरूपी व अमृतस्वरूपिणी आहे असें सांगितलें आहे. परमा-

ऱ्याविषयीं सर्वावस्थेंत अंतःकरण प्रेमानें उचंबळत राहणें, सर्व शरीर प्रेमानें थरारणें हें परमोच्चभक्तीचें लक्षण आहे. हें अशा तऱ्हेनें प्रेमलक्षणा भक्तीचें वर्म प्राप्त होण्यास उत्कृष्ट साधन म्हणजे प्रभुरायाची कृपा व अखंड संतसमागम हें होय.

मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा । ( नारदभक्तिसूत्रें ). तो सत्समागमही त्या सर्वेश्वर नारायणाच्याच कृपेनें होतो.

लभ्यतेऽपि तत्कृपयैव ॥ ( ना. भ. )

संतसद्‌गुरु ह्यांच्यांत व परमात्म्यांत भिन्नपणा मुळींच नसतो. ईश्वरो गुरुरात्मेति मूर्तिभेद विभागिनी ॥

श्लोक.

स्थावरं जंगमं चैव सचराचरमेव च । येन व्याप्तं जगत्सर्वं तस्मै श्रीगुरवे नमः

( गुरुगीता ).

श्रीमहादेवांनीं पार्वतीस "सकल स्थावरजंगम चराचरास जें व्यापून चैतन्य आहे तेंच श्रीगुरुरूपानें मूर्तिमंत आहे म्हणून श्रीगुरुसारखें दुसरें श्रेष्ठ दैवत नाहीं " असें सांगितलें.

३. हा परमोच्च भक्तियोग कोणत्याही प्रकारच्या साधनांनीं जप केल्यानें, तीर्थयात्रेनें, यज्ञानें, अध्ययनानें, दानानें, कर्मानें, उग्र तपश्चर्येनें बिलकूल साध्य होणारा नसतो.

न वेद यज्ञाध्ययनैर्नदानैर्नच क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ।

हा फक्त नारायणानेंच कृपादृष्टी केली तर मात्र आपोआप प्राप्त होतो, त्याच्या कृपेवांचून अनंत जन्म व अनंत साधनांनीं केव्हांहि प्राप्त होणार नाहीं. " आपू नोहें साधना " असेंच ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

जयाचेनि अपांगपातें । बंध मोक्षपणीं आते । भेटें जाणतया जाणतें । जयापासी ॥ ( अमृतानुभव )

सद्‌गुरु नारायणाच्याच फक्त कृपाकटाक्षेकरून बंधमोक्षवार्ता संपून येचक्षणीं स्वानंदसौख्य प्राप्त होतें. अशी सद्‌गुरु परमात्म्याची पूर्ण कृपादृष्टि झाली म्हणजे त्याचे सर्व व्यवहार परमोच्च भक्तींतच घडत असतात व हीच भक्ति सर्वकालीं सर्वावस्थेंत थोर आहे. ह्या भक्तियोगांत चतुर्विध पुरुषार्थ दासासारखे हातांत राहतात. इतकेंच नव्हे तर त्याचा अधिकार एवढा मोठा होतो कीं

जें पुरुषार्थ सिद्धी चौथी । घेउनि आपुलिया हातीं । रिघाला असे भक्तिपंथी । जगादेतु ॥ ज्ञा. अ. १२ ॥

यास्तव तुकोबाराय म्हणतात, 'हेचि थोर भक्ति आवडते देवा ' यांत देव व देवाची आवड निराळी राहात नाहीं. कशी ते आपण " संकल्पाची माया

संसाराची " या अर्थांत पाहूं, या अर्धचरणाचे विवरण जेवढें करावें तेवढें थोडेंच आहे. " संसाराच्या मायेचा संकल्प करा " हा सरळ अर्थ आहे. माया माया म्हणजे आहे तरी काय? माया जर आहे म्हणावी तर ती अनादि सिद्ध म्हणतात. मग तिचा निरास कसा व्हावा? शंका खरी आहे. पण ती अनादि-सिद्ध नास्तिपक्षी आहे हें ध्यानांत ठेवावें.

मा म्हणिजे नसे। " या " म्हणिजे नसोनि भासे। या दोशब्दीचे दोन्हीं ऐसें। अर्थकीं ऐसेचि तत्व तिचे ( यथार्थदीपिका. )

त्या प्रमाणें संसार. संसार प्रपंच हाहि असाच आहे. वास्तविक—

ईशावास्यमिदꣳसर्वं यत्किंच जगत्यां जगत् ॥ ईशोपनिषत् ।

सत्य दृष्टीनें पाहतां जगच नसून परमात्मा आहे. इतकेंच नव्हे, तर दृश्य पदार्थमात्रही परमात्म्यानें अंतर्बाह्य व्याप्त आहेत. परमात्मा आहे म्हणून पदार्थ मात्र आहेत. सोनें आहे म्हणून अलंकार आहेत. अलंकार खरे पण सोनें खोटें हें जसें मूढपणाचें लक्षण आहे तसेंच जग खरें पण जगधादार परमात्मा नाहीं हें म्हणणें आहे. " धरियेलीं सोंगे। येणें अवघीं पांडुरंगें " ॥ ( तुकोबा ).

४ प्रत्येक दृश्य वस्तुमात्र परमात्ममय आहे तर त्यांत मी व माझी मनबुद्धि चित्त अहंकार मात्र वेगळा ही भावना खुळी आहे; या वेगळेपणास तरी कोणाचा आधार असावयास पाहिजेना? समुद्र आणि लहरी. समुद्र वेगळा व तरंग वेगळे, हें बोलण्यांतः खरें आहे. पण तत्वतः समुद्र आणि तरंग वेगळे होऊं शकत नाहींत. तद्वत मन बुद्धि, मीं माझें, हे शब्द खरे असतील, पण अर्थतः व तत्वतः मात्र हे सर्व परमात्ममयच आहेत हाही उलट सिद्धांत होतो. तरंगांचा समुद्र म्हणण्यासारखें होतें.

सामुद्रोहि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥

समुद्रावरचे तरंग हेंच जसें खरें आहे, तसेंच मन बुद्धि अगोदर तयार होऊन मग परमात्मा त्यांत भरला हें म्हणणेंही वेडेपणाचें आहे. समुद्रावर जशा लहरी, सुवर्णावर जसे अलंकार, तद्वत् परमात्म्याचे अफाट विस्तीर्ण स्वरूपांत मी माझें, मनबुद्धी वगैरे परमात्मरूपी तरंगच आहेत. " तूं मन हें मीचि करीं " असेंच ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात--मन परमात्ममय झालें. ' मन रामीं रंगलें, अवघें मनचि राम झालें ' म्हणजे सर्व संसाराचा संकल्प परमात्मस्वरूपांतच होतो. संसाराचें स्वरूपच देवरूपी होतें. मग तो संसार नसून ज्यावर संसाररूपी अलंकाराचे ठसे दिसतात तो शुद्ध सुवर्णरूपी परमात्माच होय. आणखी पहा—

ॐ केनेषितं पतति प्रेषितं मनः केन प्राणः प्रथमः प्रैतियुक्तः। (केनोपनिषत्).
या केनोपनिषदाचे मंत्रामध्यें असा प्रश्न आहे कीं, शरीरांतील मन, प्राण,

वाणी, डोळे, कान, हातपाय इत्यादि इंद्रियें आपापलें सर्व व्यवहार करीत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. हीं इंद्रियें स्वतंत्र आहेत कीं यास कोणी प्रेरक आहे ? कीं, ज्याच्या प्रेरणेवांचून हीं सर्व इंद्रियें शून्यवत् आहेत. या प्रश्नाचें उत्तर याच उपनिषदांत आहे.

यद्वाचाऽनभ्युदितं येन वागभ्युद्यते तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥१॥

"वाचा यद् अनभ्युदितं" म्हणजे वाणीच्या द्वारां (ब्रह्म) प्रकाशित— बोलतां येत नाहीं. तर "येन वाग् अभ्युद्यते" म्हणजे ज्या परमात्मसत्तेनें वाणीच प्रकाशित होते, "तद् एव ब्रह्म त्वं विद्धि" तें ब्रह्म ह्मणजे परमात्मा श्रीगुरु आहेत. "यद् इदं उपासते न इदं" वाणीच्या द्वारां ब्रह्म प्रकाशित होत नाहीं, कारण वाणी तेथवर पोचूं शकत नाहीं.

तसेंच—यन्मनसा न मनुते । येनाहुर्मनो मतम् । तदेव ब्रह्मत्वं विद्धि ।
नेदं यदिदमुपासते ॥ २ ॥

"यत् मनसा न मनुते । येन मनः मतं आहुः"

मनास ज्याचा विचार करतां येत नाहीं. "यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह ' पण ज्याच्या योगानें मन विचाररूप संकल्पविकल्पास प्रवृत्त होतें.

तद् एव ब्रह्म त्वं विद्धि, यद इदं उपासते, न इदं.

५ जें मनास प्रवृत्त करतें तें ब्रह्म आहे असें समजावें. मनास ब्रह्म प्रकाशित करण्याची शक्ति नाहीं. अर्थात् मनाचें मन परमात्मा आहे. याप्रमाणेंच चक्षुरादिक इंद्रियांचें प्रेरक ब्रह्म आहे म्हणजे इंद्रियांना स्वतःस स्फूर्ति नाहीं. म्हणूनच मन जर निर्विषय परमात्म्याच्या भक्तींत गढून गेलें असेल तर त्यास इंद्रियद्वारा दृश्य पदार्थमात्राचें दर्शन परमात्ममयच होणार आणि तेंच जर परमात्म्यास विसरून विषय चिंतन करील तर सर्व दृश्य विषयीं दिसेल.

विषयान् ध्यायते चित्तं विषयेषु विषज्जते ।
मामेव ध्यायते चित्तं मय्येव प्रविलीयते ॥ भागवत ॥

या केनोपनिषदाच्या मंत्रावर तुकोबाचा अभंग सांगून आपण पुढें चालूं.

चाले हें शरीर कोणाचिया सत्ते । कोण बोलवितें हरिवीण । देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुको नको॥२॥ मानसाची देव चालवी अहंता । मीच एक कर्ता म्हणोनिया ॥३॥ वृक्षाचिये पान हाले ज्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ॥ ४ ॥ तुका म्हणे विठू भरला सबाही । तया चराचरीं उणें काय ॥ ५ ॥

याप्रमाणें परमात्मसत्तेवर जगद्रूपी टसे सुंदरपणानें शोभिवंत आहेत, अर्थात् त्यांना वेगळें अस्तित्व अगर सत्ता नाहीं व अशी भावना श्रीगुरुकृपेनें उदयास आली म्हणजे संसाराचा--मायेचा--संकल्प परमात्म स्वरूपांतच झाला

व संकल्पावी माया संसाराची, हें वाक्य सहज उलगडतें. शिवाय असा जो ब्रह्मांडांतर्वर्ती परमात्मा आहे त्याचे ठिकाणीं शरण व्हावें. शरण होण्याची खरी रीत अशी आहे.

पै आपुलेनि भेदेविण । माझें जाणिजें जें एकपण ।
तयाचि नांव शरण । मज येणें गा ॥ ज्ञा. अ. १८ ॥

असें ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

ईश्वरः सर्व भूतांना हृद्देशेंर्जुन तिष्ठति ॥ गीता ॥
सर्व भूतांच्या अंतरीं । हृदय महा अंबरीं ।
चिद्वृत्तीच्या सहस्रकरीं । उदयला असे जो ॥ ज्ञा० ॥

सर्व प्राणिमात्रांच्या अंतःकरणरूपी महाकाशांत असंख्य ज्ञानरूपी वृत्तीच्या किरणांनीं उदयास आलेला आहे.

अर्जुनपण न घेतां । मी ऐसें जें पंडसुता ।
उठतसें तें तत्वतां । तयाचें रूप ॥ ज्ञा. ॥

यास्तव अर्जुनपणाचा (नामाचा) अभिमान न धरतां जो मीपणा तुझ्या ठिकाणीं उद्भवतो तें त्या ईश्वराचें खरें रूप होय.

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ॥ गीता ॥

तया अहं वाचा चित्त अंग । देऊनिया शरण रिघ ।
महोदधी कां गांग । रिगालें जेवी ॥ ज्ञा. ॥

६. गावांतील बरें वाईट पाणी आपणांत घेऊन गंगा जशी समुद्रांत निःशंकपणें समरस होते त्यावेळीं समुद्रही तिला वाईट पाणी काढून टाक व चांगलें पवित्र व शुद्ध पाणी घेऊन मजमध्यें प्रवेश कर असें म्हणत नाहीं. निर्धास्तपणें प्रवेश होतो. तसेंच त्या परमात्म्याचें ठिकाणीं वर सांगितल्याप्रमाणें अहं-अहं स्फुरण सुद्धां परमात्माच आहे अशा भावनेनें–चित्त, वाचा, शरीर वगैरे आपलें सर्वस्व समर्पण करावें व मग हें शरीर व इंद्रियें, मी व माझें वगैरेवर सत्ता नारायणाचीच आहे हें साच प्रतीतीस येईल, व मग जे जे व्यवहार त्रयावस्थेंत होतील ते सर्व भगवन्मय होतील, व ते आत्यंतिक प्रेमानें होऊं देणें. यासच परमोच्च भक्तियोग म्हणतात. याच आत्मार्पणास तुकोबाराय "हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ।" असें म्हणतात. (हा विषय आणखीही समाधानकारक तऱ्हेनें सोडविण्यासारखा आहे. पुढें एखादे वेळ सोडवूं).

ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥

आपल्या ठिकाणीं जी परिस्थिति असेल ती ईश्वराच्या सत्तेनें व इच्छेनेंच आहे असें मानून चित्तांत समाधान वृत्ति असो द्यावी. परिस्थिति दूर करण्यास

झटणें हेंही परमात्म्याच्या स्फूर्तीवांचून होणें शक्य नाहीं. म्हणून करणें कां न न करणें। हें अघवें तोचि जाणें। विश्व चळतसें जेणें। परमात्मेनि ॥ ज्ञानेश्वरी ॥

७ याप्रमाणें परमात्म्याचें सत्तेनें जी स्थिति होत आहे तीच उत्तम मानून तीविषयीं हर्ष शोकातीत असावें. म्हणजे दुबळेपणा येईल अशी वेडगळ भावना करूं नका.

ज्याचा सखा हरी। त्यावरि विश्व कृपा करी. ॥

ज्याच्या अंतःकरणांत अनंत ब्रह्मांडनायक आहे तो दुबळा होईल अशी शंका, आळशी व परमात्म्याविषयीं ज्याचा अनादर आहे त्या मूढाशिवाय कोणासही होणार नाहीं. एतदर्थ लहानशी गोष्ट आहे.

८. एकदां दुर्वास मुनींनीं नारदांना प्रश्न केला कीं, असा एकादा श्रीहरीचा भक्त सांगा कीं, ज्यास मी जाऊन वंदन करावें व प्रेमभक्तींत लीन व्हावें. नारदांनीं चटूदिशी " गोकुळांत राधा ही फार थोर भक्त आहे " असें सांगितलें. राधेचें नांव ऐकतांच दुर्वासांचें तोंड हिरमुसलें झालें. परंतु एकवार जाऊन पाहावें असें मनांत आलें व ताबडतोब गोकुळाजवळ आले. गोकुळाबाहेर येऊन या ठिकाणीं राधा म्हणून कोणी श्रीहरिची भक्त आहे तिचें राहण्याचें घर कोठें आहे असा प्रश्न केला. त्याबरोबर व्रजवासी म्हणाले, "वाः मुनि महाराज या गोकुळांत राधा आहे, पण ती भक्त नाहीं. ती दुराचारी जारिणी आहे, तिनें उभय कुलांस कलंक लाविला आहे व आपल्या संगतीनें इतर स्त्रियांसही दूषित करीत आहे. श्रीकृष्णाशीं रत ( समरस ) होऊन तिनें सर्वत्र आपलें नांव बद्द करून घेतलें आहे, आणि मुनिवर्य आपण तिला भक्त म्हणतां ! आपण तिचें नामही उच्चारूं नये. हें ऐकतांच दुर्वासऋषि फार क्रोधायमान झाले व राधेसही शिक्षा लावूं आणि नारदांनीं समजून उमजून आपणास फसविलें आहे याबद्दल त्यांचाही समाचार घेऊं असा विचार करीत राधेचे दारांत येऊन " राधे " म्हणून हांक मारली. हांक मारतांच राधा बाहेर आली व मुनिवर्यांची पाद्यपूजा करून चरणतीर्थ घेतलें, व आसनावर बसण्यास विनंति केली. परंतु आसनावर न बसतांच क्रोधानें संतप्त होऊन ओंठ थरथर कांपत असतां दुर्वास म्हणाले

श्लोक– राधे, आचरिलें तपासि अथवा पापासि केला ठसा।
ऐसें ते यमदूत तूज पुसतां तूं जाब देसी कसा ? ॥

राधा म्हणते– राधा बोलत तापसा मम ठसा जा सांवळ्याला पुसा।
माझा लेख असा तसाहि सहसा कामास ये कायसा ॥ १ ॥
माझी रीत जशी हरीसि पटली तैसीच आहे खरी।
नाथावीण भली बुरीहि मजला कोणी कसा हो करी ॥

नाथाचे गुण सोडुनी मम गुणा चिंतूं कशाला तरी ।
मी हो फार बुरी परी बहुभला आहे सखा श्रीहरी ॥ २ ॥

( अर्थ सोपा म्हणून लिहिला नाहीं. )

इतकें ऐकतांच जयश्रीकृष्ण म्हणून दुर्वासांनीं मस्तक नमविलें, व भक्तिप्रेमानें सर्वांग थरारून अष्टसात्विकभाव उदयास आले. परमोच्च भक्तींत मीपणाचा पूर्ण विसर पडून परमात्मपदीं वृत्ती लीन झाल्या म्हणजे भोंवतालची परिस्थिति कशी आहे याचें स्मरण करण्याचें कारणच उरत नाहीं. मीपणाचा निरास परमात्मस्वरूपांत होतो व असें झालें म्हणजेच

ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ॥

अशी स्थिति आपोआप तयारच होते.

९. पहा बरें राधेचें उदाहरण. भोंवतालची परिस्थिति अतिशय कठीण, चहूं बाजूनें निंदेचा वर्षाव होत होता, बाह्यसुख लेशमात्र नव्हतें, एकही आनंदाचा शब्द-कोणीही बोलत नसे. तथापि सर्व आनंदाचा कंद हृदयविहारी परमानंद मुकुंद रोमरोमांत उदयास येऊन त्याचेवांचून जगतच दिसेनासें झालें होतें. या स्वानंदसुखामृतापुढें बाह्यनिंदेस कोण पुसतो ? इतकी परमोच्च भक्तीची स्थिति आली म्हणजे सहजच ' ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें । चित्ती असों द्यावें समाधान ॥' अशी स्थिति होते.

१०. राधेची परमोच्च भक्ति प्रेमांत विलीन झाल्याची खूण पाहूं. " नाथाचे गुण सोडुनी मम गुणा चिंतूं कशाला तरी ।" या चरणांत राधा सर्वांगानें, सर्वावस्थेंत परमात्म्याशीं समरस झाल्याची खूण आहे. भक्ताचें चित्तसर्वस्व प्रभुरायांत समर्पित झालें कीं, सर्व व्यवहार प्रभूचें नांवें होतात व आपलेपणाचा पूर्ण निरास होतो. मी व माझें हें द्वंद्व नाहींसें होतें. या ठिकाणावर असतां स्वतःचे गुणावगुण भक्त पाहूं शकत नाहीं. कारण भक्ताचें सर्वस्वच प्रभुराय होतात. मग भक्ताच्या ठिकाणचें मी हें नांव परमात्म्याचेंच आहे अशी अंतर्बाह्य वृत्ति परमात्म्यांत मुरलेली असते. उदाहरण, वकीलाची स्त्री लक्ष्मीनामें आहे, तिला लक्ष्मीबाई म्हणून हांक मारल्यास समाधान होत नाहीं. त्यापेक्षां वकिलीणकाकू म्हणून हांक मारल्यास स्वानंद उचंबळतो. वास्तविक लक्ष्मीबाईनीं वकिलीची परीक्षा दिलेली नसते. परंतु कायावाचामनेंकरून सर्वस्व पतिचरणीं स्वात्मार्पण केलेलें असतें, म्हणूनच त्याच्या नांवानेंच ही भूषित होते. तद्वतच भक्ताचेंही आहे. सर्वस्व परमात्मपदीं समर्पण करून राहणें म्हणजे सर्वावस्थेंत प्रभुराय उदयास येणें ही सुंदर भक्तियोगाची स्थिति

ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥

हें दाखविते.

तृतीय चरणांत तुकाराम महाराज म्हणतात

वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें. ॥

११. आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीविषयीं उद्वेग, चिंता, काळजी, तळमळ केली तर मात्र दुःखच सोसावें लागेल. कारण चित्त भगवत्प्रेमातिशयानें भरून गेलें नसलें म्हणजे त्या चित्तांत विषयस्फुरण असतें. अर्थात् देहाभिमान धरून देहाच्या विषयाबद्दल सुखदुःख मानणें; विषयप्राप्तीनें सुखप्राप्ति होईल अशी दुर्बल भावना धारण करणें. याचें फल " विषयेषु विषज्जते " कधींही सुखप्राप्ती न होणें हें होतें, व इंद्रियद्वारां विषयसुख प्राप्त झालें नाहीं म्हणजे त्या सुखासाठीं सारखी धडपड–तळमळ करावी लागते. यासच दुःखभोग म्हणतात, व इंद्रियद्वारां विषयप्राप्ती होऊन सुखाचा ठेवा सांपडेल अशा दुर्बळ वृत्तीच्या जीवाच्या मागें संचितक्रियमाणाचें चक्र सारखें फिरत असतें व तें चक्र अनंत जन्मांतही दूर होत नाहीं. यासाठीं बाह्य व अंतर् परिस्थितीविषयीं कोणत्याही कालीं शोकचिंता करूं नये; केल्यास देहाभिमानामुळें संचित कर्म भोगावें लागेल. यासाठीं तुकोबाराय कळवळून सांगतात, बापहो, वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें. चतुर्थ चरणाचें स्पष्टीकरण पुढील आख्यानांत होईल. (अपूर्ण)

---


# ६ कविवर्य मुक्तेश्वर (चरित्र आणि काव्यविवेचन.)

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातु मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता. त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरीभारतांतील विशेष गुणः–सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ० कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचरित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिद्धी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. ' मुक्तेश्वरनीतिरत्नमाला ' ही शेवटीं जोडली आहे. पृ. सं १४४. किं. रु. १


---

# पद–दत्ताचें.

( चाल--कृष्ण मुकुंदा हरि गोविंदा वंदन हें सेवा ॥ )

श्रीगुरुराया दत्तात्रेया ! नमितों तव पायां ।
अजाण आम्ही अम्हां न कळते अगम्य तव माया ॥ ध्रु० ॥
बुडतों आम्ही भवसागरिं या नच कोणी त्राता ।
तुजविण आम्हां कुणी न सदया ! बंधु भगिनी माता ॥
तव करुणाकर देउनि काढीं अम्हांस गुरुराया ॥ श्री० १ ॥
काम क्रोध मद मोह लोभ हे रिपु छळिती आम्हां ।
मत्सर पोटीं पेट घेतसे घेउं न दे नामा ॥
संसाराचा पाश ओढितो आम्हां गुणधामा ॥
सर्वस्वाचा होम पेटला आहुति घेई वायां ॥ श्री० २ ॥
धनसुतदारा व्यर्थ पसारा वाटतसे लोकीं ।
सुखाचे जगीं सर्व संवगडी परि मिरवति शेखी ॥
प्रेम नसोनी ढोंग दाविती स्वार्थास्तव लोकीं ॥
भूल पडे कां व्यर्थ गुरो ! बा चाळविसी जीवा ? ॥ श्री० ॥ ३ ॥
तव गुण गातां थकले वेदहि श्रुति धरिती मौन ।
तव चरिताचा तुझियावांचुनि बोध करी कोण ? ॥
निगमागम हे तव नच ठावें आम्हां लागून ॥
तुझियावांचुनि आम्हां कोणी शक्त न ताराया ॥ श्री० ४ ॥
आलों आलों आलों तुजला शरण मनोभावें ।
संसाराच्या बिकट वनांतुनि सत्पथ दावावे ॥
प्रेम हेम कीर्ती यांच्यांतुनि मनास काढावें ।
अज्ञ बाळकें तुझींच आम्ही ज्ञाणें ये या समया ! ॥ श्री० ५ ॥

जनस्थान

–विद्याधरानुज.

# लक्ष्यालक्ष्यरहस्य.

लेखकः—**परशुराम हरि थत्ते.**

## भाग पहिला.

### लेखांक १.

**१ निज–बोध–रूप.**

नाहं मनुष्यो न च देवयक्षो । न ब्राम्हणक्षत्रियवैश्यशूद्रः ॥
न ब्रम्हचारी न गृही वनस्थो । भिक्षुर्न चाहं निजबोधरूपः ॥ हस्तामलकस्तोत्रम्

**अर्थः**—मी मनुष्य नाहीं, मी देव नाहीं, मी यक्ष नाहीं, मी ब्राम्हण नाहीं, मी क्षत्रिय नाहीं, मी वैश्य नाहीं, मी शूद्र नाहीं, मी ब्रम्हचारी नाहीं, मी गृहस्थ नाहीं, मी वानप्रस्थ नाहीं, मी संन्यासी नाहीं, तर मी आहे तरी कसा ? **एक निज-बोध-रूप आहे.**

म्हणजे मी केवळ माझ्या जाणिवेच्या रूपाचा आहे व त्या जाणिवेस माझा मीच जाणूं शकतों. माझ्या आयुदार्यांत मनुष्यादि सर्व जातींचा अंतर्भाव होतो. तर मी त्यांपैकीं एकाच विवक्षित जातीचा आहे असें नाहीं. म्हणजे मी अर्थात त्या सर्व जातींचा आहे. व माझ्या लक्ष्य, दृश्य व ज्ञेय रूपांत स्वतःची जाणीव हाच माझा अलक्ष्य, अदृश्य व अज्ञेय आत्मा होय.

**२ औदार्यः—**

जुलम मत करना रे बच्चा । अलखका खेलन सब सच्चा । जु० (ध्रु० )
धोले रे प्हेरो, भगवे रे प्हेरो, प्हेरो सुरंगी जामा;
अब्धुत हो, अरु हो संसारी । नर हो, अरु हो रामा ! जु० १
अलख लखत हय सब ही खेलन, होने दो, हय जैसा !
अलख जगावनको अधिकारी न । विभूत लगावे कैसा ? जु० २

अशा प्रकारचें या लक्ष्यालक्ष्य, अथवा दृश्यादृश्य, अथवा ज्ञेयाज्ञेय अथवा सदसद अथवा नित्यानित्य वस्तूंचा विचार करणाऱ्या योग्यांचें धर्मांत **औदा**चास करितें. तें कोणावर जुलूम करून आपलीं मतें त्यास ग्रहण करावयास लावीत नाहींत. ते समजूत घालून आपल्या चेल्यास आपल्या पंथाची दीक्षा देतात.

**३. भेदः**—हे योगी अद्वैत वेदान्तीच आहेत. पण ते त्या वेदान्ताचे निराळे दोन भाग पडतातः १ श्रुति–उक्त, व २ श्रुति–अनुक्त–वैयासक, शांकर आदिक. श्रुतीच्या भागांतून झांडून सर्व सांप्रदायरूप नद्यांचें मूळ आहे हें

त्यांस मान्य आहे. पण श्री शंकराचार्यांच्या वेदान्तांत संन्यासाला उत्तम पदवी दिली आहे व मायेला त्याज्य गणली आहे हें त्यांस मान्य नाहीं. भगवान् शंकराचार्य यांस ते पूज्य मानितात. पण सदरहू दोन बाबतींत अलक्ष्यसिद्धान्त हा त्या आचार्यांच्या सिद्धांताहून भिन्न आहे. ही गोष्ट पुढील या रहस्याच्या विवरणावरून सहज समजेल. श्री शंकराचार्यांच्या वेदान्तांत जीव, ईश्वर व ब्रह्म या त्रिपुटीचें अस्तित्व मानिलें आहे. तें लक्ष्यालक्ष्य योग्यांस मान्य आहे. पण त्या आचार्यांच्या त्रिपुटीच्या ठिकाणीं लक्ष्यालक्ष्य योगी फक्त लक्ष्य व अलक्ष्य यांचीच द्विपुटी मानितात. कारण ती समुजुतीस जास्त सोयिस्कर पडते. जीव व ईश्वर या दोघांच्याही गळ्यांत उपाधींचें लोढणें असतें म्हणून ते त्या उभयतांस एका पुटींत अथवा पक्षांत मोडतात, व दुसऱ्या पुटींत अथवा पक्षांत उपाधिशून्य ब्रह्मास घालितात. प्राकृत जन आपल्या चर्मचक्षूंनीं म्हणजे चामड्याच्या डोळ्यांनीं उपाधींवरूनच केवळ जीव व ईश्वर यांस ओळखूं शकतात. म्हणून ते योगी जीव व ईश्वर यांस लक्ष्य अथवा **लख** म्हणतात, पण प्राकृत जन उपाधिहीन ब्रम्हास पाहूं शकत नाहींत, म्हणून ते योगी त्यास अलक्ष्य अथवा **अलख** म्हणतात. भगवीं वस्त्रें परिधान केलेले, सर्वांगास भस्म चर्चिलेले, घुंघुर, घंटा यांच्या नादानें कर्ण आकर्षणारे, जटाभार बाळगणारे, अंगास जागोजाग काळ्या दोऱ्यांचीं वेष्टणें असलेले व दोन भोंवयांत लाल आडवी रेषा काढलेले, भिक्षा कोणी घातल्यास जंगबारीं कडव्या जहरी नारिकेलाचें काळें अर्ध पुढें करणारे गोस्वामी अथवा गोंसावी यांच्या तोंडीं जो हा अलक्ष्य अथवा अलख हा शब्द दररोज संध्याकाळीं हिंदुस्थानभर खेडोपाडीं व शहरोशहरीं वारंवार ऐकूं येतो, त्या अलख शब्दाचें हें असें उदात्त रहस्य आहे. पण तें कोणास समजेनासें झालें आहे. असो. पण ही अशी द्विपुटी ते मानितात. ह्या द्विपुटीस मूळ सिद्धान्ताप्रमाणें लक्ष्यालक्ष्य, किंवा लख व अलख म्हणा, किंवा नवीन ग्रंथांप्रमाणें दृश्यादृश्य, नित्यानित्य, सदसद्, ज्ञेयाज्ञेय म्हणा पण त्यांतील पूर्वोक्त स्थूल भेद बरोबर लक्षांत ठेवा म्हणजे झालें.

**४. पूर्णअद्वैत**—जीवसृष्टि ही मनोराज्यग्रस्त असते व ईश्वरसृष्टी ही मायाग्रस्त असते. मनोराज्य व माया या अनुक्रमें जीव व ईश्वर यांच्या प्रत्येकीं उपाधी आहेत. त्यांना ते लक्ष्यालक्ष्यविवेकी लक्ष्याहून निराळे मानीत नाहींत. मनोराज्य व माया ह्यांस ते हेय म्हणजे त्याज्य मानीत नाहींत. हेयोपादेयता हाही एक रागद्वेषाचा प्रकार आहे व त्यांनीं ह्याचा स्वीकार केला असता तर लक्ष्यालक्ष्यसांप्रदायावर द्वैतमताची उघड झांक मारली असती. पण मनोराज्य उर्फ संसार व माया ऊर्फ मोह यांचा स्वीकार किंवा त्याग ह्यांतील एकही ते जाणूनबुजून करीत नाहींत. श्रीजनक, रामकृष्ण आदिकरून ज्ञानी महात्म्यां-

प्रमाणें ते स्वाभाविक पूर्ण अद्वैत मान्य करितात. अशा स्वाभाविक अद्वैतपूर्ण व्यवस्थेपासून दुसरा एक अपूर्व लाभ होतो. तो हा कीं त्यांस लक्ष्य ईश्वरापासून लक्ष्य जीवाचा अस्वाभाविक भेद मानावा लागत नाहीं. जीवरूप लक्ष्य हें ईश्वररूप लक्ष्य घड्याळाचें एक चक्र होय, व तें चक्र त्या घड्याळांतील इतर लहानमोठया चक्रादि भागांपासून गैरहिशोबी चालूं लागेल तर तें सगळें घड्याळ निरुपयोगी, अर्थात् नष्टप्राय होऊन पडेल. म्हणून ईश्वररूप कमान ही जें लक्ष्यरूप घटीयंत्र चालविते तिचेबरोबर ते जीवरूप लक्ष्य चक्राशीं स्वाभाविक पूर्ण अद्वैत राखून असतात. ते सुख व दुःख, संसारवैराग्य आदिकरून द्वंद्वाच्या अतीत ऊर्फ पलीकडे राहतात. म्हणजे ते त्या द्वंद्वांत अभेद अथवा अद्वैत बुद्धि ठेवितात. आणि याप्रमाणें संन्यास न घेतां, अर्थात् दुनियेंत निरुपयोगी होऊन न पडतां, म्हणजे कालवशात् संसार करणें पडला तर तोही करून ते लक्ष्यालक्ष्य धर्म पाळितात. आणि लक्ष्यधर्म पाळण्यांत धुरंधर जे श्रीरामकृष्णादि अवतार होऊन गेले, त्यांच्या पूजाअर्चा करण्यांत ते कनिष्ठ अधिकाऱ्यांस प्रवृत्त करितात. अशा करितां कीं कालगत्या भक्तीनें पूज्यामध्यें जागृत झालेल्या अलक्ष्याग्नी पूजकामध्यें म्हणजे भक्तांत लोहचुंबकन्यायानें जागृत व्हावा व लक्ष्यालक्ष्य धर्माचा भंग होऊं नये.

५. **दिव्यदृष्टि.**—लक्ष्यरूप जीव नांवाचें स्फुलिंगास असा प्रबोध मिळतो तेव्हां त्यास प्राकृत दृष्टीच्या ठिकाणीं संस्कृत अथवा दिव्य दृष्टि प्राप्त होते व तोंपर्यंत जणूं निजून राहिलेला अलक्ष्यरूप परावर आत्मा आपल्या त्या लक्ष्यरूप स्फुलिंगांत जागृत किंवा प्रज्वलीत होतो. तेव्हां या रूपांतरास लक्ष्यालक्ष्य सिद्धांती लोक अलक्ष्य किंवा अलख जागणें ही संज्ञा देतात.

६. **साधनें:**—१ लक्ष्य[1]रूप जीवाचें लक्ष्यरूप ईश्वराशीं ऐक्य साधावयाचें तें ऐक्य–ईश्वराची अनन्य भक्ति केल्यानें व शैशव, गार्हस्थ्य, स्त्रीधर्म, राजधर्म आदिकरून संसारांत जे जे लक्ष्य धर्म असतील, ते ते नीट पाळिल्यानें प्राप्त होतें. २ या संयुक्त लक्ष्याचें अलक्ष्याशीं ऐक्य साधावयाचें. तें ऐक्य ज्ञान व समाधि द्वारा लक्ष्याचा अलक्ष्याशीं योग साधून लोहचुंबकन्यायानें लक्ष्यांत अलक्ष्य जागृत केल्यानें प्राप्त होतें. तेव्हां लक्ष्य व अलक्ष्य यांच्या अद्वैताचा म्हणजे अभेदाचा अनुभव प्राप्त होतो.

७ **मुक्तिः**—ह्या दुनियेभर अलखाचा नाना प्रकारचा खेळ चालला आहे. अलख हा सागर बनून त्यावर लखाच्या ऊर्मी उठत आहेत. अलख हें ब्रह्म व लख हा जीव व ईश्वर. ह्या जीवेश्वराचा संसार सृष्टीभर पसरलेला आहे. त्या संसाराची गति धनुष्यापासून सुटलेल्या बाणाच्या गतीप्रमाणें आहे. म्हणजे

---

१ लक्ष्यरूप म्हणजे लक्ष्य अथवा दृश्य अथवा ज्ञेय आहे रूप ज्याचें.

त्या बाणाच्या गतीस प्रारंभ व अंत असतो; त्याप्रमाणें त्या संसाराला आदि व अंतही आहे. स्थूलामध्यें सूक्ष्म व सूक्ष्मामध्यें कारण वास करितें. लक्ष्य देहाचे असे तीन प्रकार आहेत, व ह्या कारण देहाचें एका स्थूल देहापासून दुसऱ्या स्थूल देहीं संक्रमण जन्ममरणाच्या रूपानें होतें व असें त्याचें संक्रमण ८४ लक्ष योनींमध्यें अखंड सृष्टिप्रारंभापासून सृष्ट्यंतापर्यंत चालू राहतें, व जन्ममरण+जन्ममरण+जन्ममरण अशी संक्रमणाची सांखळी होत जाते. जन्ममरणकाळीं ह्या संक्रमणाच्या सांखळींतील दुवे सांत (अंतासह) दिसतात. पण ह्या सांखळीच्या कारणाचा खरा प्रारंभ सृष्टीच्या आरंभीं मायेच्या सर्जनाबरोबर झालेला आहे व त्याच्या कार्यसमष्टीचा खरा अंत सृष्टीच्या शेवटीं होतो.कारणाच्या संसाराचा हा नियतकाल अथवा मुदत होय. त्या मुदतीच्या आरंभीं कारणास बंध व तिच्या शेवटीं त्यास मोक्ष प्राप्त होतो. हा स्वाभाविक महामोक्ष होय ह्या मुदतीच्या पोटीं दुसरा मोक्ष होणें शक्य असतें. त्यास कृत्रिम लघुमोक्ष म्हणतात. तो मन, मति व बुद्धीला प्राप्त होतो. हे बंध व मोक्ष–युगाचे अंतीं किंवा कल्पाचे अंती होवोत, ब्रह्मांडांच्या अंती किंवा पिंडाच्या अंतीं होवोत, ते लक्ष्य कारण देहास ऊर्फ मनास होतात, ते अलक्ष्य आत्म्यास होत नाहींत. कारण ' मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः । असें श्री कपिलगीतेंत व । संन्यास योगयुक्तात्मा कुर्वन्मुक्तमतिर्भव । असें श्रीयोगवासिष्ठांत म्हटलें आहे. बंध व मोक्ष हे संसाराच्या मार्गावरील आदि व अंत यांचे मैलाचे दगड आहेत, त्या दगडांचा स्वतंत्र आत्म्याशीं कांहीं संबंध नाहीं. परमात्मसागरावरील देही हे केवळ तरंग होत. त्या परमात्म्याच्या सान्निध्यानें लोहचुंबकवत जीवांत प्रबोध अथवा अलख जागृत होऊं शकतो. बाकी, त्या जीवात्म्यास बंधमोक्ष होतो कीं नाहीं म्हणाल तर त्यास होणें मुळींच शक्य नाहीं. कारण श्री गौडपादाचार्यांच्या वेदान्तांत आत्म्यास स्वयंभु, अबद्ध व मुक्त असें स्पष्ट म्हटलें आहे.

८. **वेष**—लक्ष्यालक्ष्यविवेकी लोक संसाराचा त्याग करीत नाहींत. ते जसे रक्त नसतात, तसेच विरक्तही नसतात. तर ते कसे असतात ? ते अरक्त असतात. ही त्यांची वृत्ति दाखविण्यास ह्या पंथाचे साधू जीं रक्त नाहींत व विरक्त नाहींत अशी भगवीं वस्त्रें वापरतात व अंगास विभूति लावितात, व जटा राखतात. अलख लखला सोडून नसतो. भस्माच्या भाराखालीं अग्नि जागृत असतो, त्याप्रमाणें लखाच्या भाराखालीं अलख जणूं जागृत असतो. तो अलख पाहाण्याची इच्छा करील त्यास ते दाखवून देण्याचें काम करितात. म्हणून ते लखची पूजा करितात व अलख शब्दांच्या गर्जनेनें दशदिशा घुमवितात व वासनांच्या जाळ्यांत घोटाळणाऱ्या संसाऱ्यांस त्या जाळ्यांतून सोडवून त्यांस सिध्या मार्गास लावितात. पण त्यांतील दुःखाचा उच्छेद करण्याकरितां ते संसाराचा त्याग करण्यास कोणासही सांगत नाहींत. ते गोस्वामी म्हणजे पृथ्वी-

पति, इंद्रियनिग्रही किंवा गाई बाळगणारे म्हणवितात. ते अज्ञानी लोकांच्या अज्ञान–निशेंत जागृत राहतात व पोलिसांप्रमाणें रोंड फिरण्यास निघतात व सर्वत्र अलख जागविण्याची केवळ परार्थ माथेकूट करितात.

इतर पंथांत जे संन्यास घेतात, त्यांस गृहस्थाश्रमांत पुन्हां जातां येत नाहीं. पण अलख पंथाचा गोसावी पुन्हां गृहस्थाश्रमांत जाऊं शकतो. विभूती सर्वांगास लाविलीच पाहिजे असा निर्बंध त्यांच्यांत नसतो. ती एक वेळ मस्तकीं धारण केली कीं बस. या पंथांत उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे तीन वर्ग असतात. त्यांत अलखला पुजलें म्हणजे झालें. त्यानें त्यानंतरही लग्न केलें तरी चालतें. मात्र ते लग्न त्यांस कामशास्त्रांतील संवननादि संस्कारपूर्वक करावें लागतें व ते संस्कार ह्या सुधारणेच्या काळास तर अत्यंत शोभण्यासारखें उत्तम आहेत. वरील अधिकारी मुख्य मठांत राहतात व विवाहित जोगी व जोगिणी उपमठांत राहतात. पण ते सर्व भिक्षार्थ पर्यटण करितात व अन्न एकत्र रांधून खातात. 'कर्मण्येवाधिकारस्ते' हें त्याचें व्रत असतें. ते कर्मनष्ठ नसतात. ते लोकोपयोगी असतात. असले लोक बायकापोरांचे लाड पुरविण्यास व वडिलांचे धन राखण्यास संसारांत न राहिले तरी दुनियेचें नुकसान मुळींच फारसें होत नाहीं. उलट पुष्कळ फायदाच होतो.

**आचार—**'* प्रारब्ध कर्म क्षीण होतांच व्यवहार निवृत्त होतो व कर्माचा क्षय झाला नाहीं तोंपर्यंत सहस्रदां ध्यान केलें तरी व्यवहाराची शान्ति व्हावयाची नाहीं. मला विक्षेप नाहीं तर मला समाधीचीही जरूर नाहीं व विक्षेप व समाधि ह्या विकारी मनाकारितां आहेत. अथवा मी जातीनेंच नित्यानुभवरूप आहें, तर त्याला निराळा अनुभव कशाला? माझा असा निश्चय आहे कीं मला जें करावयाचें होतें तें मी करून घेतलें व मिळवावयाचें होतें तें मी

---

* प्रारब्धकर्मणि क्षीणे व्यवहारो निवर्तते ।
कर्माक्षये त्वसौ नैव शाम्येद् ध्यानसहस्रतः ॥
विक्षेपो नास्ति यस्मान्मे न समाधिस्ततो मम ।
विक्षेपो वा समाधिर्वा मनसः स्याद्विकारिणः ॥
नित्यानुभवरूपस्य को मे वानुभवः पृथक् ।
कृतं कृतं प्रापणीयं प्राप्तमित्येव निश्चयः ॥
व्यवहारो लौकिको वा शास्त्रीयो वान्यथापि वा ।
ममाकर्तुरलेपस्य यथारब्धः प्रवर्तताम् ॥
अथवा कृतकृत्योऽपि लोकानुग्रहकाम्यया ।
शास्त्रीयेणैव मार्गेण वर्तेऽहं का मम क्षतिः ॥—पञ्चदशी
तस्य पुत्रा दायमुपयान्ति सुहृदः साधुकृत्यं द्विषंतः पापकृत्यम् ।

मिळवून घेतलें ! ज्ञानी मनुष्यास असा व्यवहार नसतो, म्हणजे त्यास तो स्वतःकरितां नसतो पण जगाच्या कल्याणाकरितां त्याची प्रवृत्ति नष्ट होत नाहीं. 'मी जातीनें अकर्ता आहे व निर्लेप आहे ! तर माझा व्यवहार लौकिक रीत्या किंवा शास्त्रीय रीत्या किंवा प्रारब्धाप्रमाणें अन्य रीत्या प्रवर्तो. अथवा मी कृतकृत्य आहे तरी लोकांवर अनुग्रह करण्याच्या इच्छेनें मला शास्त्रीय मार्गानेंच वर्तावें लागलें तरी त्याची मला पर्वा नाहीं.' पण जगाचें कल्याण करण्याचें कारण काय ? अलक्ष्याचें दर्शन झालें असतां मनुष्याचा मोक्ष होतो हें खरें आहे. म्हणजे मनुष्य वासनाजन्य सुखदुःखापासून मुक्ति पावतो. कारण आत्मा खुद्द बद्ध नाहीं कीं मुक्त नाहीं. स्थूलसूक्ष्म हें तर कर्मविपाकाच्या पूर्णाहुतीनेंच सुटतें. संसारी लोकांत प्रिय व अप्रिय यांचा विचार चालतो, पण साधू लोकांस कोणीही अप्रिय नसतें, पण कांहीं संसारी लोक त्यांचा द्वेष करणारे असतात. त्यांच्या संबंधें श्रुतिवचन असें आहे कीं, त्याचे मुलगे दाय (वारसा) मिळवितात, त्याच्या मित्रांस त्याच्या चांगल्या कृत्यांचा वारसा मिळतो त्याच्या वैऱ्यांना त्याच्या पापकृत्यांचा वारसा मिळतो.

संसारी लोक स्वतःकरितां सर्व प्रपंच मांडितात. पण साधुजनांचें शरीर जोंपर्यंत विद्यमान असतें तोंपर्यंत लोकांचें कल्याण करण्यांत ते आपलें आयुष्य घालितात. ख्रिस्ती, मुसलमानी वगैरे इतर धर्म एकदेशीय आहेत. तसा हा लक्ष्यधर्म एकदेशीय नाहीं, तर तो सर्वदेशीय व सनातन आहे. ह्या सनातन धर्माचें लक्षण मनूच्या एका वचनांत असें आहे कीं '×विद्वान व रागद्वेषहीन साधुजन जो धर्म नित्य उपदेशितात व जो धर्म नित्य पाळतात तो धर्म श्रेष्ठ होय.' या वचनांत इतकें उदारत्व भरलें आहे कीं त्यांत शास्त्राच्या अनुज्ञेची मर्यादा न ठेवितां केवळ साधुजनांच्या अनुज्ञेची मर्यादा ठेविली आहे. या

---

× विद्वद्भिः सेवितः सद्भिर्नित्यमद्वेषरागिभिः ।
हृदयेनाभ्यनुज्ञातो यो धर्मस्तं निबोधत ॥
दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं जलं पिबेत् ।
सत्यपूतां वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत् ॥
यथा नदीनदाः सर्वे सागरे यान्ति संस्थितिम् ।
तथैवाश्रमिणः सर्वे गृहस्थे यान्ति संस्थितिम् ॥
आत्मन्यग्नीन् समारोप्य जुव्हीतात्मानमात्मना ॥
संत्यज्य सर्व शास्त्राणि संत्यज्यामुं च संग्रहम् ।
ऋतपूतं मनःपूतं सत्यपूतं समाचरेत् ॥
यत्र यत्र न्यसेत्पादं पश्येच्छृण्वीत वा वदेत् ।
आत्माग्नि र्यजमानोयं तत्र तत्रातिथिर्विराट् ॥

साधुजनांच्या वर्तनासंबंधें मनूचें वचन आहे त्यांत असें म्हटलें आहे कीं 'दृष्टीनें शुद्ध करून पाय ठेवीत जावा, वस्त्रानें शुद्ध करून पाणी पीत जावें व मनानें शुद्ध करून आचरण ठेवीत जावें.' पण मनूच्या दुसऱ्या एका वचनांत असें म्हटलें आहे कीं 'ज्याप्रमाणें सर्व नद्या व नद सागरामध्यें संस्थिति पावतात, त्याप्रमाणें सर्व इतर आश्रमांतील जन गृहस्थाश्रमांत संस्थिति पावतात!' म्हणून लक्ष्य धर्मांत इतकीही उदारता ठेविली आहे कीं कांहीं विशेष कार्यासाठीं हे साधू आपली गोधडी टाकून संसाऱ्यांत संसाऱ्याप्रमाणें वागूं लागले तरी त्यांत अधर्म होत नाहीं असें उघड ठरविलें आहे. संसारी लोकांप्रमाणें हे साधू अग्निहोत्र चालवीत नाहींत, तर ते आत्मयज्ञ चालवितात. ह्या साधुलोकांत आत्मयज्ञानें जे उत्तम अधिकारी निपजतात, त्यांच्यासंबंधें ह्यापेक्षांही अत्यंत औदार्य दाखविलें आहे. तें असें कीं 'त्यांनीं सर्व शास्त्रें तर काय पण लक्ष्यधर्माचाही त्याग करून ऋतपूत, सत्यपूत व मनःपूत ह्या तीन गाळण्यांतून बरोबर गळेल असें आचरण करण्यास सांगितलें आहे.' अशा प्रकारें आत्मयज्ञ साधणारा यजमान जेथें जेथें पाय ठेवितो किंवा कांहीं पाहतो किंवा कांहीं ऐकतो किंवा कांहीं बोलतो तेथें तेथें विराट् पुरुष स्वतः अतिथि होतो! (अपूर्ण)

---

## २ सार्थ व सटीक नारदभक्तिसूत्रें. किं. ८८.

### (आवृत्ति तिसरी.)

हीं नारदांचीं भक्तिसूत्रें मूळ असून ८४ आहेत. सूत्रें अत्यंत सुबोध व गोड आहेत. यांत भक्तिशास्त्राचा सर्वांगसुंदर विचार केला आहे. ह्या ग्रंथांत सूत्रांचें वर्गीकरण मोठया टाईपांत सूत्रें, सरळ अर्थ व भक्तिग्रंथाधारें विस्तृत विवेचन केलें असन ग्रंथ अतिमधुर झाला आहे.

**श्रीगुलाबरावमहाराज**—"आपलीं सार्थ व सटीक सूत्रें मीं समग्र वाचलीं. सूत्रांचें विवरण फार चांगलें झालें आहे. स्पष्टीकरणार्थ श्रीसंतवचनांचा जो संग्रह केला आहे तो सोन्यावर जडावाप्रमाणें सुस्थळीं व समयोचित आहे."

**धर्मजागृतिः**—"नारदसूत्रांचें मराठींत विवरण करण्यास रा. रा. पांगारकरांसारखा सहृदय व्याख्यानकार लाभल्याबद्दल महाराष्ट्रीयांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

**विविधज्ञानविस्तार**—"लक्ष्मणरावांची भाषा महाराष्ट्रसंतांच्या अमृतवाणीच्या ओलाव्यांत कशी थबथबलेली असते हें या विषद स्पष्टीकरणावरून ध्यानीं येईल."

---

॥ श्रीदत्त. ॥

# "जगीं सर्व सुखी असा कोण आहे ?"

[ लेखक--दत्तकिंकर-कंधारकर-नांदेड. ]

पद—( चाल-हटातटानें पटा रंगउनि )

ब्रह्मज्ञान्याविरहित कोणी खरा शांत-सुखि नसे।
जग हें चिंतामय दिसतसे ॥ धृ० ॥
पोटा कोणा अन्न न मिळतें म्हणुनिच चिंता पडे।
खावया सदा मनीं धरपडे।
चाल—कुणि गृहीं संपदा येईल कैसी म्हणे।
चिंतेंत वदे कधिं भरिन तिजोऱ्या धनें।
कुणि सधन होउनी ' कीर्ति ' पसरितो म्हणे।
विवाह ईशा होईल कधिं तरि माझा म्हणुनी बसे।
एक तो तळमळ मनिं करितसें ॥ १ ॥
संततिविरहित या जगतीं मी देउं कुणा संपदा।
कुणा अशि लागत चिंता सदा।
चाल—जाहले बहु दिन परि नच हो ! अजवरी।
होत ना पुत्र, मज कन्या असती जरी-।
कधिं पाहिन ईशा ! पुत्रमुखा मी परी।
अशी काळजी लागत कोणा, निशिदिनि मनिं झुरतसे।
सदा तो ' करूं म्हणत हो कसें ।' ॥ २ ॥
मृत्यूला कुणी भीत सदोदित लौकरि आल्या कसे ?।
मनींची हौस मनीं वसतसे।
चाल—कुणि बंधुवियोगें दुःख करी मानसीं।
कुणि पुत्र वारला म्हणत करूं गति कशी ?।

कुणि दारा गेली मिळे न पुनरपि तशी ।
" मातृवियोगें मम बालक हें सदनीं राहिल कसें ?"
म्हणूनी चिंता कुणि करितसें ॥ ३ ॥
माय कुणाची, बाप कुणाचा, भगिनि कुणाची सखी ।
वारली ' हाय ' म्हणत निजमुखीं ।
चाल—कुणि वित्तरक्षणासाठीं चिंता करी ।
धन पुरेल कीं, नच मृत्यु येत तोंवरी ।
ना वारस कुणि मज रक्षण करण्या घरीं ।
पहिली पत्नि असतां कोणी कांता दुजि केलिसे ।
सवतिचा कलह लावितो पिसें ॥ ४ ॥
त्या त्रासें जरि कुणा संपदा, सौख्यहि वसते घरीं ।
परी त्या चैन नसें अंतरीं ।
चाल—जरि राज्य मिळालें नृपतीपद पावला ।
तरि टिकेल कैसें राज्य सदोदित मला ।
" परचक्र " येत कधिं म्हणुनि मनीं त्रासला ।
प्रजापालनीं, राज्यरक्षणीं, चिंता मनिं त्या वसे ।
अशी ही ' बया ' लावितें पिसें ॥ ५ ॥
संग्रहिं असती कच्चे बच्चे पोषण होईल कसें ?
थोडकें उत्पन्नहि मम असें ।
चाल—कुणि वतनदारिच्या पायीं बहु भांडती ।
कुणि बंधुद्वेषें नित्य गृहीं झोंबती ।
शेवटीं धनादिक घालवोनि बैसती ।
कोर्टामाजी कार्य चाललें यश येइल कीं कसें ?
अशी ही चिंता कितिकां असे ॥ ६ ॥
दिन घटिका आणि पळपळ विलया आयु रितें जातसें ।
परी नच सार्थक लव होतसें ।
चाल—ना झाली यात्रा काशी मथुरा गया ।
कधि येइल माझी जानकिनाथा दया ।
गुरु नसे भेटला मजसि उद्धरावया ।

धर्म करें ही नच घडला निर्धनता लावित पिसें ।
काळजी करीत कुणि म्हणतसे ॥ ७ ॥

शरीररोगें कितीक पिडती त्याची चिंता मना ।
निरोगी व्हायास्तव बहुजनां ।
चाल—कुणि कष्टी होतो नाकिं रक्त वाहतें ।
कधिं ताप देहिं अतिसर्दी मज राहते ।
कुणि म्हणे संग्रहिणि नित्य मला गांजिते ।
डोळे गेले म्हणती कोणी, बधिर करूं मी कसें ? ।
अशी ही चिंता कितिका वसे ॥ ८ ॥

धंदा केला द्रव्य वेंचूनी माल घेतला पुढें ।
मंदिचा रंग दिसत चहुंकडे ।
चाल—कधि विकेल माझा माल म्हणत कुणि धनी ।
गुंतलें द्रव्य ' लव पुंजी ' बोले कुणी ।
गृहिं पैसा नाहीं कसें करूं या क्षणीं ।
माल विकेना, द्रव्य मिळेना, खर्च उरावरि बसे ।
म्हणुनिया चिंता कुणि करितसे ॥ ९ ॥

अधिकारी कुणि न्यायाधीशहि वाहि काळजी अती ।
मानसीं कष्टी कुणि राहती ।
चाल—कुणि चाकरि पायीं दुःखि मनीं होतसे ।
बहुकष्ट करुनिही व्यर्थचि होती कसे ।
ना बढति पगारा किंचित् कुणि देतसे ।
अशी काळजी छळिते कोणा तिजविण जगिं कुणि नसें ।
निर्धना, लावित बहुती पिसें ॥ १० ॥

बालवयांतहि मुलांमुलींना चिंता मनिं लागते ।
शिकाया विद्यादिक, गान, तें ।
चाल—उत्तीर्ण परिक्षेमाजी कुणि व्हावया ।
कुणि वकील, बी. ए. होऊं कधिं म्हणुनियां ॥
कुणि करीत चिंता लंडनास जावया ॥

वेगवेगळी चिंता नूतन वर्णन नच होतसें ।
कवीची लेखणि ही नडतसे ॥ ११ ॥
सौख्याचा जरि सांठा मोठा मिळत कुणा भूवरी ।
त्यासही लव तरि चिंता वरी ।
चाल—जन असे बुडति बहु चिंतेच्या सागरीं ।
कुणि कशासाठिं तर कुणी कशास्तव तरी ।
ना जगीं दिसत जो सर्वसुखी अंतरीं ।
अनंतनंदन दत्तकिंकरा, 'सर्वसुखी' नच दिसे ।
म्हणुनि तो दत्तपदा स्मरतसें ॥ १२ ॥

---


# १६ श्रीसमर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वी आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य भरून त्याला महानिद्रेंतून जागें केलें. ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. ( १ ) प्रपंच ( २ ) राजकारण ( ३ ) परमार्थ व ( ४ ) विविधविषयक प्रकरणें अशा चार भागांत मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा '**सारांश**' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथांचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्याचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, आध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सिम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि व राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे. पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बायडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन.


---

# मुमुक्षूंतील निवडक निबंध.

' मुमुक्षु ' साप्ताहिकांत पहिल्या १०—१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निकडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या ' मुमुक्षु ' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रांसह हे नियमानें वाचावें म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपाया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल; पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्तकाचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिला**—१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वराविषयक संवाद लेखांक १।२।३।४. मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्ममहोत्सव ले. १ ते ४. श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनांतुन सुटावें कसें ? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकाचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ एका भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसरा**—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ ' कुतन्या थमालेले थमाल आपुल्या गाई. ' १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार ? १३ साधुकथा. १४ पतिपत्नीसंबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सार्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर. १९ मातभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांताचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ ऊर्फ संसारवृक्ष. २५ संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचे उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा, ३४ बालविवाह. ३५ बोध आणि विनोद [ या सदराखालीं १९ स्फुटें आहेत. ]

पत्ता—व्यवस्थापक मुमुक्षु, पुणें.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पी. नें ०१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रेंः**—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. ( आवृत्ति ४ थी )

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग २ व ३ किं. १॥ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १०८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

## पांगारकरांचीं पुस्तकें

**११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:**—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ८५.

**१२-१३. मुमुक्षूंतील निवडक निबंध** ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १८८

**१४. मोरोपंतांची वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १८१२.

**१५. पारिजातकांचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ८८.

**१६. श्रीतुकारामचरित्र:**—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह. किं. रु. २.

**१७. श्रीतुकारामचरितामृत:**—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ८५.

**१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:**—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ८१०.

**१९. मुक्तेश्वर** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणासह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

**२०. मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ): -किं. ८४.

**२१. सार्थ श्रीदासबोध:**—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४८१०.

**२२. सार्थ मनोबोध:**—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ८१२.

**२३. समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:**—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


**२४. मोरोपंत** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु. २८४.

**२५. श्रीएकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):—किं. रु. ५

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २१ वें } सप्टेंबर १९२८ } नवें वर्ष ८ वें
मास १२ } श्रावण १८५० } अंक ९ वा



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३।८२

मुद्रकः–लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३०
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका


| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १ |
| २ ज्ञानेश्वरकालीन सुवर्णयुग ... ... ... | २–११ |
| ३ वेंकटरमणअय्यर ... ... ... ... | १२–१५ |
| ४ मलीनतेचें गायन ... ... ... ... | १६–१९ |
| ५ पुरुषोत्तममासाचा आनंद ... ... ... | २० |
| ६ ठकूताईचा ग्रंथ ... ... ... ... | २१–२६ |
| ७ बभ्रुवाहनाख्यान ( उत्तरार्ध ) ... ... ... | २७–४० |


---


# निरंजनमाधवाची कविता.

भाग १ ला किं. १ रु. भाग २--३ किं. २॥ रु.

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्याच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गाथि-लेलें ग्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुटकाव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषे।( सांगणारीं अशीं घातलीं आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जे " सुभद्रा–चंपू " नांवानें या कवीनें केलें आहे. ते छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमींचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही भाग एकत्र बांधविले आहेत.



## पाळणा–श्रीकृष्णाचा.

जो जो जो जो रे । अनंता । श्रीकृष्णा भगवंता ॥ ध्रु० ॥
अनंत पुण्याची । शिराणी । व्रजनंदाची राणी
सच्चिदानंदाची । खाणी । तो हा चक्रपाणी
हलविती घालुनियां । पाळणीं, गोकुळच्या गौळणी ।
जैशा चमकति त्या, चंचलता । घनमंडळिं विद्युल्लता ॥ १ ॥
श्रीपति सुत झाला, नंदाचा । दिवस आनंदाचा
उद्भवला म्हणती या पदाचा । सुरवरव्रजवृंदांचा
करिति गजर श्री-। वरदाचा । उत्सव गोविंदाचा
जमल्या व्रजवनिता, लघुदुहिता । देवि देव त्या सरिता ॥ २ ॥
पदतळिं बळी धरिला, कां नाहीं । ती तुज स्मृति कां नाहीं
सहस्रार्जुन वधिला, कां नाहीं । ती तुज स्मृति कां नाहीं
रावणक्षय केला, कां नाहीं । ती तुज स्मृति कां नाहीं
प्रस्तुत कंसाची, तरि आतां । करितोसी कां चिंता ॥ ३ ॥
वाजति वाजंत्री, करताळा । लोंबति तोरण, माळा
मंगल गीत गाती, वेल्हाळा । होत बहुत सुखसोहळा
निद्रा करे बाळा, गोपाळा । श्रीकृष्णा, घननीळा
विष्णुदासासी, नसे चिंता । चिंतीता अच्युता ॥ ४ ॥

---

# ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्राचें सुवर्णयुग.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांसारखी महाविभूति महाराष्ट्रांत ज्याकाळीं अवतरली त्याकाळाचा थोडा आगेमागें पाहून ऐतिहासिक दृष्टीनें विचार करूं. थोर पुरुष केवळ यदृच्छेनें उत्पन्न होत नाहींत. एखादा प्रचंड वटवृक्ष किंवा आम्रवृक्ष अंतरावरून दिसला कीं त्याच्या आसपास त्या जातीचे अनेक लहानमोठे वृक्ष आहेत असें सरळ अनुमान होतें. कांहीं सजातीय जीव बरोबर घेऊनच महात्मा अवतरत असतो. कांहीं जीव पुढें येऊन त्याच्या आगमनाची तयारी करितात, कांहीं त्याच्या कार्यास सहाय्यक होतात व कांहीं त्याच्या पश्चात् त्याच्या कार्याचा नगारा पिटीत असतात. हाच न्याय ज्ञानेश्वरांच्या बाबतींत खरा आहे. कसा तें आपण आतां पाहूं.

महाराष्ट्राचें बारावें शतक हें मोठ्या भाग्याचें होतें. श्रीकृष्णपरमात्म्याच्या यादवकुळाची एक शाखा महाराष्ट्रांत शके ८०० च्या सुमारास राज्य करूं लागली. दृढप्रहरी राजा हा या यादव घराण्याचा संस्थापक होय. त्यापासून १८ वा पुरुष भिल्लम यानें आपला राज्यविस्तार महाराष्ट्राबाहेर करून सार्वभौमपद मिळविलें. त्याच्यापासून यादवांचें साम्राज्य १३० वर्षें सारखें पसरतच गेलें. या काळांतील शंभरावर ताम्रपट, शिलालेख वगैरे उपलब्ध झाले आहेत व त्यांच्या आधारानें डॉ. भांडारकर, फ्लीट वगैरे संशोधकांनीं आपापले ग्रंथ लिहिले आहेत. शिवाय हेमाद्रि म्हणून याच राजवंशाचा शकट हाकणारा एक पुरुष शेवटीं निर्माण झाला, त्यानें पांचसहा राजांचा इतिहास 'राजप्रशस्ति' नांवानें लिहून ठेवला आहे. तो अति विश्वासनीय आहे. पहिला सम्राट भिल्लम यानें चालुक्याधिपति सोमेश्वर याला जिंकून त्याचें राज्य आपल्या राज्यास जोडलें. 'भिल्लमानें श्रीवर्धनच्या अंतल राजास, मंगलवेष्टक (मंगळवेढें) येथील वज्री राजास, कल्याणच्या चालुक्य राजास व होयसळ यादवांच्या नृसिंह राजास जिंकून आपलें राज्य व यश वाढविलें, असें हेमाद्रीनें म्हटलें आहे. कृष्णानदीच्या उत्तरेस त्यानें आपलें राज्य सुस्थिर केलें खरें, पण तो तें भोगण्यास फार वर्षें राहिला नाहीं. भिल्लमाच्या वेळच्या शिलालेखांत व दानपत्रांत 'प्रतापचक्रवर्ती, समस्तभुवनाश्रय, महाराजाधिराज' इत्यादि बिरुदें त्याच्या नांवास जोडलेलीं आढळतात. शके ११०९ च्या सुमारास त्यानें आपली राजधानी देवगिरी ही केली. त्याच्या पूर्वीच्या यादव राजांची राजधानी श्रीनगर ही होती. श्रीनगर

म्हणजे चंद्रादित्यपूर उर्फ नाशिक जिल्ह्यांतील चांदूर असें डॉ. भांडारकर म्हणतात. भिल्लमाचा पुत्र जैत्रपाळ.

**शके १११३ ते ११३२.** राजा जैतुगी उर्फ जैत्रपाळ यानें प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य यांचा पुत्र लक्ष्मीधर यास आपल्या दरबारीं पंडितमुख्य केलें होतें. भास्कराचार्य जन्म शके १०३६, त्यांचा सिद्धांतशिरोमणि ग्रंथ शके १०७२, करणकुतूहल शके ११०५, याचा तिसरा ग्रंथ लीलावती. जैत्रपाळानें तिलंगाधिपति फार दुष्ट राजा होता त्याची रणयज्ञांत पूर्णाहुति दिली. याच्या कारकीर्दीच्या आरंभींच आद्य मराठी कवि मुकुंदराज झाले. मुकुंदराज म्हणतात

**शके अकरा्शें दाहोत्तरू । साधारण संवत्सरू ।**
**राजा शारंगधरू । राज्य करी ॥**
**ऐसा समयो सर्वोत्तमू । तेथें मुकुंद द्विजोत्तमू ।**
**विवेकसिंधु मनोरमु । निर्मिता जाला ॥**
**नृसिंहाचा बल्लाळ । तयाचा कुमरु जयंतपाळ ।**
**तेणें करविला हा रोळ । ग्रंथरचनेचा ॥**

शारंगधर राजा कोणत्या प्रांताचा व जयंतपाळ कोण याचा अद्याप कांहीं निर्णय झाला नाहीं. शके १११० ला कांहीं साधारण संवत्सर येत नाहीं. शके १११२ ला येतो.यानें आपल्या परमगुरूचा जन्म मनोहर अंबानगरीं झाला असें ह्मटलें आहे. अंबानगरी कोणती हा वाद आहे. मोगलाईंत जोगाईचें आंबें आहे तेथें मुकुंद राजाची समाध आहे व नागपूर प्रांतीं बैतुलजवळ खेडलें या गांवीं जुन्या पडक्या किल्यांत ही आहे. अंबानगरी वैनगंगेच्या तीरीं आहे असें मुकुंदराज म्हणतात. भंडाऱ्याजवळ वैनगंगा नदी असून तिच्या कांठचें अंभोर हीच अंबानगरी. येथें कवीचे गुरु हरिनाथ यांचीही समाधि आहे. यावरून मराठी भाषेचे आद्य कवि मुकुंदराज हे नागपूर प्रांतस्थ ठरतात. गोदातीरीं आपेगांवचे कुळकर्ण यावेळी ज्ञानेश्वरांचे पणजे त्र्यंबकपंत करीत होते.

**शके ११३२-११६९** सिंघण राजाची कारकीर्द. याच्या ३७ वर्षांच्या कारकीर्दींत देवगिरीचें साम्राज्य वैभवाच्या शिखरास चढलें. सिंघणदेव उर्फ सिंहलदेव हा महाप्रतापी होता. ' प्रौढप्रतापचक्रवर्ती ' समस्तभुवनाश्रय, पृथ्वीवल्लभ, इ० बिरुदें यांस पूर्णपणें शोभत होतीं. हेमाद्रीच्या वर्णनास ५०।६० प्राचीन लेखही पुष्टि देतात. छत्तीसगड, माळवा, धारानगरी, गुर्जर, करवीर, पांचाळ, केरल, चोळ ( कर्नाटक ), मगध ( विहार ), पांड्य ( रामेश्वर ) इ० देशांच्या राजांस त्यानें अनेकवार जिंकून करभार द्यावयास लावलें. निरनिराळ्या प्रांतांवरच्या त्याच्या प्रतिनिधींना महाप्रधान, मंडलेश्वर, दंडनायक म्हणत. त्याचा

उत्तरेकडचा सेनापति खोलेश्वर व दक्षिणेकडचा वीचण हेही महाप्रतापी होते. यानें यादवांचें ' सुवर्ण गरुडध्वज ' निशाण कावेरीवर नेऊन तेथें जयस्तंभ उभारला. याचा एक अधिकारी मायीदेव हा श० ११४८ मध्यें १२ हजार गांवांवर अंमल चालवीत होता. याच्या बिरुदांत ' यादवचक्रवर्ती. द्वारकापुरवराधीश्वर ' हीं नवीन बिरुदें होतीं. ह्या सिंघण राजानें महाराष्ट्रीयांच्या तलवारीचें पाणी साऱ्या हिंदुस्थानाला दाखविलें. त्याच जाधवांच्या घराण्यांत जन्मलेल्या जिजाबाईच्या पोटीं पुढें शिवराय जन्मले. असो. सिंघणच्या कारकीर्दीत विद्या व कला यांनाही प्रोत्साहन मिळालें. भास्कराचार्यांचा नातु व लक्ष्मीधराचा पुत्र चंगदेव याला सिंघणाचा आश्रय होता. चंगदेवानें भास्कराचार्यांच्या ग्रंथांचा अभ्यास वाढावा यासाठीं एक मठ उर्फ ग्रंथसंग्रहालय बांधलें. खानदेशांत चाळीसगांवच्या नैऋत्येस १० मैलांवर पाटण म्हणून गांव आहे तेथें तो मठ होता. अद्याप तेथें त्या मठाच्या खुणा आहेत. पाटण गांवांत भवानी देवीच्या देवळांत एका शिळेवर चंगदेवाचा लेख आहे. त्या लेखांत ही सर्व हकीकत आहे. यावरून भास्कराचार्य व त्यांचें विद्वान् घराणें खानदेशी म्हणजे महाराष्ट्रीय आहे हें सिद्ध होतें. भास्कराचार्यांनीं आपल्या सिद्धांतशिरोमणि ग्रंथांत आपल्या जनकाविषयीं म्हटलें आहे ( गोले प्रश्नाध्याये ):—

**आसीत् सह्यकुलाचलाश्रितपुरे त्रैविद्यविद्वज्जने**
**नानासज्जनधाम्नि विज्जडविडे शांडिल्यगोत्रो द्विजः ।**
**श्रौतस्मार्तविचारसारचतुरो निःशेषविद्यानिधिः**
**साधूनामवधिर्महेश्वरकृती दैवज्ञचूडामणिः ॥ ६२ ॥**

यावरून भास्कराचार्यांच्या वाडवडीलापासून सह्याद्रि पर्वताच्या सान्निध असलेल्या पुर ह्य. पाटण गांवींच ते राहत असत असें उघड दिसतें. विज्जडविड पाटणाचें नांव असावें किंवा त्याजवळ त्या नांवाचें एखादें खेडें असावें, पण तें बीड किंवा बेदर नव्हे कां कीं तेथें सह्याद्रि नाहीं. चंगदेवाच्या शिलालेखांतील श्लोकांत भास्करनंदन हा ( लक्ष्मीधर ) वेदार्थवित् व क्रतुक्रियाकांडविशारद आहे असें पाहून:—

**सर्वशास्त्रार्थदक्षोऽयमिति मत्वा पुरादतः ।**
**जैत्रपालेन यो नीतः कृतश्च विबुधाग्रणीः ॥ २२ ॥**

म्हणजे जैत्रपाल राजानें त्याला ह्या पुरांतून ( पाटण गांवांतून ) आपल्या दरबारीं नेऊन सभापति केलें. चंगदेव पुढें आपल्या मठाबद्दल म्हणतो:—

**तस्मात्सुतःसिंघणचक्रवर्तीदैवज्ञवर्योऽजनि चंगदेवः ।**
**श्रीभास्कराचार्यनिबद्धशास्त्र विस्तारहेतोः कुरुते मठं यः ॥२३॥**

चंगदेवानें आपले आजे भास्कराचार्य यांच्या शास्त्रग्रंथांचा अभ्यास व विस्तार व्हावा ह्यासाठीं हा मठ उर्फ ग्रंथसंग्रहालय स्थापन केलें व त्याला सिंघणराजाचा आश्रय मिळाला. हें घराणें मुख्यतः ज्योतिष्यांचें पण वेदवेदांगें व अन्य शास्त्रांतही तें निष्णात होतें. ह्या घराण्यांत पुढेंही अनेक विद्वान् व ग्रंथकर्ते झाले. पुर ह्म० पाटण हें देवगिरीपासून जवळच आहे व सह्याद्रीचे फांटे जे चांदवडचे प्रसिद्ध डोंगर त्याच्या लगत आहे.

सिंघणाचा 'श्रीकरणाधिप' सोढल, हा काश्मिरी ब्राम्हण असून त्याचा पुत्र शार्ङ्गधर ह्यानें 'संगीत रत्नाकर' नामक सुंदर ग्रंथ लिहिला आहे. सिंघणाचा पुत्र जैत्रपाल अल्पवयी वारल्यामुळें पुढें २४ वर्षे राज्य त्याच्या नातवांनीं केलें.

| | |
|---|---|
| शके ११६९–११८२ | कृष्णदेव |
| शके ११८२–११९३ | महादेव |
| शके ११९३–१२३१ | रामदेवराव उर्फ रामचंद्र |

म्हणजे ११६९ ते १२३१ ह्या ६० वर्षांत सिंघणाचे नातु कृष्ण व महादेव व कृष्णदेवाचा पुत्र रामदेवराव ह्या तिघांच्या राजवटी झाल्या. कृष्णदेव व महादेव हे बंधु सारख्याच वयाचे असून त्यांचें परस्परांवर रामलक्ष्मणासारखें प्रेम होतें असें हेमाद्रि म्हणतो व हेमाद्रीनें महादेव व रामदेव ह्या उभयतांच्या कारकीर्दींत 'श्रीकरणाधिप' ह्या नात्यानें राज्य शकट हांकला होता. कृष्णदेव हा शूर असून धर्मशील होता व महादेव शौर्यानें सरस होता. सिंघणाच्या प्रतापानें देवगिरीच्या साम्राज्याचा जो सर्वत्र वचक बसविला होता त्यामुळें त्याकडे वांकड्या नजरेनें कोणी सहसा पाहिलें नाहीं व सिंघणाच्या नातवानां राज्यसुख उत्तम प्रकारें भोगतां आलें. कृष्णदेवानें गुर्जराधिपतीस युद्धांत पराभूत केलें व कोकणांतील राजांना चांगली दहशत बसविली. महादेवानें तर कोकणचा शिलाहार वंशांतला राजा सोमेश्वर याचीं गलबतें पाण्यांत बुडविलीं व त्याबरोबर तो राजाही पाण्यांत बुडाला. तेव्हां यानें कोकणप्रांत आपल्या राज्यास जोडला. सिंहण तर सिंहच होता, पण त्याचे हे नातूही सिंहाचे छावे होते. महादेवाच्या कारकीर्दीचें वर्णन करितांना हेमाद्रि म्हणतोः—

**सा संपत्तदिदं यशो बलमिदं सोयं प्रतापो महान्**
**एकैकं पृथिवीभृतो भुवि महादेवस्य लोकोत्तरम् ।**
**यस्य श्रीकरणाधिपः स्वयमयं हेमाद्रिसूरिः पुरः**
**प्रौढप्रातिभवर्ण्यमानविलसद्वंशो भृशं शोभते ॥**

'संपत्ति, यश, बल, प्रताप हे एकेक गुण महादेवाच्या ठिकाणीं लोकोत्तर आहेत व ह्या राजाच्या दरबारांत श्रेष्ठ बुद्धिमत्ता व विद्वत्ता ह्या गुणांनीं मंडित

झालेल्या वंशांत मी हेमाद्रि 'श्रीकरणाधिप' ह्या अधिकारावर उत्तम प्रकारें शोभत आहे.' देवगिरीचें राज्य त्रैलोक्यांतील संपत्तीचें विश्रांति स्थान आहे; येथील मोठाले वाडे देवांची वस्ती असलेल्या शैलशिखरांशीं स्पर्धा बांधीत आहेत; येथील लोक, त्यांचीं भूषणें, वस्त्रें व भाषणें परम मधुर व चित्ताकर्षक आहेत, असें ह्यावेळच्या महाराष्ट्राचें वर्णन हेमाद्रिसारख्या कर्त्या व विद्वान् ब्राह्मणानें करून ठेविलें आहे. तो म्हणतोः—

**आस्ते मण्डितदण्डकापरिसरः श्रीसेउणाख्यः परं**
**देशः पेशलवेषभूषणवचोमाधुर्यधुर्याकृतिः ।**
**तस्मिन्देवगिरिःपुरी विजयते त्रैलोक्यसारश्रियां ।**
**विश्रांतिः सुरशालिशैलशिखरस्पर्धिष्णुसौधावलिः ॥**

येथें महाराष्ट्राला सेउणदेश असें म्हटलें आहे. यादवाच्या घराण्याचा पहिला पुरुष जो दृढप्रहारी त्याचा मुलगा सेउणचंद्र नांवाचा होता. त्याच्या पराक्रमामुळेंच त्याच्या ताब्यांत असलेल्या देवगिरीपासून नाशीकपर्यंतच्या प्रदेशास सेउणदेश असें म्हणत. ह्यांतच कांहीं भागास पुढें खानदेश म्हणूं लागले. महादेवाच्या कारकीर्दीचें वर्णन वरप्रमाणें हेमाद्रीनें केलें आहे. ह्या महादेवाचें एक व्रत होतें. 'अयं शिशुस्त्रीशरणागतानां हंता महादेवनृपो न जातु' ह्मणजे तो स्त्रिया, मुलें व शरणागत यावर शस्त्र चालवीत नसे. हें जाणून आंध्रांनीं आपल्या गादीवर एक स्त्री बसविली व मालवेश्वरानें एक अर्भक बसविलें ! ह्याच यादववंशांत पुढें जन्मलेल्या जिजाईच्या पुत्रानें ह्म० शिवरायानें आपल्या पूर्वजांचा कित्ता गिरविला. "परमुलखांत पोर, बायका न धरावी. गाई न धरावी. ब्राह्मणांस उपद्रव न द्यावा. कोणी बदअंमल ह्म० जुलूम न करावा." (सभासदांची बखर).

कृष्णदेव व महादेव यांच्या राजवटींत संस्कृत विद्या व कला यांना प्रोत्साहन मिळालें व यज्ञयागादि पुण्यकर्में यांना भर येऊन कालवशात् क्षीण झालेल्या धर्माला तारुण्य आलें. कृष्णदेवाचा गजसेनाधिप शूर व विद्वान् होता. त्यानें सुभाषितांवर 'सूक्तिमुक्तावलि' नामक सुंदर ग्रंथ केला असून त्याचा आश्रित अमलानंद यानें आचार्यांच्या वेदांतसूत्रभाष्यावर 'वेदांतकल्पतरु' नामक ग्रंथ केला आहे. पण ह्या काळचे मुख्य ग्रंथकार **हेमाद्रि** व **बोपदेव** हे होत. ही गुरुशुक्रांची जोडी महादेव व रामदेवराव यांच्या राजवटींत फार गाजली. बोपदेव हा पंडित व भक्त होता व हेमाद्रि हा राजकार्यधुरंधर असून विद्वान्, धर्मशास्त्री, ग्रंथकार व कलाभिज्ञ असा चौरस होता. महाराष्ट्रांत हेमाडपंत या नांवानें हा अद्यापही सर्वमान्य आहे. शेंकडों हेमाडपंती देवळें हीं याचीं स्मारकेंच आहेत. हा माध्यंदिन शाखेचा, वत्सगोत्री, पंचप्रवरी, यजुर्वेदी ब्राह्मण,

विद्वान्, कार्यकर्ता पुरुष होऊन गेला. याच्या बापाचें नांव कामदेव, आजाचें वासुदेव व पणज्याचें वामन होतें. याचा कुलस्वामी महालसा उर्फ मोहनीराज. ह्यानें धर्मशास्त्रावर अनेक ग्रंथ केले असून 'चतुर्वर्गचिंतामणि' हा याचा ग्रंथ सर्वमान्य आहे. ह्या ग्रंथाचे व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड व मोक्षखंड असे चार भाग आहेत. परिशेषखंड नामक पांचव्या खंडांत देवतापूजा, श्राद्धविधि, मुहूर्त निर्णय, प्रायश्चित्त इत्यादि विषय आहेत. आयुर्वेदरसायन, मुक्ताफल इत्यादि ग्रंथ यानें स्वतः लिहिले असून आपला आश्रित व मित्र बोपदेव याजकडूनही अनेक ग्रंथ लिहविले आहेत. हेमाद्रि व बोपदेव यांचा स्नेह अकृत्रिम होता. मुक्ताफलावरील टीकेंत हेमाद्रीनें म्हटलें आहे कीं, बोपदेवानें व्याकरणावर १० प्रबंध, वैद्यकावर ९, ज्योतिषावर १, साहित्यशास्त्रावर ३ व भागवततत्वावर ३ मिळून २६ प्रबंध लिहिले आहेत ! असें सांगून 'वाणि-शिरोमणेरिह गुणाः के के न लोकोत्तराः' याप्रमाणें बोपदेवाचें गौरव केलें आहे व बोपदेवानेंही 'मंत्रिहेमाद्रितुष्टये' 'हेमाद्रिर्बोपदेवेन मुक्ताफलमचीकरत्' इत्यादि प्रकारें हेमाद्रीचे उल्लेखही केले आहेत. हे दोघेही समशील पंडित लोकोत्तर होत. त्यांत हेमाद्रीच्या सर्वांगीण बुद्धीचें कौतुक करावें तेवढें थोडेंच वाटतें. हेमाद्रीच्या विद्वत्तेनेंच मनुष्य गुंग होतो, मग सुमारें ४० वर्षें तो जाधवांच्या राज्याचा 'श्रीकरणाधिप' किंवा राज्यसूत्रधार होता या गोष्टीचा व त्यानें केलेल्या सुधारणांचा विचार मनांत आणला म्हणजे हेमाद्रीसारखा हेमाद्रीच—'अनामिका सार्थवती बभूव' असेंच म्हणावेसें वाटतें. हेमाद्रि स्वतःला 'श्रीकरणाधिप' ही अधिक पदवी लावतोच. पण शके ११९४ च्या ताम्रपत्रावरूनही हें उघड होतें. ह्या पदवीसंबंधानें डॉ. भांडारकर म्हणतातः This office seems to be that of the chief secretary or one who wrote and issued all orders on behalf of his master and kept the record."

ह्या वेळच्या मऱ्हाठी राज्याचा हा नाना फडणवीसच होय. हेमाद्रीनें तसेंच नानानें मऱ्हाठी साम्राज्याचा गाडा तीन तपें स्वतःच्या कर्तबगारीवर हांकला, व उभयतांच्या पश्चात् सुमारें २०।२५ वर्षांनीं मऱ्हाठी साम्राज्यें धुळीस मिळालीं हा विचित्र दैवयोग होय. हेमाद्रि जसा राजकार्यधुरंधर होता तसाच धर्म-शास्त्रज्ञ, पंडित व गुणज्ञही होता. हेमाडपंतानें 'खाण्यांत बाजरी, राहण्यांत बिनचुन्याच्या दगडी इमारती व लिहिण्यांत मोडी लिपी' अशा तीन गोष्टी प्रचारांत आणल्याबद्दलही त्याची प्रसिद्धी आहे. मंदिरें वगैरे बांधण्याच्या कामांत त्यानें एक प्रकारची साधेपणाची शिस्त लावून दिली. असा हा अद्वितीय कर्तृत्वाचा व अलोट बुद्धिमत्तेचा पुरुष देवगिरीकर यादवांच्या राजवटींत सूर्यासारखा चम-

कला व त्याच्या कृतीची व कीर्तीची साक्ष अद्याप उभा महाराष्ट्र देत आहे हें त्या राजवटीचें थोर भाग्य होय.

कृष्णदेवाच्या राजवटींत देवगिरीकर यादवांना 'निर्वीमुर्वीतलं' कसें झालें होतें हें सांगून त्यांनीं अनेक यज्ञयाग व नाना पुण्यकर्में केलीं व त्यामुळें 'क्षीणः कालवशात् पुनस्तरुणतां धर्मोऽपि संप्रापितः' म्हणजे कालवशात् क्षीण झालेल्या धर्माला तारुण्य आलें असें म्हणतो आणि तें खरें आहे. धर्माला तारुण्य आणण्याच्या कामीं यादव राजांना हेमाद्रिबोपदेवानीं पुष्कळ साह्य केलें. यादव राजे हे धर्मशील आचरणाचे, विद्वानांना उत्तेजन देणारे व धर्माचे संरक्षक होते. कृष्णभक्तिही ते कृष्णकुलोत्पन्न असल्यामुळें त्यांच्या हाडीमासीं खिळली होती. भास्कराचार्य हे 'कंसरिपुप्रसादितपदः' म्ह. कृष्णभक्त होते असे पाटणच्या शिलालेखांत चंगदेवानें म्हटलें आहे. हेमाद्रि व बोपदेव हेही कृष्णोपासकच होते. हेमाद्रीचा कुलस्वामी नेवाशाचा मोहनीराज—कीं ज्याच्या चरणापाशीं ज्ञानेश्वरी ग्रंथ निर्माण झाला—हा होता. बोपदेवाची कृष्णभक्ति त्याच्या ग्रंथांवरूनच प्रगट आहे. बोपदेवानें श्रीमद्भागवतावर एकंदर चार ग्रंथ लिहिले. १ हरिलीला—यांत भागवताचें स्कंधशः सार दिलें आहे २ मुक्ताफल—यांत भागवताचें तात्पर्य सांगितलें आहे. ३ परमहंसप्रिया ही भागवतावर बोपदेवीय टीका आहे. ४ मुकुट—हा भागवतसाररूप ग्रंथ आहे. हे चारही ग्रंथ कृष्णभक्तिपर आहेत. हेमाद्रीचें ह्या कामीं पूर्ण साह्य होतें. श्रीकृष्णभक्ति व भागवतावर प्रेम या समान गुणामुळें उभयतांचें सख्य स्थिरता पावलें. हरिलीलेंत बोपदेव म्हणतोः—

**श्रीमद्भागवतस्कंधाऽध्यायार्थादि निरूप्यते ॥**
**विदुषा बोपदेवेन मंत्रिहेमाद्रितुष्टये ॥**

बोपदेवाच्या हरिलीला व मुक्ताफळ ह्या ग्रंथावर हेमाद्रीनें वृद्धपणीं हरिलीलाभाष्य व कैवल्यदीपिका नांवाच्या टीकाही लिहिल्या आहेत. तात्पर्य राजघराणें, त्याचे कारभारी व विबुधवर हे सर्व कृष्णभक्त होते. आतां त्यावेळचा सामान्य समाज सुद्धां कृष्णभक्तीनें कसा आकार्षिला गेला होता हें पाहूं.

कृष्णभक्तीचें महाराष्ट्रीय आदिपीठ म्हणजे पंढरपूर. पंढरीचा विठ्ठल (विष्णु कृष्ण) याची उपासना पुंडलीकापासून चालू होती. पुंडलीकाचा कालनिर्णय करण्यास कांहीं साधन नसलें तरी ज्ञानेश्वर नामदेवांपूर्वींच ही उपासना सार्वलौकिक झाली होती हें सिद्ध आहे. शके ११३१ चा एक शिलालेख आळंदीस एका स्वामीच्या समाधीवर कोरलेला सांपडला असून त्यावर विठ्ठलरखुमाईच्या मूर्ति आहेत, तसेंच ११५९ च्या पंढरीच्या एका शिळेवरच्या लेखांत पंढरिगे क्षेत्र, पुंडलीक मुनि व देवाला एका गांवचे लोक वर्षासन देत होते, त्याचा उल्लेख

आहे. पण सर्वांत महत्वाचा लेख पंढरीसच विठ्ठलमंदिरांत ' चौऱ्याशीचा शिला लेख ' म्हणून जो प्रसिद्ध आहे तो होय. तो शके ११९५ चा आहे. त्यांत ' श्रीकांतं घननिलं भक्तानुगं विठ्ठलं ' वंदन केलें असून पुढें ८ रकान्यांत 'विठ्ठल देवरायाच्या' पूजेअर्चेसाठीं मोठाल्या रकमा देणाऱ्यांचीं नांवें कोरलीं आहेत! " स्वस्ति श्री सकु ११९५ श्रीमुख संवत्सरे फागनिपूर ( फाल्गुनी पौर्णिमा ? ) श्रीविठ्ठलदेवरायासि तिसासि ती ( ? ) फुलें दांडे आचंद्रार्क चालावेया नाना भक्तमालिआं दत्त पैकाचा विवरु (तपशील) " गद्यान नामक १५ रुपये किंमतीचें सोन्याचें नाणें. कोणी किती गद्यान दिले त्यांचा हिसेब आहे. देणाऱ्यांचीं नांवें वाचतांना कोठून कोठून कोण कोण लोक विठ्ठलाच्या यात्रेला येत हें समजून येतें. कांहीं नांवें महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांचीं आहेत, कांहीं कानडी व तेलंगी आहेत. प्रत्येक रकान्यांत कोणाच्या मार्फत किती पैका जमला तें दिलें आहे, यावरून मंडळ ( कमिटी ) नेमून त्याच्या मार्फत शिस्तीनें काम झालेलें दिसतें. श्रीपतिदणाक ( नाक कां नाईक ), गंगाधर नायक, मांबोली येथील बाबा सेणवै (सेनेचा नायक ), विजापूर येथील गौरुबाहू, मांईबाई दामोदरभट, विठनायक विनायक व देऊबाई हें त्रय, कोंकणा केसवदेव, हौगल येथील मलोदेव, आवंढयाचा जातिदेव, बामरसचा नामअय्या जोसी, आंबे येथील कृष्णदेव, पैठणचा चांगदेव, आवडे येथील रासपंडित, सालीव येथील यादो सेणवै, पुराणिक हयवाह अय्या, जाईदेव सेठवल, रामण्णदेव, पदुबाई करणिक, बोडबंग येथील भणगे, वैराग येथील दाठीनायक, झिंबदेव दलवै (दळवी), भिंगिआर (भिंगार) येथील हत्तिदेव सेंडा सेट्ठे (शेंडे श्रेष्ठी ), मेहकर नागंण्णा, उभेमार्गी (उभाघर?) येथील तिंगवसेठ, लाड हरिदेव, श्रीधरदासी, कान्हो राईआप्पा, हीं एवढींच नांवें पुरेत ! ह्यावरून कर्नाटक, तेलंगण, पैठण, नगर, वऱ्हाड, इ० सर्व भागांतून भाविक विठ्ठलभक्त ' श्रीविठ्ठल देवरायाच्या ' दर्शनास शके ११९५ च्या पूर्वींपासून येत, असें स्पष्ट दिसतें. आनंदाची गोष्ट रामदेवराव जाधव व त्यांचे कारभारी हेमाडपंडित यांचींही नांवें या शिलेच्या मध्यमार्गी मोठ्या अक्षरांत आदरपूर्वक कोरलेलीं आहेत. तेव्हां ह्या विठ्ठलाच्या कार्यास राजापासून रंकापर्यंत सर्वांनीं आपापल्यापरी साह्य केलें आहे. " स्वस्ति श्रीसकु ११९८ ईश्वर संवछरे मार्गसीर सुदि १५ सुक्रे ( शुक्रवारीं ) श्रीविठ्ठलदेवरायासी पांडरीफडमुख्य ( पांढरीच्या सभेचे अध्यक्ष ) श्रीजादवनारायण प्रौढप्रतापचक्रवर्ती श्रीरामचंद्र देवराय ' यानीं, राजघराण्यांतील स्त्रियांनीं व सर्वाधिकारी यानींहीं देणग्या दिल्या आहेत. कोणा राजस्त्रीनें -'बलदेवबायकें' बांव बांधण्यास भूहसी ( भूयसी–मोठी दक्षिणा ) दिली होती. कोठारी ठाकवी ( ठकवी ) तेयासी श्रीविठ्ठलाची आण घातली आहे. ह्याच लेखांत आषाढ सुध ( शुद्ध ) व बहुल ( वद्य ), एकादशीलाच देणग्या दिल्याचें स्पष्ट दिसतें. यावरून आषाढी

एकादशी ही पंढरीच्या यात्रेची मुख्य तीथ पूर्वीपासून ठरली होती हें स्पष्ट आहे. शके १२२९ च्या दुसऱ्या एका शिलालेखांत श्रीविठ्ठलदेवरायाला " पंढरीपुरवराधीश्वर पुंडरिकवरद पांडवप्रजापालक भगवतजनसेवित सदाप्रसन्न समुज्जीव लोकैकनाथ वैकुंठाधिपति देवराय इ० प्रेमळ विशेषणांनीं संबोधिलें असून पंढरीपुराला दक्षिणद्वारावति ( दक्षिणची द्वारका ) असें म्हटलें आहे. ह्याप्रमाणें महाराष्ट्रांत विठ्ठलभक्ति सार्वत्रिक झाली होती, तिला ज्ञानेश्वरनामदेवादि सत्पुरुषांनीं उत्कृष्ट वळण कसें लावलें हें आपणांस पहावयाचें आहे पण त्याच वेळीं नवीन उपटलेल्या एका पंथाचा समाचार घेऊन आपल्या मार्गावर येऊं.

ह्याच सुमारास महानुभावपंथ किंवा महात्मापंथ निघाला. त्याचा संस्थापक चक्रधर ( शके १०७५ – ११९४ ) हा गुजराथी सामवेदी ब्राह्मण होय. हा अत्यंत बुद्धिमान् पण चंचळवृत्तीचा होता. यानें तीन लग्नें केलीं व तीनही बायकांचा त्याग केला. शके ११०७ मध्यें यानें गोविंदप्रभुनामक महाराष्ट्रीय ब्राह्मणाचा उपदेश घेतला व तेव्हांपासून यानें मऱ्हाठी भाषेचा अंगिकार केला. शके ११८५ च्या कार्तिकांत याने संन्यासाश्रम घेतला व उपदेश करून आपला स्वतंत्र पंथ उभा केला. आपल्या मठाची व्यवस्था यानें चोख आणि शिस्तीची ठेवली. यानें उपदेश उत्तर हिंदुस्थानांत फार केला यामुळें मानभव पंथाचे लोक व ग्रंथ उत्तरेकडे अधिक आहेत, महाराष्ट्रदेश व मऱ्हाठी भाषा त्याला प्रिय होत्या. ' कानडदेसा तैलंग देसा न वचावें । ते विषयबहुल देस । महाराष्ट्री असावें । मातापुरा कोल्हापुरा न वचावें । तीये साभिमानीयें स्थानें साधकासि विघ्न करीती ।' असा त्याचा शिष्यांस उपदेश असे. ११८५–११९४ पर्यंत उपदेश करीत हा हिमालयांत निघून गेला. त्याचा पुढें शोध लागला नाहीं. देवगिरीच्या यादवराजाविषयीं त्याच्या मनांत प्रथमपासून अढी होती. ' काळें करूनि या राष्ट्रा समूळैचि विनश्यंति होईल गा ' असा त्यानें यादवांच्या राज्याला शाप दिला अगर त्याचे भक्त म्हणतात त्याप्रमाणें भविष्य कथन केलें ! त्याची शासनपद्धति कडक होती. तथापि शिष्यांविषयीं अंतरांत तो सकरुण असे याचा संप्रदाय भिक्षेचा असे. ' मौन्यें भिक्षा कीजे । धर्मभिक्षा घेआवी । निरोधें भिक्षा नेघावी । क्षण एकु उभेआ असिजे । गोदोहनमात्रें उभिया असिजे । भिक्षा करितां पायाची वासु पाहावी । हांताची वासु न पाहावी । भिक्षा करितां कव्हणीकडे न पाहावें । संपन्नाचे आ घरा भिक्षे न वचावें । हिंसका निंदकाचेआ घरा भिक्षे न वचावें । प्राणासी आहारु देआवा । इंद्रियां नेदावा । इंद्रियार्थरसु न सेवावा । झोळी दृष्टिपूजा करोनि भिक्षान्न सेविजे । हे नियम फार चांगले आहेत. चक्रधराचें चरित्र ( ' लीला ' ) गोड आहे, त्याचा उपदेश गोड आहे, त्याच्या पंथांतही फारसें वावगें नाहीं. पण हा पंथ महाराष्ट्रांत

त्यावेळीं किंवा नंतर केव्हांही लोकप्रिय झाला नाहीं हें खास. या पंथांत चार युगाचे चार अवतार मानतात. कृतयुगांत हंस, त्रेतायुगांत दत्त, द्वापारांत श्रीकृष्ण, व कलियुगांत चक्रधर. श्रीकृष्णाला परमेश्वराचा हे पूर्णावतार मानतात, व यांच्या वाङ्मयांत कृष्णलीलापर शेंकडो सुंदर काव्यें आहेत. यांचा मुख्य ग्रंथ 'सिद्धांत सूत्रपाठ' हा होय. यास ते 'आदिग्रंथ' म्हणतात. खुद्द चक्रधराचा एकही ग्रंथ नाहीं. त्याच्या तोंडचीं वचनें त्याचा शिष्य महींद्रभट यानें लिहून ठेवलीं. व त्यांतील निवडक सूत्ररूप वाक्यें केशवराज सूरीनें एकवटलीं व हा ग्रंथ निर्माण झाला. यांत आचारविचारांची एकंदर १६०९ सूत्रें आहेत. "स्वदेशु संबंधु त्याज्य। संबधीयांचा संबंधु तो विशेषता त्याज्य ॥" याप्रमाणें स्वदेश, स्वग्राम, व संबंधीं यांचा त्याग करून काळीं वस्त्रें पांघरून गांवोगांव भटकण्यास सांगणारा, चातुवर्ण्य किंवा जातिभेद मोडून टाकणारा, मूर्तिपूजेचा निषेध करणारा, विटाळ चांडाळ न पाळणारा, स्वधर्माभिमानी स्वराज्याच्या नष्टांश होवो म्हणून शाप देणारा हा चक्रधराचा पंथ चातुर्वण्यघटित, सुसंबद्ध व राष्ट्रीय परंपरा प्राणापलीकडे सांभाळणाऱ्या हिंदुसमाजास मान्य झाला नाहीं याचें नवल नाहीं. पुढें एकनाथतुकारामांसारख्या महात्म्यांनीं सुद्धां बंडपाखांडांतच या पंथाची गणना केली. तथापि या पंथानें मराठी भाषेंत देवगिरीकर जाधवांच्या राजवटीपासून जें सुंदर वाङ्मय निर्माण केलें आहे, त्याबद्दल भाषाभिमानी लोक मानभावांचें कौतुकच करितील. खुद्द चक्रधारांच्या तोंडचीं "ईश्वरु निर्वेत्र निराकार असे, परी कृपावसें सावेय साकार होयए: अवतरे: आपलें सन्निधान ते दास्ये मोचक" "स्त्री भणजे मत्तद्रव्यांचा राओगा: आणिकें द्रव्यें सेविलेआं माजवीती: स्त्री दर्शनमात्रेंची माजवी: चित्रींची ही स्त्री न पाहावी: जेणें संबंधें विकारू उपजे: तेयांचा असंबंधु कीजे:" इत्यादि वचनें फार गोड आहेत. भास्कराचा शिशुपालवध हा शृंगारपर पण रसाळ असा १०८७ ओंव्यांचा ग्रंथ शके ११९५ मधला आहे. यानंतर यानें भागवताच्या दशमावर व एकादशावर दोन ग्रंथ शके १२०० च्या सुमारास रचिले. यानें ईशस्तुतीपर कांहीं चौपद्या, अष्टकें व श्लोकही लिहिले आहेत. हें मानभावी वाङ्मय ज्ञानेश्वरांच्या पूर्वींचें असून त्यानें लोकांचें चित्त वेधलें नाहीं.

देवगिरीचे यादवराजे, त्यांचा विख्यात मुत्सद्दी व पंडित हेमाडपंत, भागवताची लोकप्रियता वाढविणारा भक्त बोपदेव व त्या वेळचे नानास्थळींचें भाविक लोक या सर्वांच्या उत्कट भावामुळें धर्माला बळ चढलें खरें, पण धर्मोद्धारांचें कार्य सामान्य जनता किंवा राजमंडळ यांजकडून होत नसतें. त्याला ईश्वरी विभूतीच लागत असते. 'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे.' धर्मकार्यासाठीं भगवंताला व त्याच्या भक्तालांच अवतरावें लागतें. विभूतीशिवाय धर्मजागृतीचें महत्कार्य कोणाकडून होत नसतें. ज्ञानदेव—नामदेवांचें अवतार

त्याचसाठीं झाले. ८ व्या शतकांतले श्रीशंकराचार्य, दहाव्यांतले श्रीरामानुजाचार्य व त्यांचे समकालीन श्रीमध्वाचार्य ह्या अशाच महाविभूति होत्या. अद्वैत-द्वैत, ज्ञान-भक्ति, निर्गुण-सगुण, किंवा अमूर्त-मूर्त, स्मार्त ( शैव )-वैष्णव असे भिन्न मतांचे वाद उगाच माजून राहिले होते. हे सर्व वाद मिटवण्यासाठीं ज्ञानेश्वरांचा अवतार झाला.

---

# वेंकटरमण अय्यर.

( मागील अंकावरून समाप्त. )

१०. आज ज्यांच्या घरीं उत्सव करण्यांत आला, त्या महान् थोर पुरुषाची थोडीसी ओळख महाराष्ट्र वाचकांस करून दिल्याशिवाय हा ' कल्याणोत्सव ' लेख पुरा करणें योग्य वाटत नाहीं. ह्या पुण्यपुरुषाचें नांव **वेंकटरमण अय्यर.** हे जातीनें तामिळ ब्राह्मण असून बी. ए. बी. एल् पास झालेले, मद्रास हायकोर्टचे एक सुप्रसिद्ध वकील होते. यांना मद्रास इलाख्यांतील दुसऱ्या जिल्ह्यांच्या गांवींही वकिलीकरितां बोलावून नेण्यांत येत असे. एके दिवशीं सेलम डिस्ट्रिक्ट कोर्टमध्यें वकील म्हणून उभे राहिले असतां, पक्षकाराचें फार नुकसान होईल म्हणून खोटें बोलण्याचा प्रसंग आला. त्यावेळीं हे गांगरलें. डिस्ट्रिक्ट जज्जांनीं हें ताडलें. उपाहाराच्या निमित्तानें कोर्टाचें काम थोडा वेळ बंद ठेवून ते आंत निघून गेले व यांना प्रेमानें बोलावून घेऊन पुढील काम दुसऱ्या वकिलाकडे सोंपविण्याबद्दल त्यांनीं सुचविलें व त्याप्रमाणें करण्यांत आलें. त्या क्षणास वकिलीच्या धंद्याचा त्यांना कंटाळा येऊन त्यांनीं तो सोडून दिला व मद्रासमध्यें अकौंटट जनरल ऑफिसांत १४० रु. दरमहाची नोकरी पत्करली. दरमहाची हजारों रुपयांची प्रॅक्टिस सोडून देऊन एवढयाश्या पगाराच्या हलक्या नोकरीवर रुजू होणें हें केवढें मोठें धैर्य आहे बरें ? त्याच खात्यामध्यें मग हे वाढतां वाढतां करन्सी ऑफिसर होऊन दरमहा १५०० रु. पगार मिळवूं लागले. हे पराकाष्ठेचे सत्यनिष्ठ व परम कृष्णभक्त होते.ह्यांना एके वेळीं स्वप्नांत मिराबाईचें दर्शन होऊन तिजकडून अनुग्रह मिळाला, त्यावेळीं हे बी. ए. च्या क्लासांत शिकत होते म्हणतात ! वरील खात्यांत नोकरी धरल्यानंतर यांची बदली दिल्ली, कलकत्ता, सिमला वगैरे ठिकाणीं झाली. तेव्हां ते हिंदुस्थान सरकारचे फायनॅन्स डिपार्टमेंटचे असिस्टंट सेक्रेटरी होते. तेव्हां त्या प्रांतांतील श्रीकृष्ण-स्थानें व तेथील उत्सव पाहून यांची कृष्णभक्ति वाढत गेली. यांना श्रीकृष्णाचीं व मिराबाईचीं ओझरतीं दर्शनें जागृतींतही होऊं लागलीं. श्रीकृष्णचैतन्य-गौरांग प्रभूचेंही दर्शन यांना झालें होतें म्हणतात. यानंतर ह्यांची बदली

मद्रासला झाली, व येथें आल्यावर त्यांनीं आपल्या मित्रमंडळीसह नित्यनैमित्तिक भजनाचे उत्सव सुरू केले. यांची गुप्त उपासना व तीपासून यांना येत चाललेले विलक्षण अनुभव यांच्या कांहीं खासगी मित्रांस ठाऊक झाले. हे रहात असत त्या घरीं रात्रीच्या वेळीं, सर्वत्र सामसूम झालें म्हणजे, जमिनीमधून 'कृष्ण कृष्ण' असा ध्वनि ऐकूं येत होता. त्यांनीं पूजलेल्या देवाच्या देव्हाऱ्यांत तर त्याच्या खांबाला कान लावला असतां हा ध्वनि दिवसाही ऐकूं येत होता. हा अनुभव त्यांच्या कांहीं मित्रांनीं घेतलेला आहे. ह्यांना तामिल, तेलगू, इंग्रजी, त्याचप्रमाणें मराठी व हिंदी भाषाही समजत होत्या. मराठींतील भक्तविजय वगैरे ग्रंथ वाचून त्यांनीं तामिलमध्यें त्यांचें निरूपण करण्याचा परिपाठ ठेवला होता. हे नैमित्तिक भजनोत्सवामध्यें 'कृष्णलीलानुकरण' करीत असत. त्यावेळीं राधेचा वेष घेऊन अभिनय करीत असतां त्यांची जी अवस्था होत असे त्याचें वर्णन करवत नाहीं. हे रूपानेंही सुंदर असल्यामुळें त्यांना तो वेष फारच शोभत होता म्हणतात. हृदयांत हरिगुरुकृपेनें एकदां 'निजप्रेम' प्रगट झालें म्हणजे बाह्य लौकिकलज्जा वगैरे जळून जाते.

प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठल रखुमाई ॥
परेहून परतें घर । तेथें राहूं निरंतर ॥
नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ॥"

असें श्रीनामदेवरायांनीं म्हटल्याप्रमाणें त्या निजभक्ताची स्थिति होते व त्याच्या ठायीं—

"वाग्गद्गदा द्रवते यस्य चित्तं, रुदत्यभीक्ष्णं हसति क्वचिद्वा । विलज्ज उद्गायति नृत्यतेच, मद्भक्तियुक्तो **भुवनं पुनाति** ॥"

यांत सांगितलेलीं सर्व लक्षणें प्रगट होऊन तो भगवद्भक्तीनें जगताला पावन करूं शकतो. लोकांचें चित्त त्याच्याकडे सहज आकर्षिलें जातें. ज्याला त्याला तो आपला प्राण–सखा–सुहृद् वाटूं लागतो. असो. यांच्या पावन दिनचर्येनें व सहवासानें मोठमोठे सुशिक्षित लोकही वेधले जाऊन त्यांचे शिष्य बनले. पण हे कोणास आपले शिष्य म्हणत नसत. परम मित्र असें समजून त्यांच्याशीं वागत. गुरुत्वाचा बडेजाव त्यांनीं न ठेवल्यामुळें त्यांच्या ह्या मित्रांना म्हणजे शिष्यांना, वर म्हटल्याप्रमाणें हे आपले गुरु म्हणजे खरे सुहृद, खरे मित्र, खरे मायबाप असें वाटून सर्वजण सख्यभक्तीनेंच यांच्याशीं वागत. त्यावेळीं चालू असलेल्या इंग्रजी 'ब्रह्मवादिन्' मासिकांत हे लेख देत असत; पण लेखाखालीं आपलें प्रत्यक्ष नांव न घालतां कांहीं तरी चमत्कारिक नांव ते लिहीत. हें त्यांच्या निगर्वीपणाचे द्योतक होय. या ब्रह्मवादिन्‌चे संपादक स्वामी विवेका-

नंदाचे एक शिष्य होते. त्यांचें यांजवर इतकें प्रेम असे कीं, दर दोन दिवसांनीं यांचेकडे येऊन घटकाभर बोलल्याचालल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. यांचे हे लेख इतक्या प्रेमाचे व गंभीर विचाराचे असत कीं, हा लेखक कोण आहे हें समजून घेण्याकरितां वाचकांकडून संपादकास अनेक पत्रें येत. त्यावेळीं या मासिकास अमेरिकेंत पांच हजार वर्गणीदार होते म्हणे! संपादक स्वामींना पुढील महिन्याकरितां अमुक अमुक विषयावर लेख पाहिजे असें म्हणतांच स्वामींना तेथेंच बसवून आपण थोडे आंतले बाजूस जाऊन बसावयाचें व ५।१० मिनिटांत कागदचे कागद स्वामीस छापण्याकरितां आणून द्यावयाचे अशी यांची लेखणी सफाईची व त्वरेची होती.

मीराबाईचें दर्शन त्यांस यानंतर वारंवार होऊं लागलें. स्वप्नांतच नव्हे, जागृतींतही होऊं लागलें. यावरून विचार करितां असें वाटतें कीं, मीराबाईच्या वेळीं संगतींत असलेला हा कोणी एक उच्च जीव होता यांत संशय नाहीं. सत्पथावर असणाऱ्या पवित्र जीवांना साह्य करण्याकरितां गुप्तरूपानें अदृश्य महात्मे जगांत संचार करीत असतात. देवाच्या दर्शनाशिवाय, श्रीगोरखनाथ, श्रीज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ वगैरे महापुरुषांचीं दर्शनें स्वप्नांत व जागृतींत होऊन कृतार्थ झालेले लोक पहाण्यांत व ऐकण्यांत येतात. बहिणाबाई, सोहिरोबा अंबिये, रामकृष्ण परमहंस, हैबतरावबाबा व गुलाबरावमहाराज इत्यादि उदाहरणें महाराष्ट्रांतील लोकांस माहीतच आहेत. मीराबाई वेंकटरमण अय्यर याशीं बोलत असतां यांना ' अरण ' म्हणून संबोधी असें म्हणतात. ( अरण याचा अर्थ शरण असे हे लोक सांगतात. ) यामुळें यांच्या शिष्यमंडळीच्या घरांत देवापुढें हल्लीं रांगोळी घालतांना, 'जय श्रीराधाकृष्ण——मीरा अरण '—— अशीं अक्षरें देवनागरी लिपींत लिहून त्याच्या दोन्ही बाजूस शंख व चक्र काढीत असतात. यांच्या शिष्यवर्गांत बी. ए. बी. एल्. सारखे मोठमोठे विद्वान्-लोकही आहेत. हे ४।५ वर्षांखालीं आपल्या वयाच्या ४२ व्या वर्षीं म्हणजे अगदीं अकालीं इहलोक सोडून गेले. यांना ४ मुलगे व ३ मुली आहेत. मुलींचीं लग्नें झालीं असून मुलगे लहान विद्यार्थीदशेंत आहेत. ह्यांच्या पत्नीला ह्यांची शिष्यमंडळी मातोश्री म्हणत असतात.

हे आपल्या वयाच्या २१ व्या वर्षी बी. एल्. ची परीक्षा पास झाले. यांची दुसरी भाषा संस्कृत होती. ती मॅट्रिक क्लासमध्यें असतानांच एम्. ए. च्या विद्यार्थ्यास पुरे इतकी चांगली होती. त्यांनीं संस्कृत भाषेंतील अनेक पुस्तकें वांचून तीं आत्मसात् करून सोडलीं होतीं. इतकी कीं, श्रुतिस्मृति ग्रंथांपैकीं वृद्ध पंडितांस अर्थ लागेनासा झाला तर ते यांच्याकडे येऊन त्याचा खुलासा करून घेत. इतकी त्यांची विद्वत्ता होती, तथापि ते बाहेर कोणास दाखवीत नसत. अनेक साधुसंत, महात्मे लोक यांच्या घरीं येऊन रहात. यांना आपलें

पांडित्य अथवा ज्ञान ते प्रेमानें सांगत, त्यावेळीं हे अशा रीतीनें ऐकत बसत कीं, तो विषय जणूं नवीनच त्यांच्या मुखानें आज ते ऐकत आहेत. यांच्या दोन्हीं वेळच्या उपाहाराच्या वेळीं १०।१५ पानें नेहमीं पाहुण्यांचीं असावयाचींच. जेवणाचीं पानेंही तसींच. हे एकटे म्हणून कधीं जेवणास बसले नाहींत. मुंबईचे प्रसिद्ध बाळाबुवा हे एकदां यांच्या घरीं आले. त्यांस त्यांनीं १५ दिवस सोडलें नाहीं. जेवतां, खातां, बसतां, उठतां त्यांना अगदीं जवळ घेऊन बसावयाचें. बाळाबुवांचें प्रेमळ भजन ऐकून हे इतके तल्लीन होऊन जात, कीं सांगतां सोय नाहीं. बाळाबुवांच्या भजनाची नक्कल यांची कांहीं शिष्यमंडळी करीत असते. बाळाबुवाही इकडील (मद्रासी) आंबट तिखट जेवणाची व रीतीभातीची नक्कल करीत असतात. वेंकटरमण अय्यर जातीनें विद्वान व बहुश्रुत होते, परंतु विद्वत्तेपेक्षां त्यांना भोळ्याभावाचें भजनच फार आवडे. श्रीकृष्णप्रेमामध्यें रंगून जाऊन केव्हां केव्हां यांना 'भावमूर्च्छा' ही येई.

"सगुण निर्गुण एकचि आवडी। चित्तें दिली बुडी चिदानंदीं॥
वृत्तीसहित मन रिघे प्रेमडोहीं। नाठवती देहीं देहभाव॥ (तु.)

अशी त्यांची स्थिति होई. धन्य असे हे हरिचे दास, धन्य त्यांचें कुळ, व धन्य ती भूमि, जेथें हे जन्म घेतात.

श्री मीराबाईंच्या आज्ञा व दर्शनें यांना वरचेवर होत व त्याप्रमाणें त्यांच्या वर्तनक्रमांत फेरफार होत असत. अकारण एकदम कांहीं फरक दिसला म्हणजे लोकांना थोडें चमत्कारिक वाटे, पण त्या गोष्टीस परिहार नव्हता. त्या गुरुमातेच्या आज्ञा पालन करण्यांत कोणत्याही कारणामुळें कसूर झाली तर त्याचा प्रत्यय येई; व म्हणून ते आज्ञापालनांत अत्यंत तत्पर असत. ह्या तत्परतेनें ते आपण तरून दुसऱ्यासही तारण्यास समर्थ झाले. तात्पर्य, शास्त्राच्या व संतांच्या वचनावर विश्वास ठेवून जे पुण्यवान लोक ह्या भक्तिमार्गांत 'मनोभावानें' शिरतात, त्यांस मदत करण्याकरितां परमेश्वर व त्याच्या आज्ञेनें म्हणा, वरील सारखे गुप्त महात्मे तयार असतात. हें जाणून स्वार्थेच्छु पुरुषांनीं न डगमगतां धैर्यानें व निजनिष्ठेनें भागवतधर्माचा अवलंब करावा. परमात्मा व संत आपणांस योग्य मार्ग दाखवून इष्ट ध्येयांकडे हातांत धरून नेण्यास तयार आहेत, ह्याविषयीं विश्वास बाळगावा, अशी विनंति करून हा संत चरित्राचा अल्पलेख पुरा करितों.

# मलीनतेचें गायन.

लेखक—नाथ निफाडकर.

१ एके दिवशीं संध्याकाळीं मी एका टेकडीवर बसून मावळत्या सूर्याची शोभा पाहत होतों. तेव्हां वाऱ्याची एक लहानशी झुळूक येऊन, तिच्याबरोबर मातीचा एक बारका कण माझ्या डोळ्यांत गेला. अर्थातच तो डोळा चोळून मी कण बाहेर काढला व त्याला बोटावरून एका फुंकरानेंच उडवून देऊं लागलों, पण त्या लबाडानें हंसून माझ्याशीं बोलण्यास सुरुवात केली. तो म्हणाला,

२ " काय नाथ ! फारसे रागावलां ! अहो, तुम्ही मोठ्या रागानें मला उडवून दिलें तर त्यांत माझा उलटा फायदाच आहे. कारण मला जगत्संचार करावयाचा आहे. मी मूळचा रॉकी पर्वतांतल्या एका अभेद्य कड्यांत ६०, ३३, ५७९ वर्षे ३६३ दिवस ७ तास ३ मिनिटें व १३ सेकंदें अडकून पडलों होतों. अडकून पडलेल्या क्षणापासून माझी निसटून जाण्याची चडफड चालली होती. कारण मला आठवतें तेव्हांपासून मी वाऱ्यावर बसून त्रिभुवन हिंडणाराच होतों. मी प्रथम फार मोठा होतों, किती तें मात्र मला आठवत नाहीं. कारण हल्लींचें माझें रूपच साडे साठ लक्ष वर्षांचें आहे. पण मला एवढें मात्र नक्की स्मरतें कीं वाऱ्याच्या झोतांमुळें मी क्षीण होत असे. वास्तविक वारा हा माझा कट्टा दुस्मान्; पण मला तो भारी आवडे. मला वाटे कीं मी त्याच्यावर स्वार आहे. पण खरोखर त्यानेंच मला खावें. मी भीत असे पाण्याला. कारण पाणी मला विरघळून टाकून माझा अभिमानी कठोरपणा नष्ट करील, व मी कायमचा पातळ लवाळ्या प्रेमाचा होईन कीं काय ही माझ्या हृदयांत कायमची धडकी असे. पण मी जेव्हां रॉकीच्या खडकांत अडकून पडलों तेंव्हां मात्र माझ्या खालीं धों धों करणाऱ्या महासागराला मित्र म्हणून आळवूं लागलों. एक गगन-भेदी लाट या कडयावर अशी फेकून दे कीं, तो कडा फुटून जावा, व मी मोकळें व्हावें. पण ज्याची नेहमीं नालस्ती करावी तो संकटकाळीं धावून यावा ही अपेक्षाच खोटी ! पण तुफान दर्याही प्रेमळ खरा. त्यानें आपल्याकडून मला सोडवण्याची खटपट केली. पण माझे जातभाईच मला सोडीनात. त्यांचें माझ्या वर एवढें गाढ प्रेम कीं पाण्याच्या लाटा जितक्या मोठ्या तितकें त्यांचें प्रेमा-लिंगनही जास्तच वट्ट व्हावें. मी त्यांना सतत साडे साठ लक्ष वर्षें दोष देत राहिलों. पण मला तोपर्यंत अशी अक्कल नव्हती कीं त्यांच्यासारखा मीही

त्यांना धरून ठेवित होतो. पण एक दिवस एक भला मोठा नारळ वाहात येऊन तो माझ्याजवळ कपारींत घुसला. दोन चार दिवसांत तो सडला व त्याचें कवच फुटून त्यांचे कांहीं तुकडे पाण्यांत पडले; व कांहीं हवेंत उडून गेले. त्यावेळीं मी धडा घेतला कीं आपण जर दुसऱ्याचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें नाहीं तर आपणही स्वतंत्र होऊं. मग मी माझी पकड सैल केली. तों काय ? एका निमिषांत कड्यांत पाणी व वारा असे दोघे शिरले. एका थेंबामागें असंख्य थेंब व एका झुळुकीमागें असंख्य झंझावात आले; व अवघ्या आठ दिवसांत तो कडा तुटला; व मी कैदेंतून सुटलों. प्रथम मी पाण्यांत पडलों; त्यांतून किनाऱ्यावर फेकला गेलों; व तेथून मी जों वाऱ्यावर बसून जगत्संचाराला निघालों तों सहा महिन्यांत तुझ्या डोळ्यांतून निघून आतां बोटावर बसलों आहें.

" मी इतका हिंडलों व इतक्या ठिकाणीं वस्ती केली; परंतु मला माणसांच्या इतका कोणाचाच सहवास आवडत नाहीं. कारण तुम्ही व मी या मट्टीच्याच जगाचे आहोंत. तुम्ही मट्टी म्हणजे मलीनता समजतां. पण तुमची स्वच्छतेची कल्पनाच चुकीची आहे. तुम्हांला वाटतें कीं चिखलांत लोळणारें डुक्कर वाईट; पण मऊ व स्वच्छ बिछान्यावर लोळणारे तुम्ही डुकरांहून घाणेरडे असतां. तुमचें स्वच्छतेकडे लक्ष लागलें रे लागलें कीं तुम्ही तिचे दास बनतां. मी असंख्य वर्षें पाण्यानें व वाऱ्यानें धुवून निघत होतों. पण तोंपर्यंत मी घाणेरडा होतों. आज तुझ्या डोळ्यांत गेल्याबरोबर मी खरा स्वच्छ झालों; पण तूं मला बाहेर काढलेंस म्हणून तूं घाणेरडा झालास.

" मला तूं डोळ्यांतच राहूं दिलें असतेंस तर काय झालें असतें ? तुझ्या डोळ्यांतून शरीरांतली घाण निघून गेली असती; व मीही मग बाहेर पडलों असतों. समजा तुझे डोळे फुटले असते तर तुला अंतर्दृष्टि लाभली असती. तूं पराधीन झाला असतास; पण त्यामुळेंच तुला शरीराचा तुरुंग फोडून बाहेर जगत्संचाराला मजबरोबर हिंडतां आलें असतें. पण तूं मला काढून टाकलेंस व फिरून शारीरिक पिंजऱ्यांत अडकलास ?

" हंसतोस होय ! मला माझें हें स्थूलरूप तसें तुलाही तें तुझें स्थूलरूप हवें आहे, नाहीं ? पण वेडया हें माझें रूप किती हजारों मैल उडतें बरें ? आणि तुझें विमानाच्या सहाय्यानें अवघें दोनचार मैल उंच व कांहीं चारपांचशें मैल लांब; आणि अपघातांचें तुम्हांला भय किती ? मला कोण अडवूं शकणार ? तुमच्या शरीरांत गेलों तरी तुम्ही मला आपण होऊन बाहेर काढतां. पूर्वी मला समुद्राची भीति वाटे; आतां तीही वाटत नाहीं. कारण मातीचें पाणी कधींच होत नाहीं. माती ती माती व पाणी तें पाणी !

" तुमच्यांपैकीं छांदिष्ट लोक मला भारी आवडतात. कारण त्यांचें स्वच्छते-कडे मुळींच लक्ष नसतें. ज्याचें डोकें रिकामें तो स्वच्छतेकडे लक्ष देतो. त्याला हें समजत नाहीं कीं जें स्वच्छ तेंच भारी मलीन असतें. गोऱ्या स्त्रिया हटकून मलीन; पांढरा रंग म्हणजे साऱ्या रंगांची भेसळ. स्वच्छता ही कल्पना असते. वस्तुस्थिति तेवढी मलिनतेची असते. रंग, रूप, गंध व ध्वनि तसाच नाद ही कणाकणांचे असतात. त्यांतल्यात्यांत या पृथ्वीचा आत्मा मातीचा असतो. तेवढी मलिन ज्याला खरी स्वच्छता हवी असेल त्यांनीं वस्तुस्थितीकडे दुर्लक्षच केलें पाहिजे. वस्तु तेवढी मलीन व स्थिति तेवढी घाणेरडी. अरे मी इतका लहान आहे म्हणूनच मी इतका स्वतंत्र आहे; व मला इतकी थोडी जागा लागते म्हणूनच मी इतका शुद्ध आहे. मी रॉकीमध्यें होतों तेव्हां किती भयंकर मोठा होतों ! माझी जागा किती तरी विशाल होती ! पण त्यावेळीं मी रेसभरसुद्धां हलण्यास समर्थ नव्हतों; आणि मनानें तर इतका नादान झालों होतों कीं मी प्रत्यक्ष सजातीयांना बांधून टाकीत होतों ही मला कल्पनासुद्धां नव्हती. बाहेरून दर सेकंदांत पाण्यानें व वाऱ्यानें स्वच्छ होणारा मी आंतून इतका मलीन होतों कीं, आज मला त्याचें फार वाईट वाटतें !

" मला तुमच्यांपैकीं छांदिष्ट लोक जास्त का आवडतात याचें आणखी एक कारण आहे. त्यांना भूगोलाच्या कृत्रिम मर्यादा व नीतीचीं बांडगुळें मुळींच सहन होत नाहींत हें तें कारण होय. हिंदुस्थानांत राहणारा तो हिंदु ही सोय घाणेरडी आहे. कारण त्या मर्यादेपायीं किती भयंकर रणें माजलीं व अजूनही माजतात ? मी तुझ्या डोळ्यांत राहतों तर तुझा एकट्याचाच डोळा फुटता; पण भूगोलाच्या कृत्रिम मर्यादेपायीं किती हजारों माणसें मेलीं सांग बरें ? तूं मला क्षुद्र समजतोस, पण माझ्याकरतांच तूं रणकंदनें लढवतोस; राजकारणें खेळतोस; व दीनांच्या तोंडचे घांस काढून जिवंत कुटुंबें उपाशीं व तान्हेलीं देशोधडीं लावितोस ! फिरून तूं स्वच्छतेचा डामडौल दाखवण्यास तयार तो तयार !! "

" छांदिष्ट माणसें प्रेमळ असतात. त्यांना कृत्रिमता विषारी वाटते. ते खरो-खरच मनानें समतोल व हृदयानें बहुमोल असतात. ते आनंदी व रंगलेले अस-तात. आनंदाचा रंग तेवढाच खरा पांढरा रंग. त्याला पांढरा तरी कां म्हणायचें? कारण तो कोणताच रंग नसतो म्हणून. त्या रंगाचें नांव, रूप वगैरे सर्व कांहीं आनंद !

" त्यांच्या आनंदाला स्वच्छतेची घाण तुम्ही बुद्धिमान लोक लावतां. तुम्हांला वाटतें कीं घर कसें स्वच्छ असावें. पण कमालीचें स्वच्छ घर जें ताजमहाल त्याच्या पोटांत दोन प्रेतेंच ना ? कमालीचा स्वच्छ आरसा जो सम्राटाच्या रंगमहालांतला, त्यांत किती शाप धारण करणाऱ्या मलीन चेहऱ्यांचें प्रतिबिंब दिसतें ? तुम्हांला

स्वच्छ कपडे पाहिजेत. पण धोब्याची खारी माती अथवा सनलाईट सोप किती प्राण्यांची आहुती घेतात? तुम्हांला वाटतें फॅशनचा स्वच्छता हा तरी एक फायदा असतो. पण सुंदर दिसून किती बरें नुकसान होतें? तुम्ही खरोखरच सुंदर असाल तर तुम्हांला फॅशन कुरूप करते; आणि कुरूप असाल तर फॅशनमुळें तुम्हीं जास्तच कुरूप होता. पण फॅशनमुळें गरिबी झांकली जाऊन खोट्या श्रीमंतीची भूल पडते, यांत तर अनेकांचा तोटाच आहे. तूं कसेंही पहा; छांदिष्टपणा हाच एक खरा स्वच्छपणा. बाकीचें सोंवळें हें भयंकर ओंवळें असतें!

" तूं सृष्टीकडे पहा; तुला प्रत्येक ठिकाणीं छांदिष्टपणांत स्वच्छता, व डामडौलांत मलीनताच दिसेल. पाणी वाहतें तोंपर्यंत स्वच्छ, थांबलें कीं घाणेरडें झालेंच. अरे नद्यांना पूर आले तर पाणी गढूळ होतें तें तरी कां? तर डामडौली तीराची घाण काढायलाच त्याला अधिक गढूळ व्हावें लागतें. नद्यांचे पूर हा सुद्धां नद्यांचा डामडौलच, त्यांचें पाणी कधींही झिरपायचें नाहीं. शिल्लक रहातें तेंच झिरपतें. तसेंच सुंदर कुरणांकडे पहा. वरतीं कितीही कोंवळीं असलीं तरी लांबूनच बरीं दिसतात. त्याच्यावर जाऊन बसलास कीं तुझ्या शरीराला चिखलच लागायचा. चोरटे कांटे लागले नाहींत तर भाग्य तुझें! हें पहा; सृष्टीचें अवलोकन मी पामरानें जेवढें केलें तेवढें तुझ्यासारख्या कवीच्या स्वप्नांत सुद्धां आलें नसेल. कारण मी नुसती स्वतंत्र होण्याची कल्पना करताच, साडे सांठ लक्ष वर्षांच्या बंदिवासांतून अवघ्या आठ दिवसांत सुटलों हें तुझ्या आढ्यतेनें भरलेल्या मेंदूला खरेंसुद्धां वाटणार नाहीं.

" नाथा! मी मलीनतेचा अवतार तुला दिसत असेन. पण मी खरोखर स्वातंत्र्याचा उपदेशक आहे. स्वातंत्र्याचें करीन तेवढें माझें गायन थोडेंच होणार आहे. मी तुला फिरफिरून उपदेश करतों कीं, स्वातंत्र्याच्या मापानें स्वच्छता मोज. म्हणजे मलीनता मातींत नसून पारतंत्र्यांत आहे; व स्वच्छता शरीरांत नसून स्वच्छंदांत आहे हें तुला पटेलच पटेल.

वाऱ्याची झुळूक आली; व बोटावरला तो मातीचा कण उडून गेला; पण तें कांहीं मला त्यावेळीं समजलें नाहीं. माझ्या भोंवतीं, व माझ्या अंतरंगांत तें मलीनतेचें गायन एकसारखें दुमदुमून होतें. त्याचे जितके ध्वनि आठवले व जसे स्मरणांत आले तसे व तितके शब्दांत सांठवून ठेविले आहेत!

# पुरुषोत्तममासाचा आनंद.

यंदा अधिक श्रावण उर्फ पुरुषोत्तममास हा नाशीक क्षेत्रीं फार आनंदाचा झाला. पंडित पलुसकर यांच्या रामनामाधारांत म्ह० श्रीराममंदिरासमोरच्या विस्तृत जागेंत वारकऱ्यांचे पुढारी व्यंकटस्वामी यांनीं आपल्या मंडळीसह महिनाभर प्रवचनें, कीर्तनें, भजनें व भोजनें यांची गर्दी उसळून दिली होती. सकाळीं व्यंकटस्वामींचें ज्ञानेश्वरीवर प्रवचन, नंतर भजनसोहळा, दुपारीं चार चार हजार पात्रांच्या भोजनपंक्ति व सायंकाळीं कीर्तन असा हा थाट महिनाभर झाला. रात्रीं पलुसकरांचे तुलसीदास रामायणावर प्रवचन होत असे. गांवांत इतरत्रही मंदिरांत व खाजगी जागांतून असाच थाट असे. शंकराचार्य डॉ० कुर्तकोटी यांचीं गीतेवर प्रवचनें चालू होतीं. व्यंकटस्वामींच्या मेळ्यांत तर समाप्तीला ३० हजारांवर पात्र जेवलें असून एकंदर खर्च ५० हजारांवर झाला. रा. पांगारकरांचे घरीं, मुरलीधराचे मंदिरांत, सोनगीरचे केशवदत्त-महाराज उतरले होते त्या डॉ. काळे यांच्या माडींत व भद्रकाळीचे माडीवर स्वामी पूर्णानंद यांचेकडे प्रवचन—कीर्तनसप्ताह झाले. या चारही ठिकाणीं आमचा एकमेळाचा श्रोतृवृंद होता. यांत नरहरशास्त्री खरशीकर यांचा ज्ञाने-श्वरीसप्ताह व कीर्तनसप्ताह हे मुख्य झाले. ह्याशिवाय पांगारकरांचीं प्रवचनें व कीर्तनें, केशवदत्तांचीं प्रवचनें, गुरुभक्त माईचीं भजनें, पूर्णानंदस्वामी व श्रीराम खाडिलकर वकील यांचीं प्रेमळ भजनें व गायनें, होऊन महिनाभर हरिप्रेमाचा आनंद मनसोक्त लुटावयास मिळाला. आमचेकडे अखेरचा काlाही झाला. संतसमागम, संतपूजा, संतभेटीगांठी व प्रेमाचा संतसत्कार या अलीकडे दुर्मिळ झालेल्या गोष्टींचा अपूर्व आनंद आमच्या ह्या एकजूट मेळ्यांत अनुभवायास मिळाला. ह्या आनंदभरांत शरीरव्यथेचें व संसाराचें कोणास भानही उरलें नाहीं. एका मेळ्यांतल्या समप्रेमी भक्तभाविकांच्या पर-स्पर समागमांत कोण आनंद उसळत असतो हें अनुभवाशिवाय कळायचें नाहीं. कित्येक रात्रीं अलोचन हरिजागरांत गेल्या. शेवटीं चौंडे महाराजही या मेळ्यांत येऊन मिळाले. येथील १३ कोटी नामजपयज्ञाची सांगता टाक-ळीस श्रीसमर्थचरणीं होऊन मारुतिरायाचा पूजाअर्चादि थाट उडाला. चोवीस तास आम्ही सर्व एकत्रच होतो. तेथेंही आमचीं प्रवचनें व चौंडेबुवांचें कीर्तन झालें असा हा पुरुषोत्तममास पुरुषोत्तमगुणगायनांत सर्वांनाच परम सुखाचा वाटला. ‘ तें सुख काय सांगों वाचे बोलतां नये. ’ बाणभट्टानें कादंबरीच्या शेवटीं म्हटल्याप्रमाणें ‘ तेषु तेषु स्थानेषु…परस्परावियोगेन सर्वएव सर्वकालं सर्वसुखान्यनुभवन्तः परां कोटिमानंदस्याध्यगच्छन्. ’

# ठकूताईचा ग्रंथ !

## " आनंदपदावर चौदा चौकडयांचें राज्य !! "

' अर्धवट गुरूंच्या दुकानदारींत गरीब आणि भोळ्या मुमुक्षूंचें मात्र नुकसान होतें. ' ( प्रस्तावना ).

१ ' आनंदपदावर चौदा चौकडयांचें राज्य ' नांवाचा ग्रंथ ठकूताईंनीं प्रसिद्ध केला आहे. ठकूताई कोण व त्यांच्या या ग्रंथाचें स्वरूप काय हें आज वाचकांस सांगावयाचें आहे. ठकूताईचा जन्म नाशीक क्षेत्रीं झाला. यांचें सासरचें नांव भागीरथी असून त्यांच्या वयाचे आठवे वर्षी देवासचे गोविंदराव वैद्य यांशीं विवाह झाला. त्या आज ५२ वर्षांच्या असून गतधवा आहेत. यांना पोरबाळ कांहीं नाहीं. ' चार वर्षांच्या वयापासून यांना आकाश फोडून वर कसें जावें या संबंधीं विचार येत असत व यांनीं पुष्कळसे जप नेम ध्यानधारणा समाधीपर्यंत करून पाहिले व वयाचे २८ वे वर्षी सद्गुरूस शरण गेल्या ' असें याच ग्रंथांत यांच्या चरित्रकारानें म्हटलें आहे. यांचे गुरु बलभीम महाराज साडेकर. आमच्या संतचरित्रमाला नामक ग्रंथांत श्रीनारायणमहाराज जालवणकर ( शके १७२९–१७८९ ) यांचें चरित्र दिलें आहे. त्यांचे सप्तसागर व अष्टकें पंचकें वगैरे प्रसिद्ध आहेत. हे महासाक्षात्कारी दत्तोपासक होते. यांचे शिष्य लक्ष्मणबोवा–त्यांचा मठ इंदुरास आहे. लक्ष्मणबोवांचे शिष्य बलभीमबोवा, व बलभीमबोवांची शिष्यीण ठकूताई. नारायण–लक्ष्मण–बलभीम अशी यांची गुरुपरंपरा. बलभीम महाराजांच्या शिष्यांत नरसिंगगडचे नागेशराव काथवटे, इंदूरचे गणपतराव तांबे, धारचे बापूसाहेब उर्फ काशिनाथ कृष्ण लेले, बलभीम महाराजांचे पुत्र दत्तबोवा व ठकूताई हे प्रमुख होत. बलभीम महाराजांचा आमचा अल्पकाळ समागम झाला होता व त्यावरून ते अत्यंत निरहंकारी निरपेक्ष व प्रेमळ भगवद्भक्त होते अशी आमची खात्री झाली. आमचे स्नेही बापूसाहेब लेले यांजकडून त्यांची पुष्कळ माहिती झाली. त्यांचे वरील सर्व शिष्य आमच्या परिचयाचे आहेत. बलभीम महाराजांचें चरित्रही ( शके१७७५–१८३१ ) संतचरित्रमालेंत दिलें आहे. नागेशराव काथवटे, गणपतराव तांबे व ठकूताई हे त्रिवर्ग कीर्तन करितात व उपदेशही देतात. नागेशराव खरोखरीच अंतर्निष्ठ गुरुभक्त आहेत व यांनींच परंपरा चालवावी अशी बलभीम महाराजांची त्यांना लेखी आज्ञा आहे. ठकूताईनींही कांहीं शिष्यिणी केल्या आहेत, व त्यांत कांहीं संपन्न आहेत. आपणांस ठकूताईंच्या ग्रंथाचें स्वरूप पाहायचें आहे. प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत त्यांचे हेतु दोन दिसतात. एक तर सद्गुरुपरंपरा चालविण्याचा पूर्ण

अधिकार एकट्या ठकूताईलाच आहे हें दाखवावयाचें व दुसरें गुरुशिष्यसंवाद-द्वारां आपलें ज्ञान व सद्गुरुत्व सिद्ध करावयाचें. पण हे दोन्ही हेतु ग्रंथावरून साधलेले दिसत नाहींत.बलभीम महाराजांच्या अगदीं देहपाताच्या वेळीं एकट्या ठकूताईच त्यांच्या सन्निध होत्या याचा फायदा घेऊन त्यांनीं पुढील विचित्र मत जागोजाग प्रगट केलें आहे. " सद्गुरु देह सोडण्याचे वेळीं शिष्यावर कृपा करितात, त्यावेळीं शिष्यानें गुरुदेवाचे सांनिध्यांत असलें पाहिजे. सद्गुरु चैतन्य रूपानें शिष्याच्या नेत्रद्वारें शिरून मूर्धनी स्थानांत आपलें वास्तव्य करितात. " ( पृ० ११ ) "सद्गुरूंचें अत्यंत शेवटचें कृत्य ह्मणजे सद्भक्तावर कृपा करणें" ( पृ० ३३ ) "सद्गुरूंची देह ठेवण्याची वेळ आली ह्मणजे अशा सद्भक्तांपैकीं कोणासही हाक मारून त्यावर सद्गुरु कृपा करितात " ( पृ० ११४ ).

२ सद्गुरु देह सोडण्याचे वेळीं शिष्यावर कृपा करितात ह्मणजे काय? त्यांचा देहपात होण्यापूर्वी ते शिष्यावर कृपा करीत नाहींत ? याचा अर्थ असा होईल कीं गुरूच्या देहपातापर्यंत शिष्यावर त्यांची कृपा होत नाहीं अर्थात् गुरूच्या देह-पाताचा समय म्हणजे शिष्यांचा भाग्योदयकाळ ! गुरूनें मरावें म्हणजेच शिष्य कृतार्थ ! कोण विचित्र मत हें ? समर्थांच्या देहत्यागाचे वेळीं कल्याणस्वामी सन्निध नव्हते म्हणून काय ते कृतार्थ व्हायचे राहिले ? अशीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. दुसरें असें कीं जन्मभर सेवा किंवा कसलेंही साधन न करितां गुरूच्या देहपाताच्यावेळीं इतरांना दूर ठेवून कोणीही जरा गुरूच्या पुढें ठाकलें कीं गुरु नेत्रद्वारां मूर्धनीस्थानांत प्रवेश करणार ! तिसरें गुरूच्या देहपातापर्यंत कोणा-वरच कृपा व्हायची नाहीं व देहपाताच्या वेळीं ते एकाच्याच नेत्रांत शिरणार म्हणजे गुरूलाही एकाच शिष्यावर आणि तीही फक्त देहपाताचे वेळीं कृपा करितां येते, तर मग बाकीच्या शिष्यांवर कृपाच होत नाहीं काय ? एकाच शिष्याचा उद्धार गुरु करितात आणि बाकीच्यांस काय रडत बसवितात ? ठकू-ताईच्या ह्या विपर्यस्त मताचें बीज कशांत आहे हें वर दर्शविलेंच आहे-आणखी एक प्रमाण. " बलभीम महाराजांच्या चैतन्य आत्म्यानें श्रीमती ठकू-ताई यांजवर देह सोडण्याचे वेळीं कृपा करून आपलें अवतार कृत्य संपविलें" असें सांगून प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं " महाराजांनीं परंपरेचे सद्गुरुपद माझे परमपूज्य गुरुवर्य सद्गुरु ठकूताई यांजकडे सोंपवून देह सोडला. " प्रस्तावनेचा लेखक कोणी वर्तक म्हणून बाईचा शिष्य आहे असें खालील सहीवरून दिसतें. पण सदर वर्तक यांनीं तो लेख लिहिला आहे का बाईनेंच त्याचें नांव पुढें करून प्रस्तावना लिहिली आहे हें सांगतां येत नाहीं. तात्पर्य इतकेंच कीं, इतर शिष्य गुरुपदावर आरूढ असले तर एकटया ठकूताईच सद्गुरुपदावर आरूढ आहेत असें प्रस्तुत ग्रंथानें शिष्य प्रशिष्यांस सांगावयाचें बाईच्या मनांत आहे ! आपलेंच घोडें पुढें दामटण्याची बाईची ही कारवाई उघड दिसते.

३ आतां बाईचा दुसरा हेतु. आपलें अगाध ज्ञान गुरुशिष्यसंवाद रूपानें बाईला मिरवायचें आहे. पण प्रस्तुत ग्रंथांत विपरीत ज्ञान पानापानावर खच्चून भरलें आहे. साऱ्या ग्रंथभर इतर पंथ, धर्म, आचार्य, कीर्तनकार, मान्य ग्रंथ ह्या सर्वांस बाईनें तुच्छ लेखलें आहे. मध्वाचार्य, रामानुज, वारकरी रामदासी,दयानंदापर्यंत कोणालाच खरें ज्ञान झालें नाहीं. खरें ज्ञान फक्त बाईच्या प्रस्तुत ग्रंथांत साठवलें आहे, व खरें सद्‌गुरुपद बाईला प्राप्त झालें आहे ! सकल संप्रदायांचे मान्य ग्रंथही बाईला मान्य नाहींत. फार काय पण भगवद्गीतेवर बाईचा अभिप्राय मोठा मौजेचा आहे:—

" श्रीकृष्णांनीं अर्जुनास ज्ञान असें सांगितलेंच नाहीं...अर्जुनाचीही श्रीकृष्ण सद्‌गुरु अशी भावना नव्हती....त्यानें पारमार्थिक प्रश्न केलेच नाहींत. त्यास ( केवळ ) परोक्षज्ञान झालें. श्रीकृष्णांनीं अर्जुनास त्यांचें यथार्थ रूप दाखविलें नाहीं. " ( पृ० ३९ ).

ह्यावर काय लिहावें ? गीताज्ञानेश्वरीशीं परिचय असलेल्या आमच्या वाचकांस बाईच्या ह्या धृष्टपणाचें नवल वाटल्याशिवाय राहणार नाहीं. यांतील प्रत्येक शब्द खोटा आहे, पण या जल्पाच्या नादीं लागण्याचें कारणच नाहीं. ' अजूनपर्यंत असा ग्रंथ निघाला नाहीं ' हें प्रस्तावनेंतलें वाक्य अगदीं खरें आहे. वेद, शास्त्र संतांचे ग्रंथ यांत न सांपडणारें गावाळ यांत खच्चून भरलें आहे. बाईला ज्या विषयाचा गंधही नाहीं त्यावर ' दडपून दीजे ऐसाजे ' या न्यायानें वाटेल तें भरमसाट त्यांनीं लिहिलें आहे. प्रस्तुत ग्रंथ गुरुशिष्यसंवादरूप आहे. गुरु बलभीम महाराज व शिष्य ठकूताई—यांच्या संवादानें प्रस्तुत ग्रंथ भरला आहे. यांत बलभीममहाराजांच्या तोंडीं जे अपसिद्धांत, मिथ्या वार्ता व खोट्या गोष्टी घातल्या आहेत त्यांमुळें त्यांना कमीपणा येण्याचा संभव आहे; पण या संवादाशीं त्यांचा कांहींएक संबंध नाहीं, हें सर्व ठकूताईचें अफाट ज्ञान ( अज्ञान ) आहे, हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें. वेदशास्त्र पुराण प्रमाणबद्ध हा ग्रंथ आहे असें लिहिलें असलें तरी वेदशास्त्रांना, पुराणांना व रामकृष्णादि अवतारांनासुद्धां कमीपणा आणण्यांत ह्या धाडसी बाईनें कमी केलें नाहीं.

सद्‌गुरु भागीरथी मूर्ति प्रख्याति मोक्षार्थी संपूर्ती ।
मुमुक्षुजनशरण्य गुरुवरेण्य ।
निवारण भवारण्य अग्रगण्य वरपुण्य कारुण्य ॥

साधुकुलगोत्र सुगुण मणिसूत्र ।
सच्चिदानंदगात्र ज्ञाननेत्र सर्वत्र पवित्र ॥

—अशी या 'परमपूज्य सद्‌गुरु महात्मा' ठकूबाईची कोणी एकानें अर्थसंदर्भ-

शून्य शब्दांनीं प्रशंसा केलेली याच पुस्तकांत छापली आहे. असो. बाईंच्या ज्ञानाचे मासले पहा:—

( १ ) शिष्य चार प्रकारचे; त्यांत उत्तमाचे पुन्हां चार प्रकार. ही गोष्ट सांगतांना बाईंनीं विलक्षण गोंधळ करून सोडला आहे. नाथांचीं व समर्थांचीं अवतरणें देऊन त्यांचा मनसोक्त अर्थ केला आहे. सद्भक्त, वचनभक्त, कृपाभक्त, वाटेल ते शब्द योजून त्यांचा वाटेल तो अर्थ केला आहे.

( २ ) ' उपासनेनें उत्तीर्ण व्हावें या समर्थोक्तीप्रमाणें ' ( पृ. २५ ) येथें उपासनेचें उत्तीर्ण व्हावें असें पाहिजे.

( ३ ) स्वतःच्या पसंतीनें सद्गुरुची निवडणूक करण्याकरितां संत समागम करावयाचा असतो. सद्गुरुंची प्राप्ति झाली कीं संतसमागमाचें प्रयोजनच उरत नाहीं ! ... शिष्यानें कोठेंही जाऊं नये. ... इतर संतांचीं बोलणीं ऐकून शिष्य भांबावतील व त्यांचें आपल्या सद्गुरुवरील प्रेम नाहींसें होऊन मोठाच भंडवडा होईल ( पृ. २५ ).

हे सगळे अपसिद्धांत आहेत. सद्गुरूची निवडणूक काय शिष्याला करितां येते ? कां सद्गुरु शिष्य शोधून त्याला कृतार्थ करितात ? कोण कुणाला निवडतो ? गुरुप्राप्तीनंतर संतसंगतीचें प्रयोजन नाहीं हें बोलणेंच व्यर्थ आहे ! इतर संतांचीं बोलणीं ऐकून म्हणे शिष्याचें गुरुप्रेम नाहींसें होईल ! या कल्पना धंदेवाइकांना सुचतील. पण परमार्थांत या कल्पना अत्यंत अनिष्ट आहेत. सद्गुरु सांगतात त्याहून इतर संत काय वेगळें शिष्य सांगतात कीं त्यामुळें शिष्य बिघडून जावा ? सत्संग हा सर्वांना सर्वकाळीं इष्टच नव्हे तर अवश्य आहे. आपले शिष्य दुसऱ्या संतांकडे जाऊं नयेत असें कांहीं धंदेवाईक गुरु आपल्या शिष्यांना सांगत असतात, पण हा कांहीं परमार्थ नाहीं. शिष्य दुसऱ्या संतांकडे गेल्यास ठकूताईंना भीति कां वाटते ?

( ४ ) रामकृष्णादिअवतार तरी तुझ्यामाझ्याप्रमाणेंच माणसें होतीं. यांनीं कीर्तनें करून आपल्या भक्तांचा उद्धार केला. हे कृपाभक्त......(पृ० १११)

( ५ ) मातृकुल म्ह० स्थूलदेह. यावर पितृकुल आरूढ झालें तें लिंगदेह ( पृ० १२४ ).

( ६ ) तूं आमचेकडे उपदेश घ्यावयास आलास हाच कारण देह. कारणाशिवाय कार्य होत नाहीं. ( पृ० १४३ )

( ७ ) अथर्ववेदाचे चार भाग झाले. पहिला अथर्व म्हणजे महाकारण. दुसरा सामवेद म्हणजे कारण. तिसरा यजुर्वेद म्हणजे सूक्ष्म. चौथा ऋग्वेद म्हणजे स्थूल......त्वम् आणि तत् यांची मिळणी म्हणजे ऋग्वेद सामवेदांत मिळाला......अथर्ववेद आपल्या स्वरूपास जाणतो व ब्रह्मासही जाणतो यावरून यजुर्वेद हा अर्धवट—किंचिज्ज्ञ व अथर्ववेद हा सर्वज्ञ. ( पृ० १५२ )

हा सर्व भाग अगम्य आहे, ठकूमावशीच्या शिष्यिणींस याचा कांहीं बोध झाला असल्यास 'सद्गुरु' जाणें !

( ८ ) स्वरूपाची दोन आणे भार तरी जाणीव तुला करून दिली आहे ना ? यापैकीं इतर पंथांतून तुला कांहीं मिळालें होतें कां ? ( पृ० १६४ )

( ९ ) जीवन्मुक्तींत व्यतिरेकज्ञानाचा अभ्यास, पुढें विदेह स्थितींत अन्वय ज्ञानाचा म्हणजे विज्ञान ज्ञानाचा अभ्यास आणि नित्यमुक्तींत अखंड चिद्रूपीं राहण्याचा अभ्यास......( पृ० १७६ )

( १० ) तुझ्या माझ्या संधींत ( पोकळींत ) भरून असलेलें परब्रह्म तुला सहज दिसावें ( पृ० १८० )

( ११ ) गुरुचेल्यांचे संधिगत असलेलें स्वरूप **निरस** होऊन भोगावयाचें आहे ( पृ० १९० )

( १२ ) एकोहं बहुस्याम् हा विवर्तवाद...वर खालीं ब्रह्म आणि मध्यें चिद्रूप माया...आपण आपणास पहावें असा भास झाला तें अग्नितत्व. ब्रह्मामध्यें स्फुर्णेची जाणीव ती माया...पहिली जी बिंदुरूप जाणीव ती मूळ माया व दुसरा फांटा जो झाला. त्याची जाणीव ती तुर्या...एकंदर स्फुर्णा तीन. प्रथम स्फुर्णेचें नांव जाणिवेसहित शिव, दुसरे स्फुर्णेचें नांव जाणिवेसहित ईश्वर, व, तिसरे स्फुर्णेचें गुणक्षोभिणी...निर्गुण निराकार आणि चैतन्य आणि नेवाचा, वाचातीत आणि अनिर्वाच्य या तीन वाचा. ( पृ० १६७–१७० पहा ).

काय अगाध ज्ञान या आठव्या प्रकरणांत सांठविलें आहे ! हें वेदांत, शास्त्रांत, संतग्रंथांत कोठें सांपडायचें नाहीं ! वेदांत परिभाषा बाईला परिचित आहे पण शब्दाचे अर्थ तिनें आपल्या मनास येतील तसे लावले आहेत. कुत्र्याचें शेपूट मांजराचें गळयांत असा सर्वत्र प्रकार आहे. वेदांतशास्त्राची अशी थट्टा कोणी कोठेंही केल्याचें आढळणार नाहीं. याला अर्धवट ज्ञानही म्हणवत नाहीं. पुरें पुरें अज्ञान सर्वत्र भरलें आहे.

( १२ ) मृत्युलोकीं नवविध भक्ति उपयोगीं पडते, परंतु स्वर्गावरील प्रेमलक्षणाभक्ति सद्गुरुची म्ह० प्रत्यक्ष चैतन्य सगुणाची करावयाची असते. (पृ० १८७ )

( १३ ) सद्गुरुस्वरूप लौकिकदृष्टया **नीरस ह्म० निराकार** आहे !

ठकूताई आणखी ग्रंथ प्रसिद्ध करणार आहेत, पण त्यांनीं त्यापूर्वीं जाणत्या पाशीं कांहीं वर्षें अध्ययन करावें हें बरें.

ठकूताईच्या ह्या पुस्तकाचा समाचार घेण्याचें कारण एवढेंच कीं मुमुक्षुसाधकांनीं फसून जाऊं नये. भोंदू गुरूंची सांथ सर्वत्र फार बोकाळली आहे हे खरें आहे. खरा परमार्थ व खरे परमार्थी सर्व काळीं फार विरळ असतात. ज्ञानें-

श्वरी, नाथभागवत, दासबोध यांसारखे शुद्ध परमार्थ शिकविणारे सद्ग्रंथ सुदैवानें आपल्या भाषेंत आहेत, व कोठें कोठें खरेखुरे सत्पुरुषही आढळतात. सत्संगाशिवाय तरणोपाय नाहीं हें जितकें खरें तितकेंच खरें संत भेटणेंही कठिण. अघ्र्योकच्या परमार्थकल्पनांनीं भरलेल्या ठकुताई व ठकोबा विपुल आहेत. ही गोष्ट परमार्थांतच खरी आहे असें नसून राजकारण, समाजसुधारणा व वाङ्मय यादि नानाप्रकारच्या चळवळींना हाच न्याय लागू आहे. पारमार्थ्यांनीं शुद्धभावानें खरें चांचपत असावें, योगायोगानें खऱ्याचा शोध लागल्याशिवाय राहत नाहीं. आपला योगायोग येईतों वरीलसारख्या ग्रंथांचीं नित्य पारायणें करीत राहावीं व उपासनेचें प्रेम पोटीं धरून यावज्जीव नामानुसंधानांत तन्मय असावें. उपासनेला दया आली कीं सद्गुरूची प्राप्ती होऊन जीव कृतार्थ होतो. सोंगाढोंगावर जाऊं नये व आपला विमलभाव जतन करून उपासनेचें प्रेम वाढवावें. परमार्थ हेंच समाधानाचें स्थान आहे, परमार्थ जीविताचें साफल्य आहे, परमार्थ निजानंदाची खाण आहे, पण खऱ्या संतांचें साह्य झाल्यास उत्तमच, नाहीं पेक्षां मतामतांच्या गलबल्यांत न सांपडतां आपण निश्चल भावानें आपलें उपास्य जागवावें.

## अभंग.

ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठीं लागे ॥ १ ॥
म्हणोनियां अवघे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥ ध्रु० ॥
वेदपारायण पंडित वाचक । न मिळती एक एकामधीं ॥ २ ॥
पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखें चेष्टा विपरीत ॥ ३ ॥
आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । एकीं करिती रागें गुरुगुरु ॥ ४ ॥
तुका म्हणे मज कोणाचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥ ५ ॥

---

**श्रीसत्यनारायणकथाः**—भावार्थबोधिनी टीकासहित.कथा लोकप्रसिद्ध आहेच. तिच्यावर ही सरस टीका लोकनाथशास्त्री कुटासकर यांनीं लिहिली आहे. मूळ ग्रंथ सुबोध आहे. तथापि ही टीका नागपूरचे प्रो. ताह्मने यांनीं म्हटल्याप्रमाणें 'पामराणां परमोपकाराय तथा विदुषां मनः कौतुकाय' अशी निःसंशय झाली आहे. टीकेंत विद्वत्व व रसिकत्व दोन्ही प्रगट झाले असून ही प्रवचनकारांच्या व मार्मिक वाचकांच्याही संतोषास कारण होणारी आहे. ही टीकाकारांचे चिरंजीव काशिनाथशास्त्री यांनीं प्रकाशित केली आहे. ती पो. कुटासा, जि. आकोला, वऱ्हाड यांजकडे मिळते. किं, रु. १.

---

ता........
... शाखा

# बभ्रुवाहनाख्यान.

ले० नरहरशास्त्री खरशीकर.

ज्या भक्तांनीं चित्तसर्वस्व परमात्मपदीं समर्पित केलें आहे ते दुबळे होत नसून त्यांना सर्वावस्थेंत आनंदकंदाचा भोग होतोच व त्यांचीं सर्व दुःख-संकटेंही परमात्म्यास दूर करावीं लागतात, हा स्वाभाविकच योग होतो. पांडवांनीं आपलें सर्वस्व श्रीकृष्णपरमात्मपदीं समर्पण केल्यामुळें त्यांचें अंतर्बाह्य संरक्षण करणें श्रीकृष्णास प्राप्तच होतें, म्हणून त्यांच्या सर्व संकटांचा परिहार होत असे व परमोच्च भक्तिप्रेमसुखाचाही लाभ मिळत असे. तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं ॥ सर्व समर्पण झालें म्हणजे भक्तच देव होतो. देवही भक्तच होतो. सर्व संसारच देव, अशी भक्तांची भावना असते. अशी शुद्ध भावना पंडुनंदन पार्थाची होती. अर्जुनाचे भक्तिप्रेमानें देवास स्वतःचा विसर पडण्याइतकी भूल येत असे.

ओवी– परि अर्जुना तुझेनि वेधें । मियां देवपणाचीं विरुदें ।
सांडिलीगा मीं हें आधें । सगळेनि तुवां ॥ ज्ञा० अ० १८ ॥

श्रीकृष्ण म्हणतात-परंतु अर्जुना, तुझा जो मला अतिशय छंद लागला आहे त्या योगानें मीं आपलें देवपणाचें ब्रीद टाकून भक्त झाल्यामुळें; अर्धा आहें व तुला माझा ध्यास लागून तूं मद्रूप झाल्यामुळें तूं सगळा आहेस. याप्रमाणें सर्वोत्तम भक्तियोग पांडवांना लाभला होता. त्यांचा सर्व भार ( ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें अंतःकरणपंचकासुद्धां ) परमात्म्यावर होता, यामुळें परमात्म्यासही त्यांचा छंद लागून भक्ताच्या सेवेची आवड देवास उत्पन्न होऊन सर्वावस्थेंत पांडवांचें दास्यत्व करून संरक्षण करण्याचें ब्रीदच देवाचें होतें. बभ्रुवाहन आख्यानावरूनही पांडवांचा विशेषतः अर्जुनाचा सप्रेम भक्तियोग किती श्रेष्ठ दर्जाचा होता व त्यामुळें अभ्युदय व निःश्रेयस प्रपंच परमार्थ—कसा उच्च दर्जाचा होता, प्रत्येक वृत्तीचे द्वारा श्रीकृष्णपरमात्म्याच्या उदयाची प्रतीतीच कशी मिळत होती हें सहज ध्यानीं येणार आहे. आतां श्रोते सज्जनांनीं

अवधान एकलें देइजे । मग सर्व सुखवासि पात्र होइजे ।
हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघडें आयिका ॥ ज्ञाने० अ० ९ ॥

अखिल भारतवर्षास दुःखोदधींत बुडविणारें भारतीय युद्ध होऊन गेलें व धर्मराज राज्यसिंहासनारूढ झाल्यावर प्रजेचें पालन यथान्याय होऊं लागलें. दुष्टबुद्धि, पापी, खळ, वगैरे आसुरी संपत्ती बरीच कमी झाली व आर्यावर्तांत दैवी संपत्तीचें युग सुरू झालें. पांडुपत्नी कुंतीला तर हा अप्रतिम सौंदर्यवान

देखावा व श्रीकृष्णपरमात्म्याच्या कृपेनें पांडवांचा झालेला उत्कर्ष पाहून हायसें झालें. परंतु साक्षात् धर्माची मूर्ति धर्मराज याला मात्र रात्रंदिवस तळमळ सुरूं झाली. आपणाकडून राज्यलोभासाठीं गोत्रवध व पुष्कळ निरपराधी राजे यांचा वध झाला आहे; कित्येक राजस्त्रिया, राजस्नुषा वैधव्यप्राप्तीमुळें तळमळत असतील, कित्येक स्त्रियांनीं पतीबरोबर सहगमन करून स्वर्गलोक आपलासा केला असेल. एकंदरींत आमच्या एका लहानशा घराण्याच्या राज्यतृष्णेनें पातक मात्र फार झालें आहे; या पातकाचें निरसन होऊन आह्मांस उद्धारगति व वंशाभिवृद्धि कशी होणार या चिंतेंत धर्मराजाचे दिवस चालले असतां अकस्मात् भगवान् व्यास महर्षि तेथें आले. मुनिवर्यांची प्रेमपूर्वक पूजा करून धर्मराजानें सदर प्रश्न विचारला. त्यावर व्यासमुनि म्हणाले—धर्मराजा ! तूं अकर्ता आहेस.

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वापि स इमांल्लोकान् न हंति न निबध्यते ।। गी० अ० १८।।

कर्माचें कर्तेपण ज्याच्या ठिकाणीं मुळींच उरत नाहीं,

तया कर्मामाजीं मग । संहरो अघवें जग ।
अथवा नवें चांग । अनुकरो ( उत्पन्न होवो ).

तरी त्यास पापपुण्याचा लेश लागत नाहीं. धर्मराज, तुझाही अधिकार तसाच आहे. तूं पापपुण्यातीत आहेस, तथापि जगरूढी व समाजव्यवस्थेसाठीं तुझें हें म्हणणें उत्तमच आहे. तरी तूं आतां अश्वमेध यज्ञ केल्यास सकल पातकांचा परिहार झाला अशी तुझी व सर्व जनतेची भावना होईल. नंतर व्यास महर्षींनीं सर्व व्यवस्था सांगितली व अश्व कोठून कसा आणावयाचा हें सर्व सांगून धर्ममूर्ति युधिष्ठिराचा निरोप घेऊन व्यास महर्षि निघून गेले. यौवनाश्वाकडील श्यामकर्ण अश्व भीमसेन, कर्णपुत्र वृषकेत व घटोत्कचसुत मेघनाद घेऊन आले, व पृथ्वीपति जिंकून अश्वमेधासाठीं पुष्कळ द्रव्य जमवावें व पृथ्वींत यशस्वी होऊन यावें ही कामगिरी अर्जुनानें आपल्या शिरावर घेतली. अर्जुनाबरोबर कर्णपुत्र वृषकेतु व पुष्कळसें सैन्य अशा थाटानें जय मिळवीत मिळवीत मणिपुरचे हद्दींत अर्जुनाच्या श्यामकर्णानें पाऊल टाकलें.

अर्जुनानें विचारल्यावरून हंसध्वजानें सांगितलें कीं, धर्मात्मा, नीतिमान्, धैर्यशील, गुणज्ञ, उदार, शूर, सत्यवादी, जितेंद्रिय, दातृत्वादि अनेक गुणांनीं संपन्न असा बभ्रुवाहन राजा राज्य करीत आहे. त्याचा सुमतिनामक प्रधानही त्याचे सारखाच आहे. माझेसारखे कित्येक राजे त्यास वार्षिक करभार देत असतात. त्यानें जर शामकर्ण धरला तर मात्र तो सोडविणें आपणांस दुरापास्त आहे.

ओवी.

ऐकोनि स्तब्ध झाला अर्जुन । तों पुढें देखिलें आश्चर्य गहन ॥
ध्वजीं गृध्र येवोनि बैसला जाण । मुख्य पार्थरथाच्या ॥ २ ॥
तो अमंगळ गृध्र थोर । पाहात ठेले सकळ वीर ॥
म्हणती परम अरिष्ट दुर्धर । पावेल ऐसें दुश्चिह्न हें ॥२॥ जै. अ.॥

पद—चाल—ये धांवत माझे आई कृष्णाबाई,

श्रीधर्मराज मुद्रांकित पृथ्वी जिंकित चालला वाजी ।
जन्मेजय म्हणे वाहवाजी ॥ धृ. ॥
चातुरंग दळ घनदाट, धनुर्धर थाट, सभोवति राजे ।
मधें अर्जुनरथ विराजे ॥
पदभारें दडपति पर्वत, गज ऐरावत, उन्मत्त माजे ।
अनुरक्त समर कामा जे ॥
ध्वजमंडित रथ गडगडति, भेरि धडधडती, कर्णदर वाजे ।
बैसती कर्णदरवाजे ॥
तो सेनातट महासागर, थोपला मणिपूर ग्राम दरवाजी ॥
जन्मेजय म्हणे वाहवाजी ॥ १ ॥
ते बभ्रुवाहनाश्रित विर अवलोकुन धिर धरिति न थोडा ।
साटोपें कापिती घोडा ॥
पांडव भट करिती तांडव, म्हणती खांडव वन राखोडा ।
पुर करूं न मोडूं खोडा ॥
ध्या हिसकुन परतुन घोडा, चरण कर तोडा, फरफर ओढा ।
काय आह्मा सिंधु पुढें ओढा ॥
पुढें अद्भूत नवरस गायन, वैशंपायन, वहूं नावाजी ॥
जन्मेजय ह्मणे वाहवाजी ॥ २ ॥

बभ्रुवाहनाचे दूतांनीं शामकर्ण आल्याची वर्दी राजास सांगतांच त्यास धरून आणण्याची आज्ञा केली. आज्ञेप्रमाणें दूतांनीं शामकर्ण धरून आणला.

ओवी

बभ्रुवाहन विख्यात कीर्ती । श्रेष्ठ भूपाल चक्रवर्ती ॥
संगें घेऊनि प्रधान सुमती । शीघ्र सभेसी पातला ॥ १ ॥

**शामकर्ण धरोनी हातीं । बभ्रुवाहनासन्मुख आणिती ॥**
**पत्र वांचोनी सभासद म्हणती । राया पत्रार्थ जाणिजे ॥ २ ॥**

अश्वाचें सौन्दर्य पाहतांच सर्वांस फार समाधान वाटलें. तों अश्वाचें मस्तकावर सुवर्णपत्रावर लेख लिहिलेला दिसला.

श्लोक

**स्वस्तिश्री मद्धर्मराज नृपती यानें क्रतु मांडिला ।**
**पत्रालंकृत शामकर्ण धरणी जिंकावया सोडिला ॥**
**त्यानेंची धरणें असेल विर जो शस्त्रास्त्रपारंगत ।**
**किंवा या करभार घेउनि रणीं पार्थासि शरणांगत ॥ १ ॥**

सुवर्णपत्र पाहतांच बभ्रुवाहनाचें मनांत विलक्षण खळबळ उडाली व सुमती प्रधानास म्हणाला—हा विचार बरा झाला नाहीं; कारण अश्व संरक्षण कर्ता कुरुकुलदीपक अर्जुन—ज्याचा सारथी यदुराज श्रीकृष्ण आहे—तो माझा पिता होय. माझ्या मातेच्या बाळपणीं तिच्या पित्यानें तिला उत्तम नृत्य शिकविलें होतें. एकदां नृत्य करतांना ती ताल चुकली म्हणून तिच्या पित्यानें " तूं जलचर होशील " असा शाप दिला. मुलीच्या प्रार्थनेवरून बापानें परत उःशाप दिला कीं, " तीर्थयात्रेनिमित्त अर्जुन जलाचें ठिकाणीं स्नान करील तेव्हां तूं त्याचा पाय धर " म्हणजे तूं मुक्त होशील व अर्जुनासच वरशील. या गंधर्वशापाप्रमाणें ती जलचर झाली व अर्जुनही तीर्थयात्राप्रसंगानें त्या सरोवरांत स्नानास उतरला, तों तिनें त्याचा पाय धरला. पाय झाडतांच ती पूर्ववत् दिव्यदेही होऊन अर्जुनाच्या समोर आली. व सर्व वृत्तांत सांगितला; नंतर तेथें दोघांचा विवाह झाला व त्या उभयतापासून माझा जन्म झाला आहे. पार्थाचे पुण्यप्रभावानेंच मी एवढा ऐश्वर्यवान् झालों आहें. म्हणून आतां अर्जुनजीला शरण जावें कीं युद्ध करावें याबद्दल सर्वांनीं योग्य विचार करून सांगावें.

आर्या

**कुणि म्हणती आजि घोडा परत स्थळिं शीघ्र काळ जाऊं द्या ।**
**कुणि म्हणती डसल अहि अपकीर्तिचाचि काळ जाऊं द्या ॥१॥**

नंतर बभ्रुवाहनानें आपल्या मातुश्री ( चित्रांगी व उलूपी ) यांना विचारतां त्यांनीं सांगितलें.

घनाक्षरी

**तुझा वत्सा तो तात, जया अर्जुन म्हणतात,**
**शत्रु कंठींचा तात, प्राणनाथ आमुचा ॥१॥**
**मुला दुखवितां बाप । बहू होईल संताप ।**

नको पतकरूं हें पाप । तुला साफ सांगते ॥ २ ॥
धर्मयज्ञाचा हाय । उगा धरिला हायहाय ।
देइ वंदुनि तत्पाय । बहू काय बोलूं मी ॥ ३ ॥
तया घालुनिया आण । बहु प्रार्थुनियां आण ।
सखा हरिचा जिवप्राण । सख्या आण मंदिरीं ॥ ४ ॥

मातुश्रीची आज्ञा व प्रधानजीचा सल्ला असा पडला कीं, पुत्राचा स्वधर्म पितृसेवा होय. तरी शामकर्ण घेऊन पार्थाकडे जावें व पितृवंदन करावें आणि धर्मयज्ञास साह्य करावें. पितृचरणीं उत्तम हत्ती, अश्व, वस्त्रें, आभरणें वगैरे यथासांग समर्पण करून मोठ्या समारंभानें त्यांना आपल्या राजवाड्यांत आणून राज्यासह सर्वस्व समर्पण करावें. हा विचार बभ्रुवाहनास पटला व सर्वांस हुकूम दिला कीं,

ओवी

बभ्रुवाहन म्हणे रहा उगेची । कवचें न काढावीं निजांगीचीं ॥
मुख्य माय उलूपी चित्रांगीची । आज्ञा प्रमाण आमुतें ॥ १ ॥

नंतर वेदपाठक ब्राह्मण पुढें करून चतुरंगदळ सैन्य, रत्नें, अलंकार, ध्वज-छत्र, पताका वगैरे सरंजाम बरोबर घेऊन पार्थाकडे येण्यास निघाला. पुढें बंदीजन स्तुतिपाठ करीत आहेत, नृत्यांगनांचें नाच चालू आहेत, अशा फार मोठ्या थाटानें बभ्रुवाहन अर्जुनाजवळ येतांच हत्तीवरून खालीं उतरला.

दिंडीः

ध्वजस्तंभींचा कपि देत बुभुःकार । गांडिवाचा गंभीर टणत्कार ।
होत जेथें तेथेंचि निर्विकार । पुत्र घाली साष्टांग नमस्कार ॥ १ ॥

श्लोकः—

श्रुत्वा तु नृपतिः प्राप्तं पितरं बभ्रुवाहनः ।
निर्ययौ विनयेनाथ ब्राह्मणार्थ पुरः सरः ।

महाभारते अश्वमेधिक अ. ७९

अर्जुनाजवळ जाऊन त्यास साष्टांग नमस्कार घातला व स्वकेशांनीं पितृ-चरण झाडूं लागला, आणि सर्व वित्तजात पितृपदीं समर्पण करून अत्यंत नम्र-पणें बोलूं लागला. महाराज, चित्रांगीपासून आपणांस झालेला मी बभ्रुवाहन आपलाच कुमार आहे. आपणांस न जाणतां अश्व धरला आहे. तरी तो अश्व माझ्या सकळ राज्यवैभवसंपत्तीसह आपल्या चरणीं समर्पण करीत आहे, तरी अन्याय क्षमा करावा, असें म्हणून वारंवार पितृचरणीं लीन होऊं लागला.

प्रद्युम्नानें बभ्रुवाहनाचा स्वीकार करण्यास अर्जुनास विनविलें. हंसध्वज म्हणाला, हा धन्य पुत्र आहे. “पुन्नाम्नो नरका दस्मात् त्रायते पितरं सुतः” त्याच-

प्रमाणें ऋणत्रयांचा ( देव पितर ऋषींच्या ) परिहार करणारा, हा धर्मात्मा पुत्रांचा मुकुटमणी आहे. बभ्रुवाहनासारखा पुत्र, सुभद्रेसारखी स्त्री, आणि श्रीकृष्णासारखा सखा असणें हें आपलें महद्भाग्य आहे, तरी त्यास आलिंगन देऊन त्यावर कृपा करावी. यावर अर्जुन म्हणतो.

श्लोकः–

कुणाचाही नाहीं जंव तुजवरी बाण सुटला ।
असा कां रे आगोदर तुजप्रती कंप उठला ॥
उगाची कां धाकें सकल शरिरीं घर्म फुटला ।
कुणाचा तूं बाळा द्विजकुळमणी कोण कुठला ॥ १ ॥

घनाक्षरीः–

बळें कवटाळून चरण । म्हणे आलों मी शरण ।
कृपा ठेवून परिपूर्ण । करा स्मरण पूर्वींचें ॥ १ ॥

पुनः पुन्हां वंदन करून स्वतःचा वृत्तांत सांगूं लागला.

साकीः–

आहे अपुला मी पुत्र म्हणुन घ्या शरणचि आलों, भ्याला ।
परि न म्हणावें, पदरीं घ्यावें करुणामृतलोभ्याला ॥
जन्मलों दुर न धरी । चित्रांगीचें उदरीं ॥ १ ॥

अर्जुन म्हणतो काय ही लबाडी सांगतोस.

ओवीः––

कोण कवणाची चित्रांगी । कवण्या काळीं कवण्या जागीं ॥
भार्या झाली कवण्या प्रसंगीं । स्वप्नीं किंवा जागृती ॥१॥

बभ्रुवाहन सांगतो, महाराज आपण पूर्वीं येथें आला होता, त्याजबद्दल खूण सांगतें.

साकीः—

म्हणाल येथें आलों नव्हतों, जरि या मणिपुर नगरीं ।
तरि अन्यानें कुणि उद्धारिली येथ सरोवरमगरी ।
साक्षी देव मुनी । सत्याचि मुखिं द् त्रमुनी ॥१॥
चित्रांगीसम तुजविण व्याकुळ आहे अहिदुहिता उलुपी ।
विरहमंदिरीं वस्तू पडली जाशि शत कंटक कुलुपी ॥
तिचि तरि सय कांहीं । आहे अथवा नाहीं ॥ २ ॥

पद–( पुरवणी )

पूर्वीं या दाक्षिण सागरि, मणिपुर नगरि,
तुम्ही आले होते । विसरलां स्मरण कां हो तें ॥
जाहले लग्न याजागीं, तुम्हां चित्रांगी,
वधु देहातें । पितयानें समर्पिलें हातें ॥
येथेंचि एक संवत्सर, क्रमिला अवसर,
पुत्रवदनातें । पाहूनि केलें गमनातें ॥
तें होतें मीच लेकरूं । नका तरि करूं, बेपर्वा जी ॥
जन्मेजय म्हणे वाहवाजी ॥ ३ ॥

या ठिकाणीं चित्रांगीशीं लग्न करून वर्षभर आपण राहिलां होतां व मी लहान अर्भक असतां आपण निघून गेलां, त्याचें स्मरण करून मला पदरांत घ्या. अशी परोपरीनें बभ्रुवाहनानें प्रार्थना केली. त्याच प्रमाणें पुन्हां प्रद्युम्न हंसध्वजादि वीरांनींही तसाच सल्ला अर्जुनास दिला.

पद—जोगी–धुमाळी ( माझा कृष्ण देखिला काय— ही चाल )

क्षमा मनीं अवलंबुनि विजया । शांतवि पुत्रातें ॥ धृ० ॥
हा रणपंडित महाबलसिंधु । या गुणरत्नासि नको निंदु ।
टाकुं नको दुर्वाग्विषबिंदु । अमृतपात्रातें ॥ क्षमा मनीं ॥ १ ॥
अथवा अभिमन्युचि म्हण याला । चक्रीं बभ्रुवाहन निमाला ।
आलिंगुनि या यश दे आम्हांला । या सुपवित्राते॥ क्षमा० २॥
हा तरि तुझा वीरवीर्यांकुर । करिल कोपलिया आमुचि कुर ।
तुडविल जैसा रणवारणखूर । मृन्मय चित्रांतें ॥ क्षमा० ॥३॥
सुज्ञानें समजत जाणावें । भाषण आमुचें हें मानावें ।
विष्णुदास म्हणे सन्मानावें । या सत्पात्रांतें ॥ क्षमा० ४ ॥

अशा तऱ्हेनें परोपरीनें सर्वांनीं सांगितलें, तरीही अर्जुनानें कोणाचेंही न ऐकतां बभ्रवाहनाचें मस्तकावर लत्ताप्रहार केला व अतिशय निर्भर्त्सना केली.

( विनाशकाले विपरीत बुद्धि हें सूत्र पुढील विवेचनावरून सत्य दिसत आहे. परंतु ईशइच्छा व सुंदर परमोच्च भक्तियोग, भक्तसंरक्षण, पुत्रधर्म व क्षात्रधर्मपरिपालन वगैरे सर्वांचे कस लागून परमात्मपदीं सर्वस्वाचें समर्पण झालें पाहिजे, या शुद्ध भूमिकेसाठीं पुढील कथा निर्माण झाली आहे हें जरूर ध्यानांत ठेविलें पाहिजे. )

श्लोकः—

धिक्त्वामस्तु सदुर्बुद्धिं क्षत्रधर्मबहिष्कृतम् ।
यो मां युद्धाय संप्राप्तं साम्नैव प्रत्यगृण्हथाः ॥ महाभारते ॥

रे बभ्रुवाहन, तूं पार्थवीर्याचा नसून नर्तकी चित्रांगीचा आहेस, म्हणूनच अति क्लीब, भित्रा आहेस. अर्जुनास एकच विख्यात महाबळी अभिमन्यु हा सुत होता. ज्यानें भीष्म द्रोणादिकांना युद्धांत जर्जर केलें होतें, द्रोणाचार्यांच्या चक्रव्यूहाचा ज्या शूर वीरानें भेद केला, रणांगणांत ज्याच्या समोर उभा राहण्यास कोणीही वीर समर्थ नव्हता, तो परम प्रतापी, शौर्यवान् बलवान् योद्धा पार्थनंदन अभिमन्यु कोणीकडे व तूं भ्याड वेश्यापुत्र कोणीकडे ? चल, येथून दूर हो. अभिमन्यूचा बंधु अगर अर्जुनाचा पुत्र म्हणवून घेऊन माझ्या नांवास काळिमा फासणाऱ्या कारट्या, चालता हो. "हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥" हा क्षत्रियांचा धर्म तुला कळतं नाहीं. त्यापेक्षां भिक्षा मागून उदरपूर्ती करशील हेंच बरें आहे. मूर्खा, तूं केवळ जंबुक दिसतोस. गंधर्वकन्या नर्तकीचें पोटीं तुझा जन्म झाला आहे. "खाण तशी माती" प्रमाणें तूं आतां नटवर हो व नाटकशाळा घेऊन नाचत बैस. रथ व धनुष्य सोडून तंबोरा घेऊन गायला बैस. अगर मृदंग कमरेस बांध व तुझी आई व तूं राजसभेंत नाच करा. तुझें कुळ अपवित्र असल्यामुळें क्षत्रियांचा धर्म तूं काय जाणणार ? प्रथम घोडा धरलास, पण रणाच्या भीतीनें व घरांतील सुंदर कांतेच्या मोहानें ग्रस्त झालास. रणध्वनि ऐकतांच ज्यास भय वाटतें व जो शरण येतो त्याचें कुल क्षत्रियाचें नसून नर्तकांचें आहे. यासाठीं तूं येथून चालता हो. अर्जुन-पुत्राचे मुखांतून असे दुबळे शब्द कधींही निघणार नाहींत. तूं आपलें कृष्ण-वदन दाखवूं नकोस, येथून लौकर काळें कर. अशा बहुत प्रकारें अर्जुनानें त्याची निर्भर्त्सना केली.

**पद चाल**—विनंति करूनि चित्त वळवा.

मुला, जा भीक घरघर मागे । नको मुख दाखवुं सर मागे ॥धृ०॥
ममात्मज म्हणसी वदनानें । तरि कां विलपसि रुदनानें ।
उगा मरशिल रणकदनानें । प्राणधन आपुल्या सदनानें ।
तुला हित सांगतों अनुरागें । नको मुख दाखवुं सर मागे ॥१॥
अर्भकें या घोडा धरिला । निरखितां चमु जिव घाबरला ।
म्हणोनी आर्जव आदरिला । आठवुनि प्रीतिच्या सुंदरिला ।

असो कुशल स्त्री सौभाग्यें । नको मुख दाखवुं सर मागें ॥२॥
सकंपे जाशि भिक्षुकवनिता । मृदुत्वें लाजवि नवनीता ।
ऐकतां भय धरि रणध्वनिता । तयाची धिक् जननी जनिता ।
पूर्वजा कलंक त्यायोगें । नको मुख दाखवुं सर मागे ॥३॥
बाळगुनी नट नाटकशाळा । घाल पैंजण कंकण माळा ।
रेखुनि कुंकुमटिळि भाळा । आनंदें नृत्य करी बाळा ।
विष्णुदास न हें हित सांगे । नको मुख दाखवुं सर मागें ॥४॥

आर्या

मी कोणाचा आत्मज ऐसें पुस येचि काळिं मातेला ।
निज ज्योतीचें कज्जल कालविल्या येचि काळिमा तेला ॥ १ ॥

इतका उपमर्द त्या क्षात्रसिंह छाव्यास कसा सहन होणार ? अर्जुनाचे भाषणानें बभ्रुवाहनाचा क्रोधाग्नि भडकला, त्यांतच त्यानें बापानें दिलेलीं सर्व विशेषणें क्षम्य मानलीं, परंतु तुझें कुल नीच, हलकट असून चित्रांगी वेश्या आहे वगैरे भाषणरूपीं घृतच त्याचे क्रोधाग्नींत ओतलें. मग तें क्षत्रियबीज काय पाहावें ? ताबडतोब सर्वांग क्रोधानें तप्त झालें. जातिवंत निजलेल्या नागराजाचे शेपटावर मुद्दाम पाय देऊन त्यास चेतवावा, मग तो कडकडून दंश केल्याशिवाय रहात नाहीं. त्याप्रमाणें बभ्रुवाहनाच्या शरीरांतून उष्ण रक्त एकदम उसळलें व क्रोधाग्नीच्या जणूं ठिणग्याच पडत आहेत, अशा तऱ्हेनें डोळे लाल झाले व तो म्हणाला, अर्जुना, ज्याअर्थीं मला तूं वेश्यानंदन म्हणतोस त्याअर्थीं आतां मी तुला आपला पराक्रम दाखवितों. आजवर तूं मोठमोठे पराक्रम केले असशील. परंतु त्या वेळीं श्रीकृष्ण परमात्म्याचें तुला साह्य होतें. त्या श्रीजगन्नायकाच्या बळावर तूं विजय मिळवीत होतास. आज आतां तूं बलवान् क्षत्रियवीर व मी वेश्याकुमार ! पाहतों तुझ्या क्षात्रतेजाचा चमत्कार. तुझ्या सर्व वीरांनीं अंतकालीं एकवार भगवन्नाम उच्चारावें व सर्व आशा सोडून माझ्या बाणरूपी मृत्यूचा स्वीकार करावा. नाहीं तर मी त्या सर्वांस परलोकीं पाठवितों. असें बोलून प्रधानास आज्ञा दिली कीं, शामकर्ण नगरास पाठवा व आणलेलें सर्व द्रव्य परत भांडारखान्यांत जमा करा; आणि युद्धाची तयारी करून जमलेल्या राजांसुद्धां सर्वांचा फडशा उडवा. अशी राजाज्ञा होतांच तात्काळ चातुरंग दळ युद्धार्थ सज्ज झालें.

ओवी—सक्रोधें होवोनि परता । म्हणे बभ्रुवाहन पार्था ।
नर्तकीनंदनाच्या पुरुषार्था । येच काळीं पाहसी ॥ १ ॥

मज जननीसी गांडिवपाणी । बोललासी लांच्छित वाणी ।
विषार वृश्चिकाची आणी । मर्मस्थानीं सोसेना ॥ २ ॥
उगेचि अश्रुपात होती । उष्ण शहारे अंगीं उठती ।
सेनेसहित सकल नृपती । कळाहीन जाहाले ॥ ३ ॥

ओव्या. जै. अ.

जैसें प्रळय काळिचें मेघमंडळ । तैसें राहिलें सर्वही दळ ।
ज्यातें देखतां महाकाळ । धाकें सोडित प्राणाते ॥ १ ॥
महाघंट सुबद्ध । ऐसे गज ठाकले एक अर्बुद[1] ।
सप्त कोटि रथांचें वृंद । ध्वज पताकी शोभले ॥ २ ॥
मनपवनाच्या करिती जय । ऐसे दोन अर्बुदें हय ।
पदाति वीर अर्बुदत्रय । उभे ठाकले शस्त्रास्त्रीं ॥ ३ ॥

रत्नखचित रथ छत्र ध्वज पताकामंडित अशा उत्तम रथावर बभ्रुवाहन आरूढ झाला व अर्जुनास युद्धार्थ हांक मारली.

ओवी—अपशकुनाचा तात । ज्याचा स्पर्श मानतात ।
तो गृध्र येऊनि बैसत । ध्वजस्तंभीं पार्थाच्या ॥ १ ॥

अर्जुनाचे रथावर अपशकुनी गृध्रपक्षी येऊन बसतांच सर्वांचें धैर्य विगलित झालें.

श्लोकार्ध—पदातिः पितरं क्रुद्धो योधयामास पांडवं ।

पद ( पुरवणी )

सक्रोधे मणिपुरनायक, अगणित सायक ।
चमूवर सोडी । पांघरवि जशी पासोडी ॥ ॥
अनुशाल्व रणोदरिं शिरे, असंख्यात शिरें ।
चरण कर तोडी, दाखवि अधिक हातोडी ॥ २ ॥
चापाच्या धमकति कोटी, रिचवती कोटी ।
गजरथ घोडी । वीररसासि चढली गोडी ॥ ३ ॥
अनुशाल्व होउनि थंड, गेला मार्तंड ।
सुत गावा जी । जन्मेजय म्हणे वाहवाजी ॥ ४ ॥

बभ्रुवाहनाची हांक ऐकतांच राक्षसनाथ अनुशाल्व चवताळून गेला व त्यानें बभ्रुवाहनावर शंभर बाण सोडले. ते त्यानें सहज तोडले. बभ्रुवाहनानें अनुशाल्वावर कोटी बाण सोडले. परत त्यानेंही तितकेच सोडले. गगनांतून जलधारा

---

1 दहा कोटी

पडतात तसे ते बाण दिसूं लागले, व दोघांच्याही शरीरांतून रक्ताचे पाट वाहूं लागले. सैन्य भराभर घायाळ होऊं लागलें. नंतर बभ्रुवाहनानें अनुशाल्वाचा रथ व सारथी ठार केला. दैत्येशानें हातांत गदा घेऊन बभ्रुवाहनाचा प्राण हरण व्हावा एतदर्थ ती सोडली. तों बभ्रुवाहनानें तीक्ष्ण बाणेकरून गदेचा छेद केला, व अनुशाल्वास धरणीवर लोळविलें. तें भयंकर दृश्य पाहून वृषकेतु वाऱ्यासारखा धांवून आला व बभ्रुवाहनास युद्धासाठीं पाचारण केलें. इतक्यांत श्रीकृष्णपुत्र प्रद्युम्न ऊर्फ मदन पुढें झाला. त्याचें व पार्थकुमाराचें युद्ध सुरू झालें. तडाख्यासरशी प्रद्युम्नास बभ्रुवाहनानें विकळ केलें. पण त्वरित सावध होऊन मदनानें कामबाण शत्रुसैन्यावर सोडले. त्यासरसे गज, अश्व, पशु, मानव रणमद सोडून कामविव्हळ झाले.

**ओवी—कामबाणें व्यापिले वीर। करिती स्त्रीशब्दउच्चार।**
**संग होता वीर्यसागर। तो काम केवि हारपे॥** जै. अ.

मग त्या ठिकाणीं शूरत्व विलयास जाऊन सर्वत्र कामाचें साम्राज्य पसरलें. मग या साम्राज्यांत यक्ष, भूतें, शाकिनी, डाकिनी, वेताळ, योगिनी, झोटिंग वगैरेंना उत्तम मेजवानी होऊं लागली. कोल्हे, लांडगे, गिधाडें हे भुतें वेताळांचें नृत्य पाहून आनंदित होत्साते मेजवानीवर उघडपणें ताव मारूं लागले. तेथें रक्ताची नदी वाहून त्यांत नरमस्तकें वाहूं लागलीं. याप्रमाणें श्रीकृष्णपुत्र व पार्थपुत्राचें घनघोर युद्ध पाहून पार्थपुत्राचें सैन्यानें मनांत धडकी घेतली.

बभ्रुवाहनाचें सैन्य काममोहित झालें होतें. परंतु श्रीशंकरापुढें कामाचें जसें कांहीं चालत नाहीं; भीष्म, हनुमान, कार्तिकस्वामी, शुकदेव यांनीं कामावर जशी मात केली, तद्वत् बभ्रुवाहनानें आपल्या आत्मिक सामर्थ्यबळावर तें कामास्त्र शोषून घेतलें धन्य बभ्रुवाहन! ज्या शूराची कामावर सत्ता चालते, एवढी ज्याची आत्मिक संपत्ती सर्वश्रेष्ठ आहे, त्यास जिंकणें परम कठीण आहे, हेंच पुढें प्रत्ययास आलें.

कामाचें शोषण करतांच सर्व सैन्य खडबडून उठून पुन्हां रणकर्मास उद्युक्त झालें. दोघा पुत्रांचें भयंकर युद्ध सुरू होऊन प्रद्युम्नानें चार वेळ बभ्रुवाहनास आकाशांत भिरकावला. आकाशांतून पडतां पडतां प्रद्युम्नास बभ्रुवाहनानें आकाशांत फेंकलें. शस्त्रास्त्रांत दोघेही प्रवीण होते त्यांनीं सर्व शस्त्रास्त्रांनीं लढून एकमेकांस जर्जर केलें. बभ्रुवाहन क्रोधायमान होऊन शत्रुपक्षाचे रथ, घोडे, हत्ती, पदाति, वीर पटापट मारून पाडूं लागला. अग्नींत ज्याप्रमाणें तृण पडावें त्याप्रमाणें बभ्रुवाहनानें शत्रुसैन्य भाजून काढलें. नंतर अनुशाल्व सावध होऊन पुन्हां रणांगणांत शिरला. त्याबरोबरच नीलध्वज, पुत्रासह यौवनाश्व, हंसध्वज व वृषकेतु हे सर्व वीर खवळले व त्यांनीं पार्थपुत्रास सर्व बाजूंनीं वेढा दिला. बभ्रु-

वाहनानें पांच पांच बाण मारून सर्वांचे अश्व, सारथी यांचा फन्ना उडविला. सर्व वीर भडाभड रक्त ओकून प्राण सोडूं लागले; त्यांना विमानांत घालून देवांगना अति सन्मान देऊं लागल्या. पशु, अश्व, हत्ती हे मरतांच त्यांनाही स्वर्गांतले भोग प्राप्त होऊं लागले. रणभूमीवर मांसशोणिताचा कर्दम झाला. भुतें, यक्ष, वेताळ, कोल्हीं, गिधाडें यांना सुकाळ झाला. त्या ठिकाणचें अद्‌भुत युद्ध फारच भयंकर होतें. " युद्धस्य कथा रम्या " पण प्रत्यक्ष स्थिति लक्ष्यांत घेतल्यास कळिकाळच पेटलेला दिसत होता.

( खालील कटावांत श्रीविष्णु कवीनीं रणांगणांतील युद्धवर्णन फारच बहारीचें केलें आहे. यावरून विषयाशीं तादात्म्य होण्यासारखा त्यांचेजवळ प्रसाद होता हें सहज ध्यानांत येईल. )

( कटाव. )

चातुरंग दळभार खवळला । रणसिंधुमध्यें सिंधु मिसळला ।
क्षोभें धरणीधर खळवळला । कूर्मदृष्टिचा तळ डळमळला ।
जणु मेरुवर मेरु आदळला । निर्वाणीचा अलोट वळला ।
शस्त्रास्त्रांचा घन कोसळला । कीं रुद्राचा जिव मळमळला ।
वळे काळकुट वीष उगळला । रस पाघळला, पतंगवत वरति उडाला।
गजरथ घोडे पडति धडाडा । दुःखें ओकिति रक्त भडाडा ।
वळे दंताच्या पाडिति दरडा । अन्योन्यांच्या दाविति नरडा ।
एकचि उठला आरडाओरडा । वाजति कर्णे ढोल नगारे ।
घुमती शंखांचे भुंकारे । घडिघडि अश्वांचे खिंकारे ।
किंकाटति गज महाकिंकारे । हाकेवरती दीर्घ हकारे ।
श्वासोश्वासाचे हुंकारे । तो प्रति अंबरिं नाद विकारे ।
कठिण टोंचती मार तिराचे । नरवर दिसती रुप मोराचें ।
निघून जाती प्राण धिराचे । गगनीं उडती चेंडु शिराचे ।
क्षणभर घेति न कोणि विसावा । वाटे चित्तीं जय गवसावा ।
मद युद्धाचा चढला सर्वां । सोडुन जिव शरिराची पर्वा ।
उन्मत्त जाहले बहु बेपर्वा । परस्परांच्या झाडिति गर्वा ।
पाहुनिया रणरंगप्रभावा । सुरवर म्हणती वाहवा वाहवा !
जे अनुसरले निजधर्माला । मागें न हटले रणकर्माला ।
सुरांगना त्या नरोत्तमाला । अदरें वरोनि घालिति माळा ।
भूतें यक्षगण भक्षिति त्याला । घोर भयंकर कलह माजला ।

रक्तनदीला महापुर आला । नरमांसाचा चिखल झाला ।
विष्णुदास म्हणे किति वर्णावे । नररत्नांच्या माजि गणावे ।
अति सप्रेमें ध्यानिं अणावें । ते पुण्यश्लोक म्हणावे ॥ १ ॥

ओंवी.

यौवनाश्व सात्यकी निळध्वज । वीर प्रद्युम्न कृष्णात्मज ।
हंसध्वजादि अनेक भूभुज । तेजःपुंज निमाले ॥

प्रद्युम्नादि सर्व वीर गतप्राण होऊन पडले व सर्व सेनासागर आटून शुष्क झाला असें पाहून बभ्रुवाहनानें मोठ्यानें गर्जना करून हांक फोडली. आतां रणांगणांत पार्थ व वृषकेतु या दोघांशिवाय कोणीच राहिलें नाहीं.

उलूपी व चित्रांगदेनें घायाळ झालेल्या वीरांना नगरांत नेऊन औषधोपचार सुरू केले. अशी अनिवार स्थिति पाहून नरवीर अर्जुनानें वृषकेतूस कवटाळून सांगितलें. बाळा, यानें आपले सर्व वीर हतबल करून नगरांत पाठविले. कृष्ण-पुत्र, हंसध्वज, नीलध्वज, अनुशाल्वादि वीर कोठें आहेत? सुवेग माझे समक्ष घायाळ झाला आहे, व सर्व दळभार नामशेष झाला. तरी आतां तूं परत हस्तिना-पुरास जाऊन धर्मदर्शन घे व श्रीकृष्णास सर्व वर्तमान निवेदन कर. बाळ! आमचे कुळांत तूं एकच पुत्र कर्णप्रसूत आहेस, म्हणून वंशरक्षणासाठीं तरी तूं परत जा. पार्थ इतकें बोलत आहे तों गृध्र व कपोत पक्षी रथावर बसले, व मस्तकावांचून छाया दिसूं लागली. अशीं बरींच दुश्चिन्हें झाल्यावर भीतांतःकर-णानें अर्जुन म्हणतो—बा सुकुमारा, हें अपशकुन आपलें मरणच सुचवीत आहेत. आपण दोघेही येथें मृत्यु पावल्यास कुंती, धर्म, भीमसेन दुःखावेगानें प्राण ठेव-णार नाहींत. त्यांचे मागें नकुल, सहदेव प्राण सोडतील. आतां अश्वमेध यज्ञ, अवभृतस्नान सर्व समाप्त झालें. देवक्यादि माता, रुक्मिण्यादिक कृष्णकांता, अरुंधत्यादि ऋषिवनिता भग्नमनोरथ झाल्या. मी आजवर श्रीकृष्णसहाय्यानें मोठमोठे पराक्रम केले होते. शंकरास युद्धप्रसंगीं आनंदविलें, निवातकवच राक्षसास नाहींसें केलें, भीष्मद्रोणादि शूर योद्धयांस रणदेवतेस बळी दिले; पण आज माझ्या पराक्रमगिरीस हा बभ्रुवाहन वज्रप्राय होऊन माझा पराक्रमगिरि फुटला आहे. तरी जिवलग सखया, मी एकदां तुला डोळे भरून पाहतों व तुला एकवार कडकडून भेटतों. तूं आतां परत जा. असें म्हणून दुःखाश्रूंनीं अर्जुनाचे नेत्र भरून आले व छाती धडधड करूं लागली. पुन्हां म्हणतो-बाळ, या पार्थाची आशा सोड, आतां माझा तिकडे सर्वांस निरोप सांग कीं, तुमचा कलिजा आज तुम्हांपासून दूर झाला. आतां यापुढें तुमचें आमचें दर्शन पर-लोकींच होईल.माझी वृद्ध व दुःखानें गांजलेली माता कुंती इला माझे अनन्य नम-स्कार सांग व तुझ्या कृपेनें आजवर विजयी होतों,आतां माझें स्मरण न करतां नकुल-

सहदेवाकडे चित्त देऊन श्रीहरिस्मरणांत आपलें सार्थक कर. माझेकडून तुला किंचित्मात्र सुख प्राप्त झालें नाहीं, याजबद्दल क्षमा कर व मजसाठीं शोक करूं नको. असाच निरोप धर्मराज, भीमसेन, नकुल सहदेवास सांग. माझी प्रिय पत्नी महासती द्रौपदी इला काय सांगावें हेंच मजला सुचत नाहीं. सती द्रौपदीचे मजवर फार उपकार झाले आहेत, त्या मानानें मला तिचे उतराई होतां आलें नाहीं, याजबद्दल क्षमा कर, असा त्या कुलदेवीस निरोप सांग. सुभद्रेसही परीक्षिताकडे चित्त ठेवून असण्याबद्दल सांग. शेवटीं एकच सांगतों, माझा मनमोहन हृदयविहारी, माझ्या जिवाचा जीव, माझा आत्मा, मत्प्राण, मत्सखा, माझा श्रीगुरुनाथ श्रीगोपालकृष्ण परमात्मा यास माझे अनंत प्रणाम सांग. त्या गुरुमाउलीचे मजवर अनंत उपकार आहेत. आजवर फक्त तिचे कृपेवर तरलों होतों, आतां मज दीनास श्रीकृष्णमाउलीनें दूर धरलें आहे, पण शेवटीं वासना धरून पुन्हा त्याच श्रीकृष्णमाउलीचा जन्मांतरीं दास होऊन येईन. माउलीस माझा विसर पडला काय? आतां मी अंतकाळीं कृष्णमाउलीवांचून कुणाचें मुख पाहून प्राण सोडूं? धिक्कार असो मला! शेवटचे वेळीं माझा जिवलग जवळ नसावाना? इतकें बोलून कृष्ण–वियोगाचें भरतें येऊन अर्जुनाच्या तोंडांतून एकही शब्द फुटेना. कृष्ण–वियोगानें तो अत्यंत व्याकुळ झाला, व कृष्णदर्शन अंतरलें म्हणून दीन होऊन दुःखग्रस्त झाला. श्रीकृष्णस्मरण अति दृढ होत गेलें. श्रीकृष्णप्रेमातिशयानें अर्जुन बेहोष झाला व सर्व वृत्ति कृष्णमय झाल्या. अर्जुनाचें अर्जुनत्व श्रीकृष्णस्वरूपांत लीन झालें व " अंतर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थितः " याप्रमाणें अर्जुनाचें सर्वांग रोमरोम सुद्धां श्रीकृष्णप्रेमानें उचंबळलें, व पार्थाच्या मुखांतून फक्त श्रीकृष्ण श्रीकृष्ण हा ध्वनि निघूं लागला व सर्वांगावर सात्त्विक भावाचें भरतें आलेलें दिसत होतें.

( या ठिकाणीं अर्जुन गीता ऐकूनही मोहग्रस्त होत आहे, हा बोध कसा पटला आहे अशी शंका येईल व ती व्यतिरेकदृष्टीनें खरीशी वाटेल. परंतु परमोच्च भक्तियोगांत सेव्याचे वियोगाबद्दल अष्टसात्विकभाव उत्पन्न न होणें, त्यास अश्रुपात न होणें म्हणजे प्रेमलक्षणा भक्तिच नव्हे. भगवत्प्रेमातिशयानें भरलेल्या पुरुषास अत्यंत प्रेमाचा जिव्हाळा याच तऱ्हेनें असणार. गोपीचें उदाहरण पहा- " यथा व्रज गोपिकानां " हें नारदसूत्र आहे.

कबीर महाराज म्हणतात:—कबीर कबीर क्या कहे जा जमुनाके तीर ।
एक गोपीके प्रेम में बह गये कोटि कबीर ॥

( अपूर्ण )

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पी. नें ०१२.

२. **संतचरित्रमाला**:—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्र**:—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रें**:—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. ( आवृत्ति ४ थी )

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

८. **निरंजनमाधवांची कविता**:—भाग २ व ३ किं. १॥ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्र**:—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १०८.

१०. **भक्तिमणिमाला**:—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

मुमुक्षु REG. No. B. 662


## पांगारकरांचीं पुस्तकें

११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी के० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. कि. ०५.

१२-१३. मुमुक्षूंतील निवडक निबंध ( भाग १-२ ):-कि. प्रत्येकीं रु. १०८

१४. मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट ... एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. कि. रु. १०१२.

१५. पारिजातकाचीं ... ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थ ... विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. कि ...

१६. श्रीतुकारामचरित्र:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह कि. रु. २.

१७. श्रीतुकारामचरितामृत --तुकोबांचे प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. कि. ०५.

१८. निबंधमालेचें रहस्य आणि कार्य:- निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख--विष्णुशास्त्र्यांचें चरित्रासह कि. ०१०.

१९. मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ): --श्रीएकनाथमहाराजांचे नातू प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे प्रख्यात आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशेष गुण उदाहरणांनी ... करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ ... आहे. कि. रु. १.

२०. मारुतिउपासना ( ... आवृत्ति ): --कि. ०४.

२१ सार्थ श्रीदासबोध:--कि. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

२२. सार्थ मनोबोध-- ... श्लोकांचे संपूर्ण विवरण. कि. ०१२.

२३. समर्थसंजीवनी उर्फ समर्थांचीं वेंचें:--यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० कि. रु. २.


२४. मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):--कि. रु. २०४.

२५. श्रीएकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):—कि. रु. ६

पत्ता:--व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)

| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २२ वें | भाद्रपद १८५० | नवें वर्ष ८ वें |
| मास १ | आक्टोबर १९२८ | अंक १० वा |


संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.

वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही.पी. नें रु. ३॰२

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ. |
| --- | --- |
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १ |
| २ गीता व ज्ञानेश्वरी ... ... ... ... | २–८ |
| ३ सामराज कवीचा काळ ... ... ... ... | ९–१० |
| ४ भागवत धर्ममीमांसा ... ... ... ... | ११–१७ |
| ५ बभ्रुवाहनाख्यान ( अपूर्ण ) ... ... ... ... | १८–४० |

---


## निरंजनमाधवाची कविता

**भाग १ ला किं. १ रु.**        **भाग २–३ किं. १॥ रु.**

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्याच्या काविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गाथि-लेलें ग्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुटकाव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेंत सांगणारीं अशीं घातलीं आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जे " सुभद्रा–चंपू " नांवाचें या कवीनें केलें आहे. तें छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमींचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही भाग एकत्र बांधविले आहेत.



ॐ नमो सद्गुरु वैकुंठनाथा । स्वानंदवैकुंठीं सदा वसता ।
तुझें ऐश्वर्य स्वभावता । न कळे अनंता अन्यथा ॥ १ ॥
तुझ्या निजबोधाचा गरुड । कर जोडूनिया उभा दृढ ।
त्याच्या पाखांचा झडाड । उन्मळी सुदृढ भववृक्षा ॥ २ ॥
कैसा पांचजन्य अगाध । निःशब्दीं उठवी महाशब्द ।
वेदानुवादें गर्जे शुद्ध । तोचि प्रसिद्ध शंख तुझा ॥ ३ ॥
तुझें स्वानुभवैक चक्र । लखलखित तेजाकार ।
द्वैतदळणीं सतेज धार । अति दुर्धर महामारी ॥ ४ ॥
अति मनोहर केवळ । देखतां उपजती सुखकल्लोळ ।
परमानंदामोद बहळ । ते लीलाकमळ झेलिसी ॥ ५ ॥
जीव शीव समसमानी । जय विजय नांवें देउनी ।
तेचि द्वारपाळ दोनी । आज्ञापूनि स्थापिले ॥ ६ ॥
तुझी निजशक्ति साजिरी । रमारूपें अतिसुंदरी ।
अखंड चरणसेवा करी । अत्यादरीं सादर ॥ ७ ॥
तुझे लोकींचे निवासी जाण । अवघे तुजचिसमान ।
तेथें नाहीं मानापमान । देहाभिमान असेना ॥ ८ ॥
तेथ काळाचा रिगमू नाहीं । कर्माचें न चले कांहीं ।
जन्ममरणांचें भय नाहीं । ऐसिया ठायीं तूं स्वामी ॥ ९ ॥

साम्यतेचें सिंहासन । ऐक्यतेची गादी जाण ।
त्यावरी तुझें सहजासन । परिपूर्ण स्वभावें ॥ १० ॥
तन्मयतेचें निजछत्र । संतोषाचें आतपत्र ।
ज्ञानविज्ञानयुग्म चामर । सहजें निरंतर ढळताती ॥ ११ ॥
चारी वेद तुझे भाट । कीर्ती वर्णिती उद्भट ।
अठरा मागध अतिश्रेष्ठ । वर्णिती चोखट वंशावळी ॥ १२ ॥
तेथ साही जाणां वेवाद । नानाकुसरीं बोलती शब्द ।
युक्तिप्रयुक्तीं देती बोध । दाविती विनोद जाणिवा ॥ १३ ॥
ऐसा सद्‌गुरु महाविष्णु । जो चिद्रूपें सम सहिष्णू ।
जो भ्राजमानें भ्राजिष्णू । जनीं जनार्दनू तो एक ॥ १४ ॥
जनीं जनार्दनूचि एकला । तेथ एकपणें एका मीनला ।
तेणें एकपणाचा ग्रास केला । ऐसा झाला महाबोधू ॥ १५ ॥
(एक० भा० अ० २१)

---

## कविवर्य मुक्तेश्वर ( चरित्र विवेचन. )

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातु मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत. मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः—सुंदर आख्यानें, भक्तिरस वीररस, शृंगाररस इ० कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचरित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें त्यांच्या वेळची पाकसिध्दी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकास या ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. 'मुक्तेश्वरनीतिरत्नमाला' ही शेवटीं जोडली आहे. पृ. सं. १४४. किं. रु. १.

# गीता व ज्ञानेश्वरी.

## गीतेंतील विषय.

१ ' ज्ञानेश्वरांची प्रभावळ ' ह्या ग्रंथांत ज्ञानेश्वरमहाराजांचे गीताशास्त्र विषयक विचार सर्व एकत्र संकलित केले आहेत. त्याच विचारांचा स्पष्टार्थ आजच्या ह्या लेखांत सांगावयाचा आहे.

२ गीतेच्या अठरा अध्यायांत कोणकोणते विषय आलेले सांगितले आहेत तें पाहून पुढें जाऊं:--

( १ ) अर्जुनाचा विषाद, शास्त्रप्रवृत्तिप्रस्ताव. ह्म० गीताशास्त्राची प्रवृत्ति कां झाली याची प्रस्तावना उर्फ ओळख करविणारा.

( २ ) ह्यांत योग ह्म० कर्मयोग विशद सांगितला आहे व त्याचा सांख्य-योगाशीं भेदही दाखविला आहे. ह्यांत सांख्यसद्भाव (ज्ञानमार्ग) प्रकाशिला आहे. गीताशास्त्र हें ' ज्ञानप्रधान असून मोक्षदानीं स्वतंत्र ' आहे हें यांत सूत्ररूपानें सांगितलें आहे.

( ३ ) अज्ञानानें बांधलेला ह्म० बद्ध जीव त्याला मोक्षपदीं नेणारा ' साधनारंभ ' यांत सांगितला आहे. देहाभिमानी जीवानें काम्यनिषिद्धकर्में सोडून केवळ विहित ह्म० नित्यनैमित्तिक कर्में अप्रमादें (न चुकतां, यथाशास्त्र) व सद्भावानें करावीं असा निर्णय येथें केला असल्यामुळें येथें **कर्मकांड** प्रतिष्ठिलें आहे.

( ४ ) तिसऱ्यांत ' केवळ कर्म प्रतिष्ठिलें ' आहे तें चवथ्यांत ' ज्ञानेसीं ' ह्म० ज्ञानासह प्रगटिलें आहे. देहाभिमान्याला नित्यादिक कर्म आवश्यक म्हणून सांगितलें व तें आचरितांना मोचक म्हणजे सोडविणारें कसें होईल अशी अपेक्षा झाली ह्म० जीव बद्ध होता तो मुमुक्षु झाला; त्यानें ' ब्रह्मार्पणत्वें क्रिया ' करावी-अर्थात् कायावाचामनानें विहित कर्म ' एक ईश्वरोद्देशें ' करावें असें ह्या चौथ्या अध्यायांत सांगितलें आहे.

चौथ्या अध्यायाच्या शेवटीं शेवटीं कर्म ईश्वरार्पण करावें हें सांगतांना उपासनेचा विषय आणला आहे, तो विश्वरूपदर्शनाचा ११ वा अध्याय संपेतों म्हणजे संपूर्ण आठ अध्याय सर्व प्रतिबंध किंवा पडदे दूर करून देवताकांड सांगितलें

आहे. ही अष्टाध्यायी ( ४ थ्या पासून ११ व्यां पर्यंत दोन्ही धरून ) **उपासनाकांडात्मक** आहे.

( ५ ) 'पंचमीं गव्हरिलें योगतत्व', ह्म० पांचव्यांत योगतत्व गूढार्थानें सांगितलें आहे.

( ६ ) साहवा अध्याय अभ्यासयोगाचा आहे. यांत आसनापासून आरंभ करून जीवब्रह्मैक्यापर्यंतची योग स्थिति सांगितली असून योगभ्रष्टाला कोणती गति मिळते तेंही वर्णिलें आहे.

( ७ ) सातव्यांत आरंभीं कार्यकारणरूप प्रकृतीचें रूप सांगून चतुर्विध भक्तांची स्थिति दाखविली आहे.

( ८ ) सातव्याच्या शेवटीं उल्लेखिलेल्या सप्त प्रश्नांचीं ( ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ व प्रयाणकालीन गति ) उत्तरें आठव्यांत दिलीं असून प्रयाणसमयशुद्धीचें विशेष विवरण केलें आहे.

( ९ ) हा राजविद्या राजगुह्याचा अध्याय तर गीतेचें हृदयच आहे. साऱ्या भारतांत जशी गीता तसा साऱ्या सप्तशत गीतेंतला नवमाध्याय हा सर्वस्व आहे. भगवंताचें सारें हृद्गत या अध्यायांत प्रगट झालें आहे.

( १०–११ ) हे अध्याय देवताकांडांतले असून विभूतिविस्तार व विश्वरूप दर्शन हे यांतील विषय आहेत.

( १२–१५ ) उपासनाकांड बाराव्या अध्यायाच्या १२ श्लोकांअखेर संपलें, तेथून ज्ञानकांडास आरंभ झाला. १२ व्या पासून १५ व्या पर्यंतचे चार अध्याय ज्ञानकांडाचे आहेत. गुरुसंप्रदायानें जाणाऱ्या भक्तावर ईशप्रसाद झाला म्हणजे कोंवळें ज्ञान उद्भूत होतें. 'अद्वेष्टा सर्वभूतानां' इ० बाराव्यांतल्या श्लोकापासून किंवा 'अमानित्वमदंभित्वं' इ० तेराव्यांतल्या श्लोकापासून ज्ञानलक्षणें सांगितलीं आहेत. ह्याच ज्ञानाचा परिपाक होत होत पंधराव्यांत पुरुषोत्तमयोग सांगितला. तेथपर्यंतच्या चार अध्यायांत **ज्ञानकांड** आहे.

( १६ ) मोक्षसाधन असें जें ज्ञान त्या ज्ञानाला प्रतिबंधक जो अज्ञानवर्ग ( आसुरी संपत्ती ) त्याचें ( दैवी संपत्तीसह ) वर्णन सोळाव्या अध्यायांत केलें आहे.

( १७ ) अज्ञानलक्षणें टाकून ज्ञानलक्षणें घेतांना शास्त्राचा सोबती बरोबर घ्यावा हें सतराव्यांत मुख्यत्वें सांगितलें आहे.

( १८ ) अठरावा अध्याय हा कलशाध्याय. सतराही अध्यायांतील मुख्य मुख्य सिद्धांतांचें एकीकरण यांत केलें आहे.

३ वेदांत कर्म, उपासना, ज्ञान हीं तीन कांडें आहेत. तींच गीतेंत सांगितलीं असल्यामुळें गीता 'श्रुतीच हे कोंडिसवाणी' ह्म० लहानशी किंवा

गोजिरवाणी श्रुतीच आहे. त्रिकांडात्मक श्रुतीचें किंवा गीतेचें मोक्ष हेंच फळ आहे. ' येथ अविद्यानाश हें स्थळ । तेणें मोक्षोपादन फळ ।
या दोहीं केवळ । साधन ज्ञान ' ( अ० १८–१२४३ )
कर्म, ज्ञान, उपासना साध्य होण्यासाठीं कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग असा ज्ञानेश्वरमहाराजांनीं चढता क्रम सांगितला आहे ( पृ० ३३ ):—

**स्वकर्मांच्या चोखोळीं । मज पूजा करुनि भली ॥**
**तेणें प्रसादें आकळी । ज्ञाननिष्ठेतें ॥ १२४७ ॥**
**ते निष्ठा जेथ हातवसे । तेथ भक्ति माझी उल्लासे ॥**
**तियां मजसी समरसे । सुखिया होय ॥ १२४८ ॥** [ अ० १८ ]

स्वकर्मांच्या सुमनांनीं माझी पूजा करून माझ्या प्रसादानें ज्ञाननिष्ठेचा अधिकार प्राप्त होतो व ज्ञाननिष्ठा हस्तगत झाली कीं माझ्या भक्तीचा महानंद होऊन तो माझ्याशीं समरसतेचें सुख भोगतो. हा क्रम ध्यानांत धरून हे तीन योग यापुढें मीं याच क्रमानें घेतले आहेत. हे अत्यंत महत्वाचे असल्यामुळें यांत येणाऱ्या प्रकरणांचा समग्र गोषवारा प्रस्तावनेच्या पुढें जोडला आहे. कर्मयोग, ज्ञानयोग व शेवटीं भक्तियोग असा क्रम धरण्याचें कारण वर सांगितलेंच आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीं हा क्रम ज्या कारणानें सांगितला तें कारण त्यावरील प्रकरणें किंवा गोषवारा वाचल्यावर वाचकांचे लक्ष्यांत येईल.

४. **अठरावा अध्याय हा गीतेचा कळस आहे** असें म्हटल्याबरोबर सर्व गीताग्रंथावर **प्रासादाची कल्पना** उभी राहते. लोकांत अशी समजूत आहे कीं दुरून कळस दिसला कीं मंदिरांतील देवाचें दर्शन झालें. तसाच प्रकार येथेंही आहे. अठरावा अध्याय पाहिल्यानें सर्व गीताशास्त्र पाहिल्यासारखें होतें. याच दृष्टीनें व्यासांनीं गीतारूप मंदिरावर अठरावा अध्याय हा कळस चढविला असें मी म्हणतों. गीतारत्नप्रासादाचा अठरावा अध्याय हा अर्थरूप चिंतामणीचा बनविलेला कळस आहे, गीतादर्शन करवून देणारा हा मार्गदर्शक वाटाड्याच आहे. व्यास हे बडे सूत्रकार म्हणजे कारागीर होते. त्यांनीं वेदरत्नपर्वताच्या उपनिषद्रूप पठारावर खणायला प्रारंभ केला. धर्मार्थकामरूप त्रिविधपुरुषार्थाचा जो असार चाराचुरा निघाला त्यानेंच गीतामंदिराभोंवतीं महाभारतरूप कोट बांधिला. वर सांगितलेल्या खाणींत आत्मज्ञानरूपी जीवात्मैक्याचा अखंड घनवट एक दगड निघाला, तो चांगला स्वच्छ करून त्याचा कृष्णार्जुनसंवादरूप चिरा त्यांनीं तयार केला. निवृत्तिरूपी ओळंबा लावून व सर्व शास्त्रतात्पर्यांची भर घालून व्यासांनीं त्या चिऱ्याच्या मांडणीला मोक्षरूपाचा आकार आणला. अशा तऱ्हेनें जमीन शुद्ध करण्यापासून तों पंधराव्या अध्यायाच्या अखेरपर्यंत त्यांनीं गीताप्रासादाची उभारणी

केली. सोळावा अध्याय हा गळ्यावरील डेऱ्याचा आकार तयार झाला. सतरावा अध्याय हा कळसाच्या बैठकीचा ओटा होय. त्यावर अठरावा अध्याय हा सहजच कळसासारखा शोभूं लागला, व सर्वांवर व्यासांचा कीर्तिध्वज फडकूं लागला. कळसाच्या योगानें मंदिराचें काम अपुरें न राहतां पूर्ण झालें.

५ आतां **गीतेचें परमरहस्य** काय आहे तें पाहूं. गीता हें सर्व वाङ्मयाचें मंथन करून काढलेलें सारसर्वस्व होय गीता आत्मरत्नाचा लाभ करून देते. गीताशास्त्राची भलाई ही आहे कीं तें सर्व मोक्षोपायपर आहे. इतर शास्त्रांचे उपाय असे अनुभवसिद्ध नाहींत. वारा सूर्याच्या आड आलेले ढग दूर करितो, सूर्य उत्पन्न करीत नाहीं; हात पाण्यावरचें शेवाळ पलीकडे सारतो पण पाणी निर्मीत नाहीं; त्याप्रमाणें शास्त्र आत्मदर्शनाला प्रतिबंधक असा अविद्यामल दूर करितें, मी स्वप्रकाशक स्वयंसिद्धच आहे. म्हणून सर्व शास्त्रें अविद्यानिवारक आहेत, तीं आत्मस्वरूपाचा बोध करून देण्यास स्वतंत्र नाहींत. त्या तत्वज्ञानाच्या शास्त्रांना जेव्हां त्यांच्या सत्यत्वाची पृच्छा होते तेव्हां तीं जेथें येतात तें गीताशास्त्र होय. अविद्यानिरास हा या शास्त्राचा विषय, मोक्षप्राप्ति हें याचें फळ व या दोहोंस साधन आत्मज्ञान. आतां अर्जुना, कर्मयोगी विहित मार्गानें मी होऊन माझ्या स्वरूपीं कसा मिळतो तें सांगतों. स्वकर्मसुमनांनीं माझी चांगली पूजा करून माझ्या प्रसादानें ज्ञाननिष्ठा प्राप्त करून घेतो. ज्ञानमार्ग आकळला म्हणजे माझी शुद्ध भक्ति प्रगट होते आणि त्या भक्तीच्या योगानें तो माझ्या स्वरूपीं समरस होऊन सुखी होतो. कायावाचामनानें माझा आश्रय करून जो मत्स्वरूप होतो त्याच्या हातून कदाचित् निषिद्ध कर्म जरी घडलें तरी तें त्याला बंधक होत नाहीं. शुभाशुभ किंवा पापपुण्य हें जो एकमेवाद्वितीय जो मी तो अनुभूत झाला नाहीं तोंवरच आहे. माझी भेट (साक्षात्कार) झाल्यावर त्याचीं सर्व कर्में (व.र्मफलें) नाहींशीं होऊन तो सायुज्यपदारूढ होतो. देशकालस्वभावें ज्याचा नाश संभवत नाहीं त्या अविनाशपदाला तो प्राप्त होतो. चंद्रकला दिवसेंदिवस वाढत जाऊन पौर्णिमेस जशी संपूर्ण चंद्राला व्यापते पण चंद्रावर वेगवेगळे थर दिसत नाहींत, त्याप्रमाणें चार चरण मिळून श्लोक व अनेक श्लोक मिळून अध्याय व असे अनेक अध्याय मिळून गीता असें दिसलें तरी प्रमेयें अनेक नाहींत—गीतेचें प्रमेय एकच आहे. रत्नमणि अनेक असले तरी आंतील आधारभूत दोरी एकच असते. फुलें व फुलांच्या हारांचे सर मोजतां येतात; पण त्यांचा परिमळ मोजायला कांहीं दुसरें बोट लागत नाहीं, त्याप्रमाणें श्लोक व अध्याय वेगवेगळे असले तरी सर्वांतील सिद्धांत एकच आहे. सातशें श्लोक व अठरा अध्याय मिळून ' देव बोलिजे एक। जे दुजें नाहीं।' हा० परब्रह्म एकी-

एक आहे, तद्व्यतिरिक्त दुसरें कांहीं नाहीं हेंच भगवंताच्या बोलण्याचें तात्पर्य आहे.

६. वेदाचें मूळ सूत्र व सर्वांना उदारपणानें अधिकारदान केल्यामुळें अतिपवित्र असें हें गीताशास्त्र साक्षात् श्रीकृष्णानें जगाला दिलें आहे. ज्याच्या निश्वासाबरोबर वेदराशि प्रगट झाले त्याच प्रभूनें स्वमुखानें गीता सांगितली आहे, म्हणून वेदाचें मूळ गीता असें आम्हीं म्हणतों. याला आणखीही एक कारण देतां येतें. जें स्वरूपानें नाश पावत नाहीं व ज्याचा विस्तार त्या स्वरूपींच लय पावतो तें त्याचें बीज होय. या न्यायानें वृक्ष जसा बीजांत तसा त्रिकांड वेद गीतेंत आढळतो. म्हणून वेदाचें बीज गीता आहे असें मला वाटतें व हें उघडही आहे.

७. वेद मूळचाच समर्थ खरा पण त्रिवर्णांनींच ऐकावा असा त्याचा निर्बंध असल्यामुळें त्यावर कृपणपणाचा आक्षेप येतो. बाकी स्त्रीशूद्रादिक संसारव्यथेनें पीडलेले असले तरी त्यांना वेदानें लांब ठेवलें आहे. आतां मला वाटतें कीं आपला कृपणपणाचा दोष काढून टाकण्यासाठीं व वाटेल त्यानें येऊन उद्धरून जावें यासाठीं वेदानेंच गीतेचें रूप घेतलें आहे. मागील अपवादाला भिऊन वेद गीतेच्या पोटांत शिरला व आतां चांगली कीर्ति पावला आहे. ह्मणून वेदाची सुसेव्यता म्हणजेच गीता. वेद आणि गीता हे अभिन्नपणें नांदत आहेत. वत्साच्या प्रेमानें गाय पान्हावते व घरादाराला भरपूर दुभतें मिळतें. त्याप्रमाणें अर्जुनाच्या निमित्तानें गीतामृत मिळून जगाचा उद्धार झाला आहे. चातकाच्या प्रेमामुळें मेघ पाणी घेऊन धांवतो, पण त्यामुळें चातकाची तृषा हरून जगही तप्त होतें, त्याप्रमाणें अर्जुनाचें मिष करून भगवंतानें जगाचें संसाराचें ओझें उतरलें आहे.

८. अर्जुनास देवांनीं विचारलें ‘ पांडवा ! आह्मीं सांगितलेला शास्त्रसिद्धांत तुला पटला का ? स्वरूपाच्या अज्ञानामुळें उद्भवलेला तुझा मोह गेला का ? ’ अर्जुनानें **पावती** दिली ‘ मोह गेला कीं नाहीं हें आतां काय विचारतोस ? देवा ! अर्जुनपणें गुंतलों होतों तो तुझेंपणें मुक्त झालों, आतां पुसणें--सांगणें संपलें. तुझ्या प्रसादानें आत्मबोध झाला व तेणेंकरून मोहाचें बीजच नष्ट झालें. आत्मलाभ झाल्यामुळें कर्तव्याकर्तव्य गेलें, आतां तुझ्या आज्ञेवांचून कांहीं प्रमाण नाहीं. आतां तूं ब्रह्मत्व देणारा सद्गुरु व मी तुझा आज्ञा उठावणारा सेवक. तुझ्या माझ्यांत भेदाचा पडदा होता तो फाटून गेला व गोड सेवासुख तेवढेंच राहिलें. आतां देवाधिदेवा ! तूं म्हणशील तें करीन. ’

९. गीता हे **प्रभूची वाङ्मयीमूर्ति** आहे. सप्तशती मंत्रांत वर्णिलेली ही भगवती मोहमहिषाचा नाश करणारी आहे. कायावाचामनानें जो ह्या देवीचा

सेवक होईल तो स्वानंदसाम्राज्य भोगील. इतर शास्त्रें वाच्यार्थ देऊन आपण नाहींशीं होतात, तशी ही गीता नव्हे—ही प्रभूची साक्षात् वाङ्मयी मूर्तिच आहे.

१०. **गीतेचा संप्रदाय** गीतेनेंच सांगितला आहे. धष्टपुष्ट गाय दूध देते पण दूध काढण्याची हातोटी साधली पाहिजे. तसें सद्गुरुमुखानें ज्ञान झालें तरी तें संप्रदायाचें अनुष्ठान केल्यानेंच पचत असतें. हें गीताशास्त्र तपोहीन, गुरुभक्तिहीन, श्रवणाविषयीं अनुत्सुक व भगवंताविषयीं व भक्ताविषयीं अनादरयुक्त असेल त्यास सांगूं नये. तर तपी, गुरुभक्त, श्रवणोत्सुक व अनिंदक अशा भक्तांसच सांगावें. भक्तभाविकांच्या मेळ्यांत जो गीताशास्त्र सांगेल तो भगवान् सांगतात—मला अत्यंत प्रिय होईल. गीतामाउलीच्या ठिकाणीं तान्हें पारठें हा भेद नाहीं. ती जाणत्यानेणत्यास, अर्थज्ञास व पाठकास सारखेंच मोक्षरूप फळ देते. ज्याच्या कर्णद्वारीं गीतामृत पडतें त्याची सृष्टीच्या आरंभापासूनचीं सर्व पातकें नष्ट होऊन तो महानंदांत समरस होऊन राहतो.

---


सुधारून वाढविलेली ) **मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति

कविवर्य मोरोपंत यांच्या पाऊण लाख कवितेंतून वेगवेगळ्या विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे मोठ्या प्रयासानें यांत संग्रहीत केले आहेत. १ ईश्वरभक्तिपर. २ कवि आणि कविता. ३ उपदेशपर. ४ वर्णनपर. ५ कथानकपर. ६ चक्रीरामायण व ७ विविधविषयपर—अशीं या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं असून त्यांत पंतांच्या कवितेंतील बहुतेक उत्कृष्ट भाग आला आहे. ग्रंथाला भरपूर टीपा व कथासंदर्भ दिले असून पंतांच्या अजून अप्रसिद्ध अशा कांहीं कविता यांत दिल्या आहेत, व कोठें पंतांच्या हातच्या टीपाही दिल्या आहेत. प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत प्रस्तावना दिली असून तींत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे उत्तम गुण, काव्याची महति व पंतांची महाकवींत गणना होण्याचीं कारणें यांचें साहित्यशास्त्रदृष्ट्या विवरण केलें आहे व **ह्या दुसऱ्या आवृत्तींत पंतांचें त्रोटक चरित्र नवीनच जोडलें आहे.**

श्री.

# सामराज कवीचा काल.

ले. प्रल्हाद धोंडो कानिटकर बी. ए. एल्. एल्. बी. भोर.

## लेखांक १.

१. कोणत्याही कवीच्या काव्यांत कविकालीन समाजस्थिति, व नित्य व्यवहारांत लागणाऱ्या नानाप्रकारच्या वस्तूंचीं वर्णनें, तसेंच तत्कालीन रूढ असलेले विशिष्ट शब्द वगैरे गोष्टी यदृच्छेनें ग्रथित केलेल्या असतात. या सर्व गोष्टींचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केल्यास कवीचा काल ठरवितां येतो असें तज्ज्ञांचें मत आहे. या दृष्टीनें सामराज कवीचा काल ठरविण्यास उपलब्ध असलेलीं साधनें तज्ज्ञांपुढें सादर करावीं या हेतूनें हा लेख लिहिला आहे.

२. सामराज कवीचें "रुक्मिणीहरण" काव्य अलीकडे अज्ञातवासांतून मुक्त झालें आहे. सामराजाचा काल निश्चित ठरलेला नाहीं; तथापि रुक्मिणीहरण-काव्यांत रुक्मीनें रुक्मिणीच्या लग्नाची जी तयारी केली तिचें वर्णन तिसऱ्या सर्गांत दिलें असून, त्यांत फळांसंबंधीं वर्णन दोन श्लोकांत दिलेलें आहे. सर्वांशीं तसेंच वर्णन " नागेश " व "श्रीसमर्थ" यांचे काव्यांत आढळलें. तें क्रमानें खालीं दिलेलें आहे. नागेशाचें " सीतास्वयंवर " कवि मासिकांत कै. भावे यांनीं प्रसिद्ध केलें आहे. नागेश कवि सोळाव्या शतकाच्या तृतीय पादांत झाला असें मत कै० भावे यांनीं दिलें आहे. श्रीसमर्थ यांनीं महाबळेश्वर येथील ब्रह्मारण्याचें वर्णन शके १५६६ सालीं केलें आहे व तें शिवचरित्रप्रदीपांत ( पृ. २९० ) दिलेलें आहे. त्यांतील त्रोटक उतारा खालीं दिला आहे. तिन्ही उतारे पाहिल्यास तिन्ही कवि समकालीन होते अशी खात्री होईल.

३. सामराजाच्या रुक्मिणीहरणांतील उतारा--

येला, कंकोल, पूगीफल खदिर, शशी, जायपत्री, लवंगा ।
बादामे, आक्रोटे, खिसमिस, उतत्या आणवील्या सवंगा ॥
गोडंब्या, नारिकेळें, खजुर अणि खडीशर्करा शुद्ध चीनी ।
जीरें, सुंठी, मरीचें, हळदि बहु तशी, हिंगही दारचीनी ॥४८॥
दाळिंबें, सोनकेळें, पनस, अननसें, जांबळें, मातुलिंगें ।
अंबें, लिंबें, सुरंगें, टरबुज, पपये, अंजिरें, हे कलिंगे ॥

शेपें, शीताफळें ही खरबुज, खिरणी सुंदरें तूत, बोरें ।
सप्ताळें, ऊंस पुंडे, कविठ, कमरखें, वाळकें सूक्ष्म थोरें ॥४९॥
रु. ह. सर्ग ३.

४. नागेशकवीच्या सीतास्वयंवरांतील गौतमवनवर्णनः—

( १ ) नारंगरंग, अतिपिंग, कलिंग, केळें ।
जंबूफळें सुविमलें मृदु सोनकेळें ॥
आलीं कशीं बहु रसाळ फळें रसाळें ।
सप्ताळसें, अननसें, फणसें, विशाळे ॥ ९५ ॥

( २ ) जंबीर, अंजिर, तुरंज, करंज, बोरें ।
द्राक्षें सुलक्षणिक, दाडिम, नारिकेळें ॥
खर्जूरिका, कमरखें, हरिखें भजावीं ।
सीताफळें, खिरणिसें, उपमे त्यजावीं ॥ ९६ ॥

( ३ ) तर्बूज खर्बूज लता उदंडा ।
कांडोपकांडीं रस इक्षुदंडा ॥
आक्रोड, बादाम, अपार पेरू ।
मेवा नवा काय नसेल मेरू ॥ ९७ ॥

५. श्रीसमर्थांनीं केलेलें ब्रह्मारण्याचें वर्णन :—

त्या तळीं सुंदरा बागा । नाना तरु परोपरीं ॥ ३ ॥
आनसीं, फणसीं, पेरीं । खीरणी कविठी बहू ।
नारिंगी, बदरी, सेवी । कर्वंदी, तोरणी, गुणी ॥ ६ ॥
खर्बुजी तर्बुजी सेंदा । सेंदण्या, रायसेंदण्या ।
वाळकें, कांकड्या, तौसी । चीबडें तुरंजे बहू ॥ ७ ॥
खर्जुरी, द्राक्ष, आंजीरी । बादामे, आक्रुटे झटे ।
कलांगडी तार्वटी केळें । नारेळें बहु जीनसी ॥ ८ ॥
ऊंस काळे काठे पुंडे । वेळा वाळा च शर्करा ॥ १० ॥

६ वरील तिन्ही उतारे पाहिले असतां तीन ही कवींनीं निर्दिष्ट केलेलीं फळें खालीलप्रमाणें आहेतः—

बादाम, अक्रोट, नारिकेळे, खजूर, पनस, अननस, टरबुज, अंजिरें, कालिंगें; खरबुज, खिरणी, बोरें, ऊंस, कविठ, वाळुकें हीं फळें सामराज व श्रीसमर्थ यांचे वर्णनांत आढळतात; द्राक्षें, पेरू व नारिंग यांचा उल्लेख श्रीसमर्थ व नागेश

यांनीं केला आहे; सामराज व नागेश यांनीं डाळिंबें, जांभळें, लिंबें, शीताफळें, सताळें, कमरखें यांचा उल्लेख केला आहे.

बादाम व कविठ हीं दोन महत्वाचीं रूपें आहेत. हल्लीं प्रचारांत बदाम व कवठ असे शब्द आहेत. बदर व कपित्थ यांचे प्राकृतांत बोर व कविठ असे पर्याय होतात व ते दोन्ही पर्याय वरील वर्णनांत आढळतात. कलम ३।४।५ यांतील समान वर्णनें पहातां तिघेही समकालीन असावेत असें वाटतें. श्रीसमर्थांचें वर्णन शके १५६६ मधील आहे, नागेशाचें वर्णन शके १५७०-७१ च्या सुमारांचें आहे; त्याच सुमारास सामराज असावा असें वाटतें.

नागेश व राधामाधवविलास चंपूचा कर्ता जयराम पिंडे या दोन्ही कवींची भाषापद्धति पाहिली असतां, ते समकालीन असावेत असें दिसतें. रा. मा. वि. चंपू शके १५७५ ते ८० च्या दरम्यान झाला असावा असें कै. राजवाडे यांचें मत आहे व त्या अनुरोधानें वर सीतास्वयंवराचा काल अदमासानें दिला आहे. नागेश व सामराज यांचे काव्यांत आणखीही समानकालद्योतक गमकें आहेत, त्यांचें विवरण सवडीप्रमाणें करण्याचा विचार आहे.

---

# भागवतधर्ममीमांसा.

( ले० ह. भ. प. **धुंडिराज रामचंद्र महाराज**, पंढरपुर. )

## ले० २.

१४. 'वेदोऽखिलो धर्ममूलं' कोणताही धर्म, कोणताही सांप्रदाय किंवा पंथ, यांचें महत्व वैदिक तत्वज्ञानाशीं त्यांचा संबंध ज्या प्रमाणांत असेल त्यावर अवलंबून आहे. कारण, आर्यांची प्रवृत्ति ( व्यवहार ) सुद्धां वैदिक नियमांनीं बांधली गेली आहे, म्हणून प्रत्येक जिज्ञासु कोणतेंही पारमार्थिक मत वेदाशीं ताडून पाहून नंतर तो त्याचा स्वीकार करीत असतो. त्याचप्रमाणें भागवतधर्माचा वेदाशीं संबंध कसा व किती आहे याचा विचार करणें अवश्य आहे. कारण या मुद्यावरच भागवतधर्माचें महत्व सर्वस्वी अवलंबून आहे.

१५. अध्यात्मशास्त्राचा विचार करणारे बरेच दर्शनकार पूर्वी होऊन गेले, त्यापैकीं वैदिक संस्कृतीशीं विरुद्ध असणाऱ्या चार्वाक, ( देहात्मवादी ), बौद्ध, माध्यमिक इत्यादिकांचें खंडण श्रीशंकराचार्यांनीं ब्रह्मसूत्रभाष्याच्या २ ऱ्या अध्यायामध्यें केलें आहे. कित्येकांच्या मतें भागवतधर्माचेंही आचार्यांनीं खंडण

केलें आहे, पण तो त्यांचा समज चुकीचा आहे. तें खंडण भागवतधर्माचें नसून पांचरात्रागमाचें आहे, व पांचरात्रागमांतील मत अद्वैततत्वज्ञानाशीं विसंगत आहे, हें थोडयाशा विचाराअंतीं लक्षांत येण्यासारखें आहे. कारण श्रीशंकराचार्यच "उत्पत्त्यसंभवात्" या अधिकरणांत पांचरात्र मताचें खंडण करितांना म्हणतात कीं—

"भगवतोऽभिगमनपूजार्थं द्रव्यार्जन पूजनाष्टाक्षरादि मन्त्र जपध्यानादि लक्षणमाराधनं नात्राधिकरणे प्रतिषिध्यते । श्रुतिस्मृत्योरीश्वरप्रणिधानस्यप्रसिद्धत्वात् ।"

ब्रह्मसूत्रभाष्य अ० २–२–४२.

अर्थ—"श्रुतिस्मृतिमध्यें स्पष्टच ईश्वरप्रणिधान सांगितलें आहे. म्हणून भगवद्भक्तिविषयक अभिगमन (उपास्यदेवतेकडे जाणें), पूजार्थ द्रव्यसंपादन, पूजन, मन्त्रजपध्यानादि लक्षणउपासनेचा या अधिकरणांत निषेध केला नाहीं."

१६. कारण पुन्हा ह्म० ब्र. सू. भा. अ. ३-२–२३ 'तदव्यक्तमाह हि' या सूत्रावरील भाष्यांत आचार्य म्हणतात कीं "तें ब्रह्म व्यक्त होणारें नाहीं." कारण श्रुति सुद्धां म्हणतेः—

"न चक्षुषा गृह्यते नाऽपि वाचा । नान्यै र्देवै स्तपसा कर्मणा वा
स एष नेति नेत्यात्मा अगृह्यो नहि गृह्यते ॥ यत्तदद्दश्यमग्राह्यं" इ. इ.

तें ब्रह्म आपणाजवळ जी जी म्हणून पदार्थज्ञानाची सामुग्री आहे त्या त्या सामुग्रीनें ह्म० चक्षुरादि इंद्रियांनीं किंवा इंद्रियांकडून केली जाणारी कृच्छ्रचांद्रायणादि तपांकडून अथवा अग्निहोत्रादिकर्मानें प्राप्त होत नाहीं. मग कोणत्या साधनानें त्या ब्रह्माचा साक्षात्कार होतो ? तर या शंकेला मागील सूत्रापुढील "अपि च संराधने प्रत्यक्षानुमानाभ्यां" (अ ३–२–२४) या सूत्रावरील आपल्या भाष्यांत आचार्य उत्तर देतात कीं:—

"अपि चैनमात्मानं निरस्तसमस्तप्रपंचमव्यक्तं संराधनकाले पश्यन्ति योगिनः। संराधनंच भक्ति ध्यानप्रणिधानाद्यनुष्ठानम् ।"

अशा या निरुपाधिक आत्मस्वरूपास संराधनकालीं योगी पहातात. संराधन म्ह० काय ? भक्ति ध्यान प्रणिधानादिकांचें अनुष्ठान.

भक्ति म्ह० काय ? भाष्यावरील ब्रह्मविद्याभरण नामक टीकेमध्यें "माहात्म्य ज्ञानपूर्वक स्नेहाख्योऽन्तःकरणवृत्तिविशेषः" अशी व्याख्या केली आहे. म्ह० ईश्वराच्या माहात्म्यज्ञानासहित त्या स्वरूपीं शुद्ध प्रेमप्रवाह अखंड चालू असणें म्ह० भक्ति. 'आदि' शब्दानें जपस्तुतिनमस्कारादि क्रियेचेंही ग्रहण आहे. तात्पर्य, शंकराचार्यांना शुद्ध भागवत धर्म मान्य नव्हता असें नाहीं, तर तो श्रुतिस्मृतिप्रतिपादित असल्यामुळें आचार्यांनीं त्याचें खंडण केलें नसून तें पांचरात्रमताचें आहे हें लक्षांत ठेवावें.

१७. भागवतधर्ममंदिराची उभारणी वैदिक संस्कृतीच्या अत्युत्कृष्ट पायावर झाली आहे. वैदिक (श्रुत्युक्त) उपासनामार्गांचेंच देशकाल परिस्थित्यनुसार परिवर्तन करून भागवत धर्मीयांनीं त्यास हा साधाच पण दिव्य पोषाख दिला आहे. कित्येकांच्या मतें वेदांतील अनेक देवतांच्या कल्पनेमुळें साधकांची दिशाभूल होणें किंवा उपास्या विषयीं त्यांची एकदेशी भावना होणें अशक्य नाहीं, पण थोड्याशा विचाराअंतीं या मताचा फोलपणा आपले लक्षांत येईल. कारण वेदांत अनेक देवतांची कल्पना केली आहे, नाहीं असें नाहीं. पण उपासकांच्या सौकर्याकारितांच ती तशी केली आहे. त्यांत प्रत्येक देवतांची तात्विक स्वरूपें भिन्न भिन्न आहेत व उपासकानेंही त्यांचे ठिकाणीं भिन्न भावना ठेवूनच उपासना करावी असें वेदाचें तात्पर्य नाहीं. उदा०

" इंद्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथोदिव्यं स सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधावदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥
स ब्रह्मा सशिवः सहरिः सेंद्रः सोऽक्षरः परमः स्वराट् । "

अशी आणखींही बरींच प्रमाणें देतां येतील. वेदांत अनेक स्थलीं एकदेशी वाक्यांचा समावेश केला गेला आहे असें वरवर पाहाणारांना दिसेल, पण प्रत्येक देवतेचीं श्रुतिसिद्ध वर्णनें पाहिल्यास ही भ्रमात्मक कल्पना नाहींशी झाल्यावांचून राहणार नाहीं. उदा० श्रीगणेशाचेंच वर्णन पहाः—

" नमस्ते गणपतये । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि । सर्वं जगदिदं त्वत्तो जायते । त्वं गुणत्रयातीतः । त्वं ब्रह्मा त्वं रुद्रस्त्वमग्निस्त्वं वायुस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् " इ० इ०

तसेंच नारायणाचेंही वर्णन पहा.—

" नारायण एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यं । नारायणाद्देवाः समुत्पद्यन्ते । नारायणाद्ब्रह्मा जायते । नारायणाद्रुद्रो जायते । नारायणाद्विष्णुर्जायते । पुरुष एवेदं सर्वं " इ० इ०

एके दिवशीं सर्व स्वर्गस्थ देवानीं शंकरांना विचारिलें कीं महाराज ! आपण कोण आहां ? तेव्हां त्यांनीं ही असेंच उत्तर दिलें:—

"सोऽब्रवीदहमेकः प्रथमासीद्वर्तामिच भविष्यामिच नान्यः कश्चिन्मत्तो व्यतिरिक्त इति । यो वै रुद्रः स विष्णुः । यो वै रुद्रः स ब्रम्हा । यो वै रुद्रः सेंद्रः" इ. इ.

सूर्याचेंही स्वरूपवर्णन असेंच आहे:—

" सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च । असावादित्यो ब्रह्म । सूर्याद्भवन्ति भूतानि सूर्येण पालितानि वै । सूर्येलयंप्राप्नुवन्ति । आनंदमयो ज्ञानमयो विज्ञानमय आदित्यः " इ. इ.

१८ या एकंदर विवेचनावरून वेदांत देवतांच्या व्यापक स्वरूपालाच केवळ

प्राधान्य दिलें आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. कोणत्याही देवतेचें वर्णन घ्या, तें सर्वांना सारखें लागू पडतें. "आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं" । या न्यायानें इतर देवतांची केलेली स्तुति ' सर्व देवमय ' हरीलाच पोहोंचते.

येऽ प्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विता : ।
तेऽपि मामेव कौंतेय यजन्त्यविधिपूर्वकं ॥ गी० ॥

या श्लोकाच्या द्वारां श्रीकृष्णांनीं अर्जुनास एकदेववादाचेंच तत्व पटवून दिलें आहे.

१९. उपासकवर्गाच्या उपास्याविषयींच्या एकदेशी कल्पनेमुळें ' यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ' या न्यायानें संकुचित फलाची प्राप्ति होणें अशक्य नाहीं. पण अशा संकुचित फलप्राप्तीचा दोष आपल्या आपल्या अज्ञानमूलक उपासनेवर न लादतां वेदांवर लादणें हें महत्पातक होय. कारण जड सृष्टीमध्यें सुद्धां नानात्व पाहूं नये व पाहिल्यास " मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति " अशी जबरदस्त शिक्षा सांगणाऱ्या वेदांत प्रत्यक्ष देवतांचें स्वरूपाबद्दल इतकी भेदात्मक क्षुद्र कल्पना केली असेल असें अनुमान करणें धाडसाचें होईल.

२० ' वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा ' अशी प्रतिज्ञा करणाऱ्या श्रीतुकारामहाराजांनीं ' हरि हा व्यापक सर्वगत । हा तंव मुख्यत्वें वेदांत ' । ' विधीविश्वंभर । बोले वेदांतीचा सार ' ॥ हाच वेदार्थ जगाला सांगितला आहे. वेदांतील उपासनापद्धति ' आत्मेत्येवोपासीत ' " ब्रम्हेत्येवोपासीत " अशी आहे. वैदिक अहंग्रह इ० इ० ज्या उपासना आहेत त्या व्यापक दृष्टीनेंच करावयाच्या असतात. वेदाचा सिद्धांत ' एकमेवाद्वितीयम् ' आहे, म्हणून उपासकानेंही ' एकमेवाद्वितीयम् 'च व्हावें अशी वेदाची आज्ञा आहे. तात्पर्य वरील एकंदर विवेचनावरून अनेक देवता व त्यांच्या केल्या जाणाऱ्या उपासना याबद्दल वेदांतील विचारसरणी किती व्यापक आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. वरील व्यापक विचारसरणीला अनुलक्षूनच भागवतधर्मांतही उपासनामार्ग आखला गेला आहे.

२१ उपासना ही उपास्यज्ञानाधीन असते. उपास्यदेवतेचें पण यथार्थ ज्ञान झालें पाहिजे, व असें ज्ञान झाल्यानंतरच भागवतधर्मप्रतिपादित उपासनेचा तो उपासक अधिकारी होईल. उपासनेला माहात्म्यज्ञानाची जोड असणें अवश्य आहे हें आरंभीं सांगितलेंच आहे.

२२ ' कोण्याही भूतांचा न घडो मत्सर ' हें भागवत धर्मांतर्गत सर्वेश्वरपूजनाचें वर्म आहे. ' भूतांची दया हें भांडवल संतां ' या भांडवलावरच सर्व भक्तीचा व्यवहार चालावयास पाहिजे. भागवत धर्म अहिंसाप्रधान आहे.

ज्ञान व मन यांची गांठ जोंपर्यंत पडणार नाहीं तों पावेतों अहिंसा अंगीं बाणणें शक्य नाहीं. अहिंसेचा उद्भव मनांतून व्हावयास पाहिजे ह्म० साहजिकच इंद्रियांना ही तें वळण लागतें. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः—

तैसें दयालुत्व आपुलें । मनें हातापाया आणिलें ॥
मग तेथ उपजविलें । अहिंसेते ॥ १३–३०९ ॥

२३ जीवमात्रांच्या आत्यंतिक हिताबद्दल अंतःकरणांत कळकळ असणें व तदनुसार आचरण करणें म्हणजेच अहिंसा. । बुडता हे जन न देखवे डोळा । इ० इ० तुकोबांचे उद्गार याच भूमिकेवरील होत. श्रीज्ञानेश्वरमहाराजही अहिंसेची हीच व्याख्या करितात.

जगाचिया सुखोद्देशें । शरीर वाचा मानसें ।
राहाटणें तें अहिंसे । रूप जाणा ॥ ज्ञा० १६ ॥

कृतकृत्य झाल्यानंतरही 'उरलो उपकारापुरता' म्हणून अहिंसातत्वाचा पुरस्कार करून वर्तन करीत राहणें हें भागवतधर्माचरणाचें प्रमुख अंग आहे. लो० टिळक म्हणतात——

"देशसेवा हें परोपकाराचें धाकटें माप आहे व भक्ति हें परोपकाराचें मोठें माप आहे." टिळक सूक्ति संग्रह.

२४. भागवत धर्म परमशांति व सौख्य देणारा आहे. पण त्या मार्गांत हिंसा किंवा भूतद्वेष हा आडफाटा आहे. 'भूतेषुबद्धवैरस्य न मनः शान्तिमृच्छति । ( भागवत )–भूतमात्रांविषयीं द्वेष ठेवणाऱ्या पुरुषाचें मन केव्हांही शांत होत नाहीं.—'निर्वैर व्हावें साधनाचें मूळ.' श्री नारदऋषींनींही आपल्या भक्तिसूत्रांत भक्ताच्या आचरणाविषयीं लिहितांना भक्ताकडून अहिंसा, सत्य, शौच, दया, आस्तिक्य इ० गुणांचें पालन अवश्य झालें पाहिजे असें स्पष्ट म्हटलें आहे.

अहिंसा सत्यशौच दया आस्तिक्यादि चारित्र्याणि परिपालनीयानि ।
( नारद भक्ति सूत्रें. )

तुका म्हणे फार । थोडा करी परोपकार । या श्रीतुकोबांच्या शासनाप्रमाणें भागवत धर्मांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या साधकानें आरंभींच परोपकाराचें व्रत पाळणें आवश्य आहे.

२५. परमात्मा 'सर्व होऊनीया सर्वीं' वास्तव्य करितो तर त्याची उपासना करूं इच्छिणाऱ्यानीं ही सर्वात्मकत्व अंगीं बाणून घेणें अवश्य आहे. भूतमात्रांच्या बाह्य अनेकत्वामुळें उपासकानें त्यांचें ठिकाणीं अनेकत्वाची भावना ठेवूं नये असें श्री ज्ञा० म० एके ठिकाणीं म्हणतात.

येरवी तऱ्ही अर्जुना । जों एकवटलिया भावना ।
सर्व भूतीं अभिन्ना । मातें भजे ॥ १ ॥

भूतांचेनि अनेकपणें । अनेक नोहे अंतःकरणें ।
केवळ एकत्व चि माझें जाणे । सर्वत्र जो ॥ २ ॥ ज्ञा० ६.॥

ही भागवत धर्माचरणाची पराकाष्ठा आहे.

२६. श्रीतुकाराममहाराज एका शेतकऱ्याचे सांगण्यावरून त्याचें शेत राखत बसले असतां चरावयास आलेले पक्षी त्यांना पाहून उडून चालले, तेव्हां त्यांना किती तरी खेद झाला. त्या अवस्थेतील त्यांचे उद्गार पहा.

अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥ १ ॥
विश्वास तो खरा मग । पांडुरंग कृपेचा ॥ २ ॥

अशा या खेदपूर्ण अवस्थेंतच जेव्हां ते समत्वाच्या भावनेंत रंगून गेले तेव्हां ते सर्व उडून त्यांच्या अंगावर येऊन बसले, त्याच वेळेस त्यांच्या चित्ताची तळमळ नष्ट होऊन ते आनंदित झाले.

२७. श्रीतुकाराममहाराजांच्या एकविध अभंगाचा अर्थ कित्येकांकडून द्वैतपर लावण्यांत येत असतो, पण तो चुकीचा आहे. कारण त्यांची उपास्य-विषयक कल्पना एकदेशी नव्हती. त्यांची श्री विठ्ठलमूर्ति द्वैतमतवाद्यांप्रमाणें वैकुंठादि विशिष्ट लोकांतच राहणारी नसून ‘ विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरुनि ।’ अशी ‘ शून्यस्थावरजंगम व्यापुनि ’ राहणारी होती. व या उपास्यविषयक व्यापक भावनेप्रमाणेंच त्यांची उपासनाही

वाचा बोले ते तुझेचि गुणानुवाद । मंत्रजपकथास्तुति ।
भोजन सारू ठायीं फल तांबुल कांहीं । पूजा नैवेद्य तुज होती ।
चालता प्रदक्षिणा निद्रा लोटांगण । दंडवत तुजप्रती ॥

अशी विकासाला पावलेली होती. । जें जें कांहीं करितों देवा । ते ते सेवा समर्पे । भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज ॥ हा त्यांचा अनुभव होता. ‘ एक देशिया व्यापका । सरिसा पाडु ॥ या तत्वाची जाणीव त्यांच्या अंतःकरणांत पूर्ण वसत होती, असें त्यांच्या अनेक अभंगांवरून सिद्ध होतें.

२८. सारांश, भागवतधर्म हा ज्ञानपूर्ण व भावनाप्रधान आहे. तसेंच त्याचें स्वरूपही अत्यंत उदात्त, गंभीर व व्यापक कसें आहे हें वरील एकंदर विवेचना वरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल.

इतर कष्टमय साधनांच्या आचरणांत कष्टमयता आहे म्हणून भागवतधर्म उदयास आला. पण प्रस्तुत कालीं त्यासही अनेक फाटे फुटून भागवतधर्मीय म्हणविणाऱ्या वर्गामध्येंही अनेक संप्रदाय, पंथ व मतभेद उत्पन्न होऊन परस्परांत निंदा, द्वेष, मत्सर, इ० इ० दुष्ट विकारांचा सुळसुळाट होऊन कलह-प्रियता वाढली ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

२९ अनादि कालापासून योग्य रीतीनें वाढीस लागून छाया व पुष्पफलाच्या

योगानें संसारतापानें तप्त झालेल्या व जन्ममरणद्वारा कष्टमय प्रवास करणाऱ्या पांथिकास शांति सौख्य द्वारा अखंड निरुपाधिक आनंदाचा लाभ देणाऱ्या अध्यात्मवृक्षास आज या परस्परांतील मतभेदामुळें कीड लागून तो शुष्क होत चालला आहे., व हा मतभेद असाच जर कायम राहिला तर तो नामशेषही होऊन जाईल व आपण शांतिसौख्याला पूर्ण मुकून जाऊं कीं काय अशी भीति वाटत आहे.

आर्यांचें श्रेष्ठत्व आजपर्यंत विशेषतः आध्यात्मिक प्रगतीवरच अवलंबून आहे हें कोणासही कबूल करावें लागेल. व तें जर नष्ट होईल तर भारतीयांच्या अवनतीस पारावार राहाणार नाहीं, ही गोष्ट प्रत्येक भक्त भागवतानें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. याकरितां भक्त भागवत वर्गानें परस्परांतील मतभेद बाजूस सारून

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥ १ ॥**

या श्री तुकाराममहाराजांच्या दिव्य संदेशाप्रमाणें खरा उपासनामार्ग चोखाळावा. स्वतः ही परमार्थप्रवण होऊन अखंड आनंदाचा लाभ घ्यावा व समाजाचीही दिशाभूल न करितां त्यासही आध्यात्मिक उन्नतीचा राजमार्ग दाखवून पूर्ण शांतिसौख्याचा लाभ करून द्यावा अशी भक्तभागवतवर्गास सविनय प्रार्थना करून हा दुसरा लेखांक संपवितों.

इति शम्.

---

( मागील अंकावरून चालू )

# बभ्रुवाहनाख्यान.

( ले. नरहरशास्त्री खरशीकर. )

(अंतःकरण कृष्णप्रेमातिशयानें भरून जाऊन कृष्णवियोग होतांच गोपींचा शोक अनावर झालेला दिसतो व पुढची पायरी म्हणजे सेव्याचें सेवकास दर्शन होऊन जी भक्तिप्रेमाची मौज होते तिची रुचि अभिनव आहे. ती रुचि सामान्यास समजणार नाहीं.

भक्तिप्रेमसुख नेणवे याज्ञिका । पंडिता वाचका वैदिकासी ॥ १ ॥
जीवन्मुक्त जरि झाले आत्मनिष्ठ । भक्तिप्रेम सुख दुर्लभ त्या ॥ २ ॥ तुकाराम.

हें तुकोबारायांचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. याचप्रमाणें अर्जुन नुसता वेदांती

अगर ज्ञानी नव्हता. तो श्रीहरीचा पूर्ण अनन्य भक्त होता. मी ज्ञानी आहे ही वृत्तीही त्याची श्रीकृष्णांत सामावली होती. अस्तु. थोडें विषयांतर झालें. पण भक्तियोगाचा थोडा खुलासाही झाला. )

पद. चाल—थोर तुझे उपकार.

परतुन वृषकेता । बारेबा ॥ ध्रु ॥
जाय घराकडे सत्वर ऐकुनि, या मम संकेता ॥ बारेबा०॥ १ ॥
जाणवती अपशकुन पतनगती, भ्रम उठती चित्ता॥ बारेबा०॥ २ ॥
अश्वमेध हा आजि बुडविल ही, वाटते रणसरिता ॥ बारेबा०॥ ३ ॥
धर्म तत्क्षणीं कुलक्षय मानिल, तुज विपरित होता ॥ बारेबा०॥ ४ ॥
गमले असे नच दानव सुरनर, शंकर जिंकिता ॥ बारेबा ०॥ ५ ॥
विष्णुदास म्हणे आजि असेची, आवडलें भगवंता ॥ बारेबा०॥६॥

पृथ्वीछंद.

करीन गट खांडवा, परि हरी न आजी रणीं ।
तथापि निजशत्रुची परिहारीन आजीरणी ॥
विषाद शत दाटले म्हणुन या वधीं तो रड्या ।
परी उभय पक्षिही फजितिच्या पदी तोरड्या ॥ १ ॥

पार्थाचें हें करुणपर भाषण ऐकून वृषकेतु म्हणाला. "महाराज, या क्षणभंगुर देहाची ममता धरून हें समरांगण सोडून मी कदापि जाणार नाहीं.शत्रूला पाठ दाखवून पळून जावें हें कुरुकुलास माहीत नाहीं. पार्थवीरा, आतां माझें वाक्य ऐका. तुम्हांला सोडून देहलोभानें मी पलायन करीन तर माझी स्त्री माझें तोंडही पाहणार नाहीं. जर मी रणांगण सोडीन तर माझा पितामह सूर्य माझ्या पापामुळें पतन पावेल. गोब्राह्मणधर्मासाठीं निर्भयपणें प्राण सोडावा हा माझा क्षात्रधर्म आहे. पश्चिमेस सूर्य उगवेल, आकाश जमिनीवर पडेल, शेष धरणी सांडील, परंतु मी रणांगण सोडणार नाहीं. आतां मी युद्ध करून शत्रूचा निःपात करतों. आपण माझें युद्धचातुर्य पहा. हा कर्णबालक भिक्षुकपुत्र नव्हे. बभ्रुवाहनाच्या सर्वस्वाची राखरांगोळी उडवितों पहा तर खरें."

पद. चाल—(इसतन धनकी.)

हरहर सोडुन या समराला । जाउं कसा मी परत गृहाला ॥ ध्रु० ॥
शत्रुपुढें मुख मुरडुनि जाणें । तरि मरणाचि हें उघड शूराला ॥हरहर०
रथध्वज मोडिन हयगज पाडिन । पदचर धाडिन अंतपुराला ॥ हर. ॥
अपयश पळवीन जयधन मिळवीन । कुशल हें कळविन चक्रधराला ३॥

विष्णुदास म्हणे जयविजयासह । परतुन जाऊं मग नगराला ।। हर,४।।

हें त्या षोडशवर्ष बालकाचें वीररसोत्पादक भाषण श्रवण करून अर्जुनास समाधान होऊन त्यास त्यानें शुभाशिर्वाद दिला. अर्जुन म्हणाला "शाबास, वृषकेतो शाबास ! तूं आज कुरुकुलास पवित्र केलेंस. आज मत्भ्राता कर्णाचें स्मरण तूं करून देत आहेस. तूं विजयी हो. मीही आतांचें युद्धांत शत्रूचा फन्ना उडवून देतों. बभ्रुवाहनाची काय बिशाद आहे ? अगदीं थोड्या वेळांत त्यास यमालय दाखवितों." अर्जुनाचें हें भाषण ऐकतांच ताड्दिशीं वृषकेतूनें रणांगणांत जाऊन शत्रुपक्षाच्या कानठळ्या बसतील इतक्या जोरानें आरोळी मारली, व शस्त्रास्त्रें खणखण करूं लागलीं. वृषकेतूचें शौर्य अपरमित होतें. तो विद्युल्लतेसारखा रणांगणांत चमकत होता. एकमेकांवर उलट सुलट बाण सोडून एकमेकांस घायाळ करूं लागले. बभ्रुवाहनानें बाणानें वृषकेतूचे रथ, घोडे, सारथी मारले. पुढें बभ्रुवाहनानें अग्न्यस्त्र सोडलें, तर वृषकेतूनें पर्जन्यास्त्र सोडलें. वायुअस्त्र—पर्वतास्त्र, वज्रास्त्र--ब्रम्हास्त्र, सूर्यास्त्र--शांभवास्त्र; वगैरे अस्त्रें एकमेकांनीं सोडून कोणी कोणास हार जाईनात. फारच घनघोर युद्धाची धुमाळी झाली.

पद–( पुरवणी. )

ते कर्णार्जुननंदन अति, उग्र प्रगटविति ।
निजतेजाला । वर्णिती धनुर्धर ज्याला ।।
ते पंचानन त्या घटांकिं, गिळति गटगटकिं ।
कटक आज्याला । वाटलें मनीं आज्याला ।।
अन्योन्या उडविति अंबरिं, पावति समरि ।
समदर्जाला । मनिं नाहीं अटदर ज्याला ।।
घडोघडि पूर्वजा स्मरति, बळें पतकरति ।
वैरभावाजी । जन्मेजय म्हणे वाहवा जी ।। ५ ।।

बभ्रुवाहनानें अति तीक्ष्ण बाण सोडून वृषकेतूस गगनांत उडविला व गगनमंडळांत अष्टदिशेस फिरविला व सूर्यमंडळापर्यंत जाऊन खालीं पार्थाचे जवळ येऊन पडला. तेथें वृषकेतू सावध होऊन त्यानें बभ्रुवाहनास एका बाणानें उडविलें तो रथासह सूर्य मंडळांत गेला. आपल्या नातवास यानें फार पीडा केली म्हणून सूर्य नारायणानें त्याचा रथ जाळून टाकला; व बभ्रुवाहन खालीं पडला. त्यास वृषकेतूनें पुन्हां बाण मारून आकाशांत फेंकला. याप्रमाणें परस्परांस क्रिया प्रतिक्रिया करून वर खालीं केलें. दोघा वीरांचें ( बंधूचें ) युद्ध पाहून अर्जुनास दोघांच्याही क्षात्रतेजाबद्दल आल्हाद वाटला.

ओवी—क्षणैक सेविति दोघे रथ । क्षणैक होति दोघे विरथ ।
क्षणें धरिती आकाशपंथ । क्षणें भूमिस्थ होती पैं ॥ जै अ. ॥

याप्रमाणें अतिशय भयंकर युद्ध पांच दिवस झालें. कोणासच क्षणभरसुद्धां विश्रांति मिळाली नाहीं. मग बभ्रुवाहन वृषकेतूस म्हणाला, "तुझा पराक्रम अद्‌भुत आहे. तुझ्यासारखा वीर माझ्या पाहण्यांत नाहीं; तथापि आतां मात्र शेवटचें कृष्णस्मरण कर" असें म्हणून अर्धचंद्राकार बाण सोडला तो वृषकेतूनें तोडला व पुनः बभ्रुवाहनानें तीक्ष्ण शर सोडला त्या बाणासरसें वृषकेतूचें मस्तक तुटून उडविलें तें रविमंडळापर्यंत जाऊन खालीं पडतांना बभ्रुवाहनाच्या छातीवर आदळून त्यास मूर्च्छित केलें व तें शिरकमल पार्थाच्या चरणावर येऊन पडलें. अंतकाळीं श्रीकृष्णदर्शन नाहीं तरी त्याचा पूर्ण भक्त अर्जुन याचे चरणीं येऊन समर्पित झालें. तें शिर पाहतांच अर्जुनास अतिशय दुःख झालें.

ओवी—वृषकेताचा कंठनाळ । छेदितां लंघोनि गगनमंडळ ।
पुनरपि येऊनि शिरकमळ । पार्थापुढें पडियलें ॥ १ ॥

अर्जुनानें वृषकेतूचें शिर मांडीवर घेऊन फार मोठ्यानें गाईसारखा हंबरडा फोडला. तें शिर रामकृष्णाचें स्मरण करीत डोळ्यानें अर्जुनाकडे पाहत होतें, व त्याचें धड नाचूं लागून धडानें बरेंच सैन्य लोळविलें व बभ्रुवाहनासही मोठा धक्का देऊन लांब पळविला व देह खालीं पडला. तो देह खाण्यासाठीं श्वापदें येऊं लागलीं परंतु धडाचे हात त्या श्वापदांस स्पर्श करूं देईनात. हें दृश्य पाहून तर अर्जुनास दुःखाचा उमाळा आला व म्हणाला, हे तात, सत्पुत्रा, तुला श्रीहरिसन्मुखही मृत्यु आला नाहींना? आतां मीं आपलें मुख हस्तिनापुरास कसें दाखवूं रे! येतांना कुंतीमातेनें तुजवरून लिंबलोण उतरून "हा माझा लाडका बाळ तुझ्या स्वाधीन माझें धन म्हणून ठेवितें. त्याचें जिवापलीकडे रक्षण कर" म्हणून तुला माझ्या स्वाधीन केलें. पण मी नष्टानें आपले प्राण वांचवून तुला मात्र मृत्यूच्या स्वाधीन केलें. आतां कुंती, द्रौपदी, धर्म, भीम वगैरे सर्वच प्राण सोडतील. बाळा, तुझे काय काय गुण वर्णन करूं! तुझे गुण, शौर्य, पराक्रम लिहिण्यास शेषाची सुद्धां लेखणी समर्थ होणार नाहीं. माझ्या लाडक्या, तुझे एकेक गुण आठवत आहेत त्यामुळें अंतःकरण फाटून जात आहे. त्वद्‌गुणरूपी खडे माझे पोटांत सारखे टोंचत आहेत. जिवलगा, एकवार तरी माझ्याशीं गोड शब्द बोल व समोर असलेल्या शत्रूचें विदारण कर! हाय! हाय!! म्हणून अर्जुन शोकाकुल झाला व पुन म्हणतो—कर्णनंदना, तुझे गुण कितीरे श्रेष्ठतर आहेत! रणांत यौवनाश्व जिंकून शामकर्ण आणलास, अनुशाल्व तूंच धरून आणलास, शत्रुसेनेची लाखोली भूलिंगास समर्पण केलीस; या पुण्याईनें श्रीशंकर प्रसन्न

होऊन तुला त्यांनीं आपलें पदीं जागा दिली. तुझा पिता कर्ण यानें स्वतःचा देह छेदन करून इंद्रास कवचकुंडलें दिलीं परंतु तूं शरीर देऊन त्याचेपेक्षांही उदार झाला आहेस. आज ममात्मा अभिमन्यु नाहींसा झाला. बाळ, एकदां डोळे उघडून तर मजकडे पहा कींरे ! सख्या जिवलगा, एक तरी अमृतमय शब्द मजशीं बोलतोस ना ? सूर्यावांचून जसें गगन अथवा दिव्यावांचून जसें मंदिर, तसा तुझ्यावांचून हा कुरुवंश शून्य झाला, इकडे लक्ष देऊन तरी ऊठ व धर्मराजाचा अश्वमेधयज्ञ शेवटास ने. अश्वमेधाऐवजीं तूं आपलाच यज्ञ करून घेतलास. परमानंद मुकुंद श्रीकृष्णा, माझा केवढा रे अंत पाहत आहेस ! आज नेहमींप्रमाणें स्मरणाबरोबर धांवत येऊन दुःखमुक्त करीत नाहींस ना ? असें बोलून शोक अनावर झाल्यामुळें अर्जुनास मूर्च्छना आली व तो वृषकेतूच्या शिरासह रथांतून जमिनीवर पडला.

( पद—चाल—मित्रा मम जन्मकथा.- )

गेलासि आजि सांग मला टाकुनि कसा ।
होता निदानि बा तुझाचि पूर्ण भरवसा । धृ० ॥
जो अजिंक्य शीरजोर वीर अंकिला ।
तो क्षणांत तूंचि अनुशाल्व जिंकिला ॥
यौवनाश्व गर्व सर्व दूर झोंकिला ।
शामकर्ण आणिलासि तूंचि राजसा ॥ गेलासि० ॥ १ ॥
तुजासि मारवूनि गुणरत्नसागरा ।
एकलाचि जाऊं काय सांग मी घरा ॥
लाविन पहा आजि आग या मि संगरा ।
साह्य आलिया कृतांत करिन नाहिंसा ॥ गेलासि० २ ॥
कर्णासमान गुण तुझे कर्णकुमरा ।
वाटलें न आठवलें दुःख शंभरा ॥
सत्यविजय भ्रमर कमल पुष्प भ्रामरा ।
पंचप्राण प्रियपात्र तूंचि राजसा ॥ गेलासि० ॥ ३ ॥
पापिष्ट दुष्ट नष्ट बभ्रुवाहन माजरा ।
शंका न आली तुज वधावयासि त्या जरा ॥
निश्चित मारतों मीं त्यासि थांब तूं जरा ।
विष्णुदास म्हणे विलंब नलगे फारसा ॥ गेलासि० ॥ ४ ॥

अर्जुनास मूर्च्छागत पाहून बभ्रुवाहन जवळ येऊन त्यास वारा घालून

सावध करूं लागला व म्हणाला, मी वेश्यापुत्र तुमचेजवळ उभा आहे. आतां उठा आणि आपला पराक्रम दाखवा बरें! आपणाजवळचे सर्व वीर संपून गेले आहेत; तरी आणखी कांहीं असल्यास लौकर बाहेर काढा. मी आपल्या सर्व वीरांस ससैन्य स्वर्गलोकांस रवाना केलेंच आहे. आतां फक्त आपलेंच शिर-कमल मृत्यूस वाहण्याचें राहिलें आहे. तरी उठा, श्रीहरिची पूजा करा व निर्मळ अंतःकरणानें यादवेंद्र कृष्णास बोलवा, शंकराकडून पाशुपत मिळवा, व युद्ध करा. युद्ध सोडून नपुंसकाप्रमाणें रडत बसणें धनुर्धरास शोभतें काय? महासती साध्वीला दोष देऊन वेश्या म्हणालांत त्याचें फळ आतांच तुमचें शिर-कमल तोडून प्रत्ययास आणतों.

पद (धुमाळी–अभंगाची चाल)

**काय योग्य हें गांडिवपाणी। कां रे युद्धाची सोडिलि वाणी ॥ ध्रु० ॥**
**विर वृषकेताचे अप्रतिमाही। हरपली रत्नाची खाणी ॥ काय योग्य० १ ॥**
**श्रीगुरु द्रोणाचार्यांची विद्या। गमविली कोण्या ठिकाणीं ॥ काय० २ ॥**
**श्रीहरि कुणिकडे जाउनि बसला। नाहिंच या निरवाणी ॥ काय० ३ ॥**
**साध्विसि लावितां दोषचि पडति। पदरांत अपयश हानी ॥ काय० ४ ॥**
**विष्णुदास म्हणे अशि कुणि कथिली। उत्तम बुद्धिहि शहाणी ॥ काय० ५ ॥**

हें बभ्रुवाहनाचें मर्मभेदक भाषण त्या धनुर्धर विजयास कसें सहन होणार? अर्जुन तात्काळ रथारूढ झाला व म्हणाला, तूं वृषकेतासह सर्व वीर मारलेस पण आतां मजपासून जिवंत सुटण्याची आशा करूं नकोस. तुझा आयुर्भानु अस्तास गेलाच असें समज. असें म्हणून असंख्य बाण जलधारेप्रमाणें सोडले. तितकेही बभ्रुवाहनानें तोडून टाकले. पण बभ्रुवाहनाचें शरीर मात्र बरेंच छिन्नभिन्न झालें. अर्जुनाच्या गांडीवाच्या पराक्रमानें बभ्रुवाहनाचें सैन्य पटापट मरून पडूं लागलें. मणिपूर नगराचा कोट ढासळून पडून नगरांतील मोठमोठीं मंदिरें जमिनदोस्त होऊं लागलीं. पार्थबाणांनीं गगन व्यापलें व सर्व नगरांत जिकडे तिकडे बाणच बाण झाले. जिकडे तिकडे हाहाकार उडाला. हत्ती, अश्व, पदातिवीर कोटयावधी भराभर मरून पडूं लागले. मोठ्या वाऱ्यानें तृणपर्णें जशीं गगनांत उडतात तशीं पार्थबाणानें वीर सैन्याचीं मस्तकें आकाशांत उडूं लागलीं. अर्जुनाचें कौशल्य–सव्यसाचित्व पाहून बभ्रुवाहनास मोठा चमत्कार वाटला, व म्हणाला हा धनंजय खराच आहे, हा धन्य धन्य वीर आहे, याची मायही धन्य आहे, पार्थाचे हातून जे जे मारले गेले त्या सर्वांस मोक्ष प्राप्त होत आहे व माझेंही शरीर विकळ झालें आहे. धन्य पार्थवीरा शाबास तुझी! बभ्रुवाहन असंख्य बाणांनीं आच्छादून गेला होता; सर्व नगराचा विध्वंस होऊं लागला, सरोवराचें पाणी आटून गेलें. सर्व नगरवासी त्राही त्राही झाले. नेसल्या वस्त्रासच

आगी लागल्या. जिकडे तिकडे लहान मुलें पोटाशीं धरून शंखध्वनी सुरू झाला आहे.

( पद–असा धरि छंद. )

जसा त्रिपुरारी । कोपला धनंजय भारी ॥ धृ. ॥
महा नरवीर धनुर्धर बाप । महाब्रम्हांडि उठवी ताप ।
महाकाळासि सुटला कांप । कोण त्या वारी ॥
कोपला धनंजय भारी ॥ १ ॥
सुटले शरार्णवाचे लोट । महाभट घटोद्भवा अलोट ।
ढासळे मणिपुराचें कोट । पळति नरनारी ॥ कोपला० ॥ २ ॥
दिसेना पिता तदा पुत्रास । दाटल्या बाणभिंति नेत्रास ।
फुटेना लेश खनक (?) चित्रास । शत्रु दळ भारी ॥ कोपला० ३॥
कुणीकडे पार्थपार्थनंदन । कुणीकडे अश्व ध्वज स्यंदन ।
कुणिकडे दिसेना रणकंदन । पडलि अंधारी ॥ कोपला० ४ ॥
म्हणे बभ्रुवाहन हा रथी । धन्य हा धन्यवीर भारती ।
म्हणे विष्णुदास वर्णिती । देव परभारी ॥ कोपला० ५ ॥

अर्जुनानें याप्रमाणें जर्जर केलेलें पाहून बभ्रुवाहन अतिशय कोपास चढला व अर्जुनाचा सारथी अश्वासहित बाणानें खिळून टाकला. मारुतीलाही दोनशें बाणांनीं आच्छादून टाकलें व शंभर बाणांनीं रथ आकाशांत उडविला. तो रथ स्थिर करण्याचें अवसान अर्जुनांत राहिलें नव्हतें. अर्जुनानें अमर्याद शस्त्रें सोडलीं तितकीं सर्व पुत्रानें छाटून टाकलीं. यावेळीं अर्जुनाचें शरीर क्षतयुक्त रक्तबंबाळ झालें होतें. तरीही अर्जुनानें फार सावधपणें आपलें हस्तलाघव पुत्रास दाखविलें. बभ्रुवाहनाचे घोडे, रथ, सारथी मारून टाकले व नंतर जो जो शर ताबडतोब अर्जुन तोडूं लागला व त्यानें फार मोठ्यानें देवदत्त शंख वाजविला त्यामुळें सर्व दिशाभर प्राण्यांच्या कानठळ्या बसून गेल्या, व ही अर्जुनयुद्धाची महामरीच आली आहे असें सर्वजणांस वाटलें. पितापुत्रांचें घोरतर युद्ध देव विमानांतून पाहूं लागले. हें युद्ध दोन दिवस सतत सुरू होतें. नंतर बभ्रुवाहन क्रोधानें संतप्त झाला व म्हणाला अर्जुना ! द्रोणाचार्यापासून घेतलेली विद्या आज मला कां दाखवीत नाहींस ? श्रीशंकरांनीं तुला पाशुपत दिलें तें काढ बाहेर व मला मार पण तूं असा निस्तेज कां झालास ? तुझें मुख म्लान कां दिसतें ? तूं शस्त्रास्त्रांना विसरून भ्रमिष्ट झाला आहेस खास ! माझ्या पतिव्रता साध्वी मातेला वेश्या म्हणतांना कांहीं तरी तुला शरम वाटावयास पाहिजे होती. त्याच वाचिक पातकाचें फळ आतां तुजपुढें उभें राहिलें

आहे. तुला पूर्वी स्मरणाबरोबर श्रीकृष्ण धांऊन येत होता पण आतां तूं पातकी आहेस यामुळें तो येऊं शकला नाहीं. आतां तूं श्रीहरि गुरुचरणाचें शेवटचें स्मरण कर, तोंवर मी युद्ध तहकूब करीत आहें. कर्णपुत्रानें जी वाट धरली आहे त्याच वाटेनें तुला स्वर्गांत पोंचावितों. यासाठीं तूं अखेरची ईशप्रार्थना कर. तूं प्रार्थना करीत आहेस तोंपर्यंत मी तुजवर शस्त्रप्रहार करणार नाहीं.

[ही युद्धनीति फारच थोर आहे. शत्रू कचाट्यांत, अडचणींत सांपडला आहे तोंच त्याची चटणी करावी अशी असुरी लालसा या युद्धांत दिसत नाहीं. तर शत्रू युद्धास तयार होईपर्यंत शूरानें शस्त्रास्त्र वापरावयाचें नाहीं यासच धर्मयुद्ध म्हटलें पाहिजे. धन्य ते कुरुवीर कीं युद्धकालीही ज्यांची धर्मबुद्धि जाज्वल्य असतें.)

हें मर्मभेदक दुर्वचन ऐकतांच पार्थ अत्यंत क्रोधायमान झाला व त्यानें बभ्रुवाहनावर अगणित शर सोडले. जें जें शस्त्र पार्थ सोडी तें तें बभ्रुवाहन नाश करीत असे. अर्जुनानें पाशुपतास्त्राचें स्मरण केलें तरी तेंही स्फुरेना व दुसरींही अस्त्रें त्याला स्फुरेनाशीं झालीं. या वेळीं मात्र पार्थाचा सर्व भरंवसा तुटला व त्याला अतिशय दुःख झालें.

पद—चाल–( गड्यांनो घ्या हरिच्या नामा० )

प्रसंगीं कामीं न ये कोणी । नवल हें म्हणे गांडिवपाणी ॥धृ०॥
जाहलीं बहु बळहिन गात्रें । मंदता अविलंबि नेत्रें ॥
बोळलीं ढिलीं पडलीं शस्त्रें । आठवितां नाठवति अस्त्रें ॥
आटली विद्या नाठवणी ॥ नवल हें ॥ १ ॥
माझिया तप्त शरागारा । मानितो अर्भक अंगारा ॥
अपोआप जणु वितळति गारा । विरश्री गेली परागारा ॥
जशी कां घरबुडवी कुंटणी ॥ नवल हें ॥ २ ॥
पाशुपत बोले त्यासमयीं । वधाया निजपुत्रा पाहीं ।
नको मज पाठवूं सहसाही । तुला यश आज अनुकूल नाहीं ॥
असें मज वदला शुलपाणी ॥ नवल हें ॥ ३ ॥
जिवाचा जिवलग जो आपुला । दिसेना कोणीकडे लपला ।
जाउनि कोठें तरि बसला । कृपाघन नारायण रुसला ॥
विष्णुदासावर निरवाणी ॥ नवल हें ॥ ४ ॥

अर्जुनाचे प्रसंगास कोणीच उपयोगीं पडेनासें झालें स्वतःचीं गात्रें शिथील झालीं, अस्त्रविद्येचें स्मरण बंद पडलें. अर्जुनानें मोठे बाण सोडले तरी गारे-

प्रमाणें वितळून जात. त्याची वीरश्री घरबुडव्या कुंटिणीप्रमाणें नाहींशी होऊन दुसऱ्याकडे गेली. पाशुपताचाही उपयोग होईनासा झाला. शेवटीं जिवलग श्रीकृष्णसखा तोही जवळ नाहीं व त्यानेंही या वेळीं अंत पाहिला आहे.

पद—( ललिताची चाल. )

**करि करुणा केशवा । लवकर ये माधवा ॥ ध्रु० ॥**
**धांव कृष्णा वनमाळी । ब्रिद आपुलें सांभाळी ॥**
**शरणांगत प्रतिपाळी । दीनजनबांधवा ॥ १ ॥**
**म्हणविसी कृपावंत । तरि कां पाहतोसि अंत ॥**
**सांग झालिया देहांत । मग येशी केधवां ॥ २ ॥**
**गाई वळतां श्रमलासी । वनोवनीं भ्रमलासी ॥**
**गोपीसंगें रमलासी । व्रजवासी यादवा ॥ ३ ॥**
**उद्धवासि सोडविलें । दानवांसि बुडविलें ॥**
**पांडवसत्व वाढविलें । निवटुनियां कौरवा ॥ ४ ॥**
**तूं गुरु जनक जननी बंधु । विजयी श्रीपति करुणासिंधु ॥**
**तारि देउनि अमृतबिंदु । स्वयें मारि अथवा ॥ ५ ॥**
**म्हणे विष्णुदास स्वामी । जरि कां वायां गेलों आम्हीं ॥**
**तुझे भक्त तुझिया कामीं । करतिल कीं वाहवा ॥ ६ ॥**

इतकें होण्यास श्रीगंगेनें सहा महिन्यांत अर्जुनाचें शिर तुटेल असा शाप दिला होता हेंच कारण आहे, असें अर्जुनाचे मनानें गृहीत धरलें व श्रीकृष्णस्मरण करूं लागला. मग अर्जुन पुन्हां बाण टाकूं लागला परंतु गात्रें विगलित झालेलीं असल्यामुळें बाणाचा कांहींच उपयोग झाला नाहीं. मग बभ्रुवाहन म्हणाला, पार्था हा आतां वेश्यानंदनाचा शेवटचा बाण तुझा कंठनाळ फोडण्यास येत आहे, तरी आतां हरिस्मरण कर.

**ओवी.**

**रिपुशब्दाचल पडता वरते । क्रोधार्णवाचें खवळलें भरतें ॥**
**कोंडोनि हृदय तटाक गर्ते । बुडवूं पाहे ब्रह्मांडा ॥ १ ॥**

आतां आपला अंतसमय नजीक आला हें अर्जुनाचे मनानें निश्चित केलें व अंतःकरणांत निरनिराळे विचारांचें काहूर उठलें व सर्व दिशा शून्य दिसूं लागल्या. अर्जुनास मरणाचें भय वाटलें नाहीं. पण नित्य माझ्या सन्निध माझी श्रीकृष्ण गुरुमाउली असावयाची पण आज माझें केवढें दुर्भाग्य आहे कीं,

अंतकालीं माउली जवळ नाहीं. आतां मी कोणाचे मांडीवर व कोणाकडे पाहून प्राणोत्क्रमण करूं. श्रीकृष्ण माउले ! यावेळीं तुझा विसर पडूं देऊं नकोस. माते, दयाघन जननी, तुझें ध्यान करीत असतां माझा अंत होऊं दे. यावेळीं अर्जुनास कृष्णप्रमाचें भरतें येऊन पूर्वींच्या आठवणी होऊं लागल्या व प्रार्थना करून म्हणतो–देवा, आम्हांस लाक्षागृहांतून सोडविलेंस, आमचीं उष्टीं काढलींस, आमचे घोडे खाजविलेस, जयद्रथवधप्रसंगीं तूंच साह्य केलेंस, भारतीय युद्धांत तर सर्वतोपरी तुझें साह्य होतें म्हणून आम्हांस यशप्राप्ती झाली, अरण्यवासांत तुझ्याच कृपेची पाखर आमचेवर होती म्हणून आमचे संकटावस्थेचे दिवस सुखमय झाले होते; परंतु मी मात्र आपला अधिकार न ओळखतां तुझ्याशीं जास्त सलगी केली. कित्येक वेळ तुझ्यावर रुसून बसलों. तुझ्याशीं खेळत असतांना तुझी रळी केली. तुला सर्वज्ञालाच मी गोष्टी शिकवीत असे ! याप्रमाणें मी तुझे अनंत अपराध केले आहेत.

## ओवी.

कृष्ण म्हणोनि हाकारिजे । यादवपणें तूंतें लेखिजे ॥
आपली आण घालिजे । जातां तुज ॥ १ ॥
म्हणोनि काय काय आतां । निवेदिजेल अनंता ॥
मी राशी आहें समस्तां । अपराधांची ॥ २ ॥

( ज्ञानेश्वरी अध्याय ११ )

( या ठिकाणीं काय पाहण्यास सांपडतें ? काळ प्रतिकूळ झाला म्हणजे अर्जुनासारखा धनुर्धर वीर, धर्मात्मा, सद्भक्त, पण कसा पुरुषार्थहीन होतो हें यावरून दिसतें. आतां भक्तियोगाचें रहस्य काय असा प्रश्न घेऊं. यापुढील भयंकर संकट व त्या संकटाचा परिहार होऊन होणारा स्वानंद पाहण्यास मिळणार आहे. विरोधावांचून शुद्ध भक्तिप्रेम उत्पन्न होत नाहीं. जितका जोराचा विरोध तितका स्वानंद अधिक, याजबद्दल पुष्कळ उदाहरणें दाखवितां येण्यासारखीं आहेत, परंतु त्यामुळें प्रसंग फार लांबत आहे, म्हणून इतकेंच समजावें कीं, ही स्थिति उत्पन्न झाली म्हणून पुढें भक्तिप्रेमाचा स्वानंद होणार. ही संकटमय स्थिति श्रवण करण्याचें श्रोत्यांचें दुर्भाग्य आहे. पण पुढील भक्तिप्रेमाचा सुकाळ झालेला पाहून संतसज्जन श्रोते सभाग्य होणार आहेत. अस्तु.)

## ओवी.

भयंकर गंगेचा शाप । वारूं न शके विरंची–बाप ॥
नुचले अर्जुनासी चाप । अंगीं कंप सुटला ॥ १ ॥

असो बोलणें उद्दंड । बभ्रुवाहनें बाण प्रचंड ।
सोडला जैसा मार्तंड । कीं काळदंड दुसरा ॥ २ ॥

श्लोक.

संप्रीयमाणः पार्थानामृषभः पुत्रविक्रमात् ।
नात्यर्थं पीडयामास पुत्रं वज्रधरात्मजः ।
ततः स बाल्यात्पितरं विव्याध हृदि पत्रिणा ।
निशितेन स्वपुंखेन बलवद्बभ्रुवाहनः ॥

॥ महाभारत ॥

बभ्रुवाहनाचे भात्यांत गंगेच्या शापाच्या वेळची ज्वाळा ( नीलध्वजपत्नी ) बाणरूपानें अर्जुनाचा शिरच्छेद करण्यास्तव बनली होती. तोच बाण बभ्रुवाहनानें घेतला व अर्जुन ठार व्हावा या घोर प्रतिज्ञेनें सोडला. ह्या बाणाचें निवारण करण्याचें साधन अर्जुन विसरून गेला होता, म्हणून श्रीकृष्णाचें स्मरण करूं लागला.

ओवी.

तया बाणाचें निर्वाण । करूं विसरला सुभद्रारमण ॥
श्रेष्ठ पुरुषाचें शहाणपण । कोठें गेलें कळेना ॥ ३ ॥

बभ्रुवाहनाचा बाण सों सों करीत आला व त्यानें पार्थाचें मस्तक छेदून वर आकाशांत उडविलें.

श्लोक.

विवेश पांडवं राजन् मर्म भित्वातिदुःखकृत् ।
महीं जगाम मोहार्तस्ततो राजन् धनंजयः ॥

म. भा.

अर्जुनाचें शीर स्वर्गलोकीं उडालें. तेथें त्यास श्रीकृष्णदर्शन झालें नाहीं. म्हणून तें पुन्हां रणांगणांत आलें व वृषकेतूचें मस्तकाजवळ येऊन पडलें.

ओवी.

तुटोनि शीर तयेवेळीं । पडलें वृषकेताचे जवळी ॥
हरहर म्हणती देव मंडळी । चंद्रमौळी आक्रोशे ॥ ४ ॥

अर्जुन पडल्याचें पाहून देवसमाजास फार हळहळ वाटली व श्रीशंकरास तर फार दुःख झालें. दोघा महा योध्यांचीं मस्तकें पाहून हे चंद्रसूर्यच पडल्याचें वाटलें.

**ओवी.**

**कार्तिक शुद्ध एकादशी । उत्तरा ( भाद्रपदा ) नक्षत्र सौम्य वारेसीं ।**
**संध्याकाळीं पार्थासी । मरण झालें सत्वर ।।** जै. अश्वमेध

अर्जुनाचें मृत्यूनें त्रैलोक्यांत हाहाकार उडाला. देव, ऋषि, गंधर्व वगैरेंना फार मोठें दुःख उत्पन्न झालें. पण बभ्रुवाहनाकडे विजयसूचक वाद्यें वाजूं लागलीं. तो रणांगणांतून मोठ्या थाटानें परतला. त्याची बंदीजन भाट स्तुति करूं लागले. ठिकठिकाणच्या सुवासिनींनीं कुंकुमाक्षतांनीं त्यास ओवाळलें. कांहीं स्त्रिया धांवत धांवत उलूपी–चित्रांगीकडे गेल्या व तुमच्या पुत्रानें फार मोठा विजय मिळविला आहे त्याबद्दल अत्यंत कौतुकानें उत्तम समारंभ केला. रणांगणांत महाबलाढ्य पार्थ वीराचा शिरच्छेद करून तो विजयी झाला आहे ही हकीगत ऐकतांच दोघीही दुःखग्रस्त होऊन पडल्या.

**ओवी.**

**तोडून टाकिती मंगळसूत्रें । म्हणती मस्तकीं घोपा शस्त्रें ।।**
**सौभाग्यहीन आमुचीं वक्त्रें । या कुपुत्रें आजि केलीं ।। ५ ।।**

दोघींना सावध करण्यास्तव दासींनीं प्रयत्न केले व त्या सावध होऊन मोठ्यानें अक्रोश करूं लागल्या. त्यांनीं सौभाग्यचिन्हें, कुंकु व मंगळसूत्रें तोडून टाकलीं. “ दोघी माता मूर्च्छित झाल्या आहेत तरी आपण लौकर चलावें ” म्हणून दासी बभ्रुवाहनाकडे जाऊन त्यास घेऊन आल्या. विजयोत्सवाचें भरतें त्याच्या अंगीं आल्यामुळें येतांच त्यानें दोघी मातांस उठविलें व स्वपुरुषार्थ सांगूं लागला. “ मातुश्री ! शत्रुसैन्याचा मीं एकट्यानें निःपात केला; प्रद्युम्नादि सर्व वीर बांधून आणले; कर्णपुत्र वृषकेत व पार्थाचेंही शिरकमळ तोडून रणभूमीस समर्पण केलें. असा मीं विजय मिळविला असतां माझें कौतुक करण्याचें सोडून तुम्ही दुःखार्त कां झालां ?” असें अप्रिय भाषण ऐकून चित्रांगी अत्यंत क्रोधायमान झाली व म्हणाली; “दुरात्म्या पितृघातक्या ! हें तुझें कृष्णमुख मला दाखवूं नकोस. श्रीकृष्णाचा निजसखा, धर्मराजाचा सहोदर, माझा प्राणेश्वर जो तुझा पिता त्याचा वध करून उलट उत्सव करा असा माझ्या दुःखावर डाग देत आहेस ? नीचा, तुला आतां पुढचा प्रसंग दिसतो काय ? किती तरी पापाचे पर्वत तुझ्या मस्तकावर आदळणार आहेत याचा विचार केलास काय ? कुंत्यादि माता, धर्मादि भ्राते, प्राण देतील; सुभद्रादिक स्त्रियांना वैधव्य प्राप्त झालें; धर्माश्वमेध बंद पडला. अरे दुष्टा, इतका अनर्थ उडवून दिलास त्यापेक्षां तूंच रणांत पतन पावतास तर हे अनर्थ तरी टळले असते. दुष्टा, ज्या महावीरानें मातेच्या व्रतासाठीं स्वर्गापर्यंत बाणांचा मार्ग करून ऐरावत आणला,

ब्रह्मादिकांना जो दुर्लभ तो श्रीकृष्ण ज्यानें निजसखा केला, युद्धांत भीष्म द्रोण कर्ण यांचा ज्यानें धुंव्वा उडविला, त्या महापराक्रमी अर्जुनवीरास मारतांना तुझे हात कसे रे तुटून पडले नाहींत! कुपुत्रा, माझ्या पोटीं येऊन असें वैर साधलेंस, माझें कंठमूल जाळलेंस, इतकें करून सत्काराची इच्छा करतोस? कारट्या, नको नको तुझें तोंड पाहण्यास मी कशी रे जिवंत राहिलें." असें म्हणून अनिवार शोकग्रस्त होऊन ती गडबड लोळूं लागली. आतां सत्वर रणभूमीवर जाऊन प्राणपतीचें शेवटचें दर्शन घेऊ असें उलूपी ह्मणाली. नंतर त्या दोघीही पार्थशिराजवळ आल्या. वृषकेतू व पार्थ यांचीं मस्तकें व धडें पाहून त्यांनीं फार मोठ्यानें हंबरडा फोडला. 'बापास मारून कृतार्थ झालास तसा आमचाही वध येथें कर ह्मणजे तूं पुण्यश्लोक होशील," असें बभ्रुवाहनास बोलून ऊर बडवूं लागल्या, व प्रेतास कवटाळून शोक करूं लागल्या. त्यांच्या शोकावस्थेमुळें तेथील श्वापदांच्याही नेत्रांतून अश्रुधारा चालल्या.

पद-चाल-उद्धवा शांतवन करजा.

सुंदरा वरा नरवीरा । रणधीरा गुणगंभीरा ॥ धृ० ॥
अर्जुना, विजया, नारा-यण मित्रा, पंडुकुमारा ।
शुभवक्त्रा, पंकजनेत्रा, प्रियपात्रा, अति सुकुमारा ॥
जें दिलें शंकरें तुजला, वंचुनिया स्वामिकुमारा ॥
चाल-तें काय पाशुपत झालें । अग्नीचें तेज विझालें ।
मेरूचें शिखर बुझालें । कीं झाला अचेतन वारा ॥सुंदरा०॥१॥
आजि उठा तुम्हि व्हा जागे । विप्रांच्या नेल्या गाई ।
कुरुपती सुभद्रा वरितो व्हा संन्यासी लवलाही ॥
महाराज, जयद्रथ मारा रवि बुडतो अवधी नाहीं ॥
चाल--अवलंबुन कुश्चल पापा । कटकासि लागल्या झोपा ॥
गुरुपुत्रें घातला छापा । लाविली आग शिबिरा ॥ सुंदरा०॥२॥
पुत्राचे अवगुण गेला सांगाया श्री भगवंता ।
कीं कांहीं संशय आला ऐकाया बसला गीता ॥
कीं गेला पाशुपत घ्याया परतून गिरिजानाथा ।
चाल-ये धांवत शौर्यसमुद्रा । दाखवि आत्ममुखचंद्रा ।
या कामिनी यामिनी चंद्रा । म्हणे विष्णुदास उदारा ॥सुं० ३॥

त्या दोघींच्या शोकाची परमावधी झाली. अर्जुनाचे प्रेतास कवटाळून त्या

म्हणूं लागल्या कीं, प्रिय प्राणनाथ ! विराटाचीं गोधनें कौरवांनीं नेलीं आहेत, तसेंच गुरुद्रोणांचा अपमान द्रुपदानें केला त्यासाठीं तरी उठा. श्रीशंकर किरात-वेषानें तुमचे शिकारीचा सूकर नेत आहेत, त्यांचेशीं युद्ध करून तो सोडवा. द्रौपदीचें स्वयंवरास राजे जमले आहेत, तेथील मच्छयंत्राचा भेद करून द्रौपदीस आणा; अग्नीस खांडव वन दिलें आहे, त्यावर शरमंडप बांधून मेघवृष्टीचें निवारण करा, तुमचे मायेला गजगौरीव्रत आहे, त्यासाठीं स्वर्गमार्गात बाणांचा रस्ता तयार करून ऐरावत आणा; प्राणेश्वरा, तुमचे काय काय गुण आठवावे ? प्रत्यक्ष पुत्र कुमार कार्तिकस्वामीस जें दिलें नाहीं तें महातेजस्वी पाशुपत शंकरांनीं तुम्हांस दिलें, तें तेज आज कसें हो विझलें ? दुर्योधनसुभद्राविवाह होऊं घातला आहे, तरी आपण संन्यासी वेषानें जाऊन सुभद्रेचें हरण करा. महाराज, सूर्य अस्ताचलास जात आहे, करितां सत्वर उठून जयद्रथवध करा; महापापाचें अवलंबन करून अश्वत्थाम्यानें तुमचीं पांच लेंकरें चराचर कापून शिबिरास आग लाविली आहे, त्यास बांधून आणतांना ? दुष्ट दुरात्मा बभ्रुवाहनाचे अवगुण सांगण्यास श्रीहरीकडे गेलां किंवा संशयनिवृत्तीसाठीं गीताश्रवणास व्रतस्थ होऊन बसलां आहांत ? प्रिय आत्मेश्वरा शौर्यसागरा, चद्दिशी उठून आपला तेजःपुंज मुखचंद्रमा आम्हांस पाहूं देतां ना ? अशा प्रकारें त्या भयंकर शोकसागरांत निमग्न झाल्या.

पुन्हां पुत्रास म्हणतात–कुपुत्रा, खला, नष्टा, पूर्वीं परशुरामानें एका आईचा वध केला होता, आतां तूं चार मातांचा वध कर. आम्हीं धर्मयज्ञास जावें व डोळे भरून अश्वमेध पाहावा. सर्वांस वंदन करावें, सुभद्रा–द्रौपदींना भेटून त्यांना वस्त्रालंकार देऊन गौरव करावा; देवकी–कुंत्यादि सास्वांची सेवा करावी, अशा आशेचें आमचें वन दुष्टा तूं जाळून दग्ध केलें आहेस.

पद–चाल–रुचती कां तीर्थयात्रा०

तुम्ही कां हो प्राणनाथा स्नेह आमुचा सोडिला ।
कां एकाएकी फांसा प्रेमाचा तोडिला ॥ ध्रु० ॥
न्यायाचा पंथ सारा अन्यायें मोडिला ।
तरि सांगा संग कोण्या नारीचा जोडिला ॥ तु० ॥ १ ॥
गंधाची उटि अंगा लावितां पोळती ।
कंठींचे हार मोती क्षितिवरती लोळती ॥
मुखकमलीं ग्रास घेतां पुढें मागें घोळती ।
दुःखाचा वृक्ष माथा मोडोनि पाडिला ॥ तु० ॥ २ ॥
चित्तींचे हेतु सारे चित्तींची राहिले ।

प्रेमानें प्रेमपाशीं मन माझें मोहिलें ॥
काय नष्टा ब्रह्मदेवा लल्लाटीं लीहिलें ।
म्हणे विष्णुदास सारा रस पंकीं ओतिला ॥ तु० ॥ २ ॥

बभ्रुवाहनानें उभे राहून विनीतपणें मातांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला व म्हणाला, बापाचा वध करणारा मी घोरपातकी झालों, कीर्ति व स्वर्ग यांस अंतरलों. आतां मला देव, तीर्थें, यज्ञ, तपें, दानें, कोणीही पावन करणार नाहींत. देह जाळीन म्हटलें तरी अग्नि मला पितृघातक्यास स्पर्श करणार नाहीं. श्रीकृष्णपरमात्म्याच्या निजसख्याचें मस्तक मीं तोडलें यामुळें तो क्रोधदृष्टीनें मला जाळील व मला अखंड नरकवास प्राप्त होईल. उदकांत प्राण द्यावा तर उदक हें नारायणाचेंच स्वरूप असल्यामुळें मज दुरात्म्यास बुडवूं शकणार नाहीं. मला आतां माझ्या प्रिय मातांचें अंतर पडणार ! ईश्वरा, यापुढें माझी कायरे गति होणार आहे !

पद--चाल-माझ्या मनिचें हितगुज.

आतां मी दैवा काय दाखवूं हें मुख कृष्णाला ।
म्यां दुष्टानें कुलभ्रष्टानें वधिलें बापाला ॥ ध्रु० ॥
दुष्कृत सगळें त्रिभुवन अगळें जोडिलें पापाला ।
संकटिं पडलों वैरिचि झालों मीं आपआपणाला ॥ म्यां. १ ॥
मूळ न्यायाचें अन्यायाचें असेल सकळ कळलें ।
परि मन पार्थाच्या प्रितिकारितां जाईल कळवळलें ॥
विष्णुदास म्हणे हृदयनिवासा दाखवि चरणाला ॥ म्या. २ ॥

श्लोक--यदि नो तिष्ठति जयः पिता मे नरसत्तमः ।
अस्मिन्नेव रणोद्देशे शोषयिष्ये कलेवरम् ॥ म. भा.

शा. वि.-बापाचा जिव संभ्रमांत असतां म्या कापिला कीं गळा ।
केला हा अपराध थोर परशूरामाहुनी आगळा ॥
या दुःखें विरहज्वरांत जननी आक्रंदुनी क्षोभली ।
आहे यास्तवची सशास्त्र मजला प्राणांतशिक्षा भली ॥ १ ॥

श्लोक--वीरं हि क्षत्रियं हत्वा गोशतेन प्रमुच्यते ।
पितरं तु निहत्यैवं दुर्लभा निष्कृतिर्मम ॥ म. भा.

नंतर बभ्रुवाहनानें अग्निकुंड पेटवून त्यांत प्राण समर्पण करण्याचा निश्चय केला. हें पाहून उलूपी म्हणाली, पार्थाचा जीव वांचवण्याचा कांहीं उपाय न झाल्यास तूं अग्निप्रवेश कर.

ओवी.

उलूपी बोले सावधान । माझ्या पित्यापासी प्राणदान ।
दाता समर्थ मणिनिधान । आहे जाऊन आण जा ॥ १ ॥

उलूपी म्हणाली, पाताळांत मत्पिता शेष वासुकीचे जवळ संजीवक मणी आहे तो आणला तर हे वीर वांचतील. त्या मण्याचें रक्षण विक्राळ सर्पकुळ करीत आहे. तथापि माझा दूत पुंडरीक जाईल तर तो मणी घेऊन येईल. मग पुंडरीकास हांक मारून तिनें बापाकडे जाऊन त्यास सर्व वृत्तांत कळवून मणी आणण्यास सांगितलें. पुंडरीक म्हणाला मी मणी आणीपर्यंत दोघांचीं प्रेतें मात्र संरक्षण झालीं पाहिजेत. श्वापदें वगैरे त्यांस त्रास देतील तरी मी त्यांस दंश करतों म्हणजे त्यांना इजा पोंचणार नाहीं असें म्हणून पुंडरीकानें प्रेतांस दंश केला. ( हल्लींही इंजेक्शन करून प्रेतें संरक्षण करतात. प्रेतांत एक प्रकारचें विष घालतात त्यामुळें प्रेतें सडत नाहींत. पुंडरीक सर्पवंशांतील होता. त्यानें दंश करून आपलें विष प्रेतांत घातलें. त्याचप्रमाणें पुंडरीकानें त्या कालीं इंजेक्शनच केलें. ) व पाताळांत जाऊन शेषाची भेट घेऊन सर्व वृत्तांत निवेदन केला.

पद--( चाल-थोर तुझे उपकार. )

बुडाला तो नरवर मित्र बारे बा ॥ धृ० ॥
गांडिवधर खांडवदाहक जो, पांडवरणछत्र ॥
बारेबा पांडव० ॥ बु० १ ॥
वानरध्वज विजयी कुंतीचा, जो तिसरा पुत्र ॥ २ ॥
कृष्णेचा पति श्रीकृष्णाचा, जो प्रियकर मित्र ॥ ३ ॥
युद्धप्रसंगे प्रसन्न ज्याला, झाला त्रीनेत्र ॥ ४ ॥
तत्पुत्रानें रणधर्में त्या-वरि धरिलें शस्त्र ॥ ५ ॥
श्रीगंगेच्या शापे भुलला, रणविद्या मंत्र ॥ ६ ॥
जें न घडावें तें अजि घडलें, झालें विचित्र ॥ ७ ॥
तव कन्येचें निश्चित तुटलें, पहा मंगलसूत्र ॥ ८ ॥
संजीवनि मणी देऊनि मिळवी, हें यश सुपवित्र ॥ ९ ॥
विष्णुदास म्हणे धन्यचि म्हणतिल, सुरनर सर्वत्र ॥ १० ॥

याप्रमाणें सर्व वर्तमान त्यास सांगितलें. श्रीकृष्णाचा सखा, माझा जामात अर्जुन त्याचेसाठीं जरूर मणी घेऊन जा. माझ्या कन्येचें वैधव्य मला पाहवणार नाहीं, असें म्हणून शेष मणी द्यावयास तयार झाला. परंतु इतर नाग

तसें करूं देईनात. धृतराष्ट्र हा दुष्ट बुद्धीचा भयंकर सर्प होता, त्यानें तर फारच तक्रार केली, व मणी जर मृत्युलोकीं दिला तर मग आमचें जीवितच संपेल, मग आम्हीं निस्तेज होऊं व आमचे दांत पाहून भिकारी लोक आमच्यावर पोटें भरतील, यास्तव मणी साफ देऊं देणार नाहीं असें सांगितलें.

आर्या.

धृतराष्ट्र म्हणे राया सहसा नोहेचि बुद्धि ही शहाणी ।
संजीवनि मणि देतां होइल अमुच्या कुलासि यशहानी ॥ १ ॥
शेष म्ह०—देतों मणी परंतू यातें हे सर्व विघ्न करतात ।
रुदित कपाळीं देउनि बसला तेथें सखेद कर तात ॥ २ ॥

शेषानें धृतराष्ट्रादिकांस सांगितलें कीं, ज्याचा सखा श्रीकृष्ण परमात्मा आहे त्याच्या फक्त कृपादृष्टीनेंच ते उठतील मग आपला मणी न देऊन आपण थोरपणा तरी कां गमवावा ? परंतु दुष्टांना हे कांहींच न रुचतां त्यांनीं मणी देण्यास जोराचा विरोध केला.

पुंडरीक रिकामा आल्याचें पाहून उलूपी व चित्रांगीनें अत्यंत शोक केला. मणी देत नाहींत हें समजून बभ्रुवाहन परमकोपायमान झाला व सर्व सैन्यास आज्ञा देऊन पाताळास जाण्यास निघाला. त्याची माता म्हणाली, त्या विखार नागलोकांत तुझा टिकाव लागणार नाहीं. यावर तो म्हणतो—एवढा धनंजय पार्थवीर त्याची जर ही स्थिति मजकडून झाली तर पाताळांतील किरडांची काय बिशाद आहे ? त्यांना जिंकून आतांच मणी घेऊन येतों. चित्रांगी म्हणाली, पण बाळा, जोपर्यंत हस्तनापुराहून श्रीकृष्ण, कुंती वगैरे आले नाहींत तोपर्यंत लौकर मणी घेऊन ये.

बभ्रुवाहन मोठ्या क्रोधावेशानें पाताळांत गेला व सर्प सेनासागराशीं युद्ध करूं लागला. सर्पांचे विषाच्या फूत्कारामुळें भराभर बभ्रुवाहनाचें सैन्य जळूं लागलें. मनुष्य सर्पांचें युद्ध इंद्रादिक सुरवर विमानांतून पाहूं लागले त्यावेळीं फार भयंकर युद्ध सुरूं झालें. जय कोणास मिळेल याचा निश्चयच होईना. सर्पकुलानें बभ्रुवाहनाचें सैन्य घायाळ केलें असें पाहून बभ्रुवाहन जमदग्नीवत् अतिशय कोपला.

पद पुरवणी.

तो केवळ सुत जमदग्नि । महा प्रलयाग्नि,
चढला कोपा । जाळाया महितळ खोपा ॥
अगणित फणिवर शर सुटति तटतट तुटति ।
उडति तोफा खळ म्हणति युद्ध आटोपा ॥

न्हाणिलें मातृकुल बंधु । लवंडिला सिंधु,
मधाचा डोफा । शर चाप कवच शिर टोपा ॥
पिपिलिका मयुर नकुलाचें । अस्त्र गरुडाचें,
संकल्पे योजी । जन्मेजय म्हणे वाहवाजी ॥ ६ ॥

तो अहिपति झडकरि येउनि । धरित आलिंगुनि,
बभ्रुवाहनातें । आजाचें दर्शवुनि नातें ॥
पौत्रासि म्हणे रुष्टानि । बळें दुष्टानि,
केलें कद्नातें । बुडवाया आप्त सद्नातें ॥
कन्येसि सांग लवलाहि । करुं नको कांहीं,
अतां रुद्नातें । सुखें पहा पतिवदनातें ॥
फणिवर मणि घेऊनि संगें । निघाला वेगें,
त्यजुन दावाजी । जन्मेजय म्हणे वाहवाजी ॥ ७ ॥

बभ्रुवाहनानें बाणवृष्टि केली. त्या बाणांनीं सर्पांचे अंगास क्षतें पडलीं. मग मधुअस्त्र सोडून सर्पांचें सर्व अंग मधमय होतांच पिपिलिकास्त्रानें त्यांच्या क्षतांत सुद्धां असलेला मध खाण्यासाठीं असंख्य मुंग्या प्रत्येकाचें शरीरास लागल्या, त्यामुळें सर्पांचें सर्व अवसान थंड झालें व त्यांना चळवळ सुद्धां करतां येईना. पुन्हां मयुरास्त्र सोडून सर्पांचीं पोटें तडातड मयूर फाडूं लागले. नंतर त्यांनें नकुलास्त्र सोडलें. त्या अस्त्रानें भराभर सर्पांचीं खांडोळी चालविलीं. याप्रमाणें सर्पकुलाचा फन्ना होत असलेला पाहून शेष म्हणाला, पूर्वींच जर मणी दिला असता तर हा मानवांकडून अपमान झाला असता काय ? मूर्ख धृतराष्ट्रानें एवढा नाश केला आहे. अर्जुन हा हरिभक्त आहे, त्याचे साठीं मणी नाहीं द्यावयाचा तर कोणा दुष्टासाठीं मणी पाहिजे ? आतां हरिभक्ताला शरण होऊन सर्वस्व समर्पण करूं. असें म्हणून हातांत संजीवक मणी घेऊन अपार वस्त्रालंकारासह बभ्रुवाहनाजवळ सर्व सर्पकुल आलें व वस्त्रालंकार समर्पण केले व क्षमा असावी अशी त्याची प्रार्थना केली. शेषराज मण्यासह बभ्रुवाहनाबरोबर मणीपुरास येऊन दाखल झाले. इकडे कुबुद्धि धृतराष्ट्रानें आपल्या दुर्बुद्धि व दुर्भाव या दोन पुत्रांस या मानवांचा सूड घेण्यास सांगितलें. पण यास हें काय माहीत कीं, हरिपरमात्मा त्यांच्या पाठीशीं आहे. या दोन सर्पपुत्रांनीं रणांतून वृषकेतु व अर्जुन यांचीं शिरें पळवून भयंकर निर्जन प्रदेशांत प्रयाण केलें.

साकी.

गेला फणि मणी घेउनि संगें वृषकेत पार्थ उठवाया ।
तें कळतांचि गमला गेला संचित धन घटवाया ॥
नष्टा धृतराष्ट्रा । चैन नसेची दुष्टा ॥ १ ॥
त्या दोघांची मग शिरकमळें पुत्राहातीं लपवी ।
कां न करिल श्रीहरि कृपेचें तत्शिर तिळतिळ पवी ॥
सर्वांतर साक्षी । जो अणुरेणू लक्षी ॥ २ ॥

शेष व बभ्रुवाहन मणी घेऊन आले. पण पाहतात तों शिरें नाहींत. हें पाहून कोणा दुष्टानें वल्लभाचें शीर नेलें असें म्हणून त्या स्त्रिया पुनः अत्यंत शोकाकुल झाल्या व दोघांचीं मस्तकें नाहींत हें पाहून बभ्रुवाहनही मूर्छित झाला.

पद–धुमाळी–साधी–अभंगाची चाल.

काय विचित्र गति दैवाची । सारी तळमळ व्यर्थ जिवाची ॥ ध्रु० ॥
भस्मासुर कंकर पामर परी । पुरविली पाठ शिवाची ॥ सारी० ॥ १
कनकमृगाला पाहुन भुलली । जानकी स्त्री राघवाची ॥ सारी० ॥ २
दैवगतिनें अपूज्य झाला । जो वेद चौमुखें वाची ॥ सारी० ॥ ३ ॥
अजि विजयाला अपजय आला । मर्जी ही प्रभु केशवाची ॥सारी०॥ ४
विष्णुदास म्हणे देवहि नाडति । परवड किती मानवाची ॥सारी०॥ ५

"गहना कर्मणो गतिः" हें गीतावाक्य येथें अनुभवास येतें. सारांश ईश्वरी इच्छेच्या पुढें मानवाची तळमळ कांहीं कामाची नाहीं.

अभंग.

आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना ॥ १
हरिश्चंद्र ताराराणी । वाही डोंबाघरीं पाणी ॥ २
चौधे पुत्र दशरथा । अंतकाळीं एकही नव्हता ॥ ३
पांडवांचा साहाकारी । राज्यावरूनि केलें दूरी ॥ ४
तुका म्हणे उगे रहावें । जें जें होइल तें तें पाहावें ॥ ५

देवाचें जें मनोगत । तेंचि मानावें आपुलें हित । हें समर्थाचें वाक्य निरंतर ध्यानांत ठेवूनच वागणें जरूर आहे.

श्लोक.

त्या कालीं इकडे विचित्र पडलें कुंतीस दुस्वप्न तें ।
केलें चर्चित तैल सर्व शरिरीं स शोनिया वस्त्र तें ॥

गेला लक्षुनि पार्थ दक्षिण दिशा बैसोनि उष्ट्रासनीं ।
वैधव्यीं ललना--घरी उतरली लग्नार्थ आष्ट्रासनी (?) ॥ १

ज्या दिवशीं पार्थवीर रणांगणांत पडला त्या दिवशीं हस्तनापुरांत कुंतीस अशुभदायक स्वप्न पडलें. तें जागृत होऊन श्रीकृष्ण व धर्मराजास तिनें निवेदन केलें. ती ह्मणाली, देवा, मला स्वप्न पडलें तें--अर्जुन तेलाचे विहिरींत पडला व नंतर उंटावर बसून दक्षिण दिशेस जात आहे, त्याच्या सर्वांगास शेण फांसलें आहे व तांबडया जास्वंदीच्या फुलांच्या माळा गळ्यांत घातल्या आहेत. या स्वप्नावरून ममात्मज प्रियपार्थ खास विद्यमान नाहीं, असें म्हणून कुंती मूर्च्छित झाली. श्रीकृष्णास हें वृत्त समजतांच पार्थाबद्दल त्यास अत्यंत शोकावेग आला. तो आवरून गरुडाचें स्मरण केलें, व गरुड येतांच कुंती, रुक्मिणी, देवकी, सत्यभामादि स्त्रिया, भीमसेनादि वीर यांसह श्रीकृष्ण परमात्मा गरुडावर बसून मनोवेगानें मणीपुरच्या रणांगणांत आले.

पद पुरवणी.

गरुडारुढ होउनि श्रीपति, वृकोदर कुंति, घेउनी संगें ।
मणिपुरासि आला वेगें ॥
गंगेचा शाप संकेत, पार्थ वृषकेत, शिराविण दोघे ।
पहुडले अचेतन अवघे ॥
स्वप्नानुभव दिसला चोख, देखिले शोक करितां चौघे ।
त्या रसाचि हरिही चव घे ॥
वृत्त कथुन पार्थसुत तदा, म्हणे मज वधा, आधीं देवाजी ।
जन्मेजय म्हणे वाहवाजी ॥८॥

रणांगणांत पाहतात तों जिकडे तिकडे शोकसागरास पूर आलेला दिसला व पुढें पाहतात तों पार्थकलेवरासभोंवती स्त्रिया व पुरुष बसून शोकाकुल झाल्याचें पाहिलें. मग त्वरित गरुडावरून उतरले व पाहिलें तों वृषकेत व पार्थशवें मस्तकावांचून दिसलीं. हें भयंकर दृश्य पाहतांच कुंतीनें हा पार्थ, हे वृषकेत म्हणून फार मोठयानें दुःखाची किंकाळी फोडून ती मूर्च्छित पडली. श्रीकृष्णांनीं तर मोठा हंबरडा फोडला व मीं आतां कोणाकडे पाहून दिवस कंठावे ? मी आतां कोणाचें सारथ्य करूं, जिव्हारीची गोष्ट, जिवलगा, तुजवांचून कोणास सांगूं. मत्प्रियप्राणसख्या जिवलग अर्जुना, माझें हृदय आतां कोणाजवळरे उघडें करूं. ऐन युद्धप्रसंगींही माझा गीतोपदेश आतां कोणरे ऐकणार ! असें म्हणून देव व सर्वच शोकाकुल झाले. ज्या ठिकाणीं रक्ताच्या

नद्या वाहिल्या त्या ठिकाणीं त्याच्या पुढचा प्रसंग दुःखाश्रूंचे लोट वाहण्यांत झाला ! ! कांहीं वेळानें दुःखावेग कमी झाल्यावर भीमसेन म्हणाला, देवा, तुझ्या दारुण अवकृपास्त्रानें पार्थ मारला गेला आहे, त्याशिवाय दुसऱ्याकडून पार्थ मरणार नाहीं. शोक करणें हा मनुष्यधर्म आहे; तूं तर कैवल्यधाम आहेस. शोक करूं नको. असें म्हणून भीमसेन दुःखानें संतप्त झाला व कोणा दुष्टानें शामकर्ण धरून माझ्या बंधूचे प्राण हरण केले, त्याच्या नरडीचें रक्त प्राशन करतों असें म्हणून गदा हातांत घेतली.

दोघी मातांसह बभ्रुवाहन मूर्च्छित होता, तो श्रीकृष्णांनीं सावध केला. बभ्रुवाहनानें कुंत्यादि स्त्रिया शोकारूढ झालेल्या, भीमसेन क्रोधानें संतप्त झाला आहे व श्रीकृष्ण दुःखाश्रु टाकीत आहे असें पाहून तो श्रीकृष्णास बोलूं लागला, मी महाखळ पातकी दुरात्मा आहे, म्यां दुष्टानें ससैन्य पितृवध केला; पाताळांत सर्प जिंकून संजीवक मणी आणला. पण पार्थ व वृषकेत यांचीं शिरेंच कोणी दुष्टानें नेलीं हें कळत नाहीं. आतां देवा, तूं आपल्या हातांतील सुदर्शनानें माझा शिरच्छेद कर. मीं चांडाळानें पित्यास मारून महा नरकाची जोड मिळविली आहे, पण तूं नरकांतून तारणारा आहेस. तरी माझें मस्तक तोडून मला मोक्षाची जोड करून दे.

दिंडी.

**मंद भाग्याच्या लाभ न ये हाता ।**
**पितृहत्येचें पाप आलें माथा ॥**
**आतां कोण तारिल या अनाथा ।**
**तुझ्यावांचोनी सांग रमानाथा ॥ १ ॥**
**जे जे केले ते यत्न गेले वाया ।**
**नाहीं धीर वृत्तांत निरवाया ॥**
**आहे सर्व ठाऊक तुझ्या पाया ।**
**तूंचि वारी श्रीहरी या अपाया ॥ २ ॥**

मीं बापाचा वध करून मातांना वैधव्यदुःख दिलें; प्रत्यक्ष देवा, तुलाही प्रियाचे वियोगाचा शोक घडविला. असा जो मी पातकी त्या मला अजून कां संरक्षण करतोस ? देवा, त्वरा कर व यापुढें माझें कृष्णवदन कोणाचेही दृष्टीस पडूं नये यासाठीं लौकर माझा शिरच्छेद कर. जगद्गुरो कृष्णनाथा, काय सांगूं, तुझ्या जिवलग सख्याचें भक्तिप्रेम ! पार्थाचे तुटलेल्या मुखांतूनही कृष्ण कृष्ण हा ध्वनी सारखा निघत होता. धन्य तुम्हां देवभक्तांची. अशा सद्भक्ताचा—पित्याचा—वध केला तरी माझा देहाभिमान केवढा आहे हें तुला प्रत्यक्ष दिस-

तच आहे, या देहावर माझें ममत्व फार आहे ह्मणून एवढा घोरतर अन्याय करूनही अझून हा देह माझ्यानें सोडवत नाहीं. तरी आतां तूं " पवित्राणां पवित्र " आहेस. तरी प्रत्यक्ष तूं आपल्या हातानें उशीर न लावतां सुदर्शनानें माझा देहाभिमान देहासह छेदन कर. असें ह्मणून दीन होऊन श्रीकृष्णचरणीं मिलिंदायमान झाला.

कुंती वगैरे मातांनीं हा पार्थ, हा बाळ वृषकेतो ! ह्मणून टाहो फोडला. त्यांच्या शोकानें त्या ठिकाणचे जीवजंतु देखील शोकाकुल झाले. श्रीशेष श्रीकृष्णास ह्मणाला देवा, सर्वस्वी " पांडवानां हितार्थाय " तुझा अवतार आहे. तरी आतां अंत कां पाहतोस? " परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां " साधूंचें रक्षणार्थ व दुष्टांचें हननार्थ आपला अवतार आहे. तरी दोन्हीं मस्तकें आणवून त्या बरोबर मस्तकें चोरणारांचीं मस्तकें धडापासून वेगळीं करण्याचें सर्वस्वी तुझें सामर्थ्य आहे. तर सद्गुरो श्रीगोपाळकृष्ण परमात्म्या, आतां कृपादृष्टि कर, तुझ्या अमृतमय दृष्टीपुढें संजीवक मण्याची मुळींच प्रतिष्ठा नाहीं.

**श्लोक—या काळीं वृषकेतअर्जुनशिरें येतील युध्दस्थळीं ।**
**चोरांचीं पडतील शीघ्र तुटुनी आधीं शिरें भूतळीं ॥**
**भोगातीत खरा असेन शुकसा मी ब्रह्मचारी जरी ।**
**श्री मच्छध्वजतात गर्जुन म्हणे होईल ऐसें तरी ॥१॥**

नंतर श्रीकृष्णानें श्रीशंकरस्मरणपूर्वक प्रतिज्ञा केली कीं, जर शुक, हनुमानासारखें माझें ब्रह्मचर्य असेल; जर मी भोगातीत असेन, तर हीं मस्तकें नेणाऱ्या दुष्टांचीं मस्तकें गळून पडून या दोघा वीरांचीं मस्तकें आतांच येथें येतील. ही प्रतिज्ञा होतांच तात्काळ धृतराष्ट्रपुत्रांचा वध होऊन दोन्हीं शिरें तेथें आलीं. तीं शिरें पाहतांच सर्वत्र आनंदाचें भरतें आलें.

( धन्य गोपाळकृष्ण व धन्य ते वीर पाण्डव ! सोळासहस्त्र एकशें आठ स्त्रिया व गोकुळांतील विलास हें इतकें गृहस्थाश्रमाचें दृश्य असतां ब्रह्मचर्यही कसें, हा प्रश्न फार थोर आहे. अमर्याद परब्रह्मास जरी कृष्णमूर्ति हा मर्यादित देह होता तरी सुवर्णालंकार न्यायानें अलंकारांत सुवर्ण अंतर्बाह्य होतेंच. तसेंच अमूर्ताचे गुण सर्वस्वी मूर्तांत होते.

**आतां कर्ता कर्म करावें । हें खुंटलें तया स्वभावें ॥**
**आणि करी जरि आघवें । तरि अकर्ता तो ॥ ज्ञा. ॥**

याप्रमाणें ज्याचें ठिकाणीं अकर्तात्मबोध पुरतेपणीं राहिला आहे, बोध आत्मप्रतीतीत उतरला आहे, त्याचेंच सामर्थ्य श्रीगोपाळकृष्णप्रतिज्ञारूपानें दिसतें. यासाठीं प्रत्येक व्यक्ती, समाज, राष्ट्र ही या अकर्तात्मबोधावर श्रीकृपे-

करून आरूढ व्हावयास पाहिजे. वेदांतविचारानें व भक्तीच्या साधनानें संतांनीं राष्ट्र दुबळें करून ठेविलें असें निरर्गल प्रलाप काढणारांस हीच विनंति आहे कीं, महाराज, आपण एकवार अकर्तात्मबोधाचें अधिष्ठान गांठा व मग पहा भोग भोगूनही ब्रह्मचर्य कसें राहतें व अर्जुनाचें मस्तकही कसें परत येतें. अस्तु, आम्हांस तर या ठिकाणीं या देवभक्तांचें निःस्सीम प्रेम हेंच सर्व सुखाचें अंतरंग आहेसें वाटतें. विषयांतराची श्रोते क्षमा करतीलच. )

नंतर श्रीकृष्णपरमात्म्यानें मण्याचा सन्मान ठेवण्यासाठीं मणी जवळ घेतला व वृषकेताचें धड व शीर एकत्र करून मणी लावला व आपल्या इच्छाशक्तीनें त्यास जिवंत केलें. कृष्णस्मरण करीत " सांभाळ आपला देह " असें ओरडत उठला त्यास श्रीकृष्णांनीं आलिंगन दिलें व प्रेमाश्रूंनीं न्हाऊं घातलें. भीमसेन म्हणाला, देवा, ज्याचें अंतःकरणांत कृष्णमणी आहे त्यास संजीवक मणी कशाला ? तथापि तूं त्यास मान देत आहेस, हें उत्तमच आहे.

**" कंठीं धरिला कृष्णमणी । अवघा जनीं प्रकाश " तुका० ॥**

नंतर पार्थाचें धड व शीर एकत्र जमवून त्यास मणी श्रीकृष्णांनीं स्वहस्तें लाविला व सद्गदीत अश्रुपूर्ण नयन होऊन म्हणाले, सख्या ऊठ ! किती निद्रा घेणार ? इतकें बोलतांच कृष्ण कृष्ण नाम जपत अर्जुन उठला. तों पुढें श्रीकृष्ण माउली पाहतांबरोबर लहान वासराची माय सायंकाळीं घरीं यावी व वासरानें तिजकडे धांवत जाऊन जसें स्तनास लागावें तसा पार्थानें मोठा हंबरडा फोडून श्रीकृष्णचरणीं घट्ट मिठी मारली. देहभान सुटून क्षणभर श्रीकृष्ण माउलीशी समरस झाला. लगेच अर्जुनास उठवून देवानें त्यास आलिंगन दिलें.

**मग सांवळा सकंकणु । बाहू पसरोनि दक्षिणु ।**
**आलिंगिला स्वशरण्यु । भक्तराजू तो ॥**
**दीपें दीप लाविला । तैसा परिष्वंगु[1] तो झाला ॥**
**द्वैत न मोडतां केला । आपणपें पार्थु ॥**
**तेव्हां सुखाचा मग तया । पूरु आला जो धनंजया ।**
**तेथ वाड[2] तरी बुडोनियां । ठेला देवो ॥**
**सिंधु सिंधूतें पावों जायें । तें पावणें ठाकें दुणा होयें ॥**
**घरी रिगें पुरवणीये । आकाशही ॥**
**तैसें तयां दोघांचें मिळणें । दोघां नाव्रें जाणावें कवणें ।**
**किंबहुना श्रीनारायणें । विश्व कोंदलें ॥**

ज्ञानेश्वरी अ. १८ श्लो. ६६

---

१ आलिंगन. २ व्यापक.

श्री ज्ञानेश्वर माउलीनीं देवभक्तांच्या आलिंगनाचें सदर ओंव्यांत वर्णन दिलें आहे त्यापेक्षां दुसऱ्या भाषेनें काय वर्णन करावें ? या देवभक्तांच्या प्रेमरसांत स्वानंदसुखासही विश्रांति मिळाली. विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखः या वृत्तीचा अनुभव येत आहे. धन्य धन्य वीर पार्थ. नंतर आपल्या कृपामृतदृष्टीनें भगवानांनीं सर्व वीर ससैन्य उठविले. त्यावेळीं सर्वत्र जयजयकार होऊन देवांनीं अपार पुष्पवृष्टी केली व दुंदुभी वाजविल्या. अर्जुनानें भीमसेनास वंदन केलें. कुंतीनें अर्जुनाचे मुखावरून हात फिरविला व बाळा, तूं फार रे शिणलास म्हणून प्रेमाश्रूंनीं त्यास भिजविलें. देवकी वगैरे स्त्रिया व प्रद्युम्नादि वीरांस त्यानें आलिंगन दिलें. त्याचप्रमाणे वृषकेतूनेंही सर्वांस वंदन केलें. त्यावेळीं प्रेमानंदसागरास जें भरतें आलें तें वर्णन सहस्त्रवदन शेषासही होणार नाहीं.

वृषकेतासह त्या समई, उठला विजयी,
हर्ष कुंतीला । कैवल्य गमे नको तीला ॥
सप्रेमानंदें आलिंगुनि, मस्तक हुंगुनि,
उतरि मातीला । साखरी मुलामा तीला ॥
त्वत्शोकें रडे जी वधू, तुझा कर मृदु,
शांत करो तीला । नको करूं आतां रोतीला ॥
कृष्णाज्ञा ही समजावी, पुत्र समजावी,
त्यजुन दावाजी । जन्मेजय म्हणे वाहवाजी ॥ ९ ॥
उठले स्वसैन्यें भूप, म्हणति अपरूप,
रंग रण रंगा । भेटती सकल श्रीरंगा ॥
हरिकरुणामृत रसपर्व, प्राशिती सर्व,
ब्रह्मपद संगा । सुखसमुद्रिं मिळाल्या गंगा ॥
म्हणे विष्णुदास बहु विमळ, प्रभुपद कमळ,
तेथें आभंगा । या मिळो सदाश्रय भृंगा ॥
हा हरिल भवाब्धीभाग, कथामृतभाग,
सांग गावाजी । जन्मेजय म्हणे वाहवाजी ॥ १० ॥

सर्व वीर ह्मणूं लागले "पार्थवीरा, तुझा साह्यकर्ता श्रीकृष्णपरमात्मा व बभ्रुवाहनासारखा सत्पुत्र तुला लाभला आहे यामुळें तूं फार धन्य आहेस.

" सर्वतोजयमन्विच्छेत् शिष्या—( पुत्रा )—दिच्छेत् पराजयम् "
' शिष्योऽपि पुत्र उच्यते ' ॥ ( अपूर्ण )

## पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ॥८ व्ही. पी. नें ॥१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं ६. १॥८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ॥१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ॥४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेंपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ॥१२.

६. **नारदभक्तिसूत्रेंः**—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांना अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकास भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे किं. ॥८. ( आवृत्ति ४ थी )

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचे नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ॥६.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग २ व ३ किं. १॥ ६.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळे ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १॥८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १॥८.

मुमुक्षु REG. No. B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी के० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. कि. ०५.

१२-१३. मुमुक्षूंतील निवडक निबंध ( भाग १-२ ):-कि. प्रत्येकीं रु. १०८

१४. मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. कि. रु. १०१२.

१५. पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. कि. ०८

१६. श्रीतुकारामचरित्र:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिक-ठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे वगैरे असे सात फोटो, तुको-बांचीं भरपूर अवतरणें इ० सह. कि. रु. २.

१७. श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भावि-कांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. कि. ०५.

१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून माले-वर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. कि. ०१०.

१९. मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदा-हरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख-होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. कि. रु. १.

२०. मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ):—कि. ०४.

२१. सार्थ श्रीदासबोध:—कि. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

२२. सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. कि. ०१२.

२३. समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें अशा चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० कि. रु. २.


२४. मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—कि. रु. २०४.

२५. श्रीएकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचे, आवृत्ति तिसरी ):—कि. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ( श्रीरामदास )


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २२ वें<br>मास २ | कार्तिक १८५०<br>नोव्हेंबर १९२८ | नवें वर्ष ८ वें<br>अंक ११ वा |



संपादक व प्रकाशक,

## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३।८२

मुद्रकः–लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनी पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३०० येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १ |
| २ मुकुंदराज ( अपूर्ण ) ... ... ... | ३–१२ |
| ३ टकूताईंचा ग्रंथ ... ... ... | १२–१९ |
| ४ सामराजकवीचा काळ ... ... ... | २०–२९ |
| ५ सहजोद्गार ... ... ... | २९–३४ |
| ६ परमामृतांतील उत्कृष्ट उतारे ... ... ... | ३५–३८ |



# भक्तिमाणिमाला.

संपादकः—ल. रा. पांगारकर, बी. ए.

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृत--मधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्राय: त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमाणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५० किंमत १॥ रु. व्ही. पी. नें १०१३.

पत्ताः—व्यवस्थापक मुमुक्षु, पुणें.



## शारदास्तवन.

ओंव्या.

श्री सरस्वती-फल-संभारी । कला-लतिका अति साजिरी ।
ज्ञानगंगा जे ब्रह्मगिरी । वेष ब्रह्मकुमरीचा ।। १ ।।
त्रैलोक्य-लावण्य-नगरी । शृंगार श्रीपर्वत-भ्रमरी ।
साहित्यबाणलिंगाचे शिखरीं । विशाळ नदी नर्मदा ।। २ ।
प्रमेयपोतासाची[1] रंभा । विद्या मूळपीठ जगदंबा ।
चातुर्य-सौभाग्याची शोभा । कुलस्वामिनी कवीची ।। ३ ।।
नवरसांची मंदाकिनी । महिमे वाटे त्रिभुवनीं ।
त्रैलोक्यातें वरदायिनी । देवत्रया पढियंती ।। ४ ।।
निगमकामधेनूच्या उदरीं । सार नवनीत दुरीच्या दुरी ।
दोहन-मंथनावांचोनि सत्वरीं । दे अज्ञानबालका ।। ५ ।।
तेच सुवासिनी निर्वाणीं । सौभाग्यदायिनी शुभ कल्याणी ।
अर्थखाणी सकळ-सुजाणी । वर सुपाणी याचीजे ।। ६ ।।
वीणापुस्तकधारिणी । दुःख-दारिद्र्य-परिहारिणी ।
जे पांडित्यदानें सुखकारिणी । ते वंदिली शारदा ।। ७ ।।

( श्री विष्णुकवि. )

---

१ पोतास=कापूर.

## पांगारकरांचा नवा ग्रंथ.

# ज्ञानेश्वरांची प्रभावळ.

श्रीज्ञानेश्वरमहाराज व त्यांचीं भावंडें म्हणजे वडील बंधु व गुरु श्रीनिवृत्तिनाथ व धाकटे बंधु सोपानदेव व बहीण मुक्ताबाई, त्याचप्रमाणें नामदेवराय व त्यांचीं घरची मंडळी व दासी जनाबाई, विठोबा खेचर, परिसाभागवत, बहिरापिसा, गोराकुंभार, सावतामाळी, नरहरी सोनार, जगमित्र नागा, जोगा परमानंद चोखामेळा, त्याची बायको व मेहुणी बंका, भागु महारीण इ० अठरापगड जातीचे समकालीन, समप्रेमी व समशील भगवद्भक्त एकाच वेळीं झाले व त्यांनीं श्रीविठ्ठलपायीं भागवतधर्माचा महामंत्र घेऊन तो धर्म महाराष्ट्रभर पसरिला ही गोष्ट जगविख्यात आहे. प्रस्तुत ग्रंथांत ह्या सर्वांच्या उपदेशाची चांगली ओळख करून दिली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज हे संतांच्या प्रभावळींतले अग्रगण्य. तेव्हां त्यांच्या २५०० विषयवारीनें दिलेल्या सटीप निवडक ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग व पदें ह्या ग्रंथांत घेतलीं आहेत. 'ज्ञानेश्वरीची भूमिका' या पहिल्या प्रकरणांत सद्गुरुस्तवन, कृष्णार्जुनांची अन्योन्यप्रीति, गीताशास्त्रविषयक विषय, मराठी भाषेचे व ग्रंथांचे गौरव इ० मथळ्यांखालीं त्या त्या विषयांवरील ज्ञानोबारायांच्या निवडक ओव्या एकत्रित केल्या आहेत पुढें कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग यावरील ज्ञानेश्वरांच्या सर्व शिकवणी क्रमानें व विषयवारीनें दिल्या आहेत.

ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेंतील संतवाङ्मयाचें मंथन करून हें नवनीतच काढलें आहे.

पृ. सं. ४८० असून किंमत अवघी दोन रुपये. ट. ख. ८५.

मिळण्याचीं ठिकाणें:— १ रा. रा. 'व्यवस्थापक मुमुक्षु' पुणें शहर.
२ रा. रा. तुकाराम पुंडलीक शेट्ये बुकसेलर.
माधवबाग मुंबई.

# मुकुंदराज.

वंदन नंदनसा मी करितों भावें मुकुंदराजाला ।
वश झाल्या सद्विद्या सत्कीर्ति सुमुक्ति सुंदरा ज्याला ॥ १ ॥
—मोरोपंत

मुकुंदराज ज्ञानेश्वर । प्रमुख देशभाषाकार ।
सिद्धांतवक्ते ज्ञानभास्कर । स्मरोनि सादर वंदिले ॥ १ ॥
—कृष्णदयार्णव.

## १ कालगणना.

१ मराठी वाङ्मयसागरांतील पहिलें दिव्य रत्न म्हणजे मुकुंदराज हें होय. मराठींतील **आद्यकवि** मुकुंदराज होत अशी पहिल्यापासून आजवर महाराष्ट्रांत प्रसिद्धि आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना झाल्यावर निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांस म्हणाले कीं 'तूं तर भाष्यानुसार गीतेवर टीका लिहिलीस पण धन्य मुकुंदराज कीं ज्यांनीं विवेकसिंधूसारखा स्वतंत्र ग्रंथ स्वमतीनें लिहिला.' यावर 'आपली आज्ञा असेल तर, मीही असा स्वतंत्र ग्रंथ लिहीन' असें म्हणून ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभव ग्रंथ लिहिला अशी एक आख्यायिका महाराष्ट्रांत प्रचलित आहे. या आख्यायिकेवरून ज्ञानेश्वरमंडळापूर्वींच मुकुंदराज होऊन गेले असें अनुमान लोक काढीत आले आहेत. विवेकसिंधूंत यावनी भाषेचा अगर अंमलाचा अस्पष्टही संबंध कोठेंही दिसत नाहीं. यावरून यावनी सत्तेची आहाळ महाराष्ट्राला लागण्यापूर्वींच मुकुंदराज होऊन गेले असें अनुमान करितां येण्यासारखें आहे. जोगाईच्या आंब्याचा राजा जयंतपाळ याच्यासाठीं विवेकसिंधु ग्रंथ कवीनें लिहिला अशी प्रसिद्धि आहे. पण या जयंतपाळाचा इतिहासांत कांहीं मागमूसही सांपडत नाहीं. ग्रंथाच्या पूर्वार्धांत पुढील ओंव्या आहेत :—

नृसिंहाचा वल्लाळ । त्याचा कुमर जयंतपाळ ।
तेणें कराविला गदारोळ । ग्रंथरचनेचा ॥ ५५ ॥
भगीरथाचेनि दैवयोगें । विश्व सुस्नात गंगे ।
तैसें जयंतपाळाचेनि प्रसंगें । जग सुखिया होय ॥ ५६ ॥

नृसिंह–बल्लाळ–जयंतपाळ ही कोठल्या राजघराण्याची वंशावळ आहे याचा आजवर पत्ता लागलेला नाहीं. सर्व देशांचे व प्रांतांचे इतिहास उपलब्ध

नसल्यामुळें जयंतपाळ नांवाचा राजा कोठें व केव्हां होऊन गेला हें अजमावतां येण्यास मार्ग नाहीं. जयंतपाळाच्या कोणत्या 'प्रसंगामुळें' विवेकसिंधु निर्माण झाला या संबंधाची एक आख्यायिका आहे. जयंतपाळाला परमार्थाची अत्यंत आवड होती. जे कोणी शास्त्री, पंडित, पुराणिक किंवा साधुसंत येत त्यांना तो एकच प्रश्न करीः 'तुम्ही परब्रह्माच्या गोष्टी सांगतां पण ब्रह्म अनुभवलें आहे काय ? मला साक्षात्कार करून देतां काय ? ' यावर शब्दपंडित काय उत्तर देणार? उत्तर मिळालें नाहीं कीं यानें बंदिवासांत पाठवावें. असे ५००।६०० सज्जन कारागृहवासांत अडकून पडले होते ! राजाचा हेतु वाईट नव्हता. इतक्या लोकांत कोणी साक्षात्कारी पुरुष भेटतो कीं काय हें त्याला पहायचें होतें. हा विरोधभक्तीचाच एक प्रकार होय. 'चंदनं न वने वने' या न्यायानें साक्षात्कारी पुरुष केव्हांही विरळच असणार. मुकुंदराजाच्या कानीं साधूंच्या कारागृहवासाची गोष्ट गेली. ते स्वतः साक्षात्कारी होते. त्या साधूंना सोडवावें अशी त्यांना इच्छा झाली, व त्यांतच जयंतपाळाचें भाग्य उगवलें. मुकुंदराजांनाही त्यानें वरीलसारखाच प्रश्न केला. त्यांनीं रामकृष्ण परमहंसांनीं विवेकानंदांना उत्तर केलें त्याच जातीचें उत्तर केलें; 'तुला साक्षात्कार पाहिजे असेल तर हवा तेव्हां व हवा तेथें होईल.' प्रचीतीसाठीं अश्वशाळेंतून एक उमदा घोडा आणविला व घोड्यावर बसण्याकरितां राजानें रिकिबींत पाय ठेवला तों मुकुंदराजांनीं राजाच्या मस्तकावर हात ठेवला आणि राजाची समाधि लागली. राजा घोड्यावरच तीन अहोरात्र समाधिस्थितींत होता. समाधींतून व्युत्थानांत आल्यावर अष्ट सात्विक भाव देहावर उत्पन्न होऊन त्यानें आनंदाश्रूंनीं मुकुंदराजांचे चरण न्हाणिले व तो त्यांना शरण गेला. गुर्वाज्ञेवरून राजानें बंदिवासांतून सर्व साधूंची मुक्तता केली व वस्त्रेंभूषणें देऊन त्यांना सत्कारानें आपपल्या गांवीं पाठवून दिलें. ह्या जयंतपाळाला पूर्ण बोध देण्यासाठीं मुकुंदराजांनीं विवेकसिंधु ग्रंथ रचिला. 'जयंतपाळानें ग्रंथरचनेचा हा गदारोळ करविला' व 'जयंतपाळाचेनि प्रसंगें जग सुखीं झालें' असें वरील ओव्यांत स्वतः मुकुंदराजांनीं म्हटलें आहे, त्याचा अर्थ वरील आख्यायिकेनें स्पष्ट होतो असें वाटतें. जयंतपाळ, जैत्रपाळ, जैतपाळ अशी या राजांचीं नांवें आढळतात. कृष्णदयार्णवांनीं मुकुंदराजावर जी आरती केली आहे तींतही 'जैतपाल भूपतीनें केला दर्शना कोंड । अपरोक्ष बोध वाहे त्यांसी घातलें कोड । ' असा उल्लेख असून या वेदांतज्ञानमार्तंडानें 'भूप चिन्मात्र केला ' असें म्हटलें आहे. हा जयंतपाळ भूप कोण, कोठचा व केव्हां झाला याविषयीं ऐतिहासिक माहिती कांहींच मिळत नाहीं. तिच्या अभावीं वरील आख्यायिका प्रमाणभूत मानण्यास कांहीं हरकत नसावी असें वाटतें. विवेकसिंधूच्या कांहीं हस्तलिखित पोथ्यांतून पुढील दोन ओव्या आढळतात.

**शके अकरा दाहोत्तरू । साधारण संवत्सरू ।**
**राजा शारंगधरू । राज्य करी ॥**
**ऐसा समयो सर्वोत्तमू । तेथ मुकुंद द्विजोत्तमू ।**
**विवेकसिंधू मनोरमू । निर्मिता झाला ॥**

हा शारंगधर राजा कोण, कोठचा व त्याचा मुकुंदराजांशीं संबंध काय हें ठाऊक नाहीं. जयंतपाळाचा उल्लेख प्रत्यक्ष ग्रंथांतच आहे. वरील ओव्यांत दिल्याप्रमाणें पाहतां शके ११११० ला साधारण संवत्सर येत नाहीं, कीलक येतो. साधारण संवत्सर शके १११२ ला येतो तथापि शके १११२ च्या सुमारास म्हणजे ज्ञानेश्वरीपूर्वी १०० वर्षे विवेकसिंधु ग्रंथ रचला गेला असें मानण्यास व मुकुंदराजाकडे मराठींतील आदिकवि हा मान चालू ठेवण्यास कांहीं प्रत्यवाय नसावा असें वाटतें. वरील शके १११२ हा शके खरा मानल्यास त्यावेळीं मुकुंदराजाचें वय ६० च्या घरांत असावें.

**मज श्वासनिमेषाचा श्रम । तेथ कायसा या ग्रंथाचा उद्यम ॥**
**परी फळला मनोधर्म । सदैवांचा ॥ ५४ ॥** ( प्रक० ७ )

श्वासनिमेषाचे कष्ट होत असतांना या ग्रंथाचा उद्योग माझे हातून न व्हावा, पण जयंतपाळादि सद्भाविकांच्या दैवानें तो झाला आहे असा या ओवीचा भावार्थ आहे. यावरून ग्रंथरचनाकालीं कवि चांगले ६० च्या आंत बाहेर असावेत. हें खरें धरल्यास मुकुंदराजांचा जन्म शके. १०५० च्या सुमारास झाला असावा व त्यांचें आयुर्मान शके १०५०—११२० पर्यंत धरण्यास कांहीं हरकत नसावी. यावरून मुकुंदराज भास्कराचार्यांचे (जन्म शके १०३६) समकालीन ठरतात.

## २ गुरुपरंपरा

२ मुकुंदराजानें आपल्या **गुरुपरंपरेची माहिती** ग्रंथाचे शेवटीं दिली आहे:

**आदिगुरू श्रीआदिनाथ । तेथूनि श्रीहरिनाथ ।**
**तयाचा शिष्य श्रीरघुनाथ । जो गुणसिंधु ॥ ३४ ॥**

आदिनाथ–हरिनाथ--रघुनाथ व रघुनाथाचा शिष्य मुकुंदराज. ' गुरुपरंपरेचें परिज्ञान' शिष्याला अवश्य पाहिजे. हरिनाथांचें चारित्र कवीनें जरा सविस्तर दिलें असून त्यानें त्यांना पाहिलें होतें हें स्पष्ट आहे.

**वैन गंगेच्या तीरीं । मनोहर अंबानगरी ।**
**तेथें प्रगटले श्रीहरी । जगदीश्वर ॥ ३८ ॥**
**माध्यंदिन शाखे । अवतार केला परमपुरुखें**
**चांफे गोरटेनि वेषें । अतिमनोहर ॥ ३९ ॥**

**वेदशास्त्रांचा अभ्यास । जयासी करितां नलगे आयास ।**
**जो चतुर्विध वाचेचा ईश । तेथें विस्मय कैंचा ॥ ४३ ॥**

हरिनाथांची जन्मभूमि वैनगंगेच्या तीरीं मनोहर अंबानगरी होय. अंबानगरी म्हणजे जोगाईचें आंबें अशी लोकांची समजूत होती पण ती चुकीची आहे. मध्यप्रांतांत भंडाऱ्याजवळ वैनगंगा नदी असून तिच्या काठीं 'अंभोर'-नामक गांव आहे तीच अंबानगरी होय. येथें हरिनाथांचा जन्म झाला व येथेंच त्यांची समाधिही आहे. रघुनाथांची समाधि याच प्रांतांत छिंदवाड्यांत आहे व मुकुंदराजांची समाधिही बैतुलजवळ खेडलें नामक गांवीं जुन्या पडक्या किल्यांत आहे; यावरून मुकुंदराज, त्यांचे गुरु रघुनाथ व परमगुरु हरिनाथ ही त्रयी नागपूर प्रांताकडील असून मराठी वाङ्मयाला आद्यकवि नागपूरनें दिला ही गोष्ट तत्रस्थांस मोठी अभिमानास्पद आहे. जोगाईच्या आंब्याला ही मुकुंद-राजांची समाधि दाखवितात पण ती वास्तविक समाधि नसून कवीच्या कोणा शिष्यानें त्याच्या पादुका तेथें स्थापित केल्या असाव्यात. असो. हरिनाथांचा जन्म वैनगंगेच्या तीरीं अंबानगरींत झाला. तेथें पित्यानें त्यांचें 'मेखलाबंधन' म्ह० मुंज केली. त्यांचें वेदशास्त्राध्ययन सहज लीलेनें झालें काशीस जाऊन त्यांनीं बारा वर्षे पाशुपत महाव्रत केलें व शंकरास प्रसन्न करून घेतलें. त्यांची उपासना शंकराची होती. हरिनाथ-रघुनाथ या नांवावरून ही नाथसंप्रदायाची एक शाखा होती असें कोणी म्हणतात, पण हे साधे शिवोपासक शैव होते असें मला वाटतें. विवेकसिंधूंतही मुकुंदराजानें आपली गुरुपरंपराप्राप्त शिवभक्ति जागोजाग व्यक्त केली आहे. हरिनाथानें या नंतर तीव्र अनुष्ठान केलें, व शेवटीं महाकुंडीं हवन आरंभिलें. पूर्णाहूतीचे वेळीं घृतधारेसरिसी 'तेथ प्रगटली स्वयंज्योती.'

**तिये ज्वाळेआंत । शंभु प्रगटला 'ना भी' म्हणत ।**
**जो भक्तांचा वेळाइत । करुणासिंधु ॥ ५८ ॥**

याप्रमाणें '**स्वयंज्योति श्रीआदिनाथ**' यांनीं हरीला सप्रेम गाढ आलिंगन दिलें व '**क्षण येक दोघे जाले लीन । आनंदसागरीं**'

**सुखासी महासुख भेटलें । किंवा स्वानुभवासी पडप जोडलें**
**तैसें आनंदें फुंजो लागले । हरि शंकर ते ॥ ६१ ॥**

आदिनाथांनीं हरिनाथास '**वर माग**' म्हणतांच '**प्रेम देई आपुलें । कैवल्यदानीं**' असें त्यानें म्हटलें व शिवपार्वतीची स्तुति करूनः—

**जे पडले संसारघोरबंदीं । नेणती आपुली शुद्धी ।**
**जय जय करुणानिधी । तुवां तारावे जी ॥ ७५ ॥**

असें जीवांच्या करुणेनें विव्हळ होऊन वरप्रदान मागितलें. 'हें सिद्धचि काय मागितलें ? आणिकही वरप्रसाद देतों' असें आदिनाथ म्हणाले व 'तुझ्या

संप्रदायांतल्या पुरुषांना ज्ञान अनायासें होईल व तें तुझ्या शिष्यदेहीं संक्रमेल असा आशिर्वाद दिला. सदाशिवाच्या वरप्रसादानें हरिनाथाच्या देहीं ' शांभव तेजाचा समावेश ' झाला—' ते वेळीं चित्त समरसे। हरीचें परब्रह्मीं ' ब्रह्मसुखाची समाधि हरिनाथास २२ दिवस लागली. त्या दीर्घ समाधिसुखानंतर हरिनाथाची दिनचर्या कशी झाली ?:—

**जडचर्या आचरतु। पिशाचवत् खेळतु।**
**निजानंदें डुलतु। हरि योगिराज ॥ ९४ ॥**
**ढाळें ढाळें चालणें। विसरत विसरत बोलणें।**
**कांहीं नेणोनि हांसणें। हरिनाथासी ॥ ९५ ॥**
**कर्मवासना सरली। जीवीं चिकित्सा निमाली।**
**पूर्ण दृष्टी जाली। ह्मणऊनियां ॥ ९६ ॥**
**परापेक्षां स्नानभोजन। परापेक्षां वस्त्रपरिधान।**
**कवणासीं गोष्टी संनिधान। करणें आथीचि न ॥ ९६ ॥**

हरिनाथ याप्रमाणें पूर्णत्वास पोंचले. त्यांनीं असंख्य शिष्यांस प्रबोध दिला. पण रामचंद्रावर पूर्ण कृपा झाली. रामचंद्र किंवा रघुनाथ यांनाहीः—

**अठरा दिवसपर्यंता। जाली उन्मनी अवस्था।**
**मनाचिया वृत्ति समस्ता। खुंटालिया पै ॥ १०४ ॥**
**वर्णाश्रमाचा पांग। न करी राम निःसंग।**
**अखंड फळला राजयोग। ह्मणौनियां ॥ १०६ ॥**

हा ' उर्मीरहित ज्ञानसमुद्र ' मुकुंदराजावर वोळला. ' मेघाच्या धारा गणवती। पृथ्वीचे परमाणु मोजवती ' पण माझ्या रघुनाथाचे गुण शेषालाही वर्णवणार नाहींत, असें गुरुभक्तिप्रेमभरानें मुकुंदराजांनीं म्हटलें आहे.

## ३. ग्रंथरचना.

मुकुंदराजांचे विवेकसिंधु व परमामृत असे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. दोन्ही ग्रंथ ओवीबद्ध आहेत. विवेकसिंधूच्या पूर्वार्धाचीं सात प्रकरणें असून त्यांतील ओव्यांची संख्या ७७७ आहे. व उत्तरार्धाचीं अकरा प्रकरणें असून त्यांतील ओव्यांची संख्या ८९४ आहे. म्हणजे संपूर्ण ग्रंथाचीं १८ प्रकरणें असून एकंदर ओवीसंख्या १६७१ आहे. परमामृत याहून लहान आहे व त्याचीं प्रकरणेंही छोटीं आहेत. त्याच्या १४ प्रकरणांत मिळून ३०३ ओव्या आहेत. दोन्ही ग्रंथांच्या मिळून जवळजवळ दोनहजार ओव्या आहेत. याशिवाय पवनविजय, पंचीकरण, मूलस्तंभ, इ० ग्रंथ व कांहीं पदें अभंग वगैरेही मुकुंदराजांच्या नांवावर मोडतात, पण हा कवित्वभाग मुकुंदराजांचा असावा असें वाटत नाहीं. मुकुंद, मुकुंदस्वामी, मुकुंदकवि, मुकुंददीन वगैरे पांच सहा मुकुंद

मागाहून झाले असून त्यांचीं छोटीं मोठीं प्रकरणें मराठींत प्रसिद्ध वा अप्रसिद्ध स्थितींत आहेत. त्या सर्वांपेक्षां विवेकसिंधु व परमामृत ह्या ग्रंथांचा दर्जा फार मोठा आहे. ह्या दोन्ही ग्रंथांचें धोरण, विचारसरणी वगैरे एकाच प्रकारची आहे व विवेकसिंधुकर्ते मुकुंदराज यांचीच ती रचना आहे यांत संशय नाहीं. म्हणून मी याच दोन ग्रंथांत काय विषय सांगितले आहेत व त्यांचें प्रतिपादन कसें केलें आहे हें सांगणार आहे. हे दोन्ही ग्रंथ वेदान्तपर आहेत पण यांची मांडणी सरळ, सुबोध असून यांत प्रसाद आहे. विवेकसिंधूची तर श्रीसमर्थांच्या दासबोधावरही छाप आहे. हें मी पुढें समर्थचरित्रांत दाखविणार आहे. प्रथम विवेकसिंधूकडे वळतों.

## ४ विवेकसिंधु.

आतां विवेकसिंधु ह्या ग्रंथांत जे विषय प्रतिपादिले आहेत त्यांचें विहंगम दृष्टीनें अवलोकन करूं. पहिल्या प्रास्ताविक भागानंतर सद्गुरु, सच्छिष्य व असाच्छिष्य यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. ' जे संसारासी वेगळे । ज्ञानवैराग्यें आगळे । ब्रह्मरसास्वादा आनंदले । ते सद्गुरु जाणावे. ' कामक्रोध, हर्ष-विषाद, सुखदुःख यानीं चित्त दुभंग होत नाहीं, विषयांचे डोहळे कधींच होत नाहींत, सकळ भूतजातीं समभावानें वागतात, ज्यांच्या प्रपंचराहाटींतही परमार्थच नांदत असतो, जे विधिनिषेधांनीं लिंपत नाहींत पण जे विधिनिषेध पाळतात, अवस्थात्रयीं ज्यांचा अखंड ब्रह्मबोध असतो ते सद्गुरुपदाचे अधि-कारी होत. शिष्य आळशी, निष्ठुर, कुचर नसावा, ' जे विषयरसीं आसक्त । अथवा अहंकारें गर्वित । ज्यासी पाषांडाची संगत । ते शिष्य न करावे. ' निंदक, नास्तिक, वादक, महतीसाठीं भुकाळु, असा शिष्य नसावा. तो शुद्धचित्त व आस्थावंत असावा. ' आणीक परदैवत नेणती । श्रीगुरुवांचुनी ' असा एकनिष्ठ असावा. शिष्य सानुराग व सेवारत असावा. त्याचे ठायीं गुरूपदेश ठसतो व तो तात्काळ ब्रह्मरूप होतो. असत् शिष्यही शरण आले तर गुरूनें अंगीकारून मार्गाला लावावे. तेही गुरुचरणप्रसादानें उद्धरतात परीस, कल्पतरु, कामधेनु, चिंतामणि इ० दृष्टांत गुरूला लावतात. पण हे दृष्टांत हीन होत. 'परोपकाराचेनि संतोषें । पात्र कुपात्र ऐसें नोळखे । गुरुमेघ सर्वत्र वरुखे ( वर्षे ) । उदारपणें. ' सखोल भूमींत पाणी सांचतें, उथळ जमीनीवर थेंबही राहत नाहीं, हें कांहीं खोटें नाहीं. आईबाप थोर खरे पण बंधविच्छेदक श्रीगुरुवांचून कोणीच नाहीं. श्रीगुरूला शरण जावें म्हणजे ते संप्रदायक्रम सांगतात कीं जो आचरल्यानें ' साम्राज्यातें पावे रंक ' असें होऊन जातें. शिष्याच्या ठिकाणच्या सर्व विषयऊर्मी जिरून जातात व तो स्वानुभवसंपन्न होतो. स्वरूपसुखाच्या भरें तो 'एकछत्री राणी व

राजयोगाची ’ भोगायला समर्थ होतो. ( प्रकरण १ ). इंद्रियांची धांव मोडून तीं आनंदजळांत बुचकळलीं असतांना शिष्य गुरुस्तव करितो. ‘...सून प्रेमरसें भरलें ’ म्हणून तो वारंवार गुरुचरणीं मस्तक ठेवतो. ‘ जें अनादि हारपलें । मी मजचि होतें चोरिलें । तें मातें भेटविलें । श्रीगुरुरायें ’ या कृतज्ञताजनित प्रेमानें त्याचे ठायीं अष्ट सात्विकभाव उदित होतात, व गुरुदास्यप्रीति उत्पन्न होते ! ‘ मंत्रयंत्रादि उपदेशिते । गुरु घरोघरीं असती आइते ।’ परंतु ज्याच्या कृपादृष्टीनें भवदुःख नष्ट होऊन ब्रह्मानंदाचें साम्राज्य मिळतें त्या श्रीगुरूचे उतराई कसें होतां येईल ? ‘ माझा बोधसमुद्र उल्हासविणारा तूं चंद्र आहेस ’ म्हणून प्रेमानें गुरुही शिष्याला आलिंगन देतात व दृढतेकारणें साधन सांगतात. मनुष्याला आपली देहाची जन्मभूमि अत्यंत प्रिय वाटते मग ‘ जीवाची जन्मभूमि ’ प्राप्त झाल्याचा आनंद कोणी वर्णावा ? गुरु शिष्याला अनुभवाची खूग पटवून जीवब्रह्मैक्य करवितात ( प्रक० २ ). जीव, ब्रह्म, सगुण, निर्गुण, माया, अविद्या, प्रपंच, परमार्थ इ० पदांच्या स्पष्टीकरणार्थ गुरुशिष्यसंवादरूपानें यापुढील प्रकरणांत विवरण केलें आहे. हे विषय सूक्ष्म आहेत म्हणून विवेकाचे कान करूनच हें सर्व ऐकलें पाहिजे. पाथरवटाची टांकी कितीही तीक्ष्ण झाली तरी तिनें कांहीं मोत्याला भोंक पाडतां येत नाहीं, तसा स्थूलबुद्धीचा हा विषय नाहीं. एक दाट परब्रह्म हरिहरब्रह्मादिकांनाही विश्राममंदिर आहे. तें अनिर्देश्य पण निजानंद आहे. ‘ अहंकार गळे । आणि कल्पना मावळे । तरीच ब्रह्म आकळे । स्वानुभवासी ’ माया ही ब्रह्मीचा विवर्त आहे. ब्रह्म सत्य व माया मिथ्या असा सिद्धांत आहे. आदि ब्रह्माचा विवर्त ती मूळमाया. तेथें गुणत्रयाची साम्यता आहे. सांख्य तिलाच प्रकृति म्हणतात. तिच्यापासून अनेक तत्वांची सृष्टि झाली, तरी ‘ जें जें तत्व निपजे । तें तें व्यापिजे चैतन्यें ’ । हें विसरूं नये. कार्यांत कारण अनुस्यूत असतें यामुळें कारण सत्य व कार्य मिथ्या असें समजावें. मूळमाया ही ‘ सगुण ’ ब्रह्म व येर जें अशेष उरलें तें ‘ केवल ’ ब्रह्म. मूळ मायेंत पुरुष साक्षित्वानें असतो व कर्तृत्व प्रकृतीचें असतें. पुरुषाच्या सत्तेवर प्रकृति सृजनकार्य करिते. यांची अभिन्नता मोडत नाहीं व हे एकमेकांस ओळखीत नाहींत ! मूळमाया–तिच्यापासून गुणक्षोभिणी–तेथून त्रिविध अहंकार–सात्विक अहंकारापासून ज्ञानशक्ति, राजस अहंकारापासून क्रियाशक्ति व तामस अहंकारापासून द्रव्यशक्ति. तामस अहंकारापासून आकाश, वायु, तेज, आप व पृथ्वी या क्रमानें पंचभूतें हीं पंचभूतें शब्दस्पर्शरूपरसगंध या पंचविषयांना घेऊन उठलीं. राजस अहंकारापासून पंचदशतत्वें म्ह. पंचप्राणेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें निर्माण झालीं. सात्विक अहंकारापासून अंतःकरण मनबुद्धिचित्तअहंकार हें अंतःकरणपंचक झालें. अंतःकरण भोक्ता, इंद्रियें

भोगसाधनें व पंचभूतात्मक विषय हे भोग्य, अशी ही त्रिपुटी झाली. अशाच कर्ता, कारण, कार्य या अन्वयें अनेक त्रिपुट्या निर्माण झाल्या. पंचभूतें हीं आधीं सूक्ष्म होतीं तीं नंतर परस्परानुप्रवेशानें स्थूल झालीं. याप्रमाणें नाना तत्वांची ही सृष्टि झाली. तरी सर्व तत्वें चैतन्याधिष्ठित आहेत किंबहुना चैतन्य मात्र त्रिकाल सत्य असून तत्वें भासमान आहेत हें पूर्ण लक्षांत ठेवावें. याप्रमाणें तत्वसृष्टिकथनाचें तिसरें प्रकरण आहे ( प्रक० ३ ) चवथ्या प्रकरणांत सर्वेश्वराचा सूक्ष्म देह पंचवीस सूक्ष्म तत्वांचा कसा आहे व पंचभूतें व अहंकार व महत्तत्व हीं दोन मिळून सप्तकंचुक ब्रह्मांड हा विराट पुरुषाचा देह कसा आहे हें सांगितलें आहे. मूळमाया, हिरण्यगर्भ व विराट हे प्रभूचे तीन देह आहेत, हा या प्रकरणाचा विषय आहे. या पुढील ४ थें व ५ वें प्रकरण-यांत जीवाच्या सूक्ष्म व स्थूल देहाचें विवरण आहे. पण हा पंचीकरणाचा विषय स्वतंत्र असून मूळांतच मननपूर्वक पाहिल्याशिवाय चांगला कळणार नाहीं, म्हणून त्याचें येथें विवरण करीत नाहीं. ३।४ प्रकरणांत तत्पदाचा व ५।६ या प्रकरणांत त्वंपदाचा विचार सांगून ७ व्या ' सर्वब्रह्म'प्रकरणांत असि पदानें त्यांचा समन्वय केला असल्यामुळें या प्रकरणांतून ' तत्वमसि ' या महा-वाक्याचा स्पष्ट विचार सांगितला आहे हें उघड आहे. हें शब्दानें कळणें शक्य तोंवर ग्रंथ सांगतच आहे. पण याचा पूर्ण विचार गुरुमुखाशिवाय उलगडणार नाहीं. या भागांत कोठें कोठें सुंदर विचार आले आहेत ते सांगावयाचा मोह अनावर आहे.

**प्रतिग्रामीं अवभासक । जैसा तरणीच एक ।**
**तैसा सर्वजीवां प्रकाशक । परमात्माचि पै ॥ प्र० ५ १६ ॥**

तूर्या व उन्मनी या अवस्थांचा भेद व ऐक्य कसें मार्मिकपणें सांगितलें आहे पहा. जागृति, स्वप्न, सुषुप्ति या जीवाच्या अवस्था सर्वांस माहीत आहेत. चौथी अवस्था तूर्या हा. सर्वसाक्षिणी, व पांचवी उन्मनी. जनकादि साक्षित्वानेंच तरले, तथापि उन्मनी ही पूर्णता असून तिच्याशिवाय मोक्ष नाहीं. कां कीं तूर्या हीहि एक वृत्ति आहे व परब्रह्म तर वृत्त्यतीत आहे. आतां श्रुतीनें उन्मनीहि मान्य केली नाहीं. अशा स्थितींत मुकुंदराजांनीं समन्वय बहारीचा केला आहे:—

**तूर्येची परिपक्वता । तेचि उन्मनी अवस्था ।**
**निंबोळियांस मधुरता । जैशी पक्वदशे ॥८७॥**
**तूर्या ते शुद्धवासना । तेथें हाचि कडवटपणा ।**
**उन्मनी वूझ निर्वासना । ह्मणोनि गोड ते ॥ ८८ ॥**
**जैसी साखर उदकीं विरे । परी तेथीची मधुरता उरे ।**
**तैसी तूर्या स्वरूपीं मुरे । ते उन्मनी गा ॥ ८९ ॥**

**अवस्था पंचमा नास्ति । ऐसी वदे वेदश्रुति ।**
**म्हणोनि तूर्येची परिणामस्थिति । ते उन्मनी गा ॥ ९० ॥** (प्र. ६)

देहाच्या ठिकाणीं आत्मबुद्धि ठेवणें हें बंधन, म्हणून ती तेवढी सोड व सर्वात्मकपणाच्या अनुभवानें मोठा ( ब्रह्म ) हो:–

**अगा सर्वही आपण व्हावें । अथवा कांहींच न व्हावें ।**
**कांहींच न होऊन असावें । नेणूं काई जें ॥ ५४ ॥**
**कांहींच नव्हावया [ ० ] पासाव । सर्वही होणें हें बरव ।**
**जेथें सुखदुःखासी वेगळीक । आथींचि ना ॥ ५५ ॥**
**आदिअंतीं साळी देखिली । मध्यें तृणाकार विस्तारली**
**परी साळी येणें शब्दें बोलिली । विबुधजनीं ॥ ५६ ॥**
**तैसें आदिअंतीं ब्रह्मचि असे । मध्यें प्रपंचाकार भासे ।**
**परी ' सर्वही ब्रह्मचि ' असें । वेदीं बोलिजे ॥ ५७ ॥**

शून्य होऊन पडण्यापेक्षां 'सर्व मी सर्वात्मा ' होणें चांगलें. आदिअंती साळीं, मध्येंही साळीच, आदिअंतीं ब्रह्म तर मध्येंही प्रपंचाकारें विस्तारलेलें ब्रह्मच जाण. आपण ब्रह्म कीं प्रपंच ब्रह्मच आहे.

**तत्वता तूं निराकार । जगत् जीव ईश्वर ।**
**ते तुझेचि अंकुर ! आनंदकंदाचे ॥ ६१ ॥**
**अहो अंगासी संलग्नें । केशनखें अचेतनपणें ।**
**तीं चैतन्यासी वेगळीं कवणें । निवडावीं ? ॥ ६२ ॥**
**तैसें अचेतन हें निखळ । चैतन्यासी नाहीं वेगळ ।**
**म्हणूनि ब्रह्मचि केवळ । तूंचि एक ॥ ६४ ॥** ( प्र. ७ )

येथें पूर्वार्ध संपलें. उत्तरार्धांत स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या पिंडाच्या चौदेहांचें व ब्रह्मांडीच्या चौदेहांचें निरसन पहिल्या सहा प्रकरणांत केलें आहे. चौदेहांची उभारणी पूर्वार्धांत केली व त्यांचीच संहारणी उत्तरार्धांत केली आहे. तू पंचभूतात्मक देह नव्हेस, पंचवीस सूक्ष्म तत्वांचा सूक्ष्म (लिंग ) देह नव्हेस, अज्ञानकारण देह नव्हेस व साक्षीरूपाचा महाकारण देहही नव्हेस. तर चहूं देहातीत स्वयंप्रकाश स्वस्वरूप आहेस, असें सांगून जीवपणाचें निरसन चार अध्यायांत केलें आहे व असेंच जीव साक्षेप शिवपणाचें त्यापुढील दोन अध्यायांत निरसन केलें आहे. यांत पंचप्रळयादि अनेक मौजेचे विषय आले आहेत. ७ व्या व ८ व्या प्रकरणांत जीवपरमात्मैक्यविचार सांगितला आहे. यांत सदसत् याहून वेगळा, सजातीय, विजातीय व स्वगत भेदाहून निराळा, आत्मा कसा आहे हें उत्कृष्ट सांगितलें आहे. ' जें हेतुदृष्टान्तविवर्जित । अनुपम्य सुखभरित । द्वैताद्वैतरहित । परमतत्व ' ( प्र० ८–७३ ) आहे व ' जाणून कांहींच नेणे । तें अनिर्वाच्य तूं ' असा बोध केला आहे.

९ व्या प्रकरणांत अद्वैतप्रतिपादन समन्वय दृष्टीनें सुंदर केलें आहे. हें प्रकरण अवश्य पहावें म्हणजे ऐक्यबोध चांगल्या प्रकारें होईल. १० व्या प्रकरणांत सच्चिदानंदपदाचा विचार सांगून–' सच्छब्दें नित्य सन्मात्र । ज्ञानशब्दें ज्ञप्तिरूप चिन्मात्र । आनंदशब्दें स्वानंदमात्र । परब्रह्म तें '—शिष्याला कृतार्थ केलें आहे व शिष्यानें ' मज ब्रह्मत्वासी नाहीं चाड । तुझें भजन अत्यंत गोड ' याप्रमाणें श्रीगुरुजवळ ' मुक्तीवरील प्रेमभक्ति ' मागितली आहे. ११ व्या प्रकरणांत गुरुप्रशंसापूर्वक कर्त्रीनें आपलें संप्रदायाची व गुरु व परमगुरु यांची माहिती सांगून ग्रंथ संपूर्ण केला आहे.

( पुढील अंकीं समाप्त )

## ठकूताईंचा ग्रंथ !

सप्टेंबरच्या मुमुक्षूच्या अंकांत देवासच्या श्री. ठकूताई उर्फ भागीरथीबाई वैद्य यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ' चौदा चौकड्यांचें राज्य ' ह्या ग्रंथाचें आम्हीं समीक्षण केलें होतें, व ठकूताईंनीं त्यांत असंबद्ध, शास्त्रविरुद्ध व अर्थशून्य विधानें केलीं आहेत, हें दाखवून दिलें होतें. परमपूज्य गुरु श्री बलभीम महाराज यांच्याशीं झालेला संवाद काल्पनिक आहे व त्यामुळें त्या सज्जन, प्रेमळ व थोर सत्पुरुषाविषयीं लोकांचा विनाकारण गैरसमज होणारा आहे असेंही आम्हीं म्हटलें होतें. भोळ्याभावड्या बायांनीं व पुरुषांनींही ठकूताईंच्या ह्या देखाव्यानें फसून जाऊं नये हाही आमचा हेतु होता. त्या समीक्षणांत बलभीममहाराजांचे कृपापात्र सच्छिष्य नरसिंगड संस्थानचे कारभारी रा. नागेशराव कायवटे यांचाही आम्हीं उल्लेख केला होता. एका तरुण मुमुक्षूनें त्यांस सदर ठकूताईंच्या ग्रंथासंबंधानें कांहीं प्रश्न केले होते त्यांचीं उत्तरें त्यांजकडून आलेलीं आम्हांस पहावयास मिळालीं. तीं पत्रें फार सुंदर असून गुरुभक्त नागेशरावांचा थोर अधिकार व सत्वस्थपणा व्यक्त करणारीं आहेत. उभयतांच्या परवानगीनें आम्हीं तीं पत्रें पुढें देत आहोंत. ठकूताईंच्या ग्रंथाची प्रस्तावना रा. वर्तक यांच्या नांवावर छापली आहे पण ती वर्तक यांनीं लिहिली नसून ठकूताईंनीं दडपून दिली आहे असें रा. वर्तक यांचे नाशीक ऐथील सन्मित्र रा. रामभाऊ खाडीलकर यांस आलेल्या पत्रावरून अगदीं उघड आहे ! सदर पत्र आम्हीं पाहिलें आहे. " I solemnly tell you that the introduction was not at all written by me " "प्रस्तावना मीं बिलकूल लिहिलेली नसून माझ्या नांवावर ती छापून ठकूताईंनीं माझें नांव विनाकारण बद्‌ केलें आहे.

प्रस्तावना माझी नाहीं. तिची भाषा गचाळ व विचार बेढब आहेत व तिच्याशीं माझें नांव खोटेंच जोडल्याबद्दल मला अत्यंत खेद होत आहे" असें रा. वर्तक त्या पत्रांत लिहीत आहेत ! ! प्रस्तावनेंत जर हा खोटेपणा तर बलभीममहाराजांचे संवाद खरे आहेत असें मानण्यास काय आधार आहे! असो. आम्ही श्री. नागेशराव यांचीं पत्रेंच खालीं देतों. त्यावरून ठकूताईंच्या ग्रंथाचा निकाल अपाप लागेल.

---

## श्री. नागेशरावांचीं पत्रें.

**पत्र १ लें.** नरसिंगड २८।८।२८.

आपलें पत्र वाचून फार आनंद झाला. आपण श्रीमती गु. भ. प. गुरुपद विभूषित ठकूताई वैद्य यांचे ग्रंथाचा उल्लेख केला आहे व त्यांतील कांहीं विधानांचे शुद्धाशुद्धतेविषयीं विचारणा केली आहे. माझेकडे तें पुस्तक आलें आहे. त्यांनीं जीं पुस्तकांत विधानें केलीं आहेत तीं सर्वच फार विचित्र आहेत.

१ " सद्गुरु हे आपल्या निधनकालींच शिष्यावर कृपा करतात व कृपा करतांच सद्गुरूचा देह पडतो " हें अत्यंत विलक्षण विधान आहे. यांत कार्यकारणसंबंध कसा व काय आहे हें कळत नाहीं. श्री. ठकूताईंनीं आपल्या अनुभवानें हें वाक्य लिहिलें आहे, त्याची सत्यता त्यांचेपुरतीच आहे ! इतरांना ती कशी पटावी ? स्वतःच्या अनुभवाचें म्हणून हें वाक्य घातलें असेल तर त्याचें सत्यत्व त्यांना. मी हो किंवा नाहीं म्हणण्यास असमर्थ. पण सामान्य सिद्धांत या दृष्टीनें वरील श्री. ठकूताईंनीं केलेलें विधान अगदीं चुकीचें आहे. श्री वशिष्ठांनीं भगवान् रामचंद्रांना ब्रह्मज्ञान देऊन पूर्णानुभव दिला. परंतु वशिष्ठ त्याच वेळीं देह सोडून मुक्त झाले असें कोठें ऐकिलें व वाचलें नाहीं ! सामान्य सिद्धांत असा ठोकून देणें प्रगल्भ विचाराचें काम नाहीं.

२ " श्रीकृष्ण मरणकाळीं, उद्धवाच्या नेत्रांत शिरून मूर्ध्निस्थानांत बसला " हें विधानही पहिल्यासारखेंच विचित्र आहे मरणकाल परमात्म्याला कसला ? प्रयाणकालीं उद्धव जवळ नव्हताच. शिवाय नेत्रांत शिरून मस्तकांत शिरण्याची सुसाध्य युक्ति असती तर एवढा एकादशस्कंध उद्धवास पढविण्याची तकलीफ भगवंतानें कां घेतली कोणास ठाऊक !

३ " ज्या शिष्यास सद्गुरूची खरी कृपा पाहिजे असेल त्यानें सद्गुरूच्या मरणसमयीं त्याचे जवळ असलें पाहिजे व अशीच कृपा बाबांनीं ( बलभीम महाराजांनीं ) त्यांच्या मरणसमयीं मीच एकटी होतें म्हणून मजवर केली व मला जी निजखूण दाखविली ती कोणासच दाखविली नाहीं. "

या श्री. ठकू ईंच्या म्हणण्याबद्दल मीं काय लिहावें हें मलाच कळत नाहीं. त्यांचे देहपतनाचे वेळीं सारंगपूर, सुजालपूर व नरसिंहगड येथील मिळून २५-३० स्त्रीपुरुष त्यांचे बिछान्याजवळ व आसपास हजर होते व सर्वांची दृष्टि श्रीगुरुमहाराजांवरच होती. ते सर्वांकडे समदृष्टीनें पहात होते. गु. भ. मुकुटमणी श्रीमती ठकूताईंनीं त्यांच्या डोळ्यांतील, आपल्या हृदयांत सांठवून कांहीं निजखूण उदयास आली असेल तर त्याचा अनुभव त्यांचा त्यांना ! ती गोष्ट मला माहीत नाहीं व त्यांनींही कधीं कळविण्याची कृपा केली नाहीं, अर्थात् ती करण्याची वेळ अद्यापि आली नाहीं व लवकर न येवो अशी मनापासून इच्छा आहे. ‘ उदंड आयुष्य व्हावें तया ’...

४ “ अर्जुनाला गीतेंत ज्ञान झालेंच नाहीं व त्यानें पारमार्थिक प्रश्न कृष्णास विचारले नाहींत व कृष्णानें **विधियुक्त** ज्ञान अर्जुनास दिलेंच नाहीं ”

कृष्णार्जुनांच्या संबंधाचें वरील विधानही विचित्र आहे. त्या विधानाचें गूढ मला उकलत नाहीं. अर्जुन सद्भावानें श्रीकृष्णास शरण गेला व त्याचा मोह दूर झाला व त्याला स्वस्वरूपाची स्मृति झाली हें मी पक्कें ओळखतों व गीतेंतच स्पष्ट आहे व तें अर्जुनानें प्रांजळपणें कबूल केलें आहे श्री. ठकूताईंच्या **विधियुक्त** या शब्दाचा अर्थ करणें कठीण आहे. गीतेंत ज्ञान जर नसतें तर त्या ग्रंथावर सर्व आचार्यांनीं टीका करण्याची खटपट कां केली असती ? ज्ञानेश्वर महाराजांसारख्या अवतारी पुरुषांना तोच ग्रंथ मूळ ग्रंथ घेऊन त्याच्यावर टीका मराठींत लिहिण्याचें कां आवडलें असतें ?

५ “ रामकृष्णादिक आपल्याप्रमाणें माणसेंच होतीं त्यांनीं **कथा करून** लोकांस उद्धरिलें ” हेंही विधान विचित्रच. रामकृष्ण हे प्रत्यक्ष भगवंताचे अवतार. त्यांनीं कथा केल्या हें कोठेंच वाचनांत अथवा ऐकिवांत नाहीं !

६ “ सद्गुरूची प्राप्ती झाल्यानंतर संतसमागमाचें प्रयोजनच उरत नाहीं ” असें विधान करणें म्हणजे सत्संगाची ही केवळ अवहेलना आहे. सत्संग हा नेहमींच उपकारक आहे. त्यानें अपाय कधींही होणार नाहीं. उलट ज्ञानबीज क्षेत्रांत रुतलें गेलें व चांगलें रुजलें म्हणजे त्याला सत्संगाच्या प्रेमजलानें चांगलें अंकूर फुटून मनोहर असा परमार्थाचा वृक्ष तयार होतो. पण देहाहंकाराच्या भूमिकेवर जर गुरुशिष्य असतील तर मग जरूर भय आहे, किंवा ज्यांचा संग करावयाचा ते जर खरे संत नसले तर मग शिष्याचे नुकसानीचा संभव आहे पण वरील सर्व ठकूताईंचीं विधानें अत्यंत संकुचित वृत्तीचीं आहेत.

७ “ मुमुक्षूचे उत्तम, मध्यम, कनिष्ठ व लघु हे चार प्रकार आहेत ” हें श्री ठकूताईचें स्पष्टीकरण मला कळत नाहीं. माझें वाचन फार मर्यादित व ज्ञानही मर्यादित. मला याबद्दल खरें खोटें सांगवत नाहीं.

८ “ तूर्या तीन अथवा चार प्रकारच्या आहेत ” असें म्हणणें हें विचित्र.

ठकूताईनीं आपल्या अनुभवानें ही गोष्ट म्हटली असेल. त्यांचे त्यांनाच ठाऊक. इतरांस उलगडा होणें कठीण.

इत्यादि इत्यादि. श्री. ठकूताईंच्या विधानांविषयीं, त्यांच्या स्वत:विषयीं मी अनादर मनांत थोडाही न बाळगतां, तुम्हांस माझें अल्प समजुतीस जें वाटलें तें लिहिलें आहे. कोणास कदाचित् तें पटणार नाहीं. कोणी माझी निंदा करतील तर करोत बिचारे. मला त्याविषयीं यत्किंचितही वाईट वाटत नाहीं. सत्य वस्तूची अथवा सत्य वचनाची निंदा ही निंदा नव्हेच, तर एका दृष्टीनें सत्याची स्तुतीच आहे. वस्तु दृष्टीनें पाहतां निंदा व स्तुति हीं सारखींच आहेत. दोघांचें पर्यवसान माझे आत्मस्वरूपांतच. माझ्या निंदेनें जर कोणाची प्रौढी वाढत असेल किंवा कोणास आनंद वाटत असेल तर ती निंदाही माझी स्तुतीच होईल. फार काय लिहावें ? आपण सूज्ञच आहांत, मला जें वाटलें तें प्रांजळपणें यथाशक्ति लिहिलें आहे. कळावें, ही विनंति.

आ—**ना. आ. काथवटे.**

## पत्र दुसरें.

नरसिंगड २-९-२८.

आपणांस पहिलें पत्र पावलेंच असेल. त्यांत मीं श्री. ठकूताईनीं आपल्या ग्रंथांत केलेल्या विधानांपैकीं कांहीं विधानांविषयीं माझें मत कळविलें. वलभीम महाराजांची उपदेशाची सरणी श्री. ठकूताईंच्या पुस्तकांत दिल्याप्रमाणेंच होती कीं काय ? असें आपण मला विचारल्यावरून मी आपणांस आज हें पत्र लिहीत आहे.

श्री. ठकूताईनीं चौदाचौकड्यांचें राज्य हा ग्रंथ वलभीममहाराज उर्फ बाबा आणि श्री. ठकुताई यांच्या प्रश्नोत्तररूपानें निर्माण केला आहे. तेव्हां आम्हां सर्वांना त्याकडे फार आदरानें व प्रेमानेंच पाहिलें पाहिजे व तशी आमची इच्छाही आहे. एका प्रेमी अधिकारसंपन्न भगिनीनें तें पुस्तक छापविलें आहे. तिकडे प्रेमानें पाहणें भाग आहे ! मीं तें पुस्तक माझ्या आदरांत व प्रेमांत फरक पडूं नये म्हणोन अतिशय जलदीनें वाचलें तरी पण माझ्या मनास तें पुस्तक वाचल्यानें धक्का बसल्याखेरीज राहिला नाहीं.

तपशीलवार टीका असल्या ग्रंथावर करणें म्हणजे नसता चिखल आपल्या अंगावर उडवून घेणें आहे. आपलीं गात्रें मलीन करून घेऊन नंतर तीं धूत बसण्याइतकें सामर्थ्य माझे अंगीं नाहीं. आयुष्याची अवधि दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. महायज्ञसमाप्तीचा व अवभृतस्नानाचा प्रसंग केव्हां येईल याचा नियम नाहीं. तेव्हां त्या प्रसंगाचे वेळीं सर्व गात्रें, उपकरणीं वगैरे शुद्ध ठेवून त्यांत शुद्ध ब्रह्मरस सेवन करण्यासाठीं सांठवून त्या आनंदसाम्राज्यांत एकरूप होण्याची तयारी करण्याची माझी काळजी व कळकळ सारखी अंतः-

करणांत वागत आहे. त्यामुळें आपण चाहातां इतक्या विस्तृतपणें मला लिहितां येणें शक्य नाहीं.

मीं कांहीं मुद्दे आपणास माझे मागील पत्रांत कळविलेच आहेत. आज विशेष मुद्दा लिहिणेचा आहे तो हा कीं—

श्री सद्‌गुरु बलभीममहाराजबाबा यांचे तोंडीं जे उद्गार घातले आहेत ते मुळींच त्यांचे नाहींत. महाराज असल्या भानगडींत पडलेच नाहींत, व त्यांना पडण्याचें कांहीं कारणही नव्हतें. ते आपल्या परमात्मस्वरूपाच्या भक्तिरसांत इतके मग्न असत कीं, श्री. ठकूताईंनीं आपल्या पुस्तकांत मौंजीबंधन, जानवें, चारीवेदचर्चा वगैरेसंबंधीं चमत्कारिक रीतीनें लिहिलेली विचारमाला त्यांच्या मनाला कधीं शिवलीसुद्धां नाहीं. त्यांचेजवळ नेहमीं बसत असलेल्या मंडळीसही असले विचार सुचले नाहींत व त्यांनींही कधीं बाबांचे तोंडून ऐकले नाहींत व बाबांनीं कधीं सांगितलेही नाहींत. श्री. ठकूताईंना बलभीम-महाराजांचे वैकुंठगमनानंतर–स्वप्नांत किंवा अन्य कांहीं परिस्थितींत–दर्शन देऊन या सर्व विचारांची–अविचारांची–स्फूर्ति दिली असेल तर न कळे ! असें झालें असेल तर शिष्यांना तें कळण्याचा मार्ग नाहीं. तेव्हां आम्हां मंड-ळींच्या दृष्टीनें हा सर्व संवाद खोटा, काल्पनिक व स्वकपोलकल्पित आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. श्रीगुरुमहाराज नेहमीं सर्वांभूतीं भगवद्भाव व गाढ नम्रता यांचे भोक्ते असत. तें कधींही कोणाला एकेरी शब्दांनीं संबोधित नसत. फार काय सांगावें तें आपल्या स्वतःच्या मुलाला म्हणजे दत्तमहाराजांना देखील एकेरी शब्दानें संबोधीत नसत, तर मग इतरांस कसें संबोधितील ? श्री. ठकूताईंनीं "बाळ" वगैरे एकेरी शब्द बलभीममहाराज बाबा यांचे तोंडीं घातले आहेत, पण ते कधींही असे एकेरी शब्द वापरीत नसत. हा सर्व पुस्तकांतील गुरु–शिष्यसंवाद श्री. ठकूताईच्या कल्पनापरिपूर्ण मेंदूंतूनच निघाला आहे असें म्हणावें लागतें हा सर्व संवाद केव्हां जाहला, कोठें जाहला याविषयीं कांहींच कळत नाहीं व उल्लेख-ही नाहीं. कांहीं टिपणें वगैरे करून ठेविलीं होतीं त्यांवरून हा सर्व संवाद लिहिला असें म्हणावें तर टिपण करून ठेवण्याइतकें लिहिणें पुसणें श्री. ठकू-ताईंना येतें किंवा नाहीं याविषयीं मला बरीच शंका आहे !

पुस्तकांत लिहिलेले "बोध प्रबोध, निजबोध" हे सर्व भेद व त्यांचे निरनिराळे प्रश्न हें सर्व **गौडबंगाल** आमच्या कोणाच्याही कानांवर नाहीं. हें सर्व आम्हांपासून दडवून एकट्या श्री. ठकूताईसाठीं राखीव विषय म्हणोन त्यांनीं त्यांचेकरिता दडवून ठेविला असेंही संभवत नाहीं. कारण ते नेहमीं म्हणत असत "प्रत्यक्ष हें ज्ञान उघडाचि आहे । न घेई बारटा देहबुद्धि ॥"

ते नेहमीं म्हणत असत

" देहबुद्धी विलया जाय, तेंचि होवुनी राही" ॥
" तुका ह्मणे राम तुझा तूंचि होई ।
अनुभव घेई गुरुपुत्रा "

साधी व्यतिरेकाची व अन्वयाची मांडणी ते शिष्यापुढें ठेवीत व त्याचें निजस्वरूप काय हें शिष्यास पटवून देऊन अभ्यासाचे व साधनाचे मार्गास लावीत असत. गुरुप्रचीति जाहली तरी शास्त्रप्रचीति व आत्मप्रचीति करून घेतलीच पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. कारण त्यानें आत्मस्वरूपाचें दृढीकरण होतें. श्रवणावर त्यांचा बराच जोर असे. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध, रंगनाथी योगवासिष्ठ या ग्रंथांवर त्यांचें फारच प्रेम असे.

श्री. ठकूताई आपल्या पुस्तकांत लिहितात कीं, " गीतेंत अनुभवच कांहीं नाहीं व अर्जुनानें श्रीकृष्णास पारमार्थिक प्रश्नच विचारले नाहींत व **विधियुक्त** ज्ञान भगवंतानें त्याला दिलेंच नाहीं " व अशा तऱ्हेचें असंबद्ध, अशास्त्रसंमत, व अयोग्य प्रलाप श्रीगुरुमहाराजबाबांच्या तोंडीं घालण्याचें पाप श्रीमतींनीं आपल्या डोक्यावर कां घ्यावें हें मला कळत नाहीं. ज्ञानेश्वरी ही गीतेवरीलच टीका होय. गुरुमहाराजबाबांना ती इतकी प्रिय असे कीं, बहुतकरून दरएक कथेंत चार दोन ओंव्या तरी जरूर यावयाच्याच. त्या ज्ञानेश्वरीची सर्व भिस्त गीतेवर. श्री. ठकूताईंच्या दृष्टीनें जर गीतेंतच अनुभव नाहीं तर ज्ञानेश्वरींत काय सांपडणार? मूळांतच जर त्यांच्या मतें कांहीं नाहीं तर वर कोठून येणार? आडांतच जर नाहीं तर पोहोऱ्यांत काय येणार? तेव्हां श्रीगुरुमहाराजबाबांची दिशा कोणीकडे व श्रीमती ठकूताईंची दिशा कोणीकडे !

" गीतेंत पारमार्थिक प्रश्न अर्जुनानें विचारिले नाहींत व श्रीकृष्णानें **विधियुक्त** ज्ञान दिलें नाहीं " याविषयीं जर श्रीमतींनीं निराळी स्वतंत्र टीकाच लिहिली असती तर एका दृष्टीनें बरें झालें असतें. परंतु परमपूज्य गुरुमहाराज बाबा यांच्या तोंडीं वरील अयोग्य सिद्धांत ( एकच नव्हे पुष्कळ ) घालणें हें बरें नव्हे. " मूले कुठारः " याप्रमाणें गीतेवर शस्त्र धरलें याला काय म्हणावें ?

श्रीगुरुमहाराजांची ज्ञान समजावून सांगण्याची पद्धति फारच सुलभ व सुबोध असे, व शिष्यांना अशा रीतीनें ते समजावीत असत कीं, जणूं काय शिष्यच आपल्या हृदयांतून ते काढीत आहे. ज्ञान हें स्वरूपप्राप्तीचें साधन आहे. साध्य वस्तु आत्मस्वरूप आहे, हें पूर्णपणें बिंबवून देण्याची ते खटपट करीत असत. त्याप्रमाणें व अशा साध्या व शास्त्रसंमत तऱ्हेनें श्रीमतींनीं जर

हा ग्रंथ लिहिला असता तर आम्हां सर्वांवर व जगावर केवढा तरी उपकार जाहला असता ! पण या पुस्तकांत सत्य तत्वें सुद्धां अशा तऱ्हेनें प्रतिपादन केलीं आहेत कीं, त्यांचा सर्व मूळ रस जाऊन नुसता चोथा राहिला आहे !

मुमुक्षूचे चार पांच भेद करण्यांत काय अर्थ ? परमपूज्य बाबा, नव्हे सर्व शास्त्र-पुराणें, असे भेद करीत नाहींत. श्रीगुरुबाबा तर म्हणत असतः—

**यारे यारे लहान थोर । याती भलती नारी नर ।**
**करावा विचार । मुक्त आणि मुमुक्षू ॥**

ही अभेद दृष्टि कोणीकडे व यांची " लघु " आणि " कनिष्ठ " इत्यादि भेद दृष्टि कोणीकडे ?

तसेंच बोध, प्रबोध व निजबोध हे भेद कशाला ? सर्वांचा बोध म्हणजे एक " ज्ञान " व दुसरें " अज्ञान " येवढेंच भेद पुरेत. अज्ञान जर असेल तर त्याचें निरसन ज्ञानानें झालें पाहिजे. पुस्तकांतील इतक्या सर्व खटाटोपाची जरूरीच नाहीं.

एकदां " सच्चिदानंदाची " ओळख झाली म्हणजे स्वरूप त्याचे पलीकडे आहे असें श्रीगुरुमहाराज समजावून सांगत असत. " सच्चिदानंद शब्द असता त्याहून तूं परता रे " हें फार प्रेमानें व कळकळीनें समजाऊन सांगत असत. हें सांगतांना गुरुशिष्य, श्रोता–वक्ता आनंदसागरांत मग्न होत असत. ही निज-स्वरूपानुभवाची तऱ्हा कोणीकडे व त्या पुस्तकांतील तऱ्हा कोणीकडे ?

असो. यावर सध्यां तरी ज्यास्त लिहावेसें वाटत नाहीं व लिहावयास वेळही नाहीं. केवळ आपण प्रेमानें व आग्रहानें विचारलेंच म्हणूनच मला आपणास माझे अल्पबुद्धीप्रमाणें व माझ्या थोडयाशा अनुभवाप्रमाणें नाइलाजास्तव लिहिणें भाग पडलें. श्रीगुरु बलभीममहाराजबाबा यांचे विचार पुस्तकांत श्रीठकूताईनीं लिहिल्याप्रमाणें नव्हते व इतर लोकांचा गुरुमहाराजांविषयीं गैरसमज न व्हावा एतदर्थच मीं येवढें लांबलचक पत्र आपणास लिहिलें. याशिवाय दुसरा कोणताही हेतु नाहीं हें मात्र आपण लक्षांत असूं द्यावें.

आपला
**ना. आ. काथवटे**

वरील पत्रें वांचून कोणाही सूज्ञांस श्रीगुरुबलभीममहाराज बाबा यांची योग्यता व शिकवण कळून आल्याखेरीज राहणार नाहीं. आपल्या पुस्तकांत ठकूताईनीं जीं असंबद्ध, अशास्त्रसंमत व खोटीं विधानें दडपून दिलीं आहेत तीं अयोग्य आहेत हें श्री. रा. रा. नागेशराव यांच्या पत्रांवरून उघड होतें. कांहीं लोकांचा जो श्रीगुरुबलभीममहाराजांविषयीं गैरसमज झाला आहे तोही

या पत्रांनीं दूर होईल. पाश्चात्य, तत्ववेत्ता ॲरिस्टॉटल् यानें आपला गुरु प्लेटो यांविषयीं असें म्हटलें कीं,

" Plato is dear to me, but
truth is dearer still "

" माझा गुरु प्लेटो यावर माझें प्रेम व आदर आहे. पण सत्यावर माझें विशेष प्रेम व आदर आहे. " त्याप्रमाणें श्रीठकूताईच्याविषयीं रा. रा. नागेशरावांचाच नव्हे तर आमचाही पूर्ण आदर आहे. पण शास्त्रसंमत सत्यवचनावर विशेष आहे. वाचकांनीं ध्यानांत ठेवावें कीं, श्री. ठकूताईनीं असंबद्ध वचनें श्रीगुरुबाबांच्या तोंडीं घातल्यानें बाबांची किंमत व योग्यता कमी न होतां उलट खरी जी आहे तीच जास्त उजळेल. कारण—

" न हि निंदा निंद्यं निंदितुम्
प्रवर्तते किंतु स्तव्यं स्तोतुम् "

या उक्तीप्रमाणें श्री गुरुबाबांची व श्री. रा. नागेशरावांची योग्यता कळून येईलच. श्री. नागेशरावांनीं वरील पत्रें ज्या सद्गृहस्थास लिहिलीं ते सद्गृहस्थ आमच्या पूर्ण परिचयाचे व ओळखीचे आहेत. ते म्हणजे श्रीयुत रामभाऊ खाडिलकर बी.ए. एल्.एल्. बी. वकील नाशिक हे होत. श्रीगुरु बलभीममहाराजांविषयीं व श्री. नागेशरावांविषयीं जी आमच्या मनांत पूज्य भावना होती ती रा. रा. खाडिलकर यांनीं आम्हांस वरील पत्रें दाखविल्यामुळें आणखी दृढ झाली. याबद्दल त्यांचे व श्री. नागेशरावांचे आम्ही आभारीच आहोंत.

असो, वरील सर्व मजकुरावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, ज्याप्रमाणें व्यवहारांत त्याचप्रमाणें परमार्थांतही मनुष्यानें विचार करूनच पाऊल टाकावें. नाहींतर तोटा झाल्याखेरीज राहात नाहीं. जी गोष्ट आपणाला समजत नसेल अथवा माहित नसेल ती योग्य अधिकारी माणसांकडून कळून घ्यावी व मग आपलें पुढील पाउल टाकावें. वेदांताचा मन मानेल तसा स्वार्थाकरितां उपयोग करून घेणाऱ्या गुरूंच्या दुकानदाऱ्या जगांत फार आहेत, व अशांत भोळे भाबडे फसतात. तरी पण सूज्ञांनीं श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, श्रीतुकाराममहाराज इत्यादि साधुसंतांनीं दाखविलेल्या चोख, सत्य मार्गाचें अवलंबन करून समाधान प्राप्त करून घ्यावें व अर्धवटांच्या नादीं लागूं नये व सत्य सन्मान्य जे महात्मे होऊन गेले असतील किंवा हल्लीं असतील त्यांविषयीं, खोटीं विधानें ऐकून गैरसमज करून घेऊं नये, येवढीच विनंति आहे.

———

# सामराजकवीचा काल.

लेखकः—प्रल्हाद धोंडो कानिटकर बी. ए. एल्. एल्. बी. भोर.

## लेखांक २

### १ सामराज, नागेश, जयराम पिंड्ये व परमानंद.

( १ ) वर दिलेल्या कवींनीं अनुक्रमानें रुक्मिणीहरण, सीतास्वयंवर, राधामाधवविलासचंपू व शिवभारत असे ग्रंथ लिहिले आहेत; त्यांपैकीं पहिले दोन मराठींत पद्यात्मक आहेत; तिसरा संस्कृत आहे व त्यापैकीं कांहीं भाग मराठी, कानडी, गुजराथी वगैरे १२ भाषांत लिहिला आहे, व शिवभारत सर्व संस्कृत आहे. राधामाधवविलासचंपूचा काळ शके १५७५–८० ठरलेला आहे; शिवभारताचा रचनाकाळही शके १५८२ ते १५९६ याच्या दरम्यानचा असल्याचें श्री. दिवेकर यांनीं ठरविलें आहे. चारही कवींनीं कांहीं गोष्टींचे सारखेच उल्लेख केले आहेत व त्या गोष्टींवरून सामराजाचा काळ ठरविण्यास विशेष मदत होईल असें वाटल्यावरून तत्संबंधीं चिकित्सा मी या लेखांत करीत आहे.

( २ ) स्त्रियांचे अलंकारवाचक शब्द सर्वकाळीं सारखे नसून निरनिराळ्या कालांतील काव्यांत त्यांचीं भिन्न भिन्न वर्णनें आढळतात. कांहीं अलंकार सर्वकाळीं सारखेच असणार; परंतु कांहीं अलंकार विशिष्ट कालांतच विशिष्ट प्रांतीं प्रचारांत असतात. यामुळें अलंकारवाचक शब्दांवरूनही कवीचा काळ ठरविण्यास साधन उपलब्ध होतें. वरील कवींच्या काव्यांत अलंकारांची थोडी फार वर्णनें आलीं आहेत; त्यांत नासालंकार ( नथ ) याचे पर्यायवाचक शब्द आहेत, त्यांत " मोर " हा अलंकार चारही कवींनीं दिलेला आहे व शके १५९६।९८ या काळांत झालेल्या राजव्यवहारकोशांत किंवा वामनपंडित, विठ्ठल ( १५९६।१६०९ ) आनंदतनय, वेणाबाई ( शके १६०० ) यांच्या काव्यांत तो आढळत नाहीं, यावरून तो अलंकार त्या नांवानें शके १५७५ च्या सुमारास प्रचारांत होता असें अनुमान निघतें. तसेंच शके १४९३ मधील नाथांच्या रुक्मिणीस्वयंवरांत त्याचा निर्देश नाहीं. वर उल्लेख केलेल्या अलंकाराचें वर्णन कवीच्या शब्दांत खालीं देतों:—

**१ सामराज** ( रुक्मिणीहरण. )

नये शुकाची तुलनेस चोंची। ती नासिकाही मग माय टोंची।

आणीक कांहीं तरि मौयना कीं । म्हणोनि घाली नथ माय नाकीं ॥
सर्ग २ श्लो. ५१

दंडीं धरी रत्नजडीत वांकी । त्याली असे बेसर दिव्य नाकीं ॥
सर्ग ६ श्लो. २५

बाळ्या धरी रत्नजडीत कानीं । नासेस मोतीं विलसे सुपानी ॥
सर्ग ६ श्लो. ३४

ते भीमकीस सिसफ़ूल शिरीं विराजे ।
नाकीं तिचे अति मनोहर मोर साजे ॥ स. ८।१३५

वरील श्लोकांत (१) नथ (२) बेसर, (३) मोतीं (सुपानी), (४) मोर, असे नथेचे चार पर्याय दिले आहेत.

**२ नागेश** (सीतास्वयंवर.)

फुलीं तथा बेसर मोर हातीं । चित्तास येना मग लेत मोतीं ॥
नाकास मोतीं अतिरम्य भावें । दाणा तयाचा अति मोल पावे ॥
श्लो. २०४

नाकीं बेसर आणि मौक्तिक फुली मोतीं नथें चांगलें ॥
श्लो. ३९६

नागेशानें (१) नथ, (२) बेसर, (३) मोतीं, (४) मोर, (५) फुली असे पांच पर्याय सांगितले आहेत.

यापैकीं " मोर " नांवाच्या अलंकाराशिवाय बाकीचे पर्याय राजव्यवहार-कोशांत आढळतातः–

नासापुष्पं तु बेसरम् । श्लो. ४५
नासामाणिर्नथो मुक्ताफलं मोतीं फुलीति तु ।
नासापुष्पम् । श्लो. ४६

**३ जयराम** (रा. माः वि. चंपु.)

खालील श्लोक राधिकेच्या सौंदर्यवर्णनांत आला आहे:—

**आर्या**

गारुडमणिमुक्ताफलललितः कलितः शिखावलो घ्राणे ।
निटिलवलत्कुटिलालकभुजगीमिव गिलितुमुच्चलति ॥
उल्ला. ३ श्लो. ७३

**भावार्थः**—नाकांतील मोर (शिखावल)–अलंकार–कपाळावरून लोंबणाऱ्या कुरळ्या केसास सर्पीण समजून गिळण्याकरितां वर चालला आहे (असा भास होतो).

**४ कवींद्र परमानंद** (शिवभारत.)

अफजलखानाला मारण्यापूर्वीं तुळजादेवीनें शिवरायास दर्शन दिलें, त्या

वेळचें देवीचें स्वरूपवर्णन २० व्या अध्यायांत केलें आहे, त्यांतील श्लोकः —

भ्राजिष्णुभालतिलकां रत्नरांजितकर्णिकाम् ।
मनोज्ञनासिकान्यस्तचित्ररत्नमयूरिकाम् ॥ ५ ॥

तात्पर्यः—तेजस्वी कुंकुमतिलक लावलेली, रत्नजडित कर्णभूषणें घातलेली, सुंदर नासिकेंत चित्रविचित्र रत्नजडित नथ घातलेली, तुळजादेवी (पृ. १९१)

परमानंदानें " मयूरिका " हा शब्द मराठी अलंकारवाचक शब्द " मोर " याचें संस्कृत रूपांतर (स्त्रीलिंगी) करून योजिला आहे ! शुद्ध मराठी विशेषनामांचीं (स्थलवाचक व व्यक्तिवाचक) संस्कृत रूपांतरें या कवीनें अनेक केलीं आहेत.

उदाहरणार्थः—नागोठणें = नागस्थान; धारवाड = धारावटं, भोंसले = भृशबल; पिलाजी = पिलुजित्; मालुसरे = मल्लसूरः; खंडागळे = खंडार्गलः इ. इ. अमरकोशांत अगर आपटे यांच्या संस्कृत इंग्रजी कोशांत मयूर, मयूरिका =नथ असा अर्थ दिलेला नाहीं; इतकेंच नव्हे तर " मयूरिका " असा शब्दही दिलेला नाहीं.

(३) नागेश, भृंगीपुर—भिंगार—येथील रहाणारा असून त्यानें सीतास्वयंवर काव्य त्याच गांवीं रचिलें. जयराम नाशिकप्रांतीं रहाणारा; त्यानें राधा० मा० वि० चंपू शहाजी राजे यांच्या दरबारीं बंगळूर येथें रचिला; कवींद्र परमानंद हा निधिवास—नेवासें—येथील रहाणारा; त्यानें शिवभारताची रचना काशीक्षेत्रीं केली. यावरून या तिन्ही कवींच्या काळीं नगर व नाशिक प्रांतीं " मोर " हा दागिना प्रचारांत होता असें दिसतें, व सामराज हाही त्या प्रांतांतील रहिवासी असावा असें अनुमान करण्यास हरकत दिसत नाहीं. प्रांतवार अलंकार भिन्न असतात हें हल्लींही अनुभवास येतें. नगर व नाशिक प्रांतीं ज्या काळीं " मोर " हा नासिकालंकार प्रचारांत होता त्याच काळीं " सामराज " कवीनें "रुक्मिणीहरण " लिहिलें असावें.

(४) सामराज, नागेश व जयराम या तिघांच्याही काव्यांत फारसी शब्द आढळतात. जयरामाच्या काव्यांत मराठी भाग थोडकाच आहे; नागेशाचे काव्यांत फार्सी शब्द अल्प प्रमाणांत आहेत. त्याच्या चौपट पांचपटीनें ते सामराजानें योजिले आहेत. ही महत्त्वाची बाब असून, सामराज शके १५५० ते १५७५ या काळांत झाला असावा या गोष्टीस पुष्टि देणारी आहे. यासंबंधीं विस्तृत विवेचन सामराज व तुकाराम यांच्या संबंधीच्या लेखांत होईल.

(५) तुळजापुरची देवी (तुकाई) इचे माहात्म्य शहाजी राजे यांच्या काळीं फार वाढलें व तत्कालीन काव्यांत तिचा उल्लेख होऊं लागला. शिवरायाची तर

ती कुळस्वामिणी होती यामुळें शिवभारतांतील उल्लेखास तितकें महत्त्व देतां येत नाहीं. शिवचरित्रांत तुळजादेवी, प्रतापगडची देवी, शंभुमहादेव यांचे उल्लेख येणें अपरिहार्य आहे. तशी गोष्ट इतर कवींची नाहीं. इतर कवींनीं केलेल्या उल्लेखांवरून, त्या कवींचे काळ ठरविण्याचें तें साधन होतें. सामराज व नागेश यांनीं केलेले उल्लेख खालीं दिले आहेत.

सामराज.

(१) विनवितें तुळजापुरवासिनी ।
अभयदायिनि, शंभुसुवासिनी ॥ सर्ग ३ श्लो. ९६.

(२) असो हें काठिण्य क्षितिधरकुळोत्तंसकुलजे ।
वदो वारंवार प्रकट तुजसीं काय तुळजे ॥
स. ६ श्लो. १०८.

नागेश.

प्रसन्न झाली जरि हे तुकाई ।
मला जनेंसीं तरि हेतु काई ॥ श्लो. ४

जयराम.

प्रभापाणि नारायण श्रीतुकाई ।
असी पूजिल्या ये भवा हेतु काई ॥ पृ. २६८ श्लो. १००

(६) तिन्ही कवींनीं विशिष्ट शब्दांनीं यमक साधिलें आहे :—

जयराम. (पृ. २६६)

चत्वर अंतरिं अंबर घालुन कामजुवारिजु खोलतो खासा ।
यक्ष सुरासुर रक्ष चराचर लोक विलोकिति सर्व तमासा ॥
तारगणें मुगतापण दाउन जिंति जगत्त्रय लाउन झांसा ।
लावियला परिधींत सुधानिधि कांस्यामधें तेणें फेरुन फासा ॥ ८१

नागेश.

बोले जळस्वामि पहा तमासा ।
पळून गेला उदकांत मासा ॥
लावी महा मारुत लोक झासा ।
गुंतोनि गेला मृग काय फांसा ॥ श्लो. १०५.

सामराज.

घातला दृढ गुणत्रय फांसा ।
लाविशी हरि किती मज झांसा ॥ सर्ग ४-११७

येथवर केलेल्या प्रपंचाचा निष्कर्ष इतकाच आहे कीं, नागेश, जयराम व परमानंद हे समकालीन असून, सामराज त्यांच्या पूर्वी झाला असावा.

## २ सामराज व एकनाथ:

साहित्यपाथोनिधिमंथनोत्थं कर्णामृतं रक्षत हे कवींद्राः ।
यदस्य दैत्या इव लुंठनाय काव्यार्थचौराः प्रगुणीभवंति ॥
( विक्रमांकदेवचरितम्. )

( ७ ) श्रीएकनाथमहाराजांनीं श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधाच्या आधारानें " रुक्मिणीस्वयंवर " नांवाचा ओंवीबद्ध ग्रंथ शके १४९३ ( प्रजापतिसंवत्सर ) या वर्षीं लिहिला आहे. ग्रंथसमाप्ति चैत्र शुद्ध नवमीस काशीक्षेत्रीं झाल्याचें लिहिलें आहे. रुक्मिणीस्वयंवराचे प्रसंग ( अध्याय ) १८ आहेत; पहिल्या सात ( १–७ ) प्रसंगांत रुक्मिणीहरणाचा कथाभाग पूर्ण होतो; पुढील सहा प्रसंगांत रुक्मीच्या युद्धाचें वर्णन आहे; व १४ ते १८ या पांच प्रसंगांत नाथांनीं लग्नसोहळ्याचें रसभरित वर्णन केलें आहे. रुक्मिणीहरण व रुक्मीचें युद्ध दशमस्कंधांत विस्तारानें दिलें आहे; लग्नसोहळा मात्र मुळींच दिला नाहीं. लग्नसोहळ्यासंबंधीं दशमस्कंधांत अगदीं थोडका उल्लेख आहे तो असा :—

पुरमानीय विधिवदुपयेमे कुरूद्वह ॥

या अनुष्टुबर्धाचा नाथांनीं फार विस्तार केला आहे; व यासंबंधीं कोणी शंका घेतील म्हणून खालीलप्रमाणें समाधान केलें आहे.

### प्रसंग १८.

रुक्मिणीहरणपूर्णता । जुनाट होय सर्वथा । पाणिग्रहणव्यवस्था । तीच नवी कथा जीवित्वाची ॥ ६३ ॥ यथाविधि पाणिग्रहण । मूळीं आहे व्यासवचन । तें सूताप्रति निरूपण । श्लोकार्ध जाण बोलिलों ॥ ६४ ॥ साच न मानी ज्याचें चित्त । तेणें पाहावें भागवत । तेथींचे श्लोकींचा श्लोकार्ध । ऐसाचि आहे सर्वथा ॥ ६५ ॥ राजे जिंकोनी दारुण । भीमकी आणोनी आपण । कृष्णें केलें पाणिग्रहण । हें निरूपण मूळींचें ॥ ६६ ॥ येणेंचि पदें पदविस्तारीं । कथा चालिली पुढारी । खोडी न ठेवावी चतुरीं । ग्रंथ निर्धारीं न पाहतां ॥ ६७ ॥

दशमस्कंधांत अध्याय ५२ व ५३ यांत रुक्मिणीहरणाचा कथाभाग दिला आहे.

( ८ ) भागवत दशमस्कंधांतील रुक्मिणीहरणकथा महाराष्ट्रीयांनीं ( व महानुभावांनींही ) मराठी भाषेंत गायिली आहे. मराठींत २० पासून २५ पर्यंत रुक्मिणीस्वयंवरावर काव्यें उपलब्ध आहेत. त्या सर्वांत नाथांचा ग्रंथ श्रेष्ठ होय. नाथांनीं रु० स्वयंवर अध्यात्म दृष्टीनें लिहिलें आहे. " जीवशिवैक्य " अथवा

" प्रकृतिपुरुषसंयोग " हें नांव नाथांच्या काव्यास अन्वर्थक होईल. त्यांचीं वर्णनेंही अत्यंत रसभरित व यथोचित आहेत.

यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्कचित् ।

ही महाभारतासंबंधीं उक्ति नाथांच्या रुक्मिणीस्वयंवरासही पूर्ण लागू आहे असें विधान केल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. कोणतेही मराठी रुक्मिणीस्वयंवर पहा, त्यांत नाथांच्या कल्पना दृष्टीस पडतात. इतकेंच नव्हे तर, कोणत्याही मराठी कवीचें " सीतास्वयंवर " वाचल्यास थोडया फार फरकानें लग्नसोहोळ्यांचीं वर्णनेंही नाथांच्याच धर्तीवर केलेलीं आढळतील. यावरून या लेखाच्या प्रारंभीं दिलेल्या श्लोकांतील तत्व किती सर्वव्यापी आहे हें विशद होतें. सामराज जरी बराच उच्च दर्जाचा कवि आहे तरी त्यानेंही नाथांच्या साहित्याची चोरी केली आहे असें आढळून येतें; व ही गोष्ट पुढें दिलेल्या उताऱ्यांवरून समजून येईल. " रुक्मिणीहरण " हें रुक्मिणीच्या उत्कट भक्तीनें घडून आलें ही गोष्ट नाथांनीं पदोपदीं व्यक्त केली असूनही, सामराजानें रुक्मिणीच्या विरहावस्थेचें वर्णन प्राकृत नायिकेच्या विप्रलंभ शृंगारास साजेल अशा रीतीनें केलें आहे. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्थात्रयींत रुक्मिणी कृष्णध्यानमग्न होती या गोष्टीचा सामराजानें विपर्यास केला आहे.

( ९ ) सामराजानें भागवतांतील दशमस्कंधांतील अध्याय ५२ । ५३ यांतील सर्व श्लोकांचें सरस भाषांतर केलें असून, कांहीं ठिकाणीं नाथांच्या कल्पना-प्रसंगविशेषीं त्यांच्याच शब्दांत–घेतल्या आहेत ! रुक्मिणीहरणकथा नाथांनीं पहिल्या ७ प्रसंगांत ग्रथित केली आहे; त्यांतील उतारे व त्या प्रसंगाचें सामराजानें केलेलें वर्णन क्रमवार पुढें देत आहे:––

**एकनाथ** ( प्रसंग १ )

( १ ) रुक्मिया कृष्ण निंदा करित । वाग्देवता स्तुति वदत ।
निंदेशीं वागेश्वरी भीत । पाप अद्भुत निंदेचें ॥ ९७ ॥
एका जनार्दनीं विनवित । निंदेमाजीं स्तुति होत ॥ ९८ ॥

**सामराज** ( सर्ग २ )

तदुपरि हरिनिंदा जे मुखांतून आली ।
स्तुतिपर परभागें ते महा पुष्ट झाली ॥
अनृत वचन कांहीं वैखरी हे वदेना ।
सहज हरिचरित्रा दोष येऊंच देना ॥ ११६ ॥

**एकनाथ** ( प्रसंग २ )

( २ ) विघ्न देखोनियां थोर । होय मत्स्य कीं सूकर ।
नातरी पाठी करोनि निबर । रूप धरी कमठाचें ॥ १२ ॥

**सामराज** ( सर्ग ३ )

जाला असे जो उदकांत मासा । तसाचि हा कांसवही अमासा ॥ १९ ॥

( निबर=अमासा=मांसरहित, कठीण. )

**एकनाथ** ( प्रसंग २ )

( ३ ) थोर मांडिलें सांकडें । तैं मेळविलीं माकडें ॥ १७ ॥

**सामराज** ( सर्ग ३ )

गमाविलें पौरुष रामरूपें । तें मर्कटें मेळविलीं अमूपें ॥ २१ ॥

**एकनाथ** ( प्रसंग २ )

( ४ ) लाथ हाणितली उरावरी । तैं पद मिरवी निलाजरा ॥ २५ ॥
तया कृष्णाशीं सोयरीक करणें । लाजिरवाणें लोकांत ॥ २६ ॥

**सामराज** ( सर्ग ३ )

उरीं जयाचें मिरवे लहासें । या सोयऱ्यांचें करिशील हांसें ॥ २३ ॥

**एकनाथ** ( प्रसंग २ )

( ५ ) वचन ऐका प्रबळ । चैद्यदेशींचा भूपाळ ।
महा अभिमानी शिशुपाळ । सोयरा केवळ तो आह्मां ॥३४॥
शरीरसंबंधाचें घटित । तयाशींच आहे निश्चित ॥ ३५ ॥

**सामराज** ( सर्ग ३ )

जो चैद्यदेशीं दमघोष आहे । विख्यात ज्याचें कुलशील पाहे ।
आहेच पूर्वींहुन सोयरा जो । संबंध त्यासीं तुजसी विराजो ॥ २६ ॥

**एकनाथ** ( प्रसंग ५ )

( ६ ) जे कृष्णासी मीनले । ते परतोनी नाहीं आले ॥ ५७ ॥

**सामराज** ( सर्ग ६ )

जे भक्त कृष्णाप्रति पावताति । फिरोन ते काय घरा न येती ॥ ९३ ॥

**एकनाथ** ( प्रसंग ५ )

( ७ ) मज नलगे विंझण वारा । तेणें होतो अधिक उबारा ॥ ७१ ॥

**सामराज** ( सर्ग ३ )

व्यजनपवनयोगें होतसे हा उबारा ॥ ७२ ॥

**एकनाथ** ( प्रसंग ६ )

( ८ ) कृष्ण नोवरा भीमकीलागीं । भीमकी हो कृष्णाजोगी ।
सृष्टीं शोभती हेही दोघीं । न देखों जगीं तीसरें ॥ २५ ॥
आमचें जन्मोजन्मींचें सुकृत । शुद्ध पुण्य सुशोभित ।
तेणें तरी कृष्णनाथ । भीमकीकांत हो लग्नीं ॥ २६ ॥

**सामराज** ( सर्ग ७ )

दैवें मिळे हा यिजयोग्य जोडा ।
परंतु आहे अवकाश थोडा ॥

हें आमचें पुण्य उभें रहावें ।
दोघांजणा सत्वर ऐक्य व्हावें ॥ ७६ ॥

**एकनाथ** ( प्रसंग ६ )

( ९ ) भीतरी परवडी आढावांचीं । शस्त्रें उघडीं हातीं त्यांचीं ।
मागें परवडी धनुर्धरांची । शितें मनुष्यांचीं वाहिलीं ॥ ५३ ॥
तयांमागें वीर घोडीं । रथ जोडियले जोडीं ।
वर बैसले परवडी । शस्त्रें उघडीं झळकतीं ॥ ५४ ॥
तयांमागे कुंजर थाट । गळां सांखळिया एकवट ।
खिळिले चालतां गजघंट । दुर्ग अचाट सैन्याचा ॥ ५५ ॥

**सामराज** ( सर्ग ८ )

जे लोक खासे जवळील भारी । आरूढ ते ज्यांवरि शस्त्रधारी ॥
सभोंवते चालति ते शिपायी । हे चाललीसे सुकुमार पायीं ॥ ५१ ॥
त्याभोंवता सज्ज पदाति फेरा । त्याभोंवता स्वारसमूह घेरा ।
त्याभोंवते हे रथ थाट चाले ! त्या भोंवते मत्त गजेंद्र काळे ॥ ५२ ॥

**एकनाथ** ( प्रसंग ७ )

( १० ) फिटला चिंतेचा दचकू । म्हणोनी न घाली चितांकू ॥ ३८ ॥

**सामराज** ( सर्ग ६ )

चितांक चिंताकुल लेत नाहीं ॥ २८ ॥

**एकनाथ** ( प्रसंग ७ )

( ११ ) भीमकी पाहे कृष्णवदन । नयनीं गुंतले नयन ।
दोहींचा एक झाला प्राण । पाणिग्रहण जीवशिवां ॥६७ ॥

**सामराज** ( सर्ग ८ )

जनाच्या सौभाग्यें प्रकृतिपुरुषां योग घडला ॥ १६७ ॥

**एकनाथ** ( प्रसंग ८ )

( १२ ) हर्षें नाचत नारद । आतां होईल द्वंद्वयुद्ध । यादव आणि मागध । झोड धरणीं भिडतील ॥ ७३ ॥ शस्त्रें सुटतील गाढीं । वीर भिडतील कडोविकडी । डोळे–भरी पाहीन गोडी । शेंडी तडाडी नारदाची ॥ ७५ ॥

**सामराज** ( सर्ग ८ )

तयां सर्वांमध्यें प्रिय परम हा नारद असे ।

..........................................

निज प्रेमें नाचे, हरिचरण लाभें तरवरी ।
शिखा युद्धासाठीं अतिशयित त्याची थरथरी ॥ १७२ ॥

( १० ) वर जे १२ उतारे दिले आहेत, त्यापैकीं एकही भागवतांतील

एखाद्याही श्लोकाचें भाषांतर नाहीं; सर्व वर्णनें नाथांच्या काव्यसृष्टींतील आहेत; व त्या सर्व कल्पनांना सामराजानें फक्त निराळा पेहेराव दिला आहे. नाथांचे शब्दसुद्धां सामराजानें उचलले आहेत. बीडकर विठ्ठलांचे सप्तसर्गात्मक " रुक्मिणीस्वयंवर " या दृष्टीनें वाचलें तरी त्याचीही फलश्रुती वरीलप्रमाणेंच— सामराजाप्रमाणें—निष्पन्न होते. सामराजानें नाथांची अध्यात्मदृष्टि कायम ठेविली असून, विठ्ठलानें त्या तत्वाचा अंगिकार केला नाहीं. सामराजानें आपलें काव्य कशाच्या आधारावर रचिलें आहे तें सांगितलें आहे:—

जे बोललीं भागवतीं पुराणीं । विस्तारिली जे पुरवीं पुराणीं ।
पवित्रकर्ती सकळा जगा या । आधारही थोर असे जगाया ॥

स. १–३१

( ११ ) यावरून सामराजाचें काव्यास भागवत पुराण व सामराज पूर्वकालीन पुरुष--अर्थात् एकनाथ--हे दोन आधार असल्याचें उघड दिसतें. नाथांनीं रुक्मिणीस्वयंवरांत केलेलें विवरण भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग यांस धरून आहे; सामराजानें " रुक्मिणीहरणांत " नवविधा भक्तीचें उत्कृष्ट विवेचन केलें असून, विषयव्यावृत्ति, एकतानता, सेव्यसेवक-भाव व श्रवणापासून आत्मनिवेदनापर्यंत भक्तीची मजल गेल्याशिवाय परमात्म्याची प्राप्ती होत नाहीं इतक्या सर्व गोष्टी क्रमाक्रमानें विशद केल्या आहेत. व तें खालील उदाहरणांवरून व्यक्त होईल.

( १२ ) ( १ ) हरिविण विषयांचा स्वाद कांहींच नेवे ।
( २ ) विमल कमल हातीं भीमकी घेत नाहीं ।
( ३ ) हरियुत हरितेचा वायुहि फार मानी ।
( ४ ) हरिविण दुसरा हा नायके शब्द कानीं ।
( ५ ) निशिदिन तिज लागे ध्यान हें द्वारकेचें ।
( ६ ) कृशतनु तनु झाली, भूकताहान गेली ।
( ७ ) सहज यदुपतीचें नाम जे घेत आहे ।
उघडुनि मग डोळे तीकडे मात्र पाहे ॥
( ८ ) स्मरण तुज मुकुंदा कां नव्हे आजि माझें ।
तुजविण मज माझा देह हा होय ओझें ॥
( ९ ) एक वेळ मज सन्मुख यावें । श्रीहरी चरण दर्शन द्यावें ॥
( १० ) क्षणभरि तिस लागे जागृती माजि डोळा ।
तदुपरि गरुडीं हे कृष्ण आरूढ देखे ॥
( ११ ) जनक हे जननी मजला नसे । यदुपती मज आस तुझी असे ।

(१२) महा प्रस्थानाचे अनुभवुनि संक्लेश पुरते ।
तुझे भेटीसाठीं पुनरपि हरी प्राण धरते ॥
(१३) अरे तूझें नामस्मरण करिते अंतसमयीं ।
सुखें राहे कृष्णा, यथुन, पुरता होय विजयी ॥

येणें प्रमाणें रुक्मिणीनें आत्मनिवेदन करण्याचा निश्चय केल्याबरोबर, तिची अधिक परीक्षा न पहातां श्रीकृष्णपरमात्म्यानें तिला दर्शन देऊन संकट-मुक्त केली.

(१४) इच्या वक्त्रांभोजापसुन सज वाग्बाण सुटती ।
मनीं श्रीकृष्णाचे अति तिखट जाऊन बसती ॥
असे झाला तेथें क्षणभरि अति व्याकुल हरी ।
प्रियेच्या आक्रंदें किमपि न सुचे ते अवसरी ॥ स. ६।१६६

इतके उतारे देण्याचें कारण इतकेंच कीं, सामराजानें नाथांचे अनुकरण किती हुबेहुब केलें आहे तें प्रामुख्यानें निदर्शनास यावें. यावरून एकनाथा-नंतर सामराज झाला हें ठाम ठरतें.

---

# सहजोद्गार

[ लेखक—**दामोदर व्यं. पै, रायतुरकर** ]

१

एखादें तत्व उच्च ठरलें कीं, प्रतिकूल परिस्थितींतहि अज्ञ जनतेला त्याचा बोध करणें आणि खऱ्या उत्कर्षाला अपकारक अशी परिस्थिति मोडून टाकणें हें तज्ज्ञांचें कर्तव्य असतें. आपली उन्नति आधीं साधल्यानंतर, इतक्यावरच न थांबतां, कर्तव्यपराङ्मुख समाजास वठणीवर आणण्याचा प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे. देहाच्या विषयादिक चोंचल्यास भुलून, अध्यात्म विचारांपासून फटकून वागणारे हतभागी पिंडपोषणवृत्तीच्या जाळ्यांतून सुटून आत्मविचा-रास प्रवृत्त होतील ह्याबद्दल प्रत्येक सहिष्णु पुरुषाला तळमळ लागून राहिली पाहिजे.

२

पण जो महात्मा ब्रह्मानंदाची अत्युच्च पायरी गांठून स्वात्मसुखाचे पेले झोंकीत तेथेंच मग्न झाला असेल त्यास ही जबाबदारी लागू होतेच असें नाहीं व त्यास स्वार्थी म्हणण्याचा अधिकारहि कोणास पोंचत नाहीं. कारण द्वैताचाच

जेथें निरास झाला तेथें उपदेशक व उपदेश्य हा भेद तरी कोठचा असणार ? जनतारूपानें भासणारा परमात्माच जो बनला, तो जनतेशीं अर्थातच आपल्याशींच काय बोलणार ? किंवा श्रीरामकृष्णपरमहंसांच्या भाषेंत सांगायचें झाल्यास महासागराचा ठाव घेण्याकरितां गेलेली मिठाची बाहुली परत कसली येणार ! ती तेथेंच विरून जाऊन महासागराशीं एकरूप होईल.

श्रीस्वामीविवेकानंद प्रव्रज्यावस्थेंत असतांना **गाजीपूर** येथील सत्पुरुष **पव्हरी बाबाजी** ( फडकेकृत स्वामी विवेकानंदचरित्र, भाग १ था, पृ० ६११ ) ह्यांची त्यांनीं भेट घेतली व ह्या भेटीमुळें त्यांना अलौकिक लाभ झाला. बाबाजींचें अगाध ज्ञान पाहून एके दिवशीं स्वामीजी त्यांना म्हणाले " महाराज, आपण एवढे ज्ञानी असून आपल्या ज्ञानाचा इतर अज्ञ जीवांना फायदा करून देण्याकरितां गुहा सोडून बाहेर कां पडत नाहीं ? " स्वामींचा प्रश्न ऐकून बाबाजी म्हणाले " लोकांना शहाणे करण्याकरतां त्यांच्या घरीं जाऊनच ज्ञान सांगण्याची जरूरी आहे काय ? बसल्याजागीं एका आत्म्याला दुसऱ्या आत्म्यास सहाय्य करतां येणार नाहीं काय ? "

हें उत्तर ऐकून स्वामीजी थक्क झाले व पव्हरी बाबांविषयीं त्यांच्या मनांत पराकाष्ठेचा पूज्यभाव उत्पन्न झाला.

३

पराकाष्ठेच्या आत्मानंदांत जे गुंग असतात त्यांना सामान्य जनांची लौकिकबंधनें सुद्धां लागत नाहींत. ते दिगंबर रहातील, फाटकें वस्त्र परिधान करतील किंवा पीतांबर धारण करतील, त्यांना कसलाच विधिनिषेध रहात नाहीं. मग लोकांना उघड उपदेश करावाच अशी सक्ती तरी त्यांच्यावर कोण कशी करूं शकणार ? त्यांची मूकवृत्ति हाच उपदेश ! त्यासंबंधीं स्वामी रामतीर्थ म्हणतात :--

" असला ( मुक्त ) पुरुष लोकांना उपदेश करण्यासाठीं तोंड उघडो अगर न उघडो; असला पुरुष ग्रंथरचना करो किंवा न करो; लोकांपुढें व्याख्यानें देण्याकरितां येवो अथवा न येवो; मनुष्यजातीचें कल्याण करणार कोणी असेल, तर तो असला मुक्त पुरुषच होय."

४

आपण पोटभर जेवल्यानंतर दुसरा जेवीत असलेला पाहून आपल्याला त्याचा तिटकारा येतो ! विषयांची गोष्ट अशीच आहे. ते तात्पुरते सुख देऊं शकतात. त्यापलीकडे त्यांची मर्यादा खुंटते व तोच विषय दुसरा उपभोगीत असल्यास आपल्याला चिळस येते. पण ही चिळस सुद्धां क्षणिकच असते. पुन्हा आपली इच्छा वाढली कीं, तृष्णारूपी लता आंत डोकावूं लागून दुसऱ्याचा हेवा वाटूं लागतो !

तथापि, परमार्थाची गोष्ट अशी नाहीं. एकदा ब्रम्हानंदाचें यथेच्छ पान करून जीव ब्रम्हीं लीन केला कीं, त्यापासून होणारा आनंद अक्षय्य असतो व दुसरा कोणी त्याच मार्गानें येत असल्यास त्याचा तिटकारा न येतां उलट आनंदच होतो. आपण त्याला शक्य ती मदत करीत असतों. किंबहुना, हा ब्रम्हानंद चाखायला सगळ्यांनींच यावें अशी उत्कट इच्छा होऊन स्वार्थमय व आसुरी संसारांत लोळत पडलेल्या प्रापंचिक वीरांची कींव येते. परमार्थांत स्वार्थ नाहीं, मत्सर नाहीं, मोह नाहीं, इतकेंच नव्हे तर, काम किंवा हेतु सुद्धां शेवटीं नष्ट होऊन जातो. मूळाला ईश्वरप्राप्तीसाठीं किंवा मोक्षासाठीं भक्त हरिभक्ति करीत असतो. पण ह्या भक्तीपासून साधणारें प्रेम व वैराग्य वाढतां वाढतां वृत्तीच ब्रह्ममय होतात आणि साध्य म्हणून कांहीं निराळें रहात नाहीं. प्रथमकालीं भक्त भक्तीला धरीत असतो पण शेवटीं भक्तीच आपल्या प्रेममय व चिद्रूप पाशांत भक्ताला अडकवून ठेवते. ह्या अलोट प्रेमापुढें मोक्षाची आठवण कोठची ? श्रीसद्‌गुरुनाथ तुकोबाराय ह्या प्रसंगीं म्हणतात :—

“ मोक्ष तुमचा देवा तुम्ही दुर्लभ तो ठेवा ।<br>
मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरीं ते गोडी ॥ ”

ब्रह्मानंदाची जितकी जितकी जास्त प्राप्ति होते तितकी तितकी शांति वाढून भक्त देहातीत होतो.

५

विषयांचें सेवन लवकरच पुरें होतें. कारण विषयग्राहक इंद्रियांची सेवनशक्ति मर्यादित असते. खाण्याची केवढीहि अनावर इच्छा झाली म्हणून बाजवीपेक्षां जास्ती खाववत नाहीं व जास्त खाल्ल्यास मागाहून त्रास होतो. रतिसंभोगास हपापलेल्या विषयांधास ललनांचे कितीहि समूह आणून दिले तरी अत्यत आकुंचित मर्यादेपलीकडे त्याच्यानें जाववणार नाहीं ! विषयसेवनापूर्वीं आपल्याला ब्रह्मांडहि थोडें वाटतें. पक्वान्नाचें भांडारहि कोणास टाकावेंसें दिसत नाहीं किंवा जगांतील साऱ्या यौवनसंपन्न तरुणी कल्पनासाम्राज्यांत थोड्याच दिसतात. तथापि, विषयसेवनानंतर मनास क्षणिक वैराग्य येतें व तेंहि स्मशानवैराग्यच !

त्याच्या उलट ब्रह्मानंदसेवनानें होणारें सुख अवीट असतें. त्याचा आधीं किंवा नंतर कधींच कंटाळा येत नाहीं व तें ज्या ज्या मानानें सेवीत जावें त्या त्या मानानें ब्रह्मानंदप्राप्तीची अभिरुचिहि तशीच वाढत जात असते. द्रव्यप्राप्तीच्या मानानें आपले क्लेश वाढतात, भीति वाढते, भ्रम वाढतो, तृष्णा वाढते व मन दुबळें बनत जातें तर ब्रह्मानंदाच्या चढत्या प्राप्तीबरोबर निरंतर हितच होत जातें व चित्तस्थैर्य प्राप्त होऊन मानसिक शांति लाभते.

६

आत्मज्ञानपरिपूर्ण होऊन सागराकडे धांव घेणारी सरिता इतर लहान लहान नद्यांना सुद्धां आपल्याबरोबरच समुद्राशीं नेते. सागराला मिळाल्याशिवाय नदीला स्वास्थ्य मिळत नाहीं कारण तोच तिचें साध्य. पण नदीचा महत्वाचा विशेष हा कीं, आपणाबरोबर दुसऱ्यांनाहि ती साध्याकडे नेते. नपेक्षां दुसरे लहान जलसंघ एकाद्या वाळवंटांत पोंचून रेतींत गडप झाले असते. मग त्यांना सागर कोठचा ?

सत्संगतीचा परिणाम असाच आहे. महात्मे पुरुष आपणाबरोबर दुसऱ्या मुमुक्षु जीवांनाहि स्वस्वरूपाकडे नेत असतात. म्हणूनच तुकोबारायांनीं

" नलगे मुक्ति धनसंपदा । संतसंग देगा सदा "

अशी परमेश्वरापाशीं मागणी केली.

७

समुद्रकिनाऱ्यावर येणाऱ्या लाटा निघून गेल्या तरी त्यांच्या फेनानें बनलेल्या वक्र रेषा कांहीं काळ तरी टिकत असतात. मनःसागरावर उसळणाऱ्या आपत्तिरूप लाटा हृदयस्थानावर आपटल्यानंतर कांहीं काळपर्यंत मनाला त्यांची जाणीव उरते. पण ही जाणीव विसरण्यांतच मनुष्याची अवनति असते.

अशा रीतीनें उसळणाऱ्या असंख्य लाटांपैकीं कांहीं लाटा अगदीं कांठावर येत असतात; कांहीं थोडया अंतरावरूनच परत जातात; तर दुसऱ्या थोडया इतर लाटांवरच विराम पावतात. पण त्यांपैकीं जी लाट कांठाजवळ जास्ती येते तिचेंच फेनयुक्त रेषाचिन्ह रहातें. बाकीच्यांच्या रेषा इतर मोठया लाटांनीं पुसल्या जातात. संसारसागरांतील आपत्तिरूप लाटा अशाच प्रकारच्या असून अत्यंत मोठी आपत्ति मनावर जास्त परिणाम करते. ह्या आपत्तींमुळेंच चांगलें विचार सुचतात. मनाच्या अगदीं खालच्या तळाशीं त्याचा संघात बसून संस्काररूप रेषाचिन्हें चिरस्थायी होतात.

साधुसंतांनीं ह्याचसाठीं परमेश्वरापाशीं आपत्तींची मागणी केलेली असून मातोश्री कुंतीनें श्रीकृष्णविस्मरण होऊं नये ह्यासाठीं संकटें कोसळावीं अशी प्रभूपाशीं मागणी केली. तुकोबांनीं बायकापोरें मेलीं हें सुचिन्हच मानलें !. आणि देवहि भक्ताला संसार करूं देत नाहा हें प्रसिद्धच आहे.

" देव भक्तालागीं करूं नेदी संसार "

मग सत्पुरुष होऊं इच्छिणाऱ्यांनीं सुविचार उत्पन्न करणाऱ्या आपत्तींचा इतका तिटकारा कां करावा ?

८

वनांत सुंदर लतांवर तरंगणारीं पुष्पें वाऱ्याच्या झोतामुळें एकमेकांवर आप-

टून त्यांच्या पाकळ्या विस्फळित व गलित होतात. पण त्याबद्दल पुष्पें जबाबदार नाहींत, वारा जबाबदार आहे; व वारा जबाबदार असल्यामुळें त्या पुष्पांनीं एकमेकांवर रागावण्याचें ज्याप्रमाणें कारण उरत नाहीं, त्याचप्रमाणें परतंत्र अशा मनुष्याचा कोणाकडून अन्याय झाला तर त्याबद्दल रागें भरण्याचें कारण उरत नाहीं. त्यास क्षमा करणें हें योग्यच आहे.

नियतिवादानुसार कोणास कोणी दोष देण्याचें प्रयोजन नाहीं. कां कीं, प्रत्येक जीवात्मा दुसऱ्याशीं निगडित झालेला असतो. मनुष्याच्या अशा परस्पर संबंधामुळें किंवा एकाच पथावरील त्यांच्या अस्तित्वामुळें ज्याच्या त्याच्या मार्गानुक्रमणांत इतरांस थोडातरी अडथळा येणें साहजिकच असतें. म्हणून विचारी पुरुषांनीं दुसऱ्यावर न रागावतां क्षमा करणें हें युक्त आहे. फार तर दुसऱ्याकडून होणारा अडथळा प्रत्येकानें टाळण्याचा प्रयत्न करावा. पण प्राप्त आपत्ति भोगल्याशिवाय कोणाचीच सुटका नाहीं.

९

भेददृष्टीनें पहाणाऱ्याला समुद्र व त्यावर तरंगणाऱ्या लाटा भिन्न दिसतात. पण वास्तविक त्यांत भिन्नता नसते. उंच कांठावर राहून जो द्रष्टा ह्या लाटांचा देखावा पहातो त्याला तसें वाटणें साहजिकच असतें. कारण तो समुद्रापासून दूर अत एव भिन्न असतो.

पण समुद्राच्या बुडाला राहून पहाणाऱ्याला एका पाण्याशिवाय कांहींच दिसत नाहीं. पृष्ठभागावर उसळणाऱ्या मोठमोठ्या वीचि त्यास उमगणारहि नाहींत. तो आणि पाणी एकरूप झाल्यामुळें त्याला कसलाच निराळेपणा भासत नाहीं.

मनाची द्वैतभावना न विरतां जगाकडे पाहिल्यास तें भासतें. कारण, द्रष्टा असेतोंपर्यंत दृश्य आहे. द्रष्टेपणाचा भेद मावळून जेव्हां मनुष्य ब्रम्हांत तादात्म्य पावतो तेव्हां त्यास ब्रह्माशिवाय कांहींच दिसत नाहीं. सर्व जगत् ईश्वरमय व आनंदस्वरूप भासतें. परमार्थाची उच्च पायरी हीच आहे. "विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म" असें तुकोबाराय म्हणतात. त्याप्रमाणें जेव्हां सारें जग विष्णुमय भासतें तेव्हां, ध्याता, ध्यान, ध्येय; ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय वगैरे त्रिपुटी मावळून, भक्ताला सर्वांभूतीं परमेश्वर दिसूं लागतो. साधक साध्यस्वरूप बनतो, ध्याता ध्येयरूप बनून जातो व द्वैतभावाच्या अभावामुळें अहंकाराचा निरास होऊन अंतःकरणाच्या वृत्ति परमात्मपदीं लीन होतात.

गोकुळींच्या गोपगोपींनीं श्रीकृष्णस्वरूपाशीं अशीच एकात्मता करून घेतली होती. श्रीकृष्णप्रेम चाखतां चाखतां त्यांच्या वृत्ति कृष्णरूप बनून गेल्या होत्या. " जें जें दृष्टि दिसें तें तें कृष्ण भासे । गोपिका समरसें नित्य-

बोध् ॥" अशी नाथांनीं वर्णिल्याप्रमाणें त्यांची स्थिति झाली होती आणि म्हणूनच गोपीप्रमदांच्या एका अश्रुबिंदूलाहि कोटी कबीर वाहवण्याचें सामर्थ्य होतें !

१०

दोन सख्खीं भावंडें शैशवांतच कांहीं कारणामुळें विभक्त झालीं तर मोठे-पणीं त्यांस आपल्या बंधुत्वाची जाणीवहि रहात नाहीं. तीं परस्परांस परकीं लेखूं लागतात. परंतु, वस्तुतः त्यांच्या सहोदरत्वाचा संबंध लौकिकदृष्ट्या तुटलेला नसतो. मात्र अज्ञानामुळें त्यांस बंधुत्वाची ओळख होत नाहीं इतकेंच.

स्वतःच ब्रह्म असलेल्या मनुष्यास मनाच्या द्वैतपर भावनेमुळें ब्रह्माचीच ओळख पटत नाहीं. तो आपल्या स्वरूपाला पारखा होतो व अज्ञानामुळें आपल्यास ब्रह्मापासून विभक्त व भिन्न मानतो. पण ही नातेपणाची ओळख करून देऊन मनोलय करणारा एकादा सत्पुरुष सांपडला कीं, मग विभक्तीचा अभ्यास सोडून ब्रह्मैक्य करून घेतो व आत्मानंदांत रत राहून शेवटीं गुणातीत होतो.

११

मातीनें मढून गेलेला लोखंडाचा तुकडा लोहचुंबकाच्या जवळ असला तरी आकर्षिला जात नाहीं. पण धूळ नाहींशी होतांच लगेच तो लोहचुंबकाकडून वेगानें आकर्षिला जातो. अज्ञानाचीं पुटें चढलेल्या मानवी मनाची स्थिति अशीच आहे. परमेश्वर सर्वत्र व्यापून आहे. तो नाहीं असें ठिकाणच नाहीं व त्याकडे जाणें हेंच मनाचें ध्येय आहे. आत्मतत्वांत मनाचा लय होणें म्हणजेच नराचा नारायण होणें होय.

पण अज्ञानाचीं पुटें जोंपर्यंत आपलें आवरण सोडीत नाहींत तोंपर्यंत परमात्मतत्वाची ओळख पटत नाहीं. कारण विषयांची संगति फार दुष्कर आहे. आपल्या तावडींतून ते कोणाला सहसा सोडीत नाहींत. तथापि, अभ्यासानें मनाची देवाच्या ठिकाणीं एकाग्रता केली व नामामृतानें अंतःकरण भरून टाकलें कीं मायापटलांचा विध्वंस होतो व जवळच असणाऱ्या परमेश्वराची प्राप्ति होते.

# परमामृतांतील उत्कृष्ट उतारे.

१

जें आणोनि सर्व कीजे । जें सर्वदा अभ्यासिजे ।
जेथें परतोनि चित्तें राहिजे । बुडी देउनी ॥ १ ॥
जें अभ्यंतरीचें ज्ञान । प्रकट बोलेन साधन ।
जेथें रतले योगीजन । निरंतर ॥ २ ॥
जैसें सागरीचें अमृत । कां पय मथूनि काढिजे नवनीत ।
तैसें सार सर्वांत । तेंचि सांगेन ॥ ३ ॥
जपतप अनुष्ठानें । आणि नानापरींचीं साधनें ।
मोक्ष न पाविजे आत्मज्ञाने- । वांचोनिया सर्वथा ॥ ४ ॥
जोंवरी जीवेश्वरउपाधी । निरसूनि नेणिजे ऐक्यसिद्धी ।
भेद सांडूनि शबल विरोधी । शुद्ध स्वरूप न प्रकाशे ॥ ५ ॥
सांडूनि वेदांतसिद्धांत । जे कां बोलती पाखांड मत ।
त्यांची नायकावी मात । महावाक्यार्थ अनुभविजे ॥ ६ ॥ (प्र० २)

२

करूनि आदिशक्तीचा अंगिकारू । जो करी उत्पत्तिस्थितिसंहारू ।
सर्वसाक्षी सर्वेश्वरू । तो शबल बोलिजे ॥ ७ ॥
स्थूलदृष्टीचें जाणणें । तितुकेंही निरसणें ।
उरे अदृश्य जो द्रष्टेपणें । तोचि शुद्ध परमात्मा ॥ ८ ॥
उत्पत्तिस्थितिसंहार । सर्वसाक्षित्वाचा व्यवहार ।
या अवस्थातीत अपार । आपेंआप जो ॥ ९ ॥
ब्रह्मा विष्णु रुद्र । आणि चौथा हा सर्वेश्वर ।
यावेगळा अपरंपार । शुद्ध ब्रह्म जो ॥ १० ॥
घटमठ दोन्ही भंगतां । ठायींचेंचि ऐक्य तत्वता ।
तैसें जीवेश्वर उपाधि निरसतां । स्वस्वरूप एक ॥ ११ ॥
ह्मणोनि या दृष्टीवीण । सकळ भेदमतें जाण ।
तें बोलिजे खंडज्ञान । मायिक व्यवहार ॥ १२ ॥ ( प्र० ३ )

३

आतां अद्वैत पाहणें । तें दुसरें करूनियां जाणणें ।
पुनरपि मुरवणें । ठायींच्या ठायीं ॥ १३ ॥

उफराटे दृष्टीचें पाहणें । जे दृष्टीमाजी दृष्टि मुरवणें ।
पाहतया मूळासी जाणणें । स्वस्वरूपासी ॥ १४ ॥
तेथूनि परतें पाहतां । नाहीं पाहणें सर्वथा ।
दुमदुमित अखंडिता- । माजी पाडिजे ॥ १५ ॥
आधीं आत्मयातें जाणावें । मग तयातें साधावें ।
येऱ्हवीं नुसतें अनुभवावें । काय धरूनी ॥ १६ ॥
तूं देह कीं देहाचा जाण । देह तुज जाणें कीं तुज याचें ज्ञान ।
पाहतां द्रष्टा तूं आपण । देह तुज दृश्य ॥ १७ ॥
लेवोनि खोळी पंचभूतांची । भूतीं मिरविसी तूंची ।
जाणीव असे कीं याची । तुजसि कीं ॥ १८ ॥
देहाचिया अवयवां समस्तां । तूंचि एक जाणता ।
तो तुझा तूं आइता । विचारूंन पाहीं ॥ १९ ॥ ( प्र० ४ )

४

जयाचेनि प्रकाशें । अंतःकरण प्रकाशे ।
जो निजतेजें स्फुरतसे । तें जाण तूंचि ॥ २० ॥
तेंचि जाणीव धरूनि उल्हासें । तरी नसतेंचि दृश्य भासे ।
जैं तें जाणीव निरासे । तैं आत्मा लाभे ॥ २१ ॥ ( प्र० ५ )

५

आप आपणिया जाणता । सदैव असे सर्वथा ।
ना तरी न कळण्याची अवस्था । कवण सांगे ? ॥ २२ ॥
न कळे ऐसें जाणवलें । तें न कळण्यासी नाहीं कळलें ।
ह्मणोनि नेणणें जया विवळे । तोचि जाण आत्मा ॥२३॥ ( प्र० ६ )

६

नेणिवेच्या नेणीवभावा । तूंचि जाणसी स्वयमेवा ।
ते जाणीव धरूनि आपुलिया खेवा । आपण रिगावें ॥ २४ ॥
फेडूनिया नेणणें । आप आपणा जाणणें ।
तिहीं देहाचेनि साक्षीपणें । महाकारण देह ॥ २५ ॥
जेथें जाणीव खुटे । तें तुझें स्वरूप नेटेंवाटें ।
घनानंद चढे ना वोहटे । अपरिमित ॥ २६ ॥ ( प्र० ७ )

७

तो तूं निरालंब साक्षी । निर्लेपक सर्वपक्षी ।
पारावाररहित निरीक्षी । देखणा तूं होऊनी ॥ २७ ॥
जें ज्ञानाचें जिव्हार । आस्तिक्याचें घर ।

सुखाचें सागर । घनानंद तूं ॥ २८ ॥
जें सर्वसाक्षीचें दीपन । जें प्रकाशाचें कोंदण ।
जें आत्मानंदाचें निधान । तें कैवल्य तूं ॥ २९ ॥
ऐसा तूं परमात्मा । परी तुझा त्वां हारविला महिमा ।
आतां मिळोनि राहे निजधामा । ऐसियापरी ॥ ३० ॥ ( प्र० ८ )

८

पाहिजे एकांत स्थान । जेथें चंचळ न होय मन ।
सकळ वृत्तींतें आवरून । बैसावें तेथें ॥ ३१ ॥
स्थूळ इंद्रियांमधून । युक्तीनें एकवटीं मन ।
अंतराकाशीं नेऊन । स्थिर करीं ॥ ३२ ॥
नातरी जिकडे मनाची राहाटी । न लागावें तयाचे पाठीं ।
माघारी घालोनियां दृष्टी । स्वस्वरूपेसीं ठेविजे ॥ ३३ ॥
मन जो जो विषय धरी । तो तो विवेकें विदारी ।
तरी तें स्थिरावे अंतरीं । सांडूनि कल्पना ॥ ३४ ॥
नदी उगमीं स्थिरावे । तरी सिंधूपण कां न पावे ।
तैसें जीवाचें ब्रह्म कां न व्हावे । ये स्थिती राहतां ? ॥ ३५ ॥
जैसें कूर्मे आकुंचन केलें । करचरणशिर अंतरीं नेलें ।
मग आपणिया आपण उरलें । अखंडित ॥ ३६ ॥
देखणेंचि देखण्यावरी । परतोनि राहे जरी ।
तरी दृश्याकार उरी । कैसेनि होय ? ॥ ३७ ॥
आपण एकी एकला । दुजा नाहीं देखिला ।
ज्ञानमात्र संचला । आत्माराम ॥ ३८ ॥ ( प्र० ९ )
जाणीव ना नेणीव । भाव ना अभाव ।
तेंचि तें स्वयमेव । स्वस्वरूप ॥ ३९ ॥ ( प्र० १० )
धरितां सोडितां नये । नाहीं आहे म्हणणें राहे ।
अनुभवीं अनुभवितां नये । ठायीं नेणिजे ॥ ४० ॥
ऐसें हें अभ्यासणें । अंतरींचें अंतरीं जाणणें ।
निश्चल स्वरूपीं स्थिरावणें । कीजे मनाचें ॥ ४१ ॥
निवांत भोगी स्वरूप । डुल्लत आनंदें आपेआप ।
मग तया सुखाचें माप । कवण करी ? ॥ ४२ ॥ ( प्र० ११ )

९

चित्त चैतन्यीं हारपे । उरिजे ज्ञप्तिस्वरूपें ।
अखंडित आपआपें । ब्रह्मानंद ॥ ४३ ॥

वोळे स्वानंदाचा घन । दाटे सुख परिपूर्ण ।
तयामाजी विवेक सुजाण । हारपोनि जाय ॥ ४४ ॥
अहंता स्वरूपीं गळे । विषयतृष्णा मावळे ।
इंद्रियांचे लळे । क्रियेवीण पूर्ण होती ॥ ४५ ॥
महासुखाचे अरुवारीं । आलिंगी स्वानुभूतिसुंदरी ।
ज्ञानमात्र इयापरी । स्वस्वरूप भोगी ॥ ४६ ॥
आनंद आनंदासी घोटी । बोलतां परेसी पडे मिठी ।
मुक्यानें सुखाच्या गोष्टी । केवि कीजे ? ॥ ४७ ॥
खुंटलें मनाचें जाणणें । तें सुख अनुवादावें कवणें ? ।
हें अनुभवी तोचि जाणे । इतरां टकमक ॥ ४८ ॥ ( प्र० १२ )

१०

ऐसी पावोन योगखुण । स्वानंद भोगी परिपूर्ण ।
तया योगियां न घडे शीण । संसाराचा ॥ ४९ ॥
भुवनत्रयीं क्रीडती । स्वच्छंदा वर्तती ।
अखंड स्फुरे ज्ञती । म्हणोनियां ॥ ५० ॥
जे मनापासोनि सुटले । तया संशय तुटले ।
करणीय अकरणीय गेलें । सर्व कर्म ॥ ५१ ॥
ऐसें होऊनि निभ्रांत । कळों नेदिती आपुला अंत ।
लोकांमाजी दाविती । भक्तिरहस्य ॥ ५२ ॥
भक्तिज्ञानवैराग्य पाहीं । करूनि दाविती आपुले देहीं ।
जगासी लाविती सोई । तारक हे ॥ ५३ ॥
भोगिती स्वरूपरहस्य । करिती सद्गुरूचें दास्य ।
भेद नाहीं सामरस्य । भोगिती जीवेश्वराचें ॥ ५३ ॥
गुरु परमेश्वर ऐक्यता । तद्रूप जाणोनि भजतां ।
सन्मान देती संतां । अतिप्रीतीनें ॥ ५५ ॥
आणि विश्वामाजी ईश्वरु । एकचि व्यापक सद्गुरु ।
म्हणोनि सर्वभूतीं आदरु । करिती ते ॥ ५६ ॥
हृदय तयांचें कोमळ । सदा शुचिष्मंत निर्मळ ।
निरंतर आचारशीळ । पवित्रपणें ॥ ५७ ॥
सदा विवेकीं चित्तवृत्ती । पडों न देती विस्मृती ।
सावधान अहोरातीं । आत्मस्वरूपीं ॥ ५८ ॥ ( प्र० १३ )

—मुकुंदराजकृत परमामृत.

ल. रा. पांगारकर यांचा नवीन ग्रंथ

# श्रीसमर्थसंजीवनी
## उर्फ
# रामदासी वेंचे.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वी आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य ओतून त्याला महानिद्रेंतून जागें केलें ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केलें आहेत. ( १ ) प्रपंच ( २ ) राजकारण (३) परमार्थ व ( ४ ) विविधविषयक प्रकरणें अशा चार भागांत मिळून सुमारें १५० वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा ‘ सारांश ’ प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्यांचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. अध्यात्म आणि व्यवहार यांची समर्थांनीं जशी सांगड घातली आहे तशी कोणत्याही देशांतील तत्त्ववेत्त्यानें घातलेली नाहीं. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सीम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि व राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे.

पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बायडिंग मजबूत व सुंदर, किंमत रुपये दोन, व्ही. पी. नें. २८६.

पत्ता—व्यवस्थापक ‘मुमुक्षु’ पुणें.

# मुमुक्षूंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या ' मुमुक्षु ' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रांसह हे नियमानें वाचावें म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपया व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल. पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्तकांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिला**—१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयक संवाद—लेखांक १।२।३. ४ मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्ममहोत्सव. ले. १ ते ४. १० श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनांतून सुटावें कसें ? १८ संक्रांतीचा हलवा १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसरा**:—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ ' कुतऱ्या थमालेले थमाल आपुल्या गाई. ' १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार ? १३ साधुकथा. १४ पतिपत्नीसंबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदीर १९ मातृभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांताचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचें उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढविवाह. ३५ बोध आणि विनोद ( या सदराखालीं १९ स्फुटें आहेत. )

पत्ता— **व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.**

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. भक्तिमार्गप्रदीपः—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८ व्ही. पी. नें ८१२.

२. संतचरित्रमाला:—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १८.

३. श्रीएकनाथचरित्रः—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ८१२.

४. कविरामायणः—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ८४.

५. आनंदलहरीः—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ८१२.

६. नारदभक्तिसूत्रें:—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे किं. ८८.

७. नवविधाभक्तिः—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ८६.

८. निरंजनमाधवांची कविताः—भाग २ व ३ किं. १॥ रु.

९. श्रीज्ञानेश्वरचरित्रः—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १८.

१०. भक्तिमणिमालाः—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १८.

मुमुक्षु REG. No. B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

**११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी के० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

**१२–१३. मुमुक्षुंतील निवडक निबंध** ( भाग १–२ ):–किं. प्रत्येकीं रु. १०८

**१४. मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १०१२.

**१५. पारिजातकांचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ): - परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

**१६. श्रीतुकारामचरित्र**:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह. किं. रु. २.

**१७. श्रीतुकारामचरितामृत**:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

**१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:--निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख–विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

**१९. मुक्तेश्वर** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु-प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

**२०. मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ): —किं. ०४.

**२१. सार्थ श्रीदासबोध**:—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

**२२. सार्थ मनोबोध**:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

**२३. समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे**:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


**२४. मोरोपंत** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु. २०४.

**२५. श्रीएकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):—किं. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २२ वें | मार्गशीर्ष १८५० | नवें वर्ष ८ वें |
| मास ३ | डिसेंबर १९२८ | अंक १२ वा |



संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३॥

मुद्रकः–लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. २००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १ व २ |
| २ मुकुंदराज ... ... ... ... | ३–११ |
| ३ काशीचें ब्राह्मणसंमेलन ... ... ... | १२–१६ |
| ४ श्रीउपासनी महाराज ... ... ... | १७–१९ |
| ५ श्रीरामनाम प्रायश्चित्तानें केलेली ब्राह्मण यवनीची शुद्धि ... ... | २०–२५ |
| ६ सामराज कवीविषयीं चर्चा ... ... ... | २६–३६ |
| ७ सामराज कवीचा काळ ... ... ... | ३६–४१ |



# सार्थ श्रीदासबोध.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकश्रुत आहे. परमार्थ, प्रपंच व राजकारण यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही दिव्यवाणी आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साह्य व्हावें या हेतूनें रा. पांगारकर यांनीं दासबोधाची प्रत शुद्ध करून त्याचें मराठी सुबोध भाषांतरहि केलें आहे प्रत्येक पृष्ठावर वर मूळ व खालीं सरळ भाषांतर असा हा ग्रंथ तयार आहे. डोमगांवच्या कल्याणस्वामींची प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधू शिरगांवमठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहून तयार झालेली प्रत शिरगांवास जाऊन अक्षरशः तपासून घेऊन व दोनही प्रतींचा मेळ पाहून रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं दोनही प्रतींचा मेळ घातला आहे, व १५० टळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत. पृ. सं. ७५०. सुंदर सोनेरी बाइंडिंग, किंमत ४ रु.

पत्ता:—व्यवस्थापक, मुमुक्षु, पुणें शहर.

मुमुक्षु मासिक ] मंगलाचरण [ नवें वर्ष ८
अंक १२.



## श्री ज्ञानेश्वरकृत प्रार्थना.

तुजपासाव जन्मलों हरी पुढती सामावलों तुझ्या उदरीं ।
तुझिया व्यापकपणें चाले सत्कर्माची दोरी ।
सायिखडियाचें बाहुलें कैसे हावभाव करी ।
सूर्यकांत येथें अग्नीच प्रसवे सहजें ऐसा समंधु धरी रया ॥ १ ॥
तुझें तुज देवा सांगतां निकें ।
समर्थेसिं केवि बोलावें रंकें ॥ ध्रु० ॥

चंद्रमा मन चक्षु सूर्यों दिशा श्रोत्र अकार उकार मकार ।
प्रणव मन बुद्धि चित्त अहंकार ।
ब्रह्मा विष्णु महेश राजस सात्विक तामस मायाब्रह्माचा पार ।
तुज वेगळें काय आहे तें सांग पा मज म्हणविसि जीवु रया ॥२॥
जेथें पाहे तेथें तूंचि दिससी ।
लपोनियां अबोला कासया धरिसी ॥

इंद्रियें दारुणें जीवात्मयासी हें तों सुखदुःखप्राप्ती ।
तेथें हें कारण कीं आत्मा पावे यातायाती ।
इंद्रियें दंडून तप तें कीजे ऐसें बोलती वेदश्रुती ।
साहीजणांसी विवाद लावला हें तों तुझीच करणी सांगती रया ॥३॥
दुजेविण एकला खेळतो स्वारी ।
कवणातें जय कवणा आणी हारी ॥

वेद प्रमाण करावया कारण कीं कृष्णमूर्तीचीं बुंथी घेणें ।
अनंत ब्रह्मादिकांसि आदिवंद्य तो तूं राखसी गौळियाचीं गोधनें ।।।
अंबऋषीकारणें गर्भवास साहिले कीं अजामेळादिकांसि उद्धरणें ।
वैरिया भक्तां येकचि मुक्ती या समर्थु नाहीं येणें मानें रया ।।४।।
अनंत ब्रह्मांडें घडिसी मोडिसी ।
अकर्तेपणें जैसा तैसा असती ।।

---

मिथ्या हा प्रपंच कीं दर्पणीचें दुजें जळीं बिंब प्रकाशे ।
एक साचें दुजें दिसे तैसेंचि दुसरें कां प्रतिभासे ।
लटिकें म्हणों जाय तंव तेथें मन कां विश्वासे ।
सगुण निर्गुण हें तों तुझीच माया तुजमाजी दिसे रया ।। ५ ।।
अर्धनारी सोंग पाहतां निकें ।
साच लपवुनि दावितो लटिकें ।।

---

म्हणसी माझा संकल्प फळला तरी म्यां दुःख नाहीं इच्छिलें ।
अवघा तुझा खेळ बहुरूप ऐसें विस्तारलें ।
जाणसी तें करी देवा तें तुझें तुजपुढां सांगितलें ।
तेथ काय माझा अपराध देखसी तरी देह कां खंडिले रया ।। ६ ।।
पुरें पुरें आतां जड झालें जिणें ।
उरी नाहीं देवा लाजिरवाणें ।

---

ऐसीं इंद्रियें वासनेसी आणिजती ते तुझीं तुजमाजी सामावती ।
समस्त जीव हे तुझे आकारले येरी ते लटकीच भ्रांती ।
जाणसी तें करीं देवा तेंचि तें सांगावें किती ।
दग्धबीज तरु बीजीं सामावला तैसा तुजमाजीं श्रीगुरु निवृत्ति रया ७।
ऐक्य झालें तेथें नित्य दिवाळी ।
सहज समाधी तेथें कायसी रे टाळी ।।

---

# मुकुंदराज.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

## ५. परमामृत.

ह्या ग्रंथाचीं लहान लहान अशीं १४ प्रकरणें असून एकंदर ओवीसंख्या ३०३ आहे. ग्रंथ लहान आहे पण रसाळ आहे. विवेकसिंधूंत जे विषय पूर्णत्वें वर्णिले आहेत ते येथें संक्षेपानें सांगितले आहेत. कदाचित् हा ग्रंथ प्रथम रचला असेल. दोन्ही ग्रंथांतील विषयप्रतिपादनाची शैली एक आहे, तरी याची भाषा सुगम व विवेकसिंधूची प्रौढ आहे. मुकुंदराजाची कीर्ति त्यांच्या विवेकसिंधु ह्या एका ग्रंथानेंही अजरामर राहणार आहे. परमामृतांत प्रथम प्रकरणांत श्रीगुरुस्तवन आहे. दुसऱ्यांतः--

जें जाणोनि सर्व कीजे । जें सर्वदा अभ्यासिजे ।
जेथें परतोनि चित्तें राहिजे । बुडी देउनी ॥ १ ॥

असें अभ्यंतरीचें ज्ञान सांगेन असा हेतु पहिल्याच ओवींत प्रगट केला आहे. संकल्पविकल्प उभे करणारीं नाना मतें व नाना दर्शनें, व्रतें, मंत्र-यंत्र, होमहवनें, जपतपें व अनुष्ठानें हीं सर्व आचरलीं तरी सर्वांत सार जें आत्मज्ञान त्यावांचून मोक्ष नाहीं. महावाक्याचें विवरण चित्तांत करून व जीवेश्वरउपाधि निरसून स्वात्मसुख अंतरीं भोगलें पाहिजे. तत् त्वं असि ह्या तीन पदांचा अर्थ मनांत ठसवून कैवल्यपद पावावें ( प्रक० २ ). शुद्ध परब्रह्म ज्ञानघनानंद आहे, हरिहरब्रह्म व त्यांचें उगमस्थान जी मूळमाया तीहूनही पर आहे, स्थूल सूक्ष्म, कारण व महाकारण या चार देहांचे अभिमानी जे विश्व, तैजस, प्राज्ञ व प्रत्यगात्मा यांहून वेगळें आहे व तें 'अखंड एकरस ब्रह्म' मी आहे हा अनुभव महावाक्यविवरणानें घेतला पाहिजे ( प्रक० ३ ). तुझा देह २५ तत्वांचा आहे. रोम, त्वचा, नाडी, मांस व अस्थि हे पांच पृथ्वीचे अंश; लाळ, मूत्र, शोणित, मज्जा व रेत हे पांच आपाचे अंश; क्षुधा, तृषा, आलस्य, निद्रा व मैथुन हे पांच तेजाचे अंश; चलन, धांवन, निरोधन, प्रसरण व आकुंचन हे पांच वायूचे अंश; व काम, क्रोध, शोक, मोह व भय हें पांच आकाशाचे अंश असा २५ तत्वांचा हा स्थूल देह आहे. याचे वर्ण, व्यक्ति, नामरूप हे सर्व जाणता तूं याहून वेगळा आहेस ( प्रक० ४ ). तसाच तूं सूक्ष्म वासनात्मक लिंगदेहाहूनही भिन्न आहेस. पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, पंचप्राण, मनबुद्धिचित्तअहंकार व अंतःकरण मिळून अंतःकरणपंचक या सर्व पंचकांचा साक्षी तूं आहेस अर्थात् याहून वेगळा आहेस ( प्रक० ५ ). आतां स्थूल व सूक्ष्म देह स्वरूपाच्या ज्या

अज्ञानामुळें उत्पन्न होतात त्या अज्ञानाचा ( कारण देहाचा ) ही जाणता तूं असल्यामुळें ह्या तीनही देहांहून तूं वेगळा आहेस (प्रक० ६). नेणीव म्हणजे अज्ञान हा जर कारणदेह तर त्या अज्ञानाला जाणतें जें ज्ञान म्हणजे जाणीव तो महाकारण देह. ' फिटूनियां नेणणें । आपआपणा जाणणें । तिहीं देहांचेनि साक्षीपणें । महाकारण देह. ' स्थूल सूक्ष्म देहांचें कारण तो कारणदेह व कार्य ( दोन्ही देह ) व कारण ( तिसरा देह ) या कार्यकारणांचें कारण तो महाकारण देह. कार्यकारण शून्य झाल्यावर महाकारण कोठें राहिलें ?

यापमाणें चारी देहांचें निरसन झालें कीं:—

> आहे स्वयंभ आपण । जाणे आपली आपण खूण ।
> परब्रह्म निर्वाण । निजस्वरूप ॥ ११ ॥

त्या स्वस्वरूपाचें अनुसंधान ठेवल्यानें विज्ञान सहज होतें व तेव्हां ' प्रपंचाचें मिथ्यापण । प्रत्यया ये'. जेथून स्वस्वरूपज्ञान स्फुरतें तेंच आपण. 'तो घनानंद चढे ना वोहटे । अपरिमित । तेंच अविनाश स्वरूप । अखंडित. । (प्रक० ७). तें शून्य आहे असें शून्यवादी म्हणतात. पण शून्य आहे हें जाणलें कोणी? ह्मणून शून्यवाद टिकत नाहीं. तें सूक्ष्म घनानंद स्वरूप आहे ' तो निजद्रष्टा स्वयंप्रकाश । परमात्मा तूं' आहेस. तो निरालंब साक्षी तूं आहेस.

> जें ज्ञानाचें जिव्हार । आस्तिक्याचें घर ।
> सुखाचें सागर । घनानंद तूं ॥ १२ ॥
> जें सर्वसाक्षीचें दीपन । जें प्रकाशाचें कोंदण ।
> जें आत्मानंदाचें निदान । कैवल्य तूं ॥ १३ ॥

असा शुद्धबुद्ध परमात्मा तूं आहेस. असें असून ' तुज्ञा त्वां हारविला महिमा. ' तर आतां त्याचा अभ्यास कसा करावा तें सांगतों ( प्रक० ८ ). ' जेथें जेथें चंचल मन जाईल तेथून तेथून विषयांपासून, इंद्रियांपासून, सकल दृश्यापासून त्याला परतवून आत्मस्वरूपीं लाव. याला आत्मचिंतन किंवा निदिध्यास ह्मणतात. एकांतीं बैसावें, स्थूलाचा अभिमान सांडून दृश्यमात्रीं त्यागबुद्धि धरून युक्तीनें मन एकवटावें:—

> जिकडे मनाची राहटी । न लागावें तयाचे पाठीं ।
> माघारीं घालोनियां दृष्टी । स्वस्वरूपेसीं ठेविजे ॥ ८ ॥
> नदी उगमीं स्थिरावे । तरी सिंधूपण कां न पावे ? ।
> तैसें जीवाचें ब्रह्म कां न व्हावें । या स्थिती राहतां ॥ १२ ॥

हा अभ्यास नित्यनेमें करावा. द्रष्टा आपणांस जर पाहूं लागेल तर दृश्य समोर उभेंच राहणार नाहीं. कूर्म जसा करचरणशिर हीं आपलीं अंगें आकुंचन

करून घेतो व मग ' आपणया आपण उरलें । अखंडित. ' तसा दृश्यजात बाहेर सांडून

आपण एकीं एकला । दुजा नाहीं देखिला ।
ज्ञानमात्र संचला । आत्माराम ॥ २१ ॥ ( प्रक० ९ )

आत्मा स्वप्रकाश असतांना जीव गडद अज्ञानांत गुरफटतो कसा? दृश्यभासाला भुलतो कसा? आपल्या स्वरूपाला विसरल्यामुळें!

उजेडीचा घरांत आला । तंव दृष्टी अंधार भरला ।
डोळे असतां अदेखणा जाला । आपणासि तो ॥ ३ ॥

मध्यरात्रीच्या अंधारांत डोळ्याला गडद पडते तसें अज्ञानांधकारांत गुंतणें बरें नव्हे. देहासहित ब्रह्मांड शून्य करून आत्मचिंतनीं रत हो. ' आत्मप्रभा उजळली चिदादित्याची ' म्हणजे मनबुद्धि स्वरूपींच मावळतील. तरंग जळाला सोडून कोठें जात नाहींत तसें आत्म्याला सोडून अंतःकरण म्हणजे चित्त मन, बुद्धि कोठें जाणार? पण तूं आत्मस्फूर्तीकडून त्यांजकडे पहा. तूं स्वतः निराभास आहेस हें स्मरण ठेवल्यानें वृत्तिभासानें तूं फसणार नाहींस. जाणीव नेणीव, भावाभाव ज्याला स्पर्शत नाहींत ' तेंच तें स्वयमेव स्वस्वरूप ' (प्रक० १०). अज्ञान हें कांहीं नाहींच, ' घनानंद कोंदाटलें स्वस्वरूप. '

दृश्य द्रष्टा दर्शन । या तिन्ही भावां विलक्षण ।
एकलेंचि आपण । ज्ञप्तिमात्र ॥ ११ ॥

दृश्य लयाला गेलें कीं देखणें खुंटलें व दृश्य गेल्यावर द्रष्टा तरी कोठचा? म्हणून दृश्य–द्रष्टा–दर्शन या त्रिपुटीविरहित ज्ञप्तिमात्र आपलें आपणच आहोत. अशा अभ्यासानें मन निश्चळ करावें ( प्रक० ११ ). मन स्वरूपीं स्थिरावलें व आत्मानंद प्राप्त झाला, त्या स्वानुभवसुखाचें वर्णन कोणी करावें? ' पावे साम्राज्य संपत्ति । रंक जैसा '. तसा तो महानंद प्राप्त होतांच अष्ट सात्विक–भाव शरीरावर उठतात, चित्त चैतन्यीं हारपतें, त्या स्वात्मसुखांत विवेकही हारपून जातो.

अहंता स्वरूपीं गळे । विषयतृष्णा मावळे ।
इंद्रियांचे ळळे । क्रियेवीण पूर्ण होती ॥ ६ ॥
आनंद आनंदासी घोटी । बोलतां परेसी पडे मिठी ।
मुक्यानें सुखाच्या गोठी । केवि कीजे ॥ १२ ॥
खुंटलें मनाचें जाणणें । तें सुख अनुवादावें कवणें? ।
हें अनुभवी तोचि जाणे । इतरां टकमक ! ॥ १३ ॥ ( प्रक० १२ )

ही योगखूण पावून जो स्वानंद परिपूर्ण भोगतो त्याला संसाराचा शीण नाहीं. सदा स्वानंदनिमग्न असल्यामुळें त्याच्या ठायीं संकल्पविकल्प उठत नाहींत. स्वरूपसुखाच्या संगतींत त्याचीं इंद्रियें नित्य तृप्त असतात. साधन

असाधन, करणें न करणें संपलें. ध्यानधारणा समाधि त्याची पूर्ण झाली. तो ' चुबुकळित आनंदघन। आपणामाजी ' असा तो विधिनिषेध, पापपुण्य यापासून मुक्त असतो. त्या अखंडानंदाला बंधमोक्षाची वार्ताही उरत नाहीं. असें असून ' लोकांमाजी दावीत । भक्तिरहस्य ' तो वावरत असतो.

भक्तिज्ञान वैराग्य पाहीं । करूनि दाविती आपुले देहीं ।
जगासी लाविती सोई । तारक ते ॥ १२ ॥
भोगिती स्वरूप रहस्य । करिती सद्गुरूचें दास्य ।
परी भेद नाहीं सामरस्य । जाणती जीवेश्वराचें ॥ १३ ॥
गुरु परमेश्वर ऐक्यता । तद्रूप जाणोनि भजतां ।
सन्मान देती संतां । अति प्रीतीनें ॥ १५ ॥
आणि विश्वामाजीं ईश्वरू । एकचि व्यापक सद्गुरु ।
म्हणोनि सर्वभूतीं आदरू । करिती ते ॥ १६ ॥
हृदय जयांचें कोमळ । सदा शुचिष्मंत निर्मळ ।
निरंतर आचारशीळ । पवित्रपणें ॥ १७ ॥

मानापमान, सुखदुःख, लाभहानि याची त्यांना बिलकूल बाधा नसते. याप्रमाणें ते जनांत वागतात किंवा पिशाचवृत्तीनें जनांविगळें वागतात. त्याला लोक मग वेडा म्हणतात, पण तो सहजानंदीं मग्न असतो, ' जना उद्धरावें कीं त्यजावें ' हा विचारही त्याला स्फुरत नाहीं. ( प्रक० १३ )

मुक्तपुरुष वर सांगितल्याप्रमाणें दोन प्रकारानें वागतात. तूं मात्र तुला पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अभ्यास कर. तूं ब्रह्मस्वरूपच आहेस. ' परी पाहिजे आलें प्रत्ययासी. ' प्रत्यय आल्यावर मग तूं ज्ञानीच आहेस. शेंदाडें पिकलीं कीं तीं देंठापासून सोडवावीं लागत नाहींत, तीं अपाप गळून पडतात–तशी दशा आली तर उमगलें म्हणायचें:–

पाहें पां शेंदाडें पिकलीं । तीं काय देंठीहूनि सोडविलीं ? ।
तैशी दशा जरी आली । तरीच राहिलें ध्यानीं ! ॥ ३ ॥

पण तोंवर सांगितल्याप्रमाणें रीतीनेंच चाललें पाहिजे. स्वरूपानुसंधान ठेवलें तरच परमार्थप्राप्ति होईल.

नित्य करावा ऐसा नेम । पडों नेदावा संसारभ्रम ।
धरावा स्वरूपाच्या कामें । साधन पंथ ॥ ५ ॥
हें नित्य श्रवण करावें । मनन निदिध्यासें अनुभवावें ।
आळस करूनि न दवडावें । आयुष्य वृथा ॥ ६ ॥

सद्गुरूसी जीवेंप्राणें जीवें धरावें हें सारांतलें सार आहे. त्याच्या आज्ञेप्रमाणें वागावें. गुरु परात्पर आहे.

आतां तनमनधन । करीं सद्गुरूसी समर्पण ।
नाहीं तयावीण । अन्य दैवत जगीं ॥ १२ ॥

हें वेदांतशास्त्र गुह्य ठेवावें, वाटेल त्याला सांगू नये. गुरुसंप्रदायाच्या मार्गानें न चालतां गुह्य तेवढें समजून अनाधिकारी लोक चाट (वाचाट, चावट) होतील, म्हणून सद्भाव पाहूनच हें शिष्यास सांगावें. तात्पर्य 'सेवूनि सद्गुरूचे चरण । सुखिया होइजे.' ( प्रक० १४ ).

---

## ६. वेदांत व राजयोग.

गुरुपरंपरेनें प्राप्त झालेलें ज्ञान लोकहितबुद्धीनें जनीजनार्दनास अर्पण करणें हा सज्जनांचा सहजस्वभाव आहे. मुकुंदराजांनींही जयंतपाळाच्या निमित्तानें आपलें गुह्यज्ञान विवेकसिंधुद्वारां जगांत प्रगट केलें आहे. 'ज्ञानेविण न सुटिजे' 'न फिटतां अज्ञानपांग । सुटिका नाहीं' 'अज्ञाननिवृत्तीवीण मोक्ष कैचा ?' असें त्यांनीं अनेकवार म्हटलें आहे. ज्ञान म्हणजे अर्थात् आत्मज्ञान. आत्मज्ञान देणारें दुसरें मुख्य शास्त्र वेदांत, तेव्हां वेदांतांचा अर्थात् शांकरवेदांताचा ह्मणजे अद्वैततत्वज्ञानाचा त्यांनीं पुरस्कार केला आहे.

शंकरोक्तीवरी । मी बोलिलों मराठी वैखरी ।
म्हणोनि निर्धारावी चतुरीं । शास्त्रबुद्धी ॥ ४७ ॥
विवेकसिंधूचीं शब्दरत्नें । कंठीं धरिजे प्रयत्नें ।
तरी जनकाचेनि महिमानें । श्लाघ्यता पावे ॥ ५१ ॥ (प्रक० ७).

शंकराचार्यांच्या सिद्धांताचाच मी मराठींत अनुवाद करीत असल्यामुळें माझ्या ह्या विवेकसिंधू ग्रंथाकडे शाहण्यांनीं शास्त्रबुद्धीनें पाहावें व यांतील शब्दरत्नें कंठीं धरून मननिदिध्यासद्वारां त्याचा अनुभव घेत जनकाप्रमाणें प्रपंचांत राहूनही अध्यात्मयोगाचा आनन्द भोगावा, ह्याला त्यांनीं राजयोग म्हटलें आहे. गीता ज्याला राजविद्या, राजगुह्य म्हणते त्यालाच ते राजयोग म्हणतात. विद्यें-तली मुख्य विद्या अध्यात्मविद्या, गुह्यांतलें परमगुह्य स्वरूपानुभव, योगांतला श्रेष्ठ योग राजयोग. अन्य शास्त्रांहून वेदांतशास्त्र श्रेष्ठ व वेदांताचा अनुभव तो राजयोग. 'मी राजयोगी श्रीमुकुंदमुनी' माझ्या ग्रंथांत 'राजयोग' सांगत आहे असें त्यांनीं अनेकवार म्हटलें आहे. षद्दर्शनांतील पांच दर्शनें एकीकडे व वेदांत एकीकडे. 'पांचही दर्शनासी झुंजार । हा वेदांतासी साजे बडिवार.' पांच दर्शनें हीं जंबुकें व त्यासी लीलेनें झगडणारा हा वेदांत एकांगवीर आहे असें त्यांनीं ७ व्या प्रकरणांत म्हटलें आहे. इतर दर्शनें वेदांताची एकेक बाजू पुढें मांडून त्यास थोडेंसें साह्य करितात हें खरें, पण तीं केवळ साधनें आहेत, साध्य वस्तु तात्काळ हातीं देणारें एक वेदांतशास्त्रच. स्वाधिष्ठानादि षट्चक्रें व

उड्डियानादि बंध या साधनांत न पडतां तूं आत्मज्ञानाचा राजमार्ग चोखाळ असें तें

> न लगे वेदशास्त्राचा पांग । अभ्यासावा न लगे अष्टांग ।
> जरी पाविजे राजयोग । श्रीगुरुप्रसादें ॥ (उत्तरभाग प्र० ११-११७)

ह्या राजयोगाचें जरा स्पष्टीकरण करितों. वेदांताचा परिचय आपणांस विवेकसिंधु व परमामृत ह्या दोन्ही ग्रंथांनीं करून दिलाच आहे. अज्ञानाचा निरास ज्ञानानें—स्वस्वरूपपरिज्ञानानें होतो. आत्मज्ञान ह्मणजेच ज्ञानाची पूर्णता. खंडज्ञान तारक नाहीं. 'खंडज्ञान उपदेशिती । मोक्ष उधारें बोलती' अशा अपरोक्ष ज्ञानहीन गुरूपासून कांहीं आत्मलाभ होत नाहीं. खरोखर 'याचि देहीं आपुले डोळां । भोगिजे मुक्तीचा सोहळा' हा लाभ खऱ्या सद्‌गुरूपासून होतो. विवेकसिंधूचा अवतार हेंच मनावर बिंबवण्यासाठीं आहे. मुक्तीचा सोहळा भोगण्यासाठीं प्रपंच सोडावा लागत नाहीं. 'प्रपंचाशीं भिन्नत्व । नाहीं परब्रह्मीं' ( प्रक० ६–१०५ ). प्रपंचाशीं परमार्थाचा विरोध नाहीं. प्रपंच हा परब्रह्माहून मुळीं भिन्नच नाहीं. जग मिथ्या आहे, संसार मायिक आहे, पंचीकरणानें चौदेहांहून आपण वेगळे आहोंत, हें तीव्रतम वैराग्यासाठीं सांगितलें असतें; वस्तुतः परब्रह्म जर 'एकमेवाद्वितीय' आहे, तर प्रपंच त्याहून वेगळा कोठें आहे? प्रपंचाला अधिष्ठान जर ब्रह्माचें आहे व 'जें जें जेणेंवीण नाहीं । तें तेंचि वस्तु पाहीं' असा जर सिद्धांत आहे तर सकल प्रपंचपसारा ब्रह्मस्वरूप आहे हें अगदीं उघड आहे. तरंगाला अधिष्ठान जल, अलंकाराला सुवर्ण, पत्रपुष्पफलभारांना बीज तसें प्रपंचजाताला अधिष्ठान ब्रह्म—म्हणून ब्रह्मच एक सत्य आहे, ब्रह्मावांचून कांहींच नाहीं व दृश्यभासात्मक व नामरूपात्मक विश्वरूपानें तेंच नटलें आहे—अर्थात् ब्रह्मच प्रपंचरूपानें भासत आहे. जग मिथ्या ह्मणजे नामरूप मिथ्या, व हें कोणाला मान्य नाहीं ? 'सर्वं खल्विदं ब्रह्म' 'पुरुष एवेदं सर्वं' 'ब्रह्मैव संसरति—ब्रह्मैव विमुच्यते' इ. श्रुति ब्रह्माची प्रपंचाशीं एकरूपताच दर्शवीत आहेत. यालाच अद्वैत म्हणतात व हाच शंकराचार्यांचा सिद्धांत आहे. 'जग मिथ्या' म्हटल्याबद्दल आचार्यांवर कित्येकांचा आक्षेप आहे, पण वर सांगितल्याप्रमाणें मुकुंदराजांनीं शंकरोक्तीचें रहस्य आपल्या ग्रंथांत सांगितलें आहे व मराठी साधुसंतांनीं हेंच परोपरीनें वर्णिलें आहे. विवेक मुख्य पाहिजे, विवेकानें विरुद्ध भासणाऱ्या वचनांचा समन्वय नीट करितां येतो. हा राजयोग ज्यांना साधला त्यांना प्रपंचाचा बागुलबोवा राहिलाच कोठें ? 'जे देह असतांची सुटले । ह्मणोनि जीवन्मुक्त बोलिले'. देह असतानांच विवेकानें देहापासून किंवा ब्रह्मांडापासून वेगळे होण्याचा अथवा दुसऱ्या भाषेंत बोलायचें म्हणजे देहापासून मूळ मायेपर्यंतचा

प्रपंच आपलेपणानें पहाण्याचा प्रकार उत्तरार्धाच्या ९ व्या प्रकरणांत पहावा. हें प्रकरण समग्र पहावें. सर्व ब्रह्म जाणून जे सर्व ब्रह्म आपणच होऊन राहिले त्यांना बुडवणारा संसार वेगळा कोठें आहे ? अग्नीहून वेगळें असेल तें अग्नींत जळेल, अग्नि काय आपल्याच तेजानें पोळेल ? अशा अनुभवसंपन्न पुरुषाला मग एकांतसेवन, साधनसामुग्री, समाधि लावणें व उतरणें हें कार्य राहिलें काय ? तो साधनातीत झाला अथवा त्याचें साध्यसाधन एक झालें.

ऐक तयाची प्रचीती । जनकाचिया राज्यस्थिती ।
नाना संभ्रमें सेविती । डंडळेना ॥

आत्मज्ञान मुरालें कीं सहजप्राप्त कर्म करीत असतांनाही समाधि खंडित होत नाहीं. 'प्रपंच वैरी मारावा । किंवा आपलासा करावा' (प्र० ७–४४). प्रपच शिरजोर होत असेल तर मारावा म्हणजे विवेकानें जिंकावा किंवा आत्मपणानें तो वेढावा. प्रपंच अधिकारपरत्वें सत्यही आहे व मिथ्याही आहे ! सत्यपणानें तो जर बोकांडीं बसेल तर त्याचें मिथ्यात्व ओळखून त्याला मारावा, बरें मिथ्यत्वानें प्रतीत होत असेल तर त्याशीं वैर करण्याचें कारण नाहीं म्हणजे ब्रह्मत्वानें त्याजकडे पाहून त्याला मिळवून घ्यावा. आपल्या घरीं कोणी चोर म्हणून आला तर ठोकावा, साव म्हणून आला तर त्याचा सत्कार करावा. आत्मानुभवी सत्पुरुषालाच प्रपंच साव म्हणून आपलासा करितां येतो. संसारसंभ्रमांत गुंतला असतांना समजा त्याला स्वरूपाचा विसर पडला तरी त्याला संसाराची पीडा होणार नाहीं. एखादी सुवासिनी समजा क्षणभर आपलें सौभाग्य विसरली तर काय ती वैधव्यदुःखसागरांत बुडून जाईल ! तसेंच एकदा शुद्धस्वरूप ज्ञान झालेल्या पुरुषाला प्रपंचसंगतींत रजतमाच्या लाटांनीं जर्जर केलें तरी काय त्याचें आत्मज्ञान नष्ट होईल ? राजाला बाहेर अटकाव करणारे शेंकडो राखणाईत असले म्हणून काय त्याला अंतःपुरांत प्रवेश करायच्या वेळीं कोणी निरोध करूं शकेल ?

असतां इंद्रियव्यापार । परी तो ब्रह्मरूपें व्यवहार ।
पूर्णबोधासी संसार । परमार्थचि ॥ ७८ ॥

ज्याच्या कृपाकटाक्षाबरोबर संसारज्वर फिटतो तो राजयोगी, ज्ञानी व भक्त. त्याचें दर्शन, स्पर्शन व संभाषण पापविमोचक होय. 'कर्मशेषें देहीं वर्तती । परी ते कर्मबंध नेणतीं'. निर्विकल्प समाधीनेंच मोक्ष मिळतो, सविकल्प समाधि भोगणाऱ्या राजयोगानें मोक्ष मिळत नाहीं असें कोणी म्हणतात व 'शुको मुक्तो वामदेवो वा' ही श्रुति पुढें करितात. त्यांना आम्हीं असें उत्तर देतों कीं शुक निरंतर निर्विकल्प समाधींत होते असें तुम्हीं म्हणतां पण शुकांनीं तर भागवत ग्रंथ परीक्षितीला सांगितला आहे. ते मुक्त होते असें श्रुतिच सांगते.

शुकवामदेवादि कांहीं अंध, बधिर, मुके नव्हते. त्यांचीं इंद्रियें लोकव्यवहार करीतच होतीं. तात्पर्य प्रपंचव्यवहार करीत असतांनाही जनकाप्रमाणें जीवन्मुक्ताचें पूर्ण सुख भोगतां येतें. यालाच राजयोग म्हणतात. हा सर्व योगांत श्रेष्ठ आहे. राजयोग सांगण्यासाठींच विवेकसिंधु ग्रंथ मुकुंदराजानीं रचला आहे. हा राजयोग सर्वांस तारक आहे व अन्यसाधननिरपेक्ष म्हणजे स्वतंत्र आहे.

---

## ७. सगुणोपासना.

राजयोग कोणाला एकदम साध्य होत नसेल तर त्यानें सगुणाची उपासना करावी व या मार्गें निरालंब निर्गुणपद गांठावें.

चित्त अवलंबनेवीण । जरी न राहे स्थिरपण ।
तरी देवाचें सगुण- । स्वरूप चिंतावें ॥ १३ ॥
तेथें हृदयाच्या शेजारीं । षोडशोपचारें पूजा करी ।
उपासावा श्रीहरी । अनन्यभावें ॥ १४ ॥

सगुणभक्ति करितां करितां ' निर्गुणीं परमपुरुषीं । जीवा ऐक्य होय शेखीं ' ( विवेक० प्र० २ ). सगुण ब्रह्म तरी कोणतें ?

जेणें मायेतें व्यापिलें । तें सगुण ब्रह्म बोलिलें ।
येर जें अशेष उरलें । तें केवल ब्रह्म ॥

मायोपाधिक ब्रह्मालाच सगुण ब्रह्म ह्मणतात. ' तें ब्रह्म सगुण । तोचि परमात्मा जाण ' ( विवेक० प्र० ३ ). व्यापक ब्रह्म ' भक्ताकारणें मूर्तिमंत ' होतें हें ५ व्या प्रकरणांत फार चांगलें सांगितलें आहे. परमात्मा निर्गुण निराकार जर आहे तर सगुणोपासना कशास पाहिजे या शंकेस उत्तर मोठें बहारीचें दिलें आहे. नट नाट्य करीत असतांना स्वतःस विसरत नाहीं, तसे परमात्मा रामकृष्णादि अवतारकार्यें करीत असतांना स्वस्वरूपापासून चळत नाहीं. सगुण रूप मायिक म्हणून त्यास जे भजणार नाहींत ते मूढ होत–त्यांना सगुण वळत नाहीं व निर्गुण कळत नाहीं. असें पहा. सोंग उत्तम वठलें कीं आपण संतुष्ट होऊन नटाच्या अंगावर वस्त्रेंभूषणें टाकतों–येथें सोंग मिथ्या आहे पण तीं नटालाच पोंचतात; तद्वत् अवतार मायिक असले तरी त्यांचें केलेलें भजन पूजन मुख्य परमेश्वरालाच पावतें; म्हणून नवविधा भक्तीनें देवाला अवश्य भजावें म्हणजे देवच ज्ञानदान करून बंध तोडतो:

सोंग संपादितां लोपलेपणें । नटासी दीजेति अलंकारभूषणें ।
सोंग मिथ्या–परी पावणें । नटासीचि ॥ २० ॥
तैसें कीर मायिक अवतरण । तेथें कीजे जें भजन ।

तें होय समर्पण । जगदीश्वरीं ॥ २९ ॥
नवलक्षण भजनें । सर्वेश्वर आभारलेपणें ।
ज्ञान देऊनि बंधनें । तोडी निजसेवकांचीं ॥ २४ ॥
जीवासी तत्वज्ञानावीण । नाहीं भवबंधछेदन ।
तीं करावी सोडवण । ईश्वरेंचि कीं ॥ ३० ॥ ( प्रक० ५ )

सगुणप्रेमा वाढविण्यासाठीं काय करावें ?

करावा विषयांचा त्याग । धरावा साधूचा संग ।
रागद्वेषाचा प्रसंग । घडूंच न द्यावा ॥ ७७ ॥
वेदशास्त्रपुराण । साधुमुखें निरूपण ।
तें करावें श्रवण । विवेकदृष्टी ॥ ७८ ॥ ( प्रक० ७ ).

संतसद्गुरूंच्या मुखानें श्रवणलाभ होण्यांतच विशेष काय आहे हें अनुभवानेंच समजत असतें. सगुणोपासनेच्या व नवविधाभक्तीच्या मार्गानें जाऊन ब्रह्मज्ञान होतें व ज्ञानोत्तर भक्ति ही तर खरोखर बहार आहे. १० व्या प्रकरणांत गुरु-मुखानें ब्रह्मज्ञान झाल्यावर श्रीगुरु हीच परमात्म्याची प्रगट ( सगुण ) मूर्ति आहे अशा उत्कट प्रेमानें शिष्य गुरूस म्हणतो 'मग ब्रह्मत्वाची नाहीं चाड । तुझें भजन अत्यंत गोड । भजनेवीण कोड । कांहीं नाहीं.' तो 'भक्ति मज-लागुनी । दिधलीच देईं' 'तुझे ठायीं प्रेमभाव । जीव गेला परी न जाव' असेंच दान मागतो. 'ब्रह्मप्राप्तीवरी भक्तीचा सोस' कां असतो हें स्वानुभवी संतसज्जनच जाणूं शकतात. कोणास यांबद्दल शंका असेल तर मुकुंदराज स्पष्ट सांगतात:—

ब्रह्मप्राप्तीची पदवी । तिहीं कानींची ऐकावी ।
परी सद्गुरुभजनेवीण अनुभवी । नव्हतीच कीं ॥ ४३ ॥

नुस्तें शाब्दिक ब्रह्मज्ञान काय कामाचें ? आचार तसा भाव व भाव तसा अनु-भव असा परंपराप्राप्त अनुभव आहे. जे आपल्या मतानें नानाप्रकारच्या युक्ती चाळीत असतात पण साधुवचनीं विश्वास ठेवीत नाहींत, संतसेवा करीत नाहींत अशांना ब्रह्मज्ञान सांगणें म्हणजे भुजंगांना पयःपान करविण्यासारखें व्यर्थ आहे. तात्पर्य, मायोपाधिक सगुण ब्रह्म, रामकृष्णादि अवतार, देवांच्या सगुण मूर्ति व संतसद्गुरु हे सर्व परमात्म्याच्या सगुणोपासनेचेच प्रकार आहेत, असा मुकुंदराजांपासून सर्व सत्कवींचा अनुभव व उपदेश आहे. संतसद्गुरूंच्या ठिकाणीं ज्यांना ब्रह्मभावाचा अनुभव येत नाहीं त्यांना 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या-सिद्धांताचा अनुभव कोठून येणार ?

# काशींचें ब्राह्मणसंमेलन

सांप्रत काळीं धर्मावरून लोकांचें लक्ष उडून तें ऐहिक मोठेपणाच्या कल्पनामार्गे लागल्यामुळें व लोक सुखैषी बनल्यामुळें नस्त्या विषयांना प्राधान्य मिळत चाललें आहे. स्पर्शास्पर्शविचार, सहभोजन, विधवाविवाह इ. विषयांची फालतु चर्चा चाललेली आहे. परिस्थितीप्रमाणें धर्मशास्त्रही बदलत असतें व तें वाटेल त्याला बदलतां येतें असें कित्येक सुशिक्षित म्हणत असतात. कित्येक तर धर्मशास्त्राला धाब्यावरही बसवीत असतात. अशा मतामतांच्या गलबल्याच्या वेळीं हिंदुस्थानांतील सर्व हिंदु शास्त्रीपंडितांनीं व अर्वाचीन विद्वानांनीं काशीक्षेत्रासारख्या ठिकाणीं एकत्र जमून धर्माचा विचार करण्यास प्रवृत्त व्हावें हें एक मोठें शुभ चिन्हच समजलें पाहिजे. सभेस द्राविड, तामीळ, आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजराथ, बंगाल, मैथिल, कान्यकुब्ज इ. सर्व प्रांतीय असे दोन हजारांवर पंडित उपस्थित झाले होते. श्रीशंकराचार्य, रामानुज व वाल्लभ सांप्रदायांतील आचार्य संमेलनास हजर होते. अश्विन वद्य १ पासून ७ पर्यंत अर्धींच ठरविलेल्या १७ प्रश्नांवर अनेक विद्वानांनीं चर्चा करून कांहीं सिद्धांत ठरविले, वद्य ८ स श्रीवेदोनारायणाची मोठ्या समारंभानें मिरवणूक काढण्यांत आली व वद्य ९।१०।११ ह्या तीन दिवशीं दरभंग्याचे महाराज यांचे अध्यक्षतेखालीं संमेलनाच्या बैठकी झाल्या. ह्याप्रमाणें १०।१२ दिवस हजारों पंडितांनीं एकत्र जमून धर्मशास्त्रचर्चा मोठ्या समतोलपणानें, शिस्तीनें व शास्त्रपद्धतीनें केली ह्याबद्दल आम्हांस फार समाधान वाटतें. धर्मशास्त्र ज्यांना मान्य आहे त्यांनीं धर्मशास्त्राच्या पद्धतीनें शास्त्रचर्चा करावी हें उघड आहे. धर्मशास्त्र गुंडाळून ठेऊन सामाजिक परिषदेंत आज कित्येक वर्षें सुधारक लोक हवे तसे ठराव पास करीत आहेत व आजवर जुन्या समाजानें मौन धारण केलें होतें तें सोडून त्यानें तोंड उघडण्यास आरंभ केला हें शुभ चिन्ह आहे. महाराष्ट्रीय पंडितांनीं मात्र ह्या संमेलनांत कांहीं आपल्या बुद्धीचा प्रकाश पाडला नाहीं. वाईचे दिवेकरशास्त्री यांना बोलण्याची परवानगी देण्यांत आली पण त्यांना संस्कृतांत बोलतां येईना व 'महाराष्ट्रांतल्या ब्राह्मणांचा विचार करण्याचा ह्या संमेलनाला अधिकार नाहीं ' असे विक्षिप्त मत त्यांनीं बसतां बसतां प्रगट केलें असें म्हणतात. राजकारणांत जसा सवता सुभा तसा धर्मक्षेत्रांतही सवता सुभा मागणारे हे लोक हिंदुस्थानांत

आपलें हसें मात्र करून घेत आहेत! विचारसभेचे नियम मोडून श्रीधरशास्त्री पाठक यांना सभेंत बोलतां येईना. 'वादीप्रतिवादींनीं मध्यस्थांची निवड करावी व मध्यस्थांनींच वादग्रस्त प्रश्नांचा निर्णय करावा' असा श्री. कुर्तकोटींचा संदेश घेऊन रा. दप्तरी हे संमेलनास गेले होते. पण हा संदेश सभेच्या नियमाविरुद्ध असल्यामुळें कसें तरी त्याचें वाचन होऊं दिलें व त्यास उत्तर मिळालें तें असें "धर्माचार्यांकडूनच सभेंत मध्यस्थांची निवड झाली आहे. कोर्टाला ज्यूरी नेमण्याचा अधिकार असतो त्याप्रमाणें धर्माचार्यांना मध्यस्थ नेमण्याचा अधिकार असतो. धर्माचार्यांवर आमचा पूर्ण विश्वास आहे. ज्यांचा त्यावर विश्वास असेल त्यांनाच या सभेंत बोलण्याचा अधिकार आहे." संमेलनाची सर्व बैठक फार उत्कृष्ट व प्रभावशाली झाली.

## श्री शंकराचार्यांचें भाषण.

**(श्रीजगद्गुरु श्रीशंकराचार्य [श्रीशिरोळकर] स्वामी महाराज मठ संकेश्वर व करवीर यांचें, ब्राह्मणसंमेलनाच्या विचारसभेचे उद्घाटनसमयीं, संस्कृतमध्यें झालेल्या भाषणाचा गोषवारा.)**

अहो, ही मोठया आनंदाची गोष्ट आहे कीं:—आज भगवान् श्रीविश्वेश्वराच्या वाराणसी नगरीमध्यें राजे, महाराजे, विद्वान, धनिक, नागरिक इत्यादिकांचेकडून सांप्रत सर्वत्र विवादग्रस्त झालेल्या धार्मिक विषयांचा निर्णय करण्याकरतां अखिल भारतीय ब्राह्मणसंमेलनाच्या विचारसभेला सुरवात होत आहे. सध्या भयंकर कलिकाल प्राप्त झालेला आहे. प्रायः पाश्चात्य विद्येनें मोहित झालेले सर्व भारतवर्षीय, आपल्याच सनातन धर्मरूपी कल्पवृक्षाला चिखलाप्रमाणें तुडवून होत असलेल्या अवनतीकडे दुर्लक्ष करीत आहेत.

अग्निहोत्रादि कर्में फारच क्वचित ठिकाणीं होतात. संध्या कोणत्या कोपऱ्यांत दडी मारून बसली आहे तिचा तर पत्ताच लागत नाहीं. मग श्रौतस्मार्त कर्माची कथा तर दूरच. शमदमादिकांचें नांवही ऐकूं येत नाहीं; मग कुठला जप? कुठली तपश्चर्या! सगळ्या ठिकाणीं पाश्चात्यांचें अनुकरण हाच परम पुरुषार्थ होऊन बसला आहे. प्रायः सर्वजण निरंतर नियमन करणाऱ्या धर्माला सोडूं पहातात. युक्तिवादाचा स्वीकार करतात. वेदशास्त्रांची निंदा करतात. वैदिक आचाराचा तिरस्कार करतात. गुरूंना मानीत नाहींत. शिखासूत्र धारण करण्याला सुद्धां लाजतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सर्व बाजूंनीं आर्यावर्ताच्या गौरवाला गचांडी देण्यांत येत आहे.

भारतवर्षांत असा एक पूर्वीं काळ होता कीं, त्यावेळीं सर्व लोक धर्माला प्राणापेक्षांहि प्रिय मानून त्याचे आचरणानें उन्नतीच्या पराकाष्ठेला जाऊन पोंचलेले होते. गूढ तत्वांचें त्यांनीं प्रतिपादन केलें, परम गंभीर अशा अपौ-

रुषेय वेदाचें विवरण केलें, परम पवित्र कर्माचरणानें विमानांतून हिंडण्याचें सामर्थ्य प्राप्त करून घेतलें, गंगेला भूतलावर आणिली, गंभीर अशा समुद्राचें एकच आचमन केलें, देवांच्या समाजाशीं व्यवहार केला, त्या त्या इष्ट देवतांचा साक्षात्कार करून घेऊन त्रिकालज्ञ झाले. दिगंत कीर्ति केली आणि शेवटीं परम पुरुषार्थ मोक्षही गांठत भारत वर्षाला ते आदर्शभूत झाले. एवढेंच नव्हे तर असे ब्राह्मण उपदेशक या पदवीलाही पोंचले आणि म्हणूनच ' या देशामध्यें उत्पन्न झालेल्या ब्राह्मणापासून पृथ्वीमधील सर्व मनुष्यांनीं आपापलें चरित्र शिकावें' असें मनूनें आपल्या स्मृतींत लिहून ठेवलें.

अहो, विचार करा कीं, अशा प्रकारचें सामर्थ्य त्यांना कोठून मिळालें ? तेही आमच्याप्रमाणें मातृगर्भांतूनच जन्माला आले होते; त्यांनाही अकराच इंद्रियें होतीं आणि सूक्ष्म विचाराअंतीं त्यांची व आमची परिस्थितीही सारखीच होती. असें असता ते इतके पराक्रमी कसे झाले ? याचें उत्तर असेंच द्यावें लागेल कीं, धर्मानुष्ठानामुळेंच त्यांना हें सामर्थ्य प्राप्त झालें होतें. आमचा हा सनातन धर्म कोणत्या योग्यतेला पोंचविणार नाहीं ? आणि म्हणूनच ' धर्मामध्यें सर्व आहे ' असें श्रुति सांगते.

सर्व लोकांच्या यथेष्टाचरणामुळें सांप्रत वैदिक धर्म कशा कष्टतम अवस्थेला पोंचला आहे हें सांगण्याची जरूर नाहीं; या अशा विषम कालांतही येथील धर्मधुरंधर राजे आणि पंडितवर यांनीं धर्माचें वास्तविक स्वरूप जाणण्याकरतां ही सभा भरविली आणि कलिमलांनीं व्याप्त झालेल्या धरित्रीच्या उद्धाराकरतां कैलासांतून अवतीर्ण होऊन ज्यांनीं भूभार हरण केला अशा कृपासागर, अत्यंत मंगल श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या पीठदेवतेच्या आशीर्वादाची अपेक्षा केली आणि म्हणूनच हा सुयोग जमून आला.

अशा प्रकारच्या सभा या कैलासाप्रमाणें शोभणाऱ्या काशी–क्षेत्रामध्यें पुनः पुनः भरवाव्यात. कारण मुक्तिक्षेत्रांत, भगवान् जगन्नाथ श्रीचंद्रमौलीश्वराचें प्रणयमंदिर, भक्तांचें रक्षण करण्याकरतां सर्वदा तत्पर असलेल्या माता अन्नपूर्णादेवीचें निवासस्थान, त्रैलोक्य पावन करणारी गंगा, सर्व देवांचें वास्तव्य, विविध विषयांचें भांडार, ब्रह्मनिष्ठांचें आश्रयस्थान आणि उपासना देवीचें अंतःपुर आहे. म्हणून सर्व बाजूंनीं धर्माचा विचार करण्याकरतां हेंच अप्रतिम स्थान आहे.

कर्मानुष्ठानाकरितां व ज्ञानानुष्ठानाकरितां धर्माचा विचार करावयाचा असतो. परिवर्तन करण्याकरतां धर्माचा विचार केव्हांही करावयाचा नसतो. स्वर्गाचा व यज्ञयागादिकांचा साध्यसाधनभाव अत्यंत बुद्धिमान व तर्ककुशल मनुष्याला सुद्धां जाणतां येणार नाहीं. तो समजण्याकरतां वेद, वेदसंमत स्मृति यांनाच

शरण गेलें पाहिजे. याबद्दल कोणाचीही कल्पना प्रमाण मानतां येणार नाहीं. प्राचीन स्मृतिग्रंथ करणाऱ्या ऋषींनीं सुद्धां आपल्या कल्पनेला जागा न देतां तपश्चर्येनें अतींद्रिय ज्ञान संपादन करून घेऊन मग श्रुतींचा अर्थ केला. साक्षात् परमेश्वराला सुद्धां युगांतरांतील वेदांचें स्मरण करूनच मग पुढें प्रसार करावा लागतो.

युगांतरांतील धर्म कलियुगामध्यें वर्ज्य आहेत आणि म्हणून धर्मपरिवर्तन होत असतें असें कोणी कोणी म्हणत असतात. पण, तो त्यांचा निवळ भ्रम आहे. प्राचीन ऋषींनीं धर्माचें अगर शास्त्राचें कधींहि परिवर्तन केलें नाहीं. परंतु समानबल विकल्पबोधक श्रुतिवचनांची युगभेदांनीं आणि अधिकारभेदांनीं व्यवस्था मात्र दाखविली आहे. अर्थात् त्या व्यवस्थेला धर्मपरिवर्तन असें म्हणतां येणार नाहीं. तीही व्यवस्था ज्यांनीं प्रत्यक्ष मोक्षतत्व जाणलें आहे, दुसऱ्यांच्या उद्धाराकरितां ज्यांचा व्यवहार आहे, अशा भ्रमप्रमाददोषरहित मनुयाज्ञवल्क्यादि ऋषींनींच केलेली आहे. धर्माचें परिवर्तन करतां येत असतें तर ' धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये,' ' न जातु कामान्नभयान्नलोभात् ' अशा प्रकारचा उपदेश भगवान् वेदव्यासांनीं केव्हांही केला नसता आणि धर्मत्यागाबद्दल व आज्ञाभंगाबद्दल प्रायश्चित्तेंही लिहिलीं नसतीं. याकरतां धर्माचें परिवर्तन होतें असें कोणीहि समजूं नये.

धर्माचें परिवर्तन जर करतां येत नाहीं तर मग या सभेचा उपयोग तरी काय? अशी कदाचित् कोणाला शंका येईल पण तशी शंका घेणें उचित नाहीं. कारण, धर्माचें परिवर्तन होत नसलें तरी, त्याचें संस्करण करणें जरूर आहे. आपल्या इच्छेप्रमाणें वचनांचा अर्थ करणाऱ्या आणि कांहीं वचनें अप्रमाण मानणाऱ्या लोकांचे आक्षेप दूर करून धर्माचार निःसंदिग्धपणें दाखवून देणें हें सभेचें महत्वाचें कार्य आहे आणि हें न केल्यास धार्मिकांनाही कर्तव्याकर्तव्याचा मोह पडून आस्तिक समाज भलत्याच दिशेकडे वहात जाईल. म्हणून श्रुतिस्मृति सदाचाराच्या अनुरोधानें धर्माचरणांतील शुद्धतत्व प्रसिद्ध करणें हें या परिषदेचें अवश्य कर्तव्य आहे.

या परिषदेंत सनातनधर्माचा जयजयकार होवो. श्रुतिस्मृतिसदाचाराचें प्रामाण्य सर्वत्र प्रस्थापित होवो. प्राचीनाचाराबद्दल दृढविश्वास उत्पन्न होवो. सर्वत्र वर्णाश्रम धर्माचा प्रसार होवो. या सभेचे संचालक काशीनरेश, दरभंगाधीश महाराजे, सर्व पंडित, येथील रहिवासी इतकेंच नव्हे तर सर्व भारतवर्षीय शिष्यवृंद, यांना आदरपूर्वक स्वधर्मानुष्ठानाची बुद्धि उत्पन्न होऊन ते अंतीं परमपदाला प्राप्त होवोत अशी श्रीशारदांबा चंद्रमौलीश्वराराधनसमयीं सर्वदा प्रार्थना करतों.

---

# काशीचें ब्राम्हणसंमेलन.

दिवसेंदिवस अवनतीला चाललेल्या भारतवर्षाच्या उद्धाराकरितां आज अनेकांचे अनेक प्रयत्न चालू आहेत. शुद्धि, स्पर्शास्पर्श, विधवाविवाह, म्लेंच्छ–चंडालांचा देवालयसभाप्रवेश इत्यादि विषय मोठे वादग्रस्त होऊन राहिले आहेत. ' परिस्थितीप्रमाणें धर्मशास्त्र बदलत असतें याकरतां आजच्या स्थितींत वरील वादग्रस्त विषय सशास्त्र आहेत ' असें म्हणणारा आधुनिक विद्वानांचा एक पक्ष मोठ्या जोरानें आपल्या मताचा प्रसार करीत आहे. तर प्राचीनमतानुयायी विद्वान्, धर्मशास्त्र केव्हांही बदलत नाहीं आणि धर्मशास्त्राप्रमाणें समाजांनीं आचरण ठेवलें तरच देशाची उन्नति होईल असें निर्भीडपणें सांगत आहेत. अर्थात् या दोन्ही पक्षांच्या म्हणण्यानें सामान्य लोकांचीं अंतःकरणें मात्र संशयित होऊन ' किं कर्तव्यमकर्तव्यं वा ' अशा स्थितींत येऊन पोंचलीं आहेत.

अशा वेळेला संपूर्ण भरतखंडांतील पंडित एकत्र जमून या प्रश्नांचा तत्त्वजिज्ञासेनें विचार करणें जरूर असल्याचें काशीस्थ पं. म. म. पंचानन तर्करत्न यांना वाटून त्यांनीं तो विचार म. म. लक्ष्मण शास्त्री द्रविड, म. म. अनंत कृष्ण शास्त्री यांना बोलून दाखविला. ठिकठिकाणच्या पंडितलोकांनांही पत्रें पाठवून विचारलें; सांप्रत काळीं हिंदुस्थानांतल्या सर्व पंडितांची सभा भरवून या वादग्रस्त प्रश्नांचा निकाल होणें जरूर असल्यानें सर्व पंडितांनीं आणि सर्व मतांच्या धर्माचार्यांनीं संमेलन भरविण्यास सहानुभूति दाखविली. संमेलनांत चर्चा करावयाचे १७ प्रश्न प्रसिद्ध केले. संमेलनाच्या पूर्वीं ७ दिवस विचारसभा भरविण्याचें ठरवून त्याप्रमाणें सर्व पंडितांना पत्रेंही गेलीं. संमेलनाच्या विचारसभेच्या उद्घाटनाकरतां श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य ( श्रीशिरोळकर स्वामी महाराज ) यांना पाचारण करण्यात आलें होतें.

धर्म केसरी.

---

# ज्ञानेश्वरांची प्रभावळ.

ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचें समकालीन नामदेवराव, जनाबाई, चोखामेळा इ० सर्व जातीय २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले असून ग्रंथ सर्वोत्कृष्ट झाला आहे. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. ज्ञानेश्वरींतील वेंचे विषयवारीनें दिले असून कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग यावरील उताऱ्यांचा गोषवाराही दिला आहे. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २.

पत्ता:—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

# श्रीउपासनी महाराज.

ले.—— नरहरशास्त्री जोशी खरशीकर.

हल्लीं वर्तमानपत्रांतून साकोरीच्या उपासनीबाबांबद्दल बरीच चर्चा सुरू आहे. अशी चर्चा होत राहणें बरें वाटत नाहीं. तेव्हां आपल्या मनास प्रत्यक्ष-काय वाटतें तें पाहावें व स्वतःचें ठिकाणीं काय अनुभव येतो हेंही समजावें, या हेतूनें मी साकोरी येथें जाऊन बाबांचें दर्शन घेतलें व माझ्यावर तेथील दृश्य पाहून काय संस्कार झाले ते लिहीत आहें.

ब्राह्मणपरिषदेच्या कार्याचा प्रचार करीत करीत कोपरगांवीं गेलों. तेथून साकोरीस गेलों. महाराजांच्या दर्शन घेण्याच्या वेळा पुरुषांच्या बाबतींत मर्यादित असल्यानें त्रिकाळ आरतीचा प्रसंग साधून जावें लागतें. मीं दुपारच्या आरतीसमयीं गेलों होतों. आरती झाल्यानंतर माझे मागून डॉ. अंबिके दर्शनार्थ गेले. परंतु त्यांचा प्रवेश झाला नाहीं. संतांबद्दल माझी अत्यंत पूज्य बुद्धि आहे व तीच बुद्धि ठेवून या ठिकाणीं मीं निरीक्षण केलें आहे.

कुमारिका व स्त्रिया समर्पण केल्याची हकीगत खरी आहे. हल्लीं ज्या स्त्रीची पूजा होत आहे त्या स्त्रीचें वय सुमारें अठरा वर्षांचें आहे. तिच्या पतीनें श्रीगुरुमहाराजांचें चरणीं ही आपली प्रेमाची वस्तु म्हणून समर्पण केली आहे. “ तिचे ठिकाणीं फार मोठा अधिकार आहे. ब्र. गजानन महाराज शेगांवकर यांचा आवेश तिजमध्यें आहे, ” असें बाबांचें मत असल्यामुळें तेथील गुरुपणाचा मान गेल्या गुरुपौर्णिमेपासून या सौ. स्त्रीस प्राप्त झाला आहे. आजपर्यंत स्वतः महाराज ज्या साध्या पिंजऱ्यांत पोत्याच्या आसनावर बसत ती जागा बाबांचे कृपेमुळें या स्त्रीस प्राप्त झाली आहे. आतां हा पिंजरा चांदीचा झाला आहे ! या पिंजऱ्यांत ही स्त्री बसते. नंतर बाहेरून पादुकांची पूजा होते. सर्व भक्तमंडळी उभे राहून आरतीसमारंभ पार पाडतात व मंत्रपुष्पाचा गजर होतो. नंतर ब्राह्मण, मराठे, लिंगायत, पारशी स्त्री पुरुष हातांत फुलेंबेल घेतात व या स्त्रीचा उजवा पाय पिंजऱ्यांतून बाहेर येतो त्यावर पुष्पें वाहून नमस्कार करतात. पलीकडे बाबा निजलेले अगर बसलेले असतात, त्यांना फक्त नमस्कार करावयाचा असतो. ( अलीकडे महाराज पूजा घेत नाहींत. ) नंतर सर्व स्त्रीपुरुष मिळून प्रदक्षिणा होते. नंतर सर्व पुरुष खालीं बसतात व पंचवीस तीस स्त्रिया( यांत ८ वर्षांपासून पन्नास वर्षांपर्यंत असतात ) टिपऱ्या वाजवून रास

२

खेळतात. एक समर्पित स्त्री पेटी वाजविते व या स्त्रियां गाणीं म्हणून रासलीला खेळतात. या रासांत पुरुषांचा संबंध बिलकूल नसतो. रासानंतर तीर्थ देतात. समारंभ पुरा होतो. नंतर भक्तमंडळी तेथून बाहेर जातात. येणेंप्रमाणें हकीगत मी पाहिली आहे.

महाराजांचें वय ६५ तरी असावें. त्यांची तेजःपुंज मूर्ति पाहून मनावर त्वरित चांगले भाव उत्पन्न होतात. त्यांच्या संतत्वाबद्दल आदरच वाढतो, पण इतर प्रकार पाहिले म्हणजे मात्र मन उदास झाल्याशिवाय राहात नाहीं.

अत्यंत प्रेमाची वस्तु सद्गुरूस अर्पण करणें हें जर खरें आहे तर जीवापेक्षां आणखी प्रेमरूप वस्तु कोणती आहे ? " जीवाहूनि आतां करूं काय दान " तनमनधनेंकरून गुरुचरणीं समर्पित होणें शिष्याचें लक्षणच आहे. शिवाय " आत्मदारादिकं चैव गुरुभ्यो यः समर्पयेत् " असें गुरुगीतेंतही सांगितलें आहे. या ठिकाणीं जीवाचें दान करणें म्हणजे जीव श्रीगुरुपायापाशीं देणें असा नाहीं, दाराप्रपंच गुरुगदीं वाहायचा असेंही नाहीं. तर अध्यात्मशास्त्राचें दृष्टीनें पाहिल्यास जीवासुद्धां माझे मीपणावर, माझ्या सर्वस्वावर, माझ्या ब्रह्मांडावर, ज्या ज्या ठिकाणीं माझ्या माझेपणाचा भाव उमटत असेल त्या सर्वस्वांवर सद्गुरु परब्रह्माची सत्ता आहे, चैतन्य त्रिकालाबाधित आहे व तेंच सत्तारूपानें आहे म्हणून माझेपणाच्याही सर्व वस्तु प्रकाशित आहेत; अशा बोधानुरोधानें सर्वस्व समर्पित होतें. आईबापांस मुलींचें दान फक्त एका वरास करतां येतें. वराशिवाय प्रत्यक्ष दान कोणासच करतां येत नाहीं. धर्मशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें तर पतिराजास पत्नीचें दान कोणत्याही अवस्थेंत करतां येत नाहीं व अशा प्रकारचीं उदाहरणें कोठेंच दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. मग स्त्रीस मंगळ आहे अगर तिचे पाशांत मी गुंतून पडेन या भावनेवर तर कधींच दान होणें शक्य नाहीं. यामुळें येथें झालेल्या कुमारिका व स्त्रिया यांचें समर्पण पाहून बरें वाटत नाहीं. शास्त्र व संत यांच्या मार्गांच्या विरुद्ध दिसतें.

स्त्रियांना पुरुषांपेक्षां भक्तिभाव जास्त असतो म्हणून त्यांचेकडून टिपऱ्यांचा खेळ करवून घेणें व तो सर्व प्रेक्षकांनीं पाहात राहणें हेंही दृश्य बरें नाहीं ! !

साईवाक्सुधा याचीं चार पुस्तकें छापून तयार आहेत. त्यांत बाबांचें तोंडून झालेलीं प्रवचनें छापलेलीं आहेत. त्यांपैकीं चौथा भाग महाराजांच्या एका सुशिक्षित विद्वान् शिष्यानें मला दाखविला. त्यावरून थोडें लिहून हा विषय पुरा करतों.

या पुस्तकांत पुष्कळ विषय आहेत. शिवाजीमहाराज व श्रीसमर्थ रामदास व वानरसेना व श्रीराम हे सर्व खालीवर टोकानें पाहिलें तर रामच आहेत, व ते हल्लीं युरोपियनांच्या रूपानें राज्य करीत आहेत. युरोपियन लोक रामाचेच

अंश कसे याविषयीं त्रिजटेस श्रीरामसंग झाल्याची विक्षिप्त हकीगत दिलेली पाहून या वाङ्मयाबद्दल आदर वाटत नाहीं. मात्र या वाङ्मयांत ठिकठिकाणीं अध्यात्माचे सिद्धांत आहेत. पण ठिकठिकाणीं विलक्षण–शास्त्रास सोडून–हकीगती आहेत. गुदद्वार याचा अर्थ–गु म्हणजे गुरु गुरुचें द्वार तें गुदद्वार. तोंडापेक्षां गुरुद्वार श्रेष्ठ अशीं विधानें पाहून हा सांप्रदाय कोठील, याचें अधिष्ठान काय, यास आधार काय, याचा थांग लागत नाहीं. यांचे सुशिक्षित शिष्य सुद्धां या वाङ्मयांत फार गूढार्थ भरला आहे, तो समजण्याची पात्रता येणें फार अवघड आहे असें प्रतिपादितात व हें त्यांचें म्हणणें मला सर्वस्वी पटलें. कारण याचा अर्थ समजण्याचें भाग्य माझ्या मंदबुद्धीच्या वांट्यास लवकर खास येणार नाहीं, हा माझ्या अज्ञानाचाच परिणाम आहे.

अशा आणखी बारा स्त्रिया समर्पित होऊन त्यांच्यांत मोठमोठया संतांचा आविर्भाव होणार आहे. हें ऐकून आतां भारतास आनंदाचा दिवस लवकर उगवेल अशी आशा वाटते. परंतु यापुढें स्त्रीयुग तर नाहींना? संतांना स्त्री वेषानें अवतरण्यांत स्वानंद वाढवावयाचा आहे असें दिसतें. अस्तु. महाराजांच्या दृष्टीनें यांत स्वानंदच असेल. परंतु श्रुतिशास्त्रांकडे पाहिल्यास यांत विसंगतता वाटते. समाजाच्या दृष्टीनेंही हें बरें नाहीं असा माझे मनावर संस्कार झाला आहे. तथापि "अंतर्निष्ठांचिया खुणा। अंतर्निष्ठ जाणती" याप्रमाणें जास्त चर्चा न करतां आपण पाहात राहणें हेंच कर्तव्य ठरतें. येथील प्रकारांकडे शुद्ध निर्विकार दृष्टीनें पाहण्याची भावना समाजांत तयार व्हावी अशी श्री उपासनी महाराजांकडे प्रार्थना आहे व ती सफल करण्यास ते समर्थ आहेत.

---

ॐतत्सत् श्रीसद्गुरु प्रसन्न.

## सुमारें अडीचशें वर्षांपूर्वी

# श्रीरामनामप्रायश्चित्तानें केलेली ब्राह्मण यवनीची शुद्धि.

—∞—

लेखक—**चंद्रापुरीदास, मद्रास.**

मद्रास इलाख्यांतील श्रीक्षेत्र कांचीमधील आचार्यांचें 'कामकोटिपीठ' हें शृंगेरीमधील शारदापीठाइतकेंच, किंबहुना थोडें अधिक महात्वाचें मानलें जातें. याचें कारण, शृंगेरी-बदरी-द्वारका-जगन्नाथ येथें स्थापन केलेल्या चारही पीठांवर आचार्यांनीं आपलें पद्मपाद हस्तामलकादि चार शिष्यास बसवून कांची येथील कामकोटी पीठावर स्वतः विराजमान होऊन, तेथें स्थापन केलेल्या योगलिंगाची स्वतः पूजा करीत असत, अशी या पीठाची आख्यायिका आहे. तात्पर्य, हें कामकोटी पीठ इतक्या महत्वाचें आहे. आचार्यांनीं याप्रमाणें या पीठाची स्थापना करून ते गुप्त झाल्यानंतर कांहीं वर्षांनीं, मुसलमानी राज्याच्या वेळीं सदरहु पीठ तंजावरच्या राजानें तंजावरास नेलें. तिकडून मग त्यावेळच्या आचार्यांनीं कुंभकोण येथील कावेरी तीर पसंत करून कुंभकोणास आणलें, असा ह्या पीठाचा ( गादीचा ) पूर्व इतिहास आहे. शृंगेरीप्रमाणें कुंभकोणच्या गादीवरील आचार्यही ब्रह्मचारी संन्याशीच असतात. ह्या गादीवरील सांप्रतचे आचार्य ( जगद्गुरु श्रीचंद्रशेखरसरस्वती स्वामी ) हे मोठे विद्वान् बहुभाषाप्रवीण, तपस्वी व ब्रह्मनिष्ठ असल्याचें समजून येतें. असो.

ह्या कामकोटि पीठावर श्रीविश्वाधिकेंद्रसरस्वती नांवाचे ५८ वे आचार्य होऊन गेले. हे 'अभिनव शंकराचार्य' या नावानेंही प्रसिद्ध आहेत. यांच्या मागून **श्री बोधेन्द्रसरस्वती** नांवाचे ( ५९ वे आचार्य ) त्या गादीवर बसले. हे मोठे पंडित व महा नामधारकही होते. आपल्या महाराष्ट्र संतश्रेष्ठाप्रमाणें दक्षिणेंत नामसिद्धान्त यांनीं स्थापन केला. यांची समाधि कुंभकोणजवळ सुमारें १५ मैलांवर गोविंदपूर नांवाच्या गांवीं आहे. येथें भाद्रपद वद्य १२ रोजीं त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव होत असतो. हें स्थान म्हणजे दक्षिणेंतील श्रीज्ञानेश्वरांची आळंदी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सुदैवानें तेथें यंदा ह्या लेखकाचें जाणें झालें होतें. जुन्या नव्या विद्वानांचा समूह तेथें

जमलेला होता. श्रीस्वामींच्या नामसिद्धान्त ग्रंथावरील प्रवचनें, हरिकथा, स्वामींच्या अद्भुत आख्यायिका, इतर अनेक विषयांवरील विद्वानांचीं संभाषणें वगैरे ऐकण्याचा योग आला. तामिल भाषेंत छापलेलें स्वामींचें संक्षिप्त चरित्रहीं पाहाण्यांत आलें. त्या चरित्रापैकीं पुढील एक गोष्ट महाराष्ट्र वाचकांकरितां, प्रथम द्यावीशी वाटल्यामुळें देत आहे.

ह्या आचार्यांचे गुरु श्री विश्वाधिकेंद्रसरस्वती हे श्रीक्षेत्र काशी येथें गेले असतां, त्यांनीं आपल्या ह्या शिष्याला तेथें आश्रय देऊन दक्षिणेंत पाठविलें व आज्ञा केली कीं जातांना श्रीजगन्नाथ क्षेत्रीं लक्ष्मीधर कवि नामक महाविद्वान् पुरुष आहेत, त्यांनीं "**नामकौमुदी**" नामक ग्रंथ केला आहे तो घेऊन जाऊन, त्यावरून भगवन्नामावर स्वतः ग्रंथरचना करून लोकांत **नामसिद्धान्त** स्थापन कर, कलिकाळांत त्यासारखें दुसरें साधन नाहीं, विद्वान् लोक विद्यामदामुळें भगवद्भक्तीस विमुख होऊन अधोगतीस जातात, करितां त्यांच्या बुद्धीलाही पटून ते नामप्रवण होतील असें कर, सर्वसाधारण लोकांना तर योगयागादि साधनें अत्यंत दुष्कर आहेत. उत्तरोत्तर काळ भयंकर आहे. भगवन्नामावांचून तरणोपाय नाहीं इत्यादि. ही गुर्वाज्ञा शिरसावंद्य मानून ते दक्षिणेंत यावयास निघाले. येताना श्रीजगन्नाथ क्षेत्रांत आले व रात्रौ देवाचे दर्शन घेऊन ते लक्ष्मीधर कवीच्या बाहेरील सोप्यावर येऊन निजले.

मध्यरात्रीच्या सुमारास एक ब्राह्मणाचें जोडपें ही येऊन तेथें झोंपलें. लक्ष्मीधर कवि त्यापूर्वीच स्वर्गस्थ झालेले होते. त्यांचा मुलगा 'लक्ष्मीकांत,' नांवाचा असून तोही बापाप्रमाणें सर्वशास्त्रपारंगत होता, तो पहाटे चार वाजतां लघुशंके करितां बाहेर आला तों हें ब्राह्मण जोडपें तेथें झोंपलेलें त्यानें पाहिलें, कोण कोठील वगैरे चौकशी केली, ब्राह्मणानें त्यास वंदन करून आपली गोष्ट सांगण्यास आरंभ केला,

ब्राह्मण म्हणाला—मी दक्षिणेचा राहणारा; पांच वर्षांपूर्वीं पत्नीसह काशीयात्रेस निघालों, ह्या पलीकडच्या गांवीं रात्रौ धर्मशाळेंत निजलों असतां यवनांनीं माझ्या या स्त्रीस उचलून नेलें, सकाळीं उठून पहातों तों स्त्री नाहीं. मी तीन दिवसपर्यंत हिचा पुष्कळ शोध केला पण पत्ता लागला नाहीं. शेवटीं; हा एक दैवदुर्विलास अथवा ईशइच्छा असें मानून मी काशीक्षेत्री जाऊन तेथें पांच वर्षें राहिलों. परत गांवीं जाण्याकरितां निघून आलों असतां काल संध्याकाळीं पलीकडच्या नदीवर बसून संध्या करीत होतों. तों ही स्त्री पाणी नेण्याकरितां भांडें घेऊन नदीवर आली व मला पाहून नमस्कार करून रडूं लागली. प्रथम मी हिला ओळखलें नाहीं. कारण हिनें नेसलेलें लुगडें व कानांतील अलंकार वगैरे सर्व त्या जातीचे होते. तूं कोण, कां रडत आहेस असें विचारतां

तिनें सांगितलें, मी तुमची पत्नी, तुम्ही आम्ही त्या दिवशीं धर्मशाळेंत निजलों असतां मला दुष्टांनी उचलून नेलें; तोंडांत कापडाचा बोळा घालून तोंड बंद केल्यामुळें मला ओरडतां आलें नाहीं. मला मुसलमान धर्माची दीक्षा देण्यांत येऊन माझ्याशीं एकानें विवाहही लावला, आहार विहार सर्व त्या जातीप्रमाणें झाले. आज माझ्या नशीबानें तुम्ही मला येथें दिसला, मी आता पत्नीप्रमाणें जरी आपल्यापाशीं रहाण्यास योग्य नाहीं, तरी मी एका दासीप्रमाणें आपल्या जवळ रहात्यें. मला हिंदु करून घ्या. तो मुसलमान माझा शोध करण्यास येण्यापूर्वीं कृपा करून मला येथून घेऊन चला, इत्यादि. मी म्हटलें, तुझी सत्यनिष्ठा वाखाणण्यासारखी आहे. एकंदर खरी हकीकत तूं सांगितलीस. तथापि या गोष्टीस कांहीं प्रायश्चित्त मिळेल तर बरें होईल, त्याचा विचार करूं या, असें सांगून मी हिला घेऊन आलों आहे. आपण धर्मशास्त्रपारंगत महाविद्वान् ब्राह्मण आहां, मला आपली कीर्ति ऐकून माहीत आहे, तरी या गोष्टीस कांहीं प्रायश्चित्तविधि असेल तर कृपा करून सांगावा. त्या स्त्रीनेंही उठून त्यांना साष्टांग दंडवत घातलें व हात जोडून उभी राहिली.

लक्ष्मीकांतानें म्हटलें, माझ्या परमपूज्य व विद्वच्छिरोमणि पितुःश्रीनें मला अनेक शास्त्रें पढवून थोड्या दिवसांखालीं इहलोकची यात्रा आटपली. त्याच्या कृपेनें माझी अनेक शास्त्रांत गति आहे. तीं शास्त्रें माझ्या बुद्धींत प्रतिष्ठित आहेत. परंतु त्यांचा विचार करितां ह्या तुमच्या गोष्टीस कांहीं प्रायश्चित्त आहे असें मला वाटत नाहीं. हें ऐकून तो ब्राह्मण व ती स्त्री अगदीं खिन्न झालीं. हा त्यांचा संवाद लक्ष्मीकांताची मातोश्री आंतून ऐकत होती. तिनें आपल्या मुलास हांक मारून विचारलें. ते अतिथि काय म्हणत आहेत, कशाकरितां आले आहेत वगैरे. मुलानें सर्व गोष्ट सांगितली. त्यावेळीं ती माउली म्हणाली, "मुला, शास्त्रांत एखाद्या गोष्टीस प्रायश्चित्त न मिळालें, तर **रामनाम हें महाप्रायश्चित्त** द्यावें असें तुझ्या पित्यानें सांगितलेलें तुला आठवत नाहीं काय? त्याबरोबर त्याला पितृवचनाची आठवण होऊन त्यानें तत्क्षणीं बाहेर येऊन त्या दंपतीस सांगितलें कीं, " आहे आहे, प्रायश्चित्त आहे, भिऊं नका, रामनामाचा त्रिवार उच्चार करून नदींत स्नान करावें म्हणजे झालें." आईनें पुनः मुलास बोलावून म्हटलें, अरे 'सकृन्नामोच्चार' (एकच वेळा उच्चार) पुरे, असें तुझ्या पित्यानें सांगितलेलें मीं ऐकलें आहे, तूं त्रिवार म्हणून कां सांगितलेंस? इत्यादि.

आपलें स्वामीमहाराज त्यावेळीं उठून बसून सर्व ऐकत होते, गुर्वाज्ञेनुसार त्यांनीं नामसिद्धांत प्रस्थापित करण्याचा विचार ठरविलेलाच होता. त्यास हें प्रकरण आयतें (Godsend) मिळालें. त्यांनीं लक्ष्मीकांतास हांक मारून,

यास कांहीं आधार आहे काय, असें विचारलें. स्वामींस पाहून लक्ष्मीकांतानें साष्टांग नमस्कार केला व घरांत जाऊन पित्यानें केलेला '**नामकौमुदी**' ग्रंथ आणून त्यांस दिला. स्वामींना तों पाहिजेच होता. तो ग्रंथ म्हणजे एक श्रीगुरूंचा अनुग्रहच असें त्यांस वाटलें व तेथेंच बसून, दिव्याच्या प्रकाशांत त्यांनीं तो वाचून पाहिला. त्यांनीं आश्रम घेण्यापूर्वीं, व्याकरण, न्याय, मीमांसा वेदान्त. इ० शास्त्रांचें साङ्गोपाङ्ग अध्ययन केलेलें होतें, योगविद्येचाही अभ्यास केलेला होता. ते पूर्वजन्मीचे महायोगभ्रष्ट पुरुष होते. ते विद्वच्छ्रेष्ठ तसेच कर्मनिष्ठ, योगनिष्ठ, ज्ञाननिष्ठ व भक्तिनिष्ठही होते.

" विप्राद्विषड्गुणयुतादरविंदनाभ–
पादारविंद विमुखाच्छ्वपचं वरिष्ठं ।
मन्ये, तदर्पितमनोवचनेहितार्थ–
प्राणं पुनाति स कुलं न तु भूरिमानः ॥ "

" विद्याविनयसंपन्ना ब्राह्मणा वेदपारगाः ।
मयि भक्तिं न कुर्वन्ति ये ते चण्डालतां गताः ॥ "

इत्यादि श्री व्यासोनारायणांनीं भक्तिहीन विद्वान् ब्राह्मणांस दिलेल्या शिव्या त्यांच्या कानांत घुमत होत्या. ह्या शिव्या वेदव्यासांनीं ( अलीकडच्या ब्राह्मणेतराप्रमाणें ) ब्राह्मणांचा अपमान करण्याकरितां दिलेल्या नसून, त्यांना ह्या शिव्यांनीं चेतवून भगवद्भक्तिरूप राजमार्गावर आणून सोडण्याकरितां व त्यायोगें त्यांना जगमान्य करण्याकरितां दिलेल्या आहेत हें वर्म स्वामी जाणत होते. वेदव्यासांचें श्रीमद्भागवत हें ब्रह्मसूत्रावरील त्यांचें स्वकृत व्याख्यान आहे असें जें श्रीकृष्णचैतन्य गौरांगप्रभूंनी म्हटलें आहे, त्यावर त्यांचा विश्वास होता. भक्तीवांचून नुसती विद्वत्ता व अणिमादि सिद्धिही परम गतीला पोंचविणारीं साधनें नव्हेत, हा भागवतसिद्धान्त त्यांना अत्यंत मान्य असून विद्यामदानें मदांध झाल्यामुळें खऱ्या मार्गापासून च्युत झालेल्या लोकांत व सामान्य जनांतही भक्तिमार्गाचा प्रसार करण्याकरितां त्यांचा अवतार होता. त्या भक्तीचेही नानाविध प्रकार आहेत. त्यांत नामस्मरण भक्तीच हिंसादि दोषरहित, सुखसंपाद्य व अत्यंत श्रेष्ठ फलदायी (फुकाचें सुखाचें कांहीं न वेचें भांडार। (परंतु) कोटी यज्ञापरीस तुका म्हणे हें सार ॥) असा त्यांचा विचार होता. आणि तो ह्या नामकौमुदी ग्रंथानें दृढ झाला.

अमुक पापाला अमुक प्रायश्चित्त व त्या प्रायश्चित्तानें त्या पापाची निवृत्ति ह्याबद्दल शास्त्रप्रमाणावरच विश्वास ठेवून चाललें पाहिजे. प्रत्यक्ष किंवा अनुमान प्रमाण येथें उपयोगी नाहीं. परंतु चिकित्सक बुद्धीच्या लोकांना संशय पिशाचानें पछाडलेलें असतें. आणि असे हे लोक सर्व काळीं सर्व देशांत अस-

तातच. ते कित्येक वेळीं स्वतःबरोबर इतरांचें नुकसान करितात, तसाच कित्येक वेळां फायदाही करितात. वरील अ–लौकिक शुद्धीचा विचार चालला असतां उजाडलें. शेजारपाजारचे लोक जमा झाले. हां हां म्हणतां ही गोष्ट गांवभर पसरली. गांवच्या लोकांचा लक्ष्मीकांताच्या योग्यतेवर विश्वास होता. तथापि कांहीं शंकेखोरांनीं म्हटलें, रामनामांत हिच्या भ्रष्टतेचें पाप धुऊन टाकण्याची खरोखरच शक्ति असेल, तर तें नाम घेऊन नदींत स्नान करितांच हिचें काळें वस्त्र पांढरें व्हावें, कानांतील मेंच्छ अलंकाराचीं छिद्रें बुजून जावीं व कपाळावर कुंकुम दिसावें, असें झालें तरच ही स्त्री शुद्ध झाली व नामस्मरणाचा महिमा खरा असें आम्ही मानूं इ.. लक्ष्मीकांतानें बरें आहे असें म्हणून त्या स्त्रीस तसें करण्यास सांगितलें. तेव्हां श्री स्वामीच्या व इतर लोकांच्या देखत, तिनें हात जोडून परमेश्वराची मनोभावानें प्रार्थना केली व परम पश्चात्तापपूर्वक व अत्यंत श्रद्धापूर्वक ‘ राम ’ असें म्हणून बुडी मारली व तेथेंच उठून उभी राहिली, तों तिचें काळें लुगडें पांढरें झालें, कानांतील नवीन भोकें बुजालीं व कपाळावर कुंकू दिसूं लागलें. हें पाहून सर्व लोकांना आश्चर्य वाटलें. त्यांनीं रामनामाचा जयजयकार केला. उभयतां स्त्रीपुरुषांनीं येऊन लक्ष्मीकांताच्या व स्वामींच्या पायावर लोटांगण घातलें. स्वमींनीं लक्ष्मीकांताच्या घरीं त्यादिवशीं त्या ब्राह्मणस्त्रीनें केलेल्या स्वैपाकाची भिक्षा घेतली. स्वामींनीं त्या दंपतीस आशीर्वाद देऊन काशीक्षेत्रास गमन केलें.

योगी व तपस्वी हे लोकहितार्थ व स्वसामर्थ्यानें व स्वेच्छेनें कांहीं चमत्कार करून दाखवितात. क्वचित्प्रसंगीं परमेश्वर तसें कांहीं चमत्कार करून भक्तांची लाज राखतो या प्रकारचीं उदाहरणें आपल्या महाराष्ट्रीय संतांच्या चरित्रांतही अनेक सांपडतात. प्रस्तुत चरित्रांतील अद्भुत चमत्कार चिकित्सक दृष्टीला कसाही भासला तरी एका मोठ्या पीठाधिपति आचार्यांनीं भ्रष्ट ब्राह्मणास प्रायश्चित्त देऊन शुध्द करण्याचें मनांत आणलें अथवा दुसऱ्यानीं शुध्द केलेलें मान्य केलें ही गोष्ट, आणि त्याचबरोबर भगवन्नामासारखें दुसरें प्रायश्चित्त नाहीं हा त्यांनीं मान्य केलेला व आपल्या अमोघ वाणीनें लोकांत प्रस्थापित केलेला सिद्धान्त सर्व सामान्य आणि विद्वान् लोकांनींहि विचार करण्यासारखा आहे.

त्यांनीं गुर्वाज्ञेप्रमाणें ‘नामकौमुदी’ ग्रंथाच्या आधारावर खालीं लिहिलेले ग्रंथ केलेले त्यांच्या चरित्रांत प्रसिध्द आहेतः—

( १ ) नामामृतार्णव.
( २ ) नामामृतरसायन.
( ३ ) नामामृतरसोदय.
( ४ ) नामतरंग.

( ५ ) नामसूर्योदय. तसेंच–
( ६ ) हरिहरभेदधिःक्कार.
( ७ ) हरिहराद्वैतभूषण, व
( ८ ) मूर्तब्रह्मविवेक.

पैकीं ' नामामृतरसायन ' हा ग्रंथ तंजावरास ' पूर्णचंद्रोदय ' छापखान्यांत देवनागरी ( बालबोध ) लिपींत छापून तो एका सद्गृहस्थानें मोफत वाटला ( सन १९२६ मध्यें ). आज हीं पुस्तकें मिळत नाहींत ! दुसरा ग्रंथ 'भगवन्नामामृत–रसोदय' नांवाचा कुंभकोणास ग्रंथलिपींत नुकताच छापून प्रसिध्द झाला असून त्याची किंमत १ रु. आहे. हीं पुस्तकें या उत्सवांत विकावयासही आलीं होतीं. इतर ग्रंथ ताडपत्रावर लिहिलेले उपलब्ध आहेत म्हणतात. कोणीं पुण्यवंतांनीं ते प्रकाशित करण्याचें काम हातीं घेतल्यास बरें होईल.

श्रीबोधेंद्रस्वामींच्या चरित्राविषयीं व आचार्यांच्या कामकोटिपीठाविषयीं अधिक कांहीं माहिती मिळावी म्हणून प्रयत्न करीत असतां, श्रीयुत एन्. के. वेंकटेशन् एम्. ए. असिस्टंट लेक्चरर इन् इंग्लिश, गव्हर्मेंट कॉलेज, कुंभकोणम् यांनीं ' श्रीशंकराचार्य व त्यांचें कामकोटि पीठ ' ह्या नांवाचें इंग्रजी पुस्तक छापलेलें आढळलें. त्यांतील माहिती व उत्सवांत झालेलीं विद्वान् लोकांचीं अनेक महत्त्वाच्या विषयांवरील संभाषणें व प्रवचनें वगैरेंची माहिती महाराष्ट्र वाचकांकरितां देण्याचें आश्वासन देऊन हा लांबलेला लेख पुरा करितों.

ॐतत्सत्.

---

# सामराज कवीविषयीं चर्चा.

## शामभट आर्वीकर, मुद्गलाख्यानकर्ता सामराज व रुक्मिणीहरणकर्ता सामराज.

ले.—गोविंद रामचंद्र राजोपाध्ये. बी. ए.

१. गेल्या जूनचे मुमुक्षूचे अंकांत सामराज कवीसंबंधानें मी लेख लिहिला त्यांत शामभट आर्वीकर हाच मुद्गलाख्यानकर्ता सामराज असून तोच रुक्मिणीहरणकर्ता सामराज असें प्रतिपादन केलें होतें. व राधामाधवविलास चंपूत श्यामगुसाई या नांवानें उल्लेखिलेली व्यक्ति हीच असावी असा संभव व्यक्त केला होता. त्यावर श्रीयुत कानिटकर, न्यायाधीश मोर यांनीं गेल्या ऑगष्टचे अंकांत शामभट आर्वीकर हा मुद्गलाख्यानकर्ता सामराज असल्याचें मान्य केलें; पण रुक्मिणीहरणकर्ता सामराज हा त्याहून निराळा व श्यामगुसाई हा त्या दोहोंहून निराळा असें प्रतिपादन केलें. प्रस्तुत विषयांत श्यामगुसाई ही व्यक्ति मथळ्यांतील व्यक्तीहून भिन्न कीं अभिन्न हा महत्वाचा मुद्दा नाहीं. मथळ्यांतील व्यक्ति भिन्न कीं अभिन्न एवढाच महत्वाचा मुद्दा आहे. तो सिध्द करण्यास शामगुसाई यांची त्या व्यक्तीहून भिन्नाभिन्नता सिध्द करण्याची गरज नाहीं. व त्यासंबंधानें कांहीं पुरावाहि उपलब्ध नाहीं. सामराजाचा दरबारपरिचय सिध्द करण्याकरितां शामगुसाई याची त्याच्याशीं अभिन्नता ठरली पाहिंजे असें नाहीं. व त्याकरितां श्रीयुत कानिटकर म्हणतात त्याप्रमाणें शामगुसाई यांचें नांव मी आपल्या लेखांत गोंवलें असेंही नाहीं. केवळ त्यांच्यासंबंधानें सुचली ती माहिती नमूद केली एवढेंच. सामराज कवींच्या राजदरबार परिचयाची उपपत्ति तो मल्हारभट—श्रीशिवाजीमहाराजांचा न्यायशास्त्री पंडितराव—याचा भाऊ होता यावरूनच मी दाखविली आहे. तसेंच "मल्हारभट हा बुद्धिवान् व विद्वान होता हें उघड आहे. त्याचप्रमाणें त्याचा भाऊ सामराज हा ही व्युत्पन्न असावा यांत नवल नाहीं." असें मी लेखांत म्हटलें आहे तें सामराज कवीच्या विद्वत्तेची उपपन्नता दाखविण्याकरितां असून श्रीयुत कानिटकर म्हणतात त्याप्रमाणें शाम गुसाई यांची विद्वता सिद्ध करण्याकरितां नव्हे तेव्हां शामगुसाई याच्यासंबंधाचा मुद्दा गाळून मथळ्यांतील तीन व्यक्तींच्या भिन्नाभिन्नतेसंबंधी विचार करूं.

२. मुद्गलाख्यानकर्त्या सामराजानें आपल्यासंबंधीं जी माहिती त्या काव्यांत दिली आहे ती शामभट आर्वीकर यांस पूर्णपणें लागू पडते याबद्दल भिन्न

मत नाहीं असें श्रीयुत कानिटकर लिहितात. शामभट आर्वीकर याचेसंबंधानें माहिती मी पंडितराव यांच्या भारतवर्ष मासिकांत प्रसिद्ध झालेल्या बखरीवरून दिली आहे. ही बखर सर्वस्वीं विश्वसनीय नाहीं. हींत दिलेल्या कांहीं इतर हकिकती विसंगत व असत्य आहेत हें दाखविणारा अस्सल पुरावा मजपाशीं आहे. पण शामभट आर्वीकर यांच्या वंशावळीसंबंधानें त्या बखरींत दिलेली माहिती दुसऱ्या माहितीवरून पडताळून मी पाहिली आहे. कोल्हापूरचे राजोपाध्ये हा शामभटाचा वंश असल्यामुळें त्या घराण्यांतील सध्याचे पुरुष श्रीयुत आण्णासाहेब यांचेकडून त्यांच्या वंशावळीची माहिती मागितली. ती बखरींत दिलेल्या शामभटाच्या माहितीशीं जमली असें पाहून मग ती माहिती मी आपल्या मागील लेखांत दिली आहे. तीवरून शामभट आर्वीकर व मुद्गलाख्यानकर्ता सामराज यांच्या एकत्वाविषयीं शंका घेण्यास जागा नाहीं.

३. आतां मुद्गलाख्यानकर्ता सामराज व रुक्मिणीहरणकर्ता सामराज यांच्या एकत्वाविषयीं प्रश्न राहिला. हा प्रश्न दोन प्रकारांनीं सोडवितां येईलः—

( १ ) मु. ख्या. व रु. ह. या दोन काव्यांत एककर्तृत्वदर्शक प्रमाणें असतील तर तीं दाखवून; किंवा

( १ ) मु. ख्या. काव्याप्रमाणें रु. ह. हें काव्य शामभट आर्वीकरानेंच केलें असें दाखविण्यास रु ह. काव्यांत किंवा स्वतंत्र कांहीं आधार असल्यास ते दाखवून.

दोहोंपैकीं कोणत्याही एका प्रकारानें हा प्रश्न सुटण्यासारखा आहे. दोन्ही प्रकारांच्या समुच्चयानें सुटला तर त्यासंबंधानें अधिकच खात्री पटण्यासारखी आहे. तेव्हां प्रथम पहिल्या प्रकारानें दोन्ही सामराजांचें एकत्व दाखविण्याचा प्रयत्न करून मग आपण दुसऱ्या प्रकाराकडे वळूं.

४. मु. ख्या. काव्य व रु. ह. काव्य यांवर एककर्तृत्वाचा छाप पडला आहे असें मीं मागील लेखांत म्हटलें आहे. त्यावर श्रीयुत कानिटकर म्हणतात, “ एककर्तृत्व ठरविण्यास कवींची प्रतिभा, भाषापद्धति, शब्दसंपत्ति, वर्णन करण्याची शैली, ओज, प्रसाद, माधुर्य, कल्पकता इत्यादि गोष्टींत पूर्ण साम्यता असावी लागते. ” यानंतर पुढें ते म्हणतात, “ काव्याच्या पूर्वापर कालाप्रमाणें एकाच कवीचें ओज, प्रसाद, माधुर्य, कल्पकता यांत फरक होत जाईल. पण भाषापद्धति व शब्द संपत्ति या बाबतींत न समजून येण्यासारखा फरक पडणार नाहीं. ” यावरून एककर्तृत्व ठरविण्यास ज्या गोष्टींत साम्य असावें लागतें असें श्रीयुत कानिटकर प्रथम म्हणतात, त्यांपैकीं इतर सर्व गोष्टी त्यांनींच वगळल्यामुळें भाषापद्धति व शब्दसंपत्ति या दोन गोष्टींत तरी निदान साम्य पाहिजे असा त्यांच्या म्हणण्याचा निष्कर्ष निघतो. या दोन गोष्टींत मु. ख्या.

व रु. ह. या दोन काव्यांचें साम्य नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे व त्यास ते खालील कारणें देतातः—

( १ ) रु. ह. काव्यांत विद्वत्ता दिसते तितकी मु. ख्या. काव्यांत नाहीं.

( २ ) मु. ख्या. काव्यांत स्वभावोक्ति उठावदार नाहीं.

( ३ ) रु. ह. काव्यांत शंभर वेळां आलेला ‘ निपट ’ हा सामराजास आवडता असलेला शब्द मु. ख्या. काव्यांत मुळींच नाहीं.

( ४ ) रु. ह. काव्यांत फारशी व देशी शब्द पुष्कळ आले आहेत; मु. ख्या. काव्यांत फार थोडे आहेत.

( ५ ) ‘ करूनशानें, ’ ‘ मागत्यान् ’ अशीं दोन गांवढळ रूपें मु. ख्या. काव्यांत आहेत. रु. ह. काव्यांत नाहींत.

पहिलीं दोन कारणें देतांना मु. ख्या. काव्यांत थोडी तरी विद्वत्ता व उठावदार नसली तरी हुडकून सांपडण्यासारखी स्वभावोक्ति मु. ख्या. काव्यांत आहे असें श्रीयुत कानिटकर मान्य करितात असें दिसतें. विद्वत्ता व स्वभावोक्ति या गोष्टींत दोन्ही काव्यांत फरक आहे. पण ओज, प्रसाद, माधुर्य या गोष्टींत असलेला फरक ज्याप्रमाणें भिन्नकर्तृत्व सिद्ध करीत नाहीं असें श्रीयुत कानिटकर मानतात त्याचप्रमाणें या गोष्टींतला फरकही तें सिद्ध करीत नाहीं असें मानण्यास काय हरकत आहे ? एकाच कवीच्या दोन काव्यांत या गोष्टींतही फरक पडणें साहजिक आहे.

‘ निपट ’ हा शब्द रु. ह. कर्त्या सामराजाचा आवडता असून मु. ख्या. काव्यांत आला नाहीं. पण रु. ह. कर्त्या सामराजास आवडते असे दुसरे कांहीं प्रकार मु. ख्या. काव्यांत आले आहेत असें दाखविलें असतां या तिसऱ्या कारणास फारसें महत्त्व उरत नाहीं.

रु. ह. काव्यांतल्या इतके फारशी शब्द मु. ख्या. काव्यांत नाहींत हें चवथें कारण दिलें आहे. पण आधीं मु. ख्या. काव्य हें रु. ह. काव्याहून एकचतुर्थांशापेक्षांही लहान आहे. त्यांतून ज्या प्रसंगांच्या अनुरोधानें फारशी शब्द रु. ह. काव्यांत आले आहेत ते प्रसंग मु. ख्या. काव्यांत मुळींच नाहींत. एका मोठ्या राजकन्येच्या विवाहाची तयारी, तत्संबंधीं समारंभ, त्या प्रसंगाला उचित असे नानाविध अलंकार यांचे वर्णन करतांना राजव्यवहारविषयक जे फारशी शब्द त्या कालच्या महाराष्ट्रीयांच्या भाषेंत घुसले होते ते सहाजिकपणें रु. ह. काव्यांत आले आहेत. मु. ख्या. काव्यांत असे प्रसंग नाहींत. एका निर्धन तपस्याच्या गृहस्थाश्रमासंबंधीं तें आख्यान आहे. त्यांत राजव्यवहाराचा संबंध नाहीं. अर्थात् फारशी शब्द येण्याचें फारसें कारण नाहीं. तेव्हां श्रीयुत कानिटकर यांनीं दिलेले हें चवथें कारण लंगडेंच पडतें.

पांचवें कारण गांवढळ शब्दांसंबंधाचें आहे. ' करूनशानें ' व 'मागत्यान्' हे मु. ख्या. काव्यांत आलेले दोन शब्द गांवढळ आहेत खरें. पण सामराज कवि ज्या प्रांतात राहत होता त्या कोल्हापुर प्रांताकडील शिक्षित लोकांच्या भाषेंत हे शब्द किंवा यासारखें ' त्यास्नी ' वगैरे शब्द अद्यापही ऐकूं येतात. तेव्हां या दोन शब्दांच्या प्रयोगावरून मु. ख्या. कर्ता सामराज गांवढळ होता असें म्हणतां येत नाहीं. त्या काव्यांतही विद्वत्तेची चमक आहे. रु. ह. काव्यांत वरील शब्द आले नाहींत यावरून सामराजानें आपली भाषा पुढें सुधारली असें म्हणतां येईल. हे दोन सामराज भिन्न होते असें मानण्यास हें पुरेसें कारण नाहीं.

रु. ह. कर्ता सामराज आपल्यास 'भगवद्भक्तपदानुरक्त' असें उपपद लावतो तसें मु. ख्या. कर्ता सामराज लावीत नाहीं हें आणखी एक कारण श्रीयुत कानिटकर देतात. पण रु. ह. काव्यांत जी भक्तीची उत्कटता दिसून येते तीस उचित असें हें उपपद कवीनें मागाहून धारण केलें असण्याचा संभव आहे.

५. आतां दोन्ही काव्यांचें साम्य दाखविणाऱ्या गोष्टी कोणत्या तें पाहूं:—

( १ ) नमनाचा श्लोक हा दोन्ही काव्यांत सारखा आहे. नागेशाचे ' सीतास्वयंवर ' काव्यांतील नमनाच्या दुसऱ्या श्लोकाचा पहिला चरण "वंदूनिया पाय गजाननाचे " असा आहे. पण पुढील चरण भिन्न आहेत. मु. ख्या. व रु. ह. यांतील पहिल्याच श्लोकाचे चारही चरण सारखे आहेत. हा श्लोक " सजयति सिंदुरवदनो..." अशा श्लोकासारखा सर्वसाधारण झालेला नाहीं. एका कवीच्या काव्यांतील पहिला नमनाचा श्लोक दुसरा कवि सबंध जशास तसा त्याच स्थानीं घेईल हें बऱ्याच अंशीं असंभवनीय दिसतें.

( २ ) सगुण निर्गुण नमनः—रु. ह. काव्यांत प्रारंभीं परमेश्वरास नमन करतांना त्याच्या सगुण स्वरूपास तें केलें आहे. पण त्यावरोबर निर्गुणावरही दृष्टि ठेविली आहे. हाच प्रकार मु. ख्या. काव्यांतही आहे.

( ३ ) वृत्तः—रु. ह. कर्त्याचें ' उपजाति ' हें वृत्त आवडतें दिसतें. कारण या काव्यांत एकंदर श्लोक ११४० आहेत त्यांपैकीं ६ शेंच्या वर उपजाति वृत्ताचे असून बाकीचे निरनिराळ्या वृत्तांचे आहेत. मु. ख्या. कर्त्याचेंही हेंच आवडतें वृत्त आहे. त्यांतील २६० श्लोकांपैकीं सरासरी २ शें श्लोक उपजाति वृत्ताचे आहेत.

( ४ ) अनुप्रासः—दोन्ही सामराजांस अनुप्रास आवडतो असें दिसतें. रु. ह. काव्याप्रमाणें मु. ख्या. काव्यांतही अनुप्रासाचीं उदाहरणें आहेत.

( ५ ) शब्दः—' ब्रह्म ' या अर्थीं 'वस्तु ' हा शब्द दोन्ही काव्यांत योजिला आहे. कल्पद्रु, विपंची, पोष्य हे शब्द दोन्ही काव्यांत वरचेवर आले आहेत.

तसेंच भागे, आडले, असोशी, दापी, अगळा, उगले वगैरे देशी शब्द दोन्ही काव्यांत सांपडतात. 'सावरीते-ति' हा शब्द दोन्ही काव्यांत आला आहेः-

रु. ह. केलें कसें साहस सावरी ते (?)
मु. ख्या. विनिंद्रजे रुद्रहि सावरीति (?)

(६) व्याकरणाचीं रूपेंः—'त्वां' याअर्थीं 'तां', अवो, न जाय-नव-जाय, वसेत-वदेत-पुसेत-म्हणेत, करिजे-धरिजे, बोढिजेते-बाधिजेतें अशा प्रकारचीं शब्दांचीं रूपें दोन्ही काव्यांत आहेत. संबंधी व दर्शक सर्वनामाचीं नपुंसकलिंगी अनेकवचनाचीं रूपें जें-तें अशीं दोन्ही काव्यांत सांपडतात.

(७) वाक्यप्रयोगः—

रु. ह. तें पाविजे कुंडिन पद्मनेत्रें
मु. ख्या. न बोलतां म्यां धरिजे अबोला.
रु. ह. नियतचि मग काळें या मला बोढिजेतें
मु. ख्या. न बाधिजे तें मजला प्रमादें.

(८) वाक्प्रचारः—

(अ) अपायीं पडणें—

रु. ह. अशा प्रकारें पडशी अपायीं.
मु. ख्या. पडेल कैसा मग तो अपायीं ?

(आ) धंदा टाकणें—

रु. ह. टाकून दे मजनिमित्त समस्त धंदा
मु. ख्या. टाकूनियां सर्व शरीर धंदा

(इ) धंदा असणें—

रु. ह. निशिदिनिं शितिकंठा हा जयाचाच धंदा
मु. ख्या. ज्यांला असे केवळ हाच धंदा

(ई) नातें लावणें—

रु. ह. लावीत त्यांसी अनुकूल नातें
मु. ख्या. ते लाविती ब्रह्मपदास नातें

(९) प्रश्नालंकार (प्रश्नरूपानें विधान करण्याची रीत)—

रु. ह. कसें पतीचें मन आकळीना ?
मु. ख्या. तो आपलें कांक्षित कां न लाधे ?
रु. ह. संतान तें शल्य कसें न होतें ?
मु. ख्या. चिंतित तेणें मग कां बुडावें ?

(१०) उच्चनीच मनोवृत्तीचा उत्कर्षापकर्ष दर्शविण्याची रीत—

रु. ह. विवेक दारिद्र्य दशेस आला.

मु. ख्या. तृष्णेस दारिद्र्य बहूत आलें
रु. ह. हा क्रोध चांडाळ सदा विटाळीं
मु. ख्या. विहारवार्तेस विटाळ तेथें.

( ११ ) कथेंतील मुख्य व्यक्तीशीं सृष्टीचें तादात्म्य—
रु. ह. सये माझ्या दुःखे उपवनलता या दुखवती
मु. ख्या. वासंतिका चंपक कुंदजाती
न देखतां त्यास सुकोन जाती

( १२ ) रु. ह. काव्य कृष्णभक्तिरसानें थबथबलेलें आहे. मु. ख्या. काव्यांत कृष्णभक्तिरसाचा एक तुषारच आहे. तथापि कृष्णभक्ति व्यक्त करण्याचा त्या काव्यांत प्रसंग नसतांही कवीनें तो प्रसंग आणून 'मनीं तया भक्ति असे उदेली,' असें म्हणून ती व्यक्त केली आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

( १३ ) रु. ह. काव्यांत गृहस्थाश्रमाला श्रेष्ठत्व दिलें आहे. मु. ख्या. काव्यांत तसेंच दिलें आहे, इतकेंच नव्हे तर गृहस्थाश्रमाचा आदर्श दाखविणें हाच तें काव्य रचण्याचा प्रधान हेतु आहे. गृहस्थाश्रमाची प्रशंसा--

रु. ह. चहूंमध्यें मुख्य प्रकटच गृहस्थाश्रम असे ।
असें विश्रांतीचें निलय दुसरें आणिक नसे ॥
प्रसंगें हे तेथें अतिथिपरिचिर्या जरि घडे ।
समारंभें अंतीं सुरपतिपुरद्वार उघडे ॥
मु. ख्या. गार्हस्थ्यधर्मीं मग मुद्गलानें ।
संतुष्ट केलें द्विज फार मानें ॥
निर्वाणलक्ष्मीप्रति जें निदानें ।
केलीं तयानें बहु अन्नदानें ॥

गृहस्थाश्रमास अतिथिपरिचिर्येनें महत्त्व येतें हें श्रीकृष्णाच्या उदाहरणानें रु. ह. काव्यांत दाखविलें आहे व मुद्गलाच्या उदाहरणानें मु. ख्या. काव्यांत दाखविलें आहे. रु. ह. काव्यांतील वरील 'समारंभे...' ही ओळ मु. ख्या. तील मुद्गलाकरितां केलेल्या समारंभालाच उद्देशून आहे कीं काय असें वाटतें. मु. ख्या. काव्यांत अशा समारंभाचें वर्णन आहे.

( १४ ) गृहस्थाश्रम हा मुख्यतः पतिपत्नीच्या परस्पर अनुकूलतेवर अवलंबून आहे. पतिपत्नीसंबंध कसा असावा याचें वर्णन--

रु. ह. जीच्या गुणांची बहु त्यास गोडी
तेही तयाची वचनें न मोडी
मु. ख्या. जीच्या मनीं ध्यान सदा पतीचें
त्याला असें प्रेम तसेंच तीचें

रु. ह. मिळोन जावें मन दंपतीचें
तरीच घेती सुख संपतीचें
मु. ख्या. दोघांजणांचें अनुकूल्य जेथें
त्रिवर्ग वाढे बहु फार तेथें
रु. ह. त्याच्या मनाशीं मन मेळवावें
त्वां नित्य त्याचे मिळणीं मिळावे
मु. ख्या. दोघां विसंवाद कधीं नसावा
तरीच चित्तास असे विसावा
रु. ह. कुलस्त्रीला बाई पतिविण दुजें दैवत नसे.
मु. ख्या. स्त्रियांस तों दैवत अन्य नाहीं.

मु. ख्या.तील या ओळीच्या वरील दोन ओळी अशा आहेतः—

मु. ख्या. उत्कृष्ट तो धर्म पतिव्रतांला
स्वधर्म जेणें घडतो पतीला

यांत पतिव्रतेच्या धर्माचे उत्कृष्ट लक्षण सांगितलें आहे. असो.

रु. ह. परित्याग स्त्रीचा कवण पुरुषार्थी नर करी
मु. ख्या. याकारणें रक्षण अंगनेचें
धर्मज्ञ जो कीं न करील सांचे
अकीर्ति तो फार जनांत पावे
तसाच अंतीं नरकीं थिरावे

यांत पतिधर्माचीही फोड केली आहे.

रु. ह. विहारीं आहारीं निजपतिस वंचीत असती
वटाग्रीं तत्कर्मे प्रतिफळित सर्वांस दिसती
मु. ख्या. क्षुधार्त ही दुर्बल आत्मभर्ता
टाकूनियां जेविल कोण कांता
प्रपंच ज्या कीं करिताति नारी
त्या रौरवीं हो पचताति घोरीं

( १५ ) गृहास्थाश्रमांत दानाची प्रशंसाः—

रु. ह. अवो जों जों ज्यावें तवरि करिजे हात वरता
पहा हा विश्वात्मा तरिच पुरवी देव पुरता
मु. ख्या. जे अल्पही परि मनें नर दान देती
त्याला सुरोत्तम पदें मग चोजवीती

( १६ ) प्रपंचांत अनासक्ति, निष्कामताः—

रु. ह. येथें उदासीनपणें रहातां

चढेल•अद्वैत निधान हातां
मु. ख्या. करूनियां सर्व अलिप्त होसी
कर्मीं अकर्मीं तुज चाड नाहीं
× × ×
देहीं अदेहीं नस कोड कांहीं
प्रवृत्ति लोकांत अशी असोशी
म्हणोनि तेथें तुजला असोशी

हें ईश्वरा संबधानें म्हटलें आहे.

रु. ह. तेथें अनासक्तपणें असावें
मु. ख्या. वर्णाश्रमीं जें उचितें स्वकर्में
तें आचरावीं उगलींच धर्में

( १७ ) देव व त्यांचे स्वर्गांतील भोग याविषयीं अनादरः—

रु. ह. देवासही मानव नादरीति
मु. ख्या. गीर्वाण हे मानस वंचिताति
× × ×
या स्वर्ग मार्गा तरि नावलोकी

दोन्ही काव्यांत कवीनें देवांना भूलोकांवर वास करण्याकरितां आणलें आहे.

( १८ ) भगवच्चरित्रवर्णन—

रु. ह. अनंत ब्रह्मांडें उदर कुहरीं जें कुहिजती
मु. ख्या. ब्रह्मांड तूझ्या उदरांत डोले
रु. ह. त्वां हालवील्याविण हें न हालें
× × ×
हें सर्व आहे नटनाट्य तूझें
× × ×
माया महा नाटक सूत्रधारी
मु. ख्या. तूं एकला होउनि सूत्रधारी
चराचरा नाचविशी मुरारी
रु. ह. मनामध्यें तूझ्या स्वपरजनवैषम्य न वसे
मु. ख्या. वैषम्य तूतें अणुही न साहे

(१९) ब्रह्मविचार—

रु. ह. नसेच हा वस्तु विवेक केला
मु. ख्या. अव्यक्तही वस्तु तपास केलें

( २० ) मुद्गलपत्नीचें वर्णन—

रु. ह. पतिव्रता मुद्गल धर्मपत्नी

+ + +

अहो लोपामुद्रा प्रभृति अनुसूयावधि सती
जयेच्या लक्षांशें करुनि तुळणे येत नसती
अशी जे हे बाळा मुनिवर महा मुद्गल वधू ॥
वदे ते अंबेसी धवधवित जीचा मुखविधू

मु. ख्या. समस्त विद्योदधि पार पावे
जाबालिकेचा (मुद्गलपत्नि) मग लाभ पावे ।
पतिव्रता जीस भजेत भावें
म्हणेत सौजन्य इसीं असावें ॥

रु. ह. काव्यांतील वरील श्लोकांत मुद्गल पत्नीचें वर्णन आहे. त्याचा मुद्गलाख्यान काव्याकडेच रोंख आहे असें म्हणावें लागतें. कारण, मुद्गलपत्नीला इतकें महत्त्व देणारा कवि मु. ख्या. कर्त्या सामराजा शिवाय दुसरा कोणी असेल असें वाटत नाहीं. मु. ख्या. काव्यांत प्रसंग नसतांना प्रकट केलेली कृष्णभक्ति व रु. ह. काव्यांत कारण नसतां इतका प्रशंसापूर्वक केलेला मुद्गलपत्नीचा उल्लेख या दोन्ही गोष्टी दोन्ही सामराजांचें स्पष्ट ऐक्य दर्शवितात.

६. दोन्ही काव्यांत एककर्तृत्वदर्शक ज्या गोष्टी साधारण नजरेस आल्या त्या वर दिल्या आहेत. त्यांवरून दोन्ही काव्यें एकाच कवीचीं असें मानण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. वरीलपैकीं फार तर दोन चार बाबीसंबंधानें साम्य भिन्न कवींचेंही असूं शकेल; पण सर्व बाबी मिळून एकत्र लक्षांत घेतल्या असतां इतकें साम्य दोन्हीं काव्यें एकाच कवीचीं असल्याशिवाय सांपडणें शक्य वाटत नाहीं. दोन्ही सामराजांच्या एकत्वाचा प्रश्न सोडविण्याच्या दोन प्रकारांपैकीं एक प्रकार येथवर झाला. आतां वर तिसऱ्या कलमांत सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या प्रकाराकडे वळूं.

७. रु. ह. काव्य शामभट आर्वीकरानेंच केलें असें मानण्याचीं कारणें:—

( १ ) मु. ख्या. काव्य हें जसें कोल्हापुरचे राजोपाध्ये यांजकडे मिळालें तसेंच रु. ह. काव्यही त्याच राजोपाध्यांकडे आहे. मात्र त्याचीं पानें तुटक तुटक सांपडतात. बाकीचींही तेथेंच शोध केल्यास सांपडण्याचा संभव आहे.

( २ ) रु. ह. काव्यांत परीक्षितीनें शुकास खालील प्रश्न केले आहेत:—

हे रुक्मिणी देववरें वरोरू । नेली कसी द्वारवतीस भीरू ॥
स्वयंवरीं कृष्ण कसा वरीते । केलें कसें साहस सावरीते ॥
जिंकूनिया मागधशाल्व राजे । प्रताप ज्यांचा जगतींत गाजे ॥
तेणें विवाहीं विधि राक्षसांचा । केला कसा सांग उदार साचा ॥

या प्रश्नाचें समाधान होण्याइतकी कथा रु. ह. काव्यांत आली नाहीं. तिची पूर्तता रुक्मिणीस्वयंवर हें काव्य रचून याच कवीनें केली असावी असें वाटतें. हें काव्यही राजोपाध्ये यांचेकडूनच मिळालें असें कै. भावे लिहितात. मु. ख्या., रु. ह. व रु. स्व. हीं तिन्ही काव्यें ज्याअर्थी एकाच घराण्यांत सांपडतात व सामराज हेंच नांव कर्तृस्थानीं धारण करितात त्याअर्थी तीं तिन्हीं त्याच घराण्यांतील मु. ख्या. कर्त्या शामभट आर्वीकरानें केलीं असावीं असें साहजिक अनुमान निघतें.

( ३ ) तुळजापुरवासिनी व मल्लारि हीं राजोपाध्ये घराण्याचीं अर्थात् शामभट आर्वीकराचीं कुलदैवतें होत. त्यांचा उल्लेख रु. ह. काव्यांत आला आहे. ' मुद्गल ' हा कुलस्वामी आहे. त्याचा उल्लेख त्याच्या पत्नीचा संबंध आणून ' मुद्गलधर्मपत्नी, ' ' मुद्गलवधू ' असा करण्यांत आला आहे. शामभट आर्वीकर कोल्हापुर प्रांताकडे रहात होता. तिकडील ' बाला ' व ' बगला ' या उपदेवता होत. त्यांचीही नांवें. रु. ह. काव्यांत आणलीं आहेत. या सर्व उल्लेखांवरून रु. ह. काव्याचें कर्तृत्व शामभट आर्वीकर यासच येऊन चिकटतें.

( ४ ) रु. ह. कर्ता राजदरबारपरिचित होता याविषयीं भिन्न मत नाहीं. तसेंच न्याय, मीमांसा, वेदांत या शास्त्रासंबंधी चर्चा रु. ह. काव्यांत आली आहे. ( शास्त्रचर्चेचा उल्लेख मु. ख्या. काव्यांतही आला आहेच ). तीवरून तो शास्त्रपरिचित होता हेंही मान्य करावें लागतें. तसेंच रुक्मिणीकडून करविलेल्या देवीच्या यथासांग पूजेचें जें मार्मिक व सविस्तर वर्णन त्या काव्यांत आलें आहे, त्याप्रमाणेंच तिच्याकडून करविलेल्या कुलधर्म कुलाचारांचें जें वर्णन आलें आहे त्यावरून हा कवि अर्चनविधि, कुलधर्म, कुलाचार यांचाही पूर्ण परिचित होता असें म्हणणें भाग पडतें. असा हा राजदरबार शास्त्र व अर्चनविधि या तिन्ही गोष्टींशीं सारखा परिचित असलेला कवि या तिन्ही संबंधीं कामें ज्या धंद्यामुळें अगर वृत्तीमुळें नेहमीं करण्याचा प्रसंग त्या कालीं येत होता, ती वृत्ती चालविणाराच असला पाहिजे. ती वृत्ति म्हणजे अर्थात् पंडितराव राजोपाध्ये यांचीच होती, कारण राजघराण्यांत हीं तिन्हीं कामें करण्याचा संप्रदाय या घराण्याकडेच होता. वरील परिचयत्रयाच्या खुणेनें रु. ह. काव्याच्या कर्तृत्वाचा माग काढीत गेलें असतां तो माग आपणांस शामभट आर्वीकर ऊर्फ सामराज याजपाशींच नेऊन पोंचवितो.

८. येणेंप्रमाणें दुसऱ्या प्रकारानें प्रस्तुत प्रश्न सोडविला तरी मु. ख्या काव्याप्रमाणें रु. ह. काव्याचेंही कर्तृत्व शामभट आर्विकर याचेकडेच येतें. दोन्हीं काव्यांच्या एककर्तृकत्वाची दिशा दाखविण्यास दोन्हींच्या कर्त्यांचें नांव सामराज एवढेंच साधन नसून ती दिशा बिनचूक दाखविणारीं दुसरींही, बरींच साधनें आहेत हें वरील विवेचनावरून लक्षांत येईल.

९. मु. ख्या. काव्य महाभारतांतील आश्वमेधिक पर्वांतर्गत अनुगीत पर्व अध्याय ९० यांतील नकुलाख्यान याचे आधारानें रचिलें आहे त्यांतील आरवीतीर्थवर्णन पद्मपुराणांतर्गत मौद्गलतीर्थवर्णनाचे आधारानें केलें आहे. मु. ख्या. काव्यांत 'तो वंदिजे मुद्गलराज आधीं' असें कवीनें म्हटलें आहे. त्यास अनुसरून कवीनें आधीं मुद्गलवर्णनपर काव्य रचून मग इतर काव्यें केलीं असावीं. मु. ख्या. काव्यांतील समानार्थक स्थळें वर दिलीं आहेत तेवढींसुद्धां त्याचा कर्ता अविद्वान् नव्हता हें ठरविण्यास पुरेशीं आहेत. रु. ह. काव्यांतील ओज, प्रसाद, माधुर्य, प्रतिभा, कल्पकता, स्वभावोक्ति हे गुण मु. ख्या. काव्यांत उत्कटत्वानें नसले तरी बीज-रूपानेंही नाहींत असें नाहीं. पूर्वापर कालपरत्वें एकाच कवीच्या दोन काव्यांत या बाबतींत फरक पडणें साहजिक आहे असें श्रीयुत कानिटकर म्हणतात त्याचप्रमाणें या दोन काव्यांत या बाबतींत फरक पडला आहे असें वाटतें. याचें दिग्दर्शन खालील एका उदाहरणानें होण्यासारखें आहे. मु. ख्या. काव्यांत 'उदार जो धीर पवित्रकीर्ति' अशी एक ओळ आहे. हिचेंच अलंकारिक भाषेंत रु. ह. काव्यांत रूपांतर केलें आहे तें, 'कीर्तीसुधांशूस परीक्षिती हो' असें आहे. असाच फरक दोन्ही काव्यांच्या गुणांत पडला आहे. असो.

१० मु. ख्या. काव्य प्रसिद्ध झाल्यावर प्रस्तुत विषयासंबंधीं अधिक विचार तज्ज्ञ करूं शकतील. तसेंच रुक्मिणीस्वयंवर काव्य उपलब्ध झाल्यावर यासंबंधीं अधिक निश्चित मत देतां येण्याचा संभव आहे.

---


# भक्तिमणिमाला.

**संपादकः—ल. रा. पांगारकर, बी. ए.**

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृत–मधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधु-संतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५० किंमत १॥ रु. व्ही. पी. नें १८१३.

पत्ताः—**व्यवस्थापक मुमुक्षु, पुणें.**

# सामराजकवींचा काल.

लेखक—प्रल्हाद धोंडो कानिटकर, बी. ए. एल्एल्. बी. भोर.

## लेखांक ३ ( शेवटचा )

## सामराज, तुकाराम व समर्थ.

१. सामराज व तुकाराम यांची तुलना फक्त शब्दांपुरती करावयाची आहे. तुकाराममहाराजांची अभंगवाणी प्रसिद्ध आहे व वामन पंडितांनीही तुकाराम-स्तुतिपर श्लोक लिहिले आहेत. तुकारामबोवांच्या जन्मकालाबद्दल विद्वानांचें ऐकमत्य नाहीं. कै० राजवाडे यांच्या मताप्रमाणें तुकारामाचा जन्म शके १४९० च्या सुमारास झाला असावा; महाराष्ट्रसारस्वतकारांनीं तुकारामाचा जन्म शके १५३० या वर्षीं झाला असें मानलें आहे. जन्मकालाबद्दल जरी भिन्न मतें असलीं, तरी तुकारामास संसाराचा वीट येऊन त्यांना वैराग्य उत्पन्न झालें व शके १५५१ नंतर त्यांच्या अभंग-लेखन-व्यवसायाचा प्रारंभ झाला व ते शके १५७२-७३ या वर्षीं (सदेह) वैकुंठास गेले या दोन गोष्टींसंबंधीं भिन्न मत नाहीं. यावरून तुकारामांचे अभंगांत आढळणारे जुनाट मराठी व फार्सी शब्द शके १५५१-७२ या काळांत मराठी भाषेंत रूढ होते असें निश्चयानें म्हणतां येतें. हा काळ म्हणजे शिवाजीमहाराजांच्या जन्मापासून तोरणा किल्ला त्यांनीं घेईपर्यंतचा स्थूल मानानें होय. या काळांत महाराष्ट्रांत मुसलमानी अंमल करडा होता व त्यांना कोणीही बलवान् प्रतिस्पर्धी नव्हता. अशा स्थितींत नित्य व्यवहारांतील सर्व वस्तूंस फार्सी नांवें आलीं व तत्कालीन वाङ्मयांतही फार्सी शब्द प्रविष्ट झाले, यांत आश्चर्य नाहीं. ' राजा कालस्य कारणम् '-या उक्तीचा सर्व बाबतींत अनुभव येतो; व त्यास अनुसरूनच राजभाषेंतील शब्दांस-ते यावनी होते तरीसुद्धां-एकनाथ, तुकाराम, रामदास या महात्म्यांच्या काव्य-वाङ्मयांत यदृच्छेनें स्थान मिळालें, हा कालाचा महिमा होय.

२. ज्ञानेश्वरांचे पश्चात् जे जे प्रसिद्ध संतकवि महाराष्ट्रांत झाले त्या सर्वांनीं थोड्याफार प्रमाणांत फार्सी शब्दांचा उपयोग आपल्या वाङ्मयांत केला आहे; व ही गोष्ट कै० वामन दाजी ओक यांनीं निबंधमालाकारांस पत्र लिहून सप्रमाण सिद्ध केली आहे. सदर पत्र निबंधमाला भाग ३, अंक ५० वा, यांत छापलेलें आहे. त्यांतील तुकारामासंबंधीं उतारा देतों:—

## तुकाराम.

लोक फार वाखा* अमंगळ झाला । त्याचा त्याग केला पांडुरंगा ॥ १ ॥
रोजकीर्द* जमा* धरूनि सकळ । खतावला* काळ बराबरी ॥ २ ॥
माझ्या वडिलांची मिराशी* देवा । तुझी चरणसेवा पांडुरंगा ॥ ३ ॥
कां रे न फिरसी माघारा । अझुनि तरी फजितखोरा* ॥ ४ ॥
खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं । भार धन वाही मजुरीचे* ॥ ५ ॥
हिशेबें* आलें तें सकळाशीं प्रमाण । तेथें नाहीं आन चालों येत ॥ ६ ॥
चोरा-साठीं रदबदला* आटाहास । जळो जिणें दास्य बहुतांचें ॥ ७ ॥
केला पाहिजे विचार । मनमित्र दावेदार* ॥ ८ ॥
एका बोटाची निशाणी* । परीपाक नाहीं मनीं ॥ ९ ॥
हुकुमदाज* तुका । तेथें कोणी फुंदो नका ॥ १० ॥
उभ्या बाजारांत* कथा । हे तों नावडे पंढरिनाथा ॥ ११ ॥

**टीपः**—वरील उताऱ्यांत नक्षत्र चिन्हांकित शब्द फार्सी आहेत.

तुकाराममहाराजांचे सर्व अभंग चाळले तर सामराजानें योजलेले बहुतेक शब्द—अर्थात् फार्सी—त्यांत आढळतील. कवीचा काल ठरविण्यास हा महत्त्वाचा अंतर्गत पुरावा समजला जातो. वामन पंडित, बीडकर विठ्ठल व आनंदतनय यांच्या काव्यांत फार्सी शब्दांचें प्रमाण फारच अल्प आहे. सामराज व तुकाराम यांनीं जे सारखे शब्द वापरले आहेत, त्यांचे स्थूलमानानें केलेलें टिपण खालीं देत आहे. त्यांत फार्सी शब्द, जुनाट मराठी शब्द व अलंकारवाचक शब्द असल्याचें दिसेल.

## ३ तुकारामाचे अभंगांतील शब्द.

अनाड, अनारिसा, अबीर, अवो, असोसी, अक्षवाणे, आइती, आघवे, आण, आतळणें, आहेव, इतुले, उगले, उगवणें, उजवणें, उबग, उबारा, उमगणें, एकावळी, कंथा, कपाट, कपाट देणें, कांट, कुडावा, कुडें, कुरवंडी, कोमाइणें, गमणें, गोमटें, गमावणे, गव्हार, गिंवसणे, गोंवणे, गोवळा, घाल-मेल, घुरट, घोण, चाट, चितांक, चिकसा, चुडे, चेडे, जिव्हार, जेठी, जोहरी, झळंबणें, झांसा, टोप, डंखणें, डाव, तई, तांतडी, तेजी, तोडर, दमामा, दार-वंट, दुलडी, दोरा, धडफुडी, धिंवसा, नयोन, नवजणें, नेपुर, न्याहाली, पाखर, पाटाव, पारखा, पाव, पावा, पैंजण, बरळ, बराडी, बाजुबंद, बाहणे, बाहे, बुझावणी, बुंथी, माज, माव, मुखरिण, मूळ, मोळा, यंत्रधारी, येकावळी, रद-बदली, राजस, लिगाड, वरपंग, वळवट, वांकी, वेंघणें, वेठी, वोवणी, शिदोरी, शेटे, सिले, सिसफुल, हातसर, हुंबरी, हेर=क्षुल्लक, हलकट.

४. रुक्मिणीहरण काव्यांत समर्थ वाङ्मयांतील तीन गोष्टींचा उल्लेख आढळतो; त्या गोष्टी क्रमानें देत आहे.

(१) तिसऱ्या सर्गांत रुक्मीनें जी लग्नाची तयारी केली आहे त्यांत फळांचें वर्णन ४८।४९ या श्लोकांत दिलें आहे. तें वर्णन व समर्थांनीं शके १५६६ सालीं केलेलें ब्रह्मारण्याचें वर्णन यांत फारच साम्य आहे. समर्थांचें वर्णन शिवचरित्रप्रदीपांत (पृष्ठ २९०) दिलें आहे. यासंबंधानें स्वतंत्र लेखांत विचार केला आहे, सबब पुनरुक्ति करीत नाहीं.

(२) तिसऱ्या सर्गांत सामराजानें सायंकालवर्णन केलें आहे, त्यांत खालील श्लोक आहे:—

तदुपरि उगवे हा चंद्रमा पौर्णिमेचा ।
अनभिलषित अर्थी होय ये उत्तमेचा ॥
द्विजपति विसरेना सर्वथा स्वीय दीक्षा ।
कर पसरुन मागे वस्त्रलावण्यभीक्षा ॥ १०१ ॥

या श्लोकांतील तिसरा व चवथा हे दोन चरण महत्वाचे आहेत. "द्विजपति" व "कर" हे श्लिष्ट शब्द आहेत. द्विजपति = चंद्र, ब्राह्मण; कर = चंद्रकिरण, हात. या श्लोकाचे दोन अर्थ आहेत; (१) आपले किरणरूपीं हात पसरून चंद्र रुक्मिणी–मुख–लावण्याची भिक्षा मागत आहे. वास्तविक चंद्र हें उपमान असून मुख हें उपमेय असतें; परंतु या ठिकाणीं उपमानापेक्षां उपमेयाचें सौंदर्य (निष्कलंक असल्यामुळें) अधिक दाखवून उपमानाकडे गौणत्व दिलें आहे यामुळें कवीनें व्यतिरेक अलंकार साधला आहे. (२) ब्राह्मणाचा नित्य व्यवसाय भिक्षा मागण्याचा आहे यामुळें तो हात पसरून (लावण्य) भिक्षा मागत आहे, असा दुसरा अर्थ आहे. दुसरा अर्थ लक्षांत घेतला असतां, समर्थांच्या प्रसिद्ध ओंवीची आठवण होते:—

ब्राह्मणाची नित्य दीक्षा । मागीतली पाहिजे भिक्षा ।
ओंम् भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥ द० १४ स० २.

(३) सहाव्या सर्गांत रुक्मिणीविवाहाकरितां जे अनेक पंथांचे ब्राह्मण आले त्यांचें वर्णन दिलें आहे; त्यांत खालील श्लोक आहे:—

कित्येक तेथें अजपा जपेतीं ॥ ४५ ॥

समर्थांनीं दासबोधांत (द० १७ स० ५) अजपा निरूपण केलें आहे, त्यास अनुसरून वरील उल्लेख असावा असा भास होतो.

समर्थांचा अवतार शके १५३० सालीं झाला असून, त्यांनीं शके १६०३ या सालीं आपलें अवतारकृत्य पुरें करून, ते वैकुंठास गेले. समर्थ शके १५६६ सालीं महाबळेश्वरास होते. तुकाराममहाराजांचा अभंगरचनेचा काळ व समर्थांचे ब्रह्मारण्यवर्णनाचा काल या दोन गोष्टी लक्षांत घेतल्या असतां शके १५७० ते

१५७५ चे सुमारास साम्रराजानें "रुक्मिणीहरण" रचिलें असा निष्कर्ष निघतो.

५. सामराजाचा काल ठरविण्याचे बाबतींत उपलब्ध साधनें एकत्र सांपडावींत या दृष्टीनें विठ्ठल कळपुरकर व लोलिंबराज या दोन कवींचा निर्देश करणें इष्ट आहे. विठ्ठल कळपुरकर यानें रासक्रीडा नांवाचें काव्य शके १५३६ ( आनंद संवत्सर ) या वर्षी लिहिलें आहे. तें सर्व काव्य उपलब्ध नाहीं. तथापि त्यांतील आद्यंताचे कांहीं श्लोक सरस्वतीमंदिर मासिकाच्या अंकांत कै. राजवाडे यांनीं दिले आहेत. त्यावरून साम्याची कल्पना येते. ते श्लोक व तत्सदृश सामराजाचे श्लोक खालीं देतोः--

**विठ्ठल-रासक्रीडा.**

( १ ) गणपति—वरदानें स्फूर्ति अद्भुत आहे ।
मृदु पदरचनेचे श्लोकसाहित्य पाहे ॥
कुज म्हणतिल वाचा काय भाषा मऱ्हाटी ।
परि सुरसजनातें प्रीति होईल मोठी ॥ २२९ ॥

( २ ) जनक तूं जननी द्विरदानना ।
तुजविणें दुसऱ्यास भजेचिना ॥
हरिकथा वदतां कवि विठ्ठला ।
करि कृपा शरणागतवत्सला ॥ २ ॥

**सामराज सर्ग ( १ ).**

वंदी मना पाय गजाननाचे ।
जे सिंधु कल्पद्रुम काननाचे ॥
जे वंदिल्या विघ्न पळोन जाती ।
स्फुरेत ही फार कवित्वजाती ॥ १ ॥

( २ ) असे मऱ्हाटी निज देश भाषा । नयेत उक्ती बहुशा विशेषा ॥
तथापि जे कीं निजभक्त तूझे । न पाहती ते गुणदोष माझे ॥३३॥

सामराजाचे वरील दोन श्लोक व रासक्रीडेंतील २२९ वा श्लोक यांत विलक्षण साम्य दिसतें.

**सामराज-सर्ग ६.**

जनक हे जननी मजला नसे ।
यदुपती मज आस तुझी असे ॥ १३३ ॥

हा अर्धश्लोक व रासक्रीडेंतील २ ऱ्या श्लोकाचे पहिले दोन चरण यांतही साम्य दिसतें. दोन श्लोकांवरून सबंध काव्यांत असेंच साम्य असेल अशी कल्पना करणें सशास्त्र होणार नाहीं; परंतु ती कल्पना सत्य ठरल्यास, सामराज शके १५३६ नंतर झाला असावा असें म्हणतां येईल.

६. लोलिंबराज हा जुन्नर येथें राहणारा; जातीनें ब्राह्मण; परंतु प्रेमपाशांत गुंतून यवनीशीं (जगन्नाथपंडिताप्रमाणें) त्यानें लग्न केलें. यवनीचें नांव रत्नकळा; तिच्या अकालीं निधनानें लोलिंबराजाचें विषयसुख संपलें. नंतर त्यास उपरति होऊन तो महान् साधु झाला. त्याचा काल शके १५५६. वैद्यजीवन नांवाचा त्याचा ग्रंथ आहे वगैरे माहिती महाराष्ट्र सारस्वतांत आढळते. भा. इ. सं. मंडळाच्या शके १८३७ च्या इतिवृत्तांत (क्रमांक १३२) "लोलिंबराज व रत्नकला चरित" यासंबंधी लेख आहे. त्या चरित्रांतील भाषेची छाप रु. हरणांत प्रतीत होते:—

**लोलिंबराज.**

(१) अमृतमधुर ज्याचे श्लोक भूपाळ नारी ।
पढत पढत केले कौतुकें थोर सारी ॥
हरि हृदयचि तो हा रूपविद्याविलासी ।
उठ सखि मजपाशीं आणि लोलीमकासी ॥ १ ॥
(२) मजविण घडि कोठें जासि ना तूं रसाळे ।
न पुसत परलोका केवि गेलीस बाळे ॥ २ ॥
(३) चटपट सुटलीसे जीव कोठें न राहे ।
वदन धरुन हस्तीं येकली वाट पाहे ॥
करुनि सकल शोभा दर्पणीं रूप पाहे ।
पति अजुनि नये कां हेचि चिंतीत आहे ॥ ३ ॥

म. सारस्वत पृ. १६९.

हे श्लोक व रु. ह. सर्ग ३ श्लो. १०८-११० यांतील भाषा सारखी वाटते. लोलिंबराज हाही प्रसिद्ध पुरुष होता, यामुळें त्याचें कवित्व सामराजानें पहाणें शक्य होतें.

या बाबतींत जे लेख प्रसिद्ध केले आहेत त्यावरून एकनाथ, विठ्ठल कळपुरकर व लोलिंबराज यांचेनंतर सामराज झाला असावा; तुकाराम, समर्थ, वामन पंडित, नागेश, जयराम पिंड्ये व परमानंद (शिवभारतकार) यांचा सामराज समकालीन असावा; तसेंच वेणाबाई, बिडकर विठ्ठल, आनंदतनय हे सामराजानंतरचे कवि असावेत असें वाटतें. सुचलेल्या कल्पना विद्वज्जनांस परीक्षणार्थ सादर केल्या आहेत. सामराजाच्या काळ ठरविण्याचे प्रश्नास चालना मिळावी येवढयाच हेतूनें हे लेख लिहिले आहेत. ज्या वाग्देवीच्या कृपेनें ही लेखमाळा संपूर्ण झाली तिच्याच चरणीं ती अर्पण करून वाचकांची रजा घेतों.

---

## पांगारकरांचीं पुस्तकें.

१. भक्तिमार्गप्रदीपः—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ॰८ व्ही. पी. नें ॰१२.

२. संतचरित्रमाला:—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं रु. १॰८.

३. श्रीएकनाथचरित्रः—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ॰१२.

४. कविरामायणः—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ॰४.

५. आनंदलहरीः—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ॰१२.

६. नारदभक्तिसूत्रेंः—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे किं ॰८.

७. नवविधाभक्तिः—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ॰६.

८. निरंजनमाधवांची कविताः—भाग २ व ३ किं. १॥ रु.

९. श्रीज्ञानेश्वरचरित्रः—( आवृत्ति दुसरी )चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १॰८.

१०. भक्तिमणिमालाः—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १॰८.

पत्ताः—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

स्थळप्रत
[illegible]

[illegible]
ती........
[illegible]